

साम्राज्यवादी षड्यंत्र
अनुवादक
डॉ. सुमन वैध
डॉ. शांता कोठेकर
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

**मूळ इंग्रजी लेखकांबद्दल थोडेसे –**

दुसऱ्या महायुद्धापूर्वी नाझींनी युरोपीय राष्ट्रात केलेल्या पंचमस्तंभीय कारवायांवर संशोधन करून तत्संबंधीची सत्य हकीकत प्रथमच जगापुढे ठेवली ती मायकेल सेअर्स या अमेरिकन लेखकाने.

अलबर्ट काहन यांचाही या विषयावर लिहिण्याचा अधिकार वादातीत आहे नाझी प्रचाराला तोंड देण्यासाठी जर्मनीतील अमेरिकन राजदूत विलियम डांड यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या अमेरिकन कौंसिलचे ते कार्यकारी सचिव व नाझींच्या कूटकारस्थांनावर झगझगीत प्रकाश टाकणाऱ्या 'द अवर' या वृत्तपत्राचे संपादक होते.

सेयर्स व काहन यानी संयुक्त रित्या लिहिलेल्या ग्रंथापैकी 'साबोटेज द सीक्रेट वॉर अगेन्स्ट अमेरिका' व 'द प्लॉट अगेन्स्ट पीस' हे त्यांचे ग्रंथ विशेष लोकप्रिय ठरले आहेत.

आज संपूर्ण मानव जात सर्वसंहारक अशा स्टार वॉरच्या भयाने भयाकुल झालेली असता या विनाशकारी परिस्थितीची बीजे कशी व कोठे रोवली गेली यावर प्रकाशझोत टाकण्याच्या दृष्टिने हा ग्रंथ अतिशय मोलाचा ठरतो.

अनुक्रमणिका

# साम्राज्यवादी षड्यंत्र

मायकेल सेयर्स व अलबर्ट काहन यांच्या
The Great Conspiracy या ग्रंथाचा
अनुवाद

अनुवादक

डॉ. सौ. सुमन वैद्य
डॉ. शांता कोठेकर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
मंत्रालय, मुंबई.

अनुक्रमणिका

'साम्राज्यवादी षड्यंत्र'
The Great Conspiracy
By Michael Sayers and Albert Kahn.
Published by Boni and Gaer, I. N.C.
133 West 44th Street, New York 18, NY.
या ग्रंथाचा अनुवाद

प्रकाशक: सु. द्वा.देशमुख, सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
मंत्रालय, मुंबई.

अनुवादक: डॉ. सौ. सुमन वैद्य
एम्. ए. (इंग्रजी) एम्. ए. (इतिहास) पी. एच. डी. (इतिहास)
माजी प्रपाठक, पदव्युत्तर इतिहास विभाग,
नागपूर विद्यापीठ, नागपूर.
डॉ. शांता कोठेकर
एम्. ए. (इंग्रजी), एम्. ए. (मराठी), एम्. ए. (इतिहास)
पी. एच. डी. प्रपाठक, पदव्युत्तर इतिहास विभाग,
नागपूर विद्यापीठ, नागपूर

सर्व हक्क सुरक्षित

प्रकाशन: डिसेंबर १९८५

मूल्य रु. ३५

मृद्रक: **चंद्रकांत तापस**
श्री प्रसाद मुद्रण
८ वर्धा मार्ग, नागपूर—१२.
दूरध्वनी : २५२१३

## अनुक्रमणिका

# अमेरिकन सेनेटर क्लॉड पेप्पर यांची मूळ इंग्रजी ग्रंथाला असलेली प्रस्तावना

अलबर्ट ई. काहन व मायकेल सेयर्स यांच्या 'रशियाविरुद्धचे महान कारस्थान' या ग्रंथावरून, गतकालीन घटनांमुळे रशियाचा वर्तमानकाळ कसा साकार झाला आहे याची सुस्पष्ट कल्पना येते. जागतिक शांतता टिकून राहण्याकरिता इतर कोणत्याही गोष्टीमुळे झाले नसेल इतके मोलाचे योगदान या ग्रंथामुळे झाले आहे.

ग्रेट ब्रिटन, अमेरिका व रशिया यांत परस्पर सलोखा व सद्भाव असला तरच जगात खऱ्या अर्थाने टिकावू शांतता नांदू शकेल. पाश्चिमात्य राष्ट्रे आपला गतकाळ साहजिकच केवळ आपल्याच अनुभवातून व दृष्टीकोनातून पाहतात. परंतु रशियातील जनतेचा अनुभव काय आहे, पाश्चिमात्य जगाबद्दल त्यांची मते व त्यांची नीती कोणत्या कारणांनी साकार झाली आहे यांची यथार्थ कल्पना आपल्यापैकी क्वचितच कोणाला असेल.

रशियन क्रांतीनंतरच्या काळातील जागतिक राजकारणाचे दर्शन रशियाच्या अनुभवांच्या चष्म्यातून या ग्रंथाद्वारे लेखकांनी घडविले आहे; रशियनांना आपल्याबद्दल काय वाटते हे त्यांनी आपल्याला जाणवून दिले आहे.

या ग्रंथात वर्णन केलेल्या कारस्थानांसारखी सोविएतविरोधी कारस्थाने जर अशीच चालू राहिली तर त्याची परिणती तिसऱ्या महायुद्धात होईल हे उघडच आहे. म्हणूनच जागतिक शांतता टिकावी याची कळकळ असलेल्या सर्व ब्रिटिश व अमेरिकन मुत्सद्यांनी, एवढेच नव्हे तर त्या दोन्ही राष्ट्रांतील सामान्य नागरिकांनीही या ग्रंथाचे परिशीलन करणे अगत्याचे आहे. जगातील प्रमुख राष्ट्रे व तेथील जनता यांनी परस्परांबद्दल सहानुभूती व सद्भाव राखला तरच शांततेची व सुखी जीवनाची मानवाला वाटणारी आशा व आवश्यकता साकार होऊ शकेल. म्हणूनच कारुण्य व दुःख यांचे रंग भरलेल्या या इतिहासाला शब्दरूप दिल्याबद्दल अलबर्ट काहन व मायकेल सेयर्स यांचे आपण सर्वजण ऋणी आहोत.

**क्लॉड पेप्पर,**
फ्लोरिडाचा अमेरिकन सिनेटर

अनुक्रमणिका

# मूळ इंग्रजी ग्रंथाच्या लेखकांविषयी थोडेसे

कुटिल राजनीती व पंचमस्तंभीय कारवाया या विषयावरील एक चिकित्सक व सखोल संशोधक म्हणून मायकेल सेयर्स व अलबर्ट काहन यांनी आंतर्राष्ट्रीय कीर्ती संपादन केली आहे.

ॲक्सिस राष्ट्रांनी केलेल्या पंचमस्तंभीय कारस्थानांवर मायकेल सेयर्स यांनी अनेक वर्षे संशोधन केले आहे. नाझींनी फ्रान्स, इंग्लंड, आयर्लंड इत्यादी देशात केलेल्या कारस्थानांची सत्य हकीकत मायकेल सेयर्स यांच्या लिखाणातूनच प्रथम जगापुढे आली. एक अव्वल दर्जाचा सिद्धहस्त लघुकथा लेखक म्हणूनही वाङ्‌मयीन जगात सेयर्स यांचे नाव सर्वश्रुत आहे. एडवर्ड जे. ओब्रियन यांनी त्यांचा साहित्य पुष्पगुच्छांचा एक ग्रंथ सेयर्स यांना समर्पित केला आहे.

अलबर्ट ई. काहन हे नाझी प्रचाराविरुद्ध प्रस्थापित झालेल्या अमेरिकन कौन्सिलचे कार्यकारी सचिव होते; तर जर्मनीतील अमेरिकन राजदूत विलियम ई. डॉड हे त्या कौन्सिलचे अध्यक्ष होते. ॲक्सिस राष्ट्रांच्या पंचमस्तंभीय कारस्थानांवर प्रकाश टाकणाऱ्या ‘द अवर’ या वृत्तपत्राचे ते संपादकही होते. जर्मनी व जपान या राष्ट्रांनी अमेरिकेत केलेल्या कारवाया जनतेसमोर मांडणारे लेखक म्हणून अलबर्ट काहन यांना चांगलीच प्रसिद्धी मिळाली.

‘साबोटेज: द सिक्रेट वॉर अगेन्स्ट अमेरिका’ हा मायकेल सेयर्स व अलबर्ट काहन यांचा ग्रंथ म्हणजे त्यांच्या संशोधक वृत्तीला व सहकार्याला आलेले पहिले फळ होय. हा ग्रंथ प्रकाशित होताच त्याच्या हजारो प्रती युरोप व अमेरिकेत विकल्या गेल्या. युद्धानंतरच्या पहिल्या काही महिन्यात प्रसिद्ध झालेला ‘द प्लॉट अगेन्स्ट पीस’ हा त्यांचा दुसरा ग्रंथही अत्यंत लोकप्रिय ठरला.

‘द ग्रेट कॉन्स्पिरसी अगेन्स्ट रशिया’ हा त्यांचा ग्रंथ प्रथम फेब्रुवारी १९४६ मध्ये प्रकाशित झाला. त्यानंतर त्या ग्रंथाच्या बऱ्याच आवृत्त्या निघाल्या. रशियात बोल्शेविक क्रांती झाल्यानंतर त्या राष्ट्राविरुद्ध करण्यात आलेल्या नानाविध भयानक कारस्थानांवर लेखकांनी झगझगीत प्रकाशझोत टाकला आहे. मूल विश्वसनीय स्रोत साधनांवर या ग्रंथाची उभारणी झाली असल्याने अमेरिकेतच नव्हे तर इतर अनेक राष्ट्रांत संदर्भ व अवतरणे याकरिता अनेक लेखकांनी या ग्रंथाचा उपयोग करून घेतला. अनेक भाषांत या ग्रंथाचा अनुवाद करण्यात आलेला आहे.

अनुक्रमणिका

ग्रंथाचे महत्त्व विशद करणारे

काही बोलके अभिप्राय –

**जोसेफ डेव्हिस– (सोविएत संघातील माजी अमेरिकन राजदूत)**

'पाश्चिमात्य राष्ट्रांप्रती सोविएत संघाची नीती साशंकतेची व अविश्वासाची बनण्यात कारणीभूत झालेल्या घटनांची माहिती सामान्य जनतेला असावी हे जागतिक शांततेकरिता अगत्याचे आहे. मूळ साधनांच्या पायावर आधारलेले हे एक विश्वासार्ह इतिहासकथन आहे. प्रत्येक अमेरिकन नागरिकाने या ग्रंथाचे परिशीलन करावे इतका हा ग्रंथ मोलाचा आहे.'

**प्रो. एफ्. एल्. शूमन–(सुप्रसिद्ध अमेरिकन इतिहासकार)**

'इतिहासाची ही कथा कोणत्याही कादंबरीपेक्षा चित्तथरारक, परंतु त्याचबरोबर मूळ साधनांवर व सत्यावर आधारलेली आहे. यातील अगदी अकल्पनीय वाटणाऱ्या घटनाही पूर्णपणे वादातीत आहेत.'

**हेन्री ए. वॅलेस– (अमेरिकेचा माजी उपाध्यक्ष)**

'जगाच्या हिताची कळकळ असलेल्या प्रत्येक व्यक्तीने रशियाविरुद्धचे महान कारस्थान हा ग्रंथ अवश्य वाचला पाहिजे.'

**सेनेटर क्लॉड पेप्पर–**

'मूळ साधनांच्या सबळ पुराव्यानिशी सादर केलेली सोविएत रशियाविरुद्धच्या आंतर्राष्ट्रीय कारस्थानांची ही सत्यकथा कोणत्याही कादंबरीपेक्षा अधिक चित्तवेधक व रोमांचकारी आहे. १९१७ च्या रशियन क्रांतीपासून ते दुसऱ्या महायुद्धानंतर भडकलेल्या शीत युद्धाच्या प्रारंभापर्यंत. त्या राष्ट्राविरुद्ध जी अनेक कटकारस्थाने झाली त्यांची तपशीलासह सुसंगत हकीकत, प्रथमच, या ग्रंथाद्वारे लेखकांनी जगापुढे मांडली आहे. हेरगिरी, घातपात, कारस्थाने, राष्ट्रद्रोह, हत्या, अशा प्रकारच्या नानाविध घटनांनी विणलेले इतिहासाचे हे एक गुंतागुंतीचे व विस्मयजनक असे वस्त्र आहे. ज्यामुळे आजपर्यंत लक्षावधी लोक प्राणाला मुकले, ज्यामुळे दुसऱ्या महायुद्धाचे होमकुंड पेटून सारे जग त्यात होरपळून निघाले, व ज्यामुळे तिसऱ्या महायुद्धाचा भस्मासुर आपल्या अक्राळविक्राळ रूपाने आज जगाला भयकंपित करून सोडीत आहे त्या भयानक व चित्तथरारक कारस्थानांवर लेखकांनी या ग्रंथात झगझगीत प्रकाशझोत टाकला आहे. आंतर्राष्ट्रींय क्षेत्रातील १९१७ पासूनच्या या घटनांच्या अध्ययनाशिवाय रशियाची परराष्ट्र नीती, ट्रूमन सिद्धांत, क्रेमलिन व आपले परराष्ट्र खाते यांतील संबंध, एवढेच नव्हे तर आजच्या जगातील आंतर्राष्ट्रीय संबंध यांचे वस्तुनिष्ठ आकलन होणे अशक्य आहे.

अनुक्रमणिका

‘आज रशियावरील सर्वात महत्त्वाचे पुस्तक म्हणजे रशियाविरुद्धचे महान कारस्थान हे आहे अशी माझी खात्री आहे.’

### डेट्राईट न्यूज—

‘आजपर्यंत वाचण्यात आलेल्या कोणत्याही ग्रंथापेक्षा हा ग्रंथ कितीतरी अधिक चित्तवेधक आहे.’

### न्यूयॉर्क हेराल्ड ट्रिब्यून—

‘या ग्रंथात वर्णन केलेल्या घटना अत्यंत खळबळजनक आहेत हे तर खरेच! परंतु त्यामुळे सोविएत रशिया व अमेरिका या राष्ट्रांत परस्पर सद्‌भाव व सलोखा निर्माण होणाऱ्या मार्गातील अडचणी स्पष्ट करण्यात या ग्रंथाने केलेल्या योगदानाकडे दुर्लक्ष होऊ नये.’

### बॅरन्स फिनान्शियल वीकली—

‘इतिहासातील सर्वात महत्त्वाच्या काळावरील या माहितीपूर्ण ग्रंथामुळे अमेरिका व सोविएत रशिया यांनी परस्परांना वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून समजून घेण्यास मदत होईल अशी खात्री आहे.’

अनुक्रमणिका

# प्रास्ताविक

युरोपातील औद्योगिक क्रांतीने मानवी इतिहासातील एका नव्या पर्वाला प्रारंभ झाला. औद्योगिक विकासाबरोबर नवी भांडवलशाही अर्थव्यवस्था व समाजव्यवस्था जन्माला आली. अनियंत्रित मारक स्पर्धा हा त्या अर्थव्यवस्थेचा मूलभूत आधार! त्यातून जागतिक स्तरावर वसाहतवाद व लष्करवाद यांचा उदय होणे अपरिहार्यच होते. या संदर्भात, भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील एक खंदे पुढारी लाला लजपतराय यांनी १९२० साली मुंबई येथे अखिल भारतीय कामगार संघाच्या सभेत बोलताना केलेले एक विधान मोठे अर्थपूर्ण आहे. ते म्हणाले होते, — Militarism and Imperialism are the twin-children of capitalism; they are one in three and three in one". लालाजींचे हे भाष्य भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या वास्तव रूपावर प्रकाश टाकणारे आहे.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या या स्वरूपाचा परिपाक पहिल्या व दुसऱ्या जागतिक महायुद्धात झाला. पहिल्या महायुद्धाची अखेर होण्यापूर्वी रशियात क्रांती होऊन बहुजन समाजाच्या कल्याणाचे व विकासाचे उद्दिष्ट असलेली समाजवादी व्यवस्था अस्तित्वात आली. भांडवलशाही व समाजवादी या दोन समाज व्यवस्थांचे मूळ स्रोत व उद्दीष्टे ही परस्परविरोधी असल्याने, रशियात साकार होऊ घातलेला नवजात समाजवाद बाल्यावस्थेतच चिरडून टाकण्याचा आटोकाट प्रयत्न भांडवलशाही सत्तांनी कसा केला व त्यामुळे त्या दोन गटांत साशंकता व शत्रुत्व कसे निर्माण झाले याचे विदारक चित्र प्रस्तुत ग्रंथात रेखाटले आहे.

आज भांडवलशाही व समाजवादी या दोन गटांतील संघर्ष अधिकच तीव्र झाला आहे. त्या दोहोतील अण्वस्त्र स्पर्धा पराकोटीला गेली असल्याने आज संपूर्ण मानवजात सर्वनाशाच्या कड्यावर उभी आहे. अशा वेळी त्या दोन गटांतील संघर्षाची खरी कारणे जाणून घ्यायची असतील तर त्या काळाचा इतिहास खऱ्या अर्थाने समजून घेणे निकडीचे ठरते. म्हणून हा ग्रंथ मौलिक स्वरूपाचा ठरतो.

या ग्रंथाच्या मौलिकतेचे मर्म आणखी दोन बाबींत साठवले आहे. एक तर मूळ इंग्रजी ग्रंथ दोन अमेरिकन प्रथितयश लेखकांनी लिहिलेला आहे. मायकेल सेयर्स हे एक अव्वल दर्जाचे संशोधक, तर अलबर्ट काहन हे तत्कालीन अमेरिकन राजकारणाशी निकटचा संपर्क असलेले एक मान्यवर पुढारी व पत्रकार आहेत. एरवी, हा ग्रंथ रशियन लेखकांनी लिहिलेला असता तर तो प्रचारात्मक व म्हणून अविश्वसनीय मानून बाजूला सारला गेला असता. तसे या ग्रंथाच्या बाबतीत निश्चितच करता येणार नाही.

दुसरे म्हणजे मायकेल सेयर्स व अलबर्ट काहन यांनी मूळ कागदपत्रांचे संशोधन करून या ग्रंथाची उभारणी केली आहे. यातील सर्व ऐतिहासिक महत्त्वाच्या विधानांना विश्वसनीय पुराव्यांचे भक्कम आधार

अनुक्रमणिका

दिलेले आहेत. एवढेच नव्हे तर त्या काळचा अमेरिकेचा रशियातील राजदूत डेव्हिस व जर्मनीतील अमेरिकेचा राजदूत डॉड यांच्या पत्रव्यवहारातील व रोजनिशीतील उतारेही लेखकांनी आपल्या विधानांच्या समर्थनार्थ जागोजागी उद्‌धृत केले आहेत. यामुळे या ग्रंथात ग्रथित करण्यात आलेल्या ऐतिहासिक माहितीच्या विश्वसनीयतेबद्दल कोणाच्याही मनात शंकेची पाल चुकचुकण्याचे कारण नाही.

या ग्रंथाचा अनुवाद करून, १९१७ ते १९४७ या ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या काळातील घटनांची आजवर बव्हंशी अज्ञात असलेली बाजू मराठी वाचकांपुढे मांडण्यात डॉ. सुमन वैद्य व डॉ. शांता कोठेकर यांनी घेतलेला पुढाकार निश्चितच स्वागतार्ह ठरतो.

**सुरेंद्र बारलिंगे**
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

**डिसेंबर १९८५**

अनुक्रमणिका

# अनुवादकांचे निवेदन

प्रस्तुत पुस्तक हे अलबर्ट काहन आणि मायकेल सेयर्स या अमेरिकन लेखकांच्या “The Great Conspiracy against Russia” ह्या इंग्रजी ग्रंथाचा स्वैर अनुवाद आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे परकीय भाषांतील दर्जेदार ग्रंथांचे अनुवाद प्रकाशित होत असतात. इतिहास आणि साहित्य व संस्कृती यांचा अन्योन्यसंबंध अतिशय निकटचा आहे. म्हणून आधुनिक जागतिक राजकारण व इतिहास यावर प्रकाशझोत टाकणारे परकीय भाषांतील काही चिरंतन महत्त्वाचे ग्रंथ अनुवादित व प्रकाशित करावे व त्याद्वारा जागतिक राजकारणाच्या स्वरूपाबाबतची उद्‌बोधक माहिती सामान्य मराठी वाचकापर्यंत पोचवावी या हेतूने अनुवादासाठी काही ग्रंथांची नावे आम्ही साहित्य आणि संस्कृती मंडळाला सुचविली होती व त्यात प्रस्तुत ग्रंथाला अग्रक्रम दिला होता. अनुवादासाठी या विशिष्ट पुस्तकाला आम्ही अग्रक्रम का दिला याच्या स्पष्टीकरणाच्या दृष्टीने या ग्रंथाला अमेरिकन सिनेटर क्लॉड पेप्पर यांनी लिहिलेली प्रस्तावना आणि या ग्रंथाबाबतचे अभिप्राय हे पुरेसे बोलके आहेत.

आमचा प्रस्ताव मंडळाने संमत केल्यानंतर, ह्या ग्रंथाचा अनुवाद कोणी करावयाचा असा मुद्दा उपस्थित झाला असता या कामाची जबाबदारी आम्ही पत्करली. आम्ही केलेला या ग्रंथाचा अनुवाद मंडळाने मंजूर केला व त्याच्या प्रकाशनाची जबाबदारीही स्वीकारली याबद्दल महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे आम्ही ऋणी आहोत. या अनुवादाच्या कामी डॉ. प्रभाकर गद्रे यांनी केलेल्या सहाय्याचा निर्देश करणे अगत्याचे आहे.

तसेच या ग्रंथाचे मुद्रण शक्य तो निर्दोष करण्याची खबरदारी घेऊन अल्पावधीत मुद्रण संपविल्याबद्दल श्रीप्रसाद मुद्रणालयाचे श्री. चंद्रकांत तापस यांचे आम्ही आभारी आहोत!

८७ अ, धंतोली
नागपूर—१२
दूरध्वनी २२८४३
डिसेंबर १९८५

**सुमन वैद्य**
**शांता कोठेकर**

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

**भाग १  क्रांती – प्रतिक्रांती**

प्रकरण १  सोविएत सत्तेचा उदय

प्रकरण २  शह प्रतिशह

प्रकरण ३  निष्णात गुप्तहेर

प्रकरण ४  सैबैरियातील धाडसी कारवाया

प्रकरण ५  शांतता व युद्ध

प्रकरण ६  परकीय लष्करी हस्तक्षेप

**भाग २  लष्करी नाकेबंदीची गुपिते**

प्रकरण ७  रशियात अडकलेले दोस्तांचे हितसंबंध

प्रकरण ८  श्वेतांचे धर्मयुद्ध

प्रकरण ९  एका दहशतवाद्याचा विलक्षण जीवनक्रम

प्रकरण १०  फिनलंड सीमेवर

प्रकरण ११  युद्धाचे आवाहन

प्रकरण १२  कोट्याधीश व घातपात

प्रकरण १३  तीन खटले

प्रकरण १४  युगान्त

प्रकरण १५  राष्ट्रद्रोहाचा मार्ग

प्रकरण १६  पंचमस्तंभाचा प्रादुर्भाव

प्रकरण १७  राष्ट्रद्रोह व दहशतवाद

प्रकरण १८  क्रेमलिनमध्ये हत्या

प्रकरण १९  निर्णयाचे दिवस

प्रकरण २०  न्यायालयीन चौकशीची अखेर

प्रकरण २१  मेक्सिकोत हत्या

**भाग ४  म्युनिक ते सानफ्रान्सिस्को**

प्रकरण २२  दुसरे महायुद्ध

प्रकरण २३  अमेरिकेतील कॉमिन्टर्नविरोध

प्रकरण २४  सोळा हस्तकांचे प्रकरण

प्रकरण २५  संयुक्त राष्ट्रसंघ

प्रकरण २६  शांतता की युद्ध?

संदर्भ ग्रंथ–सूची

अनुक्रमणिका

# भाग १

# क्रांती–प्रतिक्रांती

अनुक्रमणिका

प्रकरण १

# सोविएत सत्तेचा उदय

## पेट्रोग्राड येथे कामगिरीवर

१९१७ साल! रशियाचे भवितव्य निर्धारित करणारे ते आणिबाणीचे वर्ष! त्या वर्षी ग्रीष्माच्या ऐन भरात रशियन क्रांतीचा ज्वालामुखी धगधगत असता मेजर रेमंड रॉबिन्स नावाचा एक अमेरिकन गृहस्थ अत्यंत महत्त्वाच्या व गुप्त अशा कामगिरीवर पेट्रोग्राडला आला. [पेट्रोग्राड ही झारकालीन रशियाची राजधानी. महान पीटरचे नाव दिलेल्या या शहराला पूर्वी सेंट पीडर्सबर्ग म्हणत. युद्धाच्या प्रारंभी जनतेत देशप्रेमाची भावना प्रज्वलित करण्याच्या हेतूने, त्या नावाचे रूसीकरण करून शहराचे नाव पेट्रोग्राड ठेवण्यात आले. बोल्शेविक क्रांतीनंतर रशियाची राजधानी मास्कोला नेण्यात आली, व १९२४ मध्ये लेनिनच्या निधनानंतर पेट्रोग्राडचे नामकरण लेनिनग्राड करण्यात आले.] अधिकृतपणे तो अमेरिकन रेड क्रॉस विभागाचा सहाय्यक प्रमुख म्हणून आला असला तरी वास्तवात तो अमेरिकन लष्कराच्या गुप्त हेर विभागाच्या सेवेत होता. रशियाला जर्मनीविरुद्ध लढत ठेवणे हा त्याच्या पेट्रोग्राडला येण्यामागील खरा हेतू होता.

त्यावेळी पूर्व आघाडीवरील परिस्थिती अत्यंत निराशाजनक होती. अकार्यक्षम लष्करी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली, जुन्यापुराण्या व अपुऱ्या शस्त्रांनिशी लढणारी रशियन सेना जर्मनीच्या घणाघाती आघाताखाली चिरडली जात होती. अंतर्बाह्य कुजलेली झारांची सरंजामशाही सत्ता युद्धाच्या प्रहारांनी कोसळली होती. मार्च १९१७ मध्ये झार निकोलसला राज्यत्याग करावा लागला होता; व त्यानंतर रशियात हंगामी सरकारची स्थापना झाली होती. उपासमारीने गांजलेल्या व सर्वस्व हिरावून बसलेल्या कोट्यावधी युद्धजर्जर रशियन जनतेच्या शतकानुशतकांच्या आशा आकांक्षा, 'शांतता, अन्न व जमीन' या त्या काळी संपूर्ण राष्ट्रात निनादणाऱ्या क्रांतिकारी मागण्यांत प्रतिबिंबीत झाल्या होत्या.

जर्मनीविरुद्ध रशियन लष्कराचा प्रतिकार लवकरच पूर्णपणे कोलमडणार अशी जबर धास्ती रशियात होत असलेल्या उलथापालथीमुळे इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका या दोस्त राष्ट्रांना वाटत होती. तसे झाले तर पूर्व आघाडीवरून लक्षावधी जर्मन सैनिक मोकळे होऊन पश्चिमेकडील थकल्याभागल्या दोस्त लष्करांवर उल्कापाताप्रमाणे येऊन कोसळतील अशी भीती त्यांना बेचैन करीत होती. इतकीच भयप्रद दुसरी एक शक्यता त्यांना जाणवत होती, ती म्हणजे युक्रेनचा गहू, दोनेत्सचा कोळसा, कॉकेशसचे खनिज तेल व रशियाची अन्य अमाप साधनसामुग्री जर्मनीच्या हाती पडेल ही!

जर्मनीविरुद्ध युद्धात रशियाने टिकून राहावे याकरिता दोस्त राष्ट्रांनी अटीतटीचे प्रयत्न चालविले होते. निदान अमेरिकन सैन्य पश्चिम आघाडीवर येऊन पोचेपर्यंत तरी पूर्व आघाडीवर रशियाने तग धरणे

अनुक्रमणिका

त्यांना अत्यंत अगत्याचे वाटत होते. त्याकरिता प्रयत्न करण्यासाठी जे अनेक दोस्त मुत्सद्दी, लष्करी अधिकारी व गुप्त हेर पेट्रोग्राडला येऊन दाखल झाले होते त्यापैकी रॉबिन्स हा एक होता.

काळ्याभोर केसांचा, रेखीव चेहेरपट्टीचा त्रेचाळीस वर्षीय रॉबिन्स म्हणजे अमेरिकेच्या सार्वजनिक जीवनातील एक ख्यातनाम व्यक्ती होती. असीम उत्साह, प्रभावी वक्तृत्व शैली व आकर्षक व्यक्तिमत्व हे त्याचे गुणविशेष होते. शिकागो येथील त्याच्या भरभराटीस आलेल्या धंद्यावर पाणी सोडून त्याने स्वतःला समाजकार्याला वाहून घेतले होते. राजकीय वर्तुळात तो रूझवेल्टचा माणूस म्हणून ओळखला जात होता. १९१२ मध्ये थिओडोर रूझवेल्ट 'व्हाईट हाऊस' मध्ये शिरण्याचा प्रयत्न करीत होता त्या वेळी प्रसिद्ध 'बुलमूझ' प्रचार मोहिमेत आघाडीला होता. लढाऊ वृत्तीचा उदारमदतवादी रॉबिन्स प्रतिगामित्वाला आव्हान देणाऱ्या सर्व लढ्यांत अविश्रांतपणे खपणारा एक गतिमान योद्धा होता.

'काय! रेमंड रॉबिन्स? रूझवेल्टचा चमचा? त्याचे येथे काय काम आहे?' रॉबिन्स आपला मुख्य सहाय्यक म्हणून नेमला गेला आहे असे कळताच रशियातील अमेरिकन रेड क्रॉसचा प्रमुख कर्नल विलियम बॉईस थॉम्पसन याने आश्चर्योद्गार काढले. कर्नल थॉम्पसन हा रिपब्लिकन पक्षाचा स्थितिप्रिय सदस्य होता. रशियातील मँगनीज व तांब्याच्या खाणींत त्याचे हितसंबंध गुंतले असले तरी न गोंधळता वास्तववादी दृष्टीने परिस्थितीचे आकलन करण्याची कुवत त्याच्यात होती. रशियातील प्रक्षोभक परिस्थितीसंबंधी अमेरिकन परराष्ट्र खात्याच्या अधिकाऱ्यांनी अंगिकारलेल्या परंपरावादी भूमिकेने काहीही साध्य होणार नाही असे त्याला निश्चितपणे वाटत होते.

रशियातील त्याकाळचा अमेरिकेचा राजदूत डेव्हिड फ्रान्सिस हा पूर्वाश्रमीचा मिसूरीचा गव्हर्नर व सेंट लुई येथील एक बँकर होता. 'पोकर' खेळण्यात रममाण होणाऱ्या त्या वयस्क राजनीतिज्ञाची स्वतःची अशी काही ठाम मते होती. कडक कॉलरच्या काळ्या कोटात वावरणाऱ्या रुपेरी केसांच्या उंच फ्रान्सिसचे व्यक्तिमत्व पेट्रोग्राडच्या क्रांतीच्या धुमश्चक्रीत काहीसे विसंगतच वाटायचे. 'वृद्ध फ्रान्सिसला तर सोशालिस्ट रिव्होल्यूशनरी अन् बटाटे यातील फरक सुद्धा कळत नाही,' असे मजेदार उद्गार त्या बद्दल एका ब्रिटिश मुत्सद्याने त्या काळी काढले होते.

रशियाच्या राजकारणाबद्दलच्या त्याच्या अज्ञानाबरोबरच फ्रान्सिसचे दुसरे एक वैशिष्ट्य म्हणजे त्याची काही मुद्यांबाबतची ठाम मते! पेट्रोग्राड येथील अमेरिकन दूतावासाभोवती घोटाळणाऱ्या झारकालीन लष्करी अधिकाऱ्यांच्या व लक्षाधीशांच्या कानगोष्टी ऐकून त्याची ती मते बनली होती. रशियातील क्रांतिकारक घडामोडी म्हणजे जर्मन कारस्थानाचाच परिपाक आहे, सर्व रशियन क्रांतिकारक हे परकीयांचे पगारी हस्तक आहेत असा फ्रान्सिसचा पक्का समज झाला होता. क्रांतीचा तो भडका लवकरच थंडावेल असे त्याला खात्रीपूर्वक वाटत होते. २१ एप्रिल १९१७ रोजी फ्रान्सिसने मोठ्या आत्मविश्वासाने अमेरिकेचा परराष्ट्र सचिव रॉबर्ट लानसिंग याला तार ठोकली होती. 'लेनिन नावाचा एक जहाल सोशालिस्ट अगर अराजकवादी प्रक्षोभक भाषणे करून सरकार बळकट करीत आहे. सध्या त्याला मोकळिक दिली जात असली तरी त्याला योग्य वेळी हद्दपार करण्यात येईल.'

अनुक्रमणिका

परंतु झारशाहीच्या उन्मूलनानंतर रशियन क्रांतीचा तो वणवा शमला तर नाहीच, उलट तो क्रांतीचा प्रारंभच ठरला. संपूर्ण रशियन लष्करी यंत्रणा विस्कळीत होऊ लागली; आणि ती सावरून धरण्याची कुवत रशियात कोणातही असल्याचे दिसत नव्हते. हंगामी सरकारचा महत्त्वाकांक्षी प्रधानमंत्री अलेक्झांडर केरेन्स्की पूर्व आघाडीवर आवेशपूर्ण भाषणे करीत, 'विजय, लोकशाही व शांतता' अगदी नजीक आली आहेत, अशी तोंडभर आश्वासने रशियन सैनिकांना देत असला तरी त्या सैनिकांचा त्यावर काडीमात्र विश्वास बसत नव्हता. उपासमारीने गांजलेले फाटक्यातुटक्या गणवेशातील हजारो बंडखोर रशियन सैनिक लष्करी छावण्या सोडून चिखलपाण्याने भरलेली शेते व रस्ते तुडवीत माघारी फिरत होते. त्या रशियन सैनिकांची क्रांतिकारी कामगारांशी व शेतकऱ्यांशी गाठ पडत होती. सैनिक, कामगार व शेतकरी स्वयंस्फूर्तीने आपल्या क्रांतिकारी समित्या—'सोविएत्स्' स्थापन करीत होते, आणि 'शांतता, अन्न व जमीन' या आपल्या मागण्या पेट्रोग्राड येथील हंगामी सरकारपुढे मांडण्याकरिता आपले प्रतिनिधी निवडीत होते.

मेजर रेमंड रॉबिन्स पेट्रोग्राडला पोचला त्यावेळी उपासमारीमुळे निकरास आलेला प्रचंड जनसागर भरतीच्या उसळणाऱ्या लाटेप्रमाणे देशभर पसरला होता. चिखलमातीने भरलेल्या आघाडीवरील खंदकांतून बाहेर पडून राजधानीकडे गर्दी करणारे सैनिक युद्धबंदीची मागणी करीत होते. ब्रेडसाठी दंगेधोपे ही एक नित्याची बाब होऊन बसली होती. केरेन्स्कीने बेकायदेशीर ठरविल्यामुळे भूमिगत झालेल्या लेनिनच्या बोल्शेविक पक्षाचे सामर्थ्य व प्रतिष्ठा झपाट्याने वाढत होती.

अमेरिकन राजदूत फ्रान्सिस व त्याचे झारनिष्ठ मित्र यांची मते सत्यावर आधारित आहेत असे रॉबिन्सला मुळीच वाटत नव्हते. पेट्रोग्राडच्या उच्चभ्रू लक्षाधीशांच्या घोळक्यात वेळ न घालवता स्वतःच्या डोळ्यांनी रशियातील परिस्थितीची पाहणी करावी या हेतूने तो बाहेर पडला. स्वानुभवाने वस्तुस्थितीचे आकलन करून घेण्याची यशस्वी अमेरिकन धंदेवाईकात दिसणारी बहिर्मुख वृत्ती रॉबिन्सच्या अंगी मुरली होती. पेट्रोग्राडबाहेर पडून त्याने कारखान्यांना, कामगार संघटनांना, लष्करी छावण्यांना, एवढेच नव्हे तर किडामुंग्यांनी भरलेल्या आघाडीवरील खंदकांनाही भेटी दिल्या. रशियात काय घडत आहे हे पाहण्यासाठी तो सामान्य रशियन जनतेत मिसळला.

त्या वर्षी संपूर्ण रशियन राष्ट्र म्हणजे जणू एक प्रचंड खळबळजनक चर्चास्थान बनले होते. कित्येक शतकांच्या मुस्कटदाबीनंतर राष्ट्राला अखेरीस वाचा फुटली होती. जागोजागी सभा भरत होत्या. सरकारी अधिकारी, दोस्तसमर्थक प्रचारक, अराजकवादी, बोल्शेविक्स, सोशल रिव्होल्यूशनरी, मेन्शेविक्स हे सर्वच एकाच वेळी बोलत होते. प्रत्येकालाच काहीतरी सांगायचे होते. त्यापैकी सर्वात लोकप्रिय ठरले होते ते बोल्शेविक्स! ते जे काही सांगत त्याचाच पुनरुच्चार सैनिक, कामगार व शेतकरी करीत होते. अशाच एका प्रक्षुब्ध सभेत एक रशियन सैनिक मोठ्या आवेशाने विचारीत होता, 'मी कशासाठी लढतो आहे हे मला कोणी स्पष्ट करून सांगेल काय? कॉन्स्टँटिनोपलसाठी की स्वतंत्र रशियासाठी? लोकशाहीसाठी की लुटारू भांडवलदारासाठी? क्रांतीच्या रक्षणासाठी मला लढावयाचे आहे हे जर मला कोणी पटवून दिले तर मी तळहातावर शीर घेऊन लढेन. त्यासाठी मृत्युदंडाच्या शिक्षेची धमकी देण्याची मग काहीच गरज उरणार

अनुक्रमणिका

नाही. जेव्हा शेतकऱ्याला जमीन मिळेल, कारखाने कामगारांच्या ताब्यात येतील व सत्ता सोविएत्स्च्या हाती येईल तेव्हा आपल्याला कशासाठी लढावयाचे आहे ते आम्हाला कळेल. मग आम्ही त्यासाठी निश्चितच लढू.' त्या सैनिकाच्या त्या शब्दांत हजारो कामगार—शेतकरी—सैनिक यांच्या भावना प्रतिबिंबित झाल्या होत्या.

रशियातील त्याकाळचे हे वादविवादाचे वादळी वातावरण रॉबिन्सच्या मूळ स्वभावधर्माशी जुळणारे होते. त्याच्या मायदेशी अशा सार्वजनिक चर्चेत त्याने अनेकदा भाग घेतला होता. अनेकदा अमेरिकन साम्यवाद्यांशी वाद घातला होता. मग रशियन बोल्शेविकांशी चर्चा करायला कोणती हरकत असावी? आपल्या दौऱ्याच्या दरम्यान सभांना हजर राहून पुष्कळदा बोल्शेविक वक्त्याला उत्तरे देण्याची परवानगी रॉबिन्स मागी. कारखान्यातील गर्दीत किंवा खंदकातील सैनिकांच्या घोळक्यांत हा काळ्याभोर केसांचा व भरदार शरीरयष्टीचा अमेरिकन दुभाष्यामार्फत श्रोतृवृंदापुढे अमेरिकन लोकशाहीविषयी व प्रशियन लष्करवादाच्या संकटाविषयी बोले. त्याच्या त्या बोलण्याला बहुधा टाळ्यांच्या कडकडाटाचा प्रतिसाद मिळे.

हे सर्व करीत असता रॉबिन्स आपल्या रेड क्रॉसच्या कामाकडे दुर्लक्ष करीत नव्हता. उपासमारीने गांजलेल्या शहरांना अन्नधान्य पुरविणे हे त्याचे मुख्य काम होते. वोल्गाकिनाऱ्यालगत असलेल्या गोदामांत धान्याचे प्रचंड साठे दुर्लक्षित पडून असल्याचे त्याने पाहिले होते. वाहतुकीच्या सोयीअभावी ते धान्य शहरांकडे पोचविणे शक्य होत नव्हते. अत्यंत अकार्यक्षम असलेल्या झार निकोलसच्या काळात सगळी वाहतुक यंत्रणाच मोडकळीस आली होती, व ती सुधारण्याचा कोणताही प्रयत्न केरेन्स्कीने केला नव्हता. जहाजांनी ते धान्य वोल्गामार्गे शहरांकडे नेण्याची सूचना रॉबिन्सने मांडली तेव्हा ते अशक्य असल्याचे केरेन्स्कीच्या अधिकाऱ्यांनी त्याला सांगितले होते. तशातच रॉबिन्सकडे येऊन एका शेतकऱ्याने स्वतःचा परिचय करून दिला. स्थानिक सोविएतचा तो अध्यक्ष होता. जहाजांची आवश्यक ती सोय करता येईल, असे आश्वासन त्याने रॉबिन्सला दिले. दुसरेच दिवशी धान्याने भरलेली जहाजे मास्को-पेट्रोग्राडच्या दिशेने रवाना झाली.

एकीकडे केरेन्स्की सरकारच्या असहाय्यतेमुळे निर्माण झालेला गोंधळ, तर दुसरीकडे क्रांतिकारी सोविएतांची कार्यक्षम यंत्रणा व त्यांचे निर्धाराने चाललेले कार्य असे परस्परविरोधी चित्र रॉबिन्सला सर्वत्र दृष्टोत्पत्तीस आले. सोविएतच्या अध्यक्षाने एखादी गोष्ट करतो म्हटले की ती झालीच अशी परिस्थिती होती.

एका रशियन खेड्यात सरकारी अधिकाऱ्याची भेट घेण्याची इच्छा रॉबिन्सने व्यक्त केली तेव्हा तेथील शेतकरी हसले. ते त्याला म्हणाले 'त्यापेक्षा इथल्या सोविएतच्या अध्यक्षालाच तुम्ही भेटा की!'

'हे सोविएत म्हणजे काय आहे?' रॉबिन्सने विचारले.

'कामगार-शेतकरी-सैनिक यांचे प्रतिनिधी मंडळ,' त्याला उत्तर मिळाले.

अनुक्रमणिका

'पण सोविएत म्हणजे तर एक क्रांतिकारी संघटना आहे,' रॉबिन्स शंका प्रदर्शित करीत म्हणाला. 'मला तर अधिकृत मुलकी अधिकाऱ्याला भेटायचे आहे.'

शेतकरी पुन्हा हंसले. एकजण म्हणाला, 'अस्सं होय! पण तशी सरकारी सत्ता आता उरलेलीच नाही. तुम्ही सोविएतच्या अध्यक्षाचीच भेट घ्या.'

आपला पाहाणी दौरा आटोपून पेट्रोग्राडला परत आल्यानंतर रॉबिन्सने आपला प्राथमिक अहवाल कर्नल थॉम्पसनला सादर केला. केरेन्स्कीचे सरकार केवळ कागदोपत्रीच राहिले असून ते जनतेवर लादलेले सरकार आहे; पेट्रोग्राड, मास्को व इतर काही शहरात असलेल्या लष्करी तुकड्यांच्या बळावरच ते कसेबसे टिकून आहे आणि देशाच्या शासनाचे अधिकार प्रत्यक्ष व्यवहारात सोविएत्सच्या हाती आहेत असे त्याने त्या अहवालात स्पष्टपणे नमूद केले होते. तरीही, जर्मनीविरुद्ध युद्ध चालू ठेवण्याचे केरेन्स्कीचे धोरण असल्याने, व दोस्त राष्ट्रांना ते अत्यावश्यक वाटत असल्याने केरेन्स्की सरकार टिकवून धरणे अगत्याचे आहे असे रॉबिन्सचे मत होते. रशियात सर्वत्र अराजक माजून त्या राष्ट्रावर जर्मनीचा प्रभाव प्रस्थापित होऊ द्यायचा नसेल तर सोविएतांशी तडजोड करण्यास केरेन्स्कीला भाग पाडावे, व अधिक वेळ न दवडता रशियातील सत्य परिस्थितीची जाणीव अमेरिकन सरकारला करून द्यावी अशी निकड रॉबिन्सने थॉम्पसनकडे लावली.

जर्मनीविरुद्धच्या युद्धात रशियाने तग धरून राहावे याकरिता रॉबिन्सने एक धाडसी योजना सुचविली; ती म्हणजे रशियन क्रांतीला खरा धोका जर्मनीचा आहे हे रशियन जनतेच्या मनावर बिंबविण्याकरिता प्रचंड व प्रभावी प्रचार मोहीम सुरू करणे.

रॉबिन्सच्या त्या सूचनेला कर्नल थॉम्पसनने निःसंदिग्धपणे मान्यता दिली. एवढेच नव्हे तर त्या योजनेबद्दल वॉशिंग्टनला कळवून त्यासाठी मंजूरी व आवश्यक तो निधी आपण मिळवून घेऊ, तोपर्यंत वेळ दवडणे योग्य नसल्याने रॉबिन्सने त्या प्रचार मोहिमेचा श्रीगणेशा करावा असे त्याने रॉबिन्सला सांगितले. 'पण तोपर्यंत त्याकरिता लागणारा पैसा कुठून येणार?' रॉबिन्सने विचारले.

'वॉशिंग्टनहून पैसा येईपर्यंत मी माझ्या खिशातून दहा लक्ष डॉलर्स लावायला तयार आहे' थॉम्पसने उत्तर दिले. पेट्रोग्राड येथील बँकेतून, त्याच्या खात्यातून तेवढ्या रकमेपर्यंत पैसा काढण्याची परवानगीही त्याने रॉबिन्सला दिली. कारण रशियन सैन्य पूर्व आघाडीवर लढत राहिले पाहिजे आणि रशियातून जर्मनीची हकालपट्टी झाली पाहिजे असे त्यालाही तीव्रतेने वाटत होते. अर्थात् त्याबरोबरच, रशियन राजकारणात असा उघडपणे हस्तक्षेप करण्यात अनुस्यूत असलेले धोकेही कर्नल थॉम्पसन पुरेपूर ओळखून होता. प्रचार मोहिमेची आखणी चालू असता तो रॉबिन्सला म्हणाला, 'रॉबिन्स, आपल्या या कार्यवाहीचा अर्थ काय हे तुला ठाऊक आहे ना?' 'मला वाटतं एकंदर परिस्थिती सावरण्याची हीच एक संधी आहे.' रॉबिन्स उत्तरला. 'तसं नव्हे! मला विचारायचं आहे ते असं की याचा तुझ्यावर काय परिणाम होईल हे तुला

अनुक्रमणिका

माहीत आहे ना?' थॉम्पसनने विचारले. 'म्हणजे, आपल्याला काय सुचवायचंय्?' रॉबिन्सने विचारले. 'याचा अर्थ हा की जर आपण अयशस्वी ठरलो तर तुला गोळी घातली जाईल!' थॉम्पसन त्याला परिणामांविषयी जागरूक करीत म्हणाला. त्यावर बेडरपणे खांदे उडवीत रॉबिन्स म्हणाला, 'आपल्यापेक्षा कितीतरी उमदी तरुण माणसे पश्चिम आघाडीवर रोज मारली जात आहेत.' क्षणभर थांबून तो पुढे म्हणाला, 'कर्नल, मला जर गोळी घातली गेली तर तुम्ही तरी सुटणार आहात काय? तुमच्या गळ्याभोवतीही दोरखंड आवळला जाईल.' 'तुझं हे म्हणणं खरं ठरलं तर मला आश्चर्य नाही वाटायचं!' कर्नल थॉम्पसन उद्गारला. [कर्नल थॉम्पसन व मेजर रॉबिन्स या दोघांतील हा व या ग्रंथातील इतर संवाद संदर्भ ग्रंथ सूचीत निर्देशिलेल्या कागदपत्रांतून घेतलेले आहेत.]

## प्रतिक्रांती

बाल्टिक समुद्रावरून येणारे थंडगार, बोचरे, आर्द्र शारदीय वारे शहरात पसरत असता व पाण्याने ओथंबलेले काळेशार मेघ आकाशात गर्दी करीत असता, पेट्रोग्राड शहरातील क्रांतिकारक घटना विद्युत्वेगाने ऐतिहासिक उच्चांक गाठीत होत्या.

फिक्कट चेहऱ्याचा, बटबटीत डोळ्यांचा, नेहमीचा गणवेश घातलेला हंगामी सरकारचा प्रधानमंत्री अलेक्झांडर केरेन्स्की, नेपोलियनच्या थाटात हात मागे बांधून, शारदीय प्रासादातील भव्य दालनात अस्वस्थपणे येरझारा घालीत होता. 'त्यांना माझ्याकडून हवंय् तरी काय?' रेमंड रॉबिन्ससमोर गरजत तो म्हणाला; 'एकीकडे दोस्तांना खुष ठेवण्यासाठी पश्चिम युरोपीय उदारमतवादावर बोलण्यात माझा निम्मा वेळ जातो, तर उरलेल्या वेळात स्वतःला जिवंत राखण्यासाठी मला रशियन स्लाविक समाजवादावर बोलत राहावे लागते!'

केरेन्स्कीने असे अस्वस्थ व्हावे याला तशीच गंभीर कारणे होती. त्याचे इंग्रज व फ्रेंच दोस्त व त्याला पाठिंबा देणारे रशियन लक्षाधीश आता त्याच्यावरच उलटलेले दिसत होते; त्याला सत्तेवरून खाली खेचण्याची ते कारस्थाने करीत होते; तर, क्रांतीची लाट थोपवून धरण्याकरिता इंग्लंड-फ्रान्सने ताबडतोब हातपाय हलविले नाहीत तर आपण जर्मनीला बोलावू अशी उघड धमकी रशियन भांडवलदार त्याला देत होते. 'क्रांती हा एक भयानक रोग आहे,' रशियन रॉकफेलर म्हणून ओळखला जाणारा स्टीफन गिओर्गेविच लिओनोझोव, जॉन रीड या अमेरिकन वार्ताहाराला सांगत होता. 'दुखणाईत मुलाला रोगमुक्त करून चालते करण्यास, ज्याप्रमाणे आपल्याला प्रयत्न करावे लागतात, त्याप्रमाणे क्रांतीचा हा रोग दूर करण्याकरिता आज ना उद्या परकीय सत्तांना हस्तक्षेप करावाच लागेल;' तर दुसरा एक रशियन भांडवलदार, रिवाबुशिन्स्की हा उघडपणे बोलत होता की रशियातील जीवघेणी दुष्काळी परिस्थिती व जनतेचे भयावह दारिद्र्य यावर तोडगा एकच आहे; तो म्हणजे जनतेच्या तथाकथित मित्रांच्या—म्हणजेच लोकशाहीवादी सोविएत नेते व त्यांच्या समित्या यांच्या नरडीला नख लावणे!

अनुक्रमणिका

रशियातील ब्रिटिश गुप्तहेर खात्याचा प्रमुख सर सॅम्युअल होअर हा अशा रशियन लक्षाधीशांशी चर्चा करून जेव्हा इंग्लंडला परत गेला तेव्हा रशियात लष्करी हुकुमशाही प्रस्थापित करणे हा तेथील समस्येवर एकमेव उपाय आहे असे ठाम मत त्याने व्यक्त केले. रशियाचा हुकुमशहा बनण्यास योग्य असे उमेदवारही त्याने हेरून ठेवले होते. काहीसा इंग्रज सद्‌गृहस्थासारखा दिसणारा ॲडमिरल कोलचॅक व दमदार शरीरयष्टीचा रशियन लष्कराचा कोसॅक सरसेनापती लाव्र कोर्निलोव हे त्याच्या डोळ्यापुढील दोन उमेदवार होते.

ब्रिटिश व फ्रेंच सरकारांनी त्याकरिता कोर्निलोवला पाठिंबा देण्याचे ठरविले. रशियाला युद्धात टिकवून धरणे, क्रांती दडपून टाकणे व रशियातील दोस्तांच्या हितसंबंधाची जपणूक करणे ही सर्व कामे कोर्निलोवकडून करवून घेता येतील अशी खात्री त्यांना वाटत होती. परंतु दोस्त राष्ट्रांचा तो निर्णय म्हणजे एक फार मोठी चूक आहे, तो निर्णय घेताना रशियन लोकांची मूळ प्रकृती त्यांनी जाणून घेतली नाही असे रॉबिन्सला वाटत होते. केरेन्स्की सरकारच्या बुरख्याआडून दोस्त राष्ट्रे प्रतिक्रांतीची सिद्धता करीत आहेत या बोल्शेविकांनी चालविलेल्या प्रचाराला त्यामुळे बळकटी येईल असे त्याचे मत होते. परंतु रशियातील ब्रिटिश मिलिटरी अटॅची मेजर जनरल अल्फ्रेड नॉक्स व पेट्रोग्राडमधील ब्रिटिश लष्करी मिशनचा प्रमुख हे दोघेही त्याला गप्प बसवीत होते.

८ सप्टेंबर १९१७ रोजी दोस्तांच्या त्या कटाच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली. त्या दिवशी सरसेनापती जनरल कोर्निलोव याने, देशात 'शांतता व सुव्यवस्था' प्रस्थापित करण्यासाठी हंगामी सरकार उलथून पाडावे असा जाहीरनामा काढला. 'कोर्निलोव—रशियाचा तारणकर्ता' अशा मथळ्याची हजारो पत्रके एकाएकी मास्कोच्या व पेट्रोग्राडच्या रस्तोरस्ती दिसू लागली. याबद्दल 'द कॅटास्ट्रोफी' या आपल्या ग्रंथात नंतर कोर्निलोवने स्पष्टपणे लिहिले आहे की ही पत्रके ब्रिटिश मिलिटरी मिशनच्या खर्चाने छापली गेली होती व ब्रिटिश मिलिटरी अटॅची जनरल नॉक्स याने ती पेट्रोग्राडच्या ब्रिटिश दूतावासातून आपल्या रेल्वेच्या डब्यातून मास्कोला आणली होती. कोर्निलोवचे वीस हजार सैनिक पेट्रोग्राडवर चाल करून येऊ लागले त्यावेळी त्याच्यासोबत फ्रेंच व ब्रिटिश अधिकारी रशियन गणवेशात चालत होते.

दोस्तांच्या या विश्वासघाताने केरेन्स्की हतबुद्धच झाला. लंडन व पॅरिसमध्ये अजूनही महान लोकशाहीवादी व रशियन जनतेचा त्राता म्हणून त्याचा उदोउदो होत होता, तर इकडे रशियात मात्र त्याच दोस्त राष्ट्रांचे प्रतिनिधी त्याला सत्तेवरून खाली खेचण्याचे उद्योग करीत होते. गोंधळलेल्या असहाय्य केरेन्स्कीला काय करावे हेच कळेनासे झाले. दिङ्‌मूढ झाल्याने अवसान गाळून तो स्वस्थ बसला.

बोल्शेविकांच्या नियंत्रणाखालील पेट्रोग्राड सोविएतने मात्र स्वतःहून तडकाफडकी निर्णय घेऊन लष्करी सज्जतेचा आदेश दिला. बाल्टिक नौदलातील क्रांतिकारी खलाशी व आघाडीवरून परतलेले सैनिक सशस्त्र कामगारांना येऊन मिळाले. शहराच्या रस्त्यारस्त्यांवर काटेरी तारांचे जाळे व मेढेकोट उभारले गेले. तोफा व मशीनगन्स यांनी ठिकठिकाणी मोर्चेबंदी केली गेली. टोप्या व कातडी जाकिटे

घालून रायफली व हातबाँब घेतलेले कामगार—लाल रक्षक—चिखल भरलेल्या हमरस्त्यांवर गस्त घालू लागले.

अवघ्या चार दिवसात कोर्निलोवच्या सैन्याची वाताहात होऊन ते सैनिक इतस्ततः विखुरले. त्याच्याच सैन्यात गुप्तपणे प्रस्थापित झालेल्या सैनिक-समितीने कोर्निलोवला अटक केली; आणि पेट्रोग्राडच्या अस्तोरिया हॉटेलमध्ये त्याच्या विजयाच्या वार्तेची वाट पाहात बसलेल्या त्याच्या कटातील सुमारे ४० झारकालीन सेनापतींनाही पकडण्यात आले. कोर्निलोवच्या कटात सामील असलेला केरेन्स्कीचा उपयुद्धमंत्री बोरिस साविन्कोव याला जनतेच्या रोषामुळे आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला. हंगामी सरकारचे पाय डगमगू लागले; आणि जे टाळण्याकरिता तो उठाव आयोजित केला गेला होता, तेच नेमके घडले. तो उठाव दडपण्यात बोल्शेविक्स विजयी ठरल्यामुळे त्यांच्या सामर्थ्याचा प्रत्यय सर्वांना आला. पेट्रोग्राडची खरी सत्ता केरेन्स्कीच्या नव्हे तर सोविएत्सच्या हाती आली. 'शस्त्रबळाचा वापर करण्याची वेळही न येता केवळ सोविएतांच्या शक्तीने कोर्निलोव पराभूत झाला', असा अभिप्राय रेमंड रॉबिन्सने व्यक्त केला.

या उलट राजदूत फ्रान्सिस याने अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याला तार पाठविली, 'चुकीचा सल्ला, चुकीची माहिती व पद्धती, अयोग्य वेळी कार्यवाही यामुळे कोर्निलोव अपयशी ठरला. तो एक चांगला सैनिक व देशभक्त असला तरी अननुभवी होता. सरकार चांगलेच हादरले आहे. परंतु या अनुभवाने ते कदाचित शहाणे होतील.'

### क्रांती

घटनाचक्रे आता विद्युत्वेगाने फिरत होती. लेनिन अजूनही भूमिगतच होता. तेथूनच, 'सर्व सत्ता सोविएतांच्या हाती आली पाहिजे! हंगामी सरकार हाणून पाडा' अशी नवी क्रांतिकारी घोषणा त्याने केली.

७ ऑक्टोबर रोजी, रशियातील घटनांमुळे चिंताग्रस्त झालेल्या कर्नल थॉम्पसनने वॉशिंग्टनला तार केली—'या महिन्यात येथे भरणाऱ्या कामगार-सैनिक प्रतिनिधींच्या अखिल रशियन काँग्रेसचे नियंत्रण स्वतःकडे घेण्याचा बहुमतवाले (बोल्शेविक्स) अटीतटीचा प्रयत्न करीत आहेत. तसे झाले तर ते नवे सरकार स्थापन करतील. त्याचे विघातक परिणाम होतील. कदाचित ते स्वतंत्रपणे जर्मनीशी शांतता करारही करतील. आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करीत आहोत. परंतु आम्हाला ताबडतोब पाठिंबा मिळायला हवा. अन्यथा सर्व प्रयत्न विफल ठरतील.'

३ नोव्हेंबर रोजी कर्नल थॉम्पसनच्या कार्यालयात रशियातील दोस्त लष्करी नेत्यांची एक गुप्त बैठक झाली. बोल्शेविकांना थोपवून असे धरता येईल हा त्यांच्यापुढे मुख्य प्रश्न होता. फ्रेंच मिलिटरी मिशनचा प्रमुख जनरल निसेल हा मोठ्या तावातावाने हंगामी सरकारच्या नकर्तेपणाचा धिक्कार करीत रशियन सैनिकांना 'भ्याड कुत्री' म्हणून शिव्याशाप देत होता. यामुळे एक रशियन जनरल संतापाने

अनुक्रमणिका

लालीलाल होऊन बाहेर निघून गेला; तर कोर्निलोवला पाठिंबा न दिल्याबद्दल जनरल नॉक्सने अमेरिकेला धारेवर धरले. 'केरेन्स्की व त्याचे सरकार स्थिर राखण्यात आम्हाला काही स्वारस्य वाटत नाही', नॉक्स रॉबिन्सकडे पाहात गरजला, 'ते सरकार अगदीच अकार्यक्षम व कुचकामाचे आहे. तुम्ही कोर्निलोवला पाठिंबा द्यायला हवा होता.'

'पण जनरल, तुम्ही तर कोर्निलोवबरोबर होता ना?' रॉबिन्सने खोचकपणे विचारले.

रॉबिन्सच्या त्या प्रश्नातील बोच ब्रिटिश जनरलच्या चेहऱ्यावर दिसल्याशिवाय राहिली नाही. 'आज रशियात एकाच गोष्टीची गरज आहे; लष्करी हुकुमशाहीची! चांगले कोरडे ओढल्याशिवाय हे लोक ताळ्यावर येणार नाहीत.'

'जनरल, इथे हुकुमशाही कदाचित् प्रस्थापित होईलही. पण अगदी वेगळ्या प्रकारची.' रॉबिन्स म्हणाला.

'म्हणजे ट्रॉट्स्की—लेनिन—बोल्शेविक्स यांच्याबद्दल तुम्ही म्हणता आहात का? ते तर केवळ साबणाचे फुगे आहेत.' टवाळी करीत नॉक्सने म्हटले.

'होय! त्याबद्दलच मला म्हणायचे आहे.' रॉबिन्स उत्तरला.

'रॉबिन्स,' जनरल नॉक्स त्याला समज देत म्हणाला, 'तू लष्करी माणूस नाहीस, त्यामुळे लष्करी बाबीसंबंधी तुला काही कळत नाही. असल्या लोकांशी कसे वागायचे ते आम्हाला बरोबर कळते. रांगेत उभे करून आम्ही त्यांना गोळ्या घालतो.'

'हो! घालाल ना. पण त्यांना पकडू शकलात तर!' रॉबिन्स शांतपणे उत्तरला, 'मला लष्करीबाबीसंबंधी फारसे कळत नसेलही. पण जनसामान्यांबद्दल मात्र मला थोडेफार कळते. त्यांच्यात मिसळूनच मी जन्मभर काम करीत आलो आहे. मी रशियातही सर्वत्र फिरलो आहे. आणि सध्या आपल्या समोर प्रश्न आहे तो लष्करी स्वरूपाचा नव्हे, तर सामान्य लोकांसंबंधीचा, असे मला वाटते.'

कर्नल थॉम्पसनच्या कार्यालयातील या बैठकीनंतर चारच दिवसांनी, ७ नोव्हेंबर १९१७ रोजी, बोल्शेविकांनी रशियाची सत्तासूत्रे आपल्या ताब्यात घेतली.

संपूर्ण जगाला हादरवून सोडणारी बोल्शेविक क्रांती आली ती मोठ्या चमत्कारिक रीतीने अगदी चोरपावलांनी! इतिहासातील ती सर्वात शांततापूर्ण क्रांती होती. सैनिक व खलाशी यांचे लहानलहान गट राजधानीत अगदी सहजपणे फिरत होते. क्वचित अधूनमधून गोळीबाराचे आवाज ऐकू येत होते. नव्याने हाती येणारी घोषणापत्रके व आवाहने यांवर तावातावाने हातवारे करून चर्चा करीत गारठलेल्या रस्त्यांवर

लोक गर्दी करीत होते. नेहमी प्रमाणे नाना प्रकारच्या अफवा पसरत होत्या. नेवस्की मार्गावरून मोटारी धावत होत्या. दुकानातून गृहिणींची नेहमीची खरेदी चालू होती. नेहमीप्रमाणे त्या दिवशी प्रसृत झालेल्या स्थितिप्रिय वृत्तपत्रांत क्रांती झाल्याची बातमीसुद्धा नव्हती.

थोडाही प्रतिकार न होता बोल्शेविकांनी टेलिफोन एक्सचेंज, तार ऑफिस, स्टेट बँक व मंत्रालये यांचा ताबा घेतला. हंगामी सरकारचे केंद्रस्थान असलेल्या शारदीय प्रासादाला त्यांनी वेढा घातला.

तत्पूर्वी संध्याकाळीच, अमेरिकन दूतावासाकडून एक मोटार उसनी घेऊन तीवर अमेरिकन ध्वज फडकवीत केरेन्स्कीने पळ काढला होता. जाण्याच्या घाईत, आघाडीवरून सैनिक घेऊन आपण परत येत असून चार पाच दिवसातच आपण परिस्थिती आटोक्यात आणू, असा निरोप त्याने राजदूत फ्रान्सिसला पाठविला होता.

सायंकाळी ६ वाजता राजदूत फ्रान्सिसने परराष्ट्र सचिव लानसिंग याला तार केली—'येथे संपूर्ण ताबा बोल्शेविकांनी घेतला असल्याचे दिसत आहे. इथल्या एकाही मंत्र्याचा पत्ता नाही...'

त्या गारठलेल्या सर्द रात्री चिखल भरलेल्या रस्त्यांवरून धावणारे ट्रक्स, ठिकठिकाणी शेकोट्या पेटवून गस्त घालणाऱ्या सैनिकांजवळ थांबून पांढरे गठ्ठे त्यांच्याकडे फेकीत होते. त्यांत पुढील घोषणापत्रके होती—

रशियाच्या नागरिकांनो!

हंगामी सरकारचे पतन झाले आहे. कामगार—सैनिक प्रतिनिधींच्या पेट्रोग्राड सोविएतच्या, पेट्रोग्राड कामगार व शिबंदीचे नेतृत्व करणाऱ्या लष्करी क्रांतिकारी समितीच्या हाती राष्ट्राची सर्व सत्तासूत्रे आली आहेत. लोकशाही स्वरूपाच्या शांततेकरिता ताबडतोब प्रयत्न करणे, जमीनदारांचा जमीनीवरील मालकी हक्क नष्ट करणे, उत्पादनावर कामगारांचे नियंत्रण स्थापन करणे व सोविएत सरकारची स्थापना करणे, या ज्या उद्दिष्टांकरिता आजपर्यंत जनतेने लढा दिला ती सर्व उद्दिष्टे निश्चितपणे साध्य झाली आहेत.

कामगार, सैनिक व शेतकरी यांची क्रांती चिरायू होवो!

कामगार व सैनिक प्रतिनिधींची पेट्रोग्राड सोविएत लष्करी क्रांतिकारी समिती चिरायू होवो!

नुकत्याच कोसळलेल्या हंगामी सरकारच्या अखेरच्या बालेकिल्ल्याभोवती—दिव्यांच्या प्रकाशाने लखलखणाऱ्या शारदीय प्रासादाभोवती—शेकडो लाल रक्षक व सैनिक गोळा झाले होते. एकाएकी, प्रासादासमोरील मैदानात उभारले गेलेले मेढेकोट पार करून ते सैनिक शारदीय प्रासादात शिरले. तेथील एका भव्य, सुशोभित दालनात मोठ्या टेबलाभोवती दिवसभर बसून असलेल्या केरेन्स्कीच्या मंत्र्यांना अटक

करण्यात आली. टेबलावर चोळामोळा करून टाकलेले कागद सर्वत्र पसरले होते. हंगामी सरकारतर्फे जारी व्हावयाच्या, पण कधीच तयार न झालेल्या घोषणापत्राचे ते अर्धवटच राहिलेले मसुदे होते. त्यापैकी एका घोषणेच्या प्रारंभाला लिहिले होते–'हंगामी सरकारला राष्ट्रातील सर्व जनतेने पाठिंबा द्यावा असे आवाहन हंगामी सरकार करीत आहे...'

७ नोव्हेंबर रोजी रात्री पावणे अकरा वाजता कामगार–सैनिक प्रतिनिधींच्या अखिल रशियन सोविएतची प्रारंभिक बैठक स्मोल्नी इन्स्टिट्यूटच्या एका दालनात झाली. येथे पूर्वी झारकालीन अमीरउमरावांच्या मुलींना नृत्यशिक्षण दिले जात असे. संगमरवरी स्तंभांच्या, जडावाचे फरशीकाम केलेल्या, मोठमोठ्या पांढऱ्या शुभ्र झुंबरांनी सुशोभित अशा त्या भव्य नृत्यदालनात आता बसले होते रशियन सैनिक व कामगार यांचे निर्वाचित प्रतिनिधी. आघाडीवरील खंदकांची माती अजून गणवेषांवर तशीच असलेले सैनिक, चुरगळलेले कपडे व टोप्या घातलेले कामगार, पट्ट्यापट्ट्यांचे स्वेटर्स व रिबन लावलेल्या छोट्या गोल टोप्या घातलेले खलाशी असे ते सर्व अस्वच्छ, थकले भागलेले सोविएत प्रतिनिधी केंद्रीय कार्यकारी समितीच्या सदस्यांची भाषणे कान देऊन मोठ्या उत्कंठने ऐकत होते.

काँग्रेसची बैठक दोन दिवस चालू होती. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ठेंगणासा, तुकतुकीत टकलाचा, इस्त्री न केलेल्या सैलशा कपड्यातील सोविएत नेता, हातात बरेचसे कागद घेऊन बोलायला उठला, तेव्हा हर्षभराने आरोळ्या ठोकून कामगारांनी त्याचे स्वागत केले. हा जल्लोष बराच वेळ चालू होता. शेवटी किंचित् पुढे वाकून त्या वक्त्याने बोलायला सुरवात केली. 'आता आपण समाजवादी व्यवस्थेच्या उभारणीस प्रारंभ करू या!'

तो वक्ता होता व्लादिमिर इलिच लेनिन. त्याच्या नेतृत्वाखाली जनतेच्या मंत्रिमंडळाची नियुक्ती करून त्या काँग्रेसने पहिले सोविएत सरकार प्रस्थापित केले.

### सोविएत सरकारला मान्यता देण्यास नकार

सोविएत सरकार स्थापन झाल्यानंतर दुसरेच दिवशी सकाळी राजदूत फ्रान्सिसने मास्कोतील अमेरिकन कौन्सल जनरल माडिन समर्स या त्याच्या मित्राला चिठ्ठी पाठविली. 'कामगार व सैनिकांच्या पेट्रोग्राड परिषदेने एक मंत्रिमंडळ नेमले असून लेनिन प्रधानमंत्री, ट्रॉट्स्की परराष्ट्र मंत्री, मादाम कोलोन्ताई शिक्षणमंत्री अशा नेमणुका झाल्याचे ऐकिवात आहे. सगळेच हास्यास्पद! पण एकंदर परिस्थिती जितकी अधिक किळसवाणी होईल तितक्या लवकर तीवर काही उपाययोजना करण्यात येईल अशी मला आशा आहे.'

त्याच दिवशी सकाळी रेमंड रॉबिन्स पेट्रोग्राड येथील अमेरिकन रेड क्रॉसच्या मध्यवर्ती कार्यालयातील कर्नल थॉम्पसनच्या ऑफिसमध्ये आला.

'आपल्याला तातडीने काही तरी करायला हवे', तो थॉम्पसनला म्हणाला, 'केरेन्स्की कुठेतरी सैन्य उभारणार आहे, डॉन क्षेत्रातून कोसॅक, तर फिनलंडमधून श्वेत रक्षक येणार आहेत, ह्या सर्व बोलण्यात कवडीचाही अर्थ नाही ते येथे पोहोचूच शकणार नाहीत. रायफलधारी हजारो शेतकरी त्यांना वाटेतच अडवायला टपलेले आहेत. स्मोल्नी येथून शासन चालविणारी मंडळी बराच काळ टिकून राहणार आहेत हे नक्की!' सरळ स्मोल्नीमध्ये जाऊन लेनिनची मुलाखत घ्यावी असे त्याने सुचविले. त्याकरिता त्याच्या वरिष्ठाची—थॉम्पसनची परवानगी त्याला हवी होती. 'सामान्यतः ती मंडळी समंजस व सुस्वभावी आहेत,' बोल्शेविकांबद्दल तो थॉम्पसनला पटवून सांगत होता. आपण पूर्वी राजकारणात होतो, तेव्हा अमेरिकन राजकीय दादांशी कसे वागायचे हे आपण अनुभवले आहे. आपल्या त्या राजकीय गुंडांपेक्षा स्मोल्नी येथे कोणी अधिक मोठा ठग असेल असे आपल्याला वाटत नाही असे तो म्हणाला.

उत्तरादाखल थॉम्पसनने वॉशिंग्टनहून त्याच्याकडे नुकताच आलेला एक आदेश रॉबिन्सला दाखविला. सल्लामसलतीसाठी थॉम्पसनला ताबडतोब वॉशिंग्टनला परत बोलाविण्यात आले होते. बोल्शेविकांना सामान्य रशियन जनतेचा पाठिंबा आहे असेच रॉबिन्सप्रमाणे त्याला स्वतःलाही वाटत होते. वॉशिंग्टनला गेल्यानंतर याबद्दल अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याची खात्री करून देण्याचा प्रयत्न तो करणार होता. दरम्यान रॉबिन्सची कर्नलच्या पदावर नेमणूक करण्यात आली होती व रशियातील अमेरिकन रेडक्रॉसचा प्रमुख म्हणून तो कार्यभार सांभाळणार होता. रॉबिन्सशी हस्तांदोलन करून शुभेच्छा व्यक्त करीत थॉम्पसनने त्याचा निरोप घेतला.

अजिबात वेळ न गमावता रॉबिन्स स्मोल्नी इन्स्टिट्यूटमध्ये गेला व त्याने लेनिनची भेट मागितली. 'पूर्वी आमचा केरेन्स्कीला पाठिंबा होता हे खरे,' रॉबिन्स सरळसरळ मनमोकळेपणाने लेनिनशी बोलत होता, 'पण त्या सरकारचे अस्तित्व संपुष्टात आले आहे हे कोणी आता वेगळे सांगण्याची गरज नाही. मला एकच गोष्ट तुमच्याकडून जाणून घ्यायची आहे ती ही की आमच्या राष्ट्रीय हितसंबंधांना धक्का न लावता अमेरिकन रेडक्रॉस रशियन जनतेच्या कल्याणाकरिता काही करू शकेल काय! तुमच्या अंतर्गत धोरणाच्या व कार्यक्रमाच्या मी विरुद्ध आहे. पण रशियाच्या अंतर्गत क्षेत्रात काय होतंय् याच्याशी अर्थाअर्थी माझा काही संबंध नाही. आज कोर्निलोव किंवा झार, किंवा इतर कोणीही सत्तेवर असते तर मी त्यांच्याशी बोलणे केले असते.'

लेनिनला तो उत्साही व स्पष्टवक्ता अमेरिकन एकदमच आवडला. त्याला नव्या सरकारच्या स्वरूपाची माहिती करून देत लेनिन म्हणाला, 'काही लोक मला हुकुमशहा म्हणतात. सध्याच्या क्षणी मी कदाचित् तसा असेनही; कारण मला कोट्यावधी कामगार व शेतकरी यांचे पाठबळ आहे. त्यांच्या आशाआकांक्षांना मूर्त स्वरूप देण्यात मी ज्या क्षणी कसूर करीन त्या क्षणी ते माझ्या हातून सत्ता काढून घेतील आणि मग झारप्रमाणेच मीही असहाय्य होईन.' सोविएत राजवटीच्या आर्थिक धोरणाबद्दल बोलताना लेनिन म्हणाला, 'उत्पादकांचे लोकतंत्र स्थापून आम्ही एक प्रकारे जगाला आव्हान देणार आहोत. गाठीशी पैसा बांधून असलेल्यांना किंवा संपत्तीवर मालकी हक्क गाजवणाऱ्या कोणालाही आम्ही सोविएतमध्ये प्रवेश देणार नाही. त्यात केवळ उत्पादकच असतील. दोनेत्समध्ये कोळसा उत्पादन करणारेच त्या क्षेत्राचे

अनुक्रमणिका

प्रतिनिधित्व करतील, दळणवळण क्षेत्रातील उत्पादक रेल्वेचे, तर डाकव्यवस्थेत काम करणारी मंडळीच त्या विभागाचे प्रतिनिधित्व करतील. सर्वत्र क्षेत्राबाबत आमची अशीच नीती राहील.' बोल्शेविकांच्या कार्यक्रमाच्या दुसऱ्या एका महत्वाच्या बाजूची रॉबिन्सला माहिती देत लेनिन पुढे म्हणाला,' राष्ट्रिक प्रश्नावर तोडगा शोधून काढणे ही एक मोठीच समस्या आमच्यापुढे आहे. झारांच्या काळात रशियातील अनेक राष्ट्रिक गट निर्दयपणे दडपले गेले होते. हे सर्व आता बदलले पाहिजे ज्यूविरोध व तत्सम इतर पूर्वग्रहांचा स्वतःला स्वार्थाकरिता उपयोग करून घेण्याचे, एका गटाविरुद्ध दुसऱ्या गटाला लढत ठेवण्याचे झारांचे धोरण संपुष्टात आले पाहिजे. रशियातील प्रत्येक अल्पसंख्य राष्ट्रिक गटाला स्वातंत्र्य, समान हक्क व प्रादेशिक व सांस्कृतिक स्वायत्तता दिली गेली पाहिजे.' त्या सर्व अत्यंत गुंतागुंतीच्या व महत्त्वाच्या प्रश्नाची उकल करण्यास समर्थ असा त्यांच्यापैकी एक नेता आहे; तो म्हणजे राष्ट्रिक प्रश्नाचा सांगोपांग अभ्यास केलेला, जोसेफ स्टालिन [या ग्रंथाच्या लेखकांना नोव्हेंबर १९४३ मध्ये लिहिलेल्या पत्रात कर्नल रेमंड रॉबिन्सने कळविले– 'फेडरेटेड सोशलिस्ट सोविएत रिपब्लिकच्या त्याच्या योजनेबद्दल लेनिन माझ्याशी बोलत होता, त्यावेळी प्रथमच मला स्टालिनबद्दल माहिती कळली. संपूर्ण सोविएत रशियातील भिन्नधर्मीय, भिन्नवंशीय राष्ट्रिक गटांना सहकार्याच्या एक सूत्रात बांधण्याच्या त्याच्या व स्टालिनच्या योजनासंबंधी लेनिन बोलत होता. रशियाच्या निरनिराळ्या राष्ट्रिक गटांचा मंत्री म्हणून स्टालिनची नुकतीच निवड झाल्याचे त्याने मला सांगितले. ह्या पदावर मंत्री म्हणून स्टालिनने केलेले कार्य सोविएत संघाचे ऐक्य व सामर्थ्य संपादनाच्या दृष्टीने ऐतिहासिक दृष्ट्या सर्वाधिक मोलाचे ठरले. त्याच्याच नीतीमुळे आज तेथील सर्व धार्मिक, वांशिक, राष्ट्रिक व अन्य वर्गकलह व शत्रुत्व नाहीसे झालेले असून, मायदेशाच्या संरक्षणासाठी प्राणपणाने लढण्याकरिता आवश्यक असलेले ऐक्य व सुसंवाद रशियातील निरनिराळ्या गटांत निर्माण झाला आहे,' कर्नल रॉबिन्सचे शेवटचे वाक्य अर्थातच दुसरे महायुद्ध व नाझी आक्रमकांना पराभूत करून पिटाळून लावण्यात रशियन जनतेने बजावलेली बहुमोलाची कामगिरी या संदर्भात आहे.] असे लेनिनने रॉबिन्सला सांगितले.

जर्मनीविरुद्ध रशियाने युद्ध चालू ठेवण्याची कितपत शक्यता आहे असे रॉबिन्सने लेनिनला विचारले तेव्हा रॉबिन्सइतक्यात स्पष्टवक्तेपणाने लेनिनने उत्तर दिले, की रशियाने युद्ध चालू ठेवण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. कारण ते राष्ट्र युद्धातून अगोदरच बाहेर पडले आहे. नव्या लाला लष्कराची उभारणी होईपर्यंत जर्मनीला प्रतिकार करणे रशियाला अशक्यच आहे आणि त्याला साहजिकच वेळ लागेल. तसेच रशियन उद्योग व वाहतुक यंत्रणाही आमूलाग्र सडलेली असून खालपासून वरपर्यंत तिची पुनर्रचना करावी लागणार आहे असेही तो म्हणाला.

लेनिन पुढे म्हणाला की सोविएत सरकारला अमेरिकेची मान्यता व मैत्री हवी आहे. त्याच्या राजवटीबद्दल अमेरिकन सरकारच्या मनात वसत असलेल्या पूर्वग्रहाची त्याला जाणीव होती. पण दोहोतील किमान सहकार्याकरिता एक भरीव व व्यवहार्य असा कार्यक्रम लेनिनने रॉबिन्सपुढे ठेवला. अमेरिकेच्या तांत्रिक मदतीच्या मोबदल्यात पूर्व आघाडीवरून सर्व युद्धसामुग्री हलविण्याची तयारी लेनिनने दर्शविली. एरवी ती युद्धसामुग्री जर्मन हाती पडण्याची शक्यता होती.

लेनिनच्या या प्रस्तावाबद्दल रशियातील अमेरिकन लष्करी मिशनचा प्रमुख व अमेरिकन मिलिटरी अटॅची विलियम जुडसन याला रॉबिन्सने ताबडतोब कळविले. लागलीच कराराचा तपशील निश्चित करण्याकरिता जनरल जुडसन हा स्मोल्नी येथे गेला. तेथे, रशियाच्या हाती पडलेले हजारो जर्मन युद्धकैदी रशियाने युद्ध संपेपर्यंत जर्मनीला परत करू नयेत अशीही एक विनंती जुडसनने लेनिनला केली. लेनिनने ती लागलीच मान्य केली. त्याबरोबर, सोविएत सरकारला मान्यता देणे हे अमेरिकेच्या

हितसंवर्धनाकरिता आवश्यक आहे असे जुडसनने अमेरिकन राजदूत फ्रान्सिस यास कळविले. सोविएत सरकार हेच रशियाचे खरे सरकार आहे; त्या सरकारशी राजनैतिक संबंध प्रस्थापित व्हायला पाहिजेत असे त्याचे म्हणणे होते. पण अमेरिकन राजदूताच्या मनात काही वेगळ्याच कल्पना होत्या, व त्याबद्दल त्याने वॉशिंग्टनला लिहिलेही होते.

थोडेच दिवसात परराष्ट्र मंत्री लान्सिंग याच्याकडून, रशियातील अमेरिकन प्रतिनिधींनी बोल्शेविक सरकारशी प्रत्यक्षपणे कोणत्याही प्रकारे बोलणे करू नये, अशा अर्थाची तार राजदूत फ्रान्सिसला आली. जुडसनला तत्संबंधी कळविण्याबद्दल खास उल्लेख त्या तारेत होता. त्या तारेच्या पाठोपाठ, जनरल जुडसनला अमेरिकेला माघारी बोलावणारी दुसरी तारही येऊन पोहोचली.

रॉबिन्सला ही नीती पसंत नव्हती. त्याविरुद्ध निषेध म्हणून राजीनामा देण्याचाही त्याचा विचार होता. परंतु राजदूत फ्रान्सिसने त्याला तसे करण्यापासून परावृत्त केले. एवढेच नाही तर रशियात त्याच्या पदावर राहून त्याने स्मोल्नीशी संबंध टिकवून धरावेत असे त्याने रॉबिन्सला सांगितले. रॉबिन्सला साहाजिकच त्याचे आश्चर्यच वाटले. पण फ्रान्सिस त्याला म्हणाला की, 'तू तेथे जाणे एकाएकी बंद करून सर्व संबंध तोडून टाकणे शहाणपणाचे ठरेल असे मला वाटत नाही. ती मंडळी काय करतात ते मला जाणून घ्यायचे आहे. तशीच वेळ आली तर परराष्ट्र खात्याच्या रोषापासून मी तुझा बचाव करीन.'

### कुटिल राजनीती

२ डिसेंबर १९१७ रोजी राजदूत फ्रान्सिसने डॉन कोसॅकांचा प्रमुख जनरल अलेक्सी कालेदिन याच्या हालचालींसंबंधी त्याचा पहिला गुप्त अहवाल वॉशिंग्टनला पाठविला. सुमारे २ लक्ष कोसॅकांचे श्वेत प्रतिक्रांतीकारी लष्कर दक्षिण रशियात जनरल कालेदिन याने संघटित केले असून त्याने डॉन क्षेत्राचे स्वातंत्र्य घोषित केले आहे व सोविएत सरकार उलथून पाडण्याच्या हेतूने मास्कोवर चाल करून येण्याच्या तो तयारीत आहे, एवढेच नव्हे तर पेट्रोग्राड व मास्को येथील झारनिष्ठ अधिकारी गुप्तपणे सोविएत विरोधी हेर म्हणून कालेदिन करिता काम करीत असून राजदूत फ्रान्सिसशी ते संपर्क साधून आहेत असे त्याने वॉशिंग्टनला कळविले.

त्या अहवालाच्या पाठोपाठ राजदूत फ्रान्सिसच्या विनंतीवरून मास्कोतील अमेरिकन कौन्सुल जनरल मॉडिन समर्स याने जनरल कालेदिनच्या लष्करी सामर्थ्याबद्दल एक सविस्तर अहवाल अमेरिकन परराष्ट्र मंत्रालयाला पाठविला. एका झारनिष्ठ श्रीमंत उमरावाच्या मुलीशी विवाह झालेला समर्स हा राजदूत फ्रान्सिसपेक्षाही कितीतरी अधिक कडवा सोविएतविरोधक होता. दक्षिण रशियातील सर्व 'निष्ठावान' व 'प्रामाणिक' मंडळी कालेदिनला पाठिंबा देण्यास त्याने संघटित केली आहेत असे समर्सने आपल्या अहवालात वॉशिंग्टनला कळविले.

हे कळताच कालेदिनला मदत करण्यासाठी ताबडतोब, गुप्तपणे त्याला कर्ज देण्याची व्यवस्था करावी असा आदेश लंडन येथील अमेरिकन दूतावासाला परराष्ट्रमंत्री लान्सिंग याने पाठविला. तसेच, हे कर्ज ब्रिटिश किंवा फ्रेंच सरकारांमार्फत दिले जावे. अमेरिकन सरकार कालेदिनच्या प्रतिकांतिकारी हालचालींना पाठिंबा देत आहे किंवा त्याला द्रव्यसहाय्य देत आहे हे कोणालाही कळू देऊ नये हे अत्यंत अगत्याचे असल्याचेही त्याने कळविले.

अमेरिकेच्या नीतीबाबत कोणत्याही प्रकारे संशय बोल्शेविकांना येता कामा नये; व म्हणून पेट्रोग्राडमधील कालेदिनच्या हस्तकांशी संपर्क साधताना जास्तीत जास्त सावधगिरी बाळगावी असा आदेश वॉशिंग्टनकडून राजदूत फ्रान्सिसला आला.

परंतु सर्व प्रकारे खबरदारी घेऊनही या कटाची बातमी सोविएत सरकारला लागलीच. कारण दोस्त राष्ट्रे सोविएत रशियात हस्तक्षेप करतील अशी शक्यता सोविएत सरकारला वाटत असल्याने ते त्याबाबत अत्यंत जागरूक होते. डिसेंबरच्या मध्यकाळी कालेदिनशी गुप्तपणे कटकारस्थान केल्याबद्दल राजदूत फ्रान्सिसचा सोविएत वृत्तपत्रांनी उघडपणे धिक्कार केला. परंतु त्या कोसॅक प्रमुखाची त्याला कोणत्याही प्रकारे माहिती असल्याचे फ्रान्सिसने साफ नाकबूल केले. 'कालेदिनच्या हालचालीबद्दल आपल्याला काहीच माहिती नाही, व रशियाच्या अंतर्गत व्यवहारात कोणत्याही प्रकारे ढवळाढवळ न करण्याबद्दल त्याला आदेश असून, त्या आदेशांचे पालन अमेरिकन दूतावासाने कडकपणे केलेले आहे अशा आशयाचे निवेदन आपण सोविएत वृत्तपत्रांना देत आहोत असे राजदूत फ्रान्सिसने २२ डिसेंबर रोजी परराष्ट्रमंत्री लान्सिंग याला तारेने कळविले.

❖ ❖ ❖

दोस्त राष्ट्रांच्या शत्रुत्वामुळे एकाकी पडल्याने, व शक्तिशाली जर्मन युद्धयंत्रणेला तोंड देण्याइतके सामर्थ्य त्यावेळी रशियात नसल्याने स्वसंरक्षणाकरिता शक्य ती पावले उचलणे सोविएत सरकारला भागच होते. अगदी गळ्याशी भिडलेले प्राणसंकट होते ते अर्थातच् जर्मनी! नव्या रशियाचे संरक्षण व्हावे व आवश्यक ती अंतर्गत पुनर्रचना व लाल लष्कराची निर्मिती याकरिता वेळ मिळवून घ्यावा या दृष्टीने पूर्व आघाडीवर जर्मनीशी ताबडतोब शांतता करार करावा असे लेनिनने ठरविले. 'दळणवळण, उद्योग, लष्कर इत्यादी क्षेत्रातील रशियाची भयानक दुरवस्था व दौर्बल्य लक्षात घेता, एवीतेवी आपल्याला शांतता करार करावाच लागला असता' लेनिन आपल्या पक्षसहकाऱ्यांना समजावून सांगत होता, 'आपली आज पहिली गरज आहे ती शक्तिसंपादनाची, व त्याकरिता आपल्याला वेळ मिळाला पाहिजे. जर्मनांनी पुन्हा आक्रमक पवित्रा घेतला व आगेकुचीला सुरुवात केली तर मग नाक मुठीत धरून ते म्हणतील त्या अटींवर अगतिकतेने आपल्याला शांतता करार करावा लागेल आणि तो करार मग कितीतरी अधिक कठोर व घातक ठरेल.' एकंदर परिस्थितीची निकड लक्षात घेऊन, लेनिनच्या मार्गदर्शनानुसार, जर्मनीच्या शांतता कराराच्या अटी जाणून घेण्याकरिता एक सोविएत शांतता शिष्टमंडळ पूर्वीय जर्मन लष्कराचे मध्यवर्ती कार्यालय ब्रेस्त लितोवस्क या शहराच्या दिशेने घाईघाईने रवाना झाले.

अनुक्रमणिका

ब्रेस्त लितोवस्क येथे शांतता कराराच्या वाटाघाटींना सुरुवात झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी ग्रेटब्रिटन व फ्रान्स यांच्या प्रतिनिधींनी पॅरिस येथे, सोविएत रशियाचे विघटन घडवून आणण्यासंबंधी गुप्त करार केला. रशियातील फ्रेंच व ब्रिटिश प्रभावक्षेत्रांच्या आखणीबाबत २३ डिसेंबर १९१७ रोजी त्या दोन राष्ट्रांत मतैक्य झाले. त्या कराराच्या तरतुदीनुसार, खनिज तेलाने समृद्ध असलेला कॉकेशसचा प्रदेश व बाल्टिक प्रांत यांवर ब्रिटिश नियंत्रण, तर क्रिमिया व दोनेत्स क्षेत्रातील कोळसा व लोखंड यावर फ्रान्सचे नियंत्रण प्रस्थापित व्हावयाचे होते.

इंग्लंड व फ्रान्स यात झालेल्या या गुप्त करारानेच, साहाजिकच, त्या दोन राष्ट्रांची, त्यानंतरच्या काळातील सोविएत रशियासंबंधीची नीती साकार झाली.

अनुक्रमणिका

## प्रकरण २

# शह प्रतिशह

**इंग्रज हस्तक**

१८ जानेवारी १९१८ च्या मध्यरात्री गोठलेल्या थंडीत, फरकोटात सर्वांग लपेटलेला एक देखणा स्कॉटिश तरुण, कंदिलाच्या अंधुक प्रकाशात फिनलंड–रशियन सीमेवरील अर्धवट मोडक्या पुलावरून झपाझप पावले टाकीत चालला होता. यावेळी फिनलंडमध्ये यादवी युद्ध भडकले होते व पुलावरील रेल्वे वाहतुक विस्कळित झाली होती. फिनलंडच्या लाल सरकारने मार्गदर्शनासाठी व त्या तरुणाचे सामान वाहून नेण्यासाठी सोविएत सीमेपर्यंत एक सोबती त्याच्याबरोबर दिला होता. त्या सीमेवर पेट्रोग्राडला त्याला नेण्यासाठी एक आगगाडीही तयार होती. हा प्रवासी होता आर्. एच्. ब्रूस लॉकहार्ट, ब्रिटिश युद्धमंत्रिमंडळाचा खास हस्तक.

इंग्लंडमधील एका प्रसिद्ध पब्लिक स्कूलमधून बाहेर पडलेला लॉकहार्ट वयाच्या चोविसाव्या वर्षी राजनैतिक सेवेत शिरला होता. आकर्षक व्यक्तिमत्त्वाच्या बुद्धिमान लॉकहार्टने लवकरच, परराष्ट्रमंत्रालयात एक हुशार व होतकरू तरुण म्हणून नाव मिळविले होते. वयाच्या तिसाव्या वर्षीच तो मास्कोतील ब्रिटिश व्हाइस कौन्सुल बनला होता. रशियन भाषा त्याला चांगली अवगत होती व कटकारस्थानातही तो चांगला निष्णात झाला होता. क्रांतीपूर्वी दीड महिना अगोदर त्याला लंडनला माघारी बोलावण्यात आले होते.

आता ब्रिटिश प्रधानमंत्री लॉईड जॉर्ज याने स्वतः केलेल्या विनंतीनुसार त्याला पुन्हा रशियात परत पाठविण्यात आले होते. थॉम्पसन अमेरिकेला परत जात असता लॉईड जॉर्जशी त्याची भेट झाली होती. थॉम्पसनकडून मिळालेल्या माहितीने तो चांगलाच प्रभावित झाला होता. सोविएत राजवटीला मान्यता न देण्याच्या दोस्त राष्ट्रांच्या निर्णयाचा थॉम्पसनने कडक शब्दात धिःकार केला होता. थॉम्पसनशी झालेल्या चर्चेनंतरच, प्रत्यक्षपणे राजनैतिक मान्यता न दिली तरी सोविएत सरकारशी थोड्या बहुत प्रमाणात व्यवहारी स्वरूपाचे संबंध प्रस्थापित करण्याकरिता लॉकहार्टला रशियात पाठविण्याचे लॉईड जॉर्जने ठरविले.

हे सर्व जरी खरे असले तरी, त्याचबरोबर, रशियात जायला निघालेला देखणा लॉकहार्ट हा ब्रिटिश राजकीय गुप्तहेर खात्याचाही हस्तक होता. रशियात सोविएत सरकारविरुद्ध उभ्या होत असलेल्या

चळवळीचा पुरेपूर उपयोग ब्रिटिश हितसंबंधाकरिता करून घेणे हे त्याच्याकडे सोपविण्यात आलेले खरे महत्त्वाचे काम होते.

लेनिनला विरोध करणाऱ्या बोल्शेविक पक्षातील गटाचा नेता होता लिऑं ट्रॉट्स्की, सोविएत सरकारचा परराष्ट्रमंत्री! तो स्वतःला लेनिनचा वारस मानीत होता. तत्पूर्वीच्या १४ वर्षात ट्रॉट्स्कीने सातत्याने बोल्शेविकांना अत्यंत कडवा विरोध केला होता. नंतर बोल्शेविक क्रांतीच्या थोडेच दिवस अगोदर ऑगस्ट १९१७ मध्ये, तो बोल्शेविक पक्षात सामील झाला होता. तो पक्ष क्रांतीनंतर सत्तारूढ होताच नव्या सरकारात तो परराष्ट्रमंत्री बनला होता व बोल्शेविक पक्षात राहूनच तो लेनिनच्या डाव्या विरोधकांना संघटित करीत होता.

१९१८ च्या प्रारंभी ब्रूस लॉकहार्ट पेट्रोग्राडला पोहोचला त्यावेळी सोविएत शांतता शिष्टमंडळाचा नेता म्हणून परराष्ट्रमंत्री ट्रॉट्स्की ब्रेस्त लितोवस्कला गेलेला होता.

जर्मनीशी शांतात करार करण्यासंबंधी स्पष्ट आदेश देऊन ट्रॉट्स्कीला ब्रेस्त लितोवस्क येथे पाठविण्यात आले होते. परंतु लेनिनच्या त्या आदेशांचे पालन करण्याऐवजी, युरोपीय कामगारांनी उठाव करून त्यांची सरकारे उलथून पाडावीत अशी प्रक्षोभक आवाहने ट्रॉट्स्की ब्रेस्त लितोवस्क येथे करू लागला. 'भांडवलशाही राजवटींशी सोविएत सरकार कधीही शांतता करार करणार नाही. शांतताही नाही व युद्धही नाही!' तो तेथे गरजून सांगत होता. 'रशियन लष्कर आता लढा चालू ठेवू शकत नाही, त्यामुळे ते आता विसर्जित होत आहे, पण आम्ही शांतता करार मात्र करणार नाही' असे त्याने जर्मन प्रतिनिधींना कळविले

युद्धबंदी करणे, पण शांतता करार करण्यास मात्र नकार देणे आणि लष्कराचे विसर्जन करण्याबाबत बोलणे, या ट्रॉट्स्कीच्या ब्रेस्त लितोवस्क येथील वागणुकीचा 'शुद्ध वेडेपणा किंवा त्यापेक्षाही काहीतरी भयंकर,' अशा शब्दात संतप्त लेनिनने धिःकार केला.

लेनिन व ट्रॉट्स्की यांच्यातील ह्या मतभेदांमुळे बरेच लाभ आपल्या पदरी पाडून घेता येतील अशा आशेने ब्रिटिश परराष्ट्र खाते त्यावेळी त्यांच्याकडे डोळे लावून होते, असे लॉकहार्टने नंतर 'ब्रिटिश एजंट' या त्याच्या स्मृतिचित्रात नमूद केले. [रशियन लष्कराला लढा चालू ठेवणे अशक्य आहे हे कळत असूनही, जर्मनीशी शांतता करार केला तर आंतर्राष्ट्रीय क्रांतीचा विश्वासघात केल्यासारखे होईल या भूमिकेतून 'जागतिक क्रांतीचा' पुरस्कर्ता ट्रॉट्स्की ब्रेस्त लितोवस्क येथे जर्मनीशी शांतता करार करण्यास तयार नव्हता. त्यामुळे शांतता करण्यासंबंधी लेनिनने दिलेल्या सूचनाही त्याने धुडकावून लावल्या. परिस्थितीचा अचूक अंदाज न आल्याने तो तसा वागला, असे त्याच्या वागणुकीचे समर्थन नंतर ट्रॉट्स्कीने केले. जर्मनीने १९१८ च्या प्रारंभी पुन्हा रशियावर हल्ला केला व पेट्रोग्राड काबीज करून ते सोविएत राजवट चिरडून टाकणार अशी परिस्थिती निर्माण झाली. तेव्हा ३ ऑक्टोबर १९१८ रोजी भरलेल्या पक्षाच्या बैठकीत त्याबद्दल बोलताना, 'जर्मनीशी शांतता करार करण्याबाबत ज्यावेळी माझ्यासह आपल्यापैकी अनेक जण साशंक होते त्यावेळी कौतुकास्पद दूरदृष्टीने, आमचा विरोध मोडून काढून, शांतता करार करण्याशिवाय आपल्याला दुसरा पर्याय नाही, तो करार करणे आपल्याला भाग आहे असे अट्टाहासाने ठणकावून सांगणारा एकमेव नेता होता तो कॉम्रेड लेनिन हे या मान्यवर सभेपुढे स्पष्ट करणे मी माझे कर्तव्य समजतो; आम्ही त्यावेळी चुकलो' अशी निःसंदिग्ध कबुली ट्रॉट्स्कीने दिली.

ब्रेस्त लितोवस्क येथील ट्रॉट्स्कीचे वर्तन म्हणजे लेनिनला त्याने केलेल्या विरोधाची पहिलीच वेळ होती असे नाही. ब्रेस्त लितोवस्क येथे ट्रॉट्स्कीची ती गडबड चालू असता, त्याचा उजवा हात असलेला निकोलाय क्रेस्टिन्स्की मास्को येथे उघडपणे लेनिनवर टीकास्त्र चालवून, जर्मन साम्राज्यवादी, रशियन बुर्ज्वा व लेनिनच्या नेतृत्वाखालील कामगार यांच्याविरुद्ध क्रांतिकारी युद्ध सुरू करण्याच्या वल्गना करीत होता. विरोधकांच्या त्या चळवळीतील ट्रॉट्स्कीचा दुसरा साथीदार बुखारिन याने मास्को येथे भरलेल्या तथाकथित डाव्या कम्युनिस्टांच्या खास सभेपुढे एक ठराव मांडला व तो त्या सभेने पारितही केला. 'आंतर्राष्ट्रीय क्रांतीच्या हिताच्या दृष्टीने, आता नाममात्रच शिल्लक राहिलेल्या सोविएत सत्तेच्या विसर्जनाला मान्यता देणे समयोचित ठरेल असे आम्हाला वाटते' असे नमूद करणारा तो ठराव होता. ब्रेस्त लितोवस्क कराराच्या वेळी, बोल्शेविक पक्षात फूट पाडून लेनिनला पदच्युत करावे व नवे रशियन सरकार प्रस्थापित करावे याकरिता विरोधकांचे आतून आतून प्रयत्न सुरू होते अशी कबुली नंतर १९२३ मध्ये बुखारिनने उघडपणे दिली.]

ट्रॉट्स्कीच्या अशा वागण्यामुळे ब्रेस्त लितोवस्क येथील शांतता वाटाघाटी फिसकटल्या. जर्मन उच्च लष्करी अधिकाऱ्यांना बोल्शेविकांशी वाटाघाटी करण्याची तशी इच्छा नव्हतीच. ट्रॉट्स्कीचे वागणे त्यामुळे त्यांच्या पथ्यावरच पडले. ट्रॉट्स्कीच्या वागण्यामुळे जर्मन साम्राज्यवाद्यांना त्यावेळी मदतच झाली असे लेनिनचे मत होते. ब्रेस्त लितोवस्क येथे एकदा लिऑं ट्रॉट्स्की बैठकीत बोलत असता जर्मन जनरल मॅक्स हॉफमन याने उद्दामपणे टेबलावर पाय ठेऊन सर्व सोविएत प्रतिनिधींना माघारी जाण्यास सांगितले. ट्रॉट्स्की पेट्रोग्राडला परत आल्यानंतर, झालेल्या प्रकाराबद्दल लेनिनने नाराजी व्यक्त करताच 'आगेकूच करण्याची जर्मनांना हिंमतच होणार नाही' असे म्हणून, लेनिनने त्याच्या वर्तनाबद्दल घेतलेला आक्षेप ट्रॉट्स्कीने उडवून लावला.

ब्रेस्त लितोवस्क येथील शांतता वाटाघाटी तुटल्यानंतर दहाच दिवसांनी जर्मन लष्कराने बाल्टिक समुद्रापासून ते काळ्या समुद्रापर्यंत संपूर्ण पूर्व आघाडीवर प्रचंड आगेकूच सुरू केली दक्षिणेकडे हजारो जर्मन सैनिकांनी युक्रेनचे अफाट मैदान व्यापले. मध्यभागी जर्मन सैन्याने पोलंडमार्गे मास्कोच्या दिशेने धडक मारली तर उत्तरेला जर्मनांनी नार्वा काबीज केले, त्यामुळे पेट्रोग्राडला धोका निर्माण झाला. संपूर्ण पूर्व आघाडीवर झारकालीन रशियन लष्कराचा प्रतिकार मोडून पडला, व सैनिक इतस्ततः विखुरले. नव रशियावर प्राणांतिक संकटाची छाया पसरली.

अशा त्या जीवनमरणाच्या संघर्षकाळी बोल्शेविक नेत्यांनी घाईघाईने संघटित केलेल्या सशस्त्र कामगारांच्या व लाल लष्कराच्या तुकड्या जर्मन आक्रमण थोपवून धरण्याकरिता बाहेर पडल्या. नव्या लाल लष्कराच्या पहिल्या तुकड्या शत्रूविरुद्ध रणांगणात उतरल्या. २३ फेब्रुवारी रोजी प्स्कोव येथे जर्मन लष्कराला अडविण्यात आले. [प्स्कोव येथे रशियन सैन्याने २३ फेब्रुवारी रोजी जर्मन आगेकूच अडविली तो दिवस लाल सैन्याचा जन्मदिन म्हणून रशियात साजरा केला जातो.] तात्पुरते का होईना पेट्रोग्राड बचावले. लागलीच, यावेळी ट्रॉट्स्कीचा अंतर्भाव न करता दुसरे सोविएत शांतता शिष्टमंडळ लेनिनने तातडीने ब्रेस्त लितोवस्कला पाठविले.

शांततेची किंमत म्हणून, युक्रेन, फिनलंड, पोलंड, कॉकेशस या प्रदेशांचा ताबा, व सोने, गहू, तेल, कोळसा व अन्य खनिजे या स्वरूपात फार मोठी नुकसान भरपाई रशियाने द्यावी अशा मागण्या जर्मनीने केल्या.

अनुक्रमणिका

जर्मनीने घातलेल्या या शांतता कराराच्या अटी घोषित होताच संपूर्ण रशियात जर्मन साम्राज्यवादी लुटारूंविरुद्ध संतापाची एकच लाट उसळली. त्या कठोर शांतता कराराद्वारा सोविएत रशियाचे विघटन घडवून आणावे व सोविएत राजवट चिरडून टाकावी ही आशा जर्मन लष्कर श्रेष्ठी मनाशी बाळगून आहेत, असे भाष्य त्यावर लेनिनने केले.

त्या बिकट प्रसंगी दोस्त राष्ट्रांनी सोविएत रशियाला जर्मनीविरुद्ध मदत करणेच शहाणपणाचे ठरेल असे ब्रूस लॉकहार्टचे मत होते. जर्मनीने पुढे केलेल्या अटी मान्य करून ब्रेस्त लितोवस्कचा करार करण्याची सोविएत सरकारची मुळीच इच्छा नाही, हे स्पष्टच होते. लॉकहार्टच्या मते, त्यावेळी बोल्शेविकांच्या मनात एकच प्रश्न उभा ठाकलेला होता; तो म्हणजे त्या परिस्थितीत दोस्त राष्ट्रे काय करणार आहेत? सोविएत सरकारला मान्यता देऊन ते त्यांच्या मदतीस धावतील की रशियावर ती 'लुटारूंची शांतता' लादण्यास ते जर्मनीला मोकळीक देतील?

लेनिनविरुद्ध ट्रॉट्स्कीशी हातमिळवणी करणे ब्रिटिश हितसंबधांना पोषक ठरेल असे प्रारंभी लॉकहार्टला वाटले होते. यावेळी, लेनिनच्या शांतता नीतीमुळे क्रांतीचा विश्वासघात झाला आहे असे सांगून ट्रॉट्स्की व त्याचे अनुयायी लेनिनवर हल्ला चढवीत होते. बोल्शेविक पक्षातच एक 'धर्मयुद्ध—गट' (लॉकहार्टचे शब्द) संघटित करून व दोस्त राष्ट्रांची मदत मिळवून घेऊन लेनिनला सत्तेवरून खाली खेचण्याचा प्रयत्न ट्रॉट्स्की करीत होता.

रशियाचा परराष्ट्रमंत्री ट्रॉट्स्की ब्रेस्त लितोवस्कहून परत आला तेव्हाच त्याच्याशी व्यक्तिगत संबंध लॉकहार्टने प्रस्थापित केले होते असे खुद्द लॉकहार्टने आपल्या 'ब्रिटिश एजंट' या ग्रंथात नमूद केले आहे. ट्रॉट्स्कीच्या स्मोल्नी येथील खाजगी कार्यालयात त्या दोघांनी दोन तास बोलणी झाली होती. त्याच रात्री ट्रॉट्स्कीबद्दलचे त्याचे स्वतःचे मत लॉकहार्टने आपल्या दैनंदिनीत नोंदवले. त्यात तो म्हणाला, 'ट्रॉट्स्की हा असा माणूस आहे की रशियासाठी लढता लढता एखादे वेळी तो मरणालाही सामोरे जाईल; पण केव्हा? तर ते बघण्याकरिता मोठा प्रेक्षकवर्ग समोर असेल तरच!"

सोविएत परराष्ट्रमंत्री व ब्रिटिश हस्तक यांची लवकरच चांगली गट्टी जमली. लॉकहार्ट ट्रॉट्स्कीला लेव देविदोविच या जवळिकीच्या नावाने संबोधू लागला, तर ट्रॉट्स्की लेनिनविरुद्ध मोठा उठाव घडवून आणण्याची स्वप्ने रंगवू लागला. पण लेनिनला दूर सारून सत्तासूत्रे हाती घेण्याची क्षमता व सामर्थ्य ट्रॉट्स्कीत नाही हे लवकरच लॉकहार्टला कळून चुकले. तो त्याच्या 'ब्रिटिश एजंट' या ग्रंथात म्हणतो,—'ट्रॉट्स्की हा मोठा कुशल संघटक व निधड्या छातीचा माणूस आहे. पण नैतिक बाबीत मात्र हत्तीपुढे जशी माशी पूर्णपणे निष्प्रभ ठरेल तितकाच तो लेनिनपुढे अगदी नगण्य ठरतो. मंत्रिमंडळात एकही असा माणूस नाही की जो स्वतःला ट्रॉट्स्कीच्या बरोबरीचा मानीत नाही. या उलट त्या प्रत्येकाला लेनिन म्हणजे एक दैवत वाटते, त्याचा प्रत्येक शब्द ते निःशंक मनाने मान्य करतात.' रशियात जे काही करावयाचे ते लेनिनद्वाराच करावे लागेल अशा निष्कर्षाप्रती शेवटी लॉकहार्ट आला. रेमंड रॉबिन्सचेही मत तसेच होते हेही त्याला लवकरच कळून चुकले. 'व्यक्तिशः मला ट्रॉट्स्कीबद्दल नेहमीच जबरदस्त साशंकता वाटत

आली आहे. ट्रॉट्स्की म्हणजे एक मोठे प्रश्नचिन्हच आहे. त्याचा असीम अहंकार व औधत्य यामुळे तो कोणत्या वेळी काय करील, कसा वागेल याचा काही नेमच नाही असे मला नेहमी वाटायचे,' असे ट्रॉट्स्की बद्दल बोलताना रॉबिन्स म्हणाला.

पेट्रोग्राडला आल्यानंतर थोडेच दिवसात लोकहार्टची रॉबिन्सशी भेट झाली होती. रशियन समस्यांबाबत त्या अमेरिकन माणसाच्या वास्तववादी भूमिकेमुळे लॉकहार्ट चांगलाच प्रभावित झाला होता. सोविएत सरकारला मान्यता न देण्याबाबतच्या दोस्त राष्ट्रांच्या तर्कवादात रॉबिन्सला मुळीच अर्थ वाटत नव्हता. बोल्शेविकांना जर्मनीचा विजय व्हायला हवा आहे या झारशाही हस्तकांच्या अर्थशून्य बडबडीबद्दल त्याला वाटत होता तो नुसता तिरस्कार! झारकालीन रशियातील भयानक दुरवस्था, अन्याय व जुलुम याखाली दडपल्या गेलेल्या कोट्यावधी रशियनांनी बोल्शेविकांच्या नेतृत्वाखाली केलेला अभूतपूर्व उठाव याबद्दल त्याने मोठ्या कळकळीने व प्रभावी शब्दात लॉकहार्टला माहिती करून दिली.

आपल्या मताच्या समर्थनार्थ म्हणूनच की काय नव्या सरकारच्या कामकाजाची पद्धती लॉकहार्टने प्रत्यक्षपणे पाहावी याकरिता रॉबिन्स त्याला स्मोल्नी येथे घेऊन गेला. सोविएत सरकारविरुद्ध कटकारस्थाने करून रशियातील दोस्त राष्ट्रांचे दूतावास केवळ जर्मनीचाच फायदा करून देत आहेत असे, पेट्रोग्राडच्या रस्त्यावरील बर्फाच्या भुरभुरीतून जात असता रॉबिन्स कडवटपणाने लॉकहार्टला सांगत होता. 'सोविएत सरकार स्थिर झालेले असून ती वस्तूस्थिती दोस्त राष्ट्रे जितक्या लवकर मान्य करतील तेवढे बरे' असे तो म्हणाला.

अर्थात्, दोस्त राष्ट्रांचे रशियातील इतर प्रतिनिधी व गुप्त हेर रशियातील परिस्थितीचे अगदीच वेगळे चित्र त्याच्यापुढे रंगवतील, त्यांच्या त्या कथनाच्या समर्थनार्थ वाटेल तेवढे तथाकथित साक्षीपुरावे व 'अस्सल' म्हणून खोटीनाटी कागदपत्रे सादर करतील अशी भीती त्याने व्यक्त केली. नाना प्रकारच्या बनावट कागदपत्रांची मानवी इतिहासात पूर्वी कधी झाली नसेल इतकी प्रचंड पैदास सध्या रशियात होत आहे, असे रॉबिन्सने लॉकहार्टला सांगितले. एवढेच नव्हे तर खुद्द रॉबिन्स एक बोल्शेविक आहे आणि अमेरिकेकरिता रशियाकडून व्यापारी सवलती मिळवून घेण्याचा तो प्रयत्न करीत आहे हे सिद्ध करून दाखवणारी कागदपत्रेही प्रसृत होत आहेत अशी माहिती त्याने दिली.

रॉबिन्स व लॉकहार्ट यांचे लवकरच पक्के मेतकूट जमले. रोज सकाळची न्याहारी ते एकत्रच घेत व त्याच वेळी परस्पर सल्ल्याने दिवसभराच्या कामाची निश्चिती करीत. सोविएत सरकारला मान्यता द्यावी याकरिता त्यांच्या सरकारांना प्रवृत्त करणे व पूर्व आघाडीवर जर्मनीला विजय मिळू नये याकरिता प्रयत्न करणे ही त्या दोघांचीही उद्दिष्टे समान होती. [लॉकहार्ट व रॉबिन्स यांना फ्रेंच अधिकारी कॅप्टन जीन सादौल हा एक मोलाचा साथीदार मिळाला. तो पॅरिसमध्ये पूर्वी एक यशस्वी वकील व सोशलिस्ट प्रतिनिधी होता, रशियात त्यावेळी तो सोविएत सरकार व फ्रेंच सरकार यांतील संपर्क अधिकारी म्हणून काम करीत होता. रशियातील एकूण परिस्थितीबाबत त्याची मते लॉकहार्ट व रोबिन्स यांच्या मतांशी मिळतीजुळती होती. रशियाप्रती दोस्त राष्ट्रांनी घेतलेल्या भूमिकेवर तो करीत असलेल्या निर्भिड व प्रखर टीकेमुळे फ्रेंच राजदूत नौलेन्स याचे शत्रुत्व त्याने ओढवून घेतले होते. सादौल, रॉबिन्स व लॉकहार्ट हे सगळेच बोल्शेविक बनले आहेत असा प्रचार नौलेन्सने त्यावेळी चालविला होता. नौलेन्स हा एक कट्टर प्रतिक्रियावादी होता. फ्रान्समधील निवडक भांडवलदार कुटुंबांच्या प्रभावामुळे त्याची राजकीय मते साकार झाली होती, फ्रान्स

सरकारशी स्वतंत्रपणे संपर्क साधण्याचा सादौलचा अधिकार त्याने काढून घेतला. एवढेच नव्हे तर सादौलचा खाजगी पत्रव्यवहारही तो तपासून पाहू लागला.

अमेरिकन राजदूत डेव्हिड फ्रान्सिस यावर रॉबिन्सच्या मताचा प्रभाव पडू नये या दृष्टीने राजदूत नौलेन्स याने रॉबिन्सविरुद्ध एक कुजबुज मोहीमच सुरू केली होती अशी माहिती ब्रूस लॉकहार्टने आपल्या 'ब्रिटिश एजंट' या पुस्तकात दिली आहे. त्याच्या एका सचिवाने तर फ्रान्सिसच्या देखत एकदा उघडपणे विचारले की 'अमेरिकेचा राजदूत खरा कोण? फ्रान्सिस की रॉबिन्स?' अशा प्रकारामुळे राजदूत फ्रान्सिसच्या मनात रॉबिन्सबद्दल अढी निर्माण होऊन, तो आपली जागा तर घेणार नाही ना अशी कुशंका त्याच्या मनाला अस्वस्थ करू लागली. कालेदिनशी चाललेल्या त्याच्या गुप्त व्यवहाराबाबत रॉबिन्सने बोल्शेविकांना माहिती दिली असावी असाही संशय तो घेऊ लागला.]

### आणिबाणीचा क्षण

१९१८ च्या वसंतात सोविएत सरकारपुढे मोठा बिकट पेचप्रसंग उभा ठाकला होता. ब्रेस्त लितोवस्क करारावर शिक्कामोर्तब करण्यास सोविएत सरकारने नकार दिल्यास ते सरकार जबरीने उलथून पाडायचे याकरिता जर्मनीची तयारी चालू होती. दुसरीकडे, आर्कॅंजल, मर्मन्स्क व डॉन क्षेत्रात संघटित होत असलेल्या प्रतिक्रांतिकारी लष्करांना इंग्रज व फ्रेंच गुप्तपणे पाठिंबा देत होते, तर दोस्तांच्या संमतीने व्लादिवस्तोक काबीज करून सैबेरियावर हल्ला करावा अशी योजना जपान आखीत होते.

पेट्रोग्राडवर जर्मन हल्ला होण्याचा धोका असल्यामुळे राजधानी मास्को येथे हलविण्याचे सोविएत सरकारने ठरविले असल्याने लेनिनने एका मुलाखतीत लॉकहार्टला सांगितले. 'तशीच वेळ आली तर बोल्शेविक अखेरपर्यंत लढतील, तसे करताना अगदी वोल्गा व उरलपर्यंत माघार घ्यावी लागली तरी चालेल, पण ते लढतील ते दोस्त राष्ट्रांच्या हातातील बाहुले म्हणून नव्हे तर स्वतंत्रपणे स्वतःसाठी लढतील; ही आमची भूमिका दोस्त राष्ट्रे समजून घेतील तर रशिया व दोस्त राष्ट्रे यात उत्तम सहकार्य प्रस्थापित होऊ शकेल, जर्मनांचा प्रतिकार करण्याकरिता सोविएत रशियाला मदतीची अत्यंतिक गरज आहे' असे त्याने लॉकहार्टला सांगितले, पण त्याचबरोबर काहीशा उद्वेगाने तो पुढे म्हणाला, 'पण मला खात्री आहे, तुमचे सरकार या दृष्टीने एकंदर परिस्थितीचा विचारच करणार नाही. ते प्रतिक्रियावादी सरकार आहे, त्यामुळे ते रशियन प्रतिक्रियावाद्यांनाच मदत करेल.'

लॉकहार्टने या मुलाखतीचा थोडक्यात वृत्तांत ब्रिटिश परराष्ट्रखात्याला कळविला. काही दिवसातच लंडनहून त्याला सांकेतिक भाषेत एक संदेश आला. घाईघाईने सांकेतिक शब्दांची उकल करून लॉकहार्टने लंडन सरकारचा तो आदेश वाचला. रशियाला त्यावेळी कोणत्या एका गोष्टीची खरी गरज असेल तर ती म्हणजे बोल्शेविझमचे लवकरात लवकर निर्मूलन करू शकणाऱ्या 'निष्ठावान' रशियनांचे नेतृत्व करणाऱ्या निश्चयी व धाडसी अशा लहानशा ब्रिटिश अधिकारी वर्गाची, असे लंडनमधील एका लष्करी तज्ज्ञाचे मत असल्याचे त्या संदेशाद्वारा लॉकहार्टला कळविण्यात आले होते.

२३ फेब्रुवारी रोजी राजदूत फ्रान्सिसने आपल्या पुत्राला लिहिलेल्या पत्रात कळविले—'राहता येईल तितके दिवस रशियात राहण्याचे मी ठरवतो आहे. रशियाने जर स्वतंत्रपणे जर्मनीशी शांतता करार केला—तसा ते करतील असा माझा अंदाज आहे, तर मी जर्मनांच्या हाती पडेन हा धोका संभवतच नाही.

अनुक्रमणिका

अर्थात् तशा शांतता कराराने दोस्त राष्ट्रांवर जबरदस्त आघात होणार आहे. त्यामुळे बोल्शेविक सरकारला तसा शांतता करार करण्याचा काहीही अधिकार नाही अशी भूमिका रशियातील काही गट घेणार असतील तर त्यांना पाठिंबा देऊन उठावास उद्युक्त करावे असा प्रयत्न मी करणार आहे.'

हे पत्र लिहिल्यानंतर राजदूत फ्रान्सिस फ्रेंच राजदूत नौलेन्स व अन्य दोस्त मुत्सद्दी यांची जी बैठक भरणार होती, तिला उपस्थित राहण्यास निघाला. ही बैठक मास्को व आर्केंजल यामध्ये वसलेल्या वलोग्दा या लहानशा गावी आयोजित करण्यात आली होती. सोविएत राजवटीशी कोणत्याही प्रकारे सहकार्य करावयाचे नाही हे दोस्त राष्ट्रांनी आधीच ठरवून टाकले होते हे उघडच होते.

रॉबिन्सने या एकंदर पेचप्रसंगावर ट्रॉट्स्कीशी चर्चा केली. लेनिनला विरोध करण्यात आपली चूक झाली अशी त्यावेळी ट्रॉट्स्कीने नुकतीच उघडपणे कबुली दिली होती व पुन्हा लेनिनची मर्जी संपादन करण्याच्या प्रयत्नात त्यावेळी तो होता.

'ब्रेस्त करारावर शिक्कामोर्तब होऊ नये अशी तुमची इच्छा आहे काय?' ट्रॉट्स्कीने रॉबिन्सला विचारले.

'अर्थातच! पण लेनिनला तर तो करार व्हायला हवा आहे, आणि मंत्री महोदय, स्पष्टच बोलायचे झाले तर आज सगळी सूत्रे आहेत ती लेनिनच्या हाती!' रॉबिन्स उत्तरला.

'तुम्ही चुकता आहात!' ट्रॉट्स्की म्हणाला. 'जर्मनीकडून रशियाला असलेल्या धोक्याची पुरेपूर जाणीव लेनिनला आहे, आणि म्हणूनच दोस्त राष्ट्रांचा पाठिंबा व सहकार्य मिळेल अशी खात्री जर त्याला वाटली तर ब्रेस्ट लितोवस्कचा करार तो उधळून लावील; व तशी गरज पडली तर पेट्रोग्राड व मास्कोपासून एकाटेरिनबर्गपर्यंतही माघार घेऊन व उरल क्षेत्रात आघाडी स्थिर करून दोस्तांच्या मदतीने जर्मनीविरुद्ध लढण्यास तो निश्चितच सिद्ध होईल.'

रॉबिन्सच्या विनंतीला मान देऊन अमेरिकन सरकारला पाठविण्याकरिता लेनिनने अधिकृतपणे एक खलिता तयार केला. त्याच्या आवाहनाला अनुकूल प्रतिसाद मिळेल अशी वस्तुतः त्याला मुळीच आशा नव्हती. पण प्रयत्न करून पाहायला त्याला हरकत वाटत नव्हती. त्या खलित्यात महत्त्वाचा मजकूर असा होता—जर (अ) अखिल रशियन काँग्रेस ऑफ सोविएत्सने ब्रेस्त लितोवस्कच्या कराराला मंजुरी देण्यास नकार दिला, व (ब) जर्मनीने युद्धबंदी करार मोडून पुन्हा रशियावर चढाई केली तर (१) जर्मनीविरुद्धच्या लढ्यात सोविएत सरकार पाठिंब्याकरिता अमेरिका, ग्रेट ब्रिटन व फ्रान्स यांच्यावर विसंबून राहू शकते काय? (२) नजीकच्या भविष्यात, लष्करी साहित्य, दळणवळण साधने व जीवनावश्यक वस्तू अशा कोणत्या स्वरूपाची मदत किती व कोणत्या अटीवर मिळू शकेल? (३) विशेषकरून अमेरिकेकडून रशियाला कोणत्या प्रकारचा पाठिंबा मिळू शकेल?'

ब्रेस्त लितोवस्क शांतता कराराला मान्यता देण्याच्या प्रश्नाचा विचार करण्याकरिता अखिल रशियन सोविएत काँग्रेसची सभा १२ मार्च रोजी भरणार होती. परंतु रॉबिन्सच्या विनंतीवरून १४ मार्चपर्यंत ती बैठक लांबणीवर टाकण्याचे लेनिनने कबूल केले. त्यामुळे ब्रिटिश व अमेरिकन सरकारांची मने वळविण्याकरिता लॉकहार्ट व रॉबिन्स यांना जास्तीचे दोन दिवस मिळणार होते.

५ मार्च १९१८ रोजी सोविएत सरकारला मान्यता द्यावी असे कळकळीचे विनंतीवजा आवाहन करणारी तार लॉकहार्टने ब्रिटिश परराष्ट्र खात्याच्या कार्यालयाला केली. 'क्रांतीनंतरच्या काळात रशियाशी सामंजस्य व सलोखा प्रस्थापित करून आपल्या रशियातील हितसंबंधांचे संवर्धन करण्याची उत्तम संधी, रशियावर कठोर करार लादून जर्मनीने जणू आपल्याला दिली आहे. रशिया जर्मनीच्या प्रभावाखाली जाऊ नये असे जर ब्रिटिश सरकारला वाटत असेल तर ही संधी आपण गमावू नये अशी कळकळीची विनंती आहे.' लंडनहून लॉकहार्टच्या या तारेचे उत्तर आले नाही. पत्र आले ते त्याच्या पत्नीकडून! त्याच्या रशियासंबंधीच्या भूमिकेमुळे तो 'लाल' बनला आहे, अशी परराष्ट्र खात्यात सर्वत्र कुजबुज होत असून त्याने यापुढे त्या दृष्टीने सावधगिरी बाळगावी असा इशारा तिने आपल्या पत्रात त्याला दिला होता.

१४ मार्च रोजी मास्कोत ऑल रशियन सोविएत काँग्रेसची सभा सुरू झाली. ब्रेस्त कराराला मंजूरी देण्याबाबत त्या सभेत दोन दिवस व दोन रात्री सतत वाद चालू होता. ट्रॉट्स्की गट कराराला कडवा विरोध करून, सामान्य जनतेच्या मनात त्या अत्यंत अप्रिय ठरणाऱ्या करारामुळे दाटलेल्या संतापाचा उपयोग, लेनिनविरुद्ध स्वतःच्या राजकीय उद्दिष्टांच्या पूर्तीकरिता करून घेण्याचा प्रयत्न करीत होता. स्वतः ट्रॉट्स्की मात्र सभेला हजर नव्हता. रॉबिन्सने नंतर म्हटल्याप्रमाणे तो पेट्रोग्राड येथे फुरगटून बसला होता.

दुसऱ्या रात्री, सभा सुरू असता, सुमारे अकरा साडेअकरा वाजता व्यासपीठानजीकच बसलेल्या रॉबिन्सला लेनिनने खूण करून जवळ बोलाविले व विचारले, 'तुमच्या सरकारकडून तुमच्याकडे काय बातमी आली आहे?' 'काहीच नाही.' रॉबिन्स उत्तरला. 'लॉकहार्टकडे त्याच्या सरकारकडून काही संदेश आला का?' या लेनिनच्या प्रश्नालाही रॉबिन्सने नकारार्थी उत्तर देताच लेनिनपुढे दुसरा काही पर्यायच उरला नाही, 'व्यासपीठावर जाऊन ती आता करारावर शिक्कामोर्तब करण्याची शिफारस करणार आहे. हा करार मंजूर होईल,' लेनिनने रॉबिन्सला सांगितले.

काँग्रेस सदस्यांपुढे एक तास लेनिन बोलत होता. तो करार म्हणजे रशियावर एक फार मोठा आघात आहे हे सत्य लपवून ठेवण्याचा त्याने थोडाही प्रयत्न केला नाही. एकाकी पडलेले सोविएत सरकार चारही बाजूंनी संकटांनी घेरले गेलेले असून, काहीही झाले तरी त्या सरकारला स्वहिताच्या दृष्टीने उसंत मिळणे अत्यावश्यक असल्याचे त्याने सदस्यांना पटवून सांगितले. ब्रेस्त लितोवस्क करारावर शेवटी अत्यंत नाईलाजाने काँग्रेसने शिक्कामोर्तब केले. 'सद्य परिस्थितीत रशियन लोकतंत्राचे सोविएत सरकार एकाकी उभे असून, जर्मन साम्राज्यवादी आक्रमणास तोंड देण्यास ते असमर्थ आहे, त्यामुळे क्रांतिकारी रशियाचे संरक्षण व्हावे या हेतूने, नाईलाजाने, त्याच्यावर लादण्यात आलेल्या अटींना सोविएत सरकार मान्यता देत आहे' अशा आशयाचे घोषणापत्रक काँग्रेसने काढले.

कामगिरीची अखेर

राजदूत फ्रान्सिसने २ मे १९१८ रोजी अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याला एक तार पाठविली—'रॉबिन्स व बहुधा लॉकहार्टही सोविएत सरकारला मान्यता द्यावी अशा मताचे आहेत. परतुं तुम्ही व इतरही दोस्तांनी तशी मान्यता देण्यात सतत विरोध केला आहे. मीही त्याबद्दल कधीही शिफारस केली नाही व त्यात माझी काही चूक झाली असे मला वाटत नाही.'

या तारेचा व्हायचा तो परिणाम झाला. 'एकूण परिस्थितीत विचार विनिमयाकरिता तुम्ही ताबडतोब परत निघून यावे हे अगत्याचे आहे' अशी परराष्ट्रसचिव लान्सिंग याने पाठविलेली तार काही दिवसातच रॉबिन्सला मिळाली.

व्लादिवस्तोक येथून मायदेशी जाण्याकरिता ट्रान्ससैबेरियन रेल्वेने त्या बंदराच्या दिशेने निघालेल्या रॉबिन्सला तेथे पोहोचेपर्यंत तशाच आशयाच्या तीन तारा मिळाल्या. त्याने कोणत्याही प्रकारचे जाहीर निवेदन करू नये अशी ताकीदही त्याला देण्यात आली.

वॉशिंग्टनला परत गेल्यानंतर रेमंड रॉबिन्सने त्याचा अहवाल परराष्ट्र सचिव लान्सिग याला सादर केला. त्यात, सोविएत रशियात दोस्त राष्ट्रांनी कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करण्याच्या कल्पनेचा त्याने तीव्र शब्दात धिःक्कार केला. एवढेच नव्हे तर अमेरिका व रशिया यांचे व्यापारी संबंध दृढ व वृद्धिंगत व्हावेत याकरिता एका योजनेचा मसुदाही त्याने त्या अहवालाला जोडला. अध्यक्ष विल्सनला देण्याकरिता खुद्द लेनिनने तो रॉबिन्सच्या स्वाधीन केला होता. पण लेनिनचा तो कार्यक्रम अध्यक्ष विल्सनपर्यत कधी पोचलाच नाही. रॉबिन्सने विल्सनची भेट घेण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण त्यात त्याला यश आले नाही. पावलोपावली त्याच्या मार्गात अडथळे उभे केले गेले. त्याबाबत वृत्तपत्रांत बातमी देण्याचा त्याने प्रयत्न केला. पण कधी वृत्तपत्रांनी त्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले, तर कधी त्याने दिलेल्या बातमीला प्रसिद्धी दिली गेली ती अगदी विकृत स्वरूपात!

पण एवढ्यावरही गोष्टी थांबल्या नाहीत. त्याच्या अहवालाचा त्याला अपेक्षित तो परिणाम होणे तर दूरच, उलट बोल्शेविझम व जर्मन प्रचार यांची चौकशी करण्याकरिता प्रस्थापित झालेल्या सिनेट कमिटीपुढे स्वतःचा बचाव देण्याकरिता उभे राहण्याचा प्रसंग रॉबिन्सवर ओढवला. त्या समितीपुढे आपल्या भूमिकेचे समर्थन करताना रॉबिन्स म्हणाला, 'मी जर आज खरे बोललो, व खोटे बोलून त्या मंडळींवर चिखलफेक केली नाही, ते जर्मनीचे हस्तक आहेत, खुनी, गुन्हेगार आहेत असे म्हटले नाही तर मी बोल्शेविक ठरतो असे दिसते. पण रशियातील एकंदर परिस्थितीचे निरीक्षण करण्याची अन्य कोणत्याही दोस्त प्रतिनिधीपेक्षा, उत्तम संधी मला तेथे मिळाली, व कोणत्याही प्रकारे भावनेच्या आहारी न जाता, द्वेषभावनेला बळी न पडता, केवळ वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून (माझी मते त्यांच्या मतांशी मिळती नसली तरी) तेथील लोक व तेथील राजकीय चळवळी याबद्दल सत्य तेवढेच मला सांगायचे आहे. रशियन लोकांना ज्या

प्रकारचे सरदार हवेसे वाटते तसे ते स्थापण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे असे मला वाटते, मग ते मला अनुकूल असो वा नसो, ते माझ्या तत्त्वाशी जुळणारे असो किंवा नसो! पूर्वग्रह किंवा असत्य विधाने यांनी दिशाभूल होऊ न देता रशियात आजच्या क्षणी काय चालले आहे ते मोकळ्या मनाने जाणून घेणे, व त्या दृष्टीने प्रामाणिकपणे, न्याय्य व हितकारक अशी नीती निश्चित करणे ही आजची खरी गरज आहे; शस्त्रांच्या बळावर तत्त्वे किंवा सैद्धांतिक भूमिका चिरडून टाकता येतील असे मला मुळीच वाटत नाही. अधिक चांगल्या मानवी जीवनाची गरज चांगले मानवी जीवनच भागवू शकते.' पण रॉबिन्सच्या त्या प्रामाणिक आवाहनाचा कवडी इतकाही उपयोग झाला नाही. असत्य माहिती व पूर्वग्रह यांच्या उसळत्या लाटेत त्याचा आवाज विरून गेला.

१९१८ च्या ग्रीष्मात अमेरिकेचे युद्ध रशियाविरुद्ध नव्हे तर जर्मनीविरुद्ध चालू असले तरी न्यूयॉर्क टाईम्स यासारखे अमेरिकेचे आघाडीचे वृत्तपत्र, 'आपले सर्वात भयानक व घातक शत्रू,' 'सर्वभक्षक नरपशू' असे बोल्शेविकांचे वर्णन करीत होते. सोविएत नेते हे जर्मनीचे 'पगारी हस्तक' आहेत असा प्रचार सर्व अमेरिकन वृत्तपत्रे सरसकट करीत होती. 'खाटिक,' 'खुनी,' 'वेडे,' 'रक्तपिपासू गुन्हेगार,' अशा शेलक्या विशेषणांचा वापर लेनिन व त्याचे सहकारी याबद्दल लिहिताना अमेरिकन वृत्तपत्रे करीत होती. 'भयानक घातक पशू' अशा शब्दात खुद्द काँग्रेसमध्ये त्यांचा उद्धार होत होता.

१९१८ च्या जुलैपर्यंत राजदूत फ्रान्सिस हा रशियात होता. त्या त्याच्या मुक्कामात, रशियन जनतेचे सोविएत सरकार उलथून पाडावे असे आवाहन करणारी घोषणापत्रके व निवेदने तो अधून मधून काढत होता. तो अमेरिकेला परत जाण्यास निघाला तेव्हा चिचेरिन या नव्या सोविएत परराष्ट्र मंत्र्याने अमेरिकन जनतेप्रती सदिच्छा व्यक्त करणारी तार त्याला पाठविली. त्या तारेचे फ्रान्सिसने काय केले याची माहिती त्यानेच त्याच्या 'रशिया फ्रॉम द अमेरिकन एम्बसी' या ग्रंथात दिली आहे. तो म्हणतो, 'अमेरिकन शांततावाद्यांना प्रभावित करणे हा त्या तारेचा उद्देश उघडच होता. ती तार परराष्ट्र खात्याला पोचती केली तर वृत्तपत्रांद्वारा ती अमेरिकन जनतेपर्यंत पोहोचेल या भीतीने मी ती तार परराष्ट्र खात्याला कधी दिलीच नाही.'

ब्रूस लॉकहार्ट काही काळ रशियातच राहिला, 'खरे म्हणजे मी राजीनामा देऊन मायदेशी परतायला हवे होते,' तो नंतर म्हणाला. पण ब्रिटिश हस्तक म्हणून आपल्या पदावर तो तसाच कायम राहिला. आपल्या 'ब्रिटिश एजंट' या ग्रंथात त्याने नंतर अशी कबुली दिली की रशियातील त्याच्या त्या मुक्कामात जर्मनीविरुद्ध नव्हे तर रशियाच्या सत्तारूढ सरकारविरुद्ध सुरू झालेल्या मोहिमेत, त्याच्या नकळत तो अधिकाधिक गुरफटत गेला.

## प्रकरण ३

# निष्णात गुप्तहेर

### एम्. मासिनो याचे आगमन

१९१८ मध्ये, परकीय शत्रूंच्या लष्करांचा पडलेला वेढा व अंतर्गत क्षेत्रात प्रतिक्रांतिवाद्यांच्या कटकारस्थानांमुळे निर्माण झालेला धोका, या कारणांनी क्रांतीच्या प्रक्षोभामुळे अगोदरच ढवळून निघालेल्या पेट्रोग्राड शहाराची स्थिति अगदी भयावह झाली होती. अन्नधान्य, सर्पण, दळणवळण इत्यादी गोष्टींचा मागमूसही कोठे दिसत नव्हता. ओसाड, कचरा साचलेल्या रस्त्यांवर, ब्रेडकरता कधीही न संपणाऱ्या रांगांत उभे असलेले फाटक्या कपड्यांतील थकले भागलेले स्त्रीपुरुष थंडीत कुडकुडत होते. प्रदीर्घ उदासीन रात्रींना गोळीबाराच्या आवाजाने दचकून जाग येत होती. चोर गुंडांच्या टोळ्या, सोविएत राजवटीचे आदेश धाब्यावर बसवून, लटालूट करीत, जनतेत दहशत निर्माण करीत शहरात धुमाकूळ घालीत होत्या. [या सोविएतविरोधी टोळ्यांपैकी अनेक जण स्वतःला अराजकवादी म्हणवून घेत. जर्मन लष्करी गुप्तहेर खात्याकडून त्यांना पैसा पुरवला जात होता तो एकाच उद्दिष्टाने—की त्यांनी रशियात दंगली व अस्थिरता निर्माण करून जर्मन हस्तक्षेपाला निमित्त मिळवून द्यावे; रॉबिन्स व लॉकहार्ट यांनी संयुक्तपणे केलेल्या चौकशीत या सर्व गोष्टी उघडकीस आल्या.] सशस्त्र कामगार घरोघरी जाऊन अन्नधान्याचे साठे हुडकून काढीत होते; अन्नधान्याचा काळाबाजार करणाऱ्यांची, लुटारूंची व दहशतवाद्यांची धरपकड करीत होते.

एकंदर परिस्थितीवर सोविएत सरकारचे नियंत्रण अजून प्रस्थापित झालेले नव्हेत. झारशाहीतील भोगविलास व ऐषाराम यांच्या खाणाखुणा व जनतेचे अतीव दैन्य दारिद्र्य यातील तफावत मनाला सुन्न मनाला सुन्न करीत होती. सोविएत राजवटीच्या पतनाची भाकिते करणारी सोविएत विरोधी वृत्तपत्रे रोज प्रकाशित होत होती. खर्चिक, आलिशान हॉटेल्स व उपहारगृहे अजूनही चालूच होती व तेथे किंमती, फॅशनेबल पोषाखातील मंडळींची गर्दी होत होती. रात्रीची ‘कॅबेरे’ नृत्यगृहे गच्च भरलेली असत. मद्यपान व नृत्ये यांच्या आतषबाजीत, झारकालीन अधिकारी, बॅले नर्तिका, काळाबाजार करणारे, हे सर्व जेवणाच्या टेबलांशी गर्दी करून, ‘जर्मन्स मास्कोवर चाल करून जात आहेत,’ ‘ट्रॉट्स्कीने लेनिनला अटक केली आहे,’ ‘लेनिन वेडा झाला आहे,’ अशा नानाप्रकारच्या अफवा पसरवीत होते. वेड्या आशा व खोट्या निराधार बातम्या यांची व्होडका इतकीच रेलचेल होत होती. कटकारस्थानांना ऊत येत होता.

त्या वसंतात एम्. मासिनो नावाची एक व्यक्ती पेट्रोग्राडमध्ये आली होती. तो स्वतः एक तुर्की व पौर्वात्य व्यापारी असल्याचे तो सागंत होता! फिक्कट, गंभीर चेहऱ्याचा, काळ्या डोळ्यांचा, विशाल भालप्रदेशाचा चाळिशीतील मासिनो लष्करी थाटात ताठ, भराभर पण चोरपावलांनी चाले. तो चांगला

अनुक्रमणिका

श्रीमंत असावा असे वाटत होते. बायकांना तो मोठा आकर्षक वाटायचा. पेट्रोगाड शहरातील तत्कालीन गोंधळात, आपल्या कामकाजनिमित्त हा मासिनो मोठ्या ऐटित हिंडताना दिसे.

रोज संध्याकाळी मासिनो पेट्रोग्राडच्या एका धुरकटलेल्या लहानशा बल्कोव कॅफे या उपहारगृहात सोविएत विरोधकांच्या नेहमीच्या अड्डयावर जाई. कॅफेचा मालक सर्जी बल्कोव त्याचे मोठ्या आदरपूर्वक स्वागत करी. उपहारगृहाच्या मागल्या बाजूला असलेल्या एका खोलीत अनेक स्त्रीपुरुषांना तो भेटे. ते त्याच्याशी दबलेल्या आवाजात बोलत—कोणी रशियन भाषेत, कोणी इंग्रजीतून तर कोणी फ्रेंच भाषेत! मासिनोला अनेक भाषा अवगत होत्या.

नव्याने प्रस्थापित झालेले सोविएत सरकार देशात सर्वत्र पसरलेल्या गोंधळातून शांतता व सुव्यवस्था स्थापन करण्याकरिता धडपडत होते. प्रतिक्रांतीच्या सतत जाणवणाऱ्या प्राणघातक धोक्यामुळे संघटना उभारणीचे प्रचंड काम अधिकाधिक कठीण होत होते. लेनिन म्हणाला त्याप्रमाणे बुर्ज्वा, जमीनदार व सगळा धनिक वर्ग क्रांतीला सुरुंग लावण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होता. या एकंदर परिस्थितीमुळे अंतस्थ व परकीय शत्रूंना तोंड देण्याकरिता लेनिनच्या शिफारसीवरून घातपात व हेरगिरीविरोधी एक खास संघटना उभारण्यात आली. त्या संघटनेच्या नावाच्या आद्याक्षरांवरून 'चेक' या संक्षिप्त नावाने ती संघटना ओळखली जाऊ लागली. [१९२२ मध्ये 'चेका' संघटना विसर्जित करण्यात येऊन त्याऐवजी ओ.जी.पी. यू. (युनायटेड स्टेट पोलिटिकल ऑर्गनायझेशन या अर्थाच्या रशियन नावाची आद्याक्षरे) ही संघटना उभारण्यात आली. पुढे १९३४ मध्ये ओ.जी. पी. यू. ही बरखास्त करण्यात येऊन एन्. के. व्ही. डी. (डिपार्टमेंट ऑफ पब्लिक सेक्युरिटी अंडर द सोविएत कमिसारिएत ऑफ इंटर्नल अफेअर्स) ही संघटना उभारली गेली.]

जर्मन आक्रमणाच्या धास्तीने १९१८ च्या ग्रीष्मात सोविएत सरकार मास्कोला हलविण्यात आले तेव्हा त्यापाठोपाठ मासिनोही मास्कोला गेला. पण मास्कोत त्या श्रीमंत व ऐटदार व्यापाऱ्याच्या बहिरंगात एकदमच बदल झाला. आता तो कामगारांचे कातडी जॅकेट व टोकदार टोपी परिधान करू लागला. क्रेमलिनमध्ये त्याची जा ये सुरू झाली; क्रेमलिनच्या महाद्वाराशी सोविएत सरकारच्या तरुण, कम्युनिस्ट लेटिश रक्षकाने त्याला अडवताच त्याने एक अधिकृत सोविएत दाखला त्याच्यासमोर धरला. त्या दाखल्यावरून तो पेट्रोग्राड चेकाच्या गुन्हेगारी शाखेचा एक हस्तक असून त्याचे नाव सिडने जॉर्जेविच रेलिन्स्की आहे असे दिसत होते. त्यामुळे त्या कॉम्रेड रेलिन्स्कीला आत जाण्याची परवानगी त्या रक्षकाने दिली.

मास्कोच्या दुसऱ्या एका भागात, बॅले नर्तिका दागमारा हिच्या आलिशान सुशोभित घरात मासिनो उर्फ चेकाचा कॉम्रेड रेलिन्स्की हा ब्रिटिश गुप्तहेर खात्याचा हस्तक मॅसिआ कॉन्सटंटाईन म्हणून ओळखला जात होता. ब्रिटिश दूतावासात लॉकहार्टला मात्र तो खरा कोण ते चांगले ठाऊक होते. तो होता गूढतेच्या अवगुंठनात दडलेला ब्रिटिश हेर खात्याचा सर्वात निष्णात गुप्त हेर—सिडने रॅली.

**सिडने रॅली**

पहिल्या महायुद्धकाळात, राजकीय क्षेत्रात नानाप्रकारची गैर व काळीबेरी कृत्ये करणाऱ्या झारशाहीच्या भूमिगत जगातून बोल्शेविझमविरुद्ध लढा चालविण्यास कटिबद्ध होऊन पुढे आलेल्या मंडळींपैकी एक सर्वात असाधारण व बहुरंगी व्यक्तिमत्त्व होते—ते म्हणजे ब्रिटिश गुप्तहेर सेवेच्या सिडने रॅलीचे. लॉकहार्टच्या शब्दात सांगायचे तर, मनःप्रवृत्ती व प्रकृती याबाबत रॅली व नेपोलियन यात खूपच साधर्म्य होते. या रॅलीमुळेच युरोपीय इतिहासातील मोठ्या विलक्षण व धोक्याच्या कामगिरीत लॉकहार्ट लवकरच गुंतणार होता.

ब्रिटिश गुप्तहेर खात्याच्या गूढ आणि अत्यंत शक्तिशाली यंत्रणेत रॅलीचा प्रथम शिरकाव कसा झाला हे अजूनही एक न उलगडलेले रहस्य आहे. झारकालीन रशियात जन्माला आलेल्या सिडने रॅलीची आई रशियन तर पिता आयरिश नौदलातील एक कॅप्टन होता. काळ्या समुद्रावरील ओदेसा ह्या बंदरात तो लहानाचा मोठा झाला. पहिल्या महायुद्धापूर्वी सेंट पीटर्सबर्गमधील मान्द्रोकोविच व काऊंट चुबेरस्की यांच्या नौदल शस्त्रास्त्रांच्या मोठ्या कंपनीत तो नोकरीला होता. त्याही वेळी त्याचे काम मोठे रहस्यमय स्वरूपाचे होते. ती रशियन कंपनी, व ब्लुहम व वॉस यांचे सुप्रसिद्ध हॅम्बुर्ग जहाजबांधणी कारखाने व अन्य काही जर्मन कारखानदार व उद्योगपती यातील संपर्क अधिकारी म्हणून तो काम करीत होता. पहिले महायुद्ध भडकण्याच्या सुमारास जर्मन पाणबुड्या व जर्मनीचा जहाज बांधणी कार्यक्रम याबद्दल महत्त्वाची माहिती नियमीतपणे लंडन येथील ब्रिटिश नौदल मंत्रालयाला मिळू लागली. ती माहिती पुरवीत होता, तो सिडने रॅली.

१९१४ मध्ये रूसो-एशियाटिक बँकेचा खास विश्वासू प्रतिनिधी म्हणून रॅली जपानमध्ये गेला. तेथून तो अमेरिकेत गेला व तेथे त्याने अमेरिका बँकर्स व शस्त्रास्त्र निर्मिती कारखानदार यांच्याशी खलबते केली. त्यावेळीच ब्रिटिश गुप्त हेर खात्याच्या फाईल्समध्ये सिडने रॅलीची नोंद 'आय्. एस्टी' या सांकेतिक नावाने झाली होती. एक अत्यंत साहसी, युक्तिबाज व हिकमती गुप्तहेर म्हणून त्याची ख्याती झाली होती.

तो एक चांगला भाषातज्ञ असून सात वेगवेगळ्या भाषा तो अस्खलितपणे बोलू शकत असे. लवकरच युरोपातील काही महत्त्वाच्या कामाकरिता अमेरिकेने त्याला पाचारण केले. १९१६ मध्ये स्वित्झर्लंडची सीमा ओलांडून त्याने जर्मनीत प्रवेश केला. एक जर्मन नौदल अधिकारी असल्याची बतावणी करून त्याने जर्मन नौदल मंत्रालयात प्रवेश मिळवला. तेथे, जर्मन नौदल गुप्तहेरखात्याच्या सांकेतिक लिपीची एक प्रत मिळवून घेऊन त्याने ती लंडनला पाठविली. पहिल्या महायुद्धकाळात ब्रिटिश गुप्तचर विभागाने केलेल्या अनेक महत्त्वाच्या गोष्टींपैकी रॅलीची ही कामगिरी अत्यंत महत्त्वाची ठरली.

१९१८ च्या प्रारंभी, रशियातील ब्रिटिश गुप्तचर विभागाचा संचालक म्हणून रॅलीला रशियात पाठविण्यात आले. त्याचे तेथील निरनिराळ्या क्षेत्रातील अनेक मित्र, व्यापक क्षेत्रातील त्याचे व्यापारी संबंध, व रशियन प्रतिक्रांतिकारकांच्या अंतरवर्तुळाबाबत त्याला असलेली अचूक माहिती या कारणांमुळे त्या पदावर त्याची झालेली नियुक्ती अत्यंत उचित अशीच होती. खुद्द रॅलीला रशियात झालेली त्याची

अनुक्रमणिका

नेमणूक काही खाजगी कारणाकरिता महत्त्वाची वाटत होती. बोल्शेविकांबद्दलच्या व रशियन क्रांतीबद्दलच्या कडव्या, असीम द्वेषाने त्याचे मन जळत होते. 'काही झाले तरी जर्मन लोक माणसे आहेत. त्यांच्याकडून पराभव एखादे वेळी आम्ही सहन करून घेऊ. पण इथे मास्कोत मानवजातीचा एक कट्टर शत्रू दिवसेंदिवस बळावतो आहे. सुसंस्कृत जगाने या राक्षसाला चिरडून टाकण्याकरिता वेळेवारीच पावले न उचलली तर अखेरी हा राक्षसच प्रगत पाश्चिमात्य संस्कृतीचा विनाश करून टाकील;' असे त्याच्या प्रतिक्रांतीच्या उद्दिष्टाबद्दल बोलताना तो उघडपणे म्हणे.

ब्रिटिश गुप्तचर विभागाच्या लंडन येथील मध्यवर्ती कार्यालयाला पाठविलेल्या त्याच्या अहवालात, इंग्लंडने जर्मनीशी ताबडतोब युद्धबंदी करावी, एवढेच नव्हे तर बोल्शेविझमविरुद्ध कैसरशी हातमिळवणी करावी अशी निकड तो वारंवार लावीत होता. 'काहीही झाले. कोणतीही किंमत द्यावी लागली तरी चालेल पण रशियात जन्माला आलेली ही गलिच्छ, बिभत्स विकृती पूर्णपणे चिरडली गेलीच पाहीजे. जर्मनीशी ताबडतोब शांतता करार करावा. होय! जर्मनीशीच केवळ नव्हे तर अन्य कोणाशीही शांतता करार करावा लागला तरी करावा. कारण आपला खरा शत्रू एकच आहे, बोल्शेविझम! या भयानक विकृतीविरुद्ध संपूर्ण मानवजातीने पवित्र युती करून ऐक्य साधले पाहिजे,' असे तो तळतळून आवाहन करीत होता.

रशियात पाऊल ठेवताच सोविएत विरोधी कारस्थानात रॅलीने स्वतःला झोकून दिले. त्याचे एकमेव उद्दिष्ट होते–, ते सोविएत सरकार उलथून पाडणे. [त्याकाळी ब्रिटिश टोरी पक्ष व फ्रेंच प्रतिक्रियावादी यांच्या नेतृत्वाखाली पाश्चिमात्य राष्ट्रे सोविएतविरोधी कशा कशा कारवाया करीत होते हे दर्शविण्याकरिता रशियातील सिडने रॅलीच्या सोविएतविरोधी कारस्थानांच्या कथेचा प्रतिकात्मक उपयोग प्रस्तुत लेखकांनी या ग्रंथात केला आहे. रॅलीची मते व कृती ही त्याची असली तरी त्यापाठीमागील नीतीच्या निर्धारणाचे काम मात्र त्याच्या हाती नव्हते. रशियाबाहेर सतत शिजत असलेल्या सोविएतविरोधी कारस्थानातील तो एक दृढनिश्चयी व निधड्या छातीचा हस्तक होता एवढेच! त्याच्या खंबीर व धाडसी कारवायांद्वारा पाश्चिमात्य राष्ट्रांच्या सोविएतविरोधी नीतीला मूर्त स्वरूप येत होते.]

### पैसा व हत्या

१९१८ मध्ये रशियात, बोल्शेविकांच्या विरोधात संख्याबळाने सर्वात बलिष्ठ असलेला राजकीय पक्ष होता तो सोशल रेव्होल्यूशनरी पक्ष कृषि-समाजवादाचा पुरस्कार हा पक्ष करीत होता. केरेन्स्कीच्या मंत्रिमंडळातील एकेकाळचा युद्धमंत्री व कोर्निलोवच्या उठावात भाग घेतलेला कट्टर बोल्शेविक विरोधक बोरिस साविन्कोव हा त्यांचा नेता होता. हा लढाऊ सोशल रेव्होल्यूशनरी पक्ष बोल्शेविकविरोधी भावनांचा केंद्रबिंदू बनला होता. त्यांच्या अतिरेकी हिंसक कारवाया व प्रक्षोभक प्रचार यामुळे, झारशाहीच्या जुलुम-दडपशाहीला तोंड देण्यास उदयाला आलेले अनेक अराजकवादी गट त्यांच्याकडे आकर्षित झाले होते. झारांच्याविरुद्ध शस्त्र म्हणून दहशतवादाचा प्रयोग त्यांनी अनेक वर्षापासून केला होता. तेच शस्त्र ते आता बोल्शेविकांविरुद्ध वापरण्याच्या तयारीत होते.

फ्रेंच गुप्तहेर सेवेकडून सोशल रेव्होल्यूशनरींना भरपूर पैसा मिळत होता. फ्रेंच राजदूत नौलेन्स याने दिलेल्या पैशाच्या बळावर लीग फॉर द रीजनरेशन ऑफ रशिया या नावाने, मास्को येथे, सोशल रेव्होल्युशनरी पक्षाचे जुने दहशतवादी केंद्र बोरिस साविन्कोवने पुन्हा स्थापन केले. लेनिन व अन्य सोविएत

अनुक्रमणिका

नेत्यांच्या हत्येच्या योजना आखणे हे त्या केंद्राचे मुख्य काम होते. सिडने रॅलीच्या शिफारसीवरून ब्रिटिश गुप्तचर खातेही दहशतवाद्यांना प्रशिक्षण देऊन शस्त्रसज्ज करण्यासाठी पैसा पुरवू लागले.

मात्र रॅली हा पक्का झारसमर्थक असल्याने सोविएत सरकार उलथून पाडल्यानंतर स्थापित करावयाच्या नव्या रशियन सरकारात सोशल रेव्होल्यूशनरींना स्थान देण्याची रॅलीची तयारी नव्हती. साविन्कोव हा त्याला सर्वस्वी विश्वासार्ह वाटत असला तरी डावे सोशल रेव्होल्यूशनरी म्हणजे एक मोठी घातक व जहाल शक्ती आहे असे त्याला वाटत होते. त्यांच्यापैकी काहींनी ट्रॉट्स्कीच्या नेतृत्वाखालील लेनिन विरोधकांशी हातमिळवणी केलेली होती हे त्याकाळी अनेकांना माहीत होते. त्या मंडळींचा स्वतःच्या उद्दिष्टसिद्धीकरिता उपयोग करून घेण्यास रॅलीला हरकत वाटत नव्हती, पण रशियातील जहालवादाचा नायनाट करण्याचा मात्र त्याचा पक्का निर्धार होता. झारशाहीची पुनर्स्थापना करण्याची पहिली पायरी म्हणून त्याला रशियात लष्करी हुकुमशाही प्रस्थापित व्हायला हवी होती. त्यामुळे एकीकडे सोशल रेव्होल्युशनरी दहशतवादी व अन्य जहाल सोविएतविरोधी गटांना पैसा व प्रोत्साहन देत असताना, दुसरीकडे तो ब्रिटिश हेर, स्वतःची वेगळी एक कारस्थानी यंत्रणाही मोठ्या काळजीपूर्वक उभारीत होता. त्याकाळच्या त्याच्या त्या यंत्रणेचे कामकाज कसे चालत होते याचे वर्णन खुद्द रॅलीनेच त्याच्या स्मृतिचित्रात दिले आहे. तो म्हणतो, ‘माझ्या रशियन संघटनेच्या सर्व सदस्यांना नको ती माहिती मिळू नये, व संघटनेच्या कोणत्याही सदस्याला इतर सदस्यांचा घात करणे शक्य होऊ नये हे आवश्यक असल्याने फक्त पाच सदस्यांचा एक गट असावा, व त्या गटातील प्रत्येक सदस्याला फक्त त्या गटातील इतर चार सदस्यांव्यतिरिक्त अन्य कोणाबद्दलही काही माहिती असू नये अशा पद्धतीने संपूर्ण संघटनेची उभारणी करण्यात आली होती. या संघटनेचा प्रमुख व मूळ सूत्रधार म्हणून मला मात्र सर्वांची माहिती होती. व्यक्तिशः मी प्रत्येकाला ओळखत नव्हतो. पण प्रत्येकाचे नाव व पत्ता मला माहीत असे. ही पद्धती नंतरच्या काळात मला मोठी उपयुक्त ठरली. एखादा दुसरा कोणी जरी पकडला गेला तरी त्यामुळे संपूर्ण संघटनेचा घात न होता पकडल्या गेलेल्या सदस्यांपुरताच तो धोका मर्यादित राहणार होता.

झारशाही अधिकाऱ्यांची गुप्त संघटना, ‘ओछाना’ या झारकालीन गुप्त पोलीस संघटनेचे उरले सुरले लोक, साविन्कोवचे दहशतवादी, व तत्सम प्रतिक्रांतिकारी गट यांच्याशी हातमिळवणी केलेली रॅलीची संघटनयंत्रणा मास्को व पेट्रोग्राड येथे झपाट्याने फोफावली. झारांच्या काळातील त्याचे अनेक जुने मित्र व परिचित मंडळी त्याला येऊन मिळाली. त्यांचा त्याला फार उपयोग झाला. जर्मन जहाजबांधणी कारखान्यांशी संपर्क प्रस्थापित करणारा अधिकारी म्हणून रॅलीची नियुक्ती करणारा नाविक शस्त्रास्त्र निर्मिती कारखानदार काऊंट चुबेरस्की, झारकालीन जनरल युदेनिच,पेट्रोग्राडचा कॅफे-मालक सर्जी बल्कोव, जिच्या मास्को येथील निवासस्थानी रॅलेने आपले कार्यालय थाटले होते ती बॅले नर्तिका दागमारा, झारकालीन धनिक वकील व ओछ्रानाचा भूमिगत हस्तक, आणि आता रॅलीकरिता सोशल रेव्होल्यूशनरी पक्षाशी संपर्क राखणारा रॅलीचा प्रमुख हस्तक ग्रामातिकोव, पूर्वीचा ओछानाचा हस्तक वेनेस्लाव ओर्लोवस्की, ही सर्व मडंळी त्याच्या मित्रपरिवारातीलच होती. पेट्रोग्राडमधील ‘चेका’ त या ओर्लोवस्कीने आता नोकरी मिळवून घेतली होती. ज्या खोट्या पासपोर्टच्या आधारे सोविएत रशियात सिडने जॉर्जेविच

अनुक्रमणिका

रेलिन्स्की या नावाने रॅली संपूर्ण रशियात हिंडत होता, तो पासपोर्ट या ओर्लोवस्कीनेच तयार करून दिलेला होता.

रॅलीच्या या व इतरही हस्तकांनी, क्रेमलिनमध्ये व लाल लष्कराच्या अधिकारी वर्गात शिरकाव करून घेतला होता व त्यांच्याकडून सोविएत सरकारच्या प्रत्येक निर्णयाची, प्रत्येक हालचालीची इत्थंभूत बातमी रॅलीला कळत होती. 'लाल लष्कराचे सीलबंद हुकुम मास्को येथे उघडले जाण्यापूर्वी लंडन येथे वाचले जात होते' अशी उघड प्रौढी तो इंग्रज हस्तक मारीत होता.

रॅलीच्या कारवायांसाठी लागणारा लक्षावधी रुबल्सचा निधी बॅले नर्तिका दागमारा हिच्या निवासस्थानी दडवून ठेवलेला होता. त्यापैकी बराचसा पैसा ब्रिटिश दूतावासातून येत होता. तो पैसा प्रथम ब्रूस लॉकहार्टकडे येई, व नंतर ब्रिटिश गुप्तहेर खात्याच्या कॅप्टन हिक्सद्वारा रॅलीकडे पोचता करण्यात येई. रॅलीनेच ब्रूस लॉकहार्टला ह्या सर्व व्यवहारात गुंतविले होते. हा सर्व पैसा कसा गोळा होत होता याबद्दल आपल्या 'ब्रिटिश एजंट' या पुस्तकात लॉकहार्ट म्हणतो— 'अनेक रशियनांजवळ दडलेला काळा पैसा साठला होता. प्रॉमिसरी नोटांच्या मोबदल्यात तो पैसा द्यायाला ती मंडळी केवळ तयारच नव्हे तर उत्सुक असत. कोणाला संशय येऊ नये म्हणून तो पैसा मास्कोमधील एका इंग्लिश कंपनीद्वारा आम्ही गोळा करीत असू. ती कंपनीच त्या रशियनांशी व्यवहार करून विनिमयाचा दर निश्चित करी व प्रॉमिसरी नोट्स देई. तो पैसा लंडनमध्ये निश्चितपणे मिळेल अशी अधिकृत हमी त्या कंपनीला दिली जात असे.नंतर त्या रकमा अमेरिकन वकीलातीत आणल्या जात व कॅप्टन हिक्स द्वारा ठरलेल्या ठिकाणी पोचत्या केल्या जात.'

सोविएत सरकार उलथून पाडल्यानंतर रशियात प्रस्थापित करावयाच्या सरकारसंबंधी तपशीलवार योजनाही त्या ब्रिटिश गुप्तहेराने—सिडने रॅलीने आखली होती. त्या नव्या राजवटीत रॅलीचे स्वतःचे मित्र महत्त्वाची भूमिका बजावणार होते. 'हंगामी सरकारविषयीची सर्व व्यवस्था केली गेली होती. माझा मित्र व सहकारी ग्रामातिकोव हा गृहमंत्री बनणार होता व पोलीस व वित्त ही खाती त्याच्या नियंत्रणाखाली राहणार होती. रशियातील एक मोठा व्यापारी, माझा जुना मित्र व धंद्यातील सहकारी हा दळणवळण मंत्री बनणार होता. युदेनिच, चुबेरस्की व ग्रामातिकोव हे त्या हंगामी सरकारातील तिघे सदस्य बोल्शेविक सरकारच्या पतनानंतर उद्‌भवणारे सर्व अराजक निश्चितपणे मोडून काढतील अशी आम्हाला खात्री होती.'

या सोविएतविरोधी मोहिमेतील पहिला बार साविन्कोवच्या दहशतवाद्यांनी उडविला. २१ जून १९१८ रोजी पेट्रोग्राडच्या ओबुचोव कारखान्यात झालेली कामगारांची सभा आटोपून वृत्तपत्र प्रसिद्धी खात्याचा सोविएत मंत्री वोलोदरस्की परत निघाला असता एका सोशल रेव्होल्यूशनरी दहशतवाद्याने त्याची हत्या केली. यानंतर दोनच आठवड्याच्या आत, ६ जुलै रोजी, मास्को येथे जर्मन राजदूत मिरबाक मारला गेला. बोल्शेविक गोटात दहशत निर्माण करणे व त्याबरोबर रशियावर आक्रमण करण्यास जर्मनीला प्रवृत्त करणे हे त्यांचे मुख्य उद्देश होते. जर्मनीने रशियावर हल्ला केला तर बोल्शेविझमचा निश्चितपणे नायनाट होईल अशी त्यांना खात्री होती. [मिरबाकच्या मारेकरी ब्लुमकिन हा एक सोशल रेव्होल्यूशनरी दहशतवादी होता

अनुक्रमणिका

मिरबाकच्या जिवाला धोका आहे असे सांगण्याच्या निमित्ताने, चेकाचा अधिकारी असल्याची बतावणी करून त्याने जर्मन दूतावासात प्रवेश मिळवून घेतला. 'मारेकरी खून कसा काय करणार आहेत?' असे जर्मन राजदूताने ब्लुमाकिनला विचारताच 'असा!' असे ओरडून ब्लुमकिनने त्याच्यावर गोळ्या झाडल्या व लागलीच खिडकीतून उडी मारून बाहेर त्याच्याकरता उभ्या असलेल्या मोटारीत बसून तो पसार झाला. यानंतर काही काळाने हाच ब्लुमकीन लिआँ ट्रॉट्स्कीचा खाजगी अंगरक्षक बनला.]

जर्मन राजदूताची हत्या झाली त्या दिवशी ऑल रशियन काँग्रेस ऑफ सोविएत्सची पाचवी महासभा मास्कोच्या ऑपेरा हाऊसमध्ये चालू होती. सोनेरी नक्षीकाम केलेल्या खुर्च्यांवर बसून दोस्त राष्ट्रांचे निरीक्षण सोविएत प्रतिनिधींची भाषणे ऐकत होते. सभेतील कामकाजासंबंधी वातावरण तणावाचेच होते. ब्रूस लॉकहार्ट त्या सभागृहात इतर अनेक दोस्त मुत्सद्दी व हस्तक यांसह बसला होता. तेवढ्यात सिडने रॅलीने सभागृहात प्रवेश केला. त्याच्याकडे पाहताच काहीतरी विशेष घडले आहे हे लॉकहार्टने ओळखले. अस्वस्थ झालेल्या लॉकहार्टला त्याने दबलेल्या आवाजात मिरबाकच्या हत्येची बातमी दिली.

मिरबाकची हत्या म्हणजे, काही फुटीर बोल्शेविक व सोशल रेव्होल्यूशनरी यांनी संपूर्ण राष्ट्रात घडवून आणावयाच्या उठावाची नांदी ठरावी, हत्या झाल्याबरोबर सोशल रेव्होल्यूशनरी मारेकऱ्यांनी ऑपेरा हाऊसवर छापा घालून सगळ्या सोविएत प्रतिनिधींची धरपकड करावी अशी योजना होती. पण ती फलद्रूप झाली नाही. तसे काही होणे तर दूरच, उलट मिरबाकचा खून होताच संपूर्ण ऑपेरा हाऊसला संरक्षणाच्या हेतूने लाल सैनिकांनी वेढा घातला. रस्त्यारस्त्यावर गोळीबार झाले; परंतु एकंदर परिस्थितीवर सोविएत सरकारचे पूर्ण नियंत्रण होते हे लवकरच स्पष्ट झाले.

एकीकडे लॉकहार्टशी बोलत असता, एकंदर प्रकाराबद्दल त्याच्याविरुद्ध पुरावा देणारी काही कागदपत्रे तर आपल्याजवळ नाहीत ना याचा शोध घेत रॅली स्वतःचे खिसे तपासित होता. तसा एक कागद त्याला सापडला. लागलीच त्याचे तुकडे तुकडे करून त्याने तो गिळून टाकला. लॉकहार्टच्या शेजारी बसलेल्या फ्रेंच गुप्तहेरानेही लागलीच तशीच खबरदारी घेतली.

यानंतर थोड्याच वेळाने, 'सोविएत सरकार उलथून पाडण्याच्या हेतूने करण्यात आलेला सशस्त्र उठाव लाल सैन्य व चेका यांनी निर्णायकपणे दडपून टाकला आहे' असे ऑपेरा हाऊसच्या व्यासपीठावरून एका वक्त्याने घोषित केले. अर्थात् त्या उठावाला सामान्य जनतेचा मुळीच पाठिंबा नव्हता. बॉंब्स्, रायफली, व मशीनगन्स बाळगणाऱ्या अनेक सोशल रेव्होल्युशनरी दहशतवाद्यांना अटक करण्यात आली. त्यापैकी काही मारले गेले. त्यांचे काही नेते गोळीबारात ठार झाले. काही भूमिगत झाले, तर इतर फरार झाले.

ऑपेरा हाऊसमध्ये उपस्थित असलेल्या दोस्त प्रतिनिधींना, 'रस्ते सुरक्षित असून त्यांनी आपापल्या दूतावासात परतावे' असे सांगण्यात आले. मास्को उठावाच्या वेळीच यारोस्लाव येथेही उठाव व्हावा अशी योजना होती. परंतु तो उठावही लाल लष्कराने हाणून पाडला. यारोस्लाव येथील उठावाचा नेता होता सोशल रेव्होल्यूशनरी पक्षातील एक आघाडीचा सदस्य बोरिस साविन्कोव. तो मात्र सोविएत सैनिकांच्या हातावर तुरी देऊन निसटला.

अनुक्रमणिका

उठावाचा बोजवारा उडाल्याने रॅलीच्या अंगाचा तिळपापड झाला. सोशल रेव्होल्यूशनरींच्या नेहमीच्या मूर्खपणामुळे सगळा घात झाला होता असेच त्याला वाटले. सर्व सोविएत नेते एखाद्या सभेत एकत्र जमले असता, उठाव करून एका झपाट्यात त्यांना पकडून सरकार उलथून पाडण्याच्या कल्पनेत अव्यवहार्य किंवा कठीण असे काहीच नव्हते अशी त्याची खात्री होती. आता पुन्हा ती योजना साकार करण्याच्या उद्योगाला तो तत्परतेने लागला.

## लेटिश कारस्थान

रशियात हस्तक्षेप करण्याच्या दोस्तांच्या गुप्त योजना ऑगस्ट १९१८ च्या धामधुमीच्या काळात उघड होऊ लागल्या. जर्मनांच्या हातात युद्धसामुग्री पडू देऊ नये हा त्यांचा हेतू असल्याचे जाहीर करून ब्रिटिश सैन्य आर्केंजल येथे उतरले व ४ ऑगस्ट रोजी ब्रिटिशांनी कॉकेशसमधील बाकूचे तेल केंद्र ताब्यात घेतले. यानंतर थोडेच दिवसात ब्रिटिश व फ्रेंच फौजा व्लादिवस्तोक येथे उतरल्या. त्या पाठोपाठ १२ ऑगस्ट रोजी जपानी तुकड्या, तर १५ व १६ ऑगस्ट रोजी फिलिपाईन्सहून नुकत्याच आलेल्या अमेरिकन तुकड्या व्लादिवस्तोक येथे येऊन पोहचल्या.

सैबेरियाचा बराचसा प्रदेश यावेळी अगोदरच सोविएतविरोधी फौजांच्या हाती होता. जर्मनीच्या पाठिंब्याच्या बळावर झारकालीन सेनापती क्रास्नोव सशस्त्र सोविएतविरोधी मोहीम जोमाने चालवीत होता; तर जर्मनीच्या हातातील बाहुले बनलेला हेटमन स्कोरोपदस्की याने युक्रेनमध्ये ज्यू व साम्यवादी यांची सरसकट कत्तल आरंभली होती. चारही दिशांनी नवजात सोविएत रशियाचे शत्रू मास्कोवर झेपावण्यास सिद्ध झाले होते.

रशियात लष्करी हस्तक्षेप करण्याच्या दोस्तांच्या योजना साकार होणार याची शक्यता दिसताच मास्कोत असलेले दोस्तांचे उरले सुरले प्रतिनिधी मास्को सोडून जाण्याच्या तयारीला लागले. ते निघून जात असल्याची बातमी त्यांनी सोविएत सरकारला कळवली नाही. आपल्या 'ब्रिटिश एजंट' या पुस्तकात ब्रूस लॉकहार्ट लिहितो, 'एकंदर परिस्थिती मोठी चमत्कारिक होती. प्रत्यक्ष युद्धघोषणा झालेली नसली तरी द्विना ते कॉकेशसपर्यंतच्या संपूर्ण आघाडीवर युद्धाचा वणवा भडकला होता. रॅलीशी मी अनेकदा विचारविनिमय केला.पण आम्ही निघाल्यानंतरही मास्कोतच राहण्याचे त्याने ठरविले होते.'

अमेरिकन सैन्य व्लादिवस्तोक येथे उतरले त्याच दिवशी, १५ ऑगस्ट रोजी, एक खास महत्त्वाची व्यक्ती लॉकहार्टच्या भेटीला आली. या प्रसंगाचे वर्णन लॉकहार्टने त्याच्या स्मृतिग्रंथात केले आहे. ब्रिटिश दूतावासाच्या नजीक असलेल्या त्याच्या निवासस्थानी तो दुपारचे भोजन घेत असता त्याच्या दारावरील घंटी खणखणली, आणि दोन लेटिश सद्गृहस्थ त्याला भेटू इच्छितात असे त्याच्या नोकराने त्याला सांगितले. एक होता काहीसा ठेंगणा फुगीर चेहऱ्याचा तरुण—स्मिडेन, तर दुसरा होता उंच दणकट शरीरयष्टीचा, रेखीव चेहऱ्याचा, व कठोर भेदक डोळ्यांचा—कर्नल बेर्झिन. 'क्रेमलिनच्या लेटिश रक्षकांचा

तो प्रमुख होता अशी त्याने स्वतःची ओळख करून दिली. सोविएतविरोधी कारस्थानांत आघाडीवर असलेला ब्रिटिश नौदल अटॅची कॅप्टन क्रोमी याने लॉकहार्टला लिहिलेले एक पत्र घेऊन ते दोघे आले होते. प्रक्षोभ व अराजक निर्माण करणाऱ्या मंडळींपासून मी नेहमीच सावध राहात असे. त्यामुळे ते पत्र मी काळजीपूर्वक तपासून पाहिले. ते नक्कीच क्रोमीने लिहिलेले होते.' लॉकहार्टची तशी खात्री पटताच त्या दोघांच्या भेटीचे प्रयोजन, त्याने विचारले.

क्रेमिलिन रक्षकांचा प्रमुख म्हणून स्वतःची ओळख करून देणाऱ्या कर्नल बेर्झिनने लॉकहार्टला उत्तर दिले. बोल्शेविक क्रांतीला लेट लोकांनी पाठिंबा दिला असला तरी आर्केंजल येथे उतरलेल्या जनरल पूलच्या नेतृत्वाखालील ब्रिटिश लष्कराविरुद्ध लढण्याची मात्र त्यांची तयारी नाही; ब्रिटिश हस्तकाशी ते त्याबाबत वाटाघाटी करू इच्छितात असे तो म्हणाला.

बेर्झिनशी त्यासंबंधी काही बोलण्यापूर्वी लॉकहार्टने त्याबाबत फ्रेंच कौन्सुल जनरल एम्. ग्रेनार्ड याच्याशी विचारविनियम केला. स्वतःला प्रत्यक्षपणे कोणत्याही प्रकारे गुंतवून न घेता त्या प्रकरणाबाबत लॉकहार्टने बेर्झिनशी वाटाघाटी कराव्या असा सल्ला ग्रेनार्डने लॉकहार्टला दिला. दुसरे दिवशी बेर्झिन लॉकहार्टला भेटला त्यावेळी, महत्त्वाच्या कामाकरिता जनरल पूलशी बोलणे करण्यासाठी आलेल्या कर्नल बेर्झिनला ब्रिटिश गोटात प्रवेश द्यावा असे शिफारसपत्र त्याने बेर्झिनला दिले. एवढेच नव्हे तर सिडने रॅलीशी त्याची गाठ घालून दिली.

या प्रकरणाबाबत लॉकहार्ट आपल्या 'ब्रिटिश एजंट' या ग्रंथात पुढे लिहितो, 'दोन दिवसांनी, त्यांच्या वाटाघाटी समाधानकारक रीत्या चालल्या असल्याचे रॅलीने मला कळविले. बोल्शेविकांना उलथून पाडण्याच्या कटात प्रत्यक्षपणे सहभागी होण्याची त्या लेटिश रक्षकांची तयारी नसली तरी लॉकहार्ट वगैरे मंडळी मास्को सोडून निघून गेल्यानंतर त्यांच्या मदतीने मास्कोत प्रतिक्रांती घडवून आणता येईल असा विश्वास रॅलीने व्यक्त केला.'

❖ ❖ ❖

१९१८ च्या ऑगस्ट अखेरी, अमेरिकन कौन्सुल जनरलच्या मास्को येथील कार्यालयात काही दोस्त प्रतिनिधींची एक गुप्त बैठक झाली. इतर परराष्ट्रांच्या केंद्रांवर सोविएतांची कडक नजर असल्यामुळे त्यांनी बैठकीकरिता अमेरिकन वकीलातीची जागा निवडली होती. अमेरिकन सैन्य सैबेरियात उतरले असूनही अमेरिकेप्रती मैत्रीचे धोरण सोविएत सरकारने कायम राखले होते. वुड्रो विल्सनची चौदा कलमे स्पष्ट करणारे फलक मास्कोच्या रस्त्यारस्त्यांवर लागलेले दिसत होते. 'केवळ अमेरिकनच बोल्शेविकांशी सभ्यतेने वागतात' असे इझवेस्तियाने आपल्या संपादकियात म्हटले होते. रेमंड रॉबिन्सची शिष्टाई अगदीच वाया गेली नव्हती.

अनुक्रमणिका

अमेरिकन वकीलातील झालेल्या दोस्त प्रतिनिधींच्या त्या बैठकीचे अध्यक्षपद फ्रेंच कौन्सुल ग्रेनार्डकडे होते. रॅलीच्या मदतीकरिता पाठविण्यात आलेला ब्रिटिश गुप्तचर सेवेतील अधिकारी कॅप्टन जॉर्ज हिल व खुद्द रॅली हे ब्रिटिश प्रतिनिधी म्हणून बैठकीला हजर होते. शिवाय राजनैतिक क्षेत्रातील व गुप्तचर सेवेतील इतरही अनेक दोस्त हस्तक तेथे उपस्थित होते. पॅरिस येथील 'फिगारो' या वृत्तपत्राचा मास्को येथील वार्ताहर रेने मार्चा हाही तेथे होता.

त्याच्या सोविएतविरोधी कारस्थानाच्या प्रगतीसंबंधी माहिती दोस्त प्रतिनिधींना करून देण्याकरिता रॅलीनेच ती बैठक बोलाविली होती असे त्याने आपल्या स्मृतिचित्रात नमूद केले आहे. कर्नल बेर्झिन याला २० लक्ष रुबल्स देऊन त्याने 'विकत घेतलेले' आहे असे त्याने त्या दोस्त प्रतिनिधींना सांगितले. त्यापैकी ५ लक्ष रुबल्स रॅलीने कर्नल बेर्झिनला रशियन चलनात दिले होते. उरलेली रक्कम कर्नल बेर्झिनने त्याच्याकडे सोपविण्यात आलेली कामगिरी पार पाडल्यानंतर, जेव्हा तो आर्केंजल येथील ब्रिटिश गोटात पोहोचेल त्यावेळी त्याला इंग्लिश पौंडात द्यावयाची होती. 'आपली संघटना आता चांगली मजबूत झाली आहे' रॅली आत्मविश्वासाने बोलत होता; 'सर्व लेट लोक आपल्या बाजूला आहेत. पहिला प्रहार झाला की लागलीच सगळे सामान्य लोकही आपल्या बाजूला वळतील. बोल्शेविक पक्षाच्या केंद्रिय समितीची बैठक मास्को येथील 'ग्रँड थिएटर' मध्ये २८ ऑगस्टला भरावयाची असल्याने सोविएत राजवटीचे सर्व नेते त्या बैठकीकरिता एकत्र येतील.' रॅली त्याच्या धाडसी परंतु अगदी सहजपणे साध्य होऊ शकेल अशा योजनेबद्दल बैठकीतील दोस्त प्रतिनिधींना माहिती देत होता. 'बोल्शेविकांची सभा चालू असता थिएटरच्या सर्व द्वारांवर पहारा म्हणून नेहमीप्रमाणे लेटिश रक्षकांची नेमणूक होईल. त्या कामाकरिता जे आपल्या योजनेला सर्वस्वी अनुकूल असतील व ज्यांची निष्ठा वादातीत असेल अशाच लेटिश सक्षकांची निवड बेर्झिन करील. बेर्झिनने त्यांना ठरलेला इशारा केला की लागलीच पहाऱ्यावरील ते लेटिश रक्षक सर्व दरवाजे बंद करून घेतील व सभेतील बोल्शेविकांवर आपल्या रायफली रोखतील. लागलीच त्याच्या कटातील सहकाऱ्यांसह रॅली व्यासपीठावर जाईल व बोल्शेविक पक्षाच्या केंद्रीय समितीच्या सर्व सदस्यांना अटक करील. लेनीन व अन्य सोविएत नेत्यांना गोळ्या घालण्यात येतील. परंतु त्यापूर्वी, रशियाचे जुलमी बोल्शेविक शासक आता कैदी बनलेले आहेत हे लोकांना कळावे याकरिता मास्कोच्या रस्त्यांवरून त्यांची धिंड काढण्यात येईल. लेनिन व त्याचे सहकारी नाहीसे झाले की संपूर्ण सोविएत राजवट एखाद्या पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळेल. मास्कोत यावेळी ६० हजार अधिकारी बोल्शेविकविरोधी उठावाकरिता अगदी सुसज्ज आहेत. इशारा मिळताच, बाहेरून दोस्त लष्कराचा हल्ला होईल त्याच वेळी ते शहरात उठाव करतील. या गुप्त सोविएतविरोधी लष्कराचे नेतृत्व झारकालीन लष्करी अधिकारी जनरल युदेनिच करणार आहे. जनरल साविन्कोवच्या आधिपत्याखाली उत्तर रशियात आणखी एक लष्कर त्यावेळी तयार असेल. उत्तरेकडील सोविन्कोवचे लष्कर व दक्षिणेत युदेनिचचे लष्कर या दोहोत उरल्या सुरल्या बोल्शेविकांचा पूर्ण चुराडा होईल.'

अशी ही रॅलीची योजना होती. ब्रिटिश व फ्रेंच गुप्तचर विभागांचा रॅलीच्या त्या योजनेला पूर्ण पाठिंबा होता. ब्रिटिश हस्तक जनरल युदेनिचशी सतत निकटचा संपर्क राखून होते, व त्याला भरपूर शस्त्रास्त्रे व युद्धसाहित्य पुरवीत होते, तर फ्रेंच साविन्कोवला पाठिंबा देत होते.

अनुक्रमणिका

सोविएत सरकारला देशाच्या अन्य भागांकडून कोणतीही मदत मिळू नये व त्या सरकारचा बाहेरच्या जगाशी संपर्क तोडला जावा या दृष्टीने मास्को व पेट्रोग्राडच्या आजूबाजूचे सगळे पूल कसे उडवून द्यायचे, तसेच सोविएतविरोधी प्रचार, हेरगिरी, घातपात अशा सर्व मार्गांनी त्या सोविएतविरोधी कटात त्यांनी कशाप्रकारे मदत करावयाची हे रॅलीने अमेरिकन वकीलातीत जमलेल्या त्या दोस्तप्रतिनिधींना समजावून सांगितले.

उठावाचा दिवस हळूहळू जवळ येत होता. कर्नल बेर्झिनला नियमीतपणे भेटून कारस्थानाचा प्रत्येक तपशील रॅली मोठ्या काळजीपूर्वक निश्चित करीत होता. नानाप्रकारच्या शक्यता लक्षात घेऊन तो त्या दृष्टीने सज्जता ठेवीत होता. त्याची अगदी पूर्ण तयारी झाली होती. तेवढ्यात बोल्शेविक पक्षाच्या केंद्रीय समितीची बैठक २८ ऑगस्ट ऐवजी ६ सप्टेंबरला होणार असल्याची बातमी त्याला कळली. 'त्यात काही बिघडले नाही,' रॅली बेर्झिनला म्हणाला, 'उलट मला तयारीला त्यामुळे जास्त वेळ मिळेल.' मध्यंतरी पेट्रोग्राडला जाऊन तेथील सज्जतेची एकदा स्वतः पाहाणी करून येण्याचे रॅलीने ठरविले.

यानंतर थोडेच दिवसात, चेकाचा अधिकारी सिडने जॉर्जेविच रेलिन्स्की या नावाचा बनावट पासपोर्ट घेऊन रॅली पेट्रोग्राडला जाण्यासाठी मास्कोहून निघाला.

## रॅलीचे रशियातून निर्गमन

पेट्रोग्राडला येताच ब्रिटिश नौदल अटॅची कॅप्टन क्रोमी याला भेटण्याकरिता रॅली सरळ ब्रिटिश दूतावासात गेला. मास्कोतील एकंदर परिस्थितीची त्याने क्रोमीला माहिती करून दिली व एकंदर उठावाची योजनाही स्पष्ट करून सांगितली. 'मास्को आता अगदी आपल्या मुठीत आलेच आहे असे समजा!' तो क्रोमीशी मोठ्या आत्मविश्वासाने बोलत होता. क्रोमीला अत्यानंद झाला. या सर्व प्रकरणाचा तपशीलावर अहवाल लंडनला पाठविण्याकरिता तयार करून देण्याचे रॅलीने कबूल केले.

दुसरेच दिवशी त्याच्या पेट्रोग्राड येथील कटकारस्थान-यंत्रणेशी रॅलीने संपर्क साधला. पूर्वीचा ओछानाचा हस्तक ग्रामातिकोव याला त्याने टेलिफोन केला. ग्रामतिकोवचा आवाज फोनवर काहीसा घोगरा व घाबरलेला वाटत होता. 'कोण आहे?' दबलेल्या आवाजात ग्रामातिकोवने विचारले. 'मी रेलिन्स्की.' रॅली उत्तरला. 'इथे माझ्याकडे कोणीतरी आले आहे व त्याने फार वाईट बातमी आणली आहे', ग्रामातिकोव एकदम घाईघाईने रॅलीला सांगू लागला. 'डॉक्टरांनी ठरल्या वेळेच्या पुष्कळच अगोदर शस्त्रक्रिया केली. रुग्णाची स्थिती गंभीर आहे. मला भेटायचे असेल तर ताबडतोब इकडे या!'

रॅली तात्काळ ग्रामातिकोवच्या घरी गेला. अत्यंत अस्वस्थ व बेचैन झालेला ग्रामातिकोव बरीचशी महत्त्वाची कागदपत्रे अग्नये स्वाहः करीत असलेला त्याला दिसला.

अनुक्रमणिका

‘त्या मूर्खांनी ठरलेल्या वेळेच्या अगोदरच उठाव केला,’ रॅलीला पाहताच ग्रामातिकोव उद्‌गारला. ‘उरित्स्की ठार झाला आहे. आजच सकाळी ११ वाजता, त्याच्याच कार्यालयात त्याची हत्या झाली.’

हे बोलत असता कागदपत्रे जाळण्याचा ग्रामातिकोवचा उद्योग चालूच होता. ‘आपण आता इथे राहाणे भलतेच धोक्याचे आहे. माझ्याबद्दल त्यांना चांगलीच साशंकता वाटत आहे. काही उघडकीस आले तर प्रथम तुमचे व माझेच नाव समोर येईल.’

ब्रिटिश दूतावासात कॅप्टन क्रोमीशी रॅलीने संपर्क साधला, तेव्हा उरित्स्कीच्या हत्येची बातमी त्याला अगोदरच कळलेली होती हे रॅलीच्या लक्षात आले. एका रेव्होल्यूशनरी दहशतवाद्याने पेट्रोग्राड चेकाचा प्रमुख उरित्स्की याला गोळ्या घातल्या होत्या. ‘आपल्या नेहमीच्या जागी भेटू या,’ फोन बंद करीत रॅली त्याला म्हणाला. त्यांची नेहमीची जागा म्हणजे ‘बल्कोव कॅफे’ ही होती.

मध्यंतरीचा वेळ नको ती धोकादायक कागद पत्रे नष्ट करण्यात, सांकेतिक भाषेतील मजकुराचे कागद लपवून ठेवण्यात व अन्य सर्व पुरावा नाहीसा करण्यात रॅलीने घालविला. नंतर तो क्रोमीला भेटण्यास बल्कोव कॅफेत गेला.

परंतु ठरल्याप्रमाणे क्रोमी बल्कोव कॅफेत आला नाही. ब्रिटिश दूतावासात जाणे कदाचित धोक्याचे ठरेल हे कळत असूनही क्रोमीला भेटण्यास रॅलीने तेथे जाण्याचे ठरविले. जाताजाता तो बल्कोवला इशारा देत कुजबुजला, ‘काहीतरी बिघडले असावे. वेळ आलीच, तर पेट्रोग्राड सोडून सीमा ओलांडून फिनलंडमध्ये जाण्याची तुझी तयारी असू दे.’

रॅली ब्रिटिश दूतावासाच्या दिशेने निघाला तेव्हा व्लादिमिरोवस्की चौकात बरेच स्त्रीपुरुष घाबरून धावत असल्याचे रॅलीने पाहिले. आजूबाजूच्या घरात व गल्लीबोळात ते लपत होते. इंजिनांचा घरघराट ऐकू येत होता. लाल सैनिक भरलेल्या मोटारी एका पाठोपाठ एक सुसाट वेगाने धावत होत्या.

रॅलीने भराभर पावले उचलली. ब्रिटिश दूतावासाच्या कोपऱ्यानजीक आला तेव्हा तो अक्षरशः धावत होता. दूतावाससमोर तो एकदमच थबकला. तेथे अनेक सोविएत पोलीस अधिकारी मरून पडलेले होते. दूतावाससमोर चार गाड्या उभ्या होत्या, आणि समोरील रस्त्यावर दुहेरी वेढा घालून लाल सैनिक उभे होते. दूतावासाचे प्रवेशद्वार मोडून पडले होते.

‘काय कॉम्रेड रेलिन्स्की, इथल्या होळीची आतषबाजी पाहायला आलात काय?’ पाठीमागून कोणीतरी त्याला विचारले. त्याबरोबर दचकून रॅली एकदम मागे वळला. चेकाचा कॉम्रेड रेलिन्स्की म्हणून त्याला पूर्वी ओळखणारा व अनेकदा भेटलेला एक लाल सैनिक त्याच्याकडे पाहून हसत विचारीत होता. ‘कसली एवढी गडबड चालली आहे?’ रेलिन्स्कीने त्या सैनिकाला विचारले. त्यावर रॅलीला त्या सैनिकाने सांगितले– ‘सिडने रॅली नावाच्या एका माणसाच्या शोधात चेका आहे.’

अनुक्रमणिका

तेथे नक्की काय घडले होते ते रॅलीला नंतर कळले. उरित्स्कीच्या हत्येनंतर पेट्रोग्राडमधील सोविएत अधिकाऱ्यांनी ब्रिटिश दूतावास बंद करण्याकरिता चेकाच्या काही हस्तकांना पाठविले. चेकाचे लोक आले त्यावेळी माडीवर कॅप्टन क्रोमीच्या आदेशानुसार दूतावासातील काही कर्मचारी उठावातील ब्रिटिश भूमिकेबाबत पुरावा देणारी कागदपत्रे जाळीत होते. दाराशी चेकाचे लोक आले आहेत हे कळताच कॅप्टन क्रोमी वेगाने खाली गेला व चेकाच्या लोकांनी आत येऊ नये या हेतूने, ते तेथे उभे असताच त्याने धाडकन दार लावून घेतले. सोविएत गुप्त पोलिसांनी ते दार फोडले, तेव्हा बेभान झालेल्या क्रोमीने जिन्यातच, दोन्ही हातातील दोन पिस्तुलांनी एक सोविएत प्रतिनिधी व इतर अनेक अधिकाऱ्यांना ठार केले. चेका हस्तकांनी साहजिकच उलट गोळीबार केला. त्यात कॅप्टन क्रोमी मारला गेला.

रॅलीने ती रात्र सर्ज दोर्नोस्की या सोशल रेव्होल्युशनरी दहशतवाद्याच्या घरात काढली. सकाळ होताच, बाहेर कुठे काय चालले आहे ते पाहण्यास त्याने दोर्नोस्कीला पाठविले. परत येताना दोर्नोस्की साम्यवाद्यांचे मुखपत्र 'प्रावदा' या वृत्तपत्राची एक प्रत घेऊन आला. 'पेट्रोग्राडच्या रस्त्यांवर रक्ताच्या नद्या वाहणार असे दिसते,' तो धापा टाकीत रॅलीला सांगू लागला. 'मास्कोत कोणीतरी लेनिनवर गोळी झाडली आहे. दुर्दैव असे की मारेकऱ्याचा नेम चुकला!' त्याने वृत्तपत्र रॅलीच्या हातावर ठेवले. लेनिनवर झालेल्या प्राणघातक हल्ल्याची बातमी ठळक मथळ्यात त्यात दिली होती.

आदल्या दिवशी सायंकाळी मिचेल्सन कारखान्यातील एका सभेत लेनिनचे भाषण झाले होते. ती सभा संपवून कारखान्यातून लेनिन बाहेर पडत होता तोच फानया काप्लान नावाच्या सोशल रेव्होल्यूशनरी दहशतवादी बाईने अगदी समोर येऊन लेनिनवर दोन गोळ्या झाडल्या. गोळ्या विषारी होत्या. एक लेनिनच्या छातीत हृदयाच्या किंचित् वर फुप्फुसात घुसली, तर दुसरी मानेला मुख्य रक्तवाहिनीच्या किंचित् वर लागली. लेनिनच्या आयुष्याची दोरी अजून तुटली नव्हती. पण त्याची प्रकृती अत्यंत गंभीर होती.

ज्या पिस्तुलाने फानया काप्लानने लेनिनवर गोळा झाडल्या, ते पिस्तुल तिला रॅलीचा कारस्थानी साथीदार बोरिस साविन्कोव याने दिले होते. खुद्द साविन्कोवने ही गोष्ट आपल्या स्मृतिचित्रात नमूद केली आहे.

संकटप्रसंगी उपयोगी पडावे म्हणून एक पिस्तुल अंगावरील कपड्यात लपवून रॅली ताबडतोब मास्कोला जाण्यास निघाला. दुसरे दिवशी वाटेत क्लिन या जंक्शनवर त्याने एक वृत्तपत्र विकत घेतले. त्यातील बातमी वाचून त्याला धक्काच बसला. लेनिन व इतर सोविएत नेते यांची हत्या करून मास्को व पेट्रोग्राड काबीज करण्याच्या, व साविन्कोव व युदेनिच यांच्या अधिपत्याखाली रशियात लष्करी हुकुमशाही प्रस्थापित करण्याच्या रॅलीच्या कारस्थानाची तपशीलवार हकीकत त्यात प्रसिद्ध झाली होती.

अनुक्रमणिका

वृत्तपत्रावरील ती बातमी वाचता वाचता रॅली अधिकाधिक अस्वस्थ होत गेला. अमेरिकन वकीलातीतील दोस्त प्रतिनिधींच्या बैठकीला उपस्थित असलेल्या रेने मोर्चा या फ्रेंच पत्रकाराने त्या संपूर्ण कारस्थानाचा गौप्यस्फोट बोल्शेविकांजवळ केला होता.

पण तेवढ्याने प्रकरण आटोपले नाही. रॅलीला अजून एक अखेरचा धक्का बसायचा होता. सर्व सोविएत नेत्यांच्या हत्येच्या कटात लेटिश रक्षकांना ओढण्याकरिता ब्रिटिश हस्तक कॅप्टन सिडने रॅली याने कर्नल बेर्झिनला वीस लक्ष रुबल्सची लाच देण्याचा प्रयत्न केला अशी कबुली खुद्द लेटिश रक्षकांचा प्रमुख कर्नल बेर्झिन याने दिली होती. एवढेच नव्हे तर आर्केंजल येथील ब्रिटिश लष्कराच्या छावणीत जनरल पूलला भेटण्यास जाण्याकरता ब्रूस लॉकहार्टने बेर्झिन याला दिलेले शिफारसपत्रही त्या सोविएत वृत्तपत्राने प्रकाशित केले होते.

मास्को येथे चेकाने ब्रूस लॉकहार्टला अटक केली होती; व दोस्त राष्ट्रांच्या इतर अनेक हस्तकांची धरपकड सुरू होती. संपूर्ण मास्कोत रॅलीचे वर्णन देणारी भित्तिपत्रके लागली होती. मासिनो, कॉन्स्टंटाईन, रेलिन्स्की अशा ज्या निरनिराळ्या नावांनी कटकारस्थाने करीत तो वावरला होता ती नावेही त्यांत दिली होती. सगळीकडे सिडने रॅलीकरिता शोधाशोध चालली होती.

एकंदर परिस्थितीतील धोका कळत असूनही रॅली मास्कोला गेला. लेनिनची मारेकरी फानया काप्लान हिची सहकारी वेरा पेट्रोवना हिच्या घरी बॅले नर्तिका दागमारा त्याला भेटली. तिने रॅलीला सांगितले, की बऱ्याच दिवसांपूर्वी चेकाने तिच्या घरावर छापा घातला होता. रॅलीच्या कारस्थानाकरिता गोळा केलेल्या पैशापैकी २० लक्ष रुबल्स तिने कसेबसे लपवून ठेवले होते. चेकाने तिला अजून अटक केली नव्हती. का ते तिला कळत नव्हते. कदाचित तिच्यामुळे सिडने रॅलीचा सुगावा लागेल असे वाटल्याने तिला त्यांनी मोकळे ठेवले असावे.

पण दागमाराकडून २० लक्ष रुबल्स मिळताच चेकाच्या हातावर तुरी देणे रॅलीला शक्य झाले. कधी ग्रीक व्यापारी, तर कधी झारकालीन अधिकारी, कधी सोविएत अधिकारी तर कधी एक सामान्य साम्यवादी बनून तो चेकाला चुकवीत राहीला.

एक दिवस, बोल्शेविकांच्या जाळ्यात तोपर्यंत न अडकलेल्या ब्रिटिश गुप्तचर सेवेच्या कॅप्टन जॉर्ज हिलची त्याची गाठ पडली. त्या दोघांनी अटक झालेल्या लोकांची नावे व पत्ते पाहिले. तेव्हा त्यांची कारस्थानी यंत्रणा बऱ्याच प्रमाणात शाबूत आहे व त्यांची बरीच साथीदार मंडळी अजून मोकळी आहेत हे त्यांच्या लक्षात आले. रॅलीचा आशेचा धागा पूर्ण तुटलेला नव्हता. पण कॅप्टन हिलला मात्र त्यांचा सगळा डाव उधळला गेला आहे असे वाटत होते. सोविएत सरकार व ब्रिटिश सरकार यांच्यात कैद्यांच्या देवघेवीबाबत बोलणी चालू असल्याचे त्याच्या ऐकीवात होते. लॉकहार्ट व अन्य ब्रिटिश हस्तक यांची सुटका करण्याची तयारी सोविएत सरकारने दर्शविली होती, कारण त्या मोबदल्यात, ब्रिटिश अधिकाऱ्यांनी इंग्लंडमध्ये तोपर्यंत अडकवून ठेवलेल्या, मॅक्झिम लिंटविनोवसह सर्व सोविएत प्रतिनिधींना सोडण्याचे

अनुक्रमणिका

अभिवचन ब्रिटिश सरकारने दिले होते. यामुळे सोविएत अधिकाऱ्यांच्या स्वाधीन होण्याचे कॅप्टन हिलने ठरविले होते. रॅलिनेही तसेच करावे असे त्याचे मत होते.

पण अशा प्रकारे पराभव पत्करायला रॅली तयार नव्हता. 'या लालतोंड्यांच्या परवानगी शिवायच मी परत जाऊ शकतो.' रॅली चिडून बोलत होता. दोन महिन्यात लंडनच्या सेव्हॉय हॉटेलमध्ये तो कॅप्टन हिलला भेटेल अशी पैजही त्याने हिलशी मारली. [कॅप्टन जॉर्ज हिल इंग्लंडला परत गेल्यानंतर, १९१९ मध्ये ब्रिटिश गुप्तचर सेवेने, रशियात उतरलेले ब्रिटिश सैन्य आणि जनरल अन्तोन डेनिकिन याचे श्वेत लष्कर या दोहोतील संपर्क अधिकारी म्हणून हिलची नियुक्ती केली. काही काळानंतर तेल सम्राट सर हेन्री डेटरडिंग याचा खास प्रतिनिधी म्हणून हिल काम करू लागला. युरोपीय तेल कंपन्यांचा अग्रणी असलेला डेटरडिंग सोविएत सरकार नष्ट करण्याच्या जिद्दीने इतका झपाटला होता की त्या उद्दिष्टपूर्तीच्या हेतूने हिटलरला सत्तारूढ होण्याकरिता त्याने पैशाची फार मोठ्या प्रमाणावर मदत केली. यानंतर ब्रिटिश सरकारने कॅप्टन हिल याला पूर्व युरोपात महत्त्वाच्या 'राजनैतिक' कामगिरीवर पाठविले. सोविएत रशियातील एक ब्रिटिश गुप्तचर म्हणून त्याने बजावलेल्या कामगिरीच्या आठवणी हिलने नंतर १९३४ मध्ये 'गो स्पाय द लँड, बिईंग द ॲडव्हेंचर्स ऑफ आय्. के. एस्. ऑफ द ब्रिटिश सिक्रेट सर्विस' या पुस्तकाच्या रूपाने प्रकाशित केल्या.

१९४५ च्या वसंतात ब्रिगेडियरच्या पदापर्यंत चढलेल्या हिलची, पोलंड मधील ब्रिटनचा खास दूत म्हणून चर्चिल सरकारने पोलंडला रवानगी केली. तो तेथे ब्रिटिश निरीक्षक म्हणून काम करणार होता; व तेथील अस्थिरता व अराजक यांनी गढूळ झालेल्या राजकीय परिस्थितीवरील अहवाल लंडन सरकारला पाठविणार होता. पोलंडच्या हंगामी सरकारने मात्र ब्रिगेडियर हिलला पोलंडमध्ये पाय ठेवण्याचीही परवानगी दिली नाही.]

त्यानंतर आणखी काही आठवडे रॅली रशियात होता. त्या काळातही हेरगिरी करून महत्त्वाची माहिती गोळा करणे, व सोविएतविरोधी गटांना सल्ला, मदत व प्रोत्साहन देणे हे त्याचे उद्योग चालूच होते. अनेकदा अगदी पकडला जाता जाता तो वाचला. शेवटी एका बनावट जर्मन पासपोर्टच्या बळावर तो नॉर्वेतील बर्जेन या गावी पोहोचला व तेथून इंग्लंडला गेला.

लंडनला पोचल्यानंतर ब्रिटिश गुप्तचर खात्यातील आपल्या वरिष्ठांना रॅलीने त्याने केलेल्या कामगिरीचा अहवाल सादर केला. अगदी हातात आलेली संधी गमावल्याने त्याला कल्पनातीत दुःख होत होते. 'रेने मार्चांने द्रोह केला नसता– बेर्झिनने अवसानघात करून शरणागती पत्करली नसती–आणि ब्रिटिश फौजा तातडीने वोलोग्दाच्या दिशेने चाल करून आल्या असत्या–किंवा, साविन्कोवशी माझी हातमिळवणी झाली असती, तर...' अशा विचारांनी त्याचे मन कमालीचे उद्विग्न झाले होते.

एका गोष्टीची मात्र रॅलीला पक्की खात्री होती. इंग्लंडने जर्मनीविरुद्ध युद्ध चालू ठेवावे ही एक फार मोठी चूक आहे असे त्याला वाटत होते. पश्चिम आघाडीवर तात्काळ युद्धबंदी व्हायला पाहिजे व बोल्शेविझमविरुद्ध सर्व पाश्चिमात्य राष्ट्रांनी युती करायला पाहिजे असे त्याला तीव्रतेने वाटत होते. 'शांतता! कोणत्याही अटीवर शांतता करा; आणि मानवजातीच्या खऱ्या शत्रूविरूद्ध संयुक्त आघाडी निर्माण करून लढा द्या!' असे तळतळून आवाहन रॅली करीत होता.

अनुक्रमणिका

# प्रकरण ४

# सैबेरियातील धाडसी कारवाया

**मदतीसंबंधीचे निवेदन**

२ ऑगस्ट १९१८ रोजी ब्रिटिश सैन्य आर्केंजल येथे उतरले. त्याच दिवशी कॅलिफोर्नियातील पालोअल्टो येथील फ्रेमाँट छावणीत अमेरिकन लष्कराच्या आठव्या विभागाचा सेनापती मेजर जनरल विलियम एस्. ग्रेव्हज् याला वॉशिंग्टनच्या युद्धखात्याने सांकेतिक भाषेत पाठविलेला एक तातडीचा संदेश मिळाला. त्या संदेशातील मजकूर त्याच्या हाताखालील कर्मचाऱ्यांना किंवा अन्य कोणालाही कळू नये अशी सक्त ताकीद त्या संदेशाच्या सुरुवातीलाच युद्धखात्याने ग्रेव्हज्ला दिली होती.

ग्रेव्हज्ने ताबडतोब मिळेल ती पहिली वेगवान गाडी पकडून सानफ्रान्सिस्कोहून कॅन्सास सिटीला जावे व तेथे बाल्टिमोर हॉटेलमध्ये जाऊन युद्धमंत्र्याची भेट घ्यावी असा आदेश त्या संदेशाद्वारे ग्रेव्हज्ला देण्यात आला होता. इतक्या तातडीने ग्रेव्हज्ला कॅन्सास सिटीला कशाकरिता पाठविण्यात येत होते किंवा त्याला तेथे किती काळ राहावे लागणार होते याचा कोणताही खुलासा त्या संदेशात नव्हता.

जनरल ग्रेव्हज् हा लष्करी पेशात मुरलेला मोठा अनुभवी अधिकारी असल्याने नको तेथे प्रश्न विचारण्याची त्याला सवयच नव्हती. अधिक विचक्षणा न करता एका छोट्याशा प्रवासी बॅगेत त्याने कसेबसे आपले सामान कोंबले व दोन तासातच सानफ्रान्सिकोहून पूर्वेकडे कॅन्सास सिटीला जाणारी गाडी त्याने पकडली.

कॅन्सास सिटीच्या रेल्वे स्थानकावर गाडी थांबताच युद्धमंत्री न्यूटन डी बेकर तेथे त्याची वाट बघत उभा असल्याचे त्याला दिसले. थोड्याच वेळात बेकरला दुसरी गाडी पकडायची असल्याने तो मोठ्या गडबडीत होता. त्या गुप्त भेटीकरिता ग्रेव्हज्ला तडकाफडकी का पाचारण करण्यात आले ते त्याने ग्रेव्हजला घाईघाईने समजावून सांगितले. अमेरिकन लष्कर सैबेरियात तातडीने पाठविण्यात येत असून त्या विभागाचा सेनापती म्हणून युद्धखात्याने त्याची नेमणूक केली असल्याचे त्याने ग्रेव्हज्ला सांगितले, व त्याच्या हाती एक सीलबंद लिफाफा दिला. त्यात अमेरिकेचे रशियाबाबतचे धोरण विशद केलेले असून त्या धोरणाची अंमलबजावणी ग्रेव्हज्ने करावयाची आहे असे बेकरने त्याला बजावले. त्याबरोबरच, रशियात त्याला अत्यंत बिकट व स्फोटक परिस्थितीला तोंड द्यावे लागणार आहे, तेव्हा त्याने तेथे अत्यंत सावधानतेने पावले टाकावीत असा इशारा त्याने ग्रेव्हज्ला दिला, व त्याला आपल्या शुभेच्छा देऊन तो निघून गेला.

अनुक्रमणिका

त्या रात्री कॅन्सास सिटीतील हॉटेलच्या त्याच्या खोलीत ग्रेव्हज्ने तो सीलबंद लिफाफा उघडला व त्यातील 'एडी मेमॉयर' असा मथळा असलेले सात पानी सूचनापत्र वाचायला घेतले. त्यावर कोणाचीही स्वाक्षरी नव्हती. मात्र सूचनापत्राच्या अखेरी 'परराष्ट्र खाते, वॉशिंग्टन डी.सी. जुलै १७,१९१८' अशी नोंद होती.

सर्व अमेरिकन जनता पहिल्या महायुद्धात विजय मिळविण्याकरिता प्राणपणाने कसे प्रयत्न करीत आहे व अमेरिकेने जर्मनीविरुद्ध दोस्त राष्ट्रांशी, मनात कोणताही किंतु न बाळगता सहकार्य करणे कसे आवश्यक आहे हे सुरवातीला स्पष्ट केल्यानंतर 'एडी मेमॉयर' मुख्य मुद्यावर आले होते.

'रशियातील संपूर्ण परिस्थितीची विचारपूर्वक व बारकाईने तपासणी केल्यानंतर अमेरिकन सरकारचे असे स्पष्ट मत बनले आहे की रशियात लष्करी हस्तक्षेप केल्यास तेथील सध्याचा गोंधळ नाहीसा होण्याऐवजी उलट वृद्धिंगतच होईल; अशा लष्करी हस्तक्षेपामुळे रशियाला कोणत्याही प्रकारे मदत होण्याऐवजी रशियाची हानी मात्र होईल; शिवाय, जर्मनीविरुद्ध युद्धात विजय मिळविण्याचा आपला मुख्य हेतू साध्य होण्यास त्यामुळे कोणत्याही प्रकारे हातभार लागणार नाही; त्यामुळे लष्करी हस्तक्षेपात अमेरिका सहभागी होऊ शकत नाही, किंवा तशा हस्तक्षेपाला तत्त्वतः मान्यताही देऊ शकत नाही,' हा ह्या निवेदनातील पहिला मुद्दा होता.

अमेरिकन सरकारची नीती विशद करणारे ते छोटेसे पण निःसंदिग्ध निवेदन ग्रेव्हज्ला मनापासून पटले. पण ते जर खरे, तर मग अमेरिकन सैन्य रशियात का पाठविले जात आहे? त्या सैन्याच्या नेतृत्वपदी त्याची नेमणूक का करण्यात आली आहे?--असे प्रश्न त्याच्या मनात साहाजिकच उपस्थित झाले. गोंधळात पडलेला ग्रेव्हज् पुढे वाचू लागला——

'मात्र एकंदर परिस्थिती लक्षात घेता, रशियातील झेकोस्लोवाक लष्कराने संघटित व्हावे व तेथील त्यांच्या स्लाव बांधवांशी त्यांना यशस्वी रीत्या सहकार्य करता यावे, याकरिता झेकोस्लोवाक लष्कराला मदत करण्यासाठी अमेरिकन लष्करी हस्तक्षेप समर्थनीय आहे असे अमेरिकन सरकारचे मत आहे.'

झेकोस्लोवाक लष्कर? आणि ते रशियात? — ग्रेव्हज्ला हे सारेच अनाकलनीय वाटले. आपल्या 'अमेरिकन सैबेरियन ॲडव्हेन्चर' या पुस्तकात त्या प्रसंगाचे वर्णन करताना ग्रेव्हज् म्हणतो, 'मी अंथरुणावर आडवा झालो, पण मला काही केल्या झोप येईना. इतर देशांची या प्रकरणाबाबत काय भूमिका आहे व सैबेरियातील एकंदर परिस्थिती कशी आहे याबद्दल मला काहीच माहिती का देण्यात आलेली नाही याचाच मी विचार करीत राहिलो.' त्याला बेचैन करणाऱ्या त्या प्रश्नांची उत्तरे ग्रेव्हज्ला त्यावेळी कळती तर त्या रात्री तो अधिकच अस्वस्थ झाला असता.

**व्लादिवस्तोक येथील कारस्थान**

अनुक्रमणिका

झारांच्या सरंजामशाही राजवटीत सैबेरियाचा अफाट व कल्पनातीत समृद्ध प्रदेश सर्वस्वी अविकसितच राहिला होता. युरोपच्या पूर्व सीमेपासून पॅसिफिकपर्यंत, व आर्क्टिक समुद्रापासून अफगाणिस्तानपर्यंत पसरलेल्या त्या विस्तीर्ण प्रदेशाच्या बऱ्याच भागात लोकवस्ती अगदीच तुरळक होती. त्या वैराण प्रदेशातून जाणारी एकमार्गी ट्रान्स-सैबेरियन रेल्वे म्हणजे रशियाची पूर्व व पश्चिम टोके जोडणारा एकमेव दुवा होता. आशियायी रशियाचा तो प्रदेश लष्करी दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा व आर्थिक दृष्ट्या कमालीचा समृद्ध होता. ट्रान्स-सैबेरियन रेल्वे व त्या रेल्वेमार्गाच्या दोन्ही बाजूंचा काही मैलांचा प्रदेश ज्या सत्तेच्या हाती राहील त्या सत्तेचे नियंत्रण संपूर्ण सैबेरियावर प्रस्थापित होणार हे उघडच होते.

१९१८ च्या ग्रीष्मात ट्रान्स-सैबेरियन रेल्वेने पूर्वेकडे जात असता झेकोस्लोवाक सैनिकांनी भरलेले रेल्वेचे डबे त्या लोहमार्गाच्या बाजूला उभे असलेले रेमंड रॉबिन्सला दिसले होते. पूर्वी ऑस्ट्रिया—हंगेरीच्या लष्करात असलेले ते झेक सैनिक, त्या राष्ट्राच्या वतीने दोस्त राष्ट्रांविरुद्ध लढण्याची त्यांची तयारी नसल्याने रशियात क्रांती होण्यापूर्वी मोठ्या संख्येने रशियाला येऊन मिळाले होते. रशियन लष्कराच्या खांद्याला खांदा लावून ऑस्ट्रिया व जर्मनीविरुद्ध त्यांनी लढा द्यावा, या हेतूने झार सरकारच्या सर्वोच्च लष्करी अधिकाऱ्यांनी त्या झेक सैनिकांच्या वेगळ्या पलटणी उभारल्या होत्या. केरेन्स्कीच्या पतनानंतर दोस्त राष्ट्रांच्या विनंतीनुसार त्या झेक सैनिकांना ट्रान्स-सैबेरियन रेल्वेने व्लादिवस्तोकला पोचवून देण्याचे सोविएत सरकारने मान्य केले होते. व्लादिवस्तोकहून त्या सैनिकांनी युरोपात जाऊन पश्चिम आघाडीवर जर्मनीविरुद्ध दोस्त लष्कराला जाऊन मिळावे अशी कल्पना होती. कझान ते व्लादिवस्तोक या पाच हजार मैल लांबीच्या रेल्वे मार्गावर पन्नास हजारावर संख्या असलेले ते झेक सैनिक इतस्ततः विखुरले होते.

रशियातून युरोपात गेल्यानंतर झेकोस्लोवाकियाच्या स्वातंत्र्याकरिता त्यांना लढावयाचे आहे, अशी त्या झेक सैनिकांची कल्पना होती. परंतु गायदा व सिरोवी या त्यांच्या प्रतिक्रियावादी झेक सेनापतींचे बेत मात्र वेगळेच होते. काही दोस्त मुत्सद्यांच्या पाठिंब्याने सोविएत सरकार उलथून पाडण्याकरिता झेक सैनिकांचा उपयोग करून घेण्याच्या योजना ते झेक सेनापती आखीत होते.

सोविएत सरकार व दोस्त राष्ट्रे यात झालेल्या करारानुसार सोविएत प्रदेश ओलांडून व्लादिवस्तोककडे जाताना झेक सैनिकांनी आपली शस्त्रास्त्रे सोविएत अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करावयाची होती. परंतु त्या सैनिकांनी आपआपली शस्त्राशस्त्रे खाली टाकू नयेत, असे प्रयत्न अमेरिकन राजदूत डेव्हिड आर. फ्रान्सिस याने चालविले होते. ४ जून १९१८ रोजी आपल्या मुलाला लिहिलेल्या पत्रात ह्यासंबंधी फ्रान्सिस लिहितो—

‘झेक सैनिकांनी सोविएत सरकारचे आदेश धुडकावून लावावेत व त्याकरिता मी त्यांना प्रोत्साहन द्यावे, अशा सूचना किंवा तसे अधिकार मला वस्तुतः वॉशिंग्टनहून मिळालेले नाहीत. मात्र परराष्ट्रखात्याने झेक सैनिकांप्रती सहानुभूती व्यक्त केली आहे तेवढ्या आधारावर मी कार्यवाही करीत आहे. अर्थात् यापूर्वीही स्वतःच्या जबाबदारीवर मी अशा काही गोष्टी केलेल्या आहेत.’

अनुक्रमणिका

अमेरिकेच्या पाठिंब्याची खात्री पटताच झेक सैनिकांनी आपली शस्त्रे सोविएत अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करू नयेत, असे आदेश त्या सैनिकांना झेक सेनापती गायदा व सिरोवी यांनी दिले. त्यांची आज्ञा होताच आपली शस्त्रे सोविएत अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करण्यास झेक सैनिकांनी स्पष्ट नकार दिला. एवढेच नव्हे तर संपूर्ण ट्रान्स सैबेरियन रेल्वे मार्गावर त्या प्रशिक्षित व शस्त्रसज्ज झेक सैनिकांनी अनेक ठिकाणी एकाच वेळी उठाव केले. ते ज्या भागात होते, तेथील गावे त्यांनी ताब्यात घेतली व तेथील स्थानिक सोविएत्स उलथून पाडून सोविएतविरोधी शासन प्रस्थापित केले.

जुलैच्या पहिल्या आठवड्यात रशियन प्रतिक्रांतिकारकांच्या मदतीने सेनापती गायदाने व्लादिवस्तोक येथे उठाव करून सोविएतविरोधी सरकार प्रस्थापित केले. अमेरिकन नौदल अधिकारी ॲडमिरल नाईट, जपानी नौदलाचा व्हाईस-ॲडमिरल काटो, फ्रेंच मिशनचा कर्नल पोन्स, व त्या शहराचा ताबा घेतलेला झेकोस्लोवाक लष्करी अधिकारी कॅप्टन बादिउरा यांच्या स्वाक्षऱ्या असलेली घोषणापत्रके व्लादिवस्तोकच्या रस्तोरस्ती दिसू लागली. 'रशियन जनतेबद्दल वाटणारी सहानुभूती व मित्रत्व यांनी प्रेरित होऊन दोस्त राष्ट्रे हस्तक्षेप करीत आहेत' असे ही घोषणापत्रके तेथील जनतेला कळवीत होती.

सैबेरियातील झेक सैनिकांच्या मदतीकरिता अमेरिकन सैनिक सैबेरियात पाठविण्याची योजना परराष्ट्रखात्याने आखल्यानंतर पाचच दिवसांनी, २२ जून १९१८ रोजी, मास्को येथील अमेरिकन कौन्सुल डी. विट्.क्लिन्टन पूल [डी, विट्. क्लिन्टन पूल हा नंतर अमेरिकन परराष्ट्रखात्याच्या रशियन विभागाचा प्रमुख बनला.] याने ओम्स्क येथील अमेरिकन कौन्सुलला सांकेतिक भाषेत पुढील आशयाची एक तार पाठविली—

'दोस्तांकडून पुन्हा वेगळे आदेश दिले जात नाहीत तोपर्यंत झेक सैनिकांनी जे काही साध्य केले आहे ते टिकवून धरले तर राजकीय दृष्ट्या, दोस्त राष्ट्रांना आनंदच वाटेल, असे झेकोस्लोवाक नेत्यांना विश्वासात घेऊन गुप्तपणे कळवावे. तसेच, एकंदर परिस्थितीत लष्करी दृष्ट्या आवश्यक ती पावले उचलण्यात त्यांच्या मार्गात अडथळे निर्माण होणार नाहीत अशी व्यवस्था करावी. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे त्यांनी ट्रान्स—सैबेरियन रेल्वेचा ताबा मिळवावा व शक्यतोवर सध्या त्यांच्या प्रभावाखाली असलेल्या प्रदेशावरील पकड त्यांनी कायम टिकवावी. फ्रेंच कौन्सुल जनरललाही ही नीती मान्य असल्याचे तेथील फ्रेंच प्रतिनिधींना कळवावे'

बोल्शेविकांनी लाल लष्कराच्या सैनिकांना व जर्मन युद्धबंद्यांना झेकांवर हल्ले करण्याकरिता शस्त्रे पुरविली आहेत व त्यांच्या हल्ल्यांपासून झेकांचे रक्षण करण्याकरिता दोस्तांच्या फौजा येत आहेत असे १९१८ च्या ग्रीष्मातील सैबेरियातील आपल्या लष्करी हस्तक्षेपाचे कारण दोस्त राष्ट्रांनी पुढे केले होते. झक सैनिकांशी लढण्याकरिता सैबेरियात हजारो जर्मन व ऑस्ट्रियन युद्धबंद्यांना बोल्शेविक शस्त्रसज्ज करीत आहेत अशा खळबळजनक व असत्य बातम्यांनी इंग्लिश व फ्रेंच वृत्तपत्रांचे रकानेच्या रकाने त्या वर्षीच्या वसंतात व ग्रीष्मात भरले होते. एकट्या तोम्स्क शहरात ६० हजार जर्मनांना लाल लष्कराने युद्ध साहित्य पुरवले असल्याची बातमी न्यूयॉर्क टाईम्सने दिली होती.

अनुक्रमणिका

या प्रकरणाची शहानिशा करून घेण्याकरिता ब्रिटिश गुप्तचर खात्याचा कॅप्टन हिक्स, अमेरिकन रेड क्रॉस मिशनचा कॅप्टन वेबस्टर, व पेकिंग येथील अमेरिकन 'मिलिटरी अटॅची' मेजर ड्रिस्डेल सोविएत सरकारच्या परवानगीने सैबेरियात गेले. अनेक आठवड्यांच्या बारिक चवकशीनंतर तिघांचेही एकच मत बनले की, सैबेरियात अजिबात सशस्त्र जर्मन किंवा ऑस्ट्रियन युद्धबंदी नाहीत व तत्संबंधी करण्यात आलेले आरोप पूर्णपणे असत्य आहेत. सोविएत रशियात दोस्त राष्ट्रांना हस्तक्षेप करता यावा, याकरिता हेतुपुरस्सर तसा अपप्रचार करण्यात येत आहे असा स्पष्ट निर्वाळा त्यांनी दिला. [कॅप्टन हिक्स, कॅप्टन वेबस्टर व मेजर ड्रिस्डेल यानी चौकशीअंती काढलेला हा निष्कर्ष ब्रिटिश व अमेरिकन जनतेपासून लपवून ठेवण्यात आला. कॅप्टन हिक्स याला ताबडतोब लंडन येथे माघारी बोलाविण्यात आले व त्याने कॅप्टन सिडने रॅलीबरोबर काम करावे असे आदेश त्याला देण्यात आले. अमेरिकन परराष्ट्रखात्यानेही कॅप्टन वेबस्टर व मेजर ड्रिस्डेल यांचे अहवाल थंड्या बस्त्यात टाकले.]

३ ऑगस्ट १९१८ रोजी ब्रिटिश फौजा व्लादिवस्तोक येथे उतरल्या. जर्मनीच्या कारवायांमुळे रशियाचे विघटन किंवा विनाश होऊ नये म्हणून तुम्हाला मदत करण्याकरिता आम्ही येत आहोत; तुमच्या देशाच्या इंचभरही भूमीची आम्हाला आकांक्षा नाही; रशियांचे भवितव्य निश्चित करण्याचा अधिकार रशियन जनतेच्याच हाती राहील; रशियाच्या सरकारचे स्वरूप कसे असावे व त्यांच्या सामाजिक प्रश्नांची उकल कशा प्रकारे व्हावी हे त्यांचे त्यांनीच ठरवावयाचे आहे,' अशी घोषणा ८ ऑगस्ट रोजी ब्रिटिश सरकारने रशियन जनतेला उद्देशून केली.

१६ ऑगस्ट रोजी अमेरिकन लष्कराच्या पहिल्या तुकड्या व्लादिवस्तोक येथे उतरल्या त्याच वेळी 'शस्त्रसज्ज ऑस्ट्रियन व जर्मन युद्धबंद्याच्या हल्ल्यां-पासून झेकोस्लोवाकांचे रक्षण करण्याकरिता आणि, स्वयंशासन व स्वसंरक्षण याकरिता रशियनांना आवश्यक वाटेल ती मदत करण्याकरिता रशियात सध्या लष्करी कार्यवाही करण्याची गरज आहे' असे वॉशिंग्टन सरकारनेही घोषित केले.

ऑगस्टमध्येच नव्या दमाचे जपानी सैन्यही व्लादिवस्तोक येथे उतरले. 'रशियाशी टिकावू स्वरूपाचे मैत्रीसंबंध वृद्धिंगत व्हावे ही जपानच्या सरकारची भूमिका तशीच कायम असून रशियाच्या प्रादेशिक अखंडत्वाचा सन्मान राखण्याचे व त्या देशाच्या राष्ट्रीय नीतीत कोणत्याही प्रकारे ढवळाढवळ न करण्याचे जपानचे धोरण आहे' अशी घोषणा टोकियो सरकारने केली. त्याच वेळी जपानी लष्कर पूर्वेकडे रशियन भूमीवर उतरत होते.

सैबेरियात उतरणाऱ्या जपानी सैनिकांना त्यांच्या लष्करी अधिकाऱ्यांनी मोठी दूरदृष्टी ठेऊन छोटे छोटे रशियन शब्दकोष पुरविले होते. त्यात बोल्शेविक या शब्दाचा अर्थ 'बारसुक' म्हणजे रानटी जनावर असा दिला होता, व त्या शब्दापुढे 'त्यांचे समूळ निर्मूलन करावे' अशी नोंद होती.

**पूर्वेकडील दहशतसत्र**

अनुक्रमणिका

सैबेरियात लष्करी कार्यवाहीकरिता पाठविण्यात आलेल्या अमेरिकन फौजेच्या नेतृत्वाची सूत्रे हाती घेण्याकरिता १ सप्टेंबर १९१८ रोजी जनरल ग्रेव्हज् व्लादिवस्तोक येथे उतरला. 'काय करावे किंवा करू नये याबद्दल कोणत्याही कल्पना सैबेरियात उतरताना माझ्या मनात नव्हत्या. कोणत्याही रशियन गटाविरुद्ध पूर्वग्रह नव्हते, व सर्व दोस्त राष्ट्रांच्या अधिकाऱ्यांशी सहकार्याच्या व सलोख्याच्या भावनेने काम करता येईल अशीच माझी अपेक्षा होती.' अशी नोंद या प्रसंगाबाबत जनरल ग्रेव्हज्ने आपल्या 'अमेरिकन सैबेरियन ॲडव्हेन्चर' या पुस्तकात केली आहे.

जनरल ग्रेव्हज्ने ट्रान्स—सैबेरियन रेल्वेचे रक्षण करावे, झेक सैनिकांना व्लादिवस्तोक येथून युरोपकडे जाण्यास मदत करावी व रशियाच्या अंतर्गत व्यवहारात ढवळाढवळ करू नये असे आदेश अमेरिकेच्या परराष्ट्रखात्याने तयार केलेल्या सूचनापत्राने ग्रेव्हज्ला दिले होते.

ग्रेव्हज् आपले मध्यवर्ती कार्यालय नीटपणे प्रस्थापित करतो न करतो तोच झेक लष्करी नेता जनरल गायदा त्याच्या भेटीला आला. त्याने रशियातील एकंदर परिस्थिती ग्रेव्हज्पुढे मांडली. 'रशियनांशी व्यवहार करताना दयामाया किंवा सामोपचार याचा काही उपयोग होत नाही; त्यांना चाबूक किंवा बायोनेटच हवे,' असे मत प्रदर्शित करून गायदा म्हणाला की, अराजकापासून रशियाचा बचाव करावयाचा असेल तर रशियातून प्रथम बोल्शेविझमचे समूळ उच्चाटन करून तेथे एखाद्या लष्करी हुकुमशहाच्या हाती सत्ता दिली गेली पाहिजे; त्याकरिता अगदी योग्य अशी व्यक्ती त्याच्या दृष्टीपथात होतीही, ती म्हणजे ॲडमिरल अलेक्झांडर वासिलेविच कोलचॅक! झारशाहीतील तो जुना नौदल सेनापती सोविएत-विरोधी लष्कराची उभारणी करण्याकरिता नुकताच जपानहून आला होता आणि अल्प काळातच सैबेरियात फौजा संघटित करण्यात त्याला बरेच यशही मिळाले होते; तेव्हा जनरल ग्रेव्हज्ने झेक व अन्य सोविएतविरोधी फौजांना बोल्शेविकांविरुद्ध लढा देण्याकरिता त्याला मदत करावी असे आवाहन त्याने ग्रेव्हज्ला केले.

त्याच भेटीत, वोल्गा नदीच्या दिशेने ताबडतोब कूच करून पूर्वेकडून मास्कोवर हल्ला करण्याची त्याने तयार केलेली योजनाही गायदाने ग्रेव्हज्पुढे ठेवली, व त्याच्या फ्रेंच व ब्रिटिश सल्लागारांनाच केवळ नव्हे तर अमेरिकन परराष्ट्र खात्याच्या प्रतिनिधींनाही ती योजना संमत असल्याने त्याने ग्रेव्हज्ला सांगितले.

जनरल ग्रेव्हज्ने त्याच्या सरकारकडून त्याला मिळालेले आदेश गायदाला स्पष्ट करून सांगितले व त्या आदेशानुसार वागण्याचा आपला इरादाही त्याने बोलून दाखविला; तसेच, जोपर्यंत त्याच्या हाती अमेरिकन लष्कराच्या नेतृत्वाची सूत्रे आहेत, तोपर्यंत एकही अमेरिकन सैनिक बोल्शेविकांविरुद्ध चालून जाणार नाही किंवा रशियाच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ करणार नाही हेही त्याने गायदाला निःसंदिग्धपणे सांगून टाकले.

अनुक्रमणिका

रागाने फणफणत गायदा निघून गेला. थोड्याच वेळाने आणखी एक महत्त्वाची व्यक्ती ग्रेव्हज्‌च्या भेटीला आली. तो होता जनरल नॉक्स—एकेकाळचा कोर्निलोवचा पाठिराखा व १९१८ मध्ये, सैबेरियातील ब्रिटिश फौजांचा सेनापती!

'गरीबांचा कनवाळू असल्याची तुमची प्रसिद्धी होत आहे,' असे उपहासाने उद्‌गारत जनरल ग्रेव्हजला नॉक्स म्हणाला, 'सर्व रशियन लोक अगदी डुक्करच आहेत, मुळीच सहानुभूती दाखविण्याच्या लायकीचे ते नाहीत हे तुम्हाला कसे कळत नाही?' परंतु त्याच्या या शब्दांचाही ग्रेव्हज्‌वर काहीही परिणाम झाला नाही.

जनरल ग्रेव्हज्, रेमंड रॉबिन्सच्या शब्दात सांगायचे म्हणजे मोठ्या 'खुल्या दिलाचा' माणूस होता. सत्य काय ते स्वतः पडताळून पाहण्यावर त्याचा विश्वास असल्याने सैबेरियातील खऱ्या परिस्थितीबद्दल माहिती काढून घेण्याचे त्याने ठरविले. त्याकरिता आपले गुप्तहेर त्याने खेडोपाडी पाठविले. सैबेरियात 'बोल्शेविक' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकांत तेथील जवळजवळ सर्वच रशियानांचा समावेश होत असून त्यांच्या विरुद्ध लढण्याकरिता फौजा पाठविणे किंवा श्वेत रशियानांना त्याकरिता शस्त्रास्त्रे, कपडालत्ता, अन्नधान्य व पैसा पुरविणे हे रशियाच्या अंतर्गत व्यवहारात हस्तक्षेप न करण्याच्या धोरणाशी पूर्णपणे विसंगत ठरेल, हे त्याच्या गुप्तहेरांनी पाठविलेल्या बातम्यांवरून ग्रेव्हज्‌ला कळून चुकले.

१९१८ च्या शरदात उत्तर सैबेरियात सात हजारावर इंग्लिश सैनिक होते. त्याशिवाय ॲडमिरल कोलचॅकच्या सोविएतविरोधी श्वेत रशियन लष्कराला प्रशिक्षण देऊन शस्त्रसज्ज करण्याकरिता सुमारे सात हजार ब्रिटिश व फ्रेंच सैनिक, अधिकारी व तंत्रज्ञ खपत होते. ब्रिटिश व फ्रेंच यांच्याशी सहकार्य करणारे १५०० इटालियन्सही तेथे होते. ग्रेव्हज्‌च्या हाताखालील अमेरिकन सैनिकांची संख्या ८००० होती. परंतु सैबेरियात सर्वात मोठे परकीय लष्कर होते ते जपानचे. संपूर्ण सैबेरिया गिळंकृत करण्याची जपानची आकांक्षा होती. सैबेरियात उतरलेल्या जपानी सैनिकांची संख्या होती सत्तर हजार!

ब्रिटिश व फ्रेंच पाठिंब्याच्या बळावर नोव्हेंबर १९१८ मध्ये ॲडमिरल कोलचॅकने सैबेरियाचा हुकुमशहा म्हणून आपला जम बसविला. ठेंगण्या ठुसक्या, अस्थिर मनोवृत्तीच्या कोलचॅकचे 'दुखणाईत मुलगा,' 'दुर्बल मनस्क,' नेहमीच कोणाच्या तरी प्रभावाखाली राहणारा' असे वर्णन त्याच्या एका सहकाऱ्याने केले होते. स्वतःला 'रशियाचा सर्वोच्च राज्यकर्ता' घोषित करून त्याने ओम्स्क येथे आपले मध्यवर्ती कार्यालय प्रस्थापित केले. कोलचॅक हा 'रशियन वॉशिंग्टन' असल्याचे झारकालीन मंत्री सझोनोव याने जाहीर केले व तो त्याचा पॅरिसमधील अधिकृत प्रतिनिधी बनला. पॅरिस व लंडन येथे कोलचॅकची स्तुतिस्त्रोत्रे गायली जाऊ लागली. कोलचॅक हा एक मोठा 'सद्‌गृहस्थ' असल्याची ग्वाही ब्रिटिश मुत्सद्दी सर सॅम्युअल होअर हा पुन्हा पुन्हा देत होता; कोलचॅक हा मोठा प्रामाणिक, हुशार व शुद्ध चारित्र्याचा देशभक्त आहे असे त्याचे स्तुतिपर वर्णन विन्स्टन चर्चिलने केले; तर, कोलचॅक हा मोठा कणखर व्यक्तिमत्त्वाचा नेता असल्याचे मत व्यक्त करून त्याने प्रस्थापित केलेले सरकार 'स्थिर व ढोबळमानाने प्रातिनिधिक स्वरूपाचे आहे' असा निर्वाळा न्यूयॉर्क टाईम्सने दिला.

कोलचॅक राजवटीला दोस्त राष्ट्रांनी, विशेषतः ब्रिटनने मुक्त हस्ताने दारू-गोळा, शस्त्रास्त्रे, पैसा व अन्य युद्धसाहित्य पुरविले. हजारो रायफली, लक्षावधी काडतुसे, गणवेश, इत्यादी लष्करी साहित्य आम्ही सैबेरियात पाठविले असे मोठ्या प्रौढीने जनरल नॉक्स उघडपणे बोलत होता. बोल्शेविकांविरुद्ध श्वेत रशियनांनी त्या वर्षी झाडलेली प्रत्येक गोळी ब्रिटिश कामगारांनी ब्रिटनच्या शस्त्रनिर्मिती कारखान्यात तयार केलेली व ब्रिटिश जहाजांनी व्लादिवस्तोकला पोचविलेली होती.

पदके फ्रेंचाची! गणवेश ब्रिटिशांचा!!

तंबाखू जपानची! नाच कोलचॅकचा!!

या कोलचॅकच्या परावलंबित्वाची टिंगल व हेटाळणी करणाऱ्या एका गीताच्या ओळी त्या काळी सैबेरियातील माणसामाणसांच्या तोंडी झाल्या होत्या.

कोलचॅकच्या राजवटीबद्दल ओसंडून वाहत असलेला दोस्त राष्ट्रांचा उत्साह जनरल ग्रेव्हज्च्या मनाला मुळीच पटत नव्हता. कोलचॅकने चालविलेल्या क्रौर्याच्या व रक्तपाताच्या बातम्या त्याच्या गुप्तहेरांकडून प्रत्यही त्याच्याकडे येत होत्या. गोळ्या घालण्याचा धाक दाखवून एक लाख माणसे त्याने त्याच्या सैन्यात भरती केली होती. तुरुंग व छलशिबिरे तुडुंब भरली होती. त्याच्या राजवटीला विरोध करणाऱ्या शेकडो रशियानांचे मृतदेह तारायंत्राच्या खांबांना व झाडांना लटकलेले आढळून येत होते. अनेक ठिकाणी कोलचॅकच्या मारेकऱ्यांनी शेकडो लोकांना प्रथम मोठमोठे खड्डे खणायला लावून व नंतर त्यांच्यावर मशीनगन्सचा मारा करून त्यांना त्याच खड्ड्यात सामूहिक रित्या चिरविश्रांती दिली होती. बलात्कार, खून, लुटालूट यांचे थैमान सर्वत्र चालू होते.

कोलचॅकचा उजवा हात बनलेला पूर्वीचा झारकालीन अधिकारी जनरल सझोनोव याने त्याच्या सैनिकांना उघडपणे सूचना दिल्या होत्या, की 'दरोडेखोरांच्या (सोविएत समर्थकांच्या) ताब्यात असलेले खेडे काबीज करताना प्रथम त्यांचे नेते हस्तगत करा; नेते हाती लागले नाहीत परंतु ते तेथे आहेत अशी खात्री पटली तर प्रत्येक दहा माणसापैकी एकाला तरी गोळी घालून ठार करा; आपले सैनिक कोणत्याही शहरात शिरल्यावर तेथील लोकांनी शत्रूबद्दल माहिती देण्यास नकार दिला तर अजिबात दयामाया न दाखविता सर्वांकडून जास्तीत जास्त पैसा वसूल करा; ज्या खेड्यांतील लोक तुम्हाला सशस्त्र प्रतिकार करतील ती सर्व खेडी भस्मसात करून टाका; तेथील सर्व पुरुषांना गोळ्या घाला; मालमत्ता, घरे, वाहने आपल्या उपयोगाकरिता ताब्यात घ्या.' अशा प्रकारच्या सूचना देणारा सझोनोव शुद्ध राक्षसच आहे असे भाष्य जनरल नॉक्सने ग्रेव्हज्पाशी केले होते.

कोलचॅकच्या सैनिकांप्रमाणेच, जपानने पैसा पुरविलेले दहशतवादी गटही गावोगावी लुटालूट व जाळपोळ करीत सर्वत्र धुमाकूळ घालीत होते. सेमेनोव व कालमिकोव हे त्यांचे नेते होते. सेमेनोवच्या

अनुक्रमणिका

सैनिकांनी व्यापलेल्या एका खेड्यातील सर्व स्त्री पुरुष व मुले यांची सरसकट कत्तल त्या सैनिकांनी केली अशी बैकल पलीकडील क्षेत्रातील अमेरिकन फौजेचा सेनापती कर्नल मॉरो याची बातमी होती. सेमेनोवच्या मारेकऱ्यांच्या धास्तीने घरेदारे सोडून पळणाऱ्या गावकऱ्यांना उंदरांना मारावे तशा सहजपणे सेमेनोवच्या सैनिकांनी ठार केले होते. अनेक पुरुष त्यांनी उभे जाळले होते. जनरल ग्रेव्हज्च्या निवेदनानुसार सेमेनोव व कालमिकोव यांचे सैनिक, जपानी फौजेच्या संरक्षणामुळे उन्मत्त होऊन लोकांची लुटालूट व कत्तल करीत रानटी श्वापदांप्रमाणे बेदरकारपणे हिंडत होते; आणि त्यांच्या क्रौर्याबद्दल त्यांना कोणी हटकलेच तर मारण्यात आलेले लोक बोल्शेविक्स होते असे सांगून सेमेनोवचे सैनिक मोकळे होत होते, आणि अशा स्पष्टीकरणाने जगाचे समाधानही होत होते.

सैबेरियात सोविएत–विरोधी फौजा करीत असलेल्या अमानुष अत्याचाराबद्दल वाटणारी आत्यंतिक घृणा जनरल ग्रेव्हज्ने स्पष्टपणे व्यक्त केली. त्याच्या हया भूमिकेमुळे श्वेत रशियन आणि ब्रिटिश, फ्रेंच व जपानी नेत्यांच्या मनात ग्रेव्हज्बद्दल चांगलीच नाराजी पसरली. अशा परिस्थितीतच सैबेरियातील राजकीय स्थितीची पाहणी करण्यात आलेला जपानमधील अमेरिकन राजदूत मॉरिस हा ग्रेव्हज्च्या भेटीला आला. सैबेरियात कोलचॅकला पाठिंबा देण्याचेच अमेरिकेचे धोरण असल्याबद्दल अमेरिकेच्या परराष्ट्रखात्याकडून त्याला आलेली तार ग्रेव्हज्ला दाखवून तो म्हणाला, ‘जनरल, आता तरी तुम्ही कोलचॅकला पाठिंबा द्यायलाच पाहिजे.’ परंतु तशा प्रकारचे कोणतेही आदेश युद्धखात्याकडून आपल्याला आलेले नाहीत, असे उत्तर ग्रेव्हज्ने त्याला दिले. त्यावर मॉरिस म्हणाला, ‘पण हयाबाबतीत सर्व सूत्रे हलवीत आहे ते परराष्ट्रखाते, युद्धखाते नव्हे,’ तेव्हा ग्रेव्हज्नेही त्याला ताडकन उत्तर दिले, ‘पण मी सेवेत आहे ते युद्धखात्याच्या, परराष्ट्र खात्याच्या नव्हे.’

ग्रेव्हज्च्या या खंबीर भूमिकेमुळे त्याची बदनामी करणारी प्रचार मोहीम कोलचॅकच्या हस्तकांनी आरंभली. अमेरिकन सरकारने त्याला सैबेरियातून माघारी बोलवावे हा त्यांचा मुख्य उद्देश होता. जनरल ग्रेव्हज् हा स्वतःच बोल्शेविक बनला आहे, त्याचे सैनिक कम्युनिस्टांना मदत करीत आहेत, अशा खोट्या प्रचाराचे व अफवांचे पीक सर्वत्र फोफावले. त्या प्रचाराचा थोडा फार भाग ज्यू विरोधीही होता. ‘अमेरिकन सैनिकांना बोल्शेविझमची लागण झालेली असून त्यापैकी बरेच सैनिक पूर्व न्यूयॉर्कमध्ये सतत बंडाळ्या करणारे ज्यू आहेत,’ हा ते करीत असलेल्या खोडसाळ प्रचाराचा एक मासलेवाईक नमुना आहे. कोलचॅकचा राजकीय सल्लागार असलेला एक ब्रिटिश संसद सदस्य छातीठोकपणे सांगत होता की, तो अमेरिकन लष्कराच्या कार्यालयात गेला तेव्हा तेथील साठ जनसंपर्क अधिकारी व अनुवादक यापैकी पन्नासपेक्षाही अधिक लोक ज्यू होते.

जनरल ग्रेव्हज्चे स्वतःचे देशबांधवही अशाच प्रकारच्या प्रचाराला हातभार लावीत होते. व्लादिवस्तोक येथील अमेरिकन कौन्सुल तेथील वृत्तपत्रात अमेरिकन सैनिकांबद्दल छापल्या गेलेल्या असत्य व खोडसाळ बातम्या कळवायला रोज परराष्ट्र खात्याला तारा करीत होता. त्या वृत्तपत्रांतील सगळ्या लेखातून अमेरिकन फौजेवर होत असलेली टीका सतत एकाच आरोपाभोवती केंद्रित झाली होती. तो म्हणजे अमेरिकन सैनिक बोल्शेविकांचे समर्थक आहेत. अमेरिकन सैनिकांच्या कोणत्याही कृतीवर तो

आरोप आधारलेला होता असे नव्हे तर सैबेरियात कोलचॅकला पाठिंबा न देणाऱ्या सर्वच लोकांवर कोलचॅकचे समर्थक तो आरोप करीत होते. खुद्द कौन्सुल जनरल हॅरिसही कोलचॅकचा समर्थक होता.

हा सर्व अपप्रचार ऐन भरात चालू असता जनरल इव्हानोव-रिनोव याच्याकडून एक खास दूत त्याचा एक प्रस्ताव घेऊन ग्रेव्हज्च्या कार्यालयात आला. जनरल इव्हनोव-रिनोव हा पूर्व सैबेरियातील कोलचॅकच्या संपूर्ण फौजांचा सेनापती होता. जनरल ग्रेव्हज् जर दरमहा वीस हजार डॉलर्स कोलचॅकच्या लष्कराला देईल तर त्या मोबदल्यात ग्रेव्हज् व त्याचे सैनिक यांच्याविरुद्ध चालू असलेला विखारी प्रचार थांबविण्याची व्यवस्था जनरल इव्हानोव-रिनोव करील असा प्रस्ताव त्या दूताने ग्रेव्हज्पुढे मांडला.

जनरल इव्हानोव-रिनोव हा दुसऱ्याच्या दुःखात आसुरी आनंद उपभोगणाऱ्या कोलचॅकच्या सगळ्यात क्रूर लष्करी अधिकाऱ्यांपैकी एक होता. बोल्शेविकांना पाठिंबा देत असल्याच्या नुसत्या संशयावरून अनेक खेड्यातील लोकांची सरसकट कत्तल त्याच्या सैनिकांनी पूर्व सैबेरियात केली होती. स्त्रियांना फटके मारणे, त्यांच्यावर बलात्कार करणे, वृद्धांची व मुलांचीही कत्तल करणे हे नित्याचे झाले होते. सत्य परिस्थितीची पाहणी करण्याकरिता ग्रेव्हज्ने पाठविलेला एक अमेरिकन अधिकारी त्या अत्याचारांनी इतका हादरून गेला की, तत्संबंधी त्याचा अहवाल सादर करताना, पुन्हा तशा कामगिरीवर न पाठविण्याबद्दल त्याने ग्रेव्हज्ला विनविले. कोलचॅकच्या अधिकाऱ्यांच्या त्या अघोरी कृत्यांबद्दल ग्रेव्हज्ला माहिती देताना तो म्हणाला की, कित्येकदा त्याला असे तीव्रतेने वाटायचे की आपला गणवेश फेकून द्यावा व त्या गरीब बिचाऱ्या लोकाच्या मदतीला धावून जावे.

शेवटी, संतप्त लोकांनी जनरल इव्हानोव-रिनोवविरुद्ध उठाव केला तेव्हा त्याच्या सुरक्षिततेबद्दल ब्रिटिश उच्चायुक्त सर चार्लस इलियट याच्या मनात मोठीच चिंता निर्माण झाली. ग्रेव्हज्शी बोलताना त्याने त्याबद्दल उल्लेख करताच, एकंदर प्रकाराने उद्विग्न झालेल्या ग्रेव्हज्ने ठामपणे उत्तर दिले की इव्हानोव-रिनोवला लोकांनी पकडून आणून अमेरिकन लष्करी कार्यालयासमोर फाशी जरी दिले तरी एकही अमेरिकन सैनिक त्याच्या रक्षणाकरिता हात उचलणार नाही.’

सैबेरिया व संपूर्ण रशिया यादवी युद्धाच्या व परकीय लष्करी हस्तक्षेपाच्या वणव्यात होरपळून निघत असता युरोपात अनपेक्षित अशा महत्त्वाच्या घटना घडत होत्या. ९ नोव्हेंबर १९१८ रोजी कील येथे जर्मन नौदलाच्या खलाशांनी उठाव केला व त्यांच्या अधिकाऱ्यांची हत्या करून लाल ध्वज उभारला. संपूर्ण जर्मनी विशाल शांतिमोर्चांनी दुमदुमून गेले. पश्चिम आघाडीवर जर्मन व दोस्त सैनिक परस्परांप्रती बंधुभाव प्रदर्शित करू लागले. जर्मनीच्या सर्वोच्च लष्करी अधिकाऱ्यांनी युद्धबंदीची याचना केली. जर्मनीचा कैसर दुसरा विलियम हॉलंडला पळून गेला. जर्मनी-हॉलंड सीमा ओलांडताना एका सीमारक्षक तरुण डच सैनिकाच्या हाती त्याने आपली राज्यसत्तेची निदर्शक तलवार सोपविली, तेव्हा तो सीमारक्षक आश्चर्याने स्तंभितच झाला. कैसरच्या पलायनाच्या पाठोपाठ ११ नोव्हेंबर रोजी युद्धबंदी करार झाला.

पहिले महायुद्ध संपले.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

## प्रकरण ५

# शांतता व युद्ध

**पश्चिमेकडे शांतता**

पहिले महायुद्ध आकस्मिकपणे थांबले होते. ‘शांततेने एकदमच उसळी मारली’ हे त्या संदर्भात जर्मन अधिकारी कॅप्टन रोहेम याने केलेले भाष्य मोठे समर्पक होते. बर्लिन, हॅम्बुर्ग, व संपूर्ण बव्हेरिया या भागात सोविएत्स् प्रस्थापित झाली होती. पॅरिस, लंडन, रोम या शहरांच्या रस्तोरस्ती कामगारांनी शांतता व लोकशाहीची मागणी करीत प्रचंड निदर्शने केली होती. हंगेरी क्रांतीच्या तडाख्यात सापडले होते. बाल्कन राष्ट्रेही शेतकऱ्यांच्या असंतोषाने ढवळून निघत होती. चार वर्षांच्या त्या प्रदीर्घ व सर्व संहारक युद्धानंतर सर्वांच्या मुखातून एकच मागणी बाहेर पडत होती, ‘पुन्हा युद्ध नको, कधीही नको.’

“संपूर्ण युरोपात क्रांतीचे वारे संचारले आहे. सर्वत्र केवळ असंतोषच भरला आहे असे नव्हे तर युद्धपूर्व परिस्थितीबद्दल कामगारांच्या मनात संतापाची व उठावाची भावना उसळून येत आहे, युरोपच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत सामान्य जनता सध्याच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक व्यवस्थेला आव्हान देत आहे” अशा शब्दात तत्कालीन घटनांबद्दल उल्लेख डेविड लॉईड जॉर्ज याने पॅरिस शांतता परिषदेला पाठविलेल्या त्याच्या खाजगी निवेदनात केला होता.

सर्वसामान्य जनतेच्या आशा आकांक्षा, तर काही थोड्यांना भावी राजकीय व्यवस्थेबद्दल वाटणारी धास्ती त्या काळी दोन व्यक्तींवर केंद्रित झाली होती— लेनिन व विल्सन! पूर्वेला लेनिनने घडवून आणलेल्या क्रांतीने झारशाही उलथून पाडून शतकानुशतके रंजल्या गांजल्या कोट्यावधी रशियन जनतेला नव्या मनूची द्वारे खुली केली होती; तर पश्चिमेला वुड्रो विल्सन याने रोखठोकपणे मांडलेल्या चौदा कलमांनी जनमानसात लोकशाहीबद्दलच्या आशा अपेक्षा जागृत केल्या होत्या.

डिसेंबर १९१८ मध्ये शांतता साकार करण्याकरिता म्हणून युरोपच्या रक्तलांछित भूमीवर वुड्रो विल्सनने पाऊल ठेवले तेव्हा त्याच्या हाताचे चुंबन घेण्यास व त्याच्या मार्गावर फुलांची उधळण करण्यास लोकांची तोबा गर्दी उसळली. ‘मानवतेचा सम्राट,’ ‘तारणकर्ता,’ ‘शांततेचा राजकुमार’ अशा शब्दांनी जुन्या जगातील जनतेने नव्या जगाच्या त्या अध्यक्षाचे अपूर्व उत्साहाने स्वागत केले. प्रिन्स्टनचा तो उंच, रोडकासा प्रोफेसर नव्या आदर्श युगाचा संदेश घेऊन येणारा देवदूतच आहे असे त्यावेळी युरोपातील जनसामान्यांना वाटले.

त्या भीषण महायुद्धात दहा दशलक्ष माणसे मृत्युमुखी पडली होती; दोन कोटी लोक कायमचे अपंग झाले होते; दुष्काळ व रोगराई यांना तेरा दशलक्ष नागरिक बळी पडले होते तर, उपासमारीने गांजलेले व बेघर झालेले लक्षावधी लोक जाळपोळीने उध्वस्त झालेल्या युरोपीय शहरांतून रस्तोरस्ती हिंडत होते. पण आता युद्ध संपून शांततेची भाषा जगात ऐकू येत होती. 'राष्ट्रसंघाबद्दल माझी प्रमुख कल्पना एकच आहे, ती म्हणजे सर्वसामान्य जनतेची एक सुसंघटित नैतिक शक्ती म्हणून राष्ट्रसंघाचा उपयोग जगाला व्हावा.' वुड्रो विल्सन राष्ट्रसंघाच्या स्थापनेबाबत आग्रहाने बोलत होता. [पॅरिस शांतता परिषदेसमोर केलेल्या आपल्या उद्‌घाटनपर भाषणात वुड्रो विल्सन असेहि म्हणाला की, "युद्धाने जर्जर झालेल्या या जगात आज उठणाऱ्या आवाजापैकी एक सर्वात आग्रही व अंतःकरण हेलावून सोडणारा आवाज मला सिद्धांत व उद्देश यांची व्याख्या करण्यास भाग पाडीत आहे. तो आवाज आहे रशियन जनतेचा!"]

जानेवारी १९१९ च्या प्रारंभी दोस्त राष्ट्रांचे चार बडे नेते, वुड्रो विल्सन, डेविड लॉईड जॉर्ज, जॉर्जेस क्लेमेंसो व विटोरियो ओरलँडो हे जागतिक शांततेचे स्वरूप निश्चित करण्याकरिता पॅरिस येथे एका सभागृहात एकत्र जमले. पृथ्वीच्या एक षष्ठांश भूभागाला मात्र (रशियाला) त्या शांतता परिषदेत प्रतिनिधित्व देण्यात आले नाही.

जागतिक शांततेला मूर्त स्वरूप देण्यासंबंधी पॅरिसमध्ये चर्चा चालू होती त्याचवेळी हजारो दोस्त सैनिक रशियात दोस्त राष्ट्रांनी आरंभलेल्या सोविएत-विरोधी अघोषित युद्धात गुंतले होते. कोलचॅक व डेनिकिन यांच्या नेतृत्वाखाली श्वेत प्रतिक्रांतीवादी फौजा व त्यांच्या खांद्याला खांदा लावून दोस्त राष्ट्रांच्या फौजा आर्क्टिक क्षेत्रापासून काळ्या समुद्रापर्यंत तर युक्रेनच्या गव्हाच्या शेतांपासून सैबेरियाच्या माळरानापर्यंत पसरलेल्या विशाल क्षेत्रात सोविएत सरकारने नुकत्याच उभारलेल्या लाल लष्कराविरुद्ध रक्तरंजित युद्ध चालवीत होत्या.

१९१९ च्या वसंतात संपूर्ण युरोपात व अमेरिकेत सोविएत-विरोधी प्रचाराचे प्रचंड वादळ घोंघावत होते. ओदेसा येथील 'दहशतसत्राच्या' आणि बोल्शेविकांच्या 'अनिर्बंध अनैतिक प्रेमाच्या' खुमासदार व खळबळजनक बातम्या लंडनचे 'डेली टेलिग्राफ' सतत देत होते. 'जखमी अमेरिकनांना कम्युनिस्टांनी कुऱ्हाडींनी छिन्नविछिन्न केले' अशा बातम्या मोठमोठे मथळे देऊन 'न्युयॉर्क सन' सारखी वृत्तपत्रे देत होती; तर, 'कम्युनिस्टांच्या राजवटीत रशियात दंगे व अत्याचार यांचे थैमान चालू आहे; त्यातून कसेतरी बचावून आलेले लोक सांगतात की मास्कोच्या रस्तोरस्ती प्राण्यांच्या कुजलेल्या मांसाकरिता एकमेकांशी भांडत वेडेपीर रशियन लोक सैरभैर हिंडत आहेत,' अशा कपोलकल्पित बातम्या 'न्यूयॉर्क टाईम्स' मध्ये येत होत्या. 'रशियात बुर्ज्वा वर्गातील तरुण स्त्रिया व मुली तोफखान्याच्या तुकड्यांची गरज भागविण्याकरिता बराकीत कोंबल्या जात आहेत' अशा बातम्या देणारी बनावट कागदपत्रे 'अस्सल कागदपत्रे' म्हणून छापून व धादांत खोट्या बातम्या देऊन सोविएत रशियाची बदनामी दोस्त राष्ट्रे व जर्मनी यांसह जगातील सर्वत्र राष्ट्रांतील वृत्तपत्रांनी चालविली होती. पत्रकार, गुप्तहेर, राजनीतीज्ञ, एवढेच नव्हे तर जुडसन व ग्रेव्हज् यांच्यासारख्या सेनाधिकाऱ्यांनी रशियातील सत्यपरिस्थितीबाबत पाठविलेले अहवाल दडपून टाकले जात होते. सोविएत रशियात दोस्त राष्ट्रे चालवीत असलेल्या हस्तक्षेपवादी मोहिमांविरुद्ध कोणी ब्रही उच्चारला तर तो बोल्शेविक असल्याचे शिक्कामोर्तब त्याच्यावर होत होते.

अनुक्रमणिका

युद्धबंदी होऊन दोन महिनेही उलटले नव्हते, पण महायुद्धाच्या उद्दिष्टांचा दोस्त नेत्यांना जणू पूर्णपणे विसर पडला होता. ‘बोल्शेविझमच्या धोक्याने’ त्यांना पछाडले असल्याने अन्य सर्व सारासार विचार बाजूला पडला होता. त्यांना बेचैन करणाऱ्या त्या धोक्याची छाया पॅरिस शांतता परिषदेवर पसरली होती.

शांतता परिषेदेच्या एका गुप्त बैठकीत दोस्त फौजांचा फ्रेंच सेनापती मार्शल फॉक याने जर्मनीशी ताबडतोब तडजोड करण्याबाबत दोस्त नेत्यांकडे निकड लावली. कारण तसे झाले तरच दोस्त राष्ट्रांना आपली सर्व शक्ती सोविएत रशियाविरुद्ध झोकून देणे शक्य होईल असे त्याचे मत होते. जर्मनी म्हणजे वस्तुतः फ्रान्सचे हाडवैरी राष्ट्र! परंतु त्याच जर्मन राष्ट्राच्या वतीने त्याने दोस्त राष्ट्रांपुढे जोरदार वकीली केली. ‘जर्मनीची सध्याची परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे हे सर्वांना चांगले माहीत आहे. मानहीम, कालशरु, बादेन व डुसेलडॉर्फ या क्षेत्रात सोविएत आंदोलन जोमाने व झपाट्याने फोफावत आहे. त्यामुळे दोस्त राष्ट्रे म्हणतील त्या अटी जर्मनी यावेळी मान्य करील. जर्मनीच्या सरकारला सध्या एकच गोष्ट हवी आहे—शांतता! शांततेमुळे जनतेचे समाधान तर होईलच, पण एकंदर परिस्थिती नियंत्रणाखाली आणणे त्यामुळे जर्मन सरकारला शक्य होईल,’ असे त्याचे आग्रही प्रतिपादन होते.

जर्मनीत होऊ घातलेली क्रांती दडपून टाकणे जर्मन सरकाराला शक्य व्हावे याकरिता अधिकारी व सैनिक यांसह एक लक्ष सैन्य ठेवण्याची, तसेच अद्यावत लष्करी प्रशिक्षण दिलेल्या व लष्करवादी तत्त्वप्रणालीचे महत्व मनावर ठासून बिंबविलेल्या सैनिकांचे खास लष्कर—‘ब्लॅक राईश्वेर’ बाळगण्याची जर्मनीला परवानगी देण्यात आली. याशिवाय, उठाव करणाऱ्या जर्मन लोकशाहीवाद्यांना धाकदपटशा करणे, त्यांचे हालहाल करणे, त्यांची हत्या करणे याकरिता भूमिगत जर्मन समित्या व दहशतवादी संस्था यांना पैसा पुरवण्याची परवानगी जर्मन सर्वोच्च लष्करी अधिकाऱ्यांना दिली गेली. हे सर्व करण्यात आले ते ‘बोल्शेविझमपासून जर्मनीचा बचाव’ करण्याकरिता…!

युद्धकाळातील पूर्व आघाडीवर जर्मन फौजांचा सेनापती व ब्रेस्त लितोवस्कच्या लढाईत प्रसिद्धीला आलेला वीर जनरल मॅक्स हॉफमन याने तर बोल्शेविझम मुळापासून निपटून काढण्याकरिता जर्मन सैन्याने मास्कोपर्यंत धडक मारावी या दृष्टीने त्याने तयार केलेली एक योजना त्याचा एके काळचा कट्टर शत्रू मार्शल फॉक याच्यापुढे ठेवली होती. फॉकला ती योजना पसंतही होती. पण मास्कोवरील त्या हल्ल्याचे वेळी आघाडीला जर्मन नव्हे तर फ्रेंच लष्कर असावे असा त्याचा आग्रह होता. संपूर्ण पूर्व युरोपला सोविएत रशियाविरुद्ध वेठीला धरण्याचा फॉकचा विचार होता.

‘सध्या रशियात बोल्शेविझम बरोबरच अराजकाचे साम्राज्य पसरलेले आहे’, [१९१८ मध्ये दोस्त राष्ट्रांच्या फौजा बर्लिनपर्यंत पोचल्या नाहीत व त्यांनी जर्मन लष्करवादाचे उच्चाटनही केले नाही याचे कारण एकच होते—दोस्त राष्ट्रांना बोल्शेविझमची वाटणारी धास्ती. त्यांनी अस्वस्थ करणाऱ्या त्या धास्तीचा जर्मन राजकारण्यांनी पुरेपूर फायदा उचलला. प्रारंभापासूनच, जर्मन प्रवक्ते शांतता कराराच्या अटी जर्मनीला अनुकूल ठराव्यात. याकरिता जर्मनीवर बोल्शेविक आक्रमण करणार आहेत असा बागुलबोवा हेतुपुरस्पर पुन्हा पुन्हा उभा करीत होते असे मार्शल फॉकने आपल्या युद्धोत्तर स्मृतिचित्रात नमूद केले आहे. ब्रिटिश लष्करी अधिकारी जनरल विल्सन याने ९ नोव्हेंबर रोजी—म्हणजे युद्धबंदी होण्याच्या दोनच दिवस अगोदर आपल्या युद्धदैनंदिनीत केलेली नोंदही त्या दृष्टीने मोठी बोलकी आहे. “आज रात्रीची ६-३० ते ८

अनुक्रमणिका

वाजताची मंत्रिमंडळाची बैठक. मार्शल फॉक व जर्मन अधिकारी यांच्यात झालेल्या भेटीचा वृत्तांत देणाऱ्या टायगर (क्लेमेन्सो) कडून आलेल्या दोन तारा लॉईड जॉर्जने बैठकीत वाचून दाखविल्या. जर्मनी कोसळले तर तेथे बोल्शेविझमचे नियंत्रण प्रस्थापित होईल अशी क्लेमेंसोला धास्ती वाटत होती, असे सांगून लॉईड जॉर्जने मला विचारले 'तसे झाले तर तुला चालेल काय? की त्यापेक्षा युद्धबंदी झालेली बरी असे तुला वाटते?' मी न कचरता उत्तर दिले, 'अर्थातच युद्धबंदी अधिक योग्य!' संपूर्ण मंत्रिमंडळ या मुद्यावर माझ्याशी सहमत होते. कारण आम्हाला आत खरा धोका वाटत होता तो जर्मनीचा नव्हे तर बोल्शेविझमचा!" दोस्तांना गोंधळात टाकून जर्मन लष्करवादाचा बचाव करण्याकरिता 'बोल्शेविझम-विरोध' या शस्त्राचा वापर जर्मनीचे लष्करी नेते करून घेत आहेत हे क्लेमेंसोला कळत नव्हते असे नाही. दोस्त राष्ट्रांना घाबरवून सोडण्याकरिता जर्मन नेते बोल्शेविझमचा बागुलबोवा पुढे करीत आहेत असा उघड इशारा त्याने पॅरिस शांतता परिषदेला दिलाही होता. तरीही फॉक, पेताँ, वेगाँ व अन्य फ्रेंच अधिकाऱ्यांचा त्याच्या मनावर इतका जबरदस्त पगडा होता की स्वतः त्याने दिलेल्या त्या इशाऱ्याचे त्याला विस्मरण झाले व शांतता करार करण्यास एकत्र जमलेल्या दोस्त नेत्यांची विचारशक्ती व लोकशाही निष्ठा झाकाळून टाकणाऱ्या बोल्शेविक विरोधाच्या विखारी प्रचाराला तो बळी पडला.]'. फॉक पॅरिस शांतता परिषदेपुढे पोटतिडीकेने बोलत होता, 'पूर्वेकडील समस्येची उकल करण्यावर सर्व शक्तिबुद्धी केंद्रित करावयाची असेल तर पश्चिमचेकडील सर्व महत्त्वाचे प्रश्न प्रथम लवकरात लवकर निकालात काढले पाहिजेत. पोलिश फौजांना आधुनिक युद्धसाहित्य पुरविल्यास त्या फौजा रशियनांना नक्कीच तोंड देऊ, शकतील. शिवाय फिन्स्, झेक्स्, रुमानियन्स्, ग्रीक, व दोस्तांना अनुकूल असलेले श्वेत रशियन्स हे सर्व संघटीत झाल्यास रशियनांविरुद्ध लढण्यास भरपूर लष्कर उभे करता येईल...तसे झाले तर १९१९ मध्ये बोल्शेविझमचा विनाश ठरलेलाच आहे."

वुल्डो विल्सनला मात्र रशियाला न्याय मिळावा असे वाटत होते. जगातील १/६ भूभागाला शांतता वाटाघाटीत सहभाग नाकारून जागतिक शांततेच्या गप्पा करण्यातील वैय्यर्थ्य अमेरिकेचा तो अध्यक्ष पुरेपूर जाणून होता. शांतता वाटाघाटीत दोस्तांच्या बरोबरीने सहभागी होण्यासाठी सोविएत प्रतिनिधीमंडळाला आमंत्रित करावे असे विल्सनने वारंवार सांगून पाहिले. शांतता कराराला मूर्त स्वरूप देण्याकरिता एकत्र जमलेल्या मंडळींच्या मनातून बोल्शेविझमचा बागुलबोवा नाहीसा व्हावा व रशियाला वाटाघाटीत सहभागी करून घ्यावे याकरिता त्याने आटोकाट प्रयत्न केले.

पॅरिसमध्ये दहा नेत्यांच्या भरलेल्या एका गुप्त बैठकीत बोलताना वुड्रो विल्सन याने एकंदर परिस्थितीत दडलेल्या धोक्यासंबंधी इशारा देत स्पष्टपणे बजावले की 'संपूर्ण जगातील आर्थिक व राजकीय क्षेत्रावर वर्चस्व गाजविणाऱ्या निहित स्वार्थाविरुद्ध सर्वत्र निषेधाची व बंडखोरीची भावना बळावत आहे. हे वर्चस्व झुगारून द्यावयाचे असेल तर त्याकरिता परस्पर विचारविनिमय व सुधारणा आवश्यक आहे. परंतु तशा सुधारणा आणण्यात अधिक विलंब लागला तर जगाला आता ते सहन होईल असे मला वाटत नाही. खुद्द अमेरिकेतही अत्युत्तम मनोधारणेची काही बुद्धिवान मंडळी बोल्शेविझमबद्दल सहानुभूती बाळगून आहेत, कारण प्रत्येक व्यक्तीला जीवनात ज्या ज्या गोष्टी मिळाल्या पाहिजेत असे त्यांना वाटते, त्या बोल्शेविक राजवटीत मिळू शकतील अशी त्यांना खात्री आहे.'

परंतु विल्सनच्या त्या आवाहनाचा शांतता परिषदेला उपस्थित असलेल्या दोस्त मुत्सद्यांवर लवमात्रही परिणाम झाला नाही. काहीही करून जैसे थे परिस्थिती टिकवून धरण्याचा पक्का निर्धार केलेल्या लोकांनी विल्सन घेरला गेला होता. त्या मंडळींनी आपआपसात साम्राज्यवादी व व्यापारी स्वरूपाचे करारमदार केलेले होते. त्यामुळे पावलोपावली सतत कारस्थाने करून त्यांनी सोविएत रशियाला न्याय मिळावा याकरिता विल्सनने केलेले सर्व प्रयत्न हाणून पाडले. अनेक प्रसंगी तर तणाव इतका वाढला की

लष्करवादी व राजकारणी नेत्यांना बाजूला सारून मूळ मुद्दे सरळ जनतेसमोर मांडावे असे विल्सन याला वाटू लागले.

रोम येथील सुप्रसिद्ध भव्य चौकावरील पॅलेसो-वेनेशियाच्या गॅलरीतून (याच ठिकाणाहून दोनच वर्षानंतर बेनिटो मुसोलिनीने त्याच्या 'ब्लॅक शर्टस्' समोर झंझावती भाषण ठोकले) विल्सनने रोमच्या जनतेसमोर भाषण करावे असे ठरले होते. परंतु विल्सनच्या शब्दांचा रोमच्या जनतेवर होणाऱ्या परिणामाची धास्ती वाटून इटालियन राजसत्तावाद्यांनी त्या चौकाकडे निघालेला श्रोत्यांचा व कामगारांचा मोर्चा, तो बोल्शेविकांनी आयोजित केला होता असा आरोप करून, उधळून लावला व लोकांना चौकापर्यंत पोहचूच दिले नाही. पॅरिसमध्येही असेच घडले. संपूर्ण सकाळचा वेळ ठरल्याप्रमाणे पॅरिसच्या कामगारांपुढे भाषण करण्यात जाणार अशा तयारीत विल्सन आपल्या हॉटेलच्या खिडकीत वाट पाहात बसून होता. परंतु कामगारांना हॉटेलपर्यंत जाताच येऊ नये अशी व्यवस्था करण्यात आली. याकरिता फ्रेंच पोलीस व सैनिक यांना पाचारण करण्यात आले होते. विल्सनला मात्र त्याची कल्पनाही नव्हती.

विल्सन युरोपात जेथे जेथे गेला तेथे तेथे गुप्तहेर व प्रचारक सतत त्याच्या अवतीभोवती होते. त्याच्या पाठीमागे त्यांची सतत कटकारस्थाने सुरू होती. आपापल्या उद्दिष्ट सिद्धीच्या हेतूने, आवश्यक ती माहिती मिळवून घेऊन तिचा शांतता परिषदेत उपयोग करून घ्यावा याकरिता प्रत्येक दोस्त राष्ट्राने आपले हेरखाते कार्यप्रवण केले होते. पॅरिसमधील ४ प्लेस. डी. ला. कॉनकॉर्डे येथे तर अमेरिकन लष्करी हेरखात्याने एक 'गुप्त सांकेतिक भाषा कक्ष' प्रस्थापित केले होते. तेथे अत्युत्तम प्रशिक्षण दिलेले अधिकारी व काटेकोर चाचणीनंतर निवडलेले लीपिक रात्रंदिवस इतर राष्ट्रांकडून मिळविलेल्या बातम्यांची व सांकेतिक भाषेतील संदेशांची उकल करण्यात गुंतलेले होते. या सांकेतिक भाषाकक्षाचा नियंत्रक होता मेजर हर्बर्ट ओ. यार्डले. युरोपातील अमेरिकन एजंटाकडून सत्यपरिस्थिती विशद करणारे प्रत्यक्षदर्शी अहवाल अध्यक्ष विल्सनपासून कसे लपवून ठेवले जात होते व त्याच्या कानीकपाळी सतत विकृत स्वरूपाचा चमत्कारिक बोल्शेविकविरोधी प्रचार कसा ऐकविला जात होता याचे वर्णन यार्डलेच्या 'द अमेरिकन ब्लॅक चेंबर' या पुस्तकात सापडते.

अनेकदा, विल्सनच्या धोरणाला सुरुंग लावण्याची कटकारस्थाने विदित करणाऱ्या संदेशांची उकल खुद्द यार्डलेने केली. एकदा तर त्याच्या हाती पडलेल्या गुप्त संदेशाचे स्वरूप विशेषच धक्कादायक होते. तत्संबंधात यार्डले लिहितो—

'अध्यक्ष विल्सन यांना लहान लहान मात्रेत विषप्रयोग करून, किंवा त्यांना बर्फातून इन्फ्लुएंझाचे जंतू देऊन ठार मारण्याच्या दोस्तांनी केलेल्या कटासंबंधीची तार जेव्हा माझ्या हातात पडली तेव्हा मला किती विलक्षण धक्का बसला असेल याची कल्पना केलेली बरी. आमचा एक अत्यंत विश्वासू बातमीदार, परमेश्वराची शपथ देऊन, अध्यक्षांना त्यांच्याविरुद्ध शिजणाऱ्या घातक कारस्थानांविरुद्ध सावध करण्याविषयी अधिकाऱ्यांना विनवीत होता. या कारस्थानात कितपत तथ्य होते व ते यशस्वी झाले की नाही हे कळायला काही मार्ग नाही. पण एक वस्तुस्थिती मात्र दृष्टीआड करता येत नाही. ती अशी की पॅरिसच्या

त्यांच्या मुक्कामात अध्यक्ष विल्सन यांच्या आजाराची पहिली लक्षणे दिसू लागली व त्यानंतर हळूहळू तो आजार बळावत जाऊन व त्यातच ते शेवटी कालवश झाले.'

**शांतता परिषद**

पॅरिस शांतता परिषदेच्या प्रारंभिक बैठकीत, रशियनांना योग्य तो न्याय मिळवून देण्याच्या विल्सनच्या प्रयत्नांना पाठिंबा देणारा एक साथीदार त्याला अनपेक्षितपणे मिळाला—तो म्हणजे इंग्लंडचा प्रधानमंत्री डेव्हिड लॉईड जॉर्ज! जनरल फॉक व फ्रेंच प्रधानमंत्री क्लेमेंसो यांच्या सोविएत—विरोधी योजनांवर त्याने जबरदस्त हल्ले चढविले. त्यावेळी सोविएत—विरोधी नीतीची अंमलबजावणी करणे व्यवहार्य व शहाणपणाचे ठरणार नाही हे पटवून सांगताना लॉईड जॉर्ज म्हणाला, 'ज्यावेळी पश्चिम आघाडीवरील त्यांच्या हल्ल्यांना बळकटी आणण्याकरिता जर्मनीला एक एक सैनिक मोलाचा वाटत होता त्यावेळी पूर्व आघाडीवर त्यांच्या ताब्यात असलेले दोन तीनच रशियन प्रांत टिकवून धरण्याकरिता १० लक्ष सैनिकांची शिबंदी जर्मनीला तेथे ठेवावी लागली होती. ते दोन तीन प्रांत म्हणजे रशियाची केवळ एक लहानशी सीमापट्टी होती. शिवाय बोल्शेविझम त्यावेळी दुबळा व असंघटित होता. आता बाल्शेविझम शक्तिशाली झाला आहे. त्यांचे मोठे लष्कर उभारले गेले आहे. अशा परिस्थितीत दोस्तांपैकी एका तरी पश्चिमी राष्ट्राची रशियात दहा लक्ष सैनिक पाठविण्याची तयारी आहे काय? आज जर मी एक हजार जास्तीचे सैनिक रशियात पाठवितो म्हटले तर आमचे लष्कर एखादे वेळी बंड करून उठेल अशी स्थिती आहे. अशीच परिस्थिती सैबेरियातील अमेरिकन, कॅनेडियन व फ्रेंच फौजांची आहे. लष्करी बळावर बोल्शेविझमचा निःपात आपण करू पाहणे म्हणजे शुद्ध मूर्खपणा आहे. आणि समजा तसा निःपात आपण करू शकलोही, तरी शेवटी एक महत्त्वाचा प्रश्न उरतोच. तो असा की त्यानंतर रशिया कोण व्यापणार?'

विल्सनप्रमाणे लॉईड जॉर्जचा युक्तिवाद व विरोध सैद्धांतिक भूमिकेवर नव्हे तर व्यावहारिक भूमिकेवर आधारलेला होता. युरोपात व आशियात क्रांती तर होणार नाही ना अशी त्यालाही धास्ती वाटत होती. पण रशियात आणखी हस्तक्षेप करण्याची कल्पनाही ब्रिटिश जनतेला मुळीच रुचत नव्हती आणि ब्रिटिश जनतेची ती नाडी राजकारणात मुरलेल्या त्या धूर्त वेल्श कोल्ह्याने—लॉईड जॉर्जने बरोबर ओळखली होती. मार्शल फॉकच्या योजनेला लॉईड जॉर्जने विरोध करावा याला आणखीही एक अधिक सबळ कारण होते. ग्रेट ब्रिटनचा एक उच्च पदस्थ ब्रिटिश लष्करी अधिकारी हेन्री विल्सन याने युद्धखात्याला पाठविलेल्या आपल्या एका गुप्त अहवालात युरोप व रशिया येथून ब्रिटिश सैन्य माघारी बोलावून घेण्याच्या आवश्यकतेवर भर दिला होता; कारण इंग्लंड, आयर्लंड, इजिप्त, भारत या क्षेत्रात भविष्यात गडबड किंवा उठाव होण्याची धास्ती असल्याने तेथे सैन्य पाठवावे लागेल असे त्याचे मत होते. तसे झाले व इंग्लंड इतरत्र गुंतून पडले, तर तेवढी संधी साधून फॉक व क्लेमेंसो रशियावर प्रभुत्व प्रस्थापित करतील अशी धास्ती लॉईड जॉर्जला वाटत होती.

या कारणामुळे बोल्शेविकांना योग्य न्याय देण्याची विल्सन याची मागणी लॉईड जॉर्जने उचलून धरली. शिवाय रशियाबाबत कोणतीही कार्यवाही न करताही अखेर त्या राष्ट्रासंबंधींचे इंग्लंडचे उद्दिष्ट साध्य

अनुक्रमणिका

करून घेता येईल असा त्याचा विश्वास होता. त्यामुळे पॅरिस शांतता परिषदेच्या गुप्त बैठकीत या विषयावर बोलताना त्याने ठासून सांगतले की—

“फ्रान्समध्ये आलेल्या राज्यक्रांतीचे ज्या कारणाकरिता तेथील शेतकऱ्यांनी स्वागत केले त्याच कारणाकरिता बोल्शेविझमला स्वीकृती रशियन शेतकऱ्यांनी दिली आहे. ते कारण म्हणजे त्या क्रांतीने त्यांना जमीन दिली आहे. बोल्शेविक्स आज खऱ्या अर्थाने तेथील राज्यकर्ते बनले आहेत. झारशाही अंतर्बाह्य पूर्णपणे कुजलेली व पोखरलेली आहे हे कळत असूनही आपण पूर्वी त्या सरकारला पाठिंबा दिला. कारण एकच की रशियाचे शासन झारच्या हाती होते. पण आज बोल्शेविकांच्या हाती रशियाचे शासन असूनही त्यांना मान्यता देण्याची मात्र आपली तयारी नाही. त्या विशाल देशाच्या शासनाचे प्रतिनिधी आपण निवडू असा अट्टाहास धरणे म्हणजे ज्या तत्त्वांकरिता आपण आतापर्यंत लढलो त्या तत्त्वांना पूर्णपणे हरताळ फासणे होय.”

लॉईड जॉर्ज याने केलेला तो युक्तिवाद अगदी बिनतोड असून त्याविरुद्ध कोणी अवाक्षरही बोलू शकेल हे अशक्यच आहे असे विल्सन याला वाटले; व रशियात शांतता प्रस्थापित करण्याच्या हेतूने वाटाघाटी करण्याकरिता प्रिन्किपो बेटावर किंवा अन्य कोणत्याही सोयिस्कर ठिकाणी एक विशेष परिषद बोलविण्याची त्यांनी सूचना केली. वाटाघाटी निःपक्षपाती व्हाव्या याकरिता सोविएत सरकार व श्वेत सोविएत—विरोधी गट या दोहोंच्याही प्रतिनिधींना त्या परिषदेला उपस्थित राहण्यास आमंत्रित करण्यात यावे असा त्याचा आग्रह होता.

परंतु युद्धपूर्व काळात झार सरकारला मोठमोठी कर्जे दिलेल्या फ्रेंच बँकर्सना व फ्रेंच लष्करी अधिकाऱ्यांना रशियात लष्करी हस्तक्षेप करणे अत्यावश्यक आहे असे वाटत होते. त्या हस्तक्षेपवाद्यांतर्फे फ्रेंच ‘टायगर’ क्लेमेंसो हा लॉईड जॉर्ज व विल्सन यांच्या युक्तिवादाला उत्तर देण्यास पुढे सरसावला. ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या वर्तुळात लॉईड जॉर्जच्या कूटनीतीला पाठिंबाच मिळेल हेही क्लेमेंसो ओळखून होता आणि त्या वर्तुळातील लष्करवादी व गुप्तहेरखाते यांची सोविएतविरोधी युद्धाशी बांधिलकी आहे हेही त्याला चांगले ठाऊक होते. परंतु विल्सनने केलेल्या सूचनेला उत्तर म्हणून बोल्शेविझममुळे युरोपपुढे ठाकलेल्या धोक्यावर भर देऊन लॉईड जॉर्जचा युक्तिवाद खोडून काढणे अगत्याचे आहे असे त्याला वाटत होते.

“तत्त्वतः बोल्शेविकांशी वाटाघाटी करण्याच्या मी विरोधात आहे ते बोल्शेविक कोणी गुन्हेगार आहेत म्हणून नव्हे तर त्यांच्याशी वाटाघाटी करण्याने त्यांना आपण आपल्या पातळीवर आणून बसविल्यासारखे होईल म्हणून.” क्लेमेंसो आपली भूमिका स्पष्ट करून सांगत होता. “ब्रिटनचा प्रधानमंत्री व अमेरिकेचा अध्यक्ष हे बोल्शेविझमच्या प्रश्नाबाबत निष्कारण सैद्धांतिक भूमिका घेत आहेत; सध्या बोल्शेविझमच्या धोक्याचे स्वरूप फार गंभीर बनलेले आहे; त्याचा झपाट्याने प्रसार होत असून बाल्टिक प्रांत व पोलंड बोल्शेविझमच्या तत्त्वज्ञानाने ग्रासले गेले आहेत. बुडापेस्ट व व्हिएन्नालाही त्याची लागण झाली असल्याची बातमी आजच सकाळी आमच्या हाती आली आहे; इटलीलाही तो धोका जाणवत आहे; जर्मनीतून बोल्शेविझमचे लोण इटलीपर्यंत पोहोचले तर त्यामुळे संपूर्ण युरोपला फार मोठा धोका निर्माण

होणार आहे; तेव्हा त्याविरुद्ध काहीतरी परिणामकारक कार्यवाही करणे अत्यंत निकडीचे झाले आहे," असे क्लेमेंसोने आग्रहपूर्वक स्पष्ट केले.

स्वतःच्या वक्तृत्वावर व तर्कवादावरच केवळ क्लेमेंसो विसावून राहिला नाही तर बोल्शेविझमविरुद्ध साक्ष देण्यास 'तज्ज्ञ सल्लागार' त्याने परिषदेपुढे उभे केले. त्याचा पहिला साक्षिदार होता तो राजदूत नौलेन्स! कट्टर सोविएतविरोधी अमेरिकन राजदूत फ्रान्सिस याचा तो जुना मित्र होता. विल्सन व लॉईड जॉर्ज यांच्याशी त्याची ओळख करून देण्यात आली.

"फक्त वस्तुस्थिती काय तेवढेच मी सांगणार आहे" अशी सुरुवात करून नौलेन्स 'बोल्शेविक अत्याचारां'च्या कथा रंगवून सांगू लागला—

'पुरुषांच्या बरोबरीनेच स्त्रियांनाही सरसकट गोळ्या रशियात बोल्शेविकांनी घातल्या. लोकांना पाण्यात बुडवून मारणे, त्यांचे नाक जीभ कापणे, हातपाय तोडणे, जिवंत पुरणे, लुटालूट व बलात्कार करणे असे अत्याचार त्यांनी सर्वत्र केले.' रशियातील सोविएतविरोधी परकीय मुत्सद्दी व रशिया सोडून पळालेली झारसमर्थक सरदार दरकदार मंडळी सोविएत द्वेषापोटी जे तोंडास येईल ते तळतळून बोलत होती, त्या सगळ्याचा पुनरुच्चार नौलेन्स करीत होता. 'पीटर व पॉल किल्ल्यात धंदेवाईक छळकांची एक तुकडीच्या तुकडी पोसली जात आहे... सोविएत लष्कर म्हणजे केवळ एक बेशिस्त जमाव आहे...

'ब्रिटिश नौदल अधिकारी कॅप्टन क्रोमीचे उदाहरण उल्लेखनीय आहे,' नौलेन्स बोलत होता, 'ब्रिटिश दूतावासाचे रक्षण करता तो ठार झाला. दूतावासाच्या खिडकीत त्याचा मृतदेह तीन दिवसपर्यंत मुद्दाम उघड्यावर पडून राहू देण्यात आला. दहशत, सामूहिक कत्तली, भ्रष्टाचार, दोस्त राष्ट्रांबद्दल आत्यंतिक तिरस्कार ही सोविएत राजवटीची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत...'

'शेवटी महत्त्वाची एक गोष्ट मला सांगायची आहे,' नौलेन्स तळतळून बोलत होता, 'ती म्हणजे बोल्शेविक सरकार हे निश्चितपणे साम्राज्यवादी आहे. सर्व जग काबीज करण्याची त्यांची आकांक्षा आहे. कोणत्याही राष्ट्राशी शांतता करार करणे त्यांना मुळीच नको आहे.'

नौलेस्नने इतका जिवाचा आटापिटा करूनही त्याच्या त्या कथनाचा अमेरिकेच्या अध्यक्षावर काही परिणाम झाला नाही. कारण थोडेच दिवस अगोदर त्याचा खास अमेरिकन प्रतिनिधी डब्लू. एच्. बुकलर याने विल्सनच्या आदेशानुसार मॅक्झिम लिट्विनोव या उच्चपदस्थ सोविएत सरकारी अधिकाऱ्याशी खाजगी बातचीत केली होती. १८ जानेवारी १९१९ रोजी तत्संबंधी अध्यक्ष विल्सनला सादर केलेल्या अहवालात बुकलरने कळविले होते—

"कायम शांतता प्रस्थापित व्हावी याची सोविएत सरकारला आत्यंतिक निकड जाणवत असल्याचे लिट्विनोव याने स्पष्ट केले,... चार वर्षांच्या अगदी जिकरीला आणणाऱ्या व त्यांच्या राष्ट्राला पूर्णपणे दुर्बल

करून सोडणाऱ्या त्या युद्धानंतर रशियावर पुन्हा शस्त्रसज्जता व खर्चिक युद्धे लादली जात आहेत याबद्दल सोविएतांना आत्यंतिक चीड आहे. अमेरिका व दोस्त राष्ट्रे यांना खरोखरच शांतता हवी आहे का हेच जाणून घेण्याची त्यांना इच्छा आहे.

'दोस्त राष्ट्रांना खरोखरच शांतता हवी असेल तर शांतता वाटाघाटी सहजपणे फलद्रूप होऊ शकतील. कारण लिट्विनोव याने निःसंदिग्धपणे स्पष्ट केले की रशियातील परकीय उद्योगधंद्यांना संरक्षण देणे, रशियाच्या परदेशी कर्जाबाबत फेरविचार करणे, या सर्व मुद्यांवर तडजोड करण्याची सोविएत सरकारची तयारी आहे. सोविएत सरकारची नीती सामोपचाराची आहे याबद्दल शंकाच नाही…

'तसेच, प्रतिक्रियावादाला उत्तेजन न देता राष्ट्रसंघ युद्धास प्रतिबंध करू शकत असेल तर राष्ट्रसंघाच्या त्या योजनेस सोविएत सरकार निश्चितपणे पाठिंबा देईल.'

याबरोबरच बुकलरने हेही स्पष्ट केली की 'बोल्शेविकांपैकीच काही मंडळींचा सोविएत सरकारच्या शांतता नीतीला प्रखर विरोध आहे. दोस्त राष्ट्रांनी सोविएत रशियात अधिकाधिक लष्करी हस्तक्षेप करावा हेच त्या विरोधकांना हवे आहे,' तत्संबंधी इषारा देत बुकलर म्हणाला की, 'रशियात लष्करी हस्तक्षेप करणे म्हणजे त्या अतिरेक्यांच्या हातात दोस्तांविरुद्ध व शांततेविरुद्ध एक कोलीत दिल्यासारखेच होईल.'

क्लेमेंसो व फॉक यांचा विरोध असला तरीही, लॉईड जॉर्जच्या पाठिंब्याच्या बळावर वुड्रो विल्सन याची शांततेसंबंधीची योजना तडीला जाणार अशी लक्षणे दिसू लागली. शांतता योजनेच्या अटींची रूपरेषा स्पष्ट करणारा एक कच्चा मसूदा विल्सनने सोविएत सरकारकडे व निरनिराळ्या श्वेत रशियन गटाकडे विचारार्थ पाठवून दिला. सोविएत सरकारने विल्सनच्या प्रस्तावाला मान्यता दिली व प्रिन्किपोला शिष्टमंडळ पाठविण्याची तयारीही केली. पण विन्स्टन चर्चिल नंतर म्हणाला त्याप्रमाणे, रशियात शांतता प्रस्थापनेकरिता योग्य ती वेळ तोपर्यंत आली नव्हती असेच मत त्यावेळी दोस्त नेत्यांचे होते. सोविएत सरकार लवकरच उलथून पाडले जाईल अशीच खात्री बहुसंख्य दोस्त नेत्यांना वाटत होती. त्यामुळे सोविएत नेत्यांशी सध्या वाटाघाटी करू नयेत असा सल्ला दोस्तांनी श्वेत रशियनांना दिला. त्यानुसार श्वेत रशियन गटांनी प्रिन्किपो येथे रशियन शिष्टमंडळाला भेटण्यास साफ नकार दिला.

या सर्व प्रकारामुळे लवकरच शांतता परिषदेचे वातावरण बदलले. शांततेसंबंधीच्या चर्चेतून त्याला अपेक्षित ते निष्पन्न होत नाही असे दिसताच लॉईड जॉर्ज तडकाफडकी लंडनला निघून गेला. त्याच्या ऐवजी तरुण ब्रिटिश युद्धमंत्री विन्स्टन चर्चिल, बोल्शेविक–विरोधी अतिरेक्यांची बाजू शांतता परिषदेपुढे मांडण्याकरिता घाईघाईने पॅरिस येथे आला. [त्याकाळी व त्यानंतरही अनेक वर्षे, ब्रिटिश टोरींच्या सोविएत विरोधीनीतीचा विन्स्टन चर्चिल हा एक आघाडीचा प्रवक्ता होता. ब्रिटिश साम्राज्याच्या पूर्वीय क्षेत्रात रशियन क्रांतिकारी कल्पनांचा प्रसार होईल की काय अशी जबरदस्त धास्ती त्याला वाटत होती.

रेने क्राऊस हा आपल्या विन्स्टन चर्चिलच्या चरित्रात म्हणतो, "पॅरिसमधील बड्या पाच दोस्त नेत्यांनी रशियन प्रतिक्रांतिकारकांना पाठिंबा देण्याचे पक्के ठरविले होते. तत्संबंधी एक कार्यवाही तडीला नेण्याची जबाबदारी विन्स्टन चर्चिलकडे सोपविण्यात आली होती. त्यामुळे त्या

कार्यवाहीबद्दल तो प्रत्यक्षपणे जबाबदार नसला तरी ती कार्यवाही यशस्वी करण्याकरिता सर्व शक्तिनिशी त्याने प्रयत्न केले हे नाकारता येत नाही. सर हेन्री विल्सन या उच्च पदस्थ लष्करी अधिकाऱ्याच्या मदतीने निरनिराळ्या श्वेत रशियन फौजांना ब्रिटिश युद्धखात्याच्या शस्त्रागारातून शस्त्रे, तसेच तज्ज्ञ लष्करी अधिकारी व प्रशिक्षक पुरविण्याची योजना त्याने यशस्वीपणे पार पाडली. जर्मनीत अडॉल्फ हिटलर सत्तारूढ झाल्यानंतर मात्र युरोपातीलच नव्हे तर संपूर्ण जगातील राष्ट्रांच्या हितसंबंधाना खरा धोका 'नाझीझम' कडून आहे हे चर्चिलने ओळखले. त्यामुळे अनमान न करता दुसऱ्या महायुद्धापूर्वी चर्चिलने सोविएत रशियाबाबतची आपली भूमिका बदलली आणि नाझी आक्रमणाविरुद्ध ग्रेट ब्रिटन, फ्रान्स व रशिया यात युती घडून आली पाहिजे असे आवाहन तो करू लागला. १९४१ मध्ये नाझी जर्मनीने सोविएत रशियावर हल्ला केला तेव्हा रशियाचा तो लढा हा सर्व मुक्त जनतेचा लढा असून त्या लढ्याला ब्रिटनचा सर्वतोपरी पाठिंबा मिळेल असे संपूर्ण जगाला उद्देशून सर्वप्रथम चर्चिलने ठासून सांगितले. मात्र दुसरे महायुद्ध संपते न संपते तोच चर्चिलने पुन्हा बोल्शेविझमच्या धोक्याचे तुणतुणे सुरू केले.]

अमेरिकेतही जागतिक सहकार्य व सुरक्षितता याकरिता नवी व्यवस्था निर्माण करण्याच्या प्रत्येक योजनेला सुरुंग लावण्याचा कॉँग्रेसमधील सिनेटर लॉजच्या नेतृत्वाखालील अलिप्ततावादी गट कसोशीने प्रयत्न करित होता. त्या अलिप्ततावादी गटाच्या विरोधाला तोंड देण्याकरिता विल्सन मायदेशी परत जाण्यास निघाला त्याच्या आदल्याच दिवशी, १४ फेब्रुवारी १९१९ रोजी ए.जे. बॅलफोर या ब्रिटिश परराष्ट्र सचिवाने चर्चिलची विल्सनशी ओळख करून दिली. युरोपीय राजकारणात तो अपयशी ठरल्याची जाणीव विल्सनला तोपर्यंत स्पष्टपणे होऊन चुकली होती. आता अमेरिकेतही त्याच्या पदरी अपयशच येणार की काय या धास्तीने तो अत्यंत अस्वस्थ झाला होता. पूर्ण भ्रमनिरास झालेला विल्सन अगदी थकून गेला होता. निराशेने त्याचे मन ग्रासले होते. अशा वेळी ब्रिटिश मंत्रिमंडळाची रशियाबद्दलची भूमिका विल्सनला विशद करून सांगण्याकरिता ब्रिटनचा युद्धमंत्री चर्चिल पॅरिसला आला होता. विल्सनच्या प्रिन्किपो योजनेवर चर्चिलने सरळसरळ हल्ला चढविला.

"लंडनमध्ये कालच मंत्रिमंडळाची बैठक झाली," चर्चिल विल्सनला सांगत होता, 'त्यावेळी रशियातील परिस्थितीबद्दल विशेषतः प्रिन्किपो बैठकीबद्दल सर्वांनाच फार चिंता वाटत असल्याचे दिसून आले. बोल्शेविक्स् त्या परिषदेला उपस्थित राहिले तर त्यातून काही निष्पन्न होणार नाही असेच सर्वांना वाटत होते. शिवाय त्या प्रश्नाच्या लष्करी बाजूचाही विचार होणे आवश्यक आहे. ग्रेट ब्रिटनचे बरेच सैनिक सध्या रशियात आहेत व तेथील लष्करी कार्यवाहीत ते मारले जात आहेत हे विसरून चालणार नाही.'

चर्चिलच्या या वक्तव्यावर विल्सनने उत्तर दिले, "उद्या मी परत जात असल्याचे माहीत असून चर्चिल ज्या अर्थी मुद्दाम येथे आले आहेत त्या अर्थी या विषयावर माझे स्वतःचे खाजगी विचार स्पष्ट करून सांगणे अत्यावश्यक आहे असे मला वाटते. रशियाबाबत अनेक गोष्टींबद्दल अनिश्चिती असली तरी दोन मुद्यांबाबत माझी मते अगदी स्पष्ट आहेत. पहिली गोष्ट अशी की दोस्त राष्ट्रे व सहवर्ती सत्ता यांच्या फौजा रशियात काही स्पृहणीय असे साध्य करीत आहेत असे मला वाटत नाही. कोणाकरिता व कशाकरिता आपण लढत आहोत हेच त्या सैनिकांना आज कळत नाही अशी परिस्थिती आहे. रशियात सुव्यवस्था लावण्याच्या प्रयत्नांना ते हातभार लावीत आहेत असेही नाही. उलट कोसॅक चळवळीसारख्या काही स्थानिक चळवळींना मदत करून ते तेथील गोंधळ व अराजक वाढवीत मात्र आहेत. त्यामुळे, रशियाच्या सर्व क्षेत्रातून दोस्त व सहवर्ती सत्तांनी रशियातील त्यांच्या फौजा माघारी बोलवाव्यात असे माझे निश्चित मत आहे...

अनुक्रमणिका

‘दुसरा मुद्दा असा—’, थकलेला विल्सन बोलत होता, ‘की प्रिन्किपो येथे बोल्शेविकांशी तडजोड करण्याचा आपला उद्देश नसून त्या बैठकीद्वारा आपल्याला फक्त त्यांच्याबद्दल खरी व स्पष्ट माहिती हवी आहे. सरकारी व निरनिराळ्या खाजगी सूत्रांकडून येणाऱ्या बातम्या इतक्या परस्परांविरोधी आहेत की त्या गोंधळातून त्या देशाच्या सत्य परिस्थितीचे आकलन होणे अशक्यच आहे. खुद्द रशियन प्रतिनिधींकडूनच खरे काय ते कळू शकेल असे मला वाटते.

अमेरिकेच्या अध्यक्षाचे ते बोलणे संपताच त्यावर उत्तर देत चर्चिल म्हणाला, “रशियातून सर्व दोस्त फौजा माघारी बोलविण्याचे धोरण तर्कसंगत वाटले तरी त्याची परिणती मात्र अशी होईल की रशियात बोल्शेविकांव्यतिरिक्त इतर सर्व दोस्त फौजांचा विनाश होईल. त्या फौजांची संख्या तेथे सध्या सुमारे पाच लक्ष आहे त्यांचा दर्जा फारसा चांगला नाही हे; खरे पण त्यांची संख्या मात्र आजही वाढतच आहे. विल्सन प्रतिपादित असलेल्या नीतीचा अवलंब केला तर एका मोठ्या यंत्राची खीळच काढून टाकल्यासारखे होईल. रशियात बोल्शेविकांना सशस्त्र प्रतिकारच उरणार नाही. तेथे केवळ हिंसाचार, अत्याचार व हालअपेष्टा यांचे साम्राज्य पसरेल.”

“पण पुष्कळदा त्या फौजा व साधनसामुग्री यांची मदत तेथील प्रतिक्रियावाद्यांनाच होत आहे,” विल्सनने आक्षेप घेतला, “तेव्हा अशा वेळी कोणी दोस्तांना विचारले की रशियात ते कोणाला पाठिंबा देत आहेत तर आम्हाला माहीत नाही असे सांगून ते सर्व जबाबदारी झटकून मोकळे होणार काय?”

विल्सनचे सर्व बोलणे शांतपणे ऐकून घेऊन शेवटी चर्चिलने विचारले, “मला एकच गोष्ट कळून घ्यायची आहे; ती म्हणजे प्रिन्सिपो परिषद जर अपयशी ठरली तर रशियातील बोल्शेविक-विरोधी फौजांना शस्त्रसज्ज करण्याची परिषदेची तयारी असेल काय?”

या सर्व चर्चेवरून आपलेच ते खरे करण्याचा निश्चय केलेल्या मंडळींच्या घोळक्यात आपण अगदी एकाकी पडलो आहोत हे आजाराने व निराशेने त्रस्त झालेल्या विल्सनला पुरेपूर कळून चुकले.

‘काय करावयाचे ते ठरविणे माझ्या एकट्याच्या हाती असते तर मी काय केले असते हे मी परिषदेला सांगितलेच आहे’ हताश झालेला विल्सन म्हणाला, ‘आता युरोपातील दोस्त मुत्सद्दी काय जे करतील ते खरे!”

अध्यक्ष विल्सन अमेरिकेत परत गेला तेव्हा त्याला तेथील प्रतिक्रियावाद्यांना तोंड द्यावे लागले. तो त्याच्या जीवनातील अखेरचा व शोकान्त लढा ठरावयाचा होता. [रशियाला योग्य न्याय मिळावा याकरिता वुड्रो विल्सनने एक अखेरचा प्रयत्न करून पाहिला. अमेरिकन शांतता शिष्टमंडळाचा एक सदस्य व अमेरिकेच्या परराष्ट्रखात्याचा एक तरुण अधिकारी विलियम सी. बुलिट याला स्वतःहून त्याने मास्कोला पाठविले. तेथे सोविएत नेता लेनिन याची गाठ घेऊन रशियाला खरोखरीच शांतता हवी आहे का हे बुलिटने अजमावयाचे होते. बुलिटच्या बरोबर अमेरिकेतील सुप्रसिद्ध वृत्तपत्रकार लिंकन स्टीफन्स हाही मास्कोला गेला होता. त्याने तेथे जे पाहिले ते त्याने नंतर अगदी मोजक्या शब्दात व्यक्त केले—“भावी काळाचे स्वरूप कसे असेल याची जाणीव मला तेथे झाली, आणि मला खात्री आहे की तशीच आदर्श व्यवस्था तेथे साकार होणार आहे.” बुलिट स्वतः रशियाहून परत आला तेव्हा दोस्तांकरिता व श्वेत रशियनांकरिताही लेनिनने

अनुक्रमणिका

प्रतिपादिलेल्या शांतता कराराच्या अटी तो घेऊन आला होता. शांतता प्रस्थापित करण्याची लेनिनची केवळ तयारीच होती असे नव्हे तर तसे करण्या करिता तो अत्यंत उत्सुक होता. परंतु त्याने तयार केलेली शांतता कराराची योजना दूर भिरकावून दिली गेली. अमेरिकन अध्यक्षानेच त्याला मास्कोला पाठविले होते. परंतु अमेरिकन मुत्सद्यांनीच त्याने साध्य केलेल्या कामगिरीची सर्व जबाबदारी झटकून टाकल्याने बुलिटही चांगलाच पेचात सापडला. तत्संबंधीचे स्पष्ट उल्लेख चर्चिलच्या ‘द वर्ल्ड क्रायसिसः द आफ्टरमाथ’ या ग्रंथात सापडतात. लेनिनने प्रतिपादित केलेल्या अटी धुडकावून का लावल्या गेल्या याचे स्पष्टीकरण सप्टेंबर १९१९ मध्ये ‘परराष्ट्र संबंध-सिनेट कमिटी’ समोर देताना बुलिटने सांगितले की “त्यावेळी कोलचॅकने नुकतीच १०० मैलांची आघाडी मारली होती. ती बातमी कळताच दोनच आठवड्यात कोलचॅक मास्कोला जाऊन पोचणार असा जल्लोष सगळ्या फ्रेंच वृत्तपत्रांनी सुरू केला. त्यामुळे पॅरिसमध्ये सगळ्यांचीच—मला मोठ्या दुःखाने म्हणावे लागते की अमेरिकन शिष्टमंडळाच्या सदस्यांचीही रशियात शांतता प्रस्थापनेबाबतची झालेली मानसिक तयारी पूर्णपणे ओसरली. कोलचॅक लवकरच मास्कोत पोचणार व तेथील सोविएत सरकार तो उलथून पाडणार अशी त्यांची पक्की खात्री होती.”] पॅरिस परिषदेत त्याची जागा परराष्ट्र सचिव लान्सिंग याने घेतली.विल्सन निघून गेल्यानंतर परिषदेच्या चर्चेचा रोखच पार बदलला. आपल्या मनातील शांततेची सुसंगत न ठरणारी उद्दिष्टे लपवून ठेऊन चर्चा चालू ठेवावी याचीही गरज शांतता प्रस्थापित करण्यास एकत्र जमलेल्या त्या दोस्त प्रतिनिधींना वाटेनाशी झाली.

पॅरिस परिषदेला आवाहन करीत क्लेमेंसो अगदी रुक्षपणे म्हणाला की प्रिन्किपो प्रकरण दोस्तांनीच निष्कारण उकरून काढले. ते आता त्यांनीच पूर्णपणे बाजूला सारावे व इतरही सर्व अडचणींवर मात करून परिषदेचे कामकाज त्वरेने पुढे चालवावे.

क्लेमेंसोच्या म्हणण्याला दुजोरा देत ब्रिटिश परराष्ट्र सचिव बॅलफोर म्हणाला की लोकमताच्या दृष्टीनेच केवळ आवश्यक आहे म्हणून नव्हे तर, बोल्शेविझम म्हणजे (थोडी वाट चुकलेली असली तरी) मूलतः एक लोकशाहीच आहे असे वाटणाऱ्यांच्या दृष्टीनेही बोल्शेविझमचे दोष व धोके स्पष्ट करून सांगणे अत्यावश्यक झाले आहे.”

यानंतर, सोविएत सरकारविरुद्ध श्वेत रशियन फौजांना कोणकोणत्या प्रकारे भरीव मदत करता येईल या प्रश्नाची सांगोपांग चर्चा शांतता परिषदेत सुरू झाली.

रशियन प्रश्न हाताळण्याकरिता राजकीय, आर्थिक व लष्करी विभाग असलेले एक सर्वोच्च दोस्त मंडळ तातडीने प्रस्थापित करण्यात यावे अशी सूचना शांतता परिषदेत लॉईड जॉर्जची जागा घेतलेल्या चर्चिलने केली. त्यातील लष्करी विभागाने ताबडतोब कामाचा श्रीगणेशा करून सशस्त्र हस्तक्षेपाची योजना तपशीलासह तयार करावयाची होती.

### गोलोविनची कामगिरी

दोस्तांच्या सोविएतविरोधी फौजांचे नेतृत्व अनधिकृतपणे का होईना चर्चिलकडे येताच लंडन हे सोविएतविरोधी कार्यवाहीचे केंद्रबिंदू बनले. त्या वर्षीच्या वसंतात व ग्रीष्मात व्हाईट हॉलच्या ब्रिटिश सरकारी कार्यालयात खास श्वेत रशियन दूतांची गर्दी होऊ लागली. ॲडमिरल कोलचॅक जनरल डेनिकिन व अन्य श्वेत नेत्यांचे ते प्रतिनिधी सोविएतांविरुद्ध सर्व शक्तीनिशी करावयाच्या युद्धाची अखेरची तयारी करण्यासाठी म्हणून येत होते. त्यांच्या अतिगुप्त वाटाघाटी प्रामुख्याने विन्स्टन चर्चिल व सर सॅम्युअल होअर

अनुक्रमणिका

यांच्याशी चालत. ब्रिटनच्या शस्त्रागारांतून व कोठारांतून जास्तीची शस्त्रास्त्रे व युद्धसामुग्री श्वेत रशियनांना पुरविण्याची जबाबदारी युद्धमंत्री म्हणून चर्चिलने उचलली होती, तर गुंतागुंतीची राजनैतीक कारस्थाने तडीला नेण्याचे काम सर सॅम्युअल होअर करीत होता.

या श्वेत रशियन प्रतिनिधीत, स्वतःला लोकशाहीवादी रशियन म्हणवून घेणारा सुप्रसिद्ध सोशल रिव्होल्यूशनरी दहशतवादी बोरिस साविन्कोव, झारकालीन राजकुमार लवोव, परराष्ट्रमंत्री सर्जी साझोनोव अशी मंडळी होती. साझोनोव हा कोलचॅक व डेनिकिन या दोघांचाही प्रतिनीधी म्हणून पॅरिस येथे वावरत होता. २७ मे १९१९ रोजी त्याच्या हालचालींच्या संदर्भात खालीलप्रमाणे बातमी लंडन टाईम्स मध्ये प्रसिद्ध झाली होती—

“काल रात्री साझोनोवने कॉमन्स सभागृहातील बऱ्याच संसद सदस्यांच्या भेटी घेतल्या. अध्यक्षपद सर सॅम्युअल होअरकडे होते. लवकरच बोल्शविक राजवट उलथून पडण्याची शक्यता आहे असा विश्वास व्यक्त करीत साझोनोव म्हणाला की ॲडमिरल कोलचॅकच्या सरकारला मान्यता मिळाल्यास सोविएत सरकारचे पतन अधिक लवकर होऊ शकेल. ग्रेट ब्रिटनकडून रशियनांना होत असलेला साधनसामुग्रीचा पुरवठा व रशियन निर्वासितांना वाचविण्यात ब्रिटिश नौदलाकडून होत असलेली मोलाची मदत याबद्दल त्याने रशियनांतर्फे ब्रिटिश सरकारप्रति कृतज्ञता व्यक्त केली.”

श्वेत रशियन फौजांचा अधिकृत प्रतिनिधी लेफ्टनंट जनरल गोलोविन हा विन्स्टन चर्चिलकरिता एक खास परिचयपत्र घेऊन ब्रिटिश युद्धखात्याकडे आला होता. लंडनला येऊन पोचताच त्याने सर सॅम्युअल होअरशी बोलणे केले. कॉकेशस, व त्या श्रेत्रातील ग्रोस्नी व बाकू येथील तेलाच्या खाणी हे त्या दोघात झालेल्या चर्चेचे मुख्य विषय होते.

५ मे रोजी गोलोविनने ब्रिटिश युद्धखात्याच्या कार्यालयाला पहिली भेट दिली. त्यावेळी सर सॅम्युअल होअर हा त्याच्याबरोबर होता. होअरच्या सल्ल्यानुसार गोलोविनने त्यावेळी त्याचा खास रशियन लष्करी गणवेश परिधान केला होता. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्याचे हार्दिक स्वागत केले व निरनिराळ्या श्वेत रशियन फौजांनी केलेल्या प्रगतीसंबंधी गोलोविनने दिलेली माहिती मोठ्या लक्षपूर्वक ऐकून घेतली.

त्याच दिवशी संध्याकाळी साडेपाच वाजता गोलोविनने चर्चिलची भेट घेतली. सोविएतविरोधी श्वेत फौजांना लष्करी मदत देण्याला ब्रिटिश उदारमतवादी व कामगार विरोध करीत असल्याने चर्चिल त्यांच्यावर चांगलाच उखडला होता. परंतु तशा काही अडचणींची पर्वा न करता उत्तरेच्या मोहिमेकरिता जास्तीचे १०००० ‘स्वयंसेवक’ पाठविता येतील अशी आशा त्याने गोलोविनजवळ व्यक्त केली. सैबेरियातील अमेरिकन व ब्रिटिश फौजांचे मनोधैर्य खचले असल्याने ताज्या दमाची कुमक पाठविणे अगत्याचे झाले असल्याची त्याला पुरेपूर जाणीव असल्याचे व जनरल डेनिकिनला शक्य ती सर्व मदत करण्यास तो उत्सुक असल्याचे चर्चिलने गोलोविनला सांगितले. लष्करी प्रशिक्षक व तंत्रज्ञ म्हणून कमीत कमी २५०० स्वयंसेवक डेनिकिनकडे पाठविण्यात येतील, तसेच निरनिराळ्या सोविएतविरोधी मोहिमांकरिता २ कोटी

४० लक्ष पौंडाचा निधी व युदेनिचच्या नेतृत्वाखालील १ लक्ष सैनिकांना त्यांच्या पेट्रोग्राडवरील हल्ल्याकरिता भरपूर शस्त्रास्त्रे व अन्य युद्धसाहित्य तातडीने पुरविले जाईल, व शिवाय, जर्मनीमध्ये युद्धबंदी म्हणून त्या काळी अडकून पडलेले ५०० झारकालीन अधिकारी ब्रिटनच्या खर्चाने आर्केंजलला पाठविण्याची तयारी केली जाईल अशी अभिवचनेही चर्चिलने गोलोविनला दिली.

"चर्चिलशी माझ्या झालेल्या त्या भेटीतून मला अपेक्षाही नव्हती इतकी भरीव फलनिष्पती झाली. चर्चिलला आपल्याबद्दल केवळ सहानुभूतीच आहे असे नाही तर तो आपला एक अत्यंत उत्साही व क्रियाशील असा मित्र आहे; आपल्याला जास्तीत जास्त मदत करण्याचे आश्वासन त्याने दिले आहे; आता आपल्या इंग्रज मित्रांना आपण आपले शब्द कृतीत उतरवून दाखविले पाहिजेत." असा आपल्या इंग्लंडमधील कामगिरीसंबंधीचा अहवाल रशियाला परतल्यानंतर गोलोविनने आपल्या वरिष्ठांना सादर केला. [मर्मन्स्क येथील श्वेत सरकारच्या गुप्त लेखागारातील लाल लष्कराच्या हाती पडलेला तो अहवाल थोडेच दिवसांनी लंडनच्या 'डेली हेराल्ड' मध्ये प्रसिद्ध केला गेला. त्यावेळी इंग्लंडमधील सोविएत विरोधकांची त्यामुळे मोठीच पंचाईत झाली होती.]

अनुक्रमणिका

प्रकरण ६

# परकीय लष्करी हस्तक्षेप

## पूर्वरंग

१९१९ च्या ग्रीष्मात, अधिकृतपणे युद्धघोषणा न करताच, दोस्त राष्ट्रांच्या फौजांनी रशियावर आक्रमण केले होते. ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, जपान, जर्मनी, इटली, अमेरिका, झेकोस्लोवाकिया, सर्बिया, चीन, फिनलंड, ग्रीस, पोलंड, रुमानिया, टर्की, ही चौदा राष्ट्रे त्या परकीय लष्करी हस्तक्षेपात सामील झाली होती. या सोविएत–विरोधी आक्रमकांच्या खांद्याला खांदा लावून सोविएत सरकारविरुद्ध लढत होत्या रशियातील प्रतिक्रियावादी श्वेत फौजा. [लाल ध्वज क्रांतिकारकांचे अधिकृत चिन्ह असल्याने त्यांना विरोध करणाऱ्या रशियनांकरिता 'श्वेत' ही संज्ञा त्या काळी रूढ झाली. त्यात कोणाकोणाचा अंतर्भाव होत होता हे जॉर्ज स्टेवर्ट याने आपल्या 'द व्हाईट आर्मीज ऑफ रशिया' या ग्रंथात, श्वेतांनी बोल्शेविकांविरुद्ध आरंभिलेली संघर्षाची हकीकत देताना स्पष्ट केले आहे. झार राजवटीवर ज्यांचे समाजातील स्थान, वैभव, पैसा व प्रतिष्ठा अवलंबून होती, खास विशेषाधिकार व सत्ता काही थोड्या भाग्यवंतांनाच प्रदान करणारी विषम समाजव्यवस्था ज्या परोपजीवी लोकांना स्वार्थाकरिता टिकवून धरावयाची होती, त्या सर्वांचा समावेश 'श्वेत' या गटात होत होता. रशियातील प्राचीन राज्य व समाजव्यवस्था टिकविण्याकरिता किंवा पुन:- स्थापित करण्याकरिता लढ्याला सिद्ध झालेल्या सर्वांचा उल्लेख या ग्रंथात 'श्वेत रशियन्स' असा केलेला आहे. सोविएत संघाच्या 'बायलो रशिया' या गणराज्यातील लोकांचा निर्देशही, त्यांचे पांढरे पोषाख, पांढरीच पादत्राणे व मोजे व पांढरे हातमागाचे कोट यामुळे, 'श्वेत रशियन्स' या शब्दांनी सामान्यतः करण्यात येतो, तेव्हा 'श्वेत' या शब्दामुळे त्यांची, सोविएत विरोधाला उभ्या ठाकलेल्या 'श्वेत' रशियनांशी गल्लत होऊ नये.] पूर्वीचे झारकालीन लष्करी अधिकारी हे त्या श्वेत फौजांचे सेनापती बनले होते. रशियन जनतेने उलथून पाडलेली झारकालीन सरंजामशाही एककेंद्री राज्यव्यवस्था पुनःस्थापित करण्याकरिता त्यांनी जीवाचा आटापिटा चालविला होता.

आक्रमकांचे युद्धाचे डावपेच मोठे महत्त्वाकांक्षी स्वरूपाचे होते. श्वेत सेनापतींच्या फौजा व परकीय हस्तक्षेपवादी फौजा यांनी परस्परांशी पूर्ण सहकार्य साधून उत्तर–दक्षिण, पूर्व–पश्चिम या सर्व दिशांनी मास्कोवर तुटून पडावे अशी योजना होती. उत्तरेला व वायव्येला आर्केंजल, मर्मन्स्क व बाल्टिक राज्ये या क्षेत्रात जनरल निकोलस युदेनिच या श्वेत नेत्याच्या आधिपत्याखालील श्वेत फौजांच्या बरोबरीने ब्रिटिश फौजा युद्धसज्जतेत उभ्या ठाकल्या होत्या. दक्षिणेला काळ्या समुद्राच्या किनारपट्टीला धरून कॉकेशस क्षेत्रात जनरल अँटन डेनिकिनच्या श्वेत फौजा होत्या. फ्रेंचानी त्यांना भरपूर युद्धसाहित्य पुरविले होते.

पूर्वेला, ब्रिटिश लष्करी सल्लागारांच्या मार्गदर्शनाखाली हालचाली करणाऱ्या ॲडमिरल अलेक्झांडर कोलचॅकच्या श्वेत फौजा उरल पर्वताच्या पायथ्याशी तळ ठोकून होत्या; तर पश्चिमेला, फ्रेंच अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली जनरल पिल्सुदस्कीच्या नव्याने संघटित करण्यात आलेल्या पोलीश फौजा होत्या.

अनुक्रमणिका

रशियात दोस्त राष्ट्रांनी आरंभिलेल्या लष्करी हस्तक्षेपाच्या समर्थनार्थ तेथील मुत्सद्यांनी निरनिराळी कारणे पुढे केली होती. मर्मन्स्क व आर्केंजल येथे १९१८ च्या वसंतात व ग्रीष्मात जेव्हा प्रथम त्यांच्या फौजा उतरल्या तेव्हा, जर्मनांच्या हाती तेथील युद्धसाहित्य पडू देऊ नये या उद्दिष्टाने त्यांच्या फौजा तेथे उतरल्या आहेत असे दोस्त सरकारांनी जाहीर केले होते. नंतर मात्र, झेकोस्लोवाक फौजांनी रशियातून काढता पाय घेण्यास त्यांना मदत करण्याकरिता दोस्त फौजा सैबेरियात आल्या आहेत असे स्पष्टीकरण त्यांनी दिले. याशिवाय, रशियातील अस्थिरता व गोंधळ नाहीसा करून तेथे पुन्हा सुव्यवस्था प्रस्थापित करण्यात रशियनांना मदत करण्याकरिता त्या फौजा सैबेरियात उतरल्या आहेत असेही एक कारण त्यांच्या लष्करी हस्तक्षेपाचे समर्थन करताना दोस्त राष्ट्रांनी पुढे केले होते. 'सोविएतांविरुद्ध कोणत्याही प्रकारे लष्करी कार्यवाही करण्याचा आमचा मुळीच हेतू नाही' असे दोस्त राष्ट्रांचे मुत्सद्दी वारंवार सांगत होते. 'रशियाच्या अंतर्गत क्षेत्रात लुडबुड करण्याचा आमचा मुळीच इरादा नाही, तत्संबंधी सर्व जबाबदारी रशियाने स्वतःच सांभाळली पाहिजे' असे ब्रिटिश परराष्ट्र सचिव आर्थर बॅलफोर हा ऑगस्ट १९१८ मध्ये ठासून बोलत होता.

सोविएत रशियाविरुद्धच्या मोहिमा ज्याने आपल्या देखरेखीखाली आयोजित केल्या तो विन्स्टन चर्चिल आपल्या व्यंजक पण मोठ्या खुमासदार व आकर्षक शैलीत 'द वर्ल्ड क्रायसिस: द आफ्टरमाथ' या त्याच्या ग्रंथात लिहितो,

'दोस्त राष्ट्रांनी खरोखरीच रशियाविरुद्ध युद्ध चालविले होते काय? छे! मुळीच नाही. फक्त सोविएत रशियन्स दिसताच ते गोळ्या घालीत होते; रशियन भूमीवर आक्रमक म्हणून ते उभे ठाकले होते; सोविएत सरकारच्या शत्रूंना ते शस्त्रे पुरवीत होते; त्यांनी सोविएत बंदरांची नाकेबंदी केली होती; त्यांच्या युद्धनौकांना जलसमाधी दिली होती; सोविएत सरकार उलथून पाडण्याच्या जिद्दीने त्यांनी कारस्थाने केली होती; पण युद्ध? हस्तक्षेप? छे, छे! भलतेच कांहीतरी! रशियन लोक आपला अंतस्थ कारभार कसा सांभाळतात याच्याशी त्यांना काहीही कर्तव्य नव्हते असे दोस्त राष्ट्रे वारंवार म्हणत होती. तसे बोलले की ते अगदी निःपक्षपाती ठरत होते ना? बस्स!'

परकीय व श्वेत हल्ल्याच्या त्या भीषण संकटाला तोंड देत तगून राहण्याकरिता नव्यानेच प्रस्थापित झालेले सोविएत सरकार धडपडत, झगडत होते. महायुद्धाच्या भयानक आघातांनी देश अगोदरच बेचिराख व शक्तीहीन झाला होता. लक्षावधी लोकांची उपासमार होत होती. कारखाने मोडतोड होऊन बंद पडले होते. शेती वैराण झाली होती. वाहतूक ठप्प झाली होती. असा हा सर्व बाजूंनी हतप्रभ व गलितगात्र झालेला देश साधनसामुग्री, अन्नधान्य व शस्त्रास्त्रे यांनी सुसज्ज अशा बलशाली शत्रूच्या हल्ल्यापुढे तग धरेल हे त्यावेळी अशक्यच वाटत होते.

चारही बाजूंनी परकीय आक्रमकांनी वेढले गेल्याने व अंतर्गत क्षेत्रात कटकारस्थानांनी पोखरून निघाल्याने, नाईलाज होऊन लाल लष्कर निर्धाराने लढत, हळूहळू माघार घेत होते. संपूर्ण देशाचा जेमतेम

अनुक्रमणिका

एक षष्ठांश प्रदेश मास्कोच्या सोविएत सरकारच्या नियंत्रणाखाली उरला होता. तो प्रदेश म्हणजे सोविएतविरोधी क्षुब्ध सागरातील जणू एक छोटेसे द्वीपच होते.

**उत्तरेकडील मोहीम**

१९१८ सालच्या ग्रीष्मऋतूच्या प्रारंभी काही खास ब्रिटिश गुप्तहेर आर्केंजल येथे उतरले. लष्करी दृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या त्या बंदराचे स्थानिक सोविएत शासन उलथून पाडण्याकरिता सशस्त्र उठावाची सज्ञता करण्याची कामगिरी त्यांच्याकडे सोपविण्यात आली होती. झारकालीन लष्करी अधिकारी कॅप्टन जॉर्ज एरमोलेविच चॅप्लीन (याला ब्रिटिश लष्करात कमिशन देण्यात आले होते) याच्या देखरेखीखाली श्वेत रशियन प्रतिक्रांतिवादी कटवाल्यांच्या सहकार्याने त्या ब्रिटिश गुप्त हेरांनी उठावाची सिद्धता केली.

२ ऑगस्ट रोजी त्यांनी नियोजित उठाव घडवून आणला. त्यानंतर दुसरेच दिवशी उत्तर रशियातील दोस्त फौजांचा ब्रिटिश सरसेनापती मेजर जनरल फ्रेड्रिक सी. पूल याने ब्रिटिश व फ्रेंच युद्धनौकांच्या मदतीने आर्केंजल व्यापले त्याच वेळी ब्रिटिश गुप्तचर सेवेतील अधिकारी कर्नल थॉर्नहिल याच्या नेतृत्वाखालील सर्बियन व श्वेत रशियन तुकड्यांनी आर्केंजल-वोलोग्दा दळणवळण तोडून, माघार घेणा-या बोल्शेविकांवर पिछाडीने हल्ला करण्याच्या हेतूने ओनेगा येथून कूच केले.

आर्केंजल येथील सोविएत उलथून पाडल्यानंतर तेथे निकोलस चाईकोवस्की या ज्येष्ठ झारकालीन मुत्सद्याच्या नेतृत्वात ‘उत्तर रशियाचे सर्वोच्च प्रशासन’ म्हणून एक कळसूत्री सरकार मेजर जनरल पूलने प्रस्थापित केले. परंतु लवकरच ते सरकार नको तेवढे उदारमतवादी असल्याची शंका आल्याने पूल व त्याच्या झारकालीन मित्रांना ते रुचेनासे झाले. त्यांच्या हातातील बाहुले असलेले ते सरकार दूर करून तेथे उघडउघड लष्करी हुकुमशाही उभी करावी असे त्यांनी ठरविले. ६ सप्टेंबर रोजी जनरल पूल व त्याचे श्वेत रशियन सहकारी यांनी आर्केंजल येथे लष्करी हुकुमशाही स्थापण्याची योजना तडीस नेली. त्यावेळी आर्केंजलला भेट देण्यास आलेला अमेरिकन राजदूत डेव्हिड आर्. फ्रान्सिस याला त्यांनी अमेरिकन फौजेची पाहणी करण्याकरिता आमंत्रित केले होते. पाहाणी संपल्यानंतर अगदी सहजपणे बोलता बोलता जनरल पूलने फ्रान्सिसला म्हटले,

“काल रात्री येथे क्रांती झाली!”

“काय म्हणता?” आश्चर्यचकित होऊन फ्रान्सिसने विचारले, “कोणी केली क्रांती?”

“चॅप्लीनने” असे उत्तर देत जनरल पूलने तेथेच बाजूला उभ्या असलेल्या, आर्केजल सोविएत उलथून पाडण्याचा कट तडीला नेणाऱ्या त्या झारकालीन नौदल अधिकाऱ्याकडे अंगुलीनिर्देश केला.

अनुक्रमणिका

फ्रान्सिसने कॅप्टन चॅप्लीनला जवळ येण्यास खुणावत विचारले, ‘चॅप्लीन, काल रात्रीची क्रांती कोणी केली?’

“मी केली.” मोठ्या ऐटीत चॅप्लीन उत्तरला.

तत्पूर्वीच्या रात्री कॅप्टन चॅप्लीन व काही ब्रिटिश अधिकारी यांनी गडद अंधःकाराचा फायदा घेऊन अध्यक्ष चाईकोवस्की व उत्तरेच्या सर्वोच्च प्रशासनाचे अन्य सदस्य यांची उचलबांगडी करून नजीकच्याच बेटावरील एका मठात सशस्त्र पाहरेकऱ्यांच्या कडेकोट बंदोबस्तात डांबून ठेवले होते.

राजदूत फ्रान्सिससारख्या सोविएत-विरोधकालाही ती कार्यवाही जरा जास्तच उद्दामपणाची व बेदरकारपणाची वाटली. मुख्य म्हणजे त्या कटाच्या सूत्रधारांनी तत्संबंधी काही पूर्वसूचनाही त्याला दिलेली नव्हती. त्यामुळे आपली तीव्र नाराजी व्यक्त करीत, तो सर्व प्रकार अमेरिकन सरकार मुळीच चालवून घेणार नाही असे त्याने पूलला स्पष्टपणे सांगितले.

त्याचा परिणाम तत्काळ दिसून आला. चोवीस तासाच्या आत चाईकोवस्की व त्याच्या कळसूत्री सरकारचे मंत्री आर्केंजल येथे परत आणण्यात येऊन त्यांचे सर्वोच्च प्रशासन पुन्हा प्रस्थापित करण्यात आले. त्याचे श्रेय स्वतःकडे घेऊन “माझ्या प्रयत्नांमुळेच लोकशाहीची पुनर्स्थापना झाली आहे” अशी तार राजदूत फ्रान्सिसने अमेरिकेच्या परराष्ट्रखात्याला लागलीच पाठविली.

१९१९ च्या प्रारंभी आर्केंजल व मर्मन्स्क येथील ब्रिटिश फौजेची संख्या होती १८४००. त्यांच्या बरोबरीने लढत होते ५१०० अमेरिकन्स, १८०० फ्रेंच, १२०० इटालियन्स, १००० सर्बस् व सुमारे २०००० श्वेत रशियन्स.

आर्केंजल येथील त्या काळच्या परिस्थितीचे वर्णन अमेरिकन लष्करातील कॅप्टन जॉन कुडाही याच्या ‘आर्केंजल; द अमेरिकन वॉर विथ रशिया’ या ग्रंथात सापडते. तो म्हणतो, ‘चमचमणाऱ्या भपकेबाज पदकांनी सुशोभित असे मोठे लष्करी कोट घातलेले अगणित झारकालीन अधिकारी त्यावेळी तेथे होते. राखी रंगाच्या उंच टोप्या व भडक रंगाचे पोशाख परिधान केलेले व खणखणणाऱ्या तलवारी कमरेला बांधलेले कोसॅक्स होते; एटन व हॅरो येथील ब्रिटिश अधिकारी होते, चमकदार व डौलदार टोकाच्या टोप्या घातलेले फ्रेंच होते, शिवाय सर्बियन्स व इटालियन्ससही होते...आणि त्याशिवायही आणखी होते बूटपॉलिश करणारे, सर्व व्यवस्था उत्कृष्ट ठेवण्याकरिता झटणारे, आणि अधिकाऱ्यांच्या क्लबमध्ये सोडा–व्हिस्की पुरविण्यात तत्पर असलेले असंख्य हुजरे!’ त्या सर्व अधिकाऱ्यांचे वागणे बोलणे मोठे सभ्य व सुसंस्कृत दिसत असले तरी त्यांच्या युद्धपद्धतीत मात्र सभ्यतेचे किंवा सुसंस्कृततेचे नावनिशाणही दिसत नव्हते.

अनुक्रमणिका

१९१९ मध्ये उत्तर रशियात असलेला एक वाय्. एम्. सी. ए. चा अधिकारी राल्फ अल्बर्टसन आपल्या 'फायटिंग विदाऊट अ वॉर" या पुस्तकात म्हणतो, "आम्ही त्यावेळी बोल्शेविकांविरुद्ध विषारी वायूचा वापर केला; खेड्यातून लोकांना हाकलून लावताना जितक्या प्रकारचे सापळे उभे करता येतील तेवढे आम्ही करीत असू; एकदा तर आम्ही तीस युद्धकैद्यांना सरसकट गोळ्या घातल्या. बोरोकचा कमिसार जेव्हा आमच्या हाती पडला तेव्हा आमच्या बायोनेच्या सोळा जखमांनी जर्जर झालेला त्याचा मृत देह विवस्त्र करून रस्त्यावर फेकून देण्यात आला. बोरोकवर आम्ही अकस्मात हल्ला केला होता. तेथील त्या कमिसारला हातात शस्त्र घ्यायलाही वेळ मिळाला नव्हता. आमचा एक अधिकारी त्याच्या हाताखालील सैनिकांना वारंवार बजावीत होता की 'कैदी म्हणून कोणाला पकडू नका; ते निःशस्त्र असले तरी त्यांना गोळ्या घाला.' कोणतेही कारण नसता बोल्शेविक कैद्यांना जाणूनबुजून ठार करताना मी अनेकदा पाहिले. रात्र झाली की आमची गोळीबार पथके ते मृत देह दूर बाहेर नेऊन फेकून देत असत."

सर्वसामान्य दोस्त सैनिकाला अर्थातच त्या सोविएत–विरोधी मोहिमेत काही रस वाटत नव्हता. महायुद्ध जर संपले आहे तर आपण रशियात कशाकरिता लढत आहोत हेच त्यांना समजत नव्हते व त्यांच्या त्या प्रश्नाचे समर्पक उत्तर देणे दोस्त सेनापतींना अवघड जात होते. अमेरिकन लष्करातील जॉन कुडाही त्याच्या पुस्तकात याबद्दल लिहितो, "सैनिकांच्या त्या प्रश्नाला उत्तर देण्याची काही गरज नाही असे प्रारंभी दोस्त सैनाधिकाऱ्यांना वाटले. पण नंतर सैनिकांचे मनोधैर्य टिकवून धरण्याचे महत्त्व ओळखून लष्करी अधिकाऱ्यांनी काही जाहीरनामे काढले. परंतु त्यामुळे त्या सैनिकांचा गोंधळ अधिकच वाढला."

उत्तर रशियातील ब्रिटिश लष्कराच्या मध्यवर्ती कार्यालयाने ब्रिटिश व अमेरिकन सैनिकांना उद्देशून काढलेल्या एका जाहीरनाम्याची सुरवात अशी होती–

'उत्तर रशियात आपण कशाकरिता लढत आहोत याची तुम्हा सैनिकांना स्पष्ट कल्पना नाही असे दिसते. अगदी मोजक्याच शब्दांत सांगायचे म्हणजे आम्ही बोल्शेविकांविरुद्ध लढत आहोत. कारण बोल्शेविझम म्हणजे शुद्ध अराजक. आज रशियात काय चालले आहे तेच पहा ना! सत्ता अगदी मूठभर लोकांच्या हाती केंद्रीत झाली आहे, व त्यापैकी बहुतेक ज्यू आहेत...'

परंतु हे स्पष्टीकरण सैनिकांना पटण्यासारखे नव्हते. त्यामुळे त्यांच्या मनातील गोंधळ वाढतच गेला. ब्रिटिश, फ्रेंच व श्वेत रशियन्स यात सतत खटके उडू लागले. सैनिक उठाव करू लागले. अमेरिकेच्या ३३९ नंबरच्या पायदळाने वरिष्ठांचे हुकुम मानण्याचे नाकारले, तेव्हा त्या पथकाचा अधिकारी कर्नल स्टेवर्ट याने बंड करून उठणाऱ्या सैनिकांना मृत्युदंडाची शिक्षा देण्याची तरतूद करणारे युद्ध कायदे वाचून दाखविले. त्याबरोबर क्षणभर सर्व सैनिक स्तब्ध झाले. परंतु कोणाला काही शंका विचारावयाची आहे काय असे कर्नल स्टेवर्टने विचारताच एका सामान्य सैनिकाने विचारले–

'सर, आपण येथे कशाकरिता लढत आहोत व त्यासंबंधात अमेरिकन सरकारची उद्दीष्ट्ये कोणती आहेत?'

अनुक्रमणिका

कर्नल स्टेवर्टला अशा प्रश्नांची उत्तरे देता आली नाहीत.

१९१९ च्या ग्रीष्मातील उत्तर रशियातील परिस्थितीबद्दल ब्रिटिश सेनादल प्रमुख सर हेन्री विल्सन याने ब्रिटिश ब्लू बुकात पुढील प्रमाणे नोंद केली—

"द्वीना नदीच्या उजव्या तीरावर राखीव सैन्य म्हणून असलेल्या तिसऱ्या कंपनीच्या पहिल्या तुकडीने व चवथ्या उत्तर रायफल रेजिमेंटच्या स्लावो—ब्रिटिश पलटणीने व मशीनगन कंपनीने निर्धारपूर्वक ७ जुलै रोजी उठाव केला. तीन ब्रिटिश व चार रशियन अधिकारी मारले गेले; व दोन ब्रिटिश व दोन रशियन अधिकारी जखमी झाले."

२२ जुलै रोजी ओनेगा जिल्ह्यातील रशियन रेजिमेंटनेही उठाव केल्याची बातमी आली. उठाव करणाऱ्यांनी ओनेगाची आघाडी बोल्शेविकांच्या स्वाधीन केली होती.

अमेरिकेतही, रशियातून अमेरिकन सैन्य माघारी बोलावण्यात यावे या अमेरिकन जनतेच्या मागणीला जोम येत होता. बोल्शेविकांविरुद्ध अमेरिकेत चालू असलेला अखंड प्रचारही सामान्य अमेरिकन जनतेचा निषेधपर आवाज दडपून टाकू शकत नव्हता. महायुद्ध संपलेले असूनही त्यांचे पती, त्यांची मुले यांना सैबेरियाच्या वैराण प्रदेशात व मर्मन्स्क व आर्केंजलच्या जीवघेण्या थंडीत एकाकीपणे ते रेंगाळणारे युद्ध का लढावे लागत आहे हेच अमेरिकन स्त्रीपुरुषांना समजत नव्हते. १९१९ च्या ग्रीष्मात व हिवाळ्यातही अमेरिकेच्या निरनिराळ्या भागातून, अमेरिकन सैनिक रशियातून माघारी बोलावण्यात यावेत अशी मागणी करण्याकरिता शिष्टमंडळे वॉशिंग्टनला पोहोचत होती. त्या त्यांच्या मागणीचा प्रतिध्वनी अमेरिकेच्या काँग्रेसमध्येही ऐकू येत होता.

५ सप्टेंबर १९१९ रोजी सिनेटपुढे बोलताना सिनेटर बोरा म्हणाला—

"अध्यक्ष महोदय, आपले रशियाशी युद्ध नाही. अमेरिकन काँग्रेसने रशियन सरकारविरुद्ध किंवा जनतेविरुद्ध युद्ध पुकारलेले नाही. रशियाविरुद्ध लढण्याची अमेरिकन जनतेची इच्छाही नाही. तरीही आपण रशियन जनतेविरुद्ध युद्ध चालवीत आहोत. आपले सैन्य तर रशियात आहेच; परंतु त्या शिवाय, तेथील इतर राष्ट्रांच्या फौजांनाही आपण दारूगोळा व इतर युद्धसाहित्य पुरवीत आहोत. एखाद्या घटनात्मक सत्तेने अधिकृतपणे युद्ध पुकारलेले असावे व त्याकरिता राष्ट्राच्या लष्कराला पाचारण केले जावे त्याप्रमाणे आपण उघडपणे तेथे युद्ध चालवले आहे. तेथे जी प्राणहानी होत आहे त्याला कायद्याने किंवा नैतिकतेचेही समर्थन नाही. स्वतंत्र सरकारच्या मूलभूत तत्त्वांची ही उघडउघड पायमल्ली आहे."

सोविएत रशियाविरुद्धच्या युद्धाबद्दल अमेरिकन जनतेच्या मनात जशी तीव्र नापसंती होती तशीच ती ब्रिटिश व फ्रेंच मनातही होती. तरीही त्या राष्ट्रांचे रशियाविरुद्धचे अघोषित युद्ध चालूच होते.

## वायव्येकडील मोहिमा

नोव्हेंबर १९१८ मध्ये दोस्त राष्ट्रे व मध्यवर्ती सत्ता यांच्याच झालेल्या युद्धबंदी कराराच्या १२ नंबरच्या कलमानुसार (या कलमाला फारशी प्रसिद्धी दिली गेली नव्हती) जर्मन व्याप्त रशियन प्रदेशात जर्मन फौजा, दोस्तांना आवश्यक वाटेल तोपर्यंत राहाव्यात अशी तरतूद करण्यात आली होती. त्या फौजांचा उपयोग बोल्शेविकांविरुद्धच्या लढ्यात व्हावा हे गृहित धरण्यात आले होते. परंतु दोस्त राष्ट्रांचा तो डाव फलद्रूप झाला नाही. कारण बाल्टिक प्रांतातील जर्मन फौजांचे लवकरच विघटन घडून आले होते. युद्धसंत्रस्त व बंडखोर जर्मन सैनिक त्यांच्या तळावरून सरळ माघारी परत निघून गेले होते.

यामुळे लातविया, लिथुआनिया व एस्तोनिया या क्षेत्रात सोविएत चळवळ झपाट्याने पसरत असल्याचे दिसताच बाल्टिक क्षेत्रातील श्वेत गटांना सर्वतोपरी मदत करण्याचे ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यांनी ठरविले. तेथील निरनिराळ्या श्वेत गटांचे नेतृत्व करून त्यांना एका लष्करी सूत्रात बांधण्याकरिता नेता म्हणून त्यांनी निवड केली होती ती एका जर्मन लष्करी अधिकाऱ्याची—जनरल काऊंट रूडिगर वॉन डेर् गोल्ट्झ!

रशियन क्रांतीनंतर फिनिश गणराज्याचे स्वातंत्र्य सोविएत सरकारने मान्य केले होते. त्या स्वतंत्र फिनलंडवर १९१८ च्या वसंतात जर्मन फौजांनी हल्ला केला तेव्हा त्या जर्मन सैन्याचे नेतृत्व जनरल वॉन डेर गोल्टझ् याने केले होते. झारशाहीत सम्राटाच्या अश्वदलाचा नेता असलेला व क्रांतीनंतर फिनलंडमधील श्वेत फौजांचा नेता बनलेल्या बॅरन कार्ल गस्टेव वॉन मॅनरहीम याच्या खास विनंतीनुसार वॉन डेर गोल्टझ् याने फिनिश मोहिमेच्या नेतृत्वपदाची जबाबदारी स्वीकारली होती. [वॉन डेर गोल्टझ्च्या शस्त्रसज्ज सैन्याच्या मदतीने बॅरन मॅनरहीमने फिनिश सरकार उलथून पाडले व जर्मनीच्या कैसर विल्हेल्मचा जावई राजपुत्र फ्रेड्रिव वॉन हेसेन यास फिनिश राजसिंहासनावर बसण्यास आमंत्रित केले. फिनिश लोकांचा विरोध चिरडून टाकण्याकरिता वॉन डेर गोल्टझ् याने तेथे दहशतवादाचे सत्र आरंभिले. काही आठवड्याच्या कालावधीत मॅनरहीमच्या श्वेत रक्षकांनी २०००० स्त्रिया, पुरुष व मुले यांची हत्या केली. हजारोंना छळछावण्यात आणि तुरुंगात कोंबले. तेथे नंतर अनेक लोक छळ, उपासमार व थंडी यांना बळी पडले.]

बाल्टिक क्षेत्रातील श्वेतांचा नेता या नात्याने लातविया व लिथुआनिया या राज्यातील सोविएत चळवळ चिरडून टाकण्याकरिता, वॉन डेर गोल्टझ् याने जोरदार दहशतमोहीम सुरू केली. फार मोठा प्रदेश जाळपोळ करून त्याच्या सैनिकांनी बेचिराख करून टाकला, व तेथील नागरिकांची सरसकट कत्तल केली. हल्लेखोरांचा प्रतिकार करण्याकरिता लातवियन व लिथुआनियन लोकांजवळ शस्त्रास्त्रे किंवा संघटना काहीही नव्हते. त्यामुळे अल्पावधीतच तेथील जनतेला दडपून टाकून वॉन डेर गोल्टझ् त्या दोन राज्यांचा हुकुमशहा बनला.

जर्मन जनरल वॉन डेर गोल्टझ् याने व्यापलेल्या त्या प्रदेशाकरिता हर्बर्ट हूवर याच्या मार्गदर्शनाखाली अमेरिकन मदत समितीने फार मोठ्या प्रमाणात अन्नधान्याचा पुरवठा केला.

अनुक्रमणिका

परंतु दोस्त राष्ट्रांपुढे लवकरच एक वेगळी समस्या उभी ठाकली. वस्तुतः दोस्त राष्ट्रांच्याच मदतीने वॉन डेर गोल्ट्झने बाल्टिक क्षेत्र आपल्या नियंत्रणाखाली आणले होते. परंतु तो एक जर्मन जनरल असल्याने त्याच्याद्वारा त्या बाल्टिक राज्यांवर जर्मनी आपला प्रभाव प्रस्थापित करील की काय ही धास्ती दोस्तांना भेडसावीत होती.

त्यामुळे जून १९१९ मध्ये वॉन डेर गोल्टझ्च्या ऐवजी निश्चितपणे त्यांच्याच नियंत्रणाखाली राहील असा दुसरा एखादा सेनापती नेमण्याचे ब्रिटिशांनी ठरविले. त्याकरिता सिडने रॅली याचा मित्र व झारशाहीतील ५८ वर्षीय लष्करी अधिकारी जनरल निकोलस युदेनिच याची तेथील पुनःसंघटित श्वेत लष्कराचा सेनापती म्हणून त्यांनी नेमणूक केली. पेट्रोग्राडवर चढाई करण्याकरिता आवश्यक ती सर्व लष्करी मदत देण्याचे ब्रिटिशांनी त्याला आश्वासन दिले. त्या मदतीचा पहिला हप्ता म्हणून १०००० सैनिक, दीड कोटी काडतुसे, ३००० स्वयंचलीत रायफल्स, शिवाय रणगाडे, विमाने असे युद्धसाहित्य ते युदेनिचला पुरविणार होते. शिवाय युदेनिचेने व्यापलेला क्षेत्राकरिता भरपूर अन्नधान्य उपलब्ध करून देण्याचे आश्वासन हर्बर्ट हूवरच्या अमेरिकन मदत संघटनेने दिले. त्या संघटनेच्या बाल्टिक मिशनच्या एस्तोनियन विभागाचा प्रमुख, मेजर आर्. आर्. पॉवर्स हा, पेट्रोग्राड काबीज करेपर्यंत जनरल युदेनिचच्या श्वेत रशियन लष्कराला किती अन्नधान्य लागेल, याचा अंदाज घेण्यासाठी बारकाईने सर्वेक्षण करू लागला. युदेनिचच्या लष्कराने व्यापलेल्या प्रदेशात धान्य वाटप करण्यासाठी अमेरिकन मदत संघटनेतर्फे अन्नधान्य भरलेली जहाजे रावेल या बंदरात येऊ लागली.

ही सर्व सज्जता होताच युदेनिचच्या नेतृत्वाखाली पेट्रोग्राडविरुद्ध सर्वशक्तीनिशी चढाईला प्रारंभ झाला. १९१९ च्या ऑक्टोबरपर्यंत युदेनिचचे घोडदळ पेट्रोग्राडच्या उपनगरापर्यंत येऊन पोहोचले. थोडेच दिवसात, नव्हे काही तासातच पेट्रोग्राड पडणार याची दोस्त राष्ट्रांना पक्की खात्री होती.

१८ ऑक्टोबर : स्टॉकहोमच्या वृत्तानुसार कम्युनिस्टविरोधी फौजा पेट्रोग्राडमध्ये पोहोचल्या आहेत.

२० ऑक्टोबर : पेट्रोग्राड पडल्याचे पुन्हा खात्रीलायक वृत्त आहे. मास्कोशी त्या शहराचा संपर्क तुटला आहे.

२१ ऑक्टोबर : लाल—लष्कर विरोधी फौजा पेट्रोग्राड नजीक. ते शहर हस्तगत झाल्याचे वृत्त लंडनमध्ये कोणत्याही क्षणी अपेक्षित.

असे सनसनाटी मथळे देऊन न्यूयॉर्क टाईम्स हे वृत्तपत्र पेट्रोग्राडच्या अपेक्षित पाडावाची आशादायक बातमी मोठ्या उत्कंठापूर्ण शब्दात देत होते.

अनुक्रमणिका

परंतु पेट्रोग्राड पडले नाही. त्या शहराच्या अगदी उंबरठ्याशी युदेनिचला अडविण्यात आले. आपल्या फौजा कशाबशा संघटित करून त्या क्रांतिकारी शहराने आक्रमकांवर जबरदस्त प्रत्याघात केला. त्यांच्या त्या निकराच्या हल्ल्यामुळे युदेनिचचे सैन्य वेगाने मागे रेटले गेले, व इतस्ततः पांगले. खुद्द युदेनिच कच खाऊन पळून गेला.

"सैन्य तसेच वाऱ्यावर सोडून, १० कोटी मार्क्सचा ऐवज खिशात घालून युदेनिचचे पॅरिसच्या दिशेने पलायन" अशा खळबळजनक मथळ्याखाली युदेनिचच्या पराभवाची बातमी २९ फेब्रुवारी १९२० रोजी न्यूयॉर्क टाईम्सने दिली. ब्रिटिश ध्वज फडकविणाऱ्या मोटारीतून दक्षिण दिशेने युदेनिचने पळ काढला. मागे उरली ती त्याच्या सैन्याची प्रचंड वाताहात. बर्फाच्या आच्छादनाखाली दडलेल्या त्या प्रदेशात त्याच्या सैनिकांचे अनेक छोटे छोटे गट इतस्ततः हिंडत होते त्यातील अनेक लोक तेथील जीवघेणी थंडी, उपासमार व रोगराई यामुळे मृत्युमुखी पडेल.

**दक्षिणेकडील मोहीम**

युदेनिचचे सैन्य उत्तरेकडून पेट्रोग्राडवर झेपावत होते त्याच वेळी, ४५ वर्षाचा मोठा रुबाबदार दिसणारा झारकालीन अधिकारी जनरल ॲन्टन डेनिकिन याच्या नेतृत्वाखाली दक्षिणेकडील मोहिमेला तोंड लागले होते. रशियाचे रक्षण करणे हा एकच उदात्त हेतू त्याच्या श्वेत सैन्याच्या अंतर्मनात होता असे विधान नंतर डेनिकिनने केले. परंतु तो अर्थातच सगळा देखावा होता. त्याच्या युद्ध पद्धतीतील अमानुष क्रौर्य रशियन जनतेच्या चांगल्या परिचयाचे होते.

रशियात क्रांतीला प्रारंभ झाला तेव्हापासूनच गव्हाचे आगर असलेल्या युक्रेनकरिता, तसेच कोळसा व लोखंड यांच्या अमाप साठ्याकरिता प्रसिद्ध असलेल्या डॉन क्षेत्राकरिता भयानक संघर्ष पेटला होता. डिसेंबर १९१७ मध्ये युक्रेनियन सोविएत गणराज्य प्रस्थापित झाल्यापासून, सोविएत-विरोधी झारकालीन युक्रेनियम नेता जनरल सिमॉन पेत्लुरा याने युक्रेनमधील सोविएत शासन उलथून पाडण्याकरिता फौजा पाठविण्याची निकड जर्मन लष्करी अधिकाऱ्यांकडे लावली होती. जर्मनांची बुभुक्षित नजर अन्नधान्याचे कोठार म्हणून प्रसिद्ध असलेल्या युक्रेनवर खिळलेली होतीच; त्यामुळे त्यांना आणखी वेगळ्या आमंत्रणाची जरूरीच नव्हती.

फील्ड मार्शल हर्मन वॉन इचहॉर्न याच्या आधिपत्याखाली जर्मन लष्कराचा लोंढा युक्रेनमध्ये शिरला. इचहॉर्नची पत्नी काऊंटेस दुर्नोवी ही एका धनाढ्य रशियन उमरावाची मुलगी होती, व तो धनिक उमराव हा युक्रेनमधील सर्वात मोठा जमीनदार होता. त्यामुळे इचहॉर्नच्या मनाची धावही युक्रेनकडेच होती. कीवखार्कोव या प्रदेशातून सोविएत सैन्याला पिटाळून लावून जर्मन लष्कराने जनरल पेत्लुरा याच्या आधिपत्याखाली, 'स्वतंत्र युक्रेन'चे एक कळसूत्री सरकार उभे केले. 'राष्ट्रीय समाजवाद' प्रस्थापित करण्याचे त्याचे ध्येय असल्याचे घोषित करून पेत्लुरा याने संपूर्ण युक्रेनमध्ये एकामागून एक ज्यू-विरोधी

अनुक्रमणिका

हिंसक उठावांना चिथावणी व प्रोत्साहन दिले; व युक्रेनमधील क्रांतिकारी कामगार व शेतकरी यांना चिरडून टाकण्याकरिता त्याने अत्यंत निर्घृण व क्रूर मार्गांचा अवलंब केला.

तरीही तेथील क्रांतिकारी चळवळ फोफावतच राहिली. परिस्थिती नियंत्रणाखाली आणण्यात पेत्लुरा असमर्थ ठरत असल्याचे लक्षात येताच त्याला दूर सारून इचहॉर्नने यक्रेनमध्ये लष्करी हुकुमशाही प्रस्थापित केली. या नव्या सरकारचा प्रमुख होता इचहॉर्नचा मेहुणा, जनरल पावेल पत्रोविच स्कोरोपदस्की. त्याला युक्रेनियन भाषेचे अवाक्षरही कळत नव्हते. तरीही स्वतः 'हेटमन' (युक्रेनप्रमुख) असल्याचे घोषित करून त्याने तेथील शासनसूत्रे हाती घेतली.

परंतु 'हेटमन' स्कोरोपदस्कीही पेत्लुरापेक्षा अधिक काहीही साध्य करू शकला नाही. १९१८ च्या अखेरी लाल लष्कर व त्यांना पाठिंबा देणारी युक्रेनियन जनता यांच्याविरुद्ध तो टिकाव धरू शकला नाही. लवकरच, लाल लष्कराच्या आघातांनी जर्जर झालेल्या व रोडावलेल्या जर्मन लष्कराने युक्रेनमधून पळ काढला. त्यावेळी त्यांच्याबरोबरच, एक खाजगी जर्मन माणूस म्हणून वेषांतर करून स्कोरोपदस्कीही युक्रेन सोडून पळाला.

जर्मन सैन्याने युक्रेनमधून पळ काढला म्हणून बोल्शेविकांच्या दृष्टीने युक्रेनची समस्या सुटली असे मात्र झाले नाही. दक्षिण रशियातील सोविएत-विरोधी श्वेत-रशियन चळवळीला दोस्त राष्ट्रांची मदत सतत चालूच होती. त्या मदतीच्या बळावर प्रतिक्रांतिकारकांनी डॉन कोसॅक क्षेत्रात, कालेदिन, कोर्निलोव, डेनिकिन, व क्रांतीनंतर दक्षिणेकडे पळून आलेले अन्य झारकालीन लष्करी अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली 'स्वयंसेवक सैन्य' या नावाने प्रतिक्रांतिकारी लष्कर संघटित केले होते.

परंतु सुरुवातीलाच या स्वयंसेवक सैन्याचा लाल लष्कराने जोरदार पराभव केला. वैफल्यग्रस्त जनरल कालेदिनने आत्महत्या केली. त्याची जागा जनरल कोर्निलोवने घेतली. परंतु त्यालाही डॉन क्षेत्रातून सोविएत लष्कराने हाकून लावले. शेवटी १३ एप्रिल १९१८ रोजी झालेल्या एका लढाईत कोर्निलोव मारला गेला. हतबल व निराश होऊन माघार घेणाऱ्या त्या स्वयंसेवक सैन्याचे नेतृत्व नंतर डेनिकिनने स्वतःकडे घेतले.

श्वेत-रशियनांचे भवितव्य अशा प्रकारे पूर्णपणे अंधारलेले दिसत असतानाच पहिल्या ब्रिटिश व फ्रेंच तुकड्या मर्मस्क व आर्केंजल येथे उतरल्या, आणि श्वेत लष्करांच्या मदतीकरिता भरपूर युद्धसाहित्य रशियात ओतले जाऊ लागले. त्यामुळे डेंनिकिनचे अडचणीत सापडलेले सैन्य सर्वनाश होता होता बचावले. भरपूर कुमक व युद्धसाहित्य मिळताच १९१८ च्या अखेरी डेनिकिन पुन्हा सोविएतांविरुद्ध चढाई करण्यात सज्ज झाला.

पश्चिमेकडे, पहिल्या महायुद्धाची अखेर करणारा युद्धबंदी करार झाल्यानंतर बरोबर अकरा दिवसांनी, म्हणजे २२ नोव्हेंबर १९१८ रोजी, दोस्तांचे नौदल नवोरोसिस्कच्या मार्गावर असल्याची बातमी

देणारा एक रेडिओ संदेश डेनिकिनच्या दक्षिणेकडील मध्यवर्ती कार्यालयात येऊन पोहोचला. दुसरेच दिवशी दोस्तांच्या जहाजांनी काळ्या समुद्रावरील नवोरोसिस्क बंदरात नांगर टाकला. फ्रान्स व ब्रिटन यांच्याकडून भरपूर युद्धसाहित्य डेनिकिनच्या मदतीकरिता येत असल्याचे कळविण्याकरिता फ्रेंच व ब्रिटिश दूत किनाऱ्यावर उतरले.

१९१८ च्या अखेरच्या काही आठवड्यात फ्रेंच तुकड्यांनी ओदेसा व सेवास्तोपोल व्यापले. इंग्लिश नौदल त्याचवेळी काळ्या समुद्रात आले व त्यांच्या काही तुकड्या बाटुम येथे उतरल्या. एका ब्रिटिश जनरलला तेथील गव्हर्नर जनरल नेमण्यात आले. [मेन्शेविक व सोशल रिव्होल्यूशनरी सोविएतांविरुद्ध करीत असलेल्या उठावाला मदत करण्याकरिता १९१८ च्या जुलैमध्ये ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यांनी पर्शिया मधून तुर्कस्थानत सैनिक पाठविले होते. तेव्हापासून दक्षिण रशियात ब्रिटिश सैनिक सक्रिय होते. प्रतिक्रांतिकारी नेता नोई जोर्डानिया याच्या नेतृत्वाखालील ट्रान्स कॉकेशियन कार्यकारी समितीने ब्रिटिश वर्चस्वाखाली राहणारे एक कळसूत्री सरकार प्रस्थापित केले होते. प्रतिक्रांतिवाद्यांना ब्रिटिशांकडून मिळणाऱ्या मदतीच्या मोबदल्यात, त्या क्षेत्रातून होत असलेल्या कापसाच्या व पेट्रोलियमच्या निर्यातीत ब्रिटिशांना काही खास अधिकार दिले जावे अशा स्वरूपाचा करार त्यांच्यात त्यावेळी झाला होता.]

ब्रिटनकडून मिळालेल्या भरपूर युद्धसाहित्याच्या बळावर, फ्रेंच लष्करी अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली जनरल डेनिकिन याने मास्कोविरुद्धच्या जोरदार मोहिमेला प्रारंभ केला. या चढाईत डेनिकिनचा प्रमुख मदतनीस होता जनरल बॅरल वॉन रॅंगल. उंच, सडपातळ, केस विरळ होऊ लागलेला, भावशून्य कठोर निळ्या डोळ्यांचा रँगल त्याकाळी अमानुष रानवट क्रौर्याकरिता प्रसिद्ध होता. अधूनमधून त्याच्या सर्व युद्धकैद्यांसमक्ष तो आपल्या काही निःशस्त्र युद्धबंद्यांना गटागटाने ठार करी; आणि मग ती कत्तल डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहिलेल्या युद्ध कैद्यांसमोर दोनच पर्याय ठेवी—त्याच्या लष्करात दाखल होणे अथवा मृत्यू. स्तावरोपोल जिंकल्यानंतर त्याचे सैनिक जेव्हा शहरात शिरले, तेव्हा त्यांनी पहिली कोणती गोष्ट केली असेल तर ती म्हणजे तेथील इस्पितळात शिरून तेथील सत्तर जखमी लाल सैनिकांना ठार केले. मोहिमेत लूट मिळवून ती सैनिकांनी सारखी वाटून घ्यावी असे उघड आदेश रँगलने आपल्या सैनिकांना दिले होते.

उत्तरेच्या दिशेने आगेकूच करीत डेनिकिन व रँगल यांनी जून १९१९ मध्ये झारित्सिन (आताचे स्टालिनग्राड) व्यापले व ऑक्टोबरमध्ये त्यांचे लष्कर मास्कोपासून जेमतेम १२० मैलावर असलेल्या तुला शहराच्या वेशीनजीक येऊन ठेपले. "रशियातील संपूर्ण बोल्शेविक संघटना कोसळत असल्याचे दिसत आहे;" 'बोल्शेविकांच्या बालेकिल्ल्यांचे केंद्रस्थान मास्को खाली करण्यात येत आहे;' 'डेनिकिनसमोर सर्व काही भुईसपाट होत आहे;' 'भयग्रस्त झालेले लाल लष्कर सैरभैर होऊन पळ काढीत आहे' अशा बातम्या 'न्यूयॉर्क टाईम्स', 'द टाईम्स' यांच्यासारखी वृत्तपत्रे मोठ्या आनंदाने देत होती.

अशा आणीबाणीच्या वेळी लाल लष्कराने अकस्मात प्रतिहल्ल्याला प्रारंभ केला. क्रांतिकारी लष्करी समितीचा सदस्य असलेल्या स्टालिनने प्रतिहल्ल्याची ती योजना तयार केली होती. लाल लष्कराचा अशा प्रकारे प्रतिहल्ला येईल. याची कल्पनाही नसल्याने डेनिकिनच्या लष्कराला चांगलाच हादरा बसला. त्यांचा निभाव लाल लष्करापुढे लागला नाही. काही दिवसातच दक्षिणेकडील श्वेत लष्कर

अनुक्रमणिका

काळ्या समुद्राच्या दिशेने जीव घेऊन पळत सुटले. त्यांचे नीतिधैर्य पार खचले होते. धसका घेतलेले ते सैनिक इतस्ततः विखुरले जखमी, मरणोन्मुख सैनिकांनी रस्ते भरून गेले. जखमींना इस्पितळात नेणाऱ्या गाड्यात अनेकदा औषधे, डॉक्टर किंवा परिचारिका नसत. पळ काढणारे सैनिक लुटालूट करीत दक्षिणेकडे वळत होते. ‘लढाऊ दल या दृष्टीने या लष्कराचे अस्तित्वच संपले आहे हे एक कटु सत्य आहे’ असा संदेश भयग्रस्त रँगलने जनरल डेनिकिनला ९ डिसेंबर १९१९ रोजी पाठविला, तो वस्तुस्थितीत यथार्थ कल्पना देणारा होता.

१९२० च्या पहिल्या काही आठवड्यात डेनिकिनचे उरलेसुरले सैनिक काळ्या समुद्रावरील नवोरोसिस्क या बंदरात जाऊन पोहोचले. श्वेत सैनिक लष्कर सोडून पळालेले बाजारबुणगे, निर्वासित लोक या सर्वांची त्या शहरात एकच गर्दी उसळली.

२७ मार्च १९२० रोजी ब्रिटिश युद्धनौका ‘भारत सम्राट’ व फ्रेंच गलवत ‘वाल्देक—रूसो’ यांचा, आगेकूच करीत येणाऱ्या लाल लष्करावर तोफांचा भडिमार चालू असतानाच डेनिकिनने एका फ्रेंच युद्धनौकेतून नवोरोसिस्क येथून पळ काढला. डेनिकिन व त्याचे अधिकारी त्या नौकेतून पळ काढीत असल्याचे दृश्य पाहात डेनिकिनचे हजारो सैनिक असहाय्यपणे नवोरोसिस्क गोदीत उभे होते.

### पूर्वेकडील मोहीम

दक्षिणेकडून डेनिकिन मास्कोपर्यंत झेपावला की त्याचवेळी पूर्वेकडून ॲडमिरल कोलचॅकने मास्कोला वेढा घालावा अशी परकीय हस्तक्षेपवाद्यांची मूळ योजना होती. परंतु प्रत्यक्षात त्या योजनेनुसार काहीच घडले नाही.

१९१९ च्या वसंतात व ग्रीष्मात कोलचॅकच्या लष्कराने लाल लष्कराच्या केलेल्या भयंकर पराभवाच्या बातम्या पॅरिस, लंडन व न्यूयॉर्क येथील वृत्तपत्रे सतत देत होती.

मार्च २६ : ‘कोलमडलेल्या लाल लष्कराचा कोलचॅककडून पाठलाग.’

एप्रिल २० : ‘पूर्वेकडे कम्युनिस्ट भुईसपाट होत आहेत. कोलचॅकच्या विजयाबरोबर कम्युनिस्टांची राजवट डगमगत आहे.’

मे १५ : ‘मास्कोवर चढाई करण्याची कोलचॅकची योजना’

हे त्या वृत्तपत्रांतून येणाऱ्या बातम्यांचे काही मासलेवाईक नमुने आहेत.

मात्र ११ ऑगस्ट रोजी 'द टाईम्स' या वृत्तपत्राने वस्तुस्थितीचे स्वरूप स्पष्ट करणारी बातमी दिली ती अशी—

"पश्चिम सैबेरियात कोलचॅक राजवटीच्या सर्वनाशाची शक्यता दिसत असून त्या कटु सत्याला सामोरे जाण्याच्या दृष्टीने बोल्शेविक—विरोधी जगातील जनमानसाची तयारी करण्याची वेळ नजीक येऊन ठेपली आहे असे विधान आज रात्री एका उच्च पदस्थ सरकारी अधिकाऱ्याने केले."

१९१९ च्या मध्य ग्रीष्मात लाल लष्कराच्या घणाघाती आघातासमोर तग धरणे अशक्य ॲडमिरल कोलचॅक जिवाच्या आकांताने पळत सुटला. यावेळी रशियातील गनिमी चळवळीचे सामर्थ्यही चांगले वाढले होते व ते गनीम पिछाडीहून कोलचॅकच्या लष्करावर हल्ल्यामागून हल्ले चढवीत होते. नाईलाज होऊन नोव्हेंबर मध्ये कोलचॅकने त्याची राजधानी ओम्स्क खाली केली. चिंध्या झालेले गणवेश व झिजलेले बूट, अशा थाटात त्याचे हजारो सैनिक गलितगात्र अवस्थेत ओम्स्कमधून बाहेर पडले. त्यापैकी हजारो सैनिक, चालण्याचेही त्राण न उरल्याने, रस्त्याच्या कडाकडांना साचलेल्या बर्फात मरण पावले. ओम्स्कहून निरनिराळ्या दिशांनी जाणारे रेल्वेमार्ग, मोडून पडलेल्या रेल्वेच्या इंजिनांनी अडून गेले होते. रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना फेकून दिलेले किंवा पडून राहिलेले मृत देह सडत पडले होते.

इंग्लंडचा युनियन जॅक, अमेरिकेचा पट्टेदार तारांकित ध्वज, फ्रान्स व इटलीचा तिरंगा ध्वज व जपानचा उगवत्या सूर्याचा ध्वज, असे पाच ध्वज फडकत असलेल्या रेल्वेगाडीतून कोलचॅक इर्कुटस्कला पोहोचला. पण २४ डिसेंबर १९१९ रोजी इर्कुटस्कच्या लोकांनी उठाव केला व तेथे सोविएत प्रस्थापित करून त्यांनी कोलचॅकला अटक केली. त्याच्याबरोबरच्या ५१४३ पेट्यांत व १६४० पिशव्यात सोन्याच्या विटा, पौंड व अन्य बहुमोल वस्तू भरलेल्या होत्या. कोलचॅक पळवून नेत असलेला ११५ कोटी रुबल्स किंमतीचा तो खजिनाही इर्कुटस्कच्या लोकांनी पकडला.

सोविएत सरकारने राष्ट्रद्रोहाचा आरोप ठेऊन कोलचॅकवर खटला भरला. नौदल अधिकारी म्हणून आपण समुद्रावर राहिलो असतो तर फार बरे झाले असते असे त्याला राहून वाटत होते. 'एकदा बुडू लागले की ते सर्वत्र बाजूंनी बुडते' असे अत्यंत कटू उद्गार उद्विग्न होऊन त्याने कोर्टापुढे काढले. ऐन संकटाच्या वेळी दोस्त म्हणविणाऱ्या परकीयांनी त्याची साथ सोडून देऊन त्याचा विश्वासघात केला असाही आरोप त्याने केला.

कोलचॅकविरुद्ध खटला चालविणाऱ्या कोर्टाने त्याला देहदंडाची शिक्षा ठोठावली. ७ फेब्रुवारी १९२० रोजी गोळीबार पथकाने त्या शिक्षेची अंमलबजावणी केली. कोलचॅकचे बरेच हस्तक जपान्यांच्या आश्रयाला पळाले. त्यापैकी एक अधिकारी जनरल बाकिश याने, 'ज्यू व कम्युनिस्ट यांनी पाठलाग केल्याने मी शेवटी सीमा ओलांडली' असा संदेश मंगोलियाची राजधानी उर्गा येथील श्वेत रशियन कौन्सुलला पाठविली.

अनुक्रमणिका

## पोल्स व रँगल

रशियाच्या निरनिराळ्या क्षेत्रात लाल लष्कराकडून दणदणीत व निर्णायक पराभव पदरी आलेले असूनही इंग्लिश–फ्रेंच हस्तक्षेपवाद्यांनी सोविएत रशियाच्या पश्चिमेकडील प्रदेशावर आणखी दोन जबरदस्त हल्ले चढविले.

एप्रिल १९२० मध्ये, पश्चिम रशियाचा संपूर्ण प्रदेश व स्मोलेन्स्क शहर पोलंडला दिले जावे अशी मागणी पोलंडने सोविएत सरकारकडे केली; व त्याकरिता त्यांनी पश्चिमेकडून रशियावर हल्ला चढविला. ब्रिटन व फ्रान्स यांनी मोठ्या औदार्याने पश्चिमेकडून रशियावर हल्ला चढविला. ब्रिटन व फ्रान्स यांनी मोठ्या औदार्याने व सढळ हाताने पुरविलेले भरपूर युद्धसाहित्य व अमेरिकेकडून मिळालेली ५ कोटी डॉलर्सची रक्कम [हर्बर्ट हूवर याने अमेरिकन मदत संघटनेतर्फे लक्षावधी डॉलर्स किंमतीची सामुग्री पोलंडला पुरविली; व काँग्रेसच्या मदतनिधीतून चार कोटी डॉलर्सचा निधी पोलीश सैन्याला रणभूमीत टिकवून धरण्याकरिता खर्ची पडला असा स्पष्ट आरोप सिनेटपुढे बोलताना मिसूरीचा सिनेटर जेम्स रीड याने ४ जानेवारी १९२१ रोजी सिनेटपुढे बोलताना केला.

युरोपच्या मदतीकरिता अमेरिकेत उभारला गेलेला बहुतांश निधी सोविएत रशियात हस्तक्षेप करण्याकरिता वापरला गेला. मुळात त्या मदतीकरिता १० कोटी डॉलर्स काँग्रेसने मंजूर केले होते. परंतु त्यापैकी ९ कोटी ४९ लक्ष ३८ हजार ४१७ डॉलर्सची रक्कम रशियाच्या सीमावर्ती प्रदेशात, किंवा श्वेत रशियनाच्या व हस्तक्षेपवाद्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या रशियन प्रदेशावर खर्च झाली अशी स्पष्ट कबूली जानेवारी १९२१ मध्ये, काँग्रेसला तत्संबंधी सादर केलेल्या त्याच्या अहवालात खुद्द हर्बर्ट हूवरने दिली.] यामुळे आत्मविश्वास बळावून पोलीश सैन्याने युक्रेनमध्ये घुसून कीव काबीज केले. मात्र तेथे लाल लष्कराने त्यांचा कडवा प्रतिकार केला व त्यांना निकराने मागे रेटले.

लाल सैन्याच्या लष्करी दबावामुळे पोलीश लष्कराने घाईघाईने वॉर्साच्या दिशेने माघार घेतली. त्यांचा वेगाने पाठलाग करणारे लाल लष्कर ऑगस्टपर्यंत वॉर्सा व लवोव या शहरांच्या वेशीपर्यंत जाऊन उभे ठाकले.

पोलीश लष्कराला घ्याव्या लागलेल्या माघारीमुळे दोस्त राष्ट्रे अत्यंत अस्वस्थ झाली; व त्या लष्कराकरिता पोलंडला पैसा व युद्धसाहित्य पुरविण्याची त्यांनी त्वरा केली. पोलंडच्या लष्करी मोहिमेचे मार्गदर्शन करण्याकरिता मार्शल फॉकने त्याचा सर्वोच्च लष्करी अधिकारी जनरल मॅक्झिन वेगाँ याला घाईघाईने पोलंडला रवाना केले. ब्रिटिश रणगाडे व विमाने तातडीने वॉर्साला पाठविली गेली. इकडे, लाल लष्कराचा सेनापती व युद्धमंत्री यांनी लाल लष्कर वॉर्सापर्यंत नेऊन भिडविण्याच्या केलेल्या कार्यवाहीमुळे, लाल लष्कराची दळणवळण रेषा नको तेवढी जास्त लांबली. त्याचे दुष्परिणाम, दोस्त राष्ट्रांच्या मदतीने परिपुष्ट झालेल्या पोलीश लष्कराने लाल लष्करावर प्रतिचढाई करताच दिसून आले. पोलीश सैन्याच्या जबरदस्त हल्ल्यामुळे थकले भागलेले लाल लष्कर टिकाव धरू शकले नाही. संपूर्ण आघाडीवर ते मागे रेटले गेले; वर्षानुवर्षांच्या युद्धाने व क्रांतीने रशियाचा त्यावेळी जणू शक्तिपात झाला होता. त्या काळात सोविएत सरकारला सर्वात तीव्रतेने गरज वाटत होती ती शांततेची! त्यामुळे अत्यंत नाईलाजाने सोविएत

अनुक्रमणिका

सरकारने पोलंडशी तहाची बोलणी लावली. सोविएत रशिया व पोलंड यात झालेल्या रीगाच्या करारानुसार बायलोरशिया व युक्रेन या राज्यांचे पश्चिमेचे प्रदेश पोलंडला तोडून देणे सोविएत सरकारला भाग पडले.

पोलंडशी शांतता करार होताच श्वेत नेता बॅरन वॉन रँगल याचा समाचार घेण्यास लाल लष्कराला उसंत मिळाली. श्वेत लष्कराचा सरसेनापती म्हणून डेनिकिनची जागा घेऊन, फ्रेंच पाठबळाच्या आधारे तो क्रिमियातून युक्रेनमध्ये शिरला होता. १९२० च्या अखेरी लाल लष्कराने रँगलचा निर्णायक पराभव केला, व त्याला युक्रेनमधून हाकून लावून नोव्हेंबरमध्ये, पेरेकोपवर हल्ला करून क्रिमियात प्रवेश केला. लाल लष्कराच्या प्रहारांनी रँगलचे सैन्य समुद्रात रेटले गेले.

### शेवटला हस्तक्षेपवादी शिपाईगडी

रँगलच्या लष्कराचा चुराडा होऊन पश्चिमेकडील हस्तक्षेपवाद्यांचा निकाल लागल्यानंतर सोविएत भूमीवर एकमेव परकीय लष्कर उरले होते ते जपानी साम्राज्याचे! निसर्ग संपत्तीने अत्यंत समृद्ध असलेले संपूर्ण सैबेरिया जपानच्या घशाखाली उतरणार असेच सर्वांना त्याकाळी वाटत होते. जपानचा युद्धमंत्री व जपानी लष्करी गुप्तहेर खात्याचा प्रमुख जनरल तनाका मोठ्या प्रौढीने बोलत होता की, “क्रांतीबरोबर रशियात देशभक्तीचे नावनिशाणही उरलेले नाही आणि ती आपल्या दृष्टीने मोठीच हितकर गोष्ट झाली आहे. कारण त्यामुळे, भरपूर संख्येने एकदा रशियात लष्कर ओतले की सोविएतांचा निःपात व्हायला वेळ लागणार नाही.”

१९२० मध्ये, जेव्हा कोर्निलोव, डेनेकीन, कोलचॅक इत्यादी श्वेत नेते लाल लष्करापुढे हतप्रभ ठरून रणक्षेत्रावरून नाहीसे झाले होते, त्यावेळीही जपानचे ७०००० सैन्य व त्याशिवाय शेकडोनी, जपानी गुप्तहेर, दहशतवादी व घातपाती कृत्ये करणारे जपानी हस्तक सैबेरियात कार्यरत होते. जपानी लष्करी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली, रशियन दूर पूर्वेत, श्वेत फौजांच्या लष्करी हालचाली चालूच होत्या. त्यापैकी प्रमुख सोविएत-विरोधी सैन्य होते ते जपानच्या हातातील बाहुले बनून राहिलेल्या अतामन सेम्योनोवच्या नेतृत्वाखालील लुटारू लष्कर.

सैबेरियात जपानचा प्रभाव प्रस्थापित व्हावा हे अमेरिकेला रुचण्याजोगे नव्हते. त्यामुळे सैबेरियात काहीशा सावधगिरीने पावले टाकणे जपानला भाग पडत होते. तरीही ८ जून १९२१ रोजी जपानने अतामन सेम्योनोवशी व्लादिवस्तोक येथे एक गुप्त करार केला. सोविएतांचा निःपात झाल्यानंतर शासकीय सत्ता सेम्योनोवंने हाती घ्यावी व दूरपूर्वेत त्याचे सरकार प्रस्थापित होताच शिकार मासेमारी, व लाकूडकटाई या धंद्यात, तसेच सोन्याच्या व अन्य खनिजांच्या खाणी यांच्या विकासात जपानी नागरिकांना इतरांपेक्षा अधिक विशेषाधिकार द्यावे अशी तरतूद त्या करारान्वये करण्यात आली.

अनुक्रमणिका

सेम्योनोव याचा उजवा हात असलेला बॅरन उन्गर्ग-स्टेनबर्ग याला त्या नियोजित लष्करी मोहिमेत महत्त्वाची भूमिका दिली गेली होती. परकीय हस्तक्षेपवाद्यांच्या सोविएत-विरोधी युद्धातील ती शेवटची श्वेत मोहीम ठरणार होती.

लेफ्टनंट जनरल बॅरन रोमन वॉन उन्गर्न-स्टेनबर्ग हा फिक्कट बायकी चेहऱ्याचा व भुऱ्या केसांचा बाल्टिक क्षेत्रातील उमराव. हा तरुण वयातच झारच्या सेवेत दाखल झाला होता. १९०५ च्या रशिया-जपान युद्धात त्याने बऱ्यापैकी कामगिरी बजावली होती व त्यानंतर तो सैबेरियातील कोसॅक पोलीस दलात दाखल झाला होता. पहिल्या महायुद्धात बॅरेन वॉन रँगलच्या हाताखाली त्याने काम केले होते. दक्षिणेकडील लढ्यातील त्याच्या मर्दुमकीबद्दल त्याला सेंट जॉर्ज क्रॉस प्रदान करून गौरविण्यात आले होते. बेफाम साहस, अतीव क्रोधाच्या बेगुमान लहरी व राक्षसी क्रौर्य याकरिता तो त्याच्या सहकाऱ्यांत प्रसिद्ध होता.

क्रांतीनंतर बॅरन उन्मर्ग सैबेरियात परत आला व आसमंतातील प्रदेशात लुटालूट करीत फिरणाऱ्या कोसॅक पलटणीचे आधिपत्य स्वतःकडे घेऊन, त्यांनी संघटित करून स्थानिक सोविएत्स्‌विरुद्ध लढा देणे त्याने सुरू केले. त्यानंतर जपानी हस्तकांनी त्याच्याशी संपर्क साधला व मंगोलियात शिरण्यास त्यांनी त्याला उद्युक्त केले. श्वेत रशियन अधिकारी, सोविएत-विरोधी चिनी फौजा, मंगोलियन लुटारू सैनिक व जपानी गुप्तहेर अशा निरनिराळ्या प्रकारच्या लोकांचे बनलेले कडबोळेवजा लष्कर जपान्यांनी त्यांच्या उद्दिष्टपूर्तीकरिता उन्गर्नच्या स्वाधीन केले.

मंगोलियन राजधानी उर्गा येथील मुख्यालयात, ऐषआरामात आकंठ बुडालेल्या सरंजामशाही वातावरणात, उन्गर्न बादशाही थाटात राहू लागला. इतरांचे भवितव्य निश्चित करण्याची कामगिरी दैवानेच त्याच्याकडे सोपविली आहे अशा उद्दामपणे तो वागत होता. एका मंगोलियन राजकन्येशी त्याने विवाह केला. पाश्चिमात्य पोशाखाचा त्याग करून पिवळ्या रेशमाचा मंगोलियन पद्धतीचा पायघोळ अंगरखा तो घालू लागला. तो स्वतः चेंगीझखानाचा अवतार असल्याचे त्याने घोषित केले. त्याला घेरून असलेल्या जपानी हस्तकांच्या चिथावणीने पूर्वेकडून उदयाला येणाऱ्या नव्या जगाचा (सैबेरियाचा) सम्राट होण्याची स्वप्ने तो पाहू लागला. एवढेच नव्हे तर हा सम्राट नंतर सोविएत रशिया व युरोपवर कोसळणार होता, व तलवारी व तोफा यांच्या बळांवर अधःपतित लोकशाही व ज्यूंचा साम्यवाद यांचे नावनिशाण या जगाच्या पाठीवरून तो पुसून टाकणार होता. इतरांच्या दुःखात राक्षसी आनंद मानणाऱ्या बुद्धिभ्रष्ट उन्गर्नने अमानुष क्रौर्याची अनेक कृत्ये केली. एकदा एका सैबेरियन खेड्यात त्याने एक निष्पाप देखणी मुलगी पाहिली. तिला पाहून त्याने केले काय, तर तिचे शीर कापून आणून देणाऱ्याला एक हजार रुबल्सचे बक्षीस जाहीर केले; आणि, एका क्रूर लोभी माणसाने ते कृत्य केल्यानंतर उन्गर्नने खरोखरीच त्याला बक्षिसाची रक्कम दिली. "दुतर्फा वधस्तंभ उभे करून आशियापासून युरोपच्या पश्चिम टोकापर्यंत जाणारा मार्ग मी तयार करणार आहे" अशा त्याच्या दर्पोक्तीयुक्त क्रूर बोलण्यातून त्याची मनोविकृती स्पष्टपणे डोकावत होती.

१९२१ ची मोहीम सुरू होण्यापूर्वी उर्गा येथील मध्यवर्ती कार्यालयातून बॅरन उन्गर्न याने आपल्या सैनिकांना उद्देशून पुढील घोषणा केली.

“सोविएत सैबेरियातील लाल लष्कराविरुद्ध मोहीम सुरू करण्याकरिता मंगोलिया हा एक उत्तम तळ आहे. कमिसार्स, कम्युनिस्ट व ज्यू यांचा, त्यांच्या सर्व कुटुंबियांसह समूळ नाश झाला पाहिजे; त्यांची सर्व मालमत्ता जप्त केली पाहिजे; कठोर शिस्त शिकविण्याकरिता करावयाच्या कार्यवाहीपासून ते देहदंडापर्यंत निरनिराळ्या स्वरूपाच्या शिक्षा त्या गुन्हेगारांना देता येतील.

‘सत्य आणि दया’ यांचा विचारही करणे अशक्य आहे. यापुढे उरणार आहे ते एकच, ‘सत्य व दयामायाशून्य क्रौर्य!’ मानवी आत्म्यातील परमेश्वरी तत्व नष्ट करण्याच्या हेतून जी पापी शक्ती या अवनीतलावर अवतरली आहे (बोल्शेविझम) तिची पाळेमुळे खणून नष्ट केलीच पाहिजेत.”

रशियन सीमेलगतच्या निर्मनुष्य, उजाड व वैराण सैबेरियन प्रदेशातील उन्गर्नची मोहीम म्हणजे केवळ लुटालूट करणारे निर्दय हल्ले होते. त्यांच्या हल्ल्यांनंतर मागे उरत होते ते बेचिराख झालेली खेडी व हातपाय मोडलेली मुले व स्त्रीपुरुष! त्यांनी व्यापलेल्या शहरात बलात्कार, लुटालूट व जाळपोळ यांचे थैमान सुरू होई. ज्यूंना, साम्यवाद्यांना, तसेच लोकशाहीकडे झुकता कल असल्याचा नुसता संशयही ज्या लोकांबद्दल असेल, त्या सर्वांना गोळ्या घालणे, अगर हालहाल करणे किंवा जिवंत जाळणे असे प्रकार नित्य होत.

जुलै १९२१ मध्ये उन्गर्नच्या लष्कराचा नायनाट करण्याच्या हेतूने लाल लष्कराने मोहीम सुरू केली. अनेक अटीतटीच्या लढ्यानंतर अखेरी लाल लष्कर व सोविएत गनीम यांनी उन्गर्नविरुद्ध निर्णायक विजय मिळविला. उन्गर्नचे लुटारू सैनिक, त्याच्याजवळील बंदुका, इतर युद्धसाहित्य, व त्यांचे जखमी सहकारी यांना टाकून जीव घेऊन पळत सुटले.

ऑगस्टमध्ये लाल लष्कराने उन्गर्नला चारी बाजूंनी वेढले. त्याच्या स्वतःच्या मंगोलियन अंगरक्षकांनी त्याच्याविरुद्ध बंड करून त्याला सोविएत सैनिकांच्या स्वाधीन केले. रेशमी मंगोलियन अंगरखा घातलेल्या त्या बॅनरला नोवोनिकोल्योवस्क (सध्याचे नोवोसिबिर्स्क) येथे आणून जनतेचा शत्रू असल्याच्या आरोपाखाली त्याच्याविरुद्ध सैबेरियातील सर्वोच्च सोविएत न्यायालयात खटला भरण्यात आले.

तो एक लोकविलक्षण खटला होता. शेकडोंनी कामगार, शेतकरी, सैनिक तसेच रशियन, सैबेरियन, मंगोलियन, व चिनी लोक यांची न्यायालयात गर्दी झाली होती. न्यायालयात जागा न मिळाल्याने हजारो लोक न्यायालयासमोरील रस्त्यांवर उभे होते. त्यापैकी अनेकांनी उन्गर्नच्या दहशतवादाचे जीवघेणे अत्याचार सोसले होते. अनेकांचे बंधू, मुले, पती, पत्नी उन्गर्नच्या गोळ्यांना बळी पडले होते.

अनुक्रमणिका

कोर्टासमोर उन्गर्नला आणून उभे केल्यानंतर त्याच्यावरील आरोपपत्र वाचून दाखविण्यात आले.

‘सैबेरियाच्या क्रांतिकारी समितीच्या १२ सप्टेंबर १९२१ च्या निर्णायानुसार आशियाची घोडदळ पथकाचा माजी प्रमुख लेफ्टनंट-जनरल बॅरन वॉन उन्गर्न-स्टेनबर्ग याच्यावर सैबेरियन क्रांतिकारी न्यायालयासमोर पुढील आरोप करण्यात येत आहेत—

१) ट्रान्सबैकल सरकार उलथून पाडून त्याऐवजी स्वतःचे आशियायी सरकार प्रस्थापित करण्याकरिता जपानशी हातमिळवणी करणे व जपानच्या विस्तारवादी धोरणाला खतपाणी घालणे;

२) मायकेल रोमानोव याला सिंहासनावर बसवून सैबेरियात राजसत्ता पुन्हा प्रस्थापित करण्याच्या हेतूने सोविएत सत्ता उलथून पाडण्याकरिता कट करणे;

३) अनेक रशियन शेतकरी, कामगार व चिनी क्रांतिकारक यांच्या अमानुष कत्तली करणे.’

त्याने केलेले अत्याचार नाकबूल करण्याचा प्रयत्नही उन्गर्नने केला नाही. ‘हालहाल करणे-कत्तली करणे? होय. ते सर्व खरेच होते. त्याचे कारणही उघड आहे. कारण मी चालविलेल्या युद्धाचाच तो एक भाग होता. पण जपानच्या हातातील बाहुले? छे! उलट माझ्या उद्दिष्टसिद्धीकरिता जपानचा उपयोग करून घ्यावा अशी माझी योजना होती.’ असे त्याने सांगितले. जपानशी त्याची राष्ट्रद्रोहाच्या स्वरूपाची जवळीक होती हे उन्गर्नने साफ नाकबूल केले.

‘जपानशी त्याचा कोणत्याही प्रकारचा संबंध नव्हता असा दावा आरोपी करीत असेल तर तो उघडउघड खोटे बोलत आहे,’ सोविएत अभियोगी यारोस्लावस्की म्हणाला, ‘कारण त्याबद्दल आमच्याजवळ सबळ पुरावा आहे.’

‘मी जपानशी जरूर संपर्क साधला, जसा मी चँग-सो—लीनशीही साधला. [उन्गर्नने कुप्रसिद्ध चिनी लष्करी हुकुमशहा चँग सो-लीन याच्याशी संपर्क साधून एक करार केला होता. त्यानुसार, ठरल्याप्रमाणे चँगच्या लष्करापुढे माघार घेण्याच्या मोबदल्यात पेकिंग सरकारकडून चँगने उकळलेल्या १ कोटी डॉलर्सपैकी १० टक्के रक्कम चँगकडून उन्गर्नला मिळावयाची होती.] बॅरनने कबुली दिली. ‘पण त्यात गैर काय आहे? चेंगिझखानानेही व्हॉन खानाशी, त्याचे राज्य गिळंकृत करण्यापूर्वी, असाच संपर्क व सलोखा ठेवला होता.’

‘पण आपण आज बाराव्या शतकात वावरत नाही आणि इथे न्यायालयात चेंगिझखानाची चवकशीही चाललेली नाही’ सोविएत अभियोगी म्हणाला.

अनुक्रमणिका

‘हजार वर्षापासून उन्गर्ननांनी इतरांना हुकुम सोडलेले आहेत; त्यांना इतरांकडून हुकुम ऐकून घ्यायची सवय नाही,’ न्यायालयात गोळा झालेले कामगार, शेतकरी व सैनिक यांच्याकडे उद्दामपणे पाहात संतप्त होऊन उन्गर्न गरजला, ‘कामगारांची अधिसत्ता मी कदापी मान्य करणार नाही. जो मनुष्य एखादा नोकरही घरी बाळगू शकत नाही, त्याने राज्य करण्याच्या गप्पा कशाला माराव्यात?’

अभियोगी यारोस्लावस्की याने उन्गर्नच्या गुन्ह्यांचा लांबलचक पाढा वाचून दाखविला. ज्यू व सोविएत लोक यांना अनुकूल असलेल्या शेतकऱ्यांवर हल्ले करणे, लोकांचे हातपाय तोडणे, खेडी भस्मसात करण्याकरिता रात्री माळरानातून घोडदौड करीत असता प्रेतांना आगी लावून मशाली म्हणून त्यांचा उपयोग करणे, स्त्रियांवर निर्घृण अत्याचार करणे, मुलांच्या सरसकट कत्तली करणे इत्यादी!

‘अनेक माणसे ठार मारली गेली हे खरे. पण अशा प्रकारे आम्ही मारलेले सर्वच लोक मला न रुचणाऱ्या लाल रंगाचे होत...मला ते सहन होणे शक्यच नव्हते.’ थंडपणे उन्गर्न आपली सफाई देत होता.

‘तू उर्गा का सोडलेस?’ सोविएत अभियोगीने विचारले.

‘बैकल पलीकडील प्रदेशावर हल्ला करून तेथील शेतकऱ्यांना उठाव करण्यास मी उद्युक्त करणार होतो. पण मध्येच पकडला गेलो’ उन्गर्न उत्तरला.

‘तुला कोणी कैद केले?’

‘काही मंगोलांनी माझा विश्वासघात केला.’

‘त्यांनी तसे का केले याचा तू कधी विचार केला आहेस का?’

‘त्यांनी माझा विश्वासघात केला. बस्स! एवढेच मी जाणतो.’

‘कामगारांची अधिसत्ता उलथून पाडण्याकरिता झालेल्या इतर प्रयत्नांचा जसा शेवट झाला तसाच शेवट तू आरंभिलेल्या मोहिमेचाही झाला; तुझी मोहीम त्या उद्दिष्टाने केलेला शेवटचा प्रयत्न होता हे तुला मान्य आहे ना?’

“होय! माझा हा प्रयत्न शेवटचा होता. मला वाटते त्यांच्यापैकी शिल्लक उरलेला मी एकटाच आहे,” उन्गर्नने उत्तर दिले.

अनुक्रमणिका

सप्टेंबर १९२१ मध्ये सोविएत न्यायालयाने उन्गर्नला ठोठावलेल्या शिक्षेची अंमलबजावणी करण्यात आली. बॅरन रोमन वॉन उन्गर्न-स्टेनबर्ग या श्वेत लष्करवाद्यांच्या शेवटल्या नेत्याला लाल लष्कराने गोळ्या घातल्या.

अतामन सेम्योनोव व जपान्यांच्या हातातील बाहुले बनून राहिलेल्या त्याच्या लष्करातील उरले सुरले सैनिक सोविएत सीमा ओलांडून मंगोलिया व चीनच्या दिशेने पळत सुटले.

यानंतरही शेवटचा जपानी सैनिक रशियन भूमीवरून नाहीसा होण्यास साधारणतः एक वर्ष लागले. १९ ऑक्टोबर १९२२ रोजी लाल लष्कराने व्लादिवस्तोकवरील आपली पकड आवळली, तेव्हा ते शहर व्यापून राहिलेले जपानी सैनिक शरण आले. त्यांच्याजवळील सर्व लष्करी साहित्य त्यांनी सोविएत लष्कराच्या स्वाधीन केले. शेवटले जपानी सैनिक घेऊन जपानी वाहनांनी दुसऱ्या दिवशी व्लादिवस्तोक सोडले. त्यानंतर त्या शहरावर लाल ध्वज फडकू लागला.

‘जपान हे एक आक्रमण-विरोधी राष्ट्र आहे व जागतिक शांतता टिकावी याकरिताच त्या राष्ट्राची धडपड आहे हे जगाला पटवून देण्याकरिताच व्लादिवस्तोक खाली करण्याचा निर्णय घेण्यात आला’ असे व्लादिवस्तोक सोडताना जपानी परराष्ट्र खात्याने मोठ्या साळसूदपणे घोषित केले.

अनुक्रमणिका

भाग २

# लष्करी नाकेबंदीची गुपिते

अनुक्रमणिका

### प्रकरण ७

## रशियात अडकलेले दोस्तांचे हितसंबंध

अडीच वर्षे सतत चाललेला यादवी युद्धाचा, व परकीयांनी चालविलेल्या हस्तक्षेपवादी युद्धाचा वणवा यांमुळे सुमारे सत्तर लक्ष रशियन स्त्रीपुरुष व मुले लढाया, उपासमार व रोगराई यांना बळी पडली होती. त्या काळात रशियन सरकारच्या अंदाजानुसार ६००० कोटी डॉलर्सचे नुकसान त्या देशाला सहन करावे लागले होते. दोस्तराष्ट्रांनी झार सरकारला दिलेल्या कर्जाऊ रकमेपेक्षाही ती रक्कम कितीतरी मोठी होती. आक्रमकांनी कोणत्याही प्रकारे नुकसानभरपाई दिलेली नव्हती.

दोस्त राष्ट्रांच्या त्या लष्करी हस्तक्षेपामुळे खुद्द दोस्त राष्ट्रांना किती खर्च आला याची अधिकृत माहिती त्या राष्ट्रातील करदात्यांना देण्यात आली नाही. परंतु १५ सप्टेंबर १९१९ रोजी विन्स्टन चर्चिलने काढलेल्या एका निवेदनानुसार ग्रेट ब्रिटनने तोपर्यंत सुमारे १० कोटी पौंड, तर फ्रान्सने सुमारे ३ ते ४ कोटी पौंड एकट्या जनरल डेनिकिनवर खर्च केले होते. केवळ उत्तरेकडील ब्रिटिश मोहिमेचा खर्च होता १ कोटी ८० लक्ष पौंड; तर सैबेरियातील जपानच्या ७०,००० च्या लष्कराकरिता जपानचे ९० कोटी येन खर्ची पडले होते, अशी कबुली खुद्द जपानने त्याकाळी दिली होती.

त्या अर्थशून्य व खर्चिक ठरलेल्या अघोषित युद्धामागील उद्दिष्टे तरी काय होती?

श्वेत अधिकारी तर, रशियातील राजसत्ताकाची पुनःस्थापना, त्यांचा जमीनजुमला, त्यांच्या पदरात पडत असलेला लठ्ठ नफा, त्यांच्या वर्गाचे विशेषाधिकार, त्यांची पदके व मानमरातब यांकरिता लढ्याला सिद्ध झाले होते हे उघड होते.

त्यांच्यात काही थोडे प्रामाणिक राष्ट्रवादी नव्हते असे नाही; परंतु श्वेत लष्करावर प्रामुख्याने प्रभाव होता तो प्रतिक्रियावाद्यांचा. १९२२ नंतर मध्ययुरोपात उद्याला आलेल्या फासिस्ट अधिकाऱ्यात व त्यांच्यात काही फरक नव्हता.

दोस्त राष्ट्रांची रशियातील युद्धउद्दिष्टे मात्र तितकीशी स्पष्ट नव्हती. परंतु बोल्शेविझमविरुद्ध राजकीय लढा देणे हे त्यांच्या लष्करी हस्तक्षेपाचे प्रमुख कारण असल्याने काही दोस्त प्रवक्त्यांनी त्याकाळी नमूद केले होते.

अनुक्रमणिका

वस्तुस्थिती अशी होती की दोस्तांच्या लष्करी हस्तक्षेपाचे बोल्शेविझम-विरोध हे एकमेव कारण नव्हते. बोल्शेविझम-विरोधाइतकेच दुसरे एक महत्त्वाचे कारण होते ते म्हणजे उत्तर रशियातील इमारती लाकूड, दोनेत्स क्षेत्रातील कोळसा, सैबेरियातील सोने, कॉकेशसमधील खनिज तेल या गोष्टी दोस्त राष्ट्रांना अत्यंत महत्त्वाच्या वाटत होत्या. याशिवाय ट्रान्स–कॉकेशियन प्रदेशाचे एक निराळे संघराज्य स्थापण्याच्या ब्रिटिश योजनेसारखी त्यांची काही साम्राज्यवादी उद्दिष्टेही त्यामागे होती. ब्रिटिश प्रभावाखाली तसे संघराज्य अस्तित्वात आले असते तर रशियाचा भारताकडील मार्ग अवरुद्ध होऊ शकला असता व शिवाय निकटपूर्वेतील तेलाच्या खाणींवर ब्रिटिश प्रभुत्व प्रस्थापित झाले असते. संपूर्ण सैबेरिया जिंकून घेऊन तो प्रदेश जपानची एक वसाहत करून सोडायची, हे जपानचे उद्दिष्ट होते. दोनेत्स व काळ्या समुद्राचे क्षेत्र आपल्या नियंत्रणाखाली आणण्याचा फ्रेंचांचा हेतू होता; तर बाल्टिक राज्य व युक्रेन ताब्यात घेण्याची जर्मनीची महत्वाकांक्षा होती.

सत्तासूत्रे हाती येताच सोविएत सरकारने पहिले कोणते पाऊल उचलले असेल तर ते म्हणजे राष्ट्रातील सर्व मोठ्या आर्थिक प्रतिष्ठानांचे राष्ट्रीयकरण करणे. रशियातील खाणी, गिरण्या, कारखाने, रेल्वे, तेलविहिरी व इतर सर्वच मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंदे सोविएत जनतेच्या राष्ट्राच्या मालकीचे असल्याचे घोषित करण्यात आले. तसेच, झार सरकारला देण्यात आलेली सर्व परदेशी कर्जे, रशियन जनतेची क्रांती चिरडून टाकण्याच्या उद्देशाने ती हेतूपुरस्सर झार सरकारला देण्यात आली होती, या कारणामुळे झुगारून देण्यात आली. [रशियातील 'ब्लॅक हन्ड्रेड्स' या झारनिष्ठ दहशतवादी संघटनेने झारकालीन गुप्त पोलिसांशी संगनमत करून १९०६ मध्ये जेव्हा ज्यूविरोधी मोहीम चालविली, तेव्हा झार राजवटीला कर्जे देत राहिलेल्या फ्रेंच भांडवलदारांचा अनातोल फ्रान्सने तीव्र शब्दात धिक्कार केला होता. तत्संबंधी आपल्या देशबांधवांना धोक्याचा इशारा देत तो सुप्रसिद्ध फ्रेंच लेखक म्हणाला, – "आपल्या फ्रेंच देशबांधवांनी एक गोष्ट पक्की ध्यानात असू द्यावी की, रशियन जनतेवर गोळीबार करणे, त्यांना फासावर लटकविणे, त्यांच्या कत्तली करणे, मन मानेल तशी त्यांची लुटालूट करणे, त्या विशाल परंतु जुलुम–दडपशाहीखाली चिरडल्या गेलेल्या दुःखी साम्राज्यातील संस्कृती व स्वातंत्र्य यांची गळचेपी करणे, रशियन सरकारला शक्य व्हावे याकरिता त्या सरकारला फ्रेंच भांडवलादारांनी पुन्हा कर्जाऊ पैसा दिला तर ते त्यांच्या स्वतःच्याच दृष्टीने घातक ठरेल. माझ्या देशबांधवांनो, नवे क्रौर्य व मूर्खपणा करण्याकरिता आणि असंख्य लोकांच्या हौतात्म्याकरिता पुन्हा पैसा देऊ नका." पण अनातोल फ्रान्सच्या त्या भावपूर्ण आवाहनाला फ्रेंच भांडवलदरांनी प्रतिसाद दिला नाही. झारशाहीत लक्षावधी डॉलर्सची गुंतवणूक ते करीतच राहिले.]

झारांचे साम्राज्य सकृत्‌दर्शनी समृद्ध व शक्तिशाली दिसत असले तरी वास्तवात मात्र ते राष्ट्र म्हणजे इंग्लिश, फ्रेंच व जर्मन हितसंबंधांची एक अर्धवसाहत बनले होते. फ्रेंच भांडवलशहांची झारशाहीतील भांडवली गुंतवणूक १७५९ कोटी १० लक्ष फ्रँक्सची होती. ७२ टक्के रशियन कोळसा, लोखंड व पोलाद, तर ५० टक्के खनिज तेल यांवर इंग्रजांचे व फ्रेंचांचे नियंत्रण होते. रशियन कामगार व शेतकरी यांच्या श्रमाने निर्माण झालेल्या संपत्तीतील कोट्यावधी फ्रँक्स व पौंड, दरवर्षी, लाभांश, नफा, व्याज या रूपाने, झारांशी हातमिळवणी करून, परकीय सत्ता स्वतःच्या खिशात घालून घेत होत्या.

बोल्शेविक क्रांतीनंतर, लंडनच्या १९१९ च्या 'स्टॉक एक्स्चेंज इयर बुक' मध्ये 'रशियन हिशोब' या शीर्षकाखाली १९१८ पासूनच्या थकबाकीचा हिशोब दिलेला होता.

अनुक्रमणिका

१९२० मध्ये रशियामधील दोस्तांच्या धोरणावर हाऊस ऑफ कॉमन्स मध्ये झालेल्या वादळी चर्चेत बोलताना लेफ्टनंट कर्नल सेसिल ला एस्ट्रेंज मलोन ह्या ब्रिटिश संसद सदस्याने दिलेली माहिती अशी—

'आपल्या देशातील काही लोकांचे व काही गटांचे भांडवल व भाग या दोन्ही दृष्टींनी रशियात हितसंबंध अडकलेले आहेत आणि तीच मंडळी तेथील बोल्शेविक राजवट उलथून पाडण्याकरिता तत्परतेने कटकारस्थाने करीत आहेत. झार—राजवटीत रशियन कामगार व शेतकरी यांची पिळवणूक करून १० ते २० टक्के नफा तेथे मिळवता येत होता. परंतु तेथे आता समाजवादी व्यवस्था प्रस्थापित झाल्याने तेवढा नफा उकळणे कधीच शक्य होणार नाही आणि महत्त्वाची गोष्ट अशी की आपल्या देशातील बहुतेक सर्व बडे उद्योगधंदे या ना त्या प्रकारे रशियाशी संलग्न आहेत...'

१९१८ च्या 'रशियन इयर बुक' नुसार ब्रिटिश फ्रेंच यांची रशियातील संयुक्त गुंतवणूक सुमारे १६० कोटी स्टर्लिंग किंवा ८०० कोटी डॉलर्सची आहे अशी माहिती देऊन कर्नल मलोन पुढे म्हणाला—

'मार्शल फॉक व फ्रेंच जनता रशियाशी शांतता करार करण्याच्या विरुद्ध आहेत असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा फ्रेंच लोकशाही किंवा सामान्य फ्रेंच कामगार—शेतकरी यांचा विचारही आपल्या मनात नसतो, तर त्यात अंतर्भाव होतो तो प्रामुख्याने फ्रेंच भांडवलदारांचा व भागधारकांचा. सत्य परिस्थितीबाबत आपल्या मनात कोणत्याही प्रकारे गोंधळ असण्याचे कारण नाही. रशियात जे १६० कोटी पौंड बुडाले आहेत असे आपण म्हणतो तो सर्व पैसा अनेकांनी गैरमार्गांनी मिळवलेला पैसा आहे आणि त्याच मंडळींचा रशियाशी शांतता करार करण्याला विरोध आहे.'

उरल-कास्पियन ऑईल कंपनी, द नॉर्थ कॉकेशियन ऑईल फील्ड, द न्यू शिबारेव पेट्रोलियम कंपनी यांसह रशियातील तत्सम अनेक तेलउद्योगात रॉयल डच शेल ऑईल कंपनीचे हितसंबंध गुंतलेले होते. मेट्रोविकर्स हे विशाल ब्रिटिश शस्त्रनिर्मिती प्रतिष्ठान, त्याचबरोबर फ्रेंच स्नैदर-क्रीसोत, व जर्मन क्रूप यांचे झारकालीन शस्त्रनिर्मिती उद्योगांवर जवळजवळ पूर्णच नियंत्रण होते; तर होअर्स, बेरिंग ब्रदर्स, हाम्ब्रोज, क्रेडिट लिओनेस, सोसायटी जनरेल, रॉथशील्डस् आणि कम्प्तोई नॅशनल एस्कॉम्पते द पॅरिस या सर्वांनी झारांच्या राजवटीत निरनिराळ्या उद्योगात मोठमोठ्या रकमा गुंतवल्या होत्या.

'या सर्व बड्यांचे हितसंबंध परस्परांशी निगडित आहेत,' मलोन हाऊस ऑफ कॉमन्सपुढे बोलत होता, 'व रशियातील युद्ध सातत्याने चालू राहावे हे त्यांच्या हितसंबंधाच्या दृष्टीने आवश्यक आहे. या सर्व भांडवलशहांच्या व धनकोंच्या मागे लोकमत साकार करणाऱ्या वृत्तपत्रांसारख्या बड्या शक्ती उभ्या आहेत.'

काही दोस्त राष्ट्रांचे प्रवक्ते, रशियात श्वेत लष्करांना ती राष्ट्रे देत असलेल्या पाठिंब्याच्या उद्दिष्टांबद्दल उघडपणे बोलत होते. रूसो—ब्रिटिश चेंबर ऑफ कॉमर्सच्या कार्यकारी मंडळाच्या अध्यक्ष व मेट्रो विकर्सचा युरोपीय व्यवस्थापक सर फ्रान्सिस बेकर याने १९१९ मध्ये ब्रिटिश—रशिया क्लबच्या

अनुक्रमणिका

खान्याच्या प्रसंगी उपस्थित असलेले उद्योगपती व राजधुरीण यांना उद्देशून केलेले भाषण त्या दृष्टीने उल्लेखनीय आहे. तो म्हणतो—

‘ॲडमिरल कोलचॅक व जनरल डेनिकिन यांना सुयश मिळावे अशीच आमची इच्छा आहे. आजच्या ह्या भोजनप्रसंगी मद्यचषक उचलताना प्रथम कोलचॅक, डेनिकिन व युदेनिच यांना आयुरारोग्य व यश लाभावे याकरिता शुभचिंतन करणे हे समुचित ठरेल.

‘रशिया हा एक फार मोठा देश आहे. औद्योगिक उत्पादन म्हणा की खनिज संपत्तीच्या दृष्टीने म्हणा, (एवढेच नव्हे तर इतरही सर्वच दृष्टींनी कारण रशियाजवळ सर्वच काही आहे) रशियाची सुप्त संपत्ती किती विशाल आहे, याबद्दल आपणा सर्वांना चांगली कल्पना आहेच; कारण धंद्याच्या निमित्ताने आपले रशियाशी निकटचे संबंध आलेले आहेत....’

इंग्लिश—फ्रेंच सैन्य व दारूगोळा सैबेरियात ओतला जात असता, ‘ब्रिटिश फेडरेशन ऑफ इंडस्ट्रीज’ या ब्रिटिश उद्योगपतींच्या सर्वात प्रबळ संघटनेच्या पत्रकात “एक अमेरिकेचा शोध वगळता सैबेरिया म्हणजे सुसंस्कृत जगाला प्राप्त होऊ शकणारे सर्वाधिक मोलाचे व प्रचंड पारितोषिक आहे” असा मोठा आकर्षक मथळा देऊन सैबेरियाचा उल्लेख करण्यात आला होता.

कॉकेशसमध्ये शिरून दोस्त लष्कराने बाकू काबीज केल्यानंतर ‘द नियर ईस्ट’ या ब्रिटिश व्यावसायिक नियतकालिकाने अशी बातमी प्रसिद्ध केली होती की ‘खनिज तेल समृद्धीबाबत बाकू अतुलनीय आहे. जगातील कोणत्याही तेल उत्पादक शहरापेक्षा बाकू श्रेष्ठ आहे. खनिज तेल हा एक राजा असेल तर बाकू त्याचे सिंहासन आहे!’

दोस्त राष्ट्रांच्या पाठिंब्याच्या बळावर जनरल डेनिकिनचे लष्कर डॉनच्या कोळसा क्षेत्रात घुसले, तेव्हा मेसर्स आर्. मार्टेन्स आणि कंपनी लिमिटेड या ब्रिटनमधील सर्वात मोठ्या कोळसासंघाने त्यांच्या ‘रशिया’ या व्यापारी प्रकाशनात असे जाहीर केले की—

‘रशियातील ज्ञात कोळशाचे साठे एक अमेरिका वगळता अन्य सर्व राष्ट्रांपेक्षा समृद्ध आहेत. एवढेच नव्हे तर आंतर्राष्ट्रीय जिऑलॉजिकल काँग्रेसने प्रसिद्ध केलेल्या अंदाजानुसार, ग्रेट ब्रिटनमधील कोळशाच्या अंदाजित साठ्यापेक्षा तिप्पटीने मोठा, तर अमेरिकेतील संपूर्ण कोळसा-साठ्यापेक्षा दुप्पटीने मोठा कोळशाचा साठा रशियाच्या एकट्या (जेथे सध्या जनरल डेनिकिनच्या लष्करी हालचाली सुरू आहेत) दोनेत्स क्षेत्रात आहे.’

शेवटी जपानच्या ‘सेल्समन’ने, जपानला आकर्षित करणाऱ्या रशियासंबंधीच्या निरनिराळ्या बाबींबद्दल—त्या राष्ट्राजवळ असलेल्या अमाप संपत्तीबद्दल सांगितले—

अनुक्रमणिका

‘त्या राष्ट्राची (रशियाची) अठरा कोटींची लोकसंख्या, मध्य युरोपपासून पॅसिफिक सागरापर्यंत व आर्क्टिक समुद्रापासून ते पर्शियाचे आखात व काळा समुद्र येथपर्यंत पसरलेली त्या राष्ट्राची सुपीक भूमी, अत्यंत समृद्ध, विशाल व अत्यंत वेगाने विकसित होत असलेल्या त्यांच्या बाजारपेठा, विकासाची प्रचंड क्षमता असलेले रशियाचे धान्य कोठार, तसेच मत्स्यव्यवसाय व इमारती लाकूड यांचे आगर असलेले ते राष्ट्र म्हणजे कोळसा, सोने, रुपे व प्लॅटिनमची जगातील एक अत्यंत समृद्ध अशी खाणच आहे.’

जी कोणची सत्ता रशिया जिंकेल, त्या सत्तेच्या पदरात ही अमाप संपत्ती पडणार असल्याने इंग्लिश, फ्रेंच व जपानी आक्रमक रशियाकडे जणू खेचले गेले. अमेरिकेच्या उद्दिष्टात आणखीही काही बाबींची सरमिसळ झाली होती. वुड्रो विल्सन व अमेरिकेचे युद्धखाते यांनी विशद केलेल्या अमेरिकेच्या पारंपरिक परराष्ट्रधोरणाच्या दृष्टीने रशियाची संभाव्य मैत्री अमेरिकेला मोलाची वाटत होती. जर्मनी व जपान या राष्ट्रांच्या उसळत्या साम्राज्यवादाला शह देण्याच्या दृष्टीने त्या मैत्रीचे त्यांना महत्त्व वाटत होते. त्यामुळे झारकालीन रशियात अमेरिकेची भांडवली गुंतवणूक तशी फार मोठी नसली तरी अमेरिकन परराष्ट्र खात्याच्या सल्ल्यानुसार डगमगत्या केरेन्स्की राजवटीला टेका देऊन टिकवून धरण्याकरिता कोट्यावधी डॉलर्स अमेरिकेने रशियात ओतले होते. बोल्शेविक क्रांतिनंतरही काही वर्षे अमेरिकेचे परराष्ट्र खाते केरेन्स्कीला पाठिंबा देतच होते; वॉशिंग्टन येथील केरेन्स्कीच्या ‘रशियन दूतावासा’ला पैसाही पुरवीत होते. परराष्ट्र खात्यातील बरेच अधिकारी, श्वेत रशियन सेनापती व इंग्लिश–फ्रेंच–जपानी हस्तक्षेपवादी यांच्याशी सहकार्य करीत होते.

सोविएत-विरोधी युद्धयोजनात पूर्णपणे समरस होऊन जाणारा व त्यांना सक्रीय प्रोत्साहन देणारा सुप्रसिद्ध अमेरिकन नेता म्हणजे हर्बर्ट हूवर. त्या काळचा अमेरिकन सरकारचा अन्नमंत्री व त्या राष्ट्राचा भावी अध्यक्ष.

पहिल्या महायुद्धापूर्वी खाणकाम इंजिनियर म्हणून ब्रिटिश उद्योगपतींच्या नोकरीत असलेल्या हर्बर्ट हूअरने रशियन तेलविहिरीत व खाणीत बराच पैसा गुंतवला होता. परकीयांकडून लठ्ठ लाच खाऊन, किंवा नफ्याच्या रूपाने भरपूर पैसा पदरात पाडून घेण्याच्या आशेने, आपल्या देशाची संपत्ती व श्रमशक्ती परकीयांना विकण्यास मागेपुढे न पाहणाऱ्या रशियन जमीनदारांचा व उच्च पदस्थ अधिकाऱ्यांचा झार राजवटीत सुळसुळाट झाला होता. १९०९ मध्येच, रशियाच्या माईकोप तेल विहिरीतून उत्पादनाला प्रारंभ होताच हर्बर्ट हूवरचे डोळे रशियन तेलावर खिळले होते. एक वर्षांतच–

१) माईकोप नेवतियानोय सिंडिकेट

२) माईकोप शिर्वान्स्की ऑईल कंपनी

३) माईकोप अप्शेरॉन ऑईल कंपनी

४) माईकोप अँड जनरल पेट्रोलियम ट्रस्ट

५) माईकोप ऑईल अँड पेट्रोलिअम प्रॉडक्टस्

६) माईकोप एरियाज ऑईल कंपनी

७) माईकोप व्हॅली ऑईल कंपनी

८) माईकोप म्युचुअल ऑईल कंपनी

९) माईकोप हादिजेन्सी सिंडिकेट

१०) माईकोप न्यू प्रोड्यूसर्स कंपनी

११) अमलगमेटेड माईकोप ऑईल फील्डस्

अशा अकरा रशियन तेल कंपन्यात त्याने भांडवल गुंतवले होते.

१९१२ पर्यंत त्या खाणकाम इंजीनियरने उरल व सैबेरियात इमारती लाकूड व खाणकाम या धंद्यात खास सवलती मिळवून धंदा करणाऱ्या तीन नव्या कंपन्यात लेस्की उर्कहर्ट या सुप्रसिद्ध कोट्याधीशाबरोबर भागीदारी मिळवली. यानंतर उर्कहर्टने एक 'रूसो एशियाटिक कॉर्पोरेशन' प्रस्थापित करून झारशाहीतील दोन बँकांशी हातमिळवणी केली व त्याद्वारा त्या क्षेत्रातील सर्व खाणकामाचे अधिकार मिळविले. रूसो—एशियाटिकच्या शेअरचा १९१३ मधील १६.२५ डॉलर्सचा भाव १९१४ मध्ये ४७.५० डॉलर्सपर्यंत चढला होता. त्याच वर्षी त्या कॉर्पोरेशनने झार राजवटीकडून तीन नव्या अत्यंत किफायतशीर सवलती मिळवल्या त्या अशा —

अंदाजे ७,२६२,००० टन सोने, रुपे व झिंक यांचे साठे, विशाल इमारती लाकूड क्षेत्र व फार मोठ्या प्रमाणात जलशक्ती उपलब्ध होऊ शकेल अशी अडीच लक्ष एकर भूमी; १२ विकसित खाणी, २ तांब्यांच्या भट्टया, २० लाकूड कटाई कारखाने, २५० मैलांचे रेल्वेमार्ग, तसेच वात भट्टया, रोलिंग मिल्स, सल्फ्युरिक ॲसिड कारखाने, सुवर्ण शुद्धीकरण कारखाने व कोळशाचे प्रचंड साठे. या संपत्तीची अंदाजित किंमत १०० कोटी डॉलर्स होती.

१९१७ पर्यंत हूवरने कॉर्पोरेशनमधून अंग काढून घेतले व त्याच्याजवळचे भागभांडवलही त्याने विकून टाकले. बोल्शेविक क्रांतीनंतर हूवरचा ज्या ज्या सवलतींशी संबंध होता, त्या सर्व रद्द करण्यात आल्या; व त्या खाणीही सोविएत सरकारने स्वतःकडे घेतल्या. यामुळे बोल्शेविझम युद्धापेक्षाही भयंकर आहे

असे हूवरने पॅरिस शांतता—परिषदेसमोर सांगावे यात नवल नव्हते! त्याच्या आयुष्यभर तो सोविएत सरकारचा जगातील सर्वात कट्टर शत्रू राहिला. त्याची स्वतःची व्यक्तिगत उद्दिष्टे कोणतीही असोत, पण एक सत्य मात्र नाकारता येत नाही; ते हे की अमेरिकन अन्नधान्याने श्वेत रशियनांचे पोषण झाले; एवढेच नव्हे तर पहिल्या महायुद्धानंतर जो लोकशाहीवादी उठाव झाला, तो दडपून टाकणाऱ्या युरोपातील कट्टर प्रतिक्रियावादी राजवटींच्या लष्करांच्या धडक पथकांना त्यांनी अन्नधान्य पुरविले. एकंदरीत अमेरिकन मदत युरोपच्या जनआंदोलनांच्या विरुद्ध एक शस्त्रच ठरले. [अन्नधान्य मदत प्रशासक म्हणून हर्बर्ट हूवरची सर्व कार्यवाही श्वेत रशियनांना मदत देणे व सोविएतांना कोणतेही साहित्य मिळू न देणे यावर केंद्रित झाली होती. सोविएत प्रदेशात लक्षावधी लोक उपासमारीने तडफडत होते त्यावेळी जनतेच्या दडपणामुळे वाकून थोडेफार अन्नधान्य सोविएत रशियाला हूवरने पुरविले असले तरी त्याच वेळी दुष्काळपीडित रशियाकरिता मदतनिधी गोळा करण्याच्या कार्यात तो सतत अडथळे आणीत होता असे विधान एप्रिल १९२२ च्या 'न्यूयॉर्क वर्ल्ड' मध्ये एका 'नियर ईस्ट रिलीफ' च्या अधिकाऱ्याने त्यावेळी केले होते. फेब्रुवारी १९२२ मध्ये हूवर वाणिज्य सचिव असताना 'न्यूयॉर्क ग्लोब' ने केलेली संपादकीय टिपणी उल्लेखनीय आहे— "न्यायखाते, परराष्ट्रखाते व वाणिज्यखाते यातील सर्व उच्चपदस्थ अधिकारी बोल्शेविक सरकारविरुद्ध खाजगीरित्या युद्ध चालवीत आहेत... वॉशिंग्टनमध्ये त्यांच्याविरुद्ध भयानक स्वरूपाचा प्रचार चालू आहे... परंतु जनतेचा असंतोष भलत्या थराला जाऊन पोचण्यापूर्वीच सर्वश्री हयूजेस, हूवर व डोगर्टी यांनी आपली स्वतःची घरे अगोदर स्वच्छे करून घेतली तर बरे होईल. कारण आपल्या स्वार्थी व हीन उद्दिष्टांकरिता लक्षावधी निरपराध लोकांना मरू देण्यास सज्ज असलेली घमेंडखोर व मग्रूर नोकरशाही अधिक काळ अमेरिकन लोक चालवून घेणार नाहीत."] बोल्शेविझमपासून युरोपचे संरक्षण करणे किंवा बोल्शेविकांच्या फौजा युरोपात शिरू न देणे या एकाच उद्दिष्टाने युद्धबंदीनंतरची संपूर्ण अमेरिकन नीती साकार होती, अशी स्पष्ट कबुली ओस्वाल्ड गॅरिसन विलार्ड यास १७ ऑगस्ट १९२१ रोजी लिहिलेल्या पत्रात हूवरने दिली होती.

हूवरची बोल्शेविझमची व्याख्या फॉक, पेताँ, नॉक्स, रॅली, तनाका यांच्या व्याख्येशी मिळतीजुळती होती. प्रथम वाणिज्य सचिव म्हणून, नंतर अमेरिकेचा अध्यक्ष म्हणून व त्यानंतर रिपब्लिकन पक्षाच्या अलिप्ततावादी गटाचा नेता म्हणून जागतिक फासिझमविरुद्धच्या लढ्यात, वस्तुतः जे राष्ट्र अमेरिकेचा सर्वात शक्तिशाली मित्र ठरू शकले असते त्या सोविएत रशियात व अमेरिकेत मैत्रिपूर्ण व्यापारी किंवा राजनैतिक संबंध प्रस्थापित होऊ नयेत याकरिता हूवरने त्याच्या संपूर्ण जीवनकाळात अविश्रांत धडपड केली.

दोस्त राष्ट्रांचा रशियातील लष्करी हस्तक्षेप सर्वस्वी अपयशी ठरला ते नव्याने मिळविलेले स्वातंत्र्य अबाधित राखण्याकरिता लढणाऱ्या सोविएत जनतेच्या अभूतपूर्व ऐक्यामुळे व शौर्यामुळे हे तर खरेच, पण त्याचबरोबर संपूर्ण जगातील लोकशाहीवादी जनतेचे सोविएत संघराज्याला दिलेला बळकट पाठिंबा हेही त्याचे एक प्रमुख कारण होते. फ्रान्स, इंग्लंड व अमेरिका या राष्ट्रातील जागृत लोकमताने रशियात सोविएत—विरोधी फौजा, शस्त्रे व पैसा पाठविण्यास खंबीरपणे विरोध केला. "रशियापासून आक्रमकांना दूर करा" अशी अट्टाहासाने मागणी करणाऱ्या संस्था त्या राष्ट्रात प्रस्थापित करण्यात आल्या. सर्वोच्च लष्करी अधिकाऱ्याच्या हस्तक्षेपवादी नीतीविरुद्ध कामगारांनी संप पुकारले; तर सैनिकांनी उठाव केले. राजनीतीज्ञ, वृत्तपत्रकार, शिक्षक व व्यापारी यांनी सोविएत संघाविरुद्ध कारणाशिवायच अघोषित युद्ध चालविण्याच्या नीतीचा खंबीरपणे निषेध केला.

अनुक्रमणिका

दोस्त राष्ट्रांच्या हस्तक्षेपवादी नीतीला सामान्य जनतेचा पाठिंबा नाही हे सत्य ब्रिटनचा उच्चपदस्थ लष्करी अधिकारी सर हेन्री विल्सन याने उघडपणे मान्य केले होते. १ डिसेंबर १९१९ रोजी अधिकृत 'ब्रिटिश ब्लू बुका'त त्याने पुढीलप्रमाणे नोंद केली—

'दोस्त राष्ट्रांनी सोविएत रशियाविरुद्ध निश्चित अशी नीती साकार करण्याच्या मार्गात बरेच अडथळे आहेत व ते दूर करणे कठिण झाले आहे. कारण रशियात बोल्शेविकांविरुद्ध सशस्त्र हस्तक्षेप करण्याचे समर्थन करण्याकरिता लागणाऱ्या आवश्यक तेवढ्या प्रबळ लोकमताची अनुकूलता कोणत्याही दोस्त राष्ट्रात आज नाही. त्याचा परिणाम असा झाला आहे की दोस्त राष्ट्रे रशियात चालवीत असलेल्या लष्करी मोहिमात ध्येय धोरणांची सुसंगती किंवा दृढ संकल्प उरलेला नाही.'

लाल लष्कराने त्यांच्या शत्रूंविरुद्ध मिळविलेला विजय हा सर्व राष्ट्रातील लोकशाहीवादी जनतेकरिता मिळालेला एक आंतरराष्ट्रीय विजय होता.

दोस्त राष्ट्रांचा रशियातील लष्करी हस्तक्षेप अपयशी ठरण्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण होते; ते म्हणजे त्यांच्यात आपसात ऐक्य नव्हते. हस्तक्षेपवाद्यांना प्रोत्साहन देणारी सर्व राष्ट्रे म्हणजे जागतिक प्रतिक्रियावाद्यांची एक युती होती हे खरे. परंतु खऱ्या अर्थाने उद्दिष्टे व कार्यवाही याबाबत त्यांच्यात सहकार्य नव्हते. साम्राज्यवादी राष्ट्रांच्या त्या युतीला परस्परांविरोधी हितसंबंध व साशंकता यामुळे आतून तडा गेल्या होत्या. काळ्या समुद्राच्या क्षेत्रातील फ्रेंचाच्या, तर बाल्टिक क्षेत्रातील जर्मनांच्या महत्त्वाकांक्षेची ब्रिटनला जबरदस्त धास्ती वाटत होती. सैबेरियाच्या प्रदेशातील जपानी महत्त्वाकांक्षा विफल ठराव्यात ह्याची निकड अमेरिकनांना वाटत होती; तर त्या यादवी युद्धातून पदरी पडणाऱ्या लाभांकरिता श्वेत नेते आपसात भांडत होते.

अप्रामाणिकता व गुप्त कपट—कारस्थान यातून उद्‌भवलेले ते अनर्थकारी युद्ध लाजिरवाण्या पराभवाने संपुष्टात आले. त्या युद्धाने मागे वारसा ठेवला तो पश्चिमात्य दोस्त राष्ट्रे व सोविएत संघ यांना परस्परांबद्दल वाटणारा अविश्वास, भीती व द्वेष या भावनांचा. या कारणामुळे नंतरच्या पंचवीस वर्षात युरोपचे राजकीय वातावरण अत्यंत विषमय होऊन गेले.

अनुक्रमणिका

प्रकरण ८

# श्वेतांचे धर्मयुद्ध

## हस्तक्षेपवादी युद्धानंतरची क्षुब्धता

सोविएत रशियाविरुद्धच्या युद्धाची ती पहिली फेरी काहीशी अनिर्णीतच राहिली. यादवी युद्ध व परकीय हस्तक्षेप अखेरीस संपुष्टात आले म्हणून सोविएत रशियापुढील जटिल समस्यांचा व संकटांचा अंत झाला असे घडले नाही. यादवी युद्धानंतर रशियन राष्ट्राचा बहुतेक सर्व प्रदेश सोविएत सरकारच्या अधिपत्याखाली आला होता हे खरे. पण जगातील इतर सर्व प्रमुख राष्ट्रांनी त्या राष्ट्राला वाळीत टाकले होते. दोस्त राष्ट्रांच्या हातातील बाहुली बनलेल्या शत्रुराष्ट्रांच्या कड्याने रशिया वेढले गेले होते. जगातील सर्व राष्ट्रांच्या राजकीय व व्यापारी देवाणघेवाणीपासून त्या राष्ट्राचा संबंध तोडला गेला होता. पृथ्वीच्या भूपृष्ठाचा एका षष्ठांश प्रदेश व्यापून असलेले राशिया अन्य प्रमुख राष्ट्रांच्या दृष्टीने जणू अस्तित्वातच नव्हते. त्या राष्ट्राच्या सोविएत सरकारला इतर राष्ट्रांची मान्यता नव्हती.

रशियाचे अंतर्गत क्षेत्रातील चित्रही अत्यंत चिंताजनक होते. पूर्णपणे नामशेष झालेले कारखाने, पाणी भरलेल्या खाणी, सर्वनाश झालेली शेती, तोडमोड झालेली वाहतूक व दळणवळण, यांबरोबरच रोगराई, दुष्काळ व सर्वत्र पसरलेली निरक्षरता, मागासलेपणा अशा बहुविध संकटांमुळे आर्थिक विध्वंसाची व सामाजिक अवनतीची समस्या सोविएत सरकारसमोर आ वासून उभी होती. सोविएत सरकारकडे वारसा आला होता तो सरंजामशाही झारराजवटीच्या दिवाळखोरीचा. त्यातच सात वर्षे सतत चालू असलेले युद्ध व क्रांती यामुळे झालेली उलथापालथ यांची भर पडली होती. या सर्व आघातांनी रशिया रक्तबंबाळ झाले होते. राष्ट्राचा श्वासच जणू कोंडला होता.

सोविएत सीमेपलीकडील जग १९२१ नंतरही, शांततेचा शोध घेण्याकरिता धडपडत होते. पण त्याला शांतता गवसत नव्हती. व्हर्साय तहानंतर चार वर्षांनी जागतिक परिस्थितीबाबत बोलताना सुप्रसिद्ध राजनीतीज्ञ बोनर लॉ याने, जगाच्या वेगवेगळ्या भागात त्यावेळी २३ निरनिराळी युद्धे सुरू असल्याची माहिती कॉमन्स सभेला दिली होती. चीनचा काही प्रदेश जपान बळकावून बसले होते व त्या राष्ट्राने कोरियातील स्वातंत्र्याची चळवळ निर्दयपणे दडपून टाकली होती. आयर्लंड, अफगाणिस्तान, इजिप्त व भारत या राष्ट्रातील जनआंदोलन चिरडून टाकण्याचे काम ब्रिटिश फौजा मोठ्या सातत्याने, चिकाटीने व जिद्दीने करीत होत्या; सिरियातील ड्रुस टोळ्यांविरुद्ध फ्रान्सने उघडपणे युद्ध चालविले होते (त्या ड्रुस टोळ्यांना ब्रिटनच्या मेट्रोविकर्स या कारखान्यात निर्माण झालेली शस्त्रे पुरविली जात होती याचे फ्रान्सला मोठेच दुःख होते); तर वायमर गणराज्याच्या पडद्याआडून कैसरकालीन जर्मन लष्करी अधिकारी

अनुक्रमणिका

जर्मनीतील लोकशाहीवाद्यांना दडपून टाकून जर्मन साम्राज्यवादाचे पुनरुज्जीवन करण्याकरिता धडपत होते.

फासिस्ट, राष्ट्रवादी लष्करवादी व राजसत्तावादी हे सर्व गट स्वार्थाकरिता करीत असलेल्या कारस्थानांमुळे युरोपातील प्रत्येक राष्ट्र ढवळून निघत होते आणि त्यांच्या त्या सर्व कुटिल कारवायांकरिता बोल्शेविझम–विरोध हे निमित्त ते सर्व गट पुढे करीत होते.

युद्धानंतरच्या पहिल्या काही वर्षात ब्रिटिश परराष्ट्र कार्यालयाने एका गुप्त निवेदनात त्याकाळच्या युरोपच्या स्थितीचे वर्णन केले होते, ते असे–

'सध्याचे युरोप विजेते, पराजित व रशिया अशा तीन गटात विभागले गेले आहे. युरोपीय राष्ट्रकुलातील एक शक्ती म्हणून रशिया राजकीय क्षेत्रातून दिसेनासे झाल्यामुळे एक प्रकारची अनिश्चितता व पोकळी राजकीय वातावरणात भरून राहिलेली आहे व त्यामुळे पश्चिम युरोपच्या आरोग्यावर विघातक परिणाम होत आहे.

'पहिल्या महायुद्धातील आपली सर्व शत्रुराष्ट्रे, त्यांनी युद्धानंतर जे जे गमावले त्याकरिता असंतोषाने जळफळत आहेत, तर युद्धातील आपली मित्रराष्ट्रे त्यांना जे काही मिळाले आहे ते हातातून सुटणार तर नाही ना या आशंकेने अस्वस्थ झाली आहेत. अर्धे युरोप, धोकादायक ठरण्याइतपत संतप्त आहे, तर उरलेले अर्धे युरोप, धोकादायक ठरण्याइतपत भयग्रस्त आहे. भीतीच्या भावनेतूनच अस्थिरता, शस्त्रसंचय, गुप्त करारमदार, अल्पसंख्यांकांचा छळ अशा गोष्टी उद्‌भवतात. त्याची परिणती द्वेषभावना व सूडबुद्धी तीव्रतर होण्यात होते व शेवटी त्याचा परिणाम घातक ठरतो. त्यामुळे एक प्रकारचे दुष्टचक्र चालू राहते.

'आज कोणत्याही प्रकारचा आक्रमक पवित्रा घेणे जर्मनीला अशक्य असले तरी त्या राष्ट्राची लष्करी विकासक्षमता लक्षात घेता जर्मनी पुन्हा लवकरच सावरेल व एक प्रबळ लष्करी सत्ता बनेल यात शंका नाही. तसे पुनःप्राप्त जर्मन सामर्थ्य ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध वापरण्याची आशा अनेक जर्मन लोक उराशी बाळगून आहेत.'

एकीकडे आत्मसंतुष्ट ब्रिटनचे परराष्ट्र खाते, रशिया म्हणजे अटलांटिक पलीकडील अत्यंत धोकादायक अनिश्चितता आहे, असे मानून सर्व लक्ष रशियावर केंद्रित करीत होते व त्याकरिता जर्मनीला पुन्हा शस्त्रसज्ज करीत होते तर त्याच काळात दुसरीकडे, विल्सननंतरच्या काळातील गोंधळात अमेरिकन राष्ट्राने गौरवपूर्ण अलिप्ततेच्या अवगुंठनात स्वतःला गुरफटून घेतले होते. त्या काळच्या अमेरिकेचे ते स्वप्नरंजन 'सामान्य परिस्थितीचे पुनरागमन' अशा शब्दात व्यक्त करण्यात येत होते. न्यूयॉर्क वर्ल्डकरिता लिखाण करणाऱ्या वॉल्टर लिपमनने 'सामान्य परिस्थिती' या शब्दप्रयोगात अंतर्भूत होणाऱ्या कल्पना प्रतिपादित केल्या होत्या, त्या अशा–

— अमेरिकेचे भवितव्य युरोपच्या भवितव्याशी कोणत्याही प्रकारे निगडित नाही;

— स्वतःच निर्माण केलल्या गोंधळात युरोपने हवे तसे आकंठ बुडावे;

— युरोपकडून काहीही खरेदी न करता आम्ही युरोपला पुष्कळच काही विकू शकतो.

— हे जर युरोपला पटत नसेल तर त्यांनी त्यांच्या मालाचा ढीग करून ठेऊन द्यावा; पण अर्थातच त्यांच्यातच हितसंबंधांच्या दृष्टीने त्यांनी तसे न करणे बरे!

निष्कर्षादाखल वॉल्टर लिपमन पुढे म्हणतो, 'युद्धोत्तरकाळात दृढावलेली भीती व गोंधळ यामुळे, फौजांचे संघटन, वेडगळ वाटणाऱ्या जकाती, रानवट बेताल राजनीती, विकृत राष्ट्रवाद, फासिस्ट विचारप्रणाली, कु-क्लुक्सर, अशा गोष्टी निर्माण झाल्या आहेत....'

आत्यंतिक असंतोष, युद्धामुळे झालेला शक्तिपात व आर्थिक अराजक यांचे थैमान युरोपात चालू असूनही पोलंड, फिनलंड, रुमानिया, युगोस्लाविया, फ्रान्स, इंग्लंड व जर्मनी याचे लष्कर प्रमुख सोविएत रशियावर करावयाच्या हल्ल्याच्या योजना आखून त्यांचा अव्याहतपणे व मोठ्या गांभीर्याने अभ्यास करीत होते.

सोविएत-विरोधी प्रचार हिरीरीने चालूच होता. या भूतलावरून युद्धाचे कायमचे उच्चाटन करण्याकरिता लढल्या गेलेल्या महायुद्धानंतर चारच वर्षांनी, दुसऱ्या महायुद्धाला आवश्यक त्या सर्व गोष्टी भरपूर प्रमाणात युरोपीय राजकारणात दडलेल्या दिसत होत्या. ते दुसरे महायुद्ध बोल्शेविझम-विरोधाच्या नावाखाली जगातील लोकशाही विरुद्ध लढले जाणार होते.

## श्वेत रशियनांचे निर्गमन

कोलचॅक, युदेनिच, डेनिकिन, रँगल व सेम्योनोव यांच्या फौजांच्या निर्णायक पराभवाबरोबर झारशाहीचा प्रचंड परंतु कालबाह्य ठरेलला डोलारा शेवटी पूर्णपणे कोलमडून पडला. आणि त्याबरोबर झारशाहीने शतकानुशतके पोसलेल्या व झारशाहीचे प्रतिक बनलेल्या क्रौर्याचे, रानवटपणाचे व प्रतिक्रियावादाचे कुजलेले व मोडून पडलेले तुकडे दूरपर्यंत फेकले गेले. दयामायाशून्य साहसी मंडळी, अनवतीप्रत गेलेले अमीर उमराव, दहशतवादी, लुटारू सैनिक, जनतेच्या हृदयात धडकी भरविणारे गुप्त पोलीस व अन्य लोकशाही विरोधी शक्तीचे प्रतीक असलेले श्वेत प्रतिक्रियावादी, हे सगळे, एखादा गढूळ पाण्याचा लोंढा वाहून जावा तसे रशियाबाहेर पडले. श्वेत सेनापतींचे अमानुष क्रौर्य, 'ब्लॉक हंड्रेडस्'ची

अनुक्रमणिका

ज्यूविरोधी हल्ल्यांची तत्त्वप्रणाली, झारशाहीचा भयानक लोकशाहीविरोध व इतर अनेक प्रकारचे पूर्वग्रह यांसह ते पूर्व, पश्चिम व दक्षिण दिशांनी, युरोप, दूरपूर्व व उत्तर व दक्षिण अमेरिका या खंडात पसरले.

ज्यूंच्या कत्तली भडकविण्यासाठी 'प्रोटोकोल्स ऑफ झिऑन' या सारखी, ओछानाने तयार केलेली ज्यूविरोधी बनावट कागदपत्रे, 'ज्यूंचा आंतर्राष्ट्रीय कट' हेच जगातील सर्व अनर्थांचे मूळ आहे असे जनतेच्या मनावर बिंबविण्याकरिता तयार करण्यात आलेले 'ब्लॅक हंड्रेडस्चे 'बायबल', अशी कागदपत्रे लंडन, न्यूयॉर्क, पॅरिस, ब्यूनॉसायर्स, शांघाय, माद्रिद या राजधान्यांतून उघडपणे प्रसृत केली गेली. जेथे जेथे हे श्वेत रशियन गेले तेथे त्यांची जागतिक प्रतिक्रांतीला व फासिझमला खत पाणी घातले.

१९२३ च्या सुमारास जवळजवळ पाच लक्ष श्वेत रशियन्स् जर्मनीत राहात होते तर चार लक्ष फ्रान्समध्ये, व सुमारे ९० हजार पोलंडमध्ये गेले. याशिवाय हजारो निर्वासित रशियन लोक बाल्टिक व बाल्कन राज्यात व चीन, जपान कॅनडा, संयुक्त संस्थाने व दक्षिण अमेरिका येथे गेले. तीन हजार झारकालीन रशियन अधिकारी त्यांच्या कुटुंबियांसह एकट्या न्यूयॉर्क शहरात स्थायिक झाले होते.

रशिया सोडून गेलेल्या निर्वासितांची एकूण संख्या १५ ते २० लक्षापर्यंत असावी असा अंदाज होता. [रशिया सोडून गेलेले सर्वच निर्वासित प्रतिक्रांतिवादी होते असे नाही. तर क्रांतिकाळात गोंधळलेले, स्वस्थानापासून ढळलेले व क्रांतिकाळातील प्रंचड उलथापालथीमागील आशय आकलन न झालेले हजारो लोक निर्गमन करणाऱ्या लोकांच्या लोंढ्यात सापडले. एका राष्ट्रातून दुसऱ्या राष्ट्रात भटकतभटकत नव्या अपरिचित जगात पोटापाण्याचा व्यवसाय शोधीत ते धडपडत होते. काही टॅक्सीचालक बनले तर अनेक उपहारगृहात परिवेशक बनले, घरकाम करणारे नोकर व स्वंयपाकी बनले. पश्चिम युरोपातील शहरातून उपासमारीने जर्जर झालेले अनेक लोक भिकारी बनले, तर, हार्बिन, शांघाय व पेकिंग येथील वेश्यागृहांत श्वेत रशियनांची चांगलीच गर्दी झाली.] पॅरिस येथे मध्यवर्ती कार्यालय प्रस्थापित करून, लष्करी संघांच्या देखरेखीखाली युरोप, दूरपूर्व व अमेरिका येथे स्थायिक झालेले श्वेत रशियनांचे सशस्त्र गट सोविएत रशियाविरुद्ध आक्रमणाची नव्याने सिद्धता करीत असल्याचे उघडपणे जाहीर करीत होते.

उत्तर आफ्रिकेच्या बिझर्ट या बंदरात फ्रेंच सरकारने श्वेत रशियनांकरिता एक नाविक प्रशिक्षणकेंद्र सुरू केले. तेथे ६००० अधिकारी व नौसैनिक यांसह झारकालीन नौदलाची ३० जहाजे पाठविण्यात आली होती. झारशाहीतील लष्करी अधिकारी व त्यांची मुले यांच्या प्रशिक्षणाकरिता युगोस्लाव सरकारने खास विद्यापीठे प्रस्थापित केली. बॅरन रँगलच्या लष्करातील मोठमोठे गट जसेच्या तसे बाल्कन क्षेत्रात पाठविण्यात आले. १८ हजार कोसॅक व घोडदळाचे बारगीर युगोस्लावियात, १७ हजार श्वेत सैनिक बल्गेरियात तर ग्रीसमध्ये व हंगेरीत हजारो श्वेत सैनिक पाठविण्यात आले. बाल्टिक व बाल्कन राज्यातून गुप्त पोलीस खात्याच्या अनेक शाखांची संपूर्ण यंत्रणा श्वेत रशियनांच्या हाती दिली गेली. ते तेथील सरकारात महत्त्वाच्या पदांवर अधिकारी बनले.

मार्शल पिल्सुदस्कीच्या मदतीने रशियन दहशतवादी बोरिस साविन्कोव याने ३० हजाराचे श्वेत लष्कर पोलंडमध्ये पुन्हा संघटित केले.

अनुक्रमणिका

आपले उरलेसुरले लष्कर बरोबर घेऊन अतामन सेम्योनेव जपानमध्ये पळून गेला. पेत्लुरा पॅरिसमध्ये स्थायिक झाला व तेथे त्याने तत्काळ, निरनिराळ्या स्वरूपाची सोविएत-विरोधी कारस्थाने सुरू केली. [पॅरिसमधील अमेरिकन परराष्ट्रखात्याच्या अधिकाऱ्यानी दिलेल्या परवान्याच्या आधारे जनरल अँटन डेनिकिनला अमेरिकेत कायम रहिवासी म्हणून प्रवेश देण्यात आला.] जर्मन कैसरच्या लष्कराशी ज्यांनी युक्रेनमध्ये संगनमत केले होते, ते जनरल क्रास्नोव व हेटमन स्कोरोपदस्की बर्लिनमध्ये वास्तव्यास गेले. त्यांना तेथील जर्मन लष्करी गुप्तहेर खात्याच्या एका गटाने आपल्या संरक्षणाखाली घेतले.[रशियाविरुद्ध परकीयांच्या हस्तक्षेपवादी लष्कराचे नेतृत्व केलेल्या अनेक सेनापतींचा उर्वरित जीवनक्रम हा एक कुतूहलाचा विषय आहे. सिरोवी व गायदा हे झेक सेनापती प्रागला परत गेले. तेथे सिरोवी हा झेक लष्कराचा सरसेनापती बनला तर गायदा लष्कर- अधिकारीप्रमुख बनला. १९२६ मध्ये, तेथे झालेल्या पण अपयशी ठरलेल्या फासिस्ट उठावात. व त्यानंतरही फासिस्टांनी केलेल्या कटकारस्थानात जनरल गायदाचा सक्रीय सहभाग होता. १९३८ मध्ये हिटलर झेकोस्लोवाकिया गिळंकृत करण्याचा प्रयत्नात असता, झेक लष्करी फितुर म्हणून सिरोहीने महत्त्वाची भूमिका बजावली. ब्रिटिश सेनापती नॉक्स, इंग्लंडला परत गेल्यानंतर, पार्लमेंटमधील टोरी सदस्य म्हणून आणि सोविएत-विरोधी चळवळीचा जहाल नेता व 'फ्रेंड्स ऑफ नॅशनॅलिस्ट स्पेन' या संस्थेचा संस्थापक म्हणून तो सोविएत-विरोधी कारवाया करीत राहिला. फॉक, पेताँ, वेगाँ, मॅनरहीम, तनाका, हॉफमन हे सर्व युद्धोत्तरकाळातील सोविएत-विरोधी व फासिस्ट चळवळीचे नेते बनले.]

१९२० मध्ये, फ्रान्समध्ये व अन्य राष्ट्रांत फार मोठे भांडवल गुंतविलेले धनिक रशियन निर्वासित पॅरिसमध्ये एकत्र जमले व त्यांनी एक संघटना प्रस्थापित केली. या संघटनेने, भविष्यात सोविएत रशियाविरुद्धच्या सर्व कटकारस्थानांत महत्त्वाची भूमिका बजावली. त्या संघटनेला त्यांनी 'तोर्गप्रोम' किवा रशियन व्यापार, वित्त व औद्योगिक समिती असे नाव दिले. त्यात झारशाहीतील बँकर्स, उद्योगपती व व्यापारी यांचा समावेश होता. रशियाच्या बाकू तेलविहिरींच्या उद्योगात नियंत्रकाचे अधिकार मिळविलेला जी. एन् नोबेल, रशियन 'रॉकफेलर' स्टीफन लिआनोझोव, झारशाहीतील सुप्रसिद्ध व्यापारी कुटुंबाचा एक सदस्य व्लादिमिर रियाबुशिन्स्की, पोलाद उद्योगातून अमर्याद पैसा गोळा केलेला एन्. सी. डेनिसोव व इतर अनेक धनिक, आणि जगाच्या व्यापार व उद्योग क्षेत्रातील अग्रगण्य रशियन राजसत्तावादी त्या संस्थेचे सदस्य होते.

याशिवाय रशियात बुडीत खात्यात गेलेली गुंतवणूक परत मिळविता येईल, व सोविएत राजवट उलथून पाडल्यास काही किफायतशीर नव्या सवलती मिळवून घेता येतील, या आशेने अनेक ब्रिटिश, फ्रेंच व जर्मन उद्योपतीही 'तोर्गप्रोम' मध्ये सामील झाले होते.

बोल्शेविकांशी आर्थिक आघाडीवर शक्य त्या सर्व प्रकारे लढा देणे हे तोर्गप्रोमचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्या संघटनेचा अध्यक्ष डेनिसोव याने स्पष्ट केले; तर लवकरात लवकर पितृभूमीचे पुनरुज्जीवन व्हावे व त्या पितृभूमीची पुन्हा सेवा करता यावी असे तोर्गप्रोमच्या सदस्यांना आत्यंतिक तीव्रतेने वाटत असल्याचे नोबेलने सांगितले.

परंतु तोर्गप्रोमच्या सोविएतविरोधी कारवाया आर्थिक आघाडीपुरत्या मर्यादित नव्हत्या. 'व्यापार व उद्योग समिती सोविएत सरकारविरुद्ध सातत्याने व नेटाने लढा चालू ठेवील, रशियात घडत असलेल्या घटनांचा खरा अर्थ सुसंस्कृत देशांतील जनतेला विशद करून सांगेल व स्वातंत्र्य व सत्य याकरिता

अनुक्रमणिका

भविष्यात उठाव करण्याची सिद्धता करील' असे तोर्गप्रोमने एका निवेदनाद्वारा अधिकृतपणे जाहीर केले होते.

### रेवालचा एक सद्‌गृहस्थ

झारशाहीतील जुने अधिकारी, उद्योगपती व अमीर उमराव यांच्या एका गटाने जून १९२१ मध्ये बव्हेरियातील राइशेनहाल येथे एक सोविएत विरोधी परिषद बोलावली. त्या परिषदेला संपूर्ण युरोपातील सोविएत–विरोधी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी सोविएत रशियाविरुद्ध जागतिक चळवळ उभारण्याची एक योजना आखली.

याच परिषदेने एक सर्वोच्च राजसत्तावादी समिती निर्वाचित केली. रशियन साम्राज्याच्या मूलभूत कायद्यानुसार रोमानोव राजघराण्यातील कायदेशीर सम्राटाच्या नेतृत्वाखाली राजसत्तेच्या पुनःस्थापनेकरिता कार्य करणे हे त्या समितीचे प्रमुख उद्दिष्ट होते.

नव्यानेच जर्मनीत मूळ धरू लागलेल्या जर्मनीच्या नॅशनल सोशलिस्ट पक्षाने आपला प्रतिनिधी या परिषदेला पाठविला होता. तो होता अल्फ्रेड रोझेनबर्ग.

सडसडीत, पांढुरक्या वर्णाचा, पातळ ओठ व काळे केस असलेला व सतत कुठल्यातरी गहन विचारात गढल्यासारखा वाटणारा अल्फ्रेड रोझेनबर्ग हा १९१९ च्या ग्रीष्मात बरेचदा म्युनिकच्या बीअर हॉलमध्ये दिसत असे. कधी तो ऑगस्टिनेरब्राऊ मध्ये तर कधी फ्रान्झिस्कानेरब्राऊ मध्ये तासन्‌तास एका कोपऱ्यातील टेबलाशी एकटा बसलेला असे. क्वचित कधी त्याच्याबरोबर काही साथीदार असत. त्यांचे स्वागतही तो बहुधा थंडपणेच करी; पण पुष्कळदा त्याच्या वागणुकीत मात्र फरक पडे. त्याच्या काळ्याशार डोळ्यात चमक दिसे, आणि तो हलक्या पण भावपूर्ण आवाजात साथीदारांशी बोलू लागला की त्याचा चेहरा उजळून निघे. रशियन व जर्मन दोन्ही भाषा तो सारख्याच अस्खलितपणे बोलत असे.

झारशाहीत, रेवाल बंदराजवळ फार मोठी स्थावरजंगम इस्टेट असलेल्या एका बाल्टिक जमीनदाराचा तो मुलगा होता. मध्ययुगात बाल्टिक राज्यांवर ज्या ट्यूटॉनिक सरदारांनी आक्रमण केले त्यापैकी एका सरदाराचा वंशज असल्याचा त्याचा दावा होता. स्वतः जर्मन असल्याचा त्याला मोठा अभिमान होता. रशियन क्रांतीपूर्वी मास्कोच्या 'पॉलिटेक्निकुम' या शिक्षण केंद्रात त्याने स्थापत्यशास्त्राचा अभ्यास केला होता. बोल्शेविकांच्या हाती सत्ता जाताच पळून जाऊन जनरल काऊंट रुडिगर वॉन डेर गोल्टझ् याच्या नेतृत्वाखाली बाल्टिक क्षेत्रात लढणाऱ्या श्वेत सैन्यात तो भरती झाला. १९१९ मध्ये तो म्युनिक येथे आला तेव्हा झारशाहीतील 'ब्लॅक हंड्रेडस्' च्या लोकशाही–विरोधी व ज्यू–विरोधी तत्वप्रणालीने त्याचे मन खदखदत होते.

अनुक्रमणिका

लवकरच कम्युनिस्ट व ज्यू यांच्याविरुद्ध रोझेनबर्गने तळतळून केलेल्या वक्तृत्वाचे जहरी हल्ले ऐकण्याकरिता श्वेत निर्वासितांचा व बाल्टिक क्षेत्रात ज्यांच्या हातून सोविएत सरकारने जमीनी काढून घेतल्या होत्या अशा जमीनदारांचा गट म्युनिक येथे नियमितपणे जमू लागला. बाल्टिक क्षेत्रातील जनरल वॉन डेर् गोल्टझचा सर्वात क्रूर सेनापती व रासपुटिनचा एके काळचा मित्र राजकुमार अबालोव–बरमॉंट आणि बॅरन श्नेऊबेर–रिचटेर व बॅरन अर्नो वॉन शिकेडान्झी हे दोन दयामायाशून्य बाल्टिक उमराव, ज्यूविरोधी हल्ल्यात सहभागी असलेला व कैसरने युक्रेनमध्ये स्थापिलेल्या कळसूत्री सरकारात दळणवळण मंत्री असलेला इवान–पोल्तोवेत्झ–ओस्ट्रानित्झा, हेटमन पॉल स्कोरोपदस्की, ही रोझनबर्गच्या म्युनिक येथील श्रोतृवृंदातील काही प्रमुख मंडळी होती. 'अवनतीप्रत गेलेली लोकशाही व ज्यूंचे आंतर्राष्ट्रीय कटकारस्थान, यासंबंधीच्या रोझेनबर्गच्या 'ब्लॅक हंड्रेडस्' विचारसरणीशी ते सर्व पूर्णपणे सहमत होते. 'प्रत्येक ज्यू हा मनातून बोल्शेविकच आहे' हे रोझेनबर्गच्या वाक्हल्ल्याचे एक धृपद होते.

ज्यूंबद्दल आत्यंतिक घृणा व सोविएतांप्रती ज्वलज्जहाल द्वेष व शत्रुत्व यांचे रोझेनबर्गच्या मनात जणू एक विषारी मिश्रण तयार झाले होते. त्यातून हळूहळू प्रतिक्रांतीचे जागतिक तत्त्वज्ञान साकार होऊ लागले. झारशाही रशियाचे तर्कदुष्ट पूर्वग्रह व साम्राज्यवादी जर्मनीची असीम महत्त्वाकांक्षा यांचे रंग त्यात भरलेले होते. 'द मिथ ऑफ द ट्वेन्टीएथ सेंचुरी' या त्याच्या पुस्तकात केलेले रोझेनबर्गचे आग्रही प्रतिपादन असे की 'ज्यूंची अवनत लोकशाही व बोल्शेविझम यापासून जगाची सुटका होण्याचा मार्ग नव्या जर्मनीच्या निर्माणाबरोबर जर्मनीतून निघणार असून, त्या हेतूने ट्यूटॉनिक राज्यव्यस्थेच्या धर्तीवर एक संघ स्थापन करणे हे नव्या जर्मन राष्ट्राच्या संस्थापकाचे आद्य कर्तव्य राहील. सर्व जग जिंकून घेण्याचे महत्कार्य जर्मन महामानवाच्या वंशाने पार पाडावयाचे आहे. उत्तरेकडील निळ्या डोळ्यांच्या व भुऱ्या केसांच्या त्या वंशाकडूनच जगाच्या इतिहासाचा अर्थ स्पष्ट झाला आहे. त्या वंशामुळेच, निरनिराळ्या काळात, जगाचे आत्मिक रूप साकार झाले आहे.'

सोविएत रशियाविरुद्ध पवित्र धर्मयुद्ध चालविण्याची कल्पना हे रोझेनबर्गच्या सर्व लिखाणाचे प्रमुख सूत्र होते. नव्या ट्यूटॉनिक राज्यव्यवस्थेच्या सामर्थ्यसंपन्न फौजा रशियन सीमा ओलांडून अत्यंत घृणास्पद अशा बोल्शेविकांचा सर्वनाश करतील व तो दिवस लवकरच उजाडेल अशी त्याची खात्री होती. भविष्यातील त्या दिवसाकडे त्याचे डोळे लागून राहिले होते 'बोल्शेविझमचा उच्छेद करणाऱ्या फौजेची दिशा पश्चिमेकडून पूर्वेकडे, ऱ्हाईनपासून वाईशेलकडे जाणारी असेल; मास्कोपासून तोम्सकपर्यंत त्या फौजेची रणदुंदुभी निनादली पाहिजे' अशा शब्दात रोझेनबर्ग बोल्शेविझमचा निःपात होण्यासंबंधीच्या त्याच्या आशेला अभिव्यक्ती देत असे.

युद्धोत्तर काळात, बोकाळलेली मोठ्या प्रमाणावरील बेकारी, अभूतपूर्व महागाई व व्यापक क्षेत्रावरील उपासमार अशा गहन समस्या जर्मनीला त्याकाळी भेडसावीत होत्या. जर्मन कामगार व सैनिकांची सोविएत्स् शस्त्रबळावर दडपून टाकल्यानंतर दोस्त राष्ट्रांच्या आशिर्वादाने व जर्मन उच्च लष्करी अधिकाऱ्यांच्या सहकार्याने वायमर लोकसत्ताकाची स्थापना करण्यात आली होती. त्या लोकसत्ताकाच्या दर्शनी डोलाऱ्याआडून प्रशियन लष्करवादी, जमीनदार, उद्योगपती हे जर्मन साम्राज्याच्या

अनुक्रमणिका

नवनिर्माणाकरिता व विस्ताराकरिता चोरूनलपून कारस्थाने करण्यात व्यग्र होते. बर्लिन नजीकच्या जंगलात बोरसिंग येथे एका कंपनीने संशोधन व नियोजन याकरिता उभारलेल्या गुप्त प्रयोगशाळेत, जर्मन लष्करी उच्चाधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली, शेकडोंनी इंजीनिअर्स व तंत्रज्ञ मोठ्या एकाग्रतेने जर्मनीच्या भावी लष्करीकरणाच्या योजना आखीत होते बाहेरील जगाला मात्र त्यांची गंधवार्ताही नव्हती.

युद्धाखेरी, ३ ब हा जर्मन लष्करी गुप्तचर विभाग, वरवर पाहता, विसर्जित करण्यात आला असला तरी प्रत्यक्षात मात्र क्रप, हयूगेनबर्ग व थायसेन या व्यापारी प्रतिष्ठानांनी सढळ हातांनी दिलेल्या द्रव्यसहाय्याच्या बळावर तो विभाग पुनः संघटित करण्यात आला होता; व कर्नल वॉल्थेर निकोलाय या जुन्या ज्यूविरोधी नेत्याच्या मार्गदर्शनाखाली त्या विभागाच्या कार्याला जोमाने चालना देण्यात आली होती. जर्मनीने नव्याने सुरू करावयाच्या युद्धाच्या योजना तपशीलासह मोठ्या काळजीपूर्वक तयार करण्यात येत होत्या. जर्मन साम्राज्यवादाला नवशक्ती प्रदान करण्याकरिता चालू असलेल्या मोहिमेला द्रव्याचा भरपूर पुरवठा करणाऱ्यात मृदुभाषी व उत्साही उद्योगपती अर्नोल्ड रेशबर्ग हा प्रमुख होता. जर्मन युवराजाचा एके काळचा मदतनीस व जर्मन साम्राज्याच्या लष्कर प्रमुखांचा घनिष्ट मित्र असलेला रेशबर्ग हा जर्मनीतील पोटॅश प्रतिष्ठानांशी संबद्ध होता. जर्मनीतील राष्ट्रवादी व ज्यूविरोधी गुप्त संस्थांचा तो एक प्रमुख पुरस्कर्ता होता. या त्याच्या मतांमुळेच अल्फ्रेड रोझेनबर्गकडे त्याचे लक्ष वेधले गेले.

रेशबर्गने रोझेनबर्गची भेट घेतली तेव्हा रेवालचा तो उत्साही व जहाल प्रतिक्रांतिवादी रेशबर्गला एकदम पसंत पडला. त्याने त्याच्या पंखाखाली असलेल्या एका हस्तकाशी रोझेनबर्गची गाठ घालून दिली. तो होता तीस वर्षाचा एक ऑस्ट्रियन नागरिक,—राईश्वेरचा हेर—अडॉल्फ हिटलर.

अडॉल्फ हिटलरच्या नाझी पक्षाकरिता गणवेश व अन्य अनेक गोष्टी पुरविण्याकरिता रेशबर्ग हा प्रारंभापासून पैसा पुरवीत असे. आता, रेशबर्ग व त्याचे धनिक मित्र यांनी 'वोल्किशेर बेबाश्टेर' हे तोपर्यंत फारसे प्रसिद्धीला न आलेले वृत्तपत्र विकत घेऊन ते नाझी चळवळीच्या हाती दिले. ते वृत्तपत्र नाझी पक्षाचे अधिकृत मुखपत्र बनले. हिटलरने त्या वृत्तपत्राचा संपादक म्हणून रोझेनबर्गची नियुक्ती केली.

'वोल्किशेर बेबाश्टेर' नाझी पक्षाच्या हाती आल्यानंतर दहाच दिवसांनी १९२१ च्या नववर्षदिनी त्या वृत्तपत्राने हिटलरच्या नाझी पक्षाच्या मूलभूत परराष्ट्र धोरणाची रूपरेषा स्पष्ट केली व त्याने सांगितले की—

'ज्यावेळी, जर्मनीच्या पूर्वकडील मार्गावर वादळ उठण्याची संभाव्यता दिसेल, त्यावेळी आत्मबलिदानास सिद्ध असलेल्या लक्षावधी लोकांना आपल्याला संघटित करावे लागेल. पूर्वेकडील ज्यूंवर हल्ले होतील त्यावेळी पश्चिमेकडील ज्यू साहजिकच दुःखाने आर्त स्वरात आरडाओरडा करतील; तेव्हा त्यांना तोंड देण्याची तयारी आपल्याला करावी लागेल…पण एक गोष्ट मात्र नक्की की दुसऱ्या तानेनबर्गनंतर रशियन सैन्य त्यांच्या सीमेपासून खूप दूर मागे हाकलले जाईल; ते महत्कार्य एकटे जर्मनी करणार आहे; आणि त्यानंतरच आपल्या खऱ्या पुनःनिर्माणाची सुरुवात होणार आहे…'

अनुक्रमणिका

हे संपादकीय अल्फ्रेड रोझेनबर्गने लिहिले होते. सरंजामशाही झारवाद व विसाव्या शतकातील जर्मन साम्राज्यवाद यांच्या युतीतून नाझीझम साकार होत होता.

**हॉफमन योजना**

जर्मन नाझीवादाला राजकीय तत्त्वज्ञान अल्फ्रेड रोझेनबर्गने पुरवावयाचे होते; तर रेशबर्गचा दुसरा एक मित्र जनरल मॅक्स हॉफमन हा नाझीवादाला लष्करी तंत्र व डावपेच देणार होता.

जनरल हॉफमनने तरुणपणी, झार-दरबारी राजदूतांचा मदतनीस म्हणून बरीच वर्षे रशियात घालविली होती. जर्मन भाषेपेक्षाही रशियन भाषा तो अस्खलित बोले. १९०५ मध्ये जनरल वॉन श्लीफेनच्या नोकरवर्गात कॅप्टन म्हणून ३५ वर्षीय हॉफमनची नियुक्ती झाली, तेव्हा १९०४—१९०५ च्या रशिया—जपान युद्धाच्या काळात, पहिल्या जपानी लष्करात संपर्क अधिकारी म्हणून त्याने काम केले. त्या युद्धात संख्याबळाने वरचढ असलेल्या रशियन लष्कराला, युद्धसाहित्याचा भरपूर पुरवठा करण्यात आलेला असूनही केवळ हीन व आत्मविश्वासशून्य नेतृत्वामुळे संरक्षणात्मक पवित्रा कसा घ्यावा लागला होता, व अत्यंत सुसंघटित, अद्यावत प्रशिक्षित व आक्रमक जपानी लष्कराने, लोण्यातून सुरी शिरावी तितक्या सहजपणे, त्या रशियन लष्कराला कसे कापून काढले होते हे हॉफमनने मांचूरियाच्या रणक्षेत्रावर प्रत्यक्षपणे पाहिले होते. ते दृश्य तो पुढे कधीही विसरला नव्हता.

पहिल्या महायुद्धाच्या प्रारंभी अपेक्षित रशियन हल्ल्यांना तोंड देण्याकरिता पूर्व प्रशियात ठेवण्यात आलेल्या आठव्या जर्मन सैन्याच्या लष्करी कार्यवाहीचा प्रमुख म्हणून हॉफमनची नियुक्ती झाली. तानेनबर्गच्या रणक्षेत्रावर रशियन लष्कराचा भयानक पराभव ज्या जर्मन लष्करी डावपेचांमुळे झाला त्याचे श्रेय, जर्मन लष्करी अधिकाऱ्यांच्या मते, हिंडेनबुर्ग किंवा लुडेनडॉर्फ यांकडे नव्हे तर हॉफमनकडे जात होते.

तानेनबर्गच्या लढाईनंतर हॉफमन पूर्व आघाडीवर जर्मन फौजांचा सेनापती बनला. रशियन साम्राज्याच्या लष्कराचे झालेले पतन त्याने आपल्या डोळ्यांनी पाहिले. ब्रेस्त लितोवस्क येथे जर्मनीच्या शांतता कराराच्या अटी त्यानेच सोविएत शिष्टमंडळासमोर ठेवल्या.

रशियन लष्कराची युद्धपद्धती व त्या लष्कराचा झालेला निर्णायक पराभव हॉफमनने पाहिला होता. क्रांतीनंतरचे रशियाचे लाल लष्करही पूर्वीचेच रशियन लष्कर असून, सोविएत क्रांतीनंतर तर त्या लष्कराला बाजारबुणग्यांची अवस्था आली आहे असे हॉफमनचे मत होते.

१९१९ च्या वसंताच्या प्रारंभी जर्मन लष्कराच्या नेतृत्वाखाली मास्कोपर्यंत धडक मारण्याची एक योजना जनरल हॉफमनने स्वतः पॅरिस शांतता परिषदेला सादर केली. हॉफमनच्या मते त्याच्या त्या योजनेमुळे दुहेरी लाभ होणार होता. एक तर त्यामुळे युरोपचा बोल्शेविझमपासून बचाव होणार होता आणि

अनुक्रमणिका

त्याचबरोबर जर्मन साम्राज्याच्या लष्कराचे विसर्जन टळणार होते. थोडा फेरबदल करून हॉफमनची ती योजना मार्शल फॉकने स्वीकृत केली होती. बोल्शेविझमसारखा भयंकर धोका युरोपपुढे कित्येक शतकात उभा ठाकला नव्हता अशी त्याची तत्पूर्वीच्या दोन वर्षांच्या अनुभवाने पक्की खात्री झाली असल्याचे, २२ नोव्हेंबर १९१९ रोजी डेली टेलिग्राफला दिलेल्या मुलाखतीत हॉफमनने स्पष्ट केले. "द वॉर ऑफ लॉस्ट ऑपरच्युनिटिज्" या त्याच्या स्मृतिग्रंथात मास्कोवर धडक मारण्याची संधी जगाने वाया घालविल्याबद्दल हॉफमनने मोठे दुःख व्यक्त केले आहे.

१९२३ मध्ये बर्लिन येथे जनरल हॉफमनची भेट घेतल्यानंतर ब्रिटिश राजदूत लॉर्ड ही ॲबरनॉन याने आपल्या रोजनिशीत पुढील नोंद केली होती—

'जोपर्यंत पश्चिमेकडील सुसंस्कृत राष्ट्रे एकत्र येऊन सोविएत सरकारचा नाश करीत नाहीत तोपर्यंत जगात कोणतीही गोष्ट सुयोग्य मार्गावर येणार नाही, या एकाच कल्पनेने त्याची (हॉफमनची) सर्व मते प्रभावित झाली आहेत...फ्रान्स, जर्मनी व इंग्लंड यांची युती होऊन ती राष्ट्रे संयुक्तपणे रशियावर हल्ला करतील याची शक्यता त्याला वाटते का असा प्रश्न विचारला असता हॉफमनने उत्तर दिले—'अलबत्! ती गरजच इतकी तीव्र आहे की तसे झालेच पाहिजे.'

युद्धोत्तर काळात रशियामधील परकीय लष्करी हस्तक्षेप अपयशी ठरल्यानंतर हॉफमनने त्याच्या योजनेची एक नवी सुधारित आवृत्ती एका गोपनीय टाचणाच्या स्वरूपात सर्व युरोपीय राष्ट्रांच्या सेनाध्यक्षांना पाठविली. युरोपातील फासिस्टानुकूल वर्तुळाने त्या टाचणात चांगलाच रस घेतला. हॉफमनचे व्यक्तिगत मित्र असलेले जनरल फॉक व त्याचा सेनाध्यक्ष पेताँ यांनी त्या सुधारित योजनेला मनःपूर्वक मान्यता दिली. फ्रान्स वॉन पापेन,जनरल बॅरन कार्ल वॉन मॅनरहीम, ॲडमिरल हार्थी, व ब्रिटनचा नौदल गुप्तचर खात्याचा संचालक ॲडमिरल सर बॅरी डोमविले यांनीही त्या योजनेवर त्यांच्या संमतीचे शिक्कामोर्तब केले.

जर्मनीत परंपरेने चालत आलेल्या बिस्मार्ककालीन जर्मन लष्करी व राजकीय डावपेचापेक्षा [प्रारंभी जर्मन राईश्वरेचा सेनापती जनरल हान्स वॉन सीक्त याने हॉफमनच्या योजनेला विरोध केला. रशियन साधनसामुग्री व मनुष्यबळ यांचा वापर करून पाश्चिमात्यांविरुद्ध सूड उगविण्याच्या हेतूने, युद्ध करण्याचे त्याचे स्वप्न होते. त्याकरिता लाल लष्करातील काही गटांशी व सोविएत सरकारशी काही तडजोड करता येईल अशी त्याला आशा होती. नंतर मात्र सीक्तने हॉफमन योजनेला संमती दिली व तो नाझी बनला.] हॉफमनची योजना अगदीच निराळी असली तरी त्या योजनेला जर्मन सेनाश्रेष्ठींच्या बऱ्याच मोठ्या गटाकडून पाठिंबा मिळाला. हॉफमनच्या नव्या योजनेनुसार सोविएत रशियाविरुद्ध समान उद्दिष्टांकरिता जर्मनीने फ्रान्स, इटली, इंग्लंड व पोलंड या राष्ट्रांशी युती करणे अत्यावश्यक होते. 'हिटलर ओव्हर रशिया' या ग्रंथात एक दूरदर्शी युरोपीय भाष्यकार लिहितो की हॉफमन योजनेच्या फलश्रुतीकरीता लष्करी डावपेचांच्या दृष्टीने विश्चुला व द्वीना या नद्यांवर नेपोलियनने केली होती तशी लष्करांची जमवाजमव करणे, तेथून जर्मन नेतृत्वाखाली, माघार घेत पळत सुटलेल्या बोल्शेविकावर विद्युत्वेगाने आगेकूच करून तुटून पडणे, त्यानंतर थोड्याच आठवड्यात लेनिनग्राड व मास्को व्यापणे, शत्रूला पूर्णपणे पिटाळून लावून उरलपर्यंतचा

अनुक्रमणिका

प्रदेश ताब्यात घेणे, आणि अशा प्रकारे अर्धा युरोप खंड जिंकून घेऊन संकटात सापडलेल्या युरोपीय संस्कृतीचे रक्षण करणे, अशी कार्यवाही आवश्यक होती

जर्मन नेतृत्वाखाली संपूर्ण युरोप शस्त्रसज्ज करून त्या राष्ट्रांची संपूर्ण संयुक्त लष्करी शक्ती सोविएत संघाविरुद्ध झोकून देणे अत्यावश्यक आहे असे त्याचे ठाम मत होते.

अनुक्रमणिका

# प्रकरण ९

# एका दहशतवाद्याचा विलक्षण जीवनक्रम

## सिडने रॅलीचे पुनरागमन

डिसेंबर १९२२. बर्लिन. सुप्रसिद्ध हॉटेल आडलोनच्या हिरवळीवरील गर्दीत एक जर्मन नौदल अधिकारी व एक ब्रिटिश गुप्त हेर, अत्याधुनिक पोषाख केलेल्या एका तरुण सुंदर स्त्रीसह गप्पा मारीत बसले होते. ती स्त्री होती लंडनच्या एका संगीतिकेतील अभिनेत्री, पेपिता बोबादिला, प्रथितयश ब्रिटिश नाटककार हडन चेंबर्स याची विधवा म्हणून मिसेस चेंबर्स या नावानेही ती ओळखली जात असे. त्यांच्या गप्पात सहजच हेरगिरीचा विषय निघाला. सोविएत रशियात एका ब्रिटिश गुप्तहेराने केलेल्या विलक्षण चित्तथरारक अशा कारवायांचे वर्णन त्या बैठकीतील इंग्लिश माणूस करू लागला. त्या गुप्तहेराचा उल्लेख त्याने मिस्टर सी. असा केला. मिस्टर सी. च्या पराक्रमाची माहिती त्या बैठकीतील जर्मन नाविक अधिकाऱ्यालाही होती. रशियात मिस्टर सी. ने केलेल्या कल्पनातीत धाडसी कारवायांची हकीकत एकमेकांना सांगता सांगता हसून हसून त्यांची मुरकुंडी वळत होती. शेवटी कुतुहूल आवरणे अशक्य होऊन चेंबर्सने विचारले– 'हा मिस्टर सी. म्हणजे आहे तरी कोण?'

'तो कोण नाही हे विचारा,' इंग्लिश गृहस्थ उद्‌गारला, 'मी सांगतो तुम्हाला मिसेस् चेंबर्स, हा मिस्टर सी म्हणजे एक गूढच आहे. युरोपातील तो एक मोठा रहस्यमय पुरुष आहे. त्याला पकडण्याकरिता फार मोठे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. बोल्शेविक तर त्याला जिंवत किंवा मेलेला पकडून देणाऱ्याला त्यांच्या राष्ट्राचा एखादा प्रांतसुद्धा तोडून द्यायला तयार होतील. त्याच्या साहसी कारवायांबद्दल सांगावे तितके थोडेच आहे. पदोपदी त्याच्या समोर उभ्या ठाकणाऱ्या धोक्यावरच जणू तो जगतो. अनेक कठिण प्रसंगी त्याने रशियात ब्रिटनचे डोळे व कान बनून महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. आपसातच बोलायचे तर सांगतो की पाश्चिमात्य संस्कृतीला भेडसाविणारा बोल्शेविझमचा धोका आज आहे त्यापेक्षा अधिक गंभीर नाही याचे सगळे श्रेय मिस्टर सी. कडेच जाते.'

मिस्टर सी. बद्दल आणखीही अनेक साहसी कथा ऐकण्यात मिसेस् चेंबर्स उत्सुक होती. तिच्याशी गप्पा करीत असलेल्या इंग्लिश माणसाने स्मित करीत म्हटले, 'मी तर आजच संध्याकाळी त्याला भेटलो. तो इथे आडलोन हॉटेलमध्येच उतरला आहे.' मिसेस् चेंबर्सने मिस्टर सी. बद्दलचे कुतुहूल साहाजिकच शिगेला पोहोचले.

अनुक्रमणिका

त्याच संध्याकाळी प्रथमच मिसेस् चेंबर्सने मिस्टर सी. ला पाहिले. टापटिपीचा अध्यावत उंची पोषाख, सडसडीत, काहीसा गंभीर चेहरा, डोळ्यातील भाव काहीसा व्यंजक, अनेकदा निडरपणे हसतहसत मृत्यूला सामोरे गेलेल्या माणसाचा आविर्भाव, हया त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या वैशिष्ट्यांचे वर्णन मिसेस् चेंबर्सने आपल्या लिखाणात नंतर केले. प्रथमदर्शनीच ती त्याच्या प्रेमपाशात अडकली.

मिस्टर सी. व मिसेस् चेंबर्स यांची परस्परांशी ओळख करून देण्यात आली. त्या सायंकाळी मिसेस् चेंबर्सशी गप्पा करताना युरोप व रशिया येथील परिस्थिती, चेका, आणि मुख्य म्हणजे बोल्शेविझमचा धोका या विषयांवर मिस्टर सी. अघळपघळ बोलला. त्याच बैठकीत त्याचे खरे नाव त्याने मिसेस् चेंबर्सला सांगितले— कॅप्टन सिडने रॅली.

१९१८ मधील रॅलीच्या सोविएत-विरोधी कारस्थानाचा बोजवारा उडाल्या नंतर ब्रिटिश युद्धमंत्री विन्स्टन चर्चिल याने श्वेत नेता जनरल डेनिकिनची गुप्तहेर यंत्रणा संघटित करण्यास मदत करण्याकरिता रॅलीला पुन्हा रशियात पाठविले. डेनिकिन व त्याचे अनेक सोविएत-विरोधी युरोपीय मित्र यांतील संपर्क अधिकारी म्हणूनही रॅली काम करीत होता. १९१९—१९२० या काळात त्या गुप्त हेराने पॅरिस, वॉर्सा व प्राग येथे सोविएत-विरोधी फौजात गुप्तहेर व घातपाती यंत्रणा उभ्या करण्याकरिता सातत्याने परिश्रम केले. त्यानंतर त्याचा जुना मित्र काऊंट चेबुरस्की यासह काही झारकालीन निर्वासित कोट्याधीशांचा निमसरकारी प्रतिनिधी म्हणूनही त्याने काम केले. त्या काळात एक महत्त्वाकांक्षी व महत्त्वाची योजना कार्यान्वित करण्यात रॅलीने मोलाची मदत केली—ती म्हणजे झारनिष्ठ निर्वासित उद्योगपती व त्यांचे अँग्ले-फ्रेंच-जर्मन भागीदार यांची 'तोर्गप्रोम' संघटना साकार करणे!

या सर्व कारवाया करीत असता केलेल्या निरनिराळ्या वित्त-उलाढालीतून रॅलीने फार मोठी खाजगी मालमत्ता गोळा केली होती; व रशियातील अनेक बड्या उद्योगधंद्यांशी पूर्वी संलग्न असलेल्या कंपन्यांचा संचालक म्हणून त्याने त्या कंपन्यांवर नियंत्रण मिळविले होते. त्या त्याच्या उद्योगांमुळे आंतर्राष्ट्रीय क्षेत्रातील बऱ्याच ख्यातनाम व्यक्तींशी त्याचे संबंध प्रस्थापित झाले होते. त्यापैकी, विन्स्टन चर्चिल, जनरल मॅक्स हॉफमन व फिनिश सेनाध्यक्ष वालेनियम हे त्याचे व्यक्तिगत मित्र बनले होते.

या ब्रिटिश गुप्तहेराला प्रांरभापासूनच, रशियाबद्दल वाटणारा वेडापिसा द्वेष जराही ओसरला नव्हता. बोल्शेविझमचा निःपात हे त्याच्या जीवनाचे एकमेव प्रमुख उद्दिष्ट बनले होते. नेपोलियन हा रशियाचा विजेता बनणार होता या एकाच गोष्टीमुळे नेपोलियनबद्दल त्याला मोठे कुतुहूल वाटत होते. नेपोलियनशी संबंध असलेल्या हजारो पौंड किंमतीच्या वस्तूंचा संग्रह त्याने केला होता. त्या कॉर्सिकन हुकुमशाहाच्या व्यक्तिमत्त्वाचे त्याला जबरदस्त आकर्षण होते.

रॅलीचे म्हणणे असे की फ्रेंच राज्यक्रांतीच्या धगधगत्या निखाऱ्यातून तोफखान्याचा तो कॉर्सिकन लेफ्टनंट—नेपोलियन जर फ्रान्सचा सर्वाधिकारी म्हणून येऊ शकतो, तर एक ब्रिटिश गुप्तहेर, अनेक बाबी त्याला अनुकूल असल्यावर मास्कोचा अधिपती का बनू शकणार नाही?

१८ मे १९२३ रोजी लंडनच्या हेनरिटा मार्गावरील नोंदणी कार्यालयात कॅप्टन सिडने रॅली व मिसेस् चेंबर्स परस्परांशी विवाहबद्ध झाली. रॅलीचा मास्को पासूनचा जुना साथीदार कॅप्टन जॉर्ज हिल हा साक्षीदार होता.

विवाहांनतर पतिराजांच्या लोकविलक्षण कट कारस्थानात मिसेस् चेंबर्स सक्रिय सहभाग घेऊ लागली. तत्सबंधी ती लिहिते—

'युरोपीय राजकारणात पडद्याआडून ज्या अनेक विलक्षण कारवाया चालत होत्या त्यांत हळूहळू मी गुंतत गेले. युरोपातील प्रत्येक राजधानीचे वरवर शांत दिसणारे राजकारण तेथील जुलुमी शासकांविरुद्ध निर्वासितांनी चालविलेल्या कटकारस्थानांनी कसे ढवळून निघत होते ते माझ्या लक्षात आले. बर्लिन, पॅरिस, प्राग, एवढेच नव्हे तर लंडन येथेही निर्वासितांचे छोटे छोटे गट अव्याहतपणे कटकारस्थाने करीत होते. हेलसिंकी तर प्रतिक्रांतीने ढवळून निघत होते. त्या प्रतिक्रांतीच्या प्रयत्नांना युरोपातील अनेक सरकारांचा आर्थिक पाठिंबा व प्रोत्साहन होते. त्या सर्व कारवायांत सिडनेचा उत्साही सहभाग होता. त्या उद्दिष्टसिद्धीकरता त्याचा बराच वेळ व पैसा खर्ची पडत होता.'

सिडने रॅलीच्या लंडन येथील निवासस्थानी एक दिवस एक चमत्कारिक माणूस त्याच्या भेटीला आला 'मिस्टर वॉर्नर' अशी त्याने प्रथम स्वतःची ओळख करून दिली. मोठ्या काळ्या दाढीने त्या निर्विकार काळ्या डोळ्यांच्या माणसाचा संपूर्ण चेहरा जवळजवळ झाकला गेला होता. त्या उंचपुऱ्या माणसाचे हात गुडघ्यापर्यंत पोहोचत होते. एक ब्रिटिश पासपोर्ट, बोरिस साविन्कोव या रशियन सोशल रेव्होल्यूशनरी नेत्याने पॅरिस येथे सही करून दिलेले एक परिचयपत्र व एका प्रमुख ब्रिटिश मुत्सद्याने दिलेले एक शिफारसपत्र, ही कागदपत्रे त्याचा विश्वास पटविण्याकरिता त्याने सिडने रॅलीला दाखविली.

"तुमच्या परराष्ट्र मंत्रालयाशी विचारविमर्ष करीत सुमारे एक आठवडा तरी मी लंडनमध्ये आहे,' त्याने रॅलीला सांगितले.

त्यानंतर त्या 'मिस्टर वॉर्नर'ने आपली खरी ओळख रॅलीला करून दिली. त्याचे नाव होते द्रेब्कोव. १९१८ मध्ये रशियात रॅलीने सोविएत-विरोधी कारस्थाने करण्याकरिता जे पाच गट संघटित केले होते, त्यापैकी एका गटाचा द्रेब्कोव नेता होता; व आता तो मास्को येथील एका श्वेत रशियन भूमीगत संघटनेचा प्रमुख बनला होता.

'तुम्ही रशियात त्यावेळी उभारलेली संघटना अगदी उत्कृष्ट होती, कॅप्टन रॅली,' द्रेब्कोव म्हणाला, 'आम्ही तेच धागेदोरे पुन्हा उचलून काम सुरू केले आहे. तुमचे जुने सगळे हस्तक अजून तेथेच आहेत. बाल्कोव आठवतो का तुम्हाला? तो सध्या आमच्याबरोबरच आहे. आज ना उद्या केव्हातरी आम्ही त्या लालकातडीवाल्यांना-कम्युनिस्टांना नक्कीच उलथून पाडू. ते झाले की मग पुन्हा सुखाचे दिवस येतील. पण

अनुक्रमणिका

आम्ही रशियन लोक कसे आहोत हे तर तुम्ही जाणताच! आटोकाट प्रयत्न करून आम्ही योजना आखतो, मोठमोठी कट-कारस्थाने करतो, आणि नंतर अगदी क्षुल्लक तपशीलासंबंधीच्या एखाद्या मुद्यावर आपसात भांडतो; एकामागून एक आलेली सुवर्णसंधी त्या झगड्यात वाहून जाते आणि शेवटी हातात काहीच उरत नाही. वा!' द्रेब्कोवने नंतर त्याच्या भेटीचा खरा हेतू स्पष्ट केला. 'आम्हाला रशियात आमच्या कामाचे नेतृत्व करण्याकरिता एक धाडसी मर्द माणूस हवा आहे. मिस्टर रॅली! जो खऱ्या अर्थाने हुकुम देऊ शकेल, कामे करवून घेऊ शकेल; ज्याच्या हुकुमांची मुकाट्याने व ताबडतोब तामिली होईल, असा. इटलीतील मुसोलिनीसारखा एखादा हुकुमशहा म्हणाना! —जो आपापसात भांडणाऱ्या सर्व गटांना एका सूत्रात बांधून ठेऊ शकेल व त्यांचा उपयोग, एक प्रभावी शस्त्र म्हणून रशियातील सध्याच्या जुलुमी शासकांच्या हृदयाचा छेद करण्याकरिता करून घेऊ शकेल—असा...'

'साविन्कोवबद्दल तुमचं काय मत आहे?' सिडने रॅलीने विचारले. 'तो सध्या पॅरिसमध्येच आहे, आणि अगदी तुम्हाला हवा तसाच तो माणूस आहे. खरोखरीच साविन्कोव एक फार मोठा माणूस आहे. एक जन्मजात नेता व कुशल संघटक!"

ह्या त्यांच्या मुलाखतीचे तिच्या स्मृतिग्रंथात वर्णन करताना मिसेस रॅलीने नोंद केली ती अशी— 'रॅलीला साविन्कोवबद्दल अपार कौतुक होते. पण त्या रशियन नेत्याच्या—साविन्कोवच्या हाती त्या सर्व सोविएतविरोधी उद्योगाची सूत्रे सोपविताना रॅलीला केवढा मोठा त्याग केल्यासारखे वाटत होते. ते मला त्याच्या स्वरातून स्पष्टपणे जाणवले.'

**इतर धंद्यांसारखाच एक धंदा**

झारशाहीच्या पतनानंतर रशियात निर्माण झालेल्या गोंधळातून उदयाला आलेला साविन्कोव हा अनेक दृष्टींनी एकदम डोळ्यात भरण्यासारखा माणूस होता. १९२४ च्या सुमारास, 'डाऊनिंग स्ट्रीट' व 'क्वाई द ओर्सी' या सत्ता केंद्रात धोरण निश्चित करणाऱ्या बड्या मुत्सद्यांच्या आंतर्वर्तुळात रशियाचा भावी हुकुमशहा म्हणून साविन्कोवच्या नावाचा गंभीरपणे विचार होत होता. रोडकासा, फिक्कट चेहऱ्याचा, टक्कल पडलेला व मोठ्या टापटिपीचे कपडे करणारा, मृदुभाषी सॉविन्कोव, सॉमरसेट मॉमच्या मतानुसार, एक सुप्रसिद्ध दहशतवादी व क्रूर प्रतिक्रांतीवादी वाटण्याऐवजी एखाद्या बँकेचा व्यवस्थापक वाटत होता. निरनिराळ्या प्रकारची गुणवत्ता व बुद्धिमत्ता त्याच्यात होती. त्याची विन्स्टन चर्चिलशी प्रथम ओळख करून दिली ती रॅलीनेच! "ग्रेट कॉन्टेम्पोररीज" या आपल्या ग्रंथात त्या सुप्रसिद्ध दहशतवाद्याचे वर्णन करताना चर्चिल लिहितो—

'मुत्सद्याचे शहाणपण, सेनापतीला आवश्यक ती सर्व वैशिष्ट्ये, शूरवीराचे धैर्य आणि हुतात्म्याची सहनशक्ती हे सर्व गुण साविन्कोवच्या व्यक्तिमत्त्वात एकवटले होते; आणि त्याचे सारे जीवन कटकारस्थाने करण्यात व्यतीत झाले होते.'

अनुक्रमणिका

झारकालीन रशियात तरुण साविन्कोव हा सोशल रिव्होल्यूशनरी पक्षाचा एक आघाडीचा उत्साही कार्यकर्ता होता. तो व त्या पक्षाचे आणखी चार सदस्य हे त्या पक्षाच्या लढाऊ संघटनेचे नेते बनले होते. झारशाही अधिकाऱ्यांची हत्या करणे हे त्या दहशतवाद्यांचे प्रमुख उद्दिष्ट होते. झारचा चुलता ग्रँड ड्यूक सर्जी, गृहमंत्री प्लेहव, हे, त्या संघटनेने हत्या केलेल्या झारकालीन अधिकाऱ्यांपैकी प्रमुख बळी होते. [सोशल रिव्होल्यूशनरी पक्षाच्या लढाऊ संघटनेचा खरा नेता होता तो इव्हनो आसेफ—इतिहासातील प्रक्षोभक हस्तकांपैकी एक लोकविलक्षण व्यक्ती! झारशाहीच्या गुप्तहेर खात्यात हेर म्हणून तो नोकरीला असला तरी प्रत्यक्षात दुहेरी हस्तक म्हणून तो कामे करीत होता. एकीकडे विश्वासघाताने क्रांतिकारकांना व दहशतवाद्यांना पकडवून देत असता, त्याच वेळी ग्रँड ड्यूक सर्जी, प्लेहव व अन्य झारशाही अधिकाऱ्यांच्या हत्या करण्याच्या योजना त्याने आखल्या. त्याचे एकमेव दैवत होते—ते म्हणजे पैसा. अधिकाऱ्यांच्या हत्या करण्याच्या कारस्थानात त्याने भरीव मदत केली, कारण त्यामुळे सोशल रेव्होल्यूशनरी पक्षाकडून खर्चादाखल बराच जास्त पैसा उकळता येईल असे त्याला वाटत होते. झारकालीन अधिकाऱ्यांच्या हत्येच्या कटातील त्याच्या सहभागाबद्दल झारांच्या गुप्त पोलिसांना त्याचा संशय येऊ नये याची तो साहजिकच पूरेपूर काळजी घेत होता.

साविन्कोव व आसेफ यांच्या बरोबरीने काम करणारा सोशल रेव्होल्यूशनरी पक्षाचा आणखी एक नेता होता, तो म्हणजे व्हिक्टर चेर्नेव. साविन्कोव प्रमाणेच तोही सोविएत-विरोधी कारवाया करण्यात मोठा तत्पर होता. १९४० मध्ये तो अमेरिकेत गेला. तेथेही सोविएत-विरोधी प्रचार तो मोठ्या हिरीरीने करीत राहिला.

(चेर्नेवच्या इतर कारवायांबद्दलचा तपशील प्रकरण २३ मध्ये आलेला आहे.)]

१९०५ मध्ये झारशाही उलथून पाडण्याचा केलेला पहिला प्रयत्न फसल्यानंतर क्रांतिकारी जीवनासंबंधी साविन्कोवचा थोडा भ्रमनिरासच झाला. त्यामुळे काही काळ त्याने आपले लक्ष साहित्याकडे वळविले. ‘द पेल हॉर्स’ ही एक खळबळजनक आत्मचरित्रपर कादंबरी त्याने लिहिली. त्यात त्याने ग्रँड ड्यूक सर्जी व प्लेहव यांच्या हत्या प्रकरणात स्वतः बजावलेल्या कामगिरीची हकीकत दिली आहे. एक ब्रिटिश हस्तक म्हणून वेशांतर करून, बनावट ब्रिटिश पासपोर्ट खिशात घालून रशियातील एका आडरस्त्यावरील लहानशा घरात टेबलाखाली तीन किलो वजनाचा दारूगोळा घेऊन त्या रस्त्यावरून ग्रँड ड्यूकची गाडी जाण्याची वाट पाहात तो दिवसानुदिवस कसा बसून राहात होता याचे मोठे खुमासदार वर्णन त्याने त्याच्या त्या पुस्तकात केले आहे.

त्यानंतर बरेच वर्षांनी पहिल्या महायुद्ध काळात जेव्हा ब्रिटिश गुप्तहेर खात्याने ब्रिटिश कादंबरीकार सॉमरसेट मॉम याला साविन्कोवशी संपर्क साधण्यास रशियात पाठविले; [त्याच्या ‘अशेंडन’ व ‘द ब्रिटिश एजंट’ या पुस्तकांच्या प्रस्तावनेत रशियात त्याला सोपविण्यात आलेल्या कामगिरीबद्दल मॉम लिहितो, ‘मी १९१७ मध्ये रशियात गेलो. बोल्शेविक क्रांती थोपवून धरणे व रशियाला युद्धात टिकवून धरणे ही कामगिरी माझ्याकडे सोपविण्यात आली होती.’ पुढे मॉम म्हणतो, ‘माझे ते प्रयत्न अपयशी ठरले हे वाचकांना वेगळे सांगायला नकोच.’] त्यावेळी साविन्कोवशी झालेल्या भेटीत, झारशाहीतील मंत्र्यांच्या हत्या करताना फार मोठी हिंमत लागली असेल असे सहजच मॉमने त्या रशियन दहशतवाद्याला विचारले. तेव्हा साविन्कोवने उत्तर दिले—‘नाही! मुळीच नाही. इतर अनेक धंद्यांसारखाच हाही एक धंदाच आहे. त्याची सवय होऊन जाते.’

जून १९१७ मध्ये केरेन्स्कीने दोस्त राष्ट्रांच्या सल्ल्यानुसार व्यावसायिक मारेकरी बोरिस साविन्कोव याची गॅलिशिया—आघाडीवरील ७ व्या लष्कराचा राजकीय कमिसार म्हणून नियुक्ती केली. या

अनुक्रमणिका

लष्करातील सैनिक बंड करून उठत होते. तेव्हा त्या कठीण प्रसंगाला तोंड देण्याकरिता साविन्कोवच्या कठोर दयामायाशून्य उपाययोजनेची गरज आहे अशी समजूत होती. आणि ती खरीही ठरली. साविन्कोवने सगळी गडबड निर्दयपणे दडपून टाकली. एकदा तर बोल्शेविक सैनिकसमितीकडून आलेल्या शिष्टमंडळाच्या सर्व प्रतिनिधींना त्याने आपल्या हाताने गोळ्या घातल्या...

साविन्कोवने आग्रह धरल्याने केरेन्स्कीने जनरल कोर्निलोव यास रशियन लष्कराचा सरसेनापती नेमले. खुद्द साविन्कोवची सहाय्यक युद्धमंत्री म्हणून नेमणूक झाली. त्याच वेळी फ्रेंच सरकारचा गुप्तहेर म्हणूनही तो काम करीत होता; व केरेन्स्की सरकार उलथून पाडून त्याऐवजी कोर्निलोवच्या नेतृत्वाखाली लष्करी हुकुमशाही प्रस्थापित करण्याचे त्याचे प्रयत्न चालू होते.

बोल्शेविक क्रांतीनंतर मास्को येथे सिडने रॅलीने केलेल्या उठावाची वेळ साधून यारोस्लाव मध्ये जो सोविएत–विरोधी उठाव झाला त्यात साविन्कोव अग्रणी होता. यारोस्लाव येथील उठावाला फ्रेंचांनी गुप्तपणे भरपूर पैसा पुरविला होता. साविन्कोवचा उठावाचा प्रयत्न लाल लष्कराने खंबीरपणे चिरडून टाकला. कसाबसा जीव वाचवून साविन्कोव रशिया सोडून पळाला; व युरोपात जाऊन तेथील श्वेत रशियनांचा प्रतिनिधी बनला. विन्स्टन चर्चिल त्याच्या 'ग्रेट कॉन्टेम्पो-ररीज' या ग्रंथात म्हणतो–'साविन्कोव केवळ दोस्त राष्ट्रांच्या वतीने कारस्थाने करीत होता असे नव्हे तर रशियाविरुद्ध संरक्षणात्मक कुंपण म्हणून निर्माण करण्यात आलेल्या महत्त्वाच्या बाल्टिक व सीमावर्ती राज्यांतील कारवायाबाबतही जबाबदार होता. एकेकाळचा तो निहिलिस्ट नेतृत्व व कटकारस्थाने या दोन्ही गोष्टीत मोठा निपुण होता.'

१९२० मध्ये साविन्कोव पोलंडमध्ये आला. तेथे पिल्सुदस्की हा त्याचा निकटचा मित्र होता. त्याच्या मदतीने साविन्कोवने अधिकारी व सैनिक मिळून ३०,००० चे लष्कर उभारले; त्या सैनिकांना भरपूर शस्त्रास्त्रे पुरविली व सोविएत रशियावर पुन्हा हल्ला चढविण्याच्या उद्दिष्टाने तो त्यांना प्रशिक्षण देऊ लागला.

त्यानंतर त्याने आपले मध्यवर्ती कार्यालय प्राग येथे हलविले. तेथे झेक फासिस्ट सेनापती गायदा याच्याशी पूर्णपणे सहकार्य करून साविन्कोवने तेथे 'ग्रीन गार्डस' नावाची एक संघटना उभी केली. त्यातं जुने झारकालीन अधिकारी, प्रतिक्रांतीवादी व दहशतवादी यांचा प्रामुख्याने समावेश होता. या 'ग्रीन गार्डस्' नी सोविएत सीमाप्रदेशावर एकामागून एक हल्ले चढवून लुटालूट, जाळपोळ, कामगार–शेतकऱ्यांच्या कत्तली, स्थानिक सोविएत अधिकाऱ्यांचे खून यांचे सत्र सुरू केले. या सर्व कार्यवाहीत निरनिराळ्या युरोपीय गुप्तहेर संघटनांचे सर्वतोपरी सहाय्य साविन्कोवला मिळाले.

सोविन्कोवचा निकटचा सहकारी सोशल रेव्होल्यूशनरी पक्षाचा सदस्य फोमित्शोव याने सोविन्कोवच्या दहशतवादी संघटनेची एक शाखा पोलंडने १९२० मध्ये काबीज केलेल्या लिथुआनियाच्या विल्ना या राजधानीच्या शहरी उघडली. सोविएत रशियात हेरगिरी करण्याकरिता व पोलंडमधून रशियात पाठविण्यात येत असलेल्या दहशतवाद्यांना मदत करण्याकरिता फोमित्शेवचे सहकारी पोलीश हेरखात्याच्या मदतीने सोविएत प्रदेशात गुप्तहेर केंद्रे प्रस्थापित करू लागले.

नंतर १७ सप्टेंबर १९२४ रोजी, 'इझवेत्सिया' या वृत्तपत्राला पाठविलेल्या पत्रात त्याच्या गटाने केलेल्या कारवायांबाबत फोमित्शोवने कळविले—

विशिष्ट नेत्यांची हत्या करण्याची त्यांच्याकडे सोपविण्यात आलेली कामगिरी यशस्वी करून ते हेर परत आले की ते व पोलीश सत्ताधीश यांच्यात मीच मध्यस्थ म्हणून काम करीत होतो; चोरलेली व बनावट कागदपत्रे व हेरगिरीचे साहित्य मीच त्यांच्याकडे पोचवीत असे. अशाच प्रकारे सर्जी पावलोवस्की त्रुब्नीकोव, मोनित्य, दानिएल, इव्हानोव यांच्या तुकड्या व शिवाय अनेक हेर व दहशतवादी रशियात पाठविले गेले. मला चांगले आठवते की याच पद्धतीने लेनिनची हत्या करण्याकरिता कर्नल श्वेझेवस्की याला १९२२ मध्ये रशियात पाठविण्यात आले होते...'

साविन्कोवची क्रूर कार्यपद्धती, आकर्षक व्यक्तिमत्त्व, असामान्य संघटन कौशल्य यामुळे सोविएत सरकार उलथून पाडण्याची स्वप्ने पाहणारे श्वेत रशियन निर्वासित व सोविएत—विरोधी युरोपीय मुत्सद्दी या सर्वांना त्याचे मोठे आकर्षण वाटे. साविन्कोवच्या तोपर्यंतच्या क्रूर कृत्यांमुळे अधूनमधून त्यांना एखादे वेळी काहीसे अवघडल्यासारखे होई एवढेच! पॅरिस येथे १९१९ मध्ये, झारशाहीचा जुना प्रधानमंत्री साझोनोव याच्याशी विन्स्टन चर्चिल वाटाघाटी करीत असता ओघानेच साविन्कोवचा विषय निघाला, त्या प्रसंगाचे वर्णन विन्स्टन चर्चिल याने आपल्या 'ग्रेट कॉन्टेम्पोररीज' या ग्रंथात केले आहे—

'साविन्कोवशी तुमचे कसे काय जमते?' असे चर्चिलने विचारताच झारच्या त्या जुन्या प्रधानमंत्र्याने तो मुद्दाच झटकून टाकण्याचा आविर्भाव करीत उत्तर दिले, 'तो तर निव्वळ एक मारेकरी आहे. त्याच्याबरोबर काम करण्याची कल्पनाही मला विचित्र वाटते. पण मग दुसरे करणार तरी काय? साविन्कोव मोठा कार्यक्षम, हुन्नरी व निर्धाराने काम करणारा माणूस आहे. आपल्या उद्दिष्टाच्या सिद्धीच्या दृष्टीने त्याच्या सारखा दुसरा कोणी योग्य माणूस सापडत नाही.'

### चेकर्स येथील रविवार

१९२२ मध्ये, महायुद्ध व यादवी युद्ध यामुळे उध्वस्त झालेल्या रशियन प्रदेशात दुष्काळाचे भयंकर थैमान सुरू होते. व थोडेच दिवसात सोविएत सरकार उलथून पडणे अटळ आहे असेच सकृत्दर्शनी सर्वांना वाटत होते. युरोपीय मुत्सद्दी श्वेत रशियन निर्वासित व राजकीय क्षेत्रातील अन्य सोविएत विरोधक, ही सर्व मंडळी कोणत्याही क्षणी सत्तासूत्रे हाती घेण्याची तयारी करण्यात व त्या दृष्टीने नव्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांची यादी करण्यात गढून गेली. रशियाचा नवा हुकुमशहा कोण असावा या मुद्यावर सविस्तर व गंभीर चर्चा चालू झाली. त्या संदर्भात कॅप्टन सिडने रॅलीने साविन्कोवची चर्चिलशी गाठ घालून दिली.

चर्चिलच्या मनात बरेच दिवसापासून साविन्कोवबद्दल मोठे कुतुहल होते. तो त्याला 'साहित्यिक मारेकरी' म्हणे! रशियातील त्यांच्या नियोजित कामगिरीची सूत्रे साविन्कोवच्याच हाती सोपविणे इष्ट ठरेल

अनुक्रमणिका

हे रॅलीचे मत त्याला सर्वस्वी ग्राह्य वाटत होते. त्यामुळे ब्रिटिश प्रधानमंत्री लॉईड जॉर्ज याच्याशी साविन्कोवची ओळख करून देण्याचे चर्चिलने ठरविले. ब्रिटिश प्रधानमंत्र्याच्या 'चेकर्स' या गावाबाहेरील निवासस्थानी त्याकरिता एक गुप्त बैठक घेण्याचे ठरले.

चर्चिल व साविन्कोव हे एकाच मोटारीतून 'चेकर्स' येथे गेले. आपल्या 'ग्रेट कॉन्टेम्पोररीज्' या ग्रंथात चर्चिल म्हणतो,—'त्या दिवशी रविवार होता. 'फ्री चर्च' च्या अनेक धर्मोपदेशकांचे आगत स्वागत त्या दिवशी प्रधानमंत्री त्याच्या निवासस्थानी करीत होता. प्रधानमंत्र्याच्या सन्मानार्थ मुद्दाम वेल्शमधून आलेल्या गायकांचा त्याच्या भोवती गराडा पडला होता. त्यानंतर आमची चर्चा सुरू झाली.'

मात्र बोरिस साविन्कोवला ब्रिटिश सरकारने पाठिंबा देण्याची कल्पना लॉईड जॉर्जला रुचेना. रशियात वाईटात वाईट जे काय घडावयाचे ते घडून गेलेले आहे असे आपले मत स्पष्ट करून लॉईड जॉर्ज म्हणाला की रशियातील उद्योगांवर समाजवादी नियंत्रण प्रस्थापित करण्याचा बोल्शेविकांचा प्रयोग अर्थातच् फसणार आहे; सरकारी कामकाजाच्या समस्या प्रत्यक्ष व्यवहारात उभ्या ठाकल्या की बोल्शेविक नेते त्यांचे साम्यवादी तत्त्वज्ञान बाजूला ठेवतील; अन्यथा रोबेस्पिअर व सेंट जस्ट यांप्रमाणे आपसात भांडून सत्ता गमावून बसतील.

चर्चिल व ब्रिटिश गुप्तहेर खाते जागतिक साम्यवादाच्या धोक्यामुळे अत्यंत चिंताग्रस्त असले तरी लॉईड जॉर्जला मात्र तो धोका अस्तित्वातच नाही असे वाटत होते, हेही त्याने निःसंदिग्धपणे स्पष्ट केले.

लॉईड जॉर्जचे बोलणे संपल्यावर मोठ्या गंभीरपणे साविन्कोवने उत्तर दिले, 'प्रधानमंत्री महोदय, आपली परवानगी असेल तर एकाच गोष्टीची आपल्याला आठवण करून देणे आवश्यक वाटते; ती म्हणजे रोमन साम्राज्याच्या पतनानंतर अंधकार युगाला प्रारंभ झाला...' त्याचा रोख झारशाहीचे झालेले पतन व त्यानंतर, त्याच्या मते सोविएत राजवटीत माजणारा गोंधळ व अराजक यावर होता हे उघडच होते.

### मास्को खटला, १९२४

२१ जानेवारी १९२४ रोजी लेनिन कालवश होताच रॅलीच्या मनाला आशेचे नवे अंकुर फुटले. रशियात बोल्शेविक-विरोधी गट सत्ता काबीज करण्याकरिता प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असल्याचे वृत्त रॅलीच्या रशियातील हस्तकांनी त्याला कळविले. खुद्द बोल्शेविक पक्षातील अंतस्थ मतभेद आता उघडे पडले असून, त्या पक्षातील फुटीचा फायदा करून घेता येईल अशी शक्यता तेथे निर्माण झाली असल्याचेही त्यांनी रॅलीला कळविले. सोविएत सरकारवर आघात करण्याकरिता ती सुवर्णसंधी आहे असे रॅलीला वाटले.

रशिया हे राष्ट्र झारशाहीपासून आता पूर्णपणे दुरावले असल्याने झारशाहीची पुनःस्थापना करण्याची त्याची जुनी कल्पना आता कालबाह्य झाली आहे हे रॅलीने ओळखले. त्यामुळे, सधन शेतकरी व

निरनिराळे सोविएत-विरोधी लष्करी व राजकीय गट यांच्या आधारे तेथे हुकुमशाही प्रस्थापित करावी लागेल, असे रॅलीला वाटत होते. इटलीत मुसोलिनीच्या नेतृत्वाखाली ज्या प्रकारची राजवट प्रस्थापित झाली होती तशी हुकुमशाही राज्यव्यवस्था रशियात प्रस्थापित करावयाची तर त्याकरिता अगदी योग्य व्यक्ती म्हणजे एकच—बोरिस साविन्कोव, अशी त्याची खात्री होती. रशियाचा हुकुमशहा म्हणून साविन्कोवच्या उमेदवारीला व्यापक क्षेत्रावर पाठिंबा मिळवून घेण्याच्या हेतूने निरनिराळ्या युरोपीय राष्ट्रांच्या गुप्त हेरखात्यांच्या व लष्करी अधिकाऱ्यांच्या गळी ती योजना उतरविण्याच्या उद्दिष्टाने सर्व युरोपीय राजधान्यांचा त्या ब्रिटिश गुप्त हेराने दौरा केला.

यावेळी सोविएत-विरोधी मोहिमेकडे आकृष्ट झालेल्या अनेक बड्याबड्या लोकांपैकी एक महत्त्वाची व्यक्ती म्हणजे रॉयल डच शेल या विशाल आंतर्राष्ट्रीय खनिज तेल प्रतिष्ठानाचा प्रमुख, डच म्हणून जन्माला आलेला पण ब्रिटीश साम्राज्याचा 'नाईट' ही उपाधी प्राप्त झालेला सर हेन्री विल्हेल्म ऑगस्ट डेटरडिंग. जगातील बड्या उद्योजकांचा तो प्रवक्ता बनला; आणि भविष्यात, बोल्शेविक-विरोधी कारवायांकरिता त्याने अमाप पैसा पुरविला.

रॅलीच्या प्रयत्नांमुळे त्या ब्रिटिश तेल सम्राटाचे झारशाहीतील निर्वासित लक्षाधीशांनी उभारलेल्या 'तोर्गप्रोम' या संघटनेकडे लक्ष वेधले. त्याकाळी पॅरिसमध्ये असलेल्या लिओनोझोव व मन्ताशेव यांकडून व युरोपातील 'तोर्गप्रोम'च्या इतर सदस्यांकडून डेटरडिंगने मोठ्या धूर्तपणे सोविएत रशियातील बहुतेक सर्व मोठ्या तेलखाणींचे कागदोपत्री हक्क खरेदी केले. राजनैतिक दडपण आणून सोविएत रशियातील खनिज तेलावर नियंत्रण मिळविण्याचा त्याने प्रयत्न केला. पण त्यात त्याला यश न मिळाल्याने, सोविएत राजवट बेकायदेशीर व संस्कृतिबाह्य असल्याचे सांगून त्याने सोविएत राजवटीचा तीव्र शब्दात धिक्कार केला व रशियातील खनिज तेलाचा तो स्वतःच खरा 'मालक' आहे असे त्याने १९२४ च्या प्रारंभी घोषित करून टाकले. त्याच्या हाताशी असलेली अमाप संपत्ती, निरनिराळ्या क्षेत्रातील त्याचा प्रभाव व त्याच्या सेवेत असलेले अनेक गुप्त हेर यांच्या बळावर सर हेन्री डेटरडिंग याने सोविएत कॉकेशसमधील समृद्ध तेल खाणींचा ताबा मिळविण्याच्या उद्दिष्टाने रशियाविरुद्ध युद्ध पुकारले.

डेटरडिंगच्या या कार्यवाहीमुळे सिडने रॅलीच्या मोहिमेला नवे पाठबळ मिळाले. त्या ब्रिटिश हेराने ताबडतोब सोविएत रशियावर करावयाच्या हल्ल्याची पक्की योजना तयार केली व युरोपीय राष्ट्रांच्या लष्करी प्रमुखांना ती सादर केली. हॉफमनने तयार केलेल्या योजनेप्रमाणेच या योजनेलाही लष्करी व राजकीय अशा दोन बाजू होत्या.

राजकीय दृष्ट्या, रॅलीच्या योजनेनुसार, गुप्त सोविएतविरोधी गटांनी साविन्कोवच्या दहशतवाद्यांच्या सहकार्याने रशियात प्रतिक्रांती घडवून आणावयाची होती. अशा प्रतिक्रांतीची यशस्वी रित्या सुरुवात होताच लष्करी कार्यवाही सुरू व्हावयाची होती. लंडन व पॅरिस येथील सरकारांनी अधिकृतपणे सोविएत रशियाचा धिःकार करून रशियाचा हुकुमशहा म्हणून बोरिस साविन्कोवला मान्यता द्यावी, युगोस्लाविया व रुमानिया येथे ठेवण्यात आलेल्या श्वेत फौजांनी सीमा ओलांडून रशियात शिरावे,

पोलंडने कीवच्या दिशेने चाल करावी, फिनलंडने लेनिनग्राडची नाकेबंदी करावी व त्याच वेळी जॉर्जियन मेन्शेविक नेता नोई जॉर्डेनिया याच्या नेतृत्वाखाली कॉकेशस क्षेत्रातही सशस्त्र उठाव व्हावा अशी योजना होती. [१९१८ मध्ये कॉकेशसमध्ये जर्मनीने उभे केलेल्या कळसूत्री सरकारचा नोई जॉर्डेनिया हा प्रमुख होता. १९१९ मध्ये ब्रिटिशांनी जर्मनांना त्या क्षेत्रातून हाकून लावले, तेव्हा ब्रिटिश नियंत्रित ट्रान्स-कॉकेशियन फेडरेशनचा जॉर्डेनिया हा नेता बनला. १९२४ मध्ये त्याचे मध्यवर्ती कार्यालय पॅरिसमध्ये होते, व फ्रेंच सरकारने मदत म्हणून ४० लक्ष फ्रँक्सची रक्कम त्याच्या स्वाधीन केली होती.] रशियापासून कॉकेशस विलग करून इंग्लिश व फ्रेंच यांच्या आशीर्वादाने 'स्वतंत्र' ट्रान्स-कॉकेशियन फेडरेशन प्रस्थापित व्हावयाचे होते; व सर्व तेल खाणी व तेलाचे नळमार्ग त्यांच्या पूर्वीच्या मालकांच्या व त्यांच्या परकीय भागीदारांच्या हाती दिले जावयाचे होते.

रॅलीची योजना फ्रान्स, पोलंड, फिनलंड व रुमानिया येथील लष्करी उच्चाधिकाऱ्यांना एकदम पसंत पडली. खनिज तेलाने समृद्ध असलेला कॉकेशसचा प्रदेश रशियापासून तोडण्याची योजना तर ब्रिटिश परराष्ट्र खात्याने चांगलीच उचलून धरली. इटालियन फासिस्ट हुकुमशहा मुसोलिनी याने साविन्कोवला खास चर्चेकरिता रोम येथे बोलावून घेतले. त्या 'रशियन हुकुमशहा'ला साविन्कोवला भेटण्यास मुसोलिनी अत्यंत उत्सुक होता. त्या दोघांच्या झालेल्या भेटीत, रशियावरील हल्ल्याची तयारी चालू असता साविन्कोवच्या हस्तकांना रशियात जाण्याकरिता व तेथून बाहेर पडण्याकरिता बनावट इटालियन परवाने तयार करून देण्याची व्यवस्था करण्याचे मुसोलिनीने कबूल केले, त्याबरोबरच त्याचे फासिस्ट प्रतिनिधी व गुप्त पोलीस—'ओव्हरा', हे साविन्कोवला सर्व प्रकारे मदत करतील असेही आश्वासन त्याने साविन्कोवला दिले.

रॅलीच्या शब्दात सांगायचे तर 'एका फार मोठ्या प्रतिक्रांतिवादी कटाची लवकरच यशस्वी सांगता होणार होती.'

योजनेच्या तपशीलाबाबत रॅलीशी अखेरची प्रदीर्घ चर्चा झाल्यानंतर इटालियन परवाना खिशात घालून बोरिस साविन्कोव रशियात जाण्यास निघाला. त्याच्याबरोबर त्याचे काही विश्वासू मदतनीस व त्याच्या 'ग्रीन गार्डस' चे निवडक अधिकारी होते. सोविएत सीमा ओलांडल्यानंतर, मोठ्या प्रमाणावरील उठावाकरिता त्याने आवश्यक ती अखेरची तयारी करावयाची होती. साविन्कोवला कोणी ओळखू नये व त्याची सुरक्षितता धोक्यात येऊ नये याची सर्वतोपरी खबरदारी घेण्यात आली होती. सोविएत प्रदेशात पाऊल ठेवताच त्याला श्वेत भूमिगत चळवळीचे प्रतिनिधी भेटणार होते. या प्रतिनिधींनी रशियाच्या सीमावर्ती शहरांतून सोविएत अधिकारी म्हणून पदे मिळविली होती. रशियात शिरल्यानंतर तेथील घटनांबाबत सर्व बातमी गुप्त दूतांमार्फत साविन्कोव ताबडतोब रॅलीला कळविणार होता.

दिवसामागून दिवस उलटले, परंतु साविन्कोवकडून कोणतीच बातमी आली नाही. त्यामुळे चिंतित झालेला रॅली वाढत्या अधीरतेने पॅरिस येथे वाट पाहात बसला होता; कारण साविन्कोवकडून बातमी आल्याशिवाय त्याला पुढे कोणतीही हालचाल करता येत नव्हती. एक आठवडा गेला, दुसरा आठवडा उलटला....

अनुक्रमणिका

२८ ऑगस्ट रोजी कॉकेशसमधील नियोजित उठावाला तोंड फुटले. त्या दिवशी सूर्योदयापूर्वी नोई जॉर्डेनियाच्या सशस्त्र दलाने जॉर्जियातील त्शियातुरी या निद्रेच्या अवगुंठनात पहुडलेल्या शहरावर हल्ला केला. स्थानिक सोविएत अधिकाऱ्यांची कत्तल करून त्यांनी शहर ताब्यात घेतले. लुटालूट, दहशत, हत्या, बाँबफेक, यांचे सत्र कॉकेशसभर सुरू झाले. तेल खाणी काबीज करण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

त्यानंतर दुसरेच दिवशी, म्हणजे २९ ऑगस्ट रोजी, साविन्कोवबद्दल बातमी रॅलीला कळली. 'माजी प्रतिक्रांतिवादी व दहशतवादी बोरिस साविन्कोव सोविएत रशियात चोरून लपून प्रवेश करण्याचा प्रयत्न करीत असता सीमेवरच सोविएत अधिकाऱ्यांनी त्याला अटक केली,' अशी बातमी इझवेत्सिया या सोविएत सरकारच्या मुखपत्राच्या २९ ऑगस्ट १९२४ च्या अंकात प्रसिद्ध झाली.

तो एकंदर प्रकार घडला तो असा—साविन्कोव व त्याचे मदतनीस सोविएत सीमा ओलांडून सोविएत प्रदेशात आल्यानंतर काही लोक त्यांना भेटले. ते त्यांच्या कटकारस्थानातील त्यांचे सहकारी आहेत असेच साविन्कोवला व त्याच्या साथीदारांना वाटले. त्या लोकांनी साविन्कोव व त्याच्या सहकाऱ्यांना मिन्स्क येथील एका घरात नेले. तेथे ते पोचतात न पोचतात तोच एक सोविएत अधिकारी तेथे आला व त्या संपूर्ण घराला वेढा घातला गेला असल्याचे त्याने साविन्कोवला सांगितले. अशा प्रकारे साविन्कोवसह त्याचे सर्व सहकारी अलगद सोविएत अधिकाऱ्यांनी घातलेल्या सापळ्यात सापडले होते.

कॉकेशस क्षेत्रातील उठावाचाही प्रतिक्रांतिवाद्यांच्या दृष्टीने, असाच दुर्दैवी शेवट झाला. त्या क्षेत्रातील पहाडांवर व दऱ्याखोऱ्यात राहणारे लोक त्यांना सामील होतील असे दहशतवादी प्रतिक्रांतिकारांना वाटत होते. पण झाले उलटेच! त्या लोकांनी सोविएत राजवटीच्या वतीने संरक्षणात्मक पवित्रा घेतला; व तेल खाणींतील कामगारांच्या सहकार्याने, सोविएत सैन्य येऊन पोहोचेपर्यंत त्यांनी रेल्वेमार्ग, तेलनळमार्ग व तेलविहिरी सुरक्षित अडवून धरल्या. काही आठवडे अधूनमधून लढाया चालू होत्या; पण एकंदर परिस्थिती सोविएतांच्या चांगल्या आटोक्यात होती हे प्रारंभापासूनच स्पष्ट झाले होते. कॉकेशसमधील त्या उठावाला शक्तिशाली भांडवलदार व बाकू तेल विहिरींचे जुने मालक यांनी पॅरिस मधून भरपूर पैसा पुरविला व उठावाचे मार्गदर्शनही केले अशी स्पष्ट कबुली न्यूयॉर्क टाईम्सने १३ सप्टेंबर १९२४ च्या अंकात दिली होती. काही दिवसातच जॉर्डेनियाच्या उरल्यासुरल्या प्रतिक्रांतिकारी सैनिकांना सोविएत लष्कराने पकडून तुरुंगात डांबले.

साविन्कोवला झालेली अटक व कॉकेशसमधील उठावाचा उडालेला बोजवारा म्हणजे सिडने रॅली व त्याच्या मित्रांच्या पदरी पडलेली घोर निराशाच होती हे तर खरेच; परंतु त्याहीपेक्षा त्यांना प्रचंड धक्का बसला तो मास्को येथे साविन्कोवच्या झालेल्या जाहीर न्यायालयीन चौकशीमुळे. त्या खटल्याचे वेळी न्यायालयासमोर, बोरिस साविन्कोव त्याच्या कारस्थानाचे एकामागून एक तपशील सांगू लागला. अगदी थंडपणे त्याने सोविएत न्यायालयापुढे सांगितले की सोविएत सीमा ओलांडतानाच आपण जाळ्यात सापडत आहोत याची त्याला जाणीव होती. त्याला अटक करणाऱ्या सोविएत अधिकाऱ्यांच्या कौशल्याची त्याने

अनुक्रमणिका

प्रशंसाही केली. 'खरे सांगायचे तर आपण पकडले जाऊ याची कल्पना मला होतीच,' साविन्कोव न्यायासनासमोर बोलत होता, 'पण तरीही मी रशियात यायचे का ठरविले ते मी तुम्हाला सांगतो... कारण तुमच्याविरुद्धचा लढा मी इथेच संपविणार आहे.'

सोविएत—विरोधी चळवळ हानिकारक व निरर्थक असल्याचे आता त्याच्या चांगले लक्षात आले आहे, तो एक प्रामाणिक पण वाट चुकलेला देशभक्त असून त्याच्या सहकाऱ्यांची उद्दिष्टे व चारित्र्य याबद्दल आता त्याचा पूर्ण भ्रमनिरास झालेला आहे, त्या सर्व लोकांना स्वार्थापलिकडे काही एक सुचत नाही, पितृभूमीची किंवा देशबांधवांची त्यांना यत्किंचितही पर्वा नाही याबद्दल त्याची पक्की खात्री झाली असल्याने त्याच्या मनाला विलक्षण धक्का बसला आहे असे त्याने सांगितले.

साविन्कोवने न्यायालयापुढे स्पष्ट निवेदन केले की १९१८ मध्ये रशियातील त्याच्या गुप्त दहशतवादी संघटनेला फ्रेंच राजदूत नौलेन्स याने पैसा पुरविला होता. जुलै १९१८ च्या प्रारंभी यारोस्लाव येथे साविन्कोवने उठावाला सुरुवात करावी असे आदेश नौलेन्सने त्याला दिले होते, एवढेच नव्हे तर त्याच्या उठावाला भरीव पाठिंबा देण्याकरिता फ्रेंच फौजा रशियात उतरविण्यात येतील असे वचनही त्याने दिले होते. त्याच्या त्या आदेशानुसार उठाव करण्यात आला परंतु फ्रेंचांनी दिलेल्या त्या अभिवचनानुसार त्यांचा पाठिंबा मात्र कुठेच दिसला नाही.

'त्यावेळी तुम्हाला पैसा कुठून व किती मिळाला?' न्यायाधीशाने विचारले.

'मला चांगले आठवते की मी त्यावेळी अत्यंत अडचणीत होतो,' साविन्कोव सांगू लागला, 'पैसा कुठून मिळवायचा हे मला काही केल्या कळेना. अशा वेळी, मी कोणत्याही प्रकारे मागणी केलेली नसताना एका झेक माणसाने मला दोन लक्ष रुबल्स आणून दिले. ऐन वेळी मिळालेल्या त्या मदतीने आमची संघटना बचावली... दहशतवाद्यांनी लढा जारी ठेवावा याकरिता तो पैसा दिला गेला आहे असे त्याने मला बजावले. लढ्याचा एक भाग म्हणून दहशतवादाचे शस्त्र मी वापरीत होतो हे त्यांना माहीत होते. मीही ती गोष्ट कधी लपवून ठेवली नव्हती. म्हणून दहशतवादी कारवायांकरिता मला त्यांनी पैसा दिला होता...

'त्यानंतरच्या वर्षांत,' साविन्कोव बोलत होता, 'एक रशियन देशभक्त म्हणून एक गोष्ट मला विशेष प्रकर्षाने स्पष्ट झाली, ती म्हणजे परदेशातील सोविएतविरोधी गटांना माझ्या चळवळीबद्दल काही खास आस्था होती असे नव्हे, तर केवळ रशियन तेलविहिरी व अन्य खनिज संपत्ती मिळवून घेण्याकरिता माझ्या चळवळीचा उपयोग त्यांना करून घ्यावयाचा होता. त्याच हेतूने ते मला पाठिंबा देत होते. उत्तर व ट्रान्स कॉकेशिया मिळून एक 'स्वतंत्र' आग्नेय महासंघ प्रस्थापित करणे कसे हितावह ठरणार आहे यांबद्दल ते माझ्याशी वारंवार बोलत होते. ते म्हणाले की तो महासंघ म्हणजे एकूण योजनेची केवळ एक सुरुवात ठरणार आहे. कारण नंतर अझरबैजन व जॉर्जिया हे प्रदेशही त्यात समाविष्ट करण्यात येतील.' त्याच्या ब्रिटिश सल्लागारांबद्दल हे सर्व सांगताना साविन्कोव म्हणाला की 'त्या त्यांच्या विधानाला नक्कीच पेट्रोलियमचा वास येत होता.'

अनुक्रमणिका

विन्स्टन चर्चिलशी त्याच्या झालेल्या वाटाघाटींबद्दलही तो बोलला—

‘एकदा चर्चिलने मला दक्षिण रशियाचा नकाशा दाखविला. त्यावर तुमच्या (सोविएत) व डेनिकिनच्या लष्करांची स्थिती दर्शविण्याकरिता छोट्या छोट्या खूणचिठ्ठ्या लावून ठेवल्या होत्या. डेनिकिनच्या सैन्याकडे निर्देश करताना चर्चिल एकदम अभावितपणे बोलून गेला, ‘हे इथे माझे लष्कर आहे!’ मला चांगले आठवते, त्याचे ते शब्द ऐकल्याबरोबर मला धक्काच बसला. मला काही उत्तरच देता येईना. माझे पायही जणू तिथेच खिळून बसले. मला तिथून निघून जावेसे वाटत होते. पण ब्रिटिशांकडून मिळणाऱ्या मदतीशिवाय माझे निभण्याजोगे नव्हते. मी विचार केला की आपण जर इथे काही गडबड केली तर रशियातील आपल्या सैनिकांना बूट देखील मिळायचे नाहीत.’

‘इंग्लिश व फ्रेंच कोणत्या कारणाकरिता तुम्हाला मशीनगन्स व अन्य युद्धसाहित्य पुरवीत होते?’ न्यायाधीशाने विचारले.

‘बरपांगी तर त्यांची उद्दिष्टे मोठी उदात्त होती.’ साविन्कोव उत्तरला. ‘आम्ही परस्परांचे मोठे प्रामाणिक दोस्त होतो, तर तुम्ही मात्र विश्वासघातकी, देशद्रोही होता अशीच त्यांची भूमिका होती. पण अर्थात् अंतस्थ हेतू वेगळाच होता. पेट्रोलियम मोठी उपयुक्त व म्हणूनच हवीहवीशी वाटणारी गोष्ट आहे. त्याकरिता त्यांची सर्व धडपड होती. शिवाय, रशियनांना आपसात लढत ठेवावयाचे, त्यातून जितके कमी रशियन्स जिवंत राहतील तेवढे बरे, रशिया त्यामुळे अधिकच दुबळे होईल, ही त्यांची भावना होतीच’

साविन्कोवची ही खळबळजनक जबानी दोन दिवस सतत चालली होती. कटकारस्थाने करणारा दहशतवादी नेता म्हणून त्याच्या संपूर्ण जीवनक्रमाची त्याने माहिती दिली. त्याला ज्यांच्याकडून भरपूर मदत मिळाली त्या इंग्लंड, फ्रान्स व अन्य युरोपीय देशांतील मुत्सद्यांची व पैसा पुरविणाऱ्याची नावेही त्याने सांगितली. कळत न कळत तो त्यांच्या हातातील बाहुले बनला होता असे तो म्हणाला ‘मी जणू एका काचेच्या पिंजऱ्यात सापडलो होतो. माझ्या कटकारस्थानाशिवाय मला दुसरे काही सुचत नव्हते. दिसत नव्हते. पण आपल्या लोकांची व माझी प्रत्यक्ष जवळीक नसली तरी रशियनांवर माझे प्रेम आहे. त्यांच्याकरिता प्राणही अर्पण करण्याची माझी तयारी होती. पण त्यांचे हित किंवा त्यांच्या इच्छा अनिच्छा यांचे ज्ञान मला व्हावे तरी कसे?’

१९२३ च्या सुमारास, जागतिक दृष्ट्या सोविएत क्रांती किती महत्त्वाची ठरणार आहे ह्याची जाणीव त्याला होऊ लागली व रशियात परत जाण्याची ओढ त्याला बेचैन करू लागली असे त्याने सांगितले. त्याला सर्व काही स्वतःच्या डोळ्यांनी पाहायचे होते, स्वतःच्या कानांनी ऐकायचे होते. ‘परकीय वृत्तपत्रांत ज्या बातम्या प्रसिद्ध होत होत्या त्या सर्व खोट्या असाव्यात, त्यामागे, सोविएत रशियाची नालस्ती करणे हाच केवळ हेतू होता अशी माझी हळूहळू खात्री होऊ लागली. ज्या सोविएतांना कोणी पराभूत करू शकले

अनुक्रमणिका

नाही त्यांनी रशियन लोकांच्या हिताकरिता काहीच केले नसेल हे अशक्यच आहे असे मला निश्चितपणे वाटू लागले.'

सोविएत न्यायालयाने राष्ट्रद्रोहाच्या आरोपाखाली साविन्कोवला देहदंडाची शिक्षा ठोठावली परंतु त्याची मनमोकळी जबानी सत्यावर आधारित असल्याची नंतर खात्री झाल्याने देहदंडाऐवजी त्याला दहा वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा दिली गेली. [साविन्कोव तुरुंगात असता सोविएत अधिकाऱ्यांनी त्याला मोठ्या सन्मानाने वागविले. त्याला काही खास सवलतीही देण्यात आल्या. त्याला हवी ती पुस्तके व लेखनाचे साहित्य पुरविले गेले. पण तुरुंगातून मुक्तता व्हावी याकरिता तो झुरत राहिला! ७ मे १९२५ रोजी चेका प्रमुख फेलिक्स झेरझिन्स्की याला त्याने एक लांबलचक आवाहनात्मक पत्र पाठविले. त्यात तो म्हणाला, 'मला एक तर गोळ्या घालून ठार करा, नाहीतर मला काम करण्याची संधी द्या. मी तुमच्याविरुद्ध जरूर होतो. पण आता मी तुमच्या बाजूचा झालो आहे. इकडेही नाही व धड तिकडेही नाही, नुसते तुरुंगात पडून राहणे असे हे नकर्तेपणाचे जिणे मी सहन करू शकत नाही.' क्षमेची याचना करीत, सोविएत सरकार सांगेल ते काम करण्याची त्याने तयारी दर्शविली. त्याची ती याचिका मंजूर झाली नाही. त्यानंतर, निराश होऊन काही दिवसांनी, तुरुंगाच्या चवथ्या मजल्यावरील खिडकीतून खाली उडी मारून साविन्कोवने आपली जीवनयात्रा संपविली.]

साविन्कोवला झालेली अटक व मुख्य म्हणजे त्याने सोविएत न्यायालयासमोर दिलेला कबुलीजबाब यामुळे पॅरिसमध्ये जणू बॉंबस्फोटच झाला. सिडने रॅलीने त्याच्या वरिष्ठांशी विचारविनिमय करण्याकरिता घाईघाईने लंडनला प्रयाण केले. ब्रिटिश टोरींचे बोल्शेविकविरोधी मुखपत्र 'मॉर्निंग पोस्ट' या वृत्तपत्राच्या ८ सप्टेंबर १९२४ च्या अंकात रॅलीचे एक सविस्तर व विलक्षण निवेदन प्रसिद्ध झाले. त्यात त्याने स्पष्ट करून सांगितले की मास्कोमध्ये साविन्कोवची न्यायालयीन चवकशी कधी झालीच नाही; ते सर्व थोतांड आहे; सत्य असे आहे की साविन्कोवला तो सोविएत सीमा ओलांडीत असता, गोळ्या घालून सोविएतांनी ठार केले. त्याच्याविरुद्धचा तो सर्व खटला म्हणजे एक फार मोठी फसवणूक होती...

'रशियन सीमा ओलांडताना साविन्कोव मारला गेला, आणि त्याच्याविरुद्धचा लुटुपटूचा खटला म्हणजे त्यांच्या स्वतःच्याच एका हस्तकाला साविन्कोव म्हणून उभे करून मास्को येथे बंद दाराआड चेकाने उभे केलेले न्यायालयीन चवकशीचे ते एक भयानक नाट्य होते,' [क्रांतीनंतरच्या काळात सोविएत संघाविरुद्ध कटकारस्थाने करणारे परकीय व रशियन देशद्रोही यांविरुद्ध सोविएत रशियात करण्यात आलेल्या न्यायालयीन चौकशीचा व त्यावेळी त्या आरोपींनी दिलेल्या कबुलीजबाबांचा खरेपणा नाकारताना सोविएत संघाच्या शत्रूंनी नंतरच्या काळात दिलेल्या अनेक लोकविलक्षण स्पष्टीकरणांपैकी हे पहिले स्पष्टीकरण होते.] असे त्याने घोषित केले.

एका सोविएत-विरोधी कटाचा सूत्रधार म्हणून साविन्कोवने बजावलेल्या भूमिकेची रॅलीने मोठ्या अट्टाहासाने व खंबीरपणे तरफदारी केली—

'मी साविन्कोवचा एक निकटचा मित्र व निष्ठावान अनुयायी होतो याचा मला अभिमान आहे. त्याचा मित्र म्हणून त्याच्या सन्मानाची जपणूक करणे हे मी माझे पवित्र कर्तव्य मानतो. सोविएत रशियात प्रवेश मिळवून घेण्याच्या त्याच्या उद्दिष्टांची व योजनेची ज्या अगदी थोड्या लोकांना माहिती होती त्यापैकी मी एक होतो. सोविएत सीमेच्या दिशेने जाण्यास तो निघाला तोपर्यंत मी सतत त्याच्याबरोबर होतो. माझ्या सहकार्यानेच त्याच्या सगळ्या योजना त्याने आखल्या होत्या.'

'मॉर्निंग पोस्ट' ला दिलेल्या निवेदनाच्या अखेरी रॅलीने त्या वृत्तपत्राच्या संपादकाला आवाहन केले होते—

'महाशय, बोल्शेविक—विरोध व साम्यवाद—विरोध हे आपल्या वृत्तपत्राचे नेहमीचे सूत्र राहिले आहे. त्यामुळे बोरिस साविन्कोवचे नाव व प्रतिष्ठा यांचे समर्थन करण्यात आपण मला मदत करावी असे मी आपल्याला आवाहन करतो.'

त्याचवेळी प्रत्येक शब्द विचारपूर्वक योजून लिहिलेले एक खाजगी पत्र रॅलीने विन्स्टन चर्चिलला लिहिले—

चर्चिल महोदय,

बोरिस साविन्कोववर जो अनर्थ गुदरला त्यामुळे आपल्याला नक्कीच दुःख झाले असणार. मी किंवा त्याचे निकटचे मित्र व सहकारी यांना कोणालाच त्याच्याबद्दल निश्चित अशी बातमी कळलेली नाही. परंतु आजपर्यंत चेकाने आयोजित केलेल्या सर्वात धाडसी व दुष्ट कारस्थानाला साविन्कोव बळी पडला अशी आमची पक्की खात्री झाली आहे. 'मॉर्निंग पोस्ट' ला लिहिलेल्या एका पत्रात आमचे मत मी स्पष्टपणे मांडले आहे. एकंदर प्रकारात आपण जो रस घेतला होता तो लक्षात घेऊन, त्या पत्राची एक प्रत आपल्या माहितीकरिता या सोबत पाठवीत आहे.

आपला विश्वासू
**सिडने रॅली**

अर्थात, मास्को खटल्याची विश्वसनीयता थोडेच दिवसात सिद्ध झाली. त्यामुळे 'मॉर्निंग पोस्ट' ला पुन्हा वेगळेच पत्र पाठविणे रॅलीला भाग पडले, ते असे—

"साविन्कोवच्या खटल्यासंबंधीच्या खात्रीलायक तपशीलवार बातम्या, काही मुद्यांबाबत वृत्तपत्रांचे 'स्टेनोग्राफिक' अहवाल, व त्यांना पुष्टी देणाऱ्या विश्वसनीय निःपक्षपाती चक्षुर्वैसत्यम साक्षी, यावरून साविन्कोवने केलेल्या विश्वासघाताबद्दल आता कोणत्याही प्रकारे संशयाला जागा राहिलेली नाही. त्याने केवळ त्याच्या मित्रांचा, त्यांच्या संघटनेचा व त्यांच्या ध्येयाचा विश्वासघात केला असे नव्हे, तर हेतुपुरस्सर तो आता त्याच्या जुन्या शत्रूंना जाऊन मिळाला आहे. त्याला अटक करणाऱ्या वैऱ्यांशी हातमिळवणी करून बोल्शेविकविरोधी चळवळीवर त्याने अत्यंत प्रखर प्रहार केला आहे. अंतर्गत व आंतर्राष्ट्रीय क्षेत्रातही उपयोग करून घेता येईल असा एक राजकीय विजय त्याने, त्याच्या सहकाऱ्यांचा विश्वासघात करून, बोल्शेविकांना मिळवून दिला आहे. त्याच्या या विश्वासघातकी कृत्यामुळे साम्यवाद—विरोधी चळवळीतील मानकऱ्यांच्या यादीतून त्याचे नाव कायमचे पुसले गेले आहे. साविन्कोवच्या त्या भयंकर व लाजिरवाण्या पतनामुळे त्याचे जुने मित्र व अनुयायी यांना कमालीचे दुःख होत आहे. परंतु मानवतेच्या शत्रूंशी काही झाले

तरी हातमिळवणी करावयाची नाही असा ज्यांचा निर्धार आहे त्यांना त्यांच्या जुन्या नेत्याची ती नैतिक आत्महत्या, उद्दिष्टसिद्धीकरिता त्यांनी आपसातील मतभेद मिटवून टाकून संघर्ष चालू ठेवावा याकरिता सतत प्रेरणा देत राहील अशी मला खात्री आहे."

यानंतर थोडेच दिवसांनी विन्स्टन चर्चिलचे छोटेसे, व मोठी सावधगिरी बाळगून लिहिलेले एक चिठ्ठीवजा पत्र रॅलीला मिळाले.—

**चार्टवेल मॅनर**
वेस्टरहॅम केंट,
१५ डिसेंबर १९२४.

श्री. रॅली,

तुमचे पत्र मला काहीसे मजेदारच वाटले. या एकंदर घटनेचा निकाल असाच लागणार अशी मला प्रारंभापासून अपेक्षा होतीच. मात्र साविन्कोवचा तुम्ही इतक्या कठोरतेने धिःक्कार करून मोकळे व्हावे हे योग्य आहे असे मला वाटत नाही. तो मोठ्या भयंकर कचाट्यात सापडला होता. तशा दिव्याला, न डगमगता व न कचरता ज्यांनी यशस्वीपणे तोंड दिले असेल अशांनाच केवळ साविन्कोवचा धिःकार करण्याचा अधिकार पोहोचतो. ते काहीही असो. साविन्कोवबद्दलच्या मूल्यमापनाबाबत माझ्या मतात काही परिवर्तन होण्यापूर्वी या एकंदर प्रकरणाचा शेवट कसा होतो हे जाणून घेण्याची मला उत्सुकता राहील.

आपला
**डब्लू. एस. चर्चिल**

साविन्कोवने दिलेली साक्ष व कबुलीजबाब प्रसिद्ध होताच, त्याला इंग्लंडमध्ये ज्यांनी पाठिंबा दिला होता त्यांची मोठीच पंचाईत झाली. त्यामुळे उद्‌भवलेल्या लोकापवादामुळे व टीकेमुळे रॅलीला घाईघाईने अमेरिकेला पाठवून देण्यात आले. चर्चिल काही काळ आपल्या लंडनबाहेरील केंट येथील घरी जाऊन राहिला, तर ब्रिटिश परराष्ट्र खात्याने एकंदर प्रकाराबद्दल धूर्तपणे मौन बाळगले.

या संपूर्ण प्रकरणाचा खळबळजनक ठरणारा उपसंहार अजून व्हायचाच होता. ऑक्टोबर १९२४ च्या अखेरी ब्रिटनमधील सार्वत्रिक निवडणुकांच्या थोडेच दिवस अगोदर, ब्रिटनविरुद्ध सोविएत संघाने केलेला एक दुष्ट व महाभयंकर कट स्कॉटलंड यार्डने उघडकीस आणल्याची बातमी ठळक मथळ्याखाली, लॉर्ड रॉदरमिअरच्या 'डेली मेल' या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली. त्या कटाचा कागदोपत्री पुरावा म्हणून 'डेली मेल'ने कुप्रसिद्ध 'झिनोवीव पत्र' प्रसिद्ध केले.' रशियन कॉमिन्टर्न नेता ग्रेगरी झिनोवीव याने त्या पत्राद्वारा

ब्रिटिश साम्यवाद्यांना, सार्वत्रिक निवडणुकात टोरींना कसे तोंड द्यावयाचे याबद्दल सूचना केल्या होत्या असे विधान त्यात केले होते.

ते पत्र म्हणजे साविन्कोवच्या कबुलीजबाबाला टोरींनी दिलेले उत्तर होते. त्याचा अपेक्षित तो परिणाम झाला. साम्यवाद—विरोधी स्फोटक जहरी प्रचाराच्या बळावर ब्रिटनमध्ये टोरींनी निवडणूक जिंकली.

या सर्व पार्श्वभूमीवर एक लक्षणीय बाब अशी की नंतर, काही वर्षांनी स्कॉटलंड यार्डचा एक अधिकारी सर विन्डहॅम चाईल्ड्स् याने असे स्पष्ट विधान केले की झिनोवीवकडून तसे काही पत्र त्यावेळी आलेच नव्हते. ते पत्र बनावट होते व ते तयार करण्यात अनेक परकीय हस्तकांचे हात गुंतलेले होते. कर्नल वॉल्थेर निकोलाय याचे कार्यालय हे त्या बनावट पत्राचे मूळ उगमस्थान होते. एके काळी जर्मन गुप्तहेर खात्याचा प्रमुख असलेला कर्नल वॉल्थेर निकोलाय हा त्यावेळी जर्मन नाझी पक्षाचा एक उत्साही कार्यकर्ता म्हणून काम करीत होता. त्याच्याच देखरेखीखाली, पूर्वीचा बाल्टिक प्रदेशातील श्वेत नेता व आता नाझींच्या वृत्तसेवेचा प्रमुख बनलेल्या बॅरन उक्झक्केलने खुद्द जर्मनीच्या राजधानीत, बर्लिनमध्ये, सोविएत—विरोधी बनावट कागदपत्रे तयार करण्याकरिता एका खास विभागाची स्थापना केली होती व त्या विभागाद्वारा त्या बनावट कागदपत्रांना व्यापक क्षेत्रात प्रसिद्धी दिली जाईल अशी व्यवस्था केली होती.

तथाकथित झिनोवीव पत्र ब्रिटिश परराष्ट्र मंत्रालयाला सादर करण्याचे व तेथून डेली मेल या वृत्तपत्राला पाठविण्याचे काम जॉर्ज बेल या एका आंतरर्राष्ट्रीय हस्तकाने गुप्तपणे पार पाडले होते. सर हेन्री डेटरडिंग या अँग्लो—फ्रेंच तेल सम्राटाच्या पदरी बेल नोकरीला होता.

अनुक्रमणिका

प्रकरण १०

# फिनलंड सीमेवर

१९२४ च्या शिशिरात 'न्यू ॲम्स्टरडॅम' या जहाजाने कॅप्टन सिडने रॅली सपत्निक अमेरिकेत आला. त्यावेळी त्याच्या स्वागतार्थ श्वेत रशियनांचे एक शिष्टमंडळ गोदीवर आले होते. बोल्शेविझम—विरोधी धर्मयुद्धातील त्या वीराच्या स्वागत समारोहात फुले, उंची मदिरा व स्तुतीपर भाषणे यांची एकच धमाल उडाली होती.

अमेरिकेच्या वातावरणात रॅली लवकरच समरस झाला. त्या काळी, अमेरिकेकडून सोविएत रशियाला दिल्या जावयाच्या कर्जावर अमेरिकेत सर्वत्र बरीच चर्चा चालू होती. अनेक प्रमुख अमेरिकन व्यापारी सोविएत रशियाला कर्ज द्यावे या मताचे होते; आणि अमेरिका—सोविएत संबंधात सलोखा असावा याकरिता-सोविएत संघही उत्सुक होता. राष्ट्राची उध्वस्त अर्थव्यवस्था पुन्हा बळकट पायावर उभी करण्याकरिता भांडवल व यंत्रसामुग्री यांची आत्यंतिक निकड जाणवत असलेल्या सोविएत सरकारची त्याकरिता परकीयांना काही सवलती देण्याचीही तयारी होती.

सोविएत रशियाला अमेरिकेकडून ते कर्ज मिळेल अशीच शक्यता त्यावेळी दिसत होती. परंतु तसे होऊ देऊ नये असा सिडने रॅलीचा निर्धार होता. अमेरिकेच्या त्याच्या वास्तव्यात त्याच्यासमोर असलेल्या उद्दिष्टांपैकी ते एक सर्वात महत्त्वाचे उद्दिष्ट होते असे मिसेस रॅलीने आपल्या स्मृतिग्रंथात नमूद केले आहे.

त्या नियोजित कर्जाविरुद्धच्या लढ्यात रॅलीने मोठ्या तत्परतेने स्वतःला झोकून दिले. लोअर ब्रॉडवे येथे त्याने त्याचे खाजगी कार्यालय सुरू केले. लवकरच अमेरिकेतील सर्व सोविएत विरोधकांचे व तेथील श्वेत रशियनांचे ते कार्यालय म्हणजे केंद्रस्थान बनले. रॅलीच्या त्या कार्यालयातून सोविएत—विरोधी प्रचारसाहित्य अमेरिकेतील सर्व ख्यातनाम व प्रभावी संपादक, स्तंभलेखक, शिक्षणतज्ज्ञ, मुत्सद्दी, व्यापारी इत्यादींना पोस्टाने पाठविण्यात येऊ लागले. पश्चिमात्य संस्कृती व जागतिक व्यापार यांना बोल्शेविझममुळे कसा धोका निर्माण झाला आहे हे अमेरिकन लोकांना पटवून देण्याकरिता व्याख्याने देत रॅलीने त्या संपूर्ण देशाचा दौरा केला. वॉल स्ट्रीटवरील निवडक लोकांच्या लहानलहान गटांशी व निरनिराळ्या शहरातील धनिक उद्योगपतींशी त्याने गुप्त खलबते केली.

जाहीर व्याख्याने देणे व वृत्तपत्रातून लेख लिहिणे या दोन्ही मार्गांनी सोविएतांना कर्ज देण्याविरुद्ध रॅलीने जोरदार लढा दिला. सोविएतांविरुद्ध अनेक कपोलकल्पित निंदास्पद गोष्टी त्याने अमेरिकन नेते व व्यापारी यांच्या मनावर बिंबविल्या. शेवटी त्याच्या प्रयत्नात त्याला यश मिळाले सोविएत संघाला

अमेरिकेकडून ते कर्ज मिळाले नाही. [सोविएत रशियाला मिळावयाच्या त्या कर्जाचा बोजवारा उडण्याचे संपूर्ण श्रेय सिडने रॅलीकडे जाते असे मात्र नाही. ते कर्ज दिले जाऊ नये असे वाटणारे व त्याकरिता अटीतटीचा प्रयत्न करणारे इतरही अनेक लोक अमेरिकेत होते. त्यापैकी आघाडीवर होता तो त्यावेळचा अमेरिकेचा वाणिज्यमंत्री—हर्बर्ट हूबर. त्याच्या बोल्शेविक-द्वेषाची धार कधीच बोथट झाली नव्हती. जोपर्यंत रशिया बोल्शेविकांच्या नियंत्रणाखाली आहे तोपर्यंत रशियाशी व्यापार करण्याच्या प्रश्नाला आर्थिक नव्हे तर राजकीय स्वरूप आहे असे त्याने ३१ मार्च १९२१ रोजी मॅक्झिम लिटविनोव यास स्पष्टपणे कळविले होते.]

अमेरिकेकडून सोविएतांना मिळावयाच्या कर्जाची योजना हाणून पाडणे ही रॅलीने अमेरिकेत केलेली एकमेव सोविएत—विरोधी कारवाई होती असे मात्र नव्हे. त्याबरोबरच, युरोप व रशिया यांत, तो साकार करीत असलेल्या निरनिराळ्या सोविएत—विरोधी कटकारस्थानांना बलशाली पाठिंबा मिळवून घेण्याच्या हेतूने अमेरिकेत आंतर्राष्ट्रीय बोल्शेविक—विरोधी संघटनेची एक शाखा प्रस्थापित करावी हे त्याचे प्रमुख उद्दिष्ट होते. रॅलीच्या त्या संघटनेच्या शाखा बर्लिन, लंडन, पॅरिस, रोम व सोविएत रशियाला घेरून असलेल्या सर्व बाल्टिक व बाल्कन राज्यात अगोदरच कार्यरत होत्या. त्या संघटनेची एक शाखा दूर पूर्वेत मांचूरियात हार्बिन येथे कुप्रसिद्ध दहशतवादी अतामन सेम्योनेव याच्या नेतृत्वाखाली प्रस्थापित झालेली होती. त्या शाखेला जपानने पैसा पुरविला होता. अमेरिकेत मात्र तोपर्यंत तशा प्रकारची कोणतीही संघटित यंत्रणा अस्तित्वात नव्हती. परंतु तशी संघटना व यंत्रणा यशस्वी होण्याकरिता आवश्यक त्या सर्व गोष्टी तेथे भरपूर प्रमाणात उपलब्ध होत्या.

रॅलीच्या श्वेत रशियन मित्रांनी, सोविएत—विरोधी चळवळीला सढळ हाताने व आनंदाने मदत करतील अशा धनिक व प्रभावशाली अमेरिकनांशी रॅलीचा परिचय करून दिला.

युरोपातील त्याच्या एका हस्तकाला लिहिलेल्या गोपनीय पत्रात रॅलीने कळविले—‘आपल्या कार्याकरिता येथे अमेरिकेतच फार मोठ्या प्रमाणावर पैसा उभा होऊ शकतो. परंतु त्याकरिता सुनिश्चित व सहजसाध्य होण्याजोगी योजना आपल्याजवळ तयार पाहिजे; आणि ठराविक कालमर्यादेत सोविएत—विरोधी चळवळ यशस्वी करण्याची व सोविएत सरकार उलथून पाडण्याची क्षमता आपल्यात आहे याची खात्री आपल्याला पटवून देता आली पाहिजे; तसे झाले की आपल्याला येथील सर्वात मोठ्या मोटार कारखानदाराकडे पैशासंबंधी बोलता येईल. त्याची एकदा खात्री पटली तर आपला पैशाचा प्रश्न सुटलाच म्हणून समज.’

‘सर्वात बडा मोटार कारखानदार’ हा रॅलीने केलेला उल्लेख हेन्री फोर्डसंबंधी होता हे मिसेस् रॅलीच्या स्मृतिचित्रावरून स्पष्ट होते.

### एजंट बी १

अमेरिकेत सोविएत—विरोधी श्वेत चळवळीचा नेता होता तो झारकालीन अधिकारी, कॅप्टन बोरिस ब्रासोल. त्या काळी तो ‘ओघ्राना’ चा हस्तक होता, व सेंट पीटर्सबर्ग येथील सर्वोच्च न्यायालयात अभियोगी वकील म्हणून त्याने काम केले होते. १९१६ मध्ये न्यूयॉर्क येथे भरलेल्या दोस्त राष्ट्रांच्या परिषदेकरिता

अनुक्रमणिका

रशियन प्रतिनिधी म्हणून तो अमेरिकेत आला होता. परिषदेनंतर झारचा खास दूत म्हणून तो अमेरिकेत राहिला.

किरकोळ देहयष्टीच्या व कातर मनोवृत्तीच्या ब्रासोलची, ज्यूविरोधी प्रचार सातत्याने करणारा म्हणून ख्याती होती. क्रांतीनंतर 'झारकालीन लष्करी व नौदल अधिकाऱ्यांचा संघ' या नावाखाली सोविएत सरकारविरुद्ध कटकारस्थाने करणारी श्वेत रशियनांची संघटना त्याने अमेरिकेत उभारली. त्यात रशियातून अमेरिकेत पळून आलेल्या 'ब्लॅक हंड्रेड्स' च्या सदस्यांचा प्रामुख्याने भरणा होता. अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याशी ब्रासोलचा गट निकटचा संपर्क राखून होता. त्यांनीच सिसॉन कागदपत्रांची विश्वसनीयता पटवून देण्याकरिता बराचसा धादांत बनावट पुरावा अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याला पुरविला. [रशियन क्रांतीनंतर लेनिन व अन्य सोविएत नेते हे जर्मनीचे पगारी हस्तक आहेत असे सिद्ध करणारी तथाकथित सिसॉन कागदपत्रे प्रथम अमेरिकेच्या पर राष्ट्र खात्याने प्रकाशित करून सर्वत्र प्रसृत केली. सुरवातीला, श्वेत रशियनांनी विक्रीकरिता खुली केलेली ही कागदपत्रे उघडउघड बनावट दिसत असल्याने ब्रिटिश गुप्तहेर खात्याने ती स्वीकृत करण्यास नकार दिला होता. अमेरिकेच्या परराष्ट्र खात्यातील एक अधिकारी एडग्र सिसॉन याने मात्र ती खरेदी करून वॉशिंग्टनला आणून प्रकाशित केली. त्यामुळे ती कागदपत्रे सिसॉन कागदपत्रे म्हणून ओळखली जाऊ लागली. ती सर्व बनावट असल्याचे नंतर निर्विवादपणे सिद्ध झाले.] रशियन समस्येचा तज्ज्ञ असल्याचा दावा करून गुप्तहेर खात्यात ब्रासोलने उच्चपदी नोकरी पटकावली. तो अमेरिकेचा 'बी १' हस्तक बनला. ते होताच ब्रासोलने पहिले काही काम केले असेल तर झारशाहीतील एका जनरलची कन्या नताली द बोगोरी हिच्याकडून 'प्रोटोकोल्स ऑफ द वाईज मेन ऑफ झिऑन' या कुप्रसिद्ध ज्यू-विरोधी पुस्तकाचा इंग्रजीत अनुवाद करून घेतला. झारशाहीतील गुप्त पोलीस याच पुस्तकाचा वापर ज्यू–विरोधी दंगे भडकविण्याकरिता करीत असत; आणि क्रांतीनंतर रशिया सोडून बाहेर पडलेला अल्फ्रेड रोझेनबर्ग ह्याच पुस्तकाच्या प्रती त्याकाळी म्युनिक येथे सर्वांना पुरवीत होता. ब्रासोलने ते अनुवादित पुस्तक अमेरिकेच्या गुप्तचर विभागाला 'रशियन क्रांतीचे स्पष्टीकरण देणारे विश्वसनीय दस्तऐवज' म्हणून सादर केले.

श्वेत रशियनांकरिता पाठिंबा मिळवून घेण्याच्या व बोल्शेविक क्रांती म्हणजे आंतर्राष्ट्रीय ज्यू–कारस्थानाचाच एक भाग आहे हे अमेरिकन जनतेला पटवून सांगण्याच्या हेतूने 'प्रोटोकोल्स ऑफ झिऑन' च्या प्रती ब्रासोल अमेरिकेत वितरित करू लागला. झारशाहीतील त्या बनावट कागदपत्रांसह त्याने स्वतः लिहिलेले, ज्यूंची नालस्ती करणारे लेखही तो प्रस्तृत करीत होता. १९२१ च्या प्रारंभी त्याने लिहिलेले 'द वर्ल्ड ॲट द क्रॉस रोडस्' हे पुस्तक बोस्टन येथे प्रकाशित करण्यात आले. त्यांत रशियन क्रांती ही ज्यूंच्या चिथावणीने, त्यांनी पुरविलेल्या पैशाने व त्यांच्याच नेतृत्वामुळे घडून आली असून, झारशाहीचे उन्मूलन व त्यानंतरच्या आंतर्राष्ट्रीय क्षेत्रातील घटना या संपूर्ण जगातील ज्यू व वुड्रो विल्सन यांनी चालविलेल्या कारस्थानाचाच एक भाग असल्याचे त्याने आग्रहाने प्रतिपादित केले होते.

१ जुलै १९२१ रोजी, अमेरिकेतील एक श्वेत निर्वासित, मेजर जनरल कांऊट व्ही. शेरेप–स्पिरोदोविच याला पाठविलेल्या एका पत्रात ब्रासोलने मोठ्या प्रौढीने लिहिले—"मागल्या एका वर्षात मी तीन पुस्तके लिहिली. ज्यूंविरुद्धच्या दहा उठावांनीही जितकी हानी ज्यूंची झाली नसेल, त्यापेक्षाही कितीतरी अधिक विघातक परिणाम ज्यूंवर माझ्या पुस्तकांमुळे झाला आहे."

अनुक्रमणिका

शेरेप–स्पिरोदोविच हा स्वतः कट्टर ज्यूविरोधी प्रचारक म्हणून विख्यात होता. अमेरिकेचा सुप्रसिद्ध उद्योगपती हेन्री फोर्ड याच्याकडून त्याला भरपूर द्रव्यसहाय्य मिळत होते. बोरिस ब्रासोल यानेही फोर्ड कंपनीच्या हस्तकांशी संपर्क साधला होता; व त्या मोटार सम्राटाला 'प्रोटोकोल' च्या प्रती सादर केल्या होत्या.

### डेट्रॉइटमध्ये ब्लॅक हंड्रेडस्

सरंजामशाही मनोवृत्तीचे झारनिष्ठ निर्वासित व जगातील अत्याधुनिक उत्पादनपद्धतींचा अवलंब करणारा सुप्रसिद्ध उद्योगपती हेन्री फोर्ड यांची मोठी विचित्र व अभद्र युती अमेरिकेत झाली होती.

पहिल्या महायुद्धाच्या अखेरी हेन्री फोर्डचे मन कडवटपणाने व वैफल्याने भरून गेले होते. युद्धाकाळात फोर्डने युरोपात पाठविलेल्या शांतता–जहाजाच्या कल्पनेचा पूर्ण बोजवारा उडून, तो उद्योगपती सर्वांच्या टिंगलीचा विषय बनला होता. त्याच्या धंद्याच्या विस्ताराकरिता वॉल स्ट्रिटकडून कर्ज मिळण्याबाबत बरीच खळबळ झाली असल्यानेही तो नाराज होता. धंद्याच्या दृष्टीने त्याच्या अंगी विशेष गुणवत्ता असली तरी मूलतः खऱ्या अर्थाने तो शिक्षित नसल्याने त्याच्या सर्व अडचणींकरिता केवळ ज्यूच जबाबदार आहेत असे सांगत जेव्हा श्वेत रशियन्स त्याच्याकडे गेले तेव्हा त्यावर त्याचा चटकन् विश्वास बसला. त्यांच्या त्या विधानाचा पुरावा म्हणून श्वेत रशियानांनी 'प्रोटोकोल्स् ऑफ झिऑन' हे पुस्तक फोर्डला सादर केले. त्याचे काळजीपूर्वक वाचन केल्यानंतर, त्याच्या पुढील सर्व समस्यांकरिता ज्यू जबाबदार असल्याची त्याची खात्री पटली; व ज्यूविरोधी बनावट कागदपत्रांना राष्ट्रव्यापी प्रसिद्धी देण्याच्या हेतूने त्याने ती कागदपत्रे त्याच्या 'डिअरबोर्न इंडिपेंडेट' या वृत्तपत्रात छापली.

त्याचा परिणाम असा झाला की क्रांतीनंतर अमेरिकेत निघून आलेले रशियन अमीर उमराव, श्वेत दहशतवादी, ज्यूंवर हल्ले आयोजित करणारे 'ब्लॅक हंड्रेडस्' व झारकालीन गुप्त पोलीस या सर्वांची डेट्रॉईट येथील फोर्डच्या मोटर कारखान्यात एकच गर्दी झाली. ज्यूंच्या क्रांतिकारी कटकारस्थानांमुळे खुद्द अमेरिकन सरकारला धोका निर्माण झाला असून अमेरिकेतील उदारमतवादी अमेरिकनांवर पाळत ठेवण्यासाठी, सोविएत–विरोधी–प्रतिक्रियावादी योजनांना सर्वतोपरी प्रोत्साहन देण्यासाठी व ज्यू–विरोधी गावगप्पांच्या आधारे अमेरिकेतील ज्यूंविरुद्ध जोमाने प्रचार चालविण्यासाठी, श्वेत रशियनांच्या देखरेखीखाली एक फार मोठी गुप्त संघटना उभारण्यात आली.

या संघटनेचे मध्यवर्ती कार्यालय फोर्ड मोटार कंपनीत होते. संघटनेच्या सदस्यांना खास सांकेतिक क्रमांक देण्यात आले होते. इ.जी. लायबोल्ड या फोर्डच्या स्वीयसचिवाचा क्रमांक १२१ ए.एस्. होता; 'डिअरबोर्न इंडिपेंडेंट' या फोर्डवृत्तपत्र संपादकाचा–डब्लू. जे. कामेरॉन याचा क्रमांक १२२ एक्स होता. तर 'प्रोटोकोल' चे इंग्लिशमध्ये भाषांतर करणारी बोरिस ब्रासोलची मदतनीस नताली बोगोली हिला २९ एच्. हा क्रमांक देण्यात आला होता.

अनुक्रमणिका

अमेरिकन लोकजीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात फोर्डच्या संघटनेने शिरकाव केला. अमेरिकेतील आघाडीची वृत्तपत्रे, सुप्रसिद्ध विद्यापीठे व महामंडळे, एवढेच नव्हे तर अमेरिकन सरकारच्या निरनिराळ्या घटक संस्था यात प्रवेश मिळवून घेऊन संघटनेचे सदस्य कारवाया करीत होते. अमेरिकन सरकारच्या लष्करी गुप्तहेर खात्याचा माजी सदस्य डॉ. हॅरिस ह्यूटन फोर्डच्या तथाकथिक गुप्तहेर सेवेचा प्रमुख बनला. फोर्डच्या कटकारस्थानी यंत्रणेच्या त्या विभागात प्रमुख म्हणून १०३ ए. हा त्याचा सांकेतिक क्रमांक होता. सोविएत व ज्यू–विरोधी प्रचाराकरिता प्रमुख अमेरिकन उदारमतवाद्यांबद्दल गुप्त माहिती मिळविणे हे त्यांचे मुख्य काम होते. चौकशीसाठी त्यांनी तयार केलेल्या उदारमतवाद्यांच्या काळ्या यादीत इतर अनेक नेत्यांबरोबर, वुड्रो विल्सन, रेव्हरंड जॉन हायेन्स, हेलन केलर, न्यायाधीश ह्युजेस व ब्रँडीज यांचीही नावे होती. अमेरिकन सरकार उलथून पाडण्याकरिता ज्यूंनी चालविलेल्या कारस्थानात ह्या मंडळींचा उपयोग करून घेण्यात येत होता, असे फोर्डच्या गुप्तहेर सेवेने आपल्या गोपनीय अहवालात नमूद केले होते.

या गुप्तहेर सेवेने केलेल्या चौकशीचा निष्कर्ष फोर्डच्या 'डिअरबोर्न इंडिपेंडेंट' या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आला. याच वेळी 'प्रोटोकोल ऑफ झिऑन' या पुस्तकालाही त्या वृत्तपत्रात क्रमशः प्रसिद्धी दिली जात होती. वुड्रो विल्सनविषयी त्या वृत्तपत्राने केलेले भाष्य त्या दृष्टीने नमुनेदार आहे–

'राष्ट्राध्यक्ष असताना विल्सन यांचा ज्यूंशी मोठा निकटचा संबंध होता. त्यांच्या प्रशासनात प्रामुख्याने ज्यूंचाच भरणा होता हे सर्वांना विदीत आहेच. एक ज्येष्ठ प्रेसबिटेरियन म्हणून ख्रिश्चन विचार ते जाहीरपणे व्यक्त करीत असले तरी त्यांचे ज्यू सहकारी त्यांचे पाय नेहमीच मागे ओढीत असत.'

विलियम हॉवर्ड टाफ्ट यांच्याबद्दल 'डिअरबोर्न इंडिपेंडेंट' मध्ये जी माहिती प्रकाशित झाली होती तिचा समारोप पुढील परिच्छेदाने करण्यात आला होता–

'ज्यूंचा विरोध करण्याचा विलियम हॉवर्ड टाफ्टने कसा प्रयत्न केला व शेवटी ज्यूंनी टाफ्टला कसे मोडून काढले याची ही कथा आहे. स्वतःचे समर्थन करताना ज्यू लोक ज्या सुप्रसिद्ध व्यक्तींचा उपयोग करून घेतात, त्या मंडळींच्या गटात टाफ्ट आता सामील झाला आहे ही गोष्ट त्या दृष्टीने लक्षणीय आहे.'

ज्यूंची नालस्ती व बदनामी करणाऱ्या नव्यानव्या गोष्टी व त्यांच्याविरुद्ध बनावट कागदपत्रे गोळा करण्याकरिता फोर्डच्या संघटनेच्या अनेक प्रमुख हस्तकांना महासागरापलीकडे हजारो मैल दूरपर्यंत पाठविण्यात आले. त्यापैकी एक हस्तक होता तो श्वेत रशियन रोदिओनोव. याला जपानमधील श्वेत रशियन वसाहतीतून ज्यू–विरोधी महत्त्वाचे प्रचार साहित्य मिळविण्याकरिता जपानला पाठविले गेले. अमेरिका सोडण्यापूर्वी फोर्ड संघटनेचा एक प्रमुख सदस्य चार्लस् डब्लू. स्मिथ याला रोदिओनोवने एक तार पाठविली ती अशी–

अनुक्रमणिका

"माझ्या अटी पुढीलप्रमाणे आहेत: येत्या सहा महिन्यात ठरल्याप्रमाणे तुम्हाला हवे ते साहित्य मी पुरवीन; त्या मोबदल्यात तुम्ही दरमहा १५०० अमेरिकन डॉलर्स याकोहामा बँकेत आगाऊ जमा करावे, व त्याशिवाय तुम्हाला आतापर्यंत पुरविलेल्या साहित्याची किंमतही तुम्ही द्यावी.'

फोर्ड मोटार कंपनीत निर्माण झालेल्या परिस्थितीबाबत नंतर डेन्मार्कला अमेरिकन प्रतिनिधी म्हणून गेलेला सुप्रसिद्ध अमेरिकन वृत्तपत्रकार नॉर्मन हॅप्सगुडने लिहिले–

फोर्डचे गुप्तहेर ज्या प्रकारे काम करीत होते त्यावरून या देशात त्यांच्या त्या कारवायांमुळे खरोखरीच ज्यूविरोधी दंगे उसळणार की काय असे वाटू लागले. रशियात ब्लॅक हंड्रेड्स्च्या काळात जी लक्षणे दिसत होती ती सर्व लक्षणे फोर्डच्या वर्तुळात दिसत होती. राजकीय दृष्ट्या इतिहासाची पुनरावृत्ती होणार असे वाटत होते....'

इंग्लंडमधील हेन्री डेटरडिंग व जर्मनीतील फ्रिट्झ् थायसेन या उद्योगपतींप्रमाणे अमेरिकन मोटार सम्राट हेन्री फोर्ड हा जागतिक बोल्शेविझम–विरोधाशी व झपाट्याने प्रबळ होणाऱ्या फासिझमशी पूर्णपणे समरस होऊन गेला होता. ८ फेब्रुवारी १९२३ च्या न्यूयॉर्क टाईम्सच्या अंकात बव्हेरियाच्या कायदेमंडळाचा उपाध्यक्ष आऊएर यांनी उघडपणे निवेदन केले,–

'अमेरिकेतील ज्यू–विरोधी प्रमुख हेन्री फोर्ड याने हिटलरच्या चळवळीला काही प्रमाणात द्रव्यसहाय्य केले याची बातमी बरेच दिवसांपासून बव्हेरियन डिएटला होती. एका वर्षापूर्वी जेव्हा फोर्डच्या एका हस्तकाने विशाल जर्मनीचा कुप्रसिद्ध पुरस्कर्ता डायट्रिच आइचार्ट याच्याशी संपर्क साधला तेव्हापासून फोर्डला बव्हेरियातील ज्यूविरोधी चळवळीत रस वाटू लागला. त्याचा तो हस्तक अमेरिकेत परत जाताच फोर्डचा पैसा म्युनिकला येऊ लागला. हिटलर तर, त्याला फोर्डची मदत असल्याबद्दल उघडउघड प्रौढी मिरवतो, व एक ज्यू विरोधक म्हणून तो फोर्डची भरमसाट प्रशंसा करतो.'

म्युनिकच्या कार्नेलियस स्ट्रीटवरील हिटलरच्या छोट्याशा कार्यालयात चौकटीत बसविलेला एकच फोटो भिंतीवर टांगलेला होता–हेन्री फोर्डचा.

### सिडने रॅलीची अखेर

अमेरिकेत आल्यानंतर लागलीच फोर्डच्या ज्यू विरोधी व सोविएत-विरोधी संघटनेशी सहकार्य करून रॅलीने कामाला प्रारंभ केला होता. अमेरिकेत बोल्शेविकांकरिता गुप्तपणे काम करणाऱ्या सर्व लोकांची यादी त्याने फोर्डच्या हस्तकांच्या मदतीने तयार केली होती. [ज्या अमेरिकनांना सोविएत रशियाबद्दल सहानुभूती असेल, किंवा ज्यांनी पूर्वी केव्हातरी त्या राष्ट्राबद्दल अनुकूल असे अवाक्षरही कोठे उच्चारले असेल, अशा सर्व प्रमुख अमेरिकनांची नावे त्या यादीत होती. नंतरच्या काळात ती यादी अमेरिकन फासिस्ट व नाझी हस्तक यांना चांगली उपयुक्त ठरली. ज्यू-विरोधी प्रचारक एलिझाबेथ डिलिंग हिने या व अशाच काही याद्यांचा तिच्या कुप्रसिद्ध 'रेड नेटवर्क' या पुस्तकाचे संपादन करण्याकरिता उपयोग करून घेतला. जॉर्ज

अनुक्रमणिका

सिल्व्हेस्टर व्हायरेक, कर्नल एमर्सन, ऑस्कर फॉस व अन्य नाझी हस्तक, आणि अमेरिकेतील पंचम स्तंभीय यांनी त्यांच्या प्रचारकार्यात याच माहितीचा भरपूर वापर करून घेतला.]

रॅलीच्या प्रयत्नाने अमेरिकेतील ज्यू व लोकशाही-विरोधी चळवळीचा व युरोप-आशियातील आंतर्राष्ट्रीय बोल्शेविकविरोधी संघटनेचा परस्पर संबंध प्रस्थापित झाला. १९२५ च्या वसंतात बोल्शेविझम-विरोधाच्या नावाखाली कार्य करणारे आंतर्राष्ट्रीय फासिस्ट प्रचार व हेरगिरी केंद्र अशा प्रकारे निर्माण झाले.

दरम्यान युरोपातील त्याच्या हस्तकांशी रॅलीचा निकटचा संपर्क होताच. रेवाल, हेलसिंकी, रोम, बर्लिन व सोविएत-विरोधी कारस्थाने करणाऱ्या अन्य केंद्रांकडून त्याला नियमीत बातम्या कळत होत्या. त्याच्या ब्रॉडवे ऑफिसमध्ये रॅलीला येणारी बरीचशी पत्रे सांकेतिक भाषेत किंवा धंद्यानिमित्त पत्र लिहिल्याचा देखावा करून, त्या पाठीमागे अदृश्य शाईने लिहिलेली असत.

या पत्रांत युरोपातील सोविएत-विरोधी चळवळीसंबंधी तपशीलवार माहिती असे. साविन्कोवच्या कटकारस्थानाचा पूर्ण बोजवारा उडाल्यानंतर काही काळ सोविएत-विरोधकांचे नैतिक बळ कोसळले होते. ‘ग्रीन गार्डस्’ संघटना फुटली होती व त्याच्या विस्कळीत झालेल्या लहानसहान गटांचे सदस्य आता धंदेवाईक दहशतवादी किंवा दरोडेखोर बनले होते. त्यांच्यातील परस्पर असूया व शत्रुत्व यामुळे अन्य सोविएत-विरोधी गटांच्या नीतिधैर्यावरही विघातक परिणाम झाला होता. त्यांनी योजिलेली महान प्रतिक्रिया काही काळ तरी लांबणीवर टाकावी लागणार अशी लक्षणे दिसत होती.

या संदर्भात मिसेस् रॅलिने केलेली नोंद सूचक आहे. ती लिहिते—‘रशियाबाहेर त्याने (रॅलीने) केलेल्या कार्यामुळे सोविएतांबद्दल परकीय राष्ट्रांच्या मनात प्रखर शत्रुत्व निर्माण होत होते हे खरे. परंतु प्रत्यक्ष प्रतिक्रांतीला सुरुवात व्हावयाची ती रशियातच झाली पाहिजे हे सिडनेने बरोबर ओळखले होते. मास्को येथील काही संघटनांनी व लंडनहून द्रेब्कोवने त्या संदर्भात सिडनेशी बोलणे लावलेही होते. पण तो सावधपणे पावले टाकीत होता…’

त्या वसंतात एस्तोवियातील रावेल येथून आलेल्या एका पत्राने मात्र रॅली चांगलाच उत्तेजित झाला. त्याचा जुना मित्र कमांडर ई याने सांकेतिक भाषेत ते पत्र लिहिले होते. महायुद्धकाळात ब्रिटिश गुप्तहेर खात्यात त्याने रॅलीबरोबर काम केले होते; व आता तो एका बाल्टिक राज्यात ब्रिटिश कौन्सुलर सेवेत नोकरीला होता. २१ जानेवारी १९२५ रोजी कमांडर ई ने लिहिले होते—

प्रिय सिडने,

‘क्राश्नोस्तोनोव पतिपत्नी माझ्यातर्फे तुला पॅरिस येथे भेटतील. कॅलिफोर्नियाहून तुझ्याकरिता निरोप आहे असे सांगून उमरखय्यामची रुबाई असलेली एक चिठ्ठी ते तुला देतील. तुला त्याची आठवण

असेलच. या प्रकरणात पुढे पाऊल टाकण्याची तुझी तयारी असेल तर तू त्यांना मुक्कामाला ठेऊन घे. तसे नसेल तर तू त्यांना फक्त 'धन्यवाद, शुभ दिन' एवढेच म्हण.'

त्या सांकेतिक पत्रातील क्राश्नोस्तोनोव म्हणजे सोविएत-विरोधी हस्तक शुल्ट्झ व त्याची पत्नी हे होते; कॅलिफोर्निया म्हणजे सोविएत संघ, व उमरखय्यामची रुबाई म्हणजे एक निरोप असा अर्थ होता.

कमांडर ई ने पुढे लिहिले होते—'त्यांच्या धंद्याबद्दल सांगायचे तर, ते ज्या उद्योगाचे प्रतिनिधी आहेत त्याचा युरोप व अमेरिका येथील बाजारपेठांवर भविष्यात चांगलाच परिणाम होणार आहे. दोन वर्षे तरी त्यांचा उद्योग चांगला भरभराटेल अशी त्यांची अपेक्षा नाही; परंतु त्यांना प्रोत्साहित करू शकेल अशी परिस्थिती बहुधा लवकरच निर्माण होईल. तो उद्योग फार मोठा आहे. त्याबद्दल अधिक वाच्यता आताच योग्य नाही... मात्र त्या धंद्यात सहभागी होण्यास एक जर्मन गट अत्यंत उत्सुक आहे,. शिवाय फ्रेंच व इंग्लिश गटांचाही लवकरच सक्रिय सहभाग मिळेल अशी खात्री आहे...

रशियात तो धंदा कसा चालला आहे याबद्दल कमांडर ईने कळविले, 'या सर्व उद्योगाच्या पाठीशी असलेल्या प्रमुख व्यक्तीचे नाव सध्याच कळविण्यास ते तयार नाहीत. परंतु एक गोष्ट मात्र निश्चित की त्यापैकी काही जण सोविएत सरकार-विरोधी गटाचे सदस्य आहेत. एकंदर प्रकरणाबाबत आत्यंतिक गुप्तता राखण्याची गरज तुझ्या लक्षात येईलच. आतापर्यंत तू कार्यान्वित केलेली योजना मोठी हानिकारक ठरून ढासळली असल्याने, ही योजना तू राबवू शकशील असे वाटले म्हणून मुद्दाम कळवीत आहे.'

या पत्राच्या आधारे रॅलीच्या हालचाली सुरू झाल्या. तो व त्याची पत्नी यांनी ६ ऑगस्ट १९२५ रोजी न्यूयॉर्क सोडले. सप्टेंबरमध्ये ती दोघे पॅरीस यथे येऊन पोहोचली. लागलीच कमांडर ई ने कळविल्याप्रमाणे त्याने शुल्ट्-झशी संपर्क साधला. त्यांच्या भेटीत त्यांनी रशियातील एकंदर परिस्थितीचा बारकाईने आढावा घेतला. लेनिनच्या निधनानंतर तेथे लिऑं ट्राट्स्कीच्या नेतृत्वाखाली विरोधकांची एक व्यापक स्वरूपाची चळवळ, स्टालिन राजवट उलथून पाडण्याच्या उद्दिष्टाने गुप्तपणे संघटित करण्यात येत होती. या घटनेचे महत्त्व रॅलीच्या साहजिकच तात्काळ लक्षात आले. रशियातील स्टालिन विरोधकांच्या नेत्यांशी व्यक्तिगत संपर्क साधण्यास तो उत्सुक झाला. गुप्त हस्तकांद्वारा दोन्ही पक्षात निरोपानिरोपी होऊन, रशियात चालू असलेल्या चळवळीच्या प्रतिनिधीला रॅलीने फिनलंड-सोविएत सीमेवर भेटावे अशी व्यवस्था करण्यात आली. बोल्शेविक विरोधी संघटनेचा सदस्य असलेला, व रॅलीचा मित्र असलेला फिनिश लष्कराचा सर्वोच्च अधिकारी त्याकरिता रॅलीला सोविएत सीमेपलिकडे नेण्याची व्यवस्था करणार होता. त्या हेतूने रॅली हेलसिंकी येथे गेला. यावेळी त्याची पत्नी पॅरिस येथेच राहिली होती. 'रशियामध्ये खरोखरच अत्यंत महत्त्वाच्या घटना घडत आहेत. त्यामुळे यावेळी माझे तेथे जाणे बहुधा सार्थकी लागणार,' असा आशावाद रॅलीने तिला लिहिलेल्या पत्रात व्यक्त केला.

त्यानंतर एका आठवड्याने, २५ सप्टेंबर १९२५ रोजी, रॅलीने विबोर्ग येथून घाईघाईने आपल्या पत्नीला एक चिठ्-ठी पाठविली—

अनुक्रमणिका

‘पेट्रोग्राड व मास्को येथे तीन दिवसाकरिता माझे जाणे अत्यावश्यक झाले आहे. आज रात्री मी तेथे जाण्यास निघत आहे, व मंगळवारी सकाळी परत येईन. याबाबत मला एक गोष्ट आवर्जून तुला सांगाविशी वाटते ती अशी की माझे तेथे जाणे अगदी अत्यावश्यकच आहे व त्यात मुळीच धोका नाही अशी खात्री असल्यामुळेच मी जात आहे. माझ्या बाबतीत काही विपरीत घडेल अशी शक्यता जवळजवळ नाहीच. पण तसे काही बरेबाईट झाले तर तू कोणतीही हालचाल करू नयेस. एक तर त्याचा काही उपयोग होणार नाही आणि दुसरे म्हणजे बोल्शेविक्स माझ्या बाबतीत त्यामुळे उगीचच सावध मात्र होतील. रशियात मला अटक झालीच तर ती अगदी किरकोळ कारणाकरिता होईल व त्यातून मला सोडविण्याकरिता माझे नवे मित्र चांगले समर्थ आहेत.’

ब्रिटिश गुप्तहेर खात्याच्या सेवेतील कॅप्टन सिडने रॅली याने लिहिलेले ते अखेरचे पत्र होते.

या पत्रानंतर अनेक आठवडे उलटले तरी मिसेस् रॅलीला तिच्या पतीबद्दल काही बातमी कळली नाही. तेव्हा तिने पॅरिस येथील रॅलीची सहकारी मारी शुल्ट्झ् हिच्याशी संपर्क साधला. त्या दोघींच्या भेटीचा वृत्तांत व मारी शुल्टझ् कडून कळलेली हकीकत यांची नोंद मिसेस रॅलीने आपल्या स्मृतीग्रंथात केली आहे. मारी शुल्टझ्ने मिसेस रॅलीला सांगितले—

‘तुमचे यजमान जेव्हा इथे आले तेव्हा आमच्या संघटनेसंबंधीची सर्व परिस्थिती मी त्यांना समजावून सांगितली होती. मास्को येथील काही प्रमुख बोल्शेविक अधिकारी आमच्या बाजूचे आहेत व जर त्यांच्या सुरक्षिततेची हमी दिली गेली तर सध्याची तेथील राजवट उलथून पाडण्याकरिता आपल्याशी सर्वतोपरी सहकार्य करण्यास ते उत्सुक आहेत असे मी त्यांना सांगितले. एकंदर कार्यवाहीबाबत कॅप्टन रॅली प्रारंभी काहीसे साशंकच होते. सोविएत रशियातील कटकारस्थाने करणारा सरकार-विरोधकांचा गट खरोखर शक्तिशाली असला तरच तेथील सरकार उलथून पाडण्याच्या कार्यात त्यांना परकीय मदत देता येईल असे रॅली म्हणाले. तेव्हा रशियातील आपली संघटना चांगली प्रबळ व सुसंघटित असल्याचे मी त्यांना खात्रीपूर्वक सांगितले…’

फिनलंडमधील विबोर्न या गावी रशियातील कटवाल्यांच्या यंत्रणेचे प्रतिनिधी व रॅली यांची भेट कशी घडवून आणली गेली तेही मारी शुल्ट्झ्ने सांगितले. ‘त्या प्रतिनिधींच्या बोलण्यामुळे, विशेषकरून बोल्शेविक राजवटीत मोठ्या उच्च पदावर असलेल्या परंतु आतून आतून सध्याच्या तेथील राजवटीचा कट्टर शत्रू बनलेल्या कटवाल्यांच्या नेत्यांमुळे रॅली चांगलाच प्रभावित झाला,’

त्यानंतर दुसरेच दिवशी त्यांच्या दिमतीला देण्यात आलेल्या फिनिश गस्ती सैनिकांबरोबर रॅली व रशियन कटवाले रशियन सीमेच्या दिशेने निघाले. त्यांना माझ्या शुभेच्छा देण्यास मी सीमेपर्यंत त्यांच्याबरोबर गेले होते. रात्र होईपर्यंत सीमेवरील नदीकाठी एका फिनिश घरात ते राहिले. नदी किनाऱ्याच्या त्या भागात कोणी लाल गस्ती सैनिक तर नाही ना याची खात्री करून घेत आम्ही तेथे बराच

वेळ थांबलो. पण सर्वत्र शांत दिसत होते. शेवटी फिनिश सैनिकांपैकी एकजण मोठ्या सावधगिरीने हळूच पाण्यात उतरला. त्याच्या पाठोपाठ तुमचे यजमानही निघाले...'

मिसेस शुल्टझने रॅलीला पाण्यात उतरताना पाहिले ते अखेरचेच. रॅलीच्या साहसाची ती कथा सांगून संपताच तिने रशियन वृत्तपत्र 'इझवेत्सिया' चे एक कात्रण मिसेस रॅलीच्या हाती दिले. त्यात मजकूर होता—

"सप्टेंबर २८—२९ च्या रात्री बेकायदेशीर कारवाया करणाऱ्या चार लोकांनी फिनिश सीमा ओलांडण्याचा प्रयत्न केला. त्यापैकी दोघे त्यावेळी कराव्या लागलेल्या गोळीबारात ठार झाले; एक फिनिश सैनिक पकडला गेला, व गोळीबारात झालेल्या जखमांमुळे चौथा इसम नंतर मरण पावला."

या घटनेचा तपशील थोडेच दिवसात प्रसिद्ध झाला. सीमा ओलांडण्यात रॅलीला यश मिळाले होते. रशियातील स्टॅलिन-विरोधी गटाच्या सदस्यांशी त्याची बोलणीही झाली. तेथून तो परत निघाला. परंतु फिनलंडच्या सीमेवर तो व त्याचे अंगरक्षक यांवर तेथील सोविएत सीमारक्षकांनी अकस्मात हल्ला केला. रॅली व त्याच्या सहकाऱ्यांनी निसटून जाण्याचा प्रयत्न केली, तेव्हा सीमारक्षकांनी गोळ्या झाडल्या. त्यात कपाळाला गोळी लागून रॅली मारला गेला.

यानंतर बरेच दिवसपर्यंत मारल्या गेलेल्या व्यक्तिची ओळख सोविएत अधिकाऱ्यांना पटली नव्हती. त्याबद्दलची पक्की शहानिशा झाल्यानंतर मात्र लागलीच ब्रिटिश गुप्तहेर सेवेच्या कॅप्टन सिडने रॅलीच्या मृत्यूची अधिकृत घोषणा त्यांनी केली.

'२८ सप्टेंबर रोजी, 'रशियातील अलेकुल या खेड्यानजीक कॅप्टन सिडने रॅली ओ.जी.पी.यू. सैनिकांकडून मारला गेला असा' दोनच ओळींचा मजकूर गृह्यसंस्कार या सदराखाली लंडन टाईम्समध्ये प्रसिद्ध झाला होता.

अनुक्रमणिका

प्रकरण ११

# युद्धाचे आवाहन

१९२४–२५ च्या काळात जागतिक राजकारणात वरवर शांतता दिसत असली तरी त्याखाली मात्र असंतोषाचे भयानक वादळ दाटून आले होते. साम्राज्यवाद्यांच्या टाचेखाली भरडल्या गेलेल्या निरनिराळ्या वसाहतीत रशियन क्रांतीमुळे नवी आशा पल्लवित झाली होती. त्यांच्यात उफाळून येत असलेल्या राष्ट्रवादामुळे वसाहतवादी साम्राज्यवादाचा डोलारा डळमळीत होत होता.

१९२६ च्या वसंतात वादळाला प्रारंभ झाला. चीनमध्ये कोमिंटांग व साम्यवादी यांच्या संयुक्त आघाडीने पाश्चात्य साम्राज्यवाद्यांच्या हातातील बाहुले बनलेली चीनची भ्रष्ट हुकुमशाही राजवट उलथून पाडली व स्वतंत्र चीनची प्रस्थापना केली.

त्याबरोबर संपूर्ण आशियात व पाश्चात्य जगात सोविएत-विरोधी प्रचाराला आगळीच धार आली. वस्तुतः चीनमधील क्रांती म्हणजे अंतर्गत व परकीय जुलुमाखाली भरडल्या गेलेल्या कोट्यावधी सामान्य जनतेने केलेला एक उत्स्फूर्त उठाव होता. तरीही, ती क्रांती म्हणजे, मास्कोने केलेल्या कटाचीच एक फलश्रुती होती असा आरडाओरडा उच्चरवाने सुरू झाला.

आशियात बोल्शेविझमविरुद्धचा बालेकिल्ला बनून लढा देण्याची तयारी मोठ्या तत्परतेने जपानच्या सम्राटाने दर्शविली. पाश्चात्य सत्तांच्या प्रोत्साहनाने चीनमधील क्रांती दडपून टाकण्याकरिता त्या राष्ट्रात हस्तक्षेप करण्याची सिद्धता जपान करू लागले. जपानचा प्रधानमंत्री जनरल तनाका याने जपानी सम्राटाला, जपानच्या साम्राज्यवादी उद्दिष्टांची रूपरेषा स्पष्ट करणारे त्याचे सुप्रसिद्ध निवेदन सादर केले–

संपूर्ण जगावर विजय मिळवायचा असेल तर प्रथम आपण चीन जिंकून घेणे आवश्यक आहे. तसे झाले की संपूर्ण आशियातील राष्ट्रांवर आपली चांगली जरब बसेल व ती राष्ट्रे आपल्याला शरण येतील...व संपूर्ण पूर्व आशिया आपला आहे हे जगाला कळून चुकेल. एकदा चीनची संपत्ती-साधनसामुग्री आपल्या हाती आली की भारत, इंडोनेशियन द्वीपसमूह, आशिया मायनर, मध्य आशिया, एवढेच नव्हे तर युरोपही आपण जिंकून घेऊ शकू. पण मांचूरिया व मंगोलिया यांवर नियंत्रण मिळविणे हे अर्थातच् आपले पहिले पाऊल असले पाहिजे. कारण आज ना उद्या आपल्याला सोविएत रशियाविरुद्ध लढावेच लागणार आहे... तसेच चीन पक्केपणाने आपल्या ताब्यात घ्यावयाचे असेल तर प्रथम आपण अमेरिकेला चिरडले पाहिजे.'

[नंतरच्या काळात जपानचे 'माईन कांफ' म्हणून प्रसिद्ध झालेले हे 'तनाका मेमोरँडम' हे १९२७ मध्ये लिहिले गेले व मांचुरियाचा तरुण मार्शल चांग सुह-लिआँग याने एका जपानी हस्तकाकडून विकत मिळविल्यानंतर ते १९२९ मध्ये प्रसिद्ध झाले. 'चायना कौन्सिल ऑफ द इन्स्टिट्यूट ऑफ पॅसिफिक रिलेशन्स' यांनी ते निवेदन अमेरिकेत प्रकाशित करून जगापुढे ठेवले.]

मार्च १९२७ मध्ये जपानी हस्तक असलेल्या चीनमधील कुप्रसिद्ध सरदार चेंग सो-लीन याने पेकिंग येथील सोविएत दूतावासावर हल्ला केला; व बोल्शेविक नेते चीन विरुद्ध करीत असलेल्या कटाचा पुरावा त्याच्या हाती लागल्याचे त्याने घोषित केले. चीनमध्ये प्रतिक्रांतीला सुरुवात करण्याची ही पूर्वतयारी होती. जपानचे प्रोत्साहन, व इंग्लंड व फ्रान्स यांची राजनैतिक मान्यता, शस्त्रास्त्रे व पैसा पुरविण्याचे दिलेले आश्वासन या बळावर चँग काय-शेकच्या नेतृत्वाखाली कोमिंटांगच्या लष्कराने एकाएकी साम्यवाद्यांशी त्यांची असलेली संयुक्त आघाडी मोडली व त्यांच्या तोपर्यंतच्या त्या क्रांतिकारी दोस्तांवर हल्ला चढविला. कत्तलीचे सत्र सुरू झाले. उदारमतवादी असल्याच्या आरोपावरून किंवा साम्यवाद्यांबद्दल सहानुभूती असल्याच्या नुसत्या संशयावरून हजारो चिनी कामगार, शेतकरी, विद्यार्थी यांची शांघाय, पेकिंग व इतर शहरात धरपकड होऊन अनेकांना गोळ्या घालण्यात आल्या. अनेकांना हालहाल करून मारण्यात आले. हजारो छलशिबिरांत डांबले गेले. संपूर्ण चीनभर यादवी युद्धाचा डोंब उसळला.

संपूर्ण आशियात स्वातंत्र्य चळवळीची तोपर्यंत सुप्तावस्थेत असलेली शक्ती चीनमधील क्रांतीने खडबडून जागृत केली. इंडोचीन, ब्रम्हदेश, भारत या राष्ट्रांत चांगलीच खळबळ माजली. यामुळे भयग्रस्त होऊन साम्राज्यवादी राष्ट्रे बोल्शेविझमपासून रक्षण व्हावे याकरिता आशाळभूतपणे जपानकडे पाहू लागली. त्याचवेळी बोल्शेविझम विरोधाला परिस्थिती अनुकूल आहे असे वाटून युरोपीय राष्ट्रातील लष्करवाद्यांनीही तोपर्यंत थंड्या बस्त्यात पडलेल्या बोल्शेविक-विरोधाच्या व मास्कोवरील हल्ल्याच्या जुन्या योजना पुन्हा बाहेर काढल्या.

१९२५–१९२६ मध्ये लोकार्नो येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत इंग्लिश व फ्रेंच मुस्तद्दी सोविएत संघाविरुद्ध संयुक्त कार्यवाही करण्याकरिता जर्मनीशी हातमिळवणी व्हावी म्हणून जिवाचा आटपिटा करीत होते.

२३ ऑक्टोबर १९२४ रोजी मँचेस्टर येथे केलेल्या भाषणात ब्रिटिश टोरी प्रवक्ता डब्लू. सी. ए. ऑर्म्सबी गोर याने लोकार्नो परिषदेमागील मुख्य मुद्दा अगदी अचूकपणे स्पष्ट शब्दात मांडला–

'आपल्या जीवनकाळात ज्या दुष्ट व अनर्थकारी शक्ती उदयाला आल्या आहेत त्यांना आवर घालण्याकरिता संपूर्ण ख्रिश्चन संस्कृतीचे ऐक्य अत्यावश्यक आहे. लोकार्नो येथे सुरू असलेल्या परिषदेमागील मुख्य मुद्दा मला तरी एकच दिसतो–तो म्हणजे आपले भवितव्य बड्या पाश्चिमात्य राष्ट्रांशी निगडीत आहे असे जर्मनी मानणार आहे, की पाश्चात्य संस्कृतीच्या विनाशाकरिता ते राष्ट्र रशियाशी सहकार्य करणार आहे?

'लोकार्नो परिषदेला आज अनन्यसाधारण महत्त्व आहे ते ह्या दृष्टीने की जर्मनीचे सध्याचे सरकार हे रशियापासून दुरावून आपले नाते पश्चिमी राष्ट्रांशी जोडीत आहे.'

फ्रान्समध्ये प्रधानमंत्री रेमंड पॉईनकेर, सोविएत रशियावर जर्मनीसह सर्व युरोपीय राष्ट्रांनी लष्करी आक्रमण करावे असे जाहीरपणे, आग्रहाने प्रतिपादित होता; बर्लिनमध्ये जर्मन साम्राज्यवादी व लोकशाहीविरोधी, वृत्तपत्रे बोल्शेविझमचा निःपात होण्याचा क्षण नजीक आला असल्याचे घोषित करीत होती; तर नाझी पक्षाशी जवळीक असलेले लष्करी नेते व उद्योगपती यांच्याशी बराच विचारविनिमय केल्यानंतर, जनरल मॅक्स हॉफमन, त्याची सोविएत संघाविरुद्धच्या युद्धाची योजना ब्रिटिश परराष्ट्र खाते, पार्लमेंटचे निवडक टोरी सदस्य व ब्रिटिश लष्करी अधिकारी यांच्यापुढे ठेवण्याकरिता घाईघाईने लंडनला गेला.

५ जानेवारी १९२६ रोजी सकाळी लंडनच्या 'मॉर्निंग पोस्ट' ने सर हेन्री डेटरडिंग याचे एक पत्र प्रसिद्ध केले. सोविएत रशियाविरुद्ध पुन्हा नव्याने लष्करी हस्तक्षेप करण्याच्या योजना आखल्या जात असल्याचे त्याने त्या पत्रात घोषित केले होते.

'...काही महिन्यातच रशिया पाश्चिमात्य संस्कृतीच्या क्षेत्रात परत येईल. परंतु त्यावेळी झार सरकारपेक्षा अधिक चांगले व सक्षम सरकार रशियात प्रस्थापित झालेले असेल. हे वर्ष संपण्यापूर्वीच रशियातील बोल्शेविझम संपुष्टात येणार हे नक्की. तसे होताच सर्व जगाकडून रशियाला कर्जे मिळू लागतील; व धंद्यांच्या भरभराटीकरिता कष्ट करण्यास उत्सुक असलेल्या सर्वांकरिता त्या राष्ट्राची द्वारे खुली होतील.'

'रॉयल डच' च्या अध्यक्षाने सोविएत राजवटीच्या अखेरीची निश्चित अशी वेळ जाहीर केली आहे त्या अर्थी तत्संबंधी त्याच्याजवळ नक्कीच काहीतरी सबळ कारण असले पाहिजे,' असे भाष्य उजव्या गटाचा सुप्रसिद्ध फ्रेंच पत्रकार जॉक्विस बेनव्हिल याने त्यावेळी डेटरडिंगच्या त्या वक्तव्यावर केले होते; तर, ३ मार्च १९२७ रोजी ब्रिटिनच्या हाऊस ऑफ लॉर्डस् मध्ये ग्रे याने वक्तव्य केले की 'सोविएत सरकार हे खऱ्या अर्थाने राष्ट्रीय सरकार नाही. जसे फ्रेंच सरकार फ्रेंच आहे किंवा जर्मन सरकार जर्मन आहे, तसे सोविएत सरकार रशियन नाही.'

२७ मे १९२७ रोजी ब्रिटिश पोलिस व गुप्तचर सेवेच्या हस्तकांनी लंडन येथील सोविएत व्यापारी संघटनेच्या (अर्कोस) कार्यालयांवर छापे घातले. तेथील कर्मचाऱ्यांना अटक केली. सर्व कार्यालयांची झडती घेऊन आजूबाजूच्या परिसरातही शोधाशोध केली. तिजोऱ्या फोडून फाईली तपासल्या. एवढेच नव्हे तर गुप्त कागदपत्रांच्या शोधार्थ भिंतींना, छताला, जमीनीला मोठमोठी छिद्रे पाडली. त्यात आक्षेपर्ह अशी कागदपत्रे किंवा अन्य कोणताही पुरावा त्यांना सापडला नाही. तरीही 'मॉर्निंग पोस्ट,' 'डेलिमेल' यांसारख्या कट्टर सोविएत–विरोधी वृत्तपत्रांनी 'अर्कोस' वरील छाप्यात ब्रिटनविरुद्धच्या सोविएत–कटाचा पुरावा हाती लागल्याच्या बेफाम बातम्या छापल्या.

त्यापाठोपाठ ब्रिटनच्या टोरी सरकारने सोविएत संघाशी राजनैतिक व व्यापारी संबंध तोडून टाकले.

त्याच ग्रीष्मात बर्लिन व पॅरिस येथील सोविएत कौन्सुलेट व अन्य कार्यालये यांवरही छापे घालण्यात आले. जून मध्ये पोलंड येथील सोविएत राजदूत व्ही. आय. व्होईकोव याची वॉर्सा येथे हत्या झाली. लेनिनग्राड येथे भरलेल्या बोल्शेविक पक्षाच्या सभेवर बॉंब फेकण्यात आले. [याचवेळी रशियाच्या अंतर्गत क्षेत्रात ट्रॉट्स्की व त्याचे सहकारी सोविएत सरकार उलथून पाडण्याचा तयारीत होते. ७ नोव्हेंबर १९२७ रोजी ट्रॉट्स्कीने उठावाचा प्रयत्न केला. त्यात त्याचे बरेच अनुयायी पकडले गेले; व खुद्द ट्रॉट्स्कीला हद्दपार करण्यात आले.]

हा सर्व हिंसाचार कोणत्या दिशेने चालला आहे हे मार्शल फॉकने लंडन येथील'संडे रेफ्री' या वृत्तपत्राला दिलेला मुलाखतीत सूचित केले. 'फेब्रुवारी १९१९ मध्येच, म्हणजे लेनिनवादाच्या प्रारंभीच्या काळात, पॅरिसमध्ये भरलेल्या राजदूतांच्या एका परिषदेत मी असे स्पष्टपणे सांगितले होते की रशियाभोवतीच्या राज्यांना दारूगोळा व अन्य साहित्य पुरविले तर बोल्शेविक धोक्याला कायमची मूठमाती देण्याची जबाबदारी पत्करायला मी तयार आहे. परंतु युद्धामुळे श्रांत झाले असल्याचे कारण पुढे करून दोस्त राष्ट्रांनी माझी सूचना त्यावेळी फेटाळून लावली. अर्थात त्यानंतरच्या घटनांनी माझे म्हणणे सयुक्तिक होते हे स्पष्ट झाले आहे.'

जर्मनीतील नाझी पक्षाचा एक कट्टर समर्थक अर्नोल्ड रेशबर्ग याला लिहिलेल्या पत्रात मार्शल फॉकने म्हटले—

'युरोप खंडाच्या अर्ध्याअधिक भूभागावर व आशियाच्या विस्तीर्ण प्रदेशावर काही मूठभर जुलुमी गुन्हेगारांना राज्य करण्यास मोकळे सोडावे असे मानण्याइतका मूर्ख मी नाही. परंतु फ्रान्स व जर्मनी जोपर्यंत एकत्र येत नाहीत तोपर्यंत काहीच करता येत नाही. बोल्शेविक—विरोधी लष्करी युतीचा खंबीर प्रवर्तक जनरल हॉफमन याला, तो त्या दृष्टीने करीत असलेल्या प्रयत्नाकरिता माझे अभिवादन पोचवावे.'

एकंदरीत युद्धाचा रंगमंच तयार करण्याचे अटीतटीचे प्रयत्न चालू होते.

## प्रकरण १२

# कोट्याधीश व घातपात

### पॅरिसमधील एक बैठक

१९१८ तील शिशिराच्या एका सायंकाळी काही धनाढ्य रशियन निर्वासित पॅरिसमध्ये अत्यंत गुप्तपणे, ग्रँड बोलेवार्ड मार्गावरील एका उपहारगृहाच्या खाजगी भोजनकक्षात एकत्र जमले. त्या बैठकीची गंधवार्ताही कोणाला लागू नये याची सर्वतोपरी खबरदारी घेण्यात आली होती. झारकालीन कोट्याधीशांच्या 'तोर्गप्रोम' या संघटनेच्या नेत्यांनी ती बैठक बोलाविली होती. जी. एन. नोबेल, एन.सी. डेनिसोव, व्लादिमिर रियाबुशिन्स्की हे व यांसारखी जुन्या रशियातील ख्यातनाम मंडळी बैठकीला हजर होती.

हे सर्व निर्वासित लक्षाधीश सोविएत रशियातून पॅरिसला आलेल्या दोन रशियन पाहुण्यांची गुप्तपणे खलबत करण्याकरिता एकत्र जमले होते. त्या दोन रशियन पाहुण्यांशी गुप्तपणे खलबत करण्याकरिता एकत्र जमले होते. त्या दोन पाहुण्यांपैकी एक होता प्रोफेसर लिओनिद रामझिन–रशियाचा सुप्रसिद्ध वैज्ञानिक, मास्को येथील थर्मोटेक्निकल इन्स्टिट्यूटचा संचालक व सोविएत सर्वोच्च आर्थिक समितीचा सदस्य. दुसरा होता वित्तर लारित्शेव–सोविएत संघाच्या राज्य नियोजन मंडळाच्या इंधन विभागाचा अध्यक्ष.

प्रोफेसर रामझिन व वित्तर लारित्शेव हे अधिकृतपणे पॅरिस येथे आले होते ते काही सरकारी कामकाजाकरिता. परंतु ते दोघे सोविएत संघात हेरगिरी व घातपाती कृत्ये करणाऱ्या संघटनेचे प्रमुख होते व तोर्गप्रोमच्या नेत्यांना त्या संघटनेच्या रशियातील कारवायासंबंधी अहवाल सादर करणे हा पॅरिसला येण्यामागील त्यांचा प्रमुख हेतू होता.

रामझिन व लारित्शेव यांच्या संघटनेचे नाव होते 'औद्योगिक पक्ष.' झारशाहीत ज्यांना अनेक विशेषाधिकार मिळाले होते असे त्याकाळच्या रशियातील तंत्रज्ञ व बुद्धिजीवी त्या संघटनेचे सदस्य होते. रशियातील त्यांच्या त्या संघटनेची सदस्यसंख्या सुमारे दोन हजार असल्याचा त्यांचा दावा होता. त्यापैकी बहुतेक लोक सोविएत रशियात महत्त्वाच्या तांत्रिक पदावर नोकरीला होते तोर्गप्रोमने पुरविलेला पैसा व मार्गदर्शन याच्या बळावर सोविएत रशियाच्या औद्योगिक क्षेत्रात हेरगिरी व अनेक घातपाती कृत्ये ते करीत होते.

पॅरिस येथील उपहारगृहातील त्या बैठकीत प्रथम बोलायला उठला तो प्रोफेसर रामझिन. पृथ्वीच्या भूपृष्ठाचा एक षष्ठांश भूभाग व्यापणाऱ्या सोविएत रशियाचे औद्योगीकरण घडवून आणण्याकरिता स्टालिनने नुकतीच जी विशाल, महत्वाकांक्षी पंचवार्षिक योजना सर्व शक्तिनिशी कार्यान्वित केली होती त्यात अडथळे निर्माण व्हावेत या हेतूने शक्य ती सर्व कार्यवाही करण्यात येत आहे, सोविएत उद्योगांच्या सर्वच विभागात घातपाताचे अत्याधुनिक वैज्ञानिक तंत्र पध्दतशीरपणे व काळजीपूर्वक वापरले जात आहे असे आश्वासन त्याने उपस्थितांना दिले. 'आमच्या कार्याची एक बाजू म्हणजे', रामझिन श्रोत्यांना माहिती देत होता,' 'शक्य तो देशाचा आर्थिक कुंठित करणे, औद्योगीकरणाची गती अवरुद्ध करणे; दुसरे म्हणजे राष्ट्रीय अर्थकारणाच्या निरनिराळ्या विभागात, तसेच एकाच औद्योगिक विभागाच्या निरनिराळ्या शाखांत विसंवाद निर्माण करणे. तिसरी बाजू आहे ती भांडवल गोठनाची; म्हणजेच अगदीच अनुत्पादक योजनांत किंवा पूर्णपणे अनावश्यक असलेल्या प्रकल्पांत भांडवल अडकविणे.'

भांडवल गोठविण्याच्या कारवाईला मिळालेल्या यशाबद्दल रामझिन याने विशेष समाधान व्यक्त केले. 'ते केल्यामुळे औद्योगीकरणाची गती मंदावली आहे, देशाच्या आर्थिक जीवनाची सर्वसाधारण पातळी घसरली आहे व त्यामुळे जनसामान्यांत असंतोष पसरत आहे याबद्दल शंकाच नाही;' अशी माहिती त्याने बैठकीला उपस्थित असलेल्या व्यक्तींना दिली.

याउलट, रशियात त्यांना काहीशा प्रतिकूल ठरणाऱ्या गोष्टींचाही प्रोफेसर रामझिनने उल्लेख केला. शाख्ती खाणीत काम करणाऱ्या त्यांच्या औद्योगिक पक्षाच्या सदस्यांना नुकतीच ओ. जी. पी. यू कडून अटक झाली होती. दळणवळण व खनिज तेल उद्योगात घातपात करणाऱ्यांनाही पकडण्यात आले होते. मुख्य म्हणजे लिआँ ट्रॉट्स्की हद्दपार झाल्यापासून त्याने संघटित केलेली विरोधकांची चळवळ कोलमडली होती. पक्षांतर्गत मतभेद व संघर्ष थंडावले होते. त्यामुळे घातपाती कारवाया जोमाने चालू ठेवणे औद्योगिक पक्षाला अधिकाधिक कठिण होत होते.

'आम्हाला तुमच्याकडून अधिक भरीव पाठिंबा मिळाला पाहिजे हे तर खरेच; पण बोल्शेविकांना उलथून पाडायचे असेल तर अर्थातच खरी गरच आहे ती लष्करी हस्तक्षेपाची.' प्रो. रामझिनने शेवटी सांगितले.

यानंतर तोर्गप्रोमचा अध्यक्ष एन. सी. डेनिसोव बोलायला उठला. त्याबरोबर त्या लहानशा गटात आदरयुक्त स्तब्धता पसरली.

'तुम्हाला माहीतच आहे', डेनिसोवने सुरुवात केली, 'की पॉईनकेर व ब्रियाँ यांच्याशी आमच्या वाटाघाटी सुरू आहेत. सोविएत संघाविरुद्ध लष्करी कार्यवाही करण्याच्या योजनेला त्यांची मान्यता असल्याचे, एवढेच नव्हे तर, लष्करी कार्यवाहीबाबतच्या योजनेला निश्चित रूप देण्याची जबाबदारी लष्करी नेत्यांकडे सोपविण्यात आली असल्याचे पॉईनकेरने नुकत्याच झालेल्या एका भेटीत आम्हाला सांगितले आहे. याशिवाय एक खास महत्त्वाची बातमी तुम्हाला देण्यात आज मला विशेष आनंद होत आहे,' श्रोत्यांची

अनुक्रमणिका

उत्कंठा वृद्धिंगत व्हावी म्हणून क्षणभर, नाट्यपूर्ण रीत्या स्तब्ध राहून सोविएत संघावरील हल्ल्याची तयारी करण्याकरिता फ्रेंच लष्करी अधिकाऱ्यांनी कर्नल जॉईनव्हिल [१९१८ मध्ये सैबेरियातील फ्रेंच लष्करी हस्तक्षेपाचे नेतृत्व याच जॉईनव्हिलने केले होते. पॅरिसमध्ये 'तोर्गप्रोम' ची सभा झाली त्यावेळी फ्रेंच लष्करी अधिकाऱ्यांत प्रमुख होते ते, १९१९ पासून सोविएत रशियात लष्करी हस्तक्षेप करण्याचा पुरस्कार करणारा मार्शल फॉक, लोकशाहीबद्दल भीती व तुच्छता, व सोविएतांबद्दल द्वेष यांनी जळफळणारा मार्शल पेताँ, व १९२० मध्ये लाल लष्कराविरुद्ध पोलीश सैन्याचे नेतृत्व करणारा व त्यानंतरच्या काळात सोविएतविरोधी व लोकशाहीविरोधी कटकारस्थानात उत्साहाने सहभागी होणारा जनरल वेगाँ. १९२९ मध्ये फॉक कालवश झाला. त्यानंतर त्याचा खाजगी मदतनीस रेने ला होपिटल हा, नाझींना अनुकूल ठरणारा व सोविएतांचा निषेध करणारा प्रचार करण्याकरिता नाझी हस्तक ऑटो आवेट्झ याने, १९३५ च्या अखेरी फ्रान्समध्ये प्रस्थापित केलेल्या समितीचा अध्यक्ष बनला.] याच्या नेतृत्वाखाली एक खास कमिशन नेमले असल्याची बातमी त्याने उपस्थितांना दिली.

ही बातमी कळताच त्या सर्व श्रोत्यांत अपेक्षा व आनंद यांचे इतके उधाण आले की, हर्षभराने सुरू झालेल्या त्यांच्या आपसातील बोलण्यामुळे डेनिसोवला पुढे भाषण चालू ठेवणे कठिण झाले.

### हल्ल्याची योजना

१९२९ च्या ग्रीष्माखेरी किंवा उशीरात उशीरा म्हणजे १९३० च्या ग्रीष्मात सोविएत संघावर लष्करी आक्रमण करण्याचे निश्चित करण्यात आले होते.

त्याकरिता पोलंड, रुमानिया व फिनलंड या राष्ट्रांनी प्रामुख्याने लष्करी सामर्थ्य पुरवावयाचे होते; लष्करी मार्गदर्शन व वायुदलाचा वापर ही जबाबदारी फ्रेंच लष्करी अधिकारी उचलणार होते; तंत्रज्ञ व स्वयंसेवक—तुकड्या जर्मनी पुरविणार होते तर नौदलाची मदत ब्रिटनकडून होणार होती. प्रत्यक्ष हल्ल्याची योजना ही हॉफमन योजनेच्या आधारावर तयार करण्यात आली होती.

रशिया-बेसअरेबिया सीमेवरील एखाद्या तंट्याचे निमित्त करून रुमानियाने प्रथम लष्करी कार्यवाहीला प्रारंभ करावा; पाठोपाठ त्यात पोलंड व रशियन सीमेवरील बाल्टिक राज्ये यांनी सामील व्हावे असे ठरले होते. रँगलच्या १ लक्षाच्या श्वेत लष्कराने रुमानियातून पुढे येऊन, दक्षिणेकडून आगेकूच करणाऱ्या हस्तक्षेपवादी लष्कराला येऊन मिळावे; त्यांच्या लष्करी कार्यवाहीला काळा समुद्र व फिनलंडचे आखात या भागात ब्रिटिश नौदलाने पाठिंबा द्यावा; व १९२१ पासून बाल्कन क्षेत्रात दडून असलेल्या क्रास्नोवच्या कोसॅक सैनिकांनी काळ्या समुद्रकिनाऱ्याच्या नोवोरोसिस्क प्रदेशात उतरून, डॉन नदीच्या दिशेने आगेकूच करावी व तेथे डॉन कोसॅकांना उठाव करण्यास प्रवृत्त करून युक्रेनवर तुडून पडावे, अशी सर्व योजना होती. डॉन-युक्रेन क्षेत्रावर हल्ला करण्यामागील मुख्य उद्देश होता तो म्हणजे दोनेत्स कोळसा क्षेत्र व मास्को यांचे दळणवळण तोडणे. तसे झाल्यास खनिज द्रव्ये व इंधन यांचा सोविएतांना होणारा पुरवठा फार मोठ्या प्रमाणात खंडित झाला असता. मास्को व लेनिनग्राड यांवर एकसमयावच्छेदे हल्ले व्हावयाचे होते, तर दक्षिणेच्या लष्कराने युक्रेनच्या पश्चिमेकडून मास्कोच्या दिशेने पुढे घुसावयाचे होते.

अनुक्रमणिका

हे सर्व हल्ले अकस्मात, युद्धघोषणा न करताच व्हावयाचे होते. त्या अकल्पित घणाघाती हल्ल्यांपुढे लाल लष्कर लवकरच कोसळेल व थोड्याच काळात सोविएत राजवटीची इतिश्री होईल अशी आक्रमकांची अपेक्षा होती.

बाहेरून अशा प्रकारे हल्ला होईल त्यावेळी सोविएत संघातील सोविएत-विरोधकांकडून कितपत सक्रिय लष्करी मदत मिळू शकेल असा प्रश्न तोर्गप्रोम नेत्यांच्या एका बैठकीत फ्रेंच सर्वोच्च लष्करी अधिकाऱ्यांच्या वतीने कर्नल जॉईनव्हिल याने प्रोफेसर रामझिन याला विचारला. तेव्हा, लिऑं ट्राट्स्कीच्या हद्दपारीनंतर सोविएत संघातील सरकारचे विरोधक विखुरले किंवा भूमीगत झालेले असले तरी त्यांची संख्या अजून बरीच आहे व एकूण योजनेत ते सक्रिय सहकार्य निश्चितच करू शकतील असे आश्वासन प्रोफेसर रामझिन याने दिले.

'औद्योगिक पक्ष' व त्यांचे सहकारी यांनी त्या दृष्टीने एक खास 'लष्करी शाखा' संघटित करावी असा सल्ला जॉईनव्हिल याने दिला. त्याकरिता त्यांना मदत करू शकतील अशा अनेक फ्रेंच गुप्तहेरांच्या नावांची यादी त्याने रामझिनला दिली.

सरकारी कामकाजासाठी जात असल्याचे दर्शवून रामझिन पॅरिसहून लंडनला गेला. रॉयल डच शेल व मेट्रो-विकर्स या दोन विशाल शस्त्रास्त्र निर्मिती प्रतिष्ठानांच्या प्रतिनिधींना तो तेथे भेटणार होता. झारकालीन रशियातील बडा उद्योगपती सर बेसिल झाहरोव याचा त्या प्रतिष्ठानांवर वरचष्मा होता. सोविएत रशियाविरुद्धच्या लष्करी हस्तक्षेपात फ्रान्स पुढाकार घेत असले तरी त्या योजनेत आपली जबाबदारी पार पाडायची तयारी आहे, ब्रिटन आर्थिक दृष्ट्या त्या कार्यवाहीला भरीव पाठिंबा देईल, सोविएतांना राजकीय क्षेत्रात एकाकी पाडण्याच्या हेतूने इतर राष्ट्रांवर राजनैतिक दडपण आणील व हल्ल्याच्या वेळी ब्रिटनचे नौदल पूर्ण सहकार्य करील, असे आश्वासन रामझिनला देण्यात आले होते.

मास्कोत परत गेल्यानंतर लंडन व पॅरिस येथील त्याच्या कामगिरीच्या फलश्रुतीचा अहवाल रामझिनने त्यांच्या कटातील सहकाऱ्यांना दिला. त्यावर बराच विचारविनिमय केल्यानंतर, रशियन जनतेत असंतोष माजवून सोविएत राजवटीचा पाया खिळखिळा करण्याच्या हेतूने औद्योगिक व कृषी क्षेत्रात आणिबाणीची संकटमय परिस्थिती निर्माण करणे आणि, घातपाती व दहशतवादी कृत्ये करण्यासाठी एक यंत्रणा उभी करून आक्रमकांना शक्य त्या सर्व मार्गांनी मदत करणे या दोन प्रकारच्या कार्यवाहीवर औद्योगिक पक्षाने आपले सर्व लक्ष केंद्रित करावे, असा निर्णय त्यांनी घेतला.

सोविएत उद्योग व कृषी क्षेत्रात तशी घातपाती कृत्ये करण्याकरिता फ्रेंच हस्तकांद्वारा तोर्गप्रोमकडून पैसा ओतला जाऊ लागला. धातुउद्योग क्षेत्राकरिता ५ लक्ष रुबल्स, इंधन व खनिज तेलाकरिता ३ लक्ष, कापड उद्योगाकरिता २ लक्ष, तर विद्युत्पादन क्षेत्राकरिता १ लक्ष रुबल्स तोर्गप्रोमने त्यावेळी पाठविले. फ्रेंच, जर्मन व ब्रिटिश हस्तकांच्या मागणीनुसार, औद्योगिक पक्ष व त्याचे सहकारी,

अनुक्रमणिका

सोविएत विमान उत्पादन, विमानतळांची उभारणी, रसायन, दारूगोळा, रेल्वे या उद्योगात हेरगिरी करून तत्संबंधी अहवाल नियमीतपणे त्यांना सादर करीत.

आक्रमणाची वेळ जशी नजीक येऊ लागली तसी रशियन निर्वासितांच्या मनातील आशा-उत्कंठा शिगेला पोहोचली. पॅरिस येथील एका श्वेत रशियन वृत्तपत्रात व्लादिमिर रियाबुशिन्स्की याने 'एक अत्यावश्यक युद्ध' या मथळ्याखाली एक लेख प्रसिद्ध केला. त्यात त्याने लिहिले—

'रशियाच्या मुक्तीसाठी 'थर्ड इंटरनॅशनल' विरुद्ध होऊ घातलेला हा लढा म्हणजे अत्यंत न्याय्य व अत्यावश्यक युद्धांपैकी एक युद्ध होते अशीच साक्ष इतिहास देईल, याबद्दल मला तिळमात्रही संदेह नाही. रशियातील हस्तक्षेपाचे यापूर्वीचे प्रयत्न फार खर्चिक ठरल्याने फसले. सोविएतांविरुद्धची कार्यवाही कमीतकमी सहा महिने तरी चालेल असे १९२० ते १९२५ या काळात तज्ज्ञांना वाटत होते व त्याकरिता १० लक्षाचे सैन्य व १० कोटी पौंड खर्च लागेल असा अंदाज होता. परंतु आता अंतस्थ राजकीय व आर्थिक अडचणींमुळे सोविएत रशिया दुबळे झालेले असल्याने त्याला चिरडण्याकरिता बराच कमी खर्च येईल, ती कार्यवाही फलद्रूप होण्याकरिता तीन ते चार महिन्यांपेक्षा अधिक कालावधी लागणार नाही, व ५ लक्षाचे सैन्य त्याकरिता पुरेसे होईल अशी आम्हाला खात्री आहे.' अर्थात, कम्युनिस्ट गटांचा पूर्ण निःपात व्हायला थोडा आणखी वेळ लागेल हे खरे असले तरी त्याकरिता लष्करी कार्यवाहीची गरज उरणार नाही; केवळ पोलीस कार्यवाही पुरेशी ठरेल, असे त्याने सांगितले.

रशियावरील आक्रमणामुळे किती लाभ त्यांच्या पदरात पडणार आहेत याचाही रियाबुशिन्स्कीने आढावा घेतला. रशियाच्या भरभराटीला येणाऱ्या अर्थव्यवस्थेचे नियंत्रण त्यांच्यासारख्या मंडळींच्या हाती आले तर तेथून दरवर्षी निरनिराळ्या वस्तूंकरिता येणाऱ्या मागणीच्या रूपाने इतका अमाप पैसा युरोपीय अर्थकारणात ओतला जाईल की ऑस्ट्रिया, जर्मनी व ग्रेट ब्रिटन या राष्ट्रांमधील ५० लक्षांची बेकारी पूर्णपणे नाहीशी होऊ शकेल असे त्याने सांगितले.

ते सोविएत-विरोधी युद्ध म्हणजे अर्थातच एक महान व पवित्र कार्य होते. मानवतेप्रती ते त्यांचे एक नैतिक कर्तव्य होते, हे सर्व तर खरेच परंतु त्याशिवाय, केवळ निर्भेळ धंद्याच्या दृष्टीकोनातूनही ते युद्ध किती लाभदायक ठरणार होते ते रियाबुशिन्स्कीने स्पष्ट केले.

'व्यापारी दृष्ट्याही रशियाची सोविएतांच्या पकडीतून मुक्तता करण्याइतकी दुसरी कोणतीही अधिक लाभदायक योजना जगात नसेल. १० कोटी रुबल्स त्याकरिता खर्च केले तर ५० कोटी रुबल्स आपल्या पदरात पडतील. म्हणजेच दरवर्षी ५०० टक्के नफा मिळेल. शिवाय दरवर्षी १०० ते २०० टक्क्यांनी तो नफा वाढतच जाईल. यापेक्षा किफायतशीर धंदा तुम्हाला अन्यत्र कोठे करायला मिळणार आहे?'

**पडद्याआडचे एक दृश्य**

अनुक्रमणिका

त्याकाळी युरोपच्या बड्या उद्योग व राजनैतिक क्षेत्रात जी लोकशाही-विरोधी व सोविएत-विरोधी बेफाम कटकारस्थाने रचली जात होती ती १९३० च्या सुमारास जर्मनीत अचानकपणे उघडकीला आली.

फ्रँकफुर्ट शहरात जर्मन पोलीस नेहमीची गस्त घालीत असता एका गोदामात बनावट रशियन चलनी नोटांचे गठ्ठेच्या गठ्ठे सोविएत रशियाला पाठविण्याच्या तयारीत ठेवलेले, अगदी अनपेक्षितपणे त्यांना आढळले.

ते प्रकरण चौकशीकरिता न्यायालयापुढे आले. चेर्वोनेत्स खटला म्हणून गाजलेल्या त्या घटनेने आंतर्राष्ट्रीय क्षेत्रात चांगलीच खळबळ उडवून दिली. साक्षीपुरावे होत असता, युरोपातील अनेक बडी मंडळी त्या प्रकरणात गुंतली असल्याचे उघडकीस आले. त्यात सर हेन्री डेटरडिंग, त्याचा गुप्त हस्तक जॉर्ज बेल, झारकालीन तेलसम्राट नोबेल, बव्हेरियातील नाझीधार्जिणा उद्योगपती विली श्मिट्झ् यांचा अंतर्भाव होता. सुप्रसिद्ध जर्मन जनरल मॅक्स हॉफमन याचे नावही त्या कटात प्रामुख्याने आले; परंतु खटला निकालात निघण्यापूर्वीच हॉफमन कालवश झाला.

त्या खटल्यात बेल व स्मिट्झ व नोई जॉर्डेनियाच्या कटकारस्थानातील त्याचे पूर्वीचे, कट्टर सोविएत द्वेष्टे असलेले जॉर्जियन सहकारी, कारुमिड्झ् व सादाथिएर्श्विली यांच्यावर बनावट सोविएत बँक नोटा छापल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. सोविएत कॉकेशस प्रदेशात फार मोठ्या प्रमाणात त्या बनावट बँक नोटा ओतून सोविएत संघात राजकीय तणाव व अराजक माजविण्याचे कटवाल्यांचे मुख्य उद्दिष्ट होते हे खटल्याची सुनावणी चालू असता उघडकीस आले. तेलविहिरी व खनिजे यांसारख्या आर्थिक बाबी त्या कटाच्या बुडाशी असल्याचा निर्वाळा न्यायाधीशाने दिला.

अर्थात् त्या बनावट नोटा म्हणजे एका प्रचंड कटकारस्थानाची एक लहानशी बाजू होती हेही लवकरच स्पष्ट झाले. नाझीनिष्ठ उद्योगपती विली स्मिट्झ् याने आपल्या जबानीत सांगितले की त्या कटकारस्थानामागील त्याचा प्रमुख हेतू जर्मनीतून साम्यवादाचे उच्चाटन करण्याचा होता; परंतु त्याकरिता प्रथम रशियातील सोविएत राजवटीचे उन्मूलन करणे आवश्यक असल्याची त्याची खात्री होती. रशियाविरुद्ध फ्रेंच-जर्मन-इंग्लिश अशी संयुक्त आघाडी संघटित करण्याची त्याची योजना ब्रिटिश परराष्ट्र खात्याला सादर करण्याकरिता जनरल हॉफमन १९२६ मध्ये इंग्लंडला गेला तेव्हा त्याचा सगळा खर्च आपण दिला होता हे त्याने कबूल केले. हॉफमनचे व्यक्तिमत्त्व, चारित्र्य व इंग्लंडमधील बड्या तेलव्यवसायाशी निगडित असलेले त्याचे हितसंबंध, या कारणांमुळे हॉफमन ती कामगिरी पार पाडू शकेल असा त्याला विश्वास होता असे त्याने न्यायालयापुढे सांगितले.

इंग्लंडमधील बड्यांचे तेल उद्योगातील हितसंबंध म्हणजे सर हेन्री डेटरडिंग याचेच हितसंबंध असल्याचे, व प्रामुख्याने त्यानेच त्या सर्व कटकारस्थानाकरिता पैसा पुरविल्याचे जॉर्जियन आरोपी कारुमिड्झ याने सांगितले.

अनुक्रमणिका

न्यायालयासमोर आलेल्या साक्षीपुराव्यातून एक गोष्ट निर्विवादपणे सिद्ध झाली ती ही की रशियाविरुद्ध युद्ध सुरू करण्यापूर्वी सोविएत संघापासून कॉकेशस प्रदेश तोडावा या हेतूने जर्मनी, फ्रान्स, व ब्रिटन या राष्ट्रांतील वित्त व राजकीय क्षेत्रातील गटांनी ती योजना तयार केली होती. त्यांच्या कारस्थानामुळे 'मुक्त' होणाऱ्या सोविएत प्रदेशाचे आर्थिक शोषण करण्याकरिता एक व्यापारी संघटना प्रस्थापित करण्यात आली. त्या योजनेकरिता सैन्य, तंत्रज्ञ शस्त्रास्त्रे जर्मनी पुरविणार होते; व त्या कार्यवाहीत रुमानिया व पोलंड यांनी सहभागी व्हावे याकरिता त्या राष्ट्रांवर राजनैतिक व आर्थिक दडपण इंग्लंड व फ्रान्स ही राष्ट्रे आणणार होती.

साक्षीपुरावे चालू असता एक महत्त्वाचा दस्तऐवज न्यायालयाच्या बंद दाराआड वाचण्यात आला; कारण प्रसिद्धी मिळाली तर जर्मनीच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होईल अशी जर्मन सरकारला धास्ती होती. त्या सर्व कारस्थानात जर्मनीचे सर्वोच्च अधिकारी गुंतले असल्याचे त्या दस्तऐवजावरून सिद्ध होत होते अशी त्यावेळी सर्वत्र बोलवा होती.

या सर्व प्रकारामुळे तो खटला पुढे चालू ठेवणे त्यात गुंतलेल्या राष्ट्रांना धोक्याचे वाटू लागले. 'त्या प्रकरणाबाबत सामान्य जनतेपासून काहीही लावून ठेवण्यात येणार नाही अशी ग्वाही, अगदी सुरुवातीला, जर्मन परराष्ट्र खाते व ब्रिटिश दूतावास यांनी दिलेली असली तरी ते प्रकरण दडपून टाकण्याचे आदेश गुप्तपणे पोलिसांना देण्यात आले होते ते आता उघड झाले आहे,' असे वृत्त न्यूयॉर्क टाईम्सने आपल्या २३ नोव्हेंबर १९२७ च्या अंकात दिले होते.

चेर्वोनेत्झ् खटला अकस्मात व आश्चर्यकारक रित्या निकालात काढला गेला. त्या बनावट चलनी नोटा चलनात येण्यापूर्वीच पोलिसांनी पकडल्याने, खऱ्या अर्थाने बनावट नोटा काढल्याचा गुन्हा घडला आहे असे म्हणता येत नाही; त्या नोटा छापल्या गेल्याचे सिद्ध झाले असले तरी ती कार्यवाही निःस्वार्थ राजकीय हेतूने करण्यात आलेली असल्याने संबंधितांना निर्दोष म्हणून सोडून देणेच न्याय्य ठरेल असा निकाल न्यायालयाने दिला. सर्व आरोपी निरपराध ठरून बाहेर पडले.

यानंतर त्या खटल्यासंबंधी पुसटते उल्लेखही वृत्तपत्रांतून आले नाहीत. फक्त सर हेन्री डेटरडिंग याने एक जाहीर निवेदन मात्र केले, ते असे–

'जनरल हॉफमनशी माझा चांगला निकटचा परिचय होता. एक सैनिक व नेता म्हणून मला त्याच्याबद्दल फार आदर होता. दुर्दैवाने तो आज आपल्यात नाही व आपल्या बचावाकरिता काही करू शकत नाही. पण त्याच्या समर्थनार्थ एक गोष्ट मी ठामपणे सांगू इच्छितो की जनरल हॉफमन बोल्शेविझ्मचा कट्टर शत्रू होता. त्या धोक्याविरुद्ध लढा देण्याकरिता बड्या राष्ट्रांची युती घडवून आणावी म्हणून तो वर्षानुवर्षे खपला. मास्कोविरुद्ध लढा दिला पाहिजे असे त्याला आत्यंतिक तीव्रतेने वाटत होते हे युद्धोत्तर

राजकारणाच्या प्रत्येक जाणकाराला माहीत होते. तो आज जिवंत नाही ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. अन्यथा त्याने आपल्या टिकाकारांना अगदी चोख उत्तर दिले असते.'

### युगान्त

सोविएत संघावरील हल्ल्याची योजना १९३० च्या ग्रीष्मापर्यंत पुढे ढकलण्यात आली. त्याकरिता फ्रेंचांची पुरेशी तयारी झालेली नव्हती असे त्याचे कारण श्वेत वर्तुळाकडून सांगण्यात आले असले तरी खरे कारण वेगळेच होते. हल्ल्यानंतर हाती येणाऱ्या सोविएत प्रदेशापैकी कोणता प्रदेश कोणाच्या प्रभावाखाली असावा या मुद्यावर त्यांच्यात मतभेद उपस्थित झाले होते. कॉकेशस व दोनेस्त कोळसा क्षेत्राच्या नियंत्रणावरून ब्रिटिश व फ्रेंच यांच्यात तंटा उद्‌भवला होता, तर युक्रेनवर जर्मनीचे प्रभुत्व असावे हा जर्मनीचा दावा फ्रेंच व ब्रिटिश या दोहोंनाही मान्य नव्हता. तरीही, हे सर्व मतभेद मिटविण्यात येतील व १९३० च्या ग्रीष्मात युद्धाला प्रारंभ करता येईल असा, त्या सर्व योजनेचा सूत्रधार सर हेन्री डेटरडिंग याला विश्वास होता.

श्वेत रशियन उमरावांच्या व अधिकाऱ्यांच्या मुलांना लष्करी प्रशिक्षण देण्याकरिता उघडण्यात आलेल्या केंद्राचा दहावा वर्धापन दिन पॅरिस येथे जुलैमध्ये साजरा करण्यात आला. त्यावेळी आयोजित करण्यात आलेल्या एका सभेत सर हेन्री डेटरडिंग हा प्रमुख वक्ता होता. झारकालीन निर्वासित राजपुत्र, राजकन्या, धर्मोपदेशक, लष्करी व नाविक अधिकारी, तसेच कनिष्ठ स्तरावरील अनेक अधिकारी त्या समारंभाला उपस्थित होते. एवढेच नव्हे तर फ्रेंच लष्करातील उच्च पदस्थ अधिकारीही, संपूर्ण गणवेशात, त्या समारंभाला हजर होते.

'सोविएताविरोधी योजनांना तो करीत असलेली मदत ही पाश्चात्य संस्कृतीच्या रक्षणाकरिता तो करीत असल्याने त्या मदतीबद्दल कोणी त्याचे आभार मानण्याचे काहीच कारण नाही' अशा शब्दांनी आपल्या भाषणाची सुरुवात करून, सभेतील तरुण श्वेत रशियनांना उद्देशून डेटरडिंग म्हणाला—

'तुम्ही स्वावलंबी बनले पाहिजे. तुमचे सर्व कार्य व हालचाली तुमच्या मायदेशाच्या—रशियाच्या भूमीवरच होणार आहेत हे तुम्ही विसरता कामा नये. आज संकटांच्या भोवऱ्यात सापडलेला रशिया लवकरच मुक्त होईल ही आशा दिवसेंदिवस दृढ होत आहे. आपल्या अपेक्षेपेक्षाही लवकर, बहुधा थोड्याच महिन्यात, तुमच्या पितृभूमीची सुटका होणार आहे.'

डेटरडिंगच्या या वक्तव्यावर, श्वेत रशियनांइतक्याच उत्साहाने व आनंदाने फ्रेंच लष्करी अधिकाऱ्यांसह सर्व श्रोत्यांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला.

अनुक्रमणिका

परंतु, युद्धाची अशा प्रकारे सिद्धता सुरू असताच त्यात अगदी अनपेक्षीत व गंभीर स्वरूपाचा अडथळा निर्माण झाला—तो म्हणजे जागतिक मंदी. युरोपवर कोसळलेल्या त्या संकटाच्या परिणामांबद्दल बोलताना १८ डिसेंबर १९३० रोजी मुसोलिनी म्हणाला—

'१९२९ च्या हेमंतापर्यंत इटलीतील परिस्थिती समाधानकारक होती. परंतु त्या सुमारास एखादा बाँबस्फोट व्हावा त्याप्रमाणे अमेरिकन बाजारपेठ कोसळली. आम्हा छोट्या व गरीब युरोपीय राष्ट्रांच्या दृष्टीने तो एक फार मोठा आघात होता. नेपोलियनच्या मृत्यूने जसे झाले तसे सर्व जग आज आर्थिक मंदीमुळे हादरले आहे. सर्व काही अलबेल आहे अशा भ्रमात आम्ही निश्चिंत असतानाच आमच्यावर संकटाची कुऱ्हाड कोसळली आहे. ३० ते ५० टक्क्यांनी भागभांडवलाची किंमत घसरली आहे. दिवसेंदिवस आमचा पाय अधिकाधिक खोलात जाऊ लागला आहे.'

वॉल स्ट्रीटपासून सुरुवात झालेल्या त्या आर्थिक अनर्थाने लवकरच संपूर्ण युरोप व आशियाला ग्रासले. मंदीच्या त्या भयानक वादळात सोविएत रशियाविरुद्ध धर्मयुद्ध चालविण्याची आकांक्षा बाळगून असलेली राष्ट्रेही सापडली. मंदीचे अपरिहार्य ते परिणाम होऊन, बेकारी, उपासमार, नैतिक अधःपतन या भोवऱ्यात सर्व राष्ट्र गटंगळ्या खाऊ लागली. एकापाठोपाठ एक बँकांचे दिवाळे निघत होते. छोटे ठेवीदार तर त्यामुळे पार बुडाले. कारखाने बंद पडू लागल्याने लक्षावधी कामगार रस्त्यावर आले. कोट्यावधी लोक उपासमारीने तडफडत असता, तुडुंब भरलेल्या गोदामातून गहू सडत होता, शेतांत उभ्या पिकावरून पुन्हा नांगर फिरवला जात होता; समुद्रातून पकडून आणलेले मासे पुन्हा सागरात फेकले जात होते; कारण तो माल विकत घ्यायला लोकांच्याजवळ पैसा नव्हता. संपूर्ण आर्थिक वितरण व्यवस्था कोलमडून पडली होती. ही सर्व संकटमय परिस्थिती सावरण्याकरिता काहीतरी जालिम उपाययोजना न झाली तर सुसंस्कृत जगाची भांडवलशाही अर्थव्यवस्था एका वर्षाच्या आत मोडून पडेल की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. तशी धास्ती इंग्लंडच्या बँकेचा गव्हर्नर मॉंटेग्यू याने फ्रेंच बँकेच्या गव्हर्नरला लिहिलेल्या पत्रात व्यक्त केली होती. सर्व जगच जणू ढासळत होते, व त्या दगडमातीच्या भयंकर ढिगाऱ्याखाली राष्ट्रांचे प्राण गुदमरत होते.

सर्व पाश्चात्य भांडवलशाही राष्ट्रांना भेडसाविणाऱ्या त्या संकटाची संधी दूरपूर्वेत जपानने साधली. युरोपीय राष्ट्रे मंदीच्या मगरमिठीत आवळली जात असताच 'तनाका मेमोरँडम' च्या पहिल्या टप्प्याच्या अंमलबजावणीला जपानने प्रारंभ केला. १८ सप्टेंबर १९३१ च्या रात्री जपानने मांचूरियावर अकस्मात आक्रमण केले. चिनी कम्युनिस्टांविरुद्धच्या यादवी युद्धात गुंतलेले कोमिन्टांग लष्कर त्या अनपेक्षित हल्ल्यामुळे निष्प्रभ ठरले. 'बोल्शेविझमपासून चीनचा बचाव' करण्याचे निमित्त पुढे करून जपानने मांचूरियाचा ताबा घेतला.

दुसऱ्या महायुद्धाची ती नांदी होती. मात्र ते युद्ध सुरू झाले ते पाश्चिमात्यांना अपेक्षा होती त्यापेक्षा अगदी वेगळ्या प्रकाराने.

## प्रकरण १३

# तीन खटले

### ओद्योगिक पक्षाची न्यायालयीन चौकशी

जागतिक मंदीच्या संकटाचा कोणत्याही प्रकारे आघात न झालेले युरोपात एकमेव राष्ट्र होते—ते म्हणजे १९१७ पासून जागतिक राजकारणातून वाळीत टाकले गेलेले सोविएत रशिया.

ज्यावेळी युरोपीय राष्ट्रे त्या जागतिक मंदीच्या तडाख्यामुळे कासावीस होत होती त्यावेळी, तोपर्यंतच्या जगाच्या इतिहासात तोड नसलेल्या अशा प्रचंड आर्थिक व औद्योगिक विकासाच्या मार्गावर सोविएत संघाची दमदार वाटचाल सुरू होती. स्टालिनची पंचवार्षिक योजना जुन्या रशियाला विधायक श्रमशक्तीची नवी संजीवक प्रेरणा देऊन गतीमान करीत होती. पडीत गवताळ माळरानात नवी शहरे उभी होत होती. नव्या खाणी, गिरण्या, कारखाने निर्माण होत होते. लक्षावधी शेतकरी आता कसबी कामगार, इंजीनिअर, डॉक्टर, शिल्पतज्ञ बनत होते. थोड्याच वर्षांत हजार वर्षांची प्रगती सोविएतांना साधावयाची होती. जे शेतकरी शतकानुशतके जुनेपुराणे नांगर-कोयते घेऊन पाठ मोडेपर्यंत शेतात राबत होते तेच आता ट्रॅक्टर्स व मळणी यंत्रे यांच्या सहाय्याने भरपूर पीक पदरात पाडून घेत होते. कीटकनाशकांची फवारणी विमानातून होत होती. त्या सर्व क्रांतिकारी प्रयत्नांमुळे राष्ट्राचा जणू कायाकल्प होत होता. झारशाहीतील मानहानीची किंवा अत्याचारांची कल्पनाही नसलेली नवी सोविएत पिढी उदयाला येत होती.

अशा वेळी अंतर्गत शत्रूंचा मुकाबला करण्यास सोविएत सरकार पुढे सरसावले. त्या कार्यवाहीमुळे अँग्लो-फ्रेंच साम्राज्यवादी व रशियातील झारकालीन प्रतिक्रांतिवादी यांच्या तोर्गप्रोम संघटनेच्या कारवाया उघडकीस येऊन ती संघटना कायमची नेस्तनाबूत झाली.

२८ ऑक्टोबर १९३० रोजी प्रोफेसर रामझिन व औद्योगिक पक्षाचे अनेक नेते पकडण्यात आले. त्याच वेळी छापे घालून ओ. जी. पी. यू. ने, संपूर्ण सोविएत संघात घातपाती कारवाया करीत असलेले सोशल रेव्होल्यूशनरी, मेन्शेविक व श्वेत रशियन चळवळीतील भूमीगत कार्यकर्ते, व त्याचबरोबर बरेच फ्रेंच, पोलिश व रुमानियन गुप्तहेर या सर्वांना अटक केली.

मास्कोच्या सर्वोच्च न्यायालयात औद्योगिक पक्षाविरुद्ध खटला चालविण्यात आला. २५ नोव्हेंबर ते ७ डिसेंबर १९३० पर्यंत त्या खटल्याची सुनावणी चालू होती. प्रोफेसर रामझिन व वित्तर लारित्शेव यांसह आठ आरोपींवर, परकीयांना सोविएत संघाविरुद्धच्या कटकारस्थानात मदत करणे, हेरगिरी व घातपाती कृत्ये करणे व सोविएत सरकार उलथून पाडण्याकरिता कटकारस्थाने करणे असे आरोप ठेवण्यात आले

होते. सोविएत गुप्तहेरांनी त्यांच्या विरुद्ध न्यायासनासमोर ठेवलेला पुरावा इतका सबळ होता की आरोपींपुढे गुन्हे कबूल करण्याव्यतिरिक्त अन्य पर्याय उरला नाही. न्यायालयासमोर झालेल्या साक्षींतून त्यांच्या कारवायांचा सर्व तपशील तर उघडकीस आलाच, पण शिवाय, तोर्गप्रोम नेते सर हेन्री डेटरडिंग, कर्नल जॉईनव्हिल, लेस्ली उर्क्हार्ट, रेमंड पॉईनकेर व अन्य सुप्रसिद्ध युरोपीय सेनापती, मुत्सद्दी व व्यापारी त्या कटात गुंतले असल्याचे सिद्ध झाले.

प्रो. रामझिन व विक्तर लारित्शेव यांसह ५ आरोपींना राष्ट्रद्रोहाच्या गुन्ह्याकरिता देहदंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. इतर तिघांना, त्यांच्या आदेशानुसार घातपात केल्याबद्दल दहा वर्षांची कारावासाची शिक्षा झाली. [शिक्षेची सुनावणी झाल्यानंतर दोन दिवसांनी रामझिनसह पाच आरोपींनी न्यायालयाकडे दयेचा विनंती अर्ज केला. रामझिन व त्याचे सहकारी यांचा सोविएत संघाबाहेर असलेल्या कटाच्या सूत्रधारांनी आपल्या स्वार्थाकरिता उपयोग करून घेतला हे लक्षात घेऊन न्यायालयाने त्यांची देहांताची शिक्षा रद्द करून त्यांना दहा वर्षांचा तुरुंगवासाची शिक्षा दिली. सोविएत अधिकाऱ्यांनी प्रोफेसर रामझिनला, तुरुंगात, त्याचे वैज्ञानिक संशोधनाचे कार्य चालू ठेवण्याकरिता सर्व सोयी उपलब्ध करून दिल्या. त्या काळात सामझिनच्या मनोभूमिकेत पूर्णपणे परिवर्तन घडून आले... तो कट्टर सोविएत समर्थक बनला. एवढेच नव्हे तर सोविएत संघाच्या औद्योगिक विकासात त्याने मोलाचे योगदान दिले. ७ जुलै १९४३ रोजी प्रो. रामझिन याला, जगातील कोणत्याही टर्बोजनरेटरपेक्षा उत्तम प्रकारच्या टर्बोजनरेटरचा शोध लावल्याबद्दल 'ऑर्डर ऑफ लेनिन' हा किताब व ३० हजार पौंडाचे जोसेफ स्टालिन पारितोषिक बहाल करून गौरविण्यात आले.]

## मेन्शेविकांवरील खटला

औद्योगिक पक्ष कोलमडून पडल्यानंतर थोड्याच दिवसांनी सोविएत सरकारने त्यांच्या दुसऱ्या शत्रूवर प्रहार केला. १ मार्च १९३१ रोजी व्यापक क्षेत्रात घातपाती कृत्ये करणाऱ्या १४ मेन्शेविक नेत्यांना न्यायालयीन चौकशीसाठी मास्को येथील सर्वोच्च सोविएत न्यायालयापुढे उभे करण्यात आले. [मेन्शेविक पक्ष हा रशियन सोशल डेमोक्रॅटिक पार्टी या मूळ रशियन मार्क्सवादी संघटनेचा एक घटक होता. १९०३ मध्ये लंडन येथे भरलेल्या सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या दुसऱ्या परिषदेत पक्ष सदस्यांत मतभेद होऊन पक्ष दुभंगला. त्या दोन गटांनी नंतर आपआपले स्वतंत्र पक्ष स्थापन केले. बहुसंख्य सदस्य लेनिनच्या पक्षात असल्याने त्या पक्षाला बोल्शेविक्स (रशियन शब्द बोलशिनस्त्वो—म्हणजे बहुसंख्य), तर अल्पसंख्य असलेल्या लेनिनच्या विरोधकांना मेन्शेविक्स (रशियन शब्द मेन्शिनस्त्वो—म्हणजे अल्पसंख्य) अशी नावे रूढ झाली. क्रांतीनंतर लेनिनच्या सूचनेवरून बोल्शेविक पक्षाचे 'कम्युनिस्ट पक्ष' असे नामकरण अधिकृतपणे करण्यात आले. बोल्शेविक सत्तेवर येताच मेन्शेविकांनी युरोपीयन सोशल डेमोक्रॅट्स् व सोशलिस्ट यांच्याशी व्यक्तिगत, तसेच संघटनात्मक संबंध जोडले.]

त्या खटल्यातील आरोपींपैकी बरेच जण महत्त्वाच्या सोविएत प्रशासकीय व तांत्रिक शाखांत उच्चपदी अधिकारावर होते. सोविएत राजवटीच्या प्रारंभीच्या काळात या मेन्शेविक नेत्यांनी, सोविएतांप्रती त्यांचे शत्रुत्व संपले असल्याची ग्वाही देऊन, महत्त्वाच्या पदांवर आपली नेमणूक करून घेण्यात यश मिळविले होते, तर दुसरीकडे औद्योगिक पक्ष व अन्य सोविएत विरोधक यांच्याशी गुप्तपणे त्यांची हातमिळवणी चालूच होती.

मेन्शेविक कटवाल्यांपैकी ग्रोमन हा सोविएत औद्योगिक नियोजन मंडळात (गॉस्प्लान) एक वरिष्ठ अधिकारी होता. नियोजनाचा आराखडा तयार करताना चुकीचे अंदाज व निष्कर्ष काढून व महत्त्वाच्या उद्योगांच्या उत्पादन-उद्दिष्टात कपात करून पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या यशसिद्धीच्या कार्याला खीळ घालण्याचा उद्योग तो करीत होता.

अनुक्रमणिका

१९२८ ते १९३० या काळात घातपाताकरिता मेन्शेविकांना बराच पैसा 'तोर्गप्रोम' कडून मिळाला होता. पण त्याबरोबरच अन्य सोविएत—विरोधी गटांकडूनही त्यांना द्रव्याचा पुरवठा होत होता. सोविएत-विरोधक सोशल डेमोक्रॅट्स व सोशलिस्ट यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या श्रमिक संघटनेचा—'सेकंड इंटरनॅशनल' चा मेन्शेविकांना भरीव पाठिंबा होता.

आरोपींनी आपल्या जबानीत सांगितले की ते व परकीय सोविएत-विरोधी गट यांत मुख्य दुवा होता तो म्हणजे क्रांतीनंतर जर्मनीत पळून गेलेला मेन्शेविक नेता राफेल अब्रोमोविच. मेन्शेविक कटाचा प्रमुख सूत्रधार वासिली शेर याने सांगितले की १९२८ मध्ये अब्रोमोविच परदेशातून आला. त्याबद्दलची पूर्वसूचना त्यांना—म्हणजे 'ऑल युनियन ब्यूरो' च्या सदस्यांना देण्यात आली होती. जबाबदारीच्या पदांवरील कर्मचाऱ्यांना आपल्या जाळ्यात ओढून घातपाती कृत्यांना गती देण्यावर लक्ष केंद्रित करण्यास त्याने त्यांना सांगितले होते.

लाझार सालकिंद या दुसऱ्या एका मेन्शेविक कटवाल्याने न्यायालयापुढे जबानी दिली—

'सोविएत अर्थव्यवस्थेच्या निरनिराळ्या शाखात घातपाती कृत्ये घडवून आणणे व सोविएत आर्थिक नीती अपयशी ठरली असल्याची कामगार-शेतकरी यांची खात्री पटवून देण्याच्या दृष्टीने राष्ट्राची अर्थव्यवस्था खिळखिळी करणे ही सोविएत सत्तेविरुद्धच्या संघर्षाची एक बाजू असून, दुसरी बाजू म्हणजे लष्करी हस्तक्षेप करणे ही होय असे अब्रोमोविच याने आम्हाला सांगितले.' [मेन्शेविकांविरुद्धचा हा खटला म्हणजे स्टालिनच्या हुकुमशाही राजवटीच्या नोकरशाहीने चालविलेले निव्वळ राजकीय छळवाद व क्रौर्य आहे असे सांगून 'सेकंड इंटरनॅशनल'ने त्या खटल्याचा धिक्कार केला, तर सोविएत संघात जाऊन तेथील गुप्त बैठकीत मेन्शेविकांना चिथावणी दिल्याचे अब्रोमोविच याने साफ नाकारले. मात्र रशियात त्यांच्या पक्षाची एक बेकायदेशीर पण सक्रिय संघटना होती व त्या संघटनेचे प्रतिनिधी बर्लिन येथील त्यांच्या परकीय पाठिराख्यांशी संपर्क साधून होते हे त्याने कबूल केले.]

९ मार्च १९३१ रोजी खटल्याचा निकाल लागला. मेन्शेविक गुन्हेगारांना ५ ते १० वर्षांच्या कारवासाच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या.

## विकर्स इंजिनियर्सविरुद्धचा खटला

११ मार्च १९३३ रोजी रात्री साडेनऊ वाजता सोविएत सरकारने तोर्ग-नंतरच्या काळात अब्रोमोविच अमेरिकेत गेला. प्रोमच्या उरल्या सुरल्या कटवाल्यांवर अखेरचा प्रहार केला. मेट्रोपोलिटिन—विकर्स या ब्रिटिश इलेक्ट्रिकल इंजीनियरिंग उद्योगाच्या मास्को कार्यालयातील १० रशियन व ६ ब्रिटिश इंजीनियरांना ओ.जी.पी. यू ने अकस्मात अटक केली. ब्रिटिश गुप्तचर सेवेतर्फे सोविएत संघात हेरगिरी व घातपात करण्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता.

अनुक्रमणिका

विकर्सचा मास्को येथील प्रमुख, कॅप्टन सी.एस. रिचर्डस् ही धरपकड होण्यापूर्वीच घाईघाईने इंग्लंडला परत गेला होता. ब्रिटिश हस्तक म्हणून रिचर्डस् रशियात १९१७ पासून होता. त्याकाळी, दोस्त राष्ट्रांनी आर्केंजल व्यापण्याकरिता केलेल्या सोविएत-विरोधी कारस्थानात गुप्तचर तुकडीचा प्रमुख म्हणून रिचर्डस्ने महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्याच्याच नेतृत्वाखाली मेट्रो-विकर्सचे मास्को येथील कार्यालय हे नंतर रशियातील ब्रिटिश गुप्तचर कारवायांचे केंद्र बनले.

मास्को येथे सोविएत अधिकाऱ्यांनी अटक केलेल्या ब्रिटिश तंत्रज्ञांत रिचर्डस्चा आर्केंजल मोहिमेतील जुना सहकारी आणि १९३० च्या सुमारास त्याचा उजवा हात मानला गेलेला ॲलन मॉंकहाऊस याचा समावेश होता.

मॉंकहाउसने त्याच्यावर ठेवण्यात आलेले आरोप साफ नाकबूल केले. मात्र तो पूर्वी रिचर्डस्चा सहकारी असल्याची कबूली त्याने दिली. त्याने त्याच्या जबानीत सांगितले—

रिचर्डस्शी माझी भेट १९१७ मध्ये प्रथम मास्कोत व नंतर आर्केंजलमध्ये झाली. तो त्यावेळी गुप्तचर सेवेत कॅप्टनच्या पदावर होता. १९१८ च्या एप्रिल व मे महिन्यात तो मास्कोत होता. पण तो कशाकरिता आला होता हे मात्र मला माहीत नाही. त्याने त्यावेळी चोरून लपून फिनलंडची सीमा ओलांडली असल्याचे त्याच्याच बोलण्यावरून मला कळले. १९२३ मध्ये मेट्रोपोलिटन—विकर्स इंजीनियरिंग इलेक्ट्रिकल एक्सपोर्ट कंपनीचा संचालक म्हणून त्याची नेमणूक झाली. त्याचवर्षी रशियाला काही उपकरणे पुरविण्याबाबत वाटाघाटी करण्याकरिता तो मास्कोला गेला'.

१९२४ मध्ये, विकर्सच्या मास्को कार्यालयात रिचर्डस्च्या हाताखाली काम करण्याकरिता मॉंकहाउसला रशियात पाठविण्यात आले होते.

अटक झालेल्या विकर्स कर्मचाऱ्यांपैकी विकर्सचा मुख्य उभारणी इंजीनियर म्हणून मास्कोत पाठविण्यात आलेला लेस्की चार्लस् थॉर्नटन हा एका झारकालीन धनाढ्य कारखानदाराचा मुलगा होता. क्रांतीनंतर त्याने ब्रिटिश नागरिकत्व घेतले होते; व तो ब्रिटिश गुप्तचर सेवेत एक हस्तक बनला होता. अटकेनंतर दोन दिवसांनी थॉर्नटनने स्वाक्षरी करून एक कबुलीजबाब सादर केला ते असा—

'रशियातील आमच्या हेरगिरीच्या कार्यवाहीचे मार्गदर्शन ब्रिटिश गुप्तचर सेवा, मेट्रोपोलिटन विकर्स इलेक्ट्रिकल एक्सपोर्ट कंपनीचा व्यवस्थापक रिचर्डस् या आपल्या हस्तकाद्वारा करीत असे. सोविएत संघातील हेरगिरीचे आयोजन मी व मॉंकहाऊस करीत होतो. विद्यूत् उपकरणे व टर्बाइन्स सोविएत संघाला पुरविण्याबाबत सोविएत संघाचा मेट्रो-विकर्सशी करार झाला होता. रिचर्डस्च्या सूचनेनुसार, कोणत्याही कारणाकरिता रशियात आलेली ब्रिटिश मंडळी हळूहळू हेरगिरी—संघटनेत ओढली जात असत. कोणत्या प्रकारची माहिती त्यांनी मिळवायची याबद्दल त्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या जात.'

अनुक्रमणिका

विकर्स-इंजीनियर विलियम मॅकडोनल्ड यानेही त्याच्यावर ठेवण्यात आलेला आरोप साधार असल्याचे कबूल केले. त्याने सांगितले—

‘रशियात मेट्रोपोलिटन विकर्सचा मास्को येथील हेरगिरी कारवायांचा प्रमुख होता तो थॉर्नटन्. कंपनीचा उभारणी इंजीनियर असल्याच्या बुरख्याआडून तो हेरगिरी करी. मॉंकहाऊस हाही थॉर्नटनच्या बेकायदेशीर कारवायात सहभागी होता. पूर्वी ब्रिटिश लष्करात अधिकारी असलेला व आता विकर्स कंपनीत इंजीनियर म्हणून काम करणारा कुश्ने हाही त्या हेरगिरी कारवायांत त्याचा मदतनीस होता. सोविएत संघात हेरगिरी करणाऱ्यात हा गट आघाडीवर आहे.’

विकर्स-इंजीनियर्सच्या अटकेमुळे ब्रिटनमध्ये सोविएतविरोधाचे चांगले वादळ उठले. त्यांच्यावरील आरोपांच्या चौकशीची किंवा साक्षीपुराव्यांची वाटही न पाहता प्रधानमंत्री स्टॅन्ले बाल्डविन याने अटक झालेली सर्व मंडळी पूर्णपणे निरपराध असल्याचा निःसंदिग्ध निर्वाळा दिला तर, मास्कोशी सर्व राजनैतिक व व्यापारी संबंध ताबडतोब तोडून टाकण्याची मागणी पार्लमेंटचे टोरी सदस्य करू लागले. सर हेन्री डेटरडिंग याचा मित्र असलेला ब्रिटनचा मास्को येथील राजदूत एक दिवस तणतणत सोविएत परराष्ट्र कार्यालयात शिरला व ब्रिटन—रशिया-संबंधावर विघातक परिणाम होऊ नये असे वाटत असेल तर अटक झालेल्यांना, त्यांच्यावर खटले न भरता, तात्काळ सोडून देण्यात यावे अशी धमकीवजा मागणी त्याने मॅक्झिम लिटविनोवकडे केली.

१२ एप्रिल रोजी मास्को येथील नोबेल क्लबच्या ‘ब्लू हॉल’ मध्ये या खटल्याची सुनावणी सुरू झाली. त्यावेळी ‘छळवणूक करणाऱ्यांच्या प्रभावाखाली असलेल्या लोकांनी न्यायालय गच्च भरले होते’ असे भाष्य न्यायालयातील गर्दीला उद्देशून टाईम्सने केले; ‘सुसंस्कृत जगाच्या न्यायदानपद्धतीशी जराही साम्य नसलेले, न्यायाच्या नावाखाली चालविण्यात येत असलेले एक भयानक नाट्य’ असे त्या खटल्याचे वर्णन ‘ऑब्झर्वर’ या वृत्तपत्राने केले; “तो लालतोंड्या रशियन घृणास्पद शब्द बरळत टेबलावर मुठी आपटत होता” असे अपमानास्पद भाष्य डेली एक्सप्रेसने १८ एप्रिलच्या अंकात सोविएत अभियोगी विशिन्स्कीला उद्देशून केले; तर, ‘शाफ्ट्स्‌बरी मार्गावर संध्याकाळच्या वेळी दिसणाऱ्या निर्बुद्ध व हीन दर्जाच्या ज्यूसारखा एक माणूस’ असे बचावाचा वकील ब्राऊद याचे वर्णन इव्हिनिंग स्टॅंडर्डने केले. खऱ्या अर्थाने आरोपींची न्यायालयीन चौकशी करण्यात येत नसून त्यांच्याकडून जबरीने गुन्ह्याचा कबुलीजबाब घेण्याकरिता त्यांचा अनन्वित छळ करण्यात येत आहे अशी समजूत ब्रिटिश जनतेची करून दिली गेली. ‘रशियन कारावासाच्या भयानक हालअपेष्टा आपल्या देशबांधवांना सोसाव्या लागत आहेत’ (डेली एक्सप्रेस, २० मार्च), ‘न्यायालयाच्या दोन सत्रांच्या मध्यंतरात मॅकडोनल्ड यांच्यावर कारावासात काय भयंकर प्रसंग ओढवत असेल या कल्पनेने सर्वांची मने चिंताग्रस्त आहेत; मॅकडोनल्ड यांचे प्राण धोक्यात आहेत असेच चेका-कार्यपद्धतीच्या माहीतगारांना वाटत आहे’ (टाईम्स १७ एप्रिल),’ तर ‘आपल्या भक्ष्यांची इच्छाशक्ती खची करण्याकरिता ओ.जी.पी. यू. त्यांना एक घातक तिबेटी द्रव्य जबरीने पाजीत आहे’ (सर ओस्वाल्ड मोस्ले

अनुक्रमणिका

याच्या ब्रिटिश फासिस्ट पार्टीचे मुखपत्र बनलेले लॉर्ड रॉदरमिअरचे 'डेली मेल'), अशा बेकाम, कपोलकल्पित बातम्या तेथील वृत्तपत्रे देत होती.

या उलट, अटक झालेल्या सर्व ब्रिटिश इंजीनियरांनी मात्र खटल्याच्या सुनावणीच्या काळात सोविएत अधिकाऱ्यांनी त्यांना अत्यंत सभ्यतेने व सौजन्याने वागविले, त्यांच्यावर कोणत्याही प्रकारे जुलुमजबरदस्ती करण्यात आली नव्हती अशी कबुली दिली; तर सबळ व निःसंदिग्ध पुरावा पुढे ठेवण्यात आलेला असूनही जो मॉंकहाइस त्याच्या सहकाऱ्यांच्या कारवायांचे त्याला यत्किंचितही ज्ञान नव्हते असे म्हणत राहिला, तो पुढे १५ मार्च रोजी ओ.जी.पी. यू. बद्दल लंडनच्या 'डिस्पॅच' ला दिलेल्या निवेदनात म्हणाला—

'ते (ओ.जी.पी.यू. अधिकारी)' माझ्याशी फारच सहृदयतेने वागले. त्यांनी विचारलेले प्रश्नही अगदी तर्कशुद्ध होते. माझी तपासणी करणारे वकील त्यांच्या कामात कुशल होते. ओ.जी.पी.यू. चे कारागृह स्वच्छता, सुव्यवस्था व सुयोजन याबाबत प्रशंसेला पात्र आहे. अटक होण्याची ही माझी पहिलीच वेळ आहे. पण मी इंग्लिश तुरुंगांना भेट दिल्या आहेत. त्या तुरुंगांपेक्षा ओ.जी.पी.यू. चे तुरुंग पुष्कळच चांगले आहेत हे मी निश्चितपणे सांगू शकतो. ओ.जी.पी.यू. अधिकाऱ्यांनी माझ्या गरजांकडे व सोयींकडे सर्वतोपरी लक्ष दिले.'

सत्यपरिस्थिती अशी असूनही टोरी दडपणाखाली वाकून ब्रिटिश सरकारने सोविएत रशियाकडून ब्रिटनमध्ये आयात होणाऱ्या सर्व मालावर बंदी घातली. दोन्ही राष्ट्रांमधील व्यापार बंद झाला.

मास्कोतील ब्रिटिश प्रतिनिधींशी खाजगी बोलणी झाल्यानंतर लेस्ली थॉर्नटन याने मात्र तत्पूर्वी स्वाक्षरी करून दिलेला आपला कबुलीजबाब १५ एप्रिल रोजी एकाएकी मागे घेतला. त्या कबुलीजबाबात निर्दिष्ट केलेल्या घटना खऱ्या असल्याचे त्याने कोर्टासमोर कबूल केले. पण 'हेर' हा शब्द त्याच्या मते बरोबर नव्हता. त्याच्या कबुलीजबाबात त्याने स्वतःच तो शब्द का वापरला याचा खुलासा करताना थॉर्नटनने सांगितले की तो त्यावेळी संभ्रमित अवस्थेत असल्याने तसे घडले. मात्र त्याने दिलेला कबुलीजबाब हा त्याने स्वेच्छेने दिलेला होता, त्याकरिता त्याच्यावर कोणत्याही प्रकारे दडपण आणले गेले नव्हते हे त्याने सोविएत अभियोगी विशिन्स्की याच्या प्रश्नांना उत्तर देताना कबूल केले.

ब्रिटिश प्रतिनिधींशी झालेल्या खाजगी भेटीनंतर विलियम मॅकडोनल्ड यानेही त्याचे प्रारंभी केलेले निवेदन बदलले. मात्र सोविएत अधिकाऱ्यांनी न्यायालयासमोर ठेवलेला भरभक्कम व बिनतोड पुरावा पाहताच त्याने पुन्हा गुन्ह्याची कबुली दिली. 'मी माझ्या गुन्ह्याची कबुली दिली आहे. यापेक्षा मला जास्त काहीही म्हणायचे नाही,' हे कोर्टासमोरील त्याचे शेवटचे शब्द होते.

१८ एप्रिल रोजी सोविएत सर्वोच्च न्यायालयाने आपला निकाल दिला. अटक झालेल्या रशियनांपैकी एक आरोपी वगळता, इतर सर्वांचा गुन्हा सिद्ध झाल्याने त्यांना तीन ते दहा वर्षांच्या

कारावासाच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. पुरेसा पुरावा उपलब्ध नसल्याने अलबर्ट ग्रेगोरी यास सोडून देण्यात आले तर इतर पाच ब्रिटिश इंजीनियरांचा गुन्हा सिद्ध झाल्याने, मॉंकहाइस, नॉर्डवाल व कुश्ने यांना सोविएत रशियातून हद्दपार करण्यात आले, तर लेस्ली थॉर्नटन व विलियम मॅकडोनल्ड यांना अनुक्रमे दोन व तीन वर्षांची कारावासाची शिक्षा देण्यात आली.

त्यांच्या गुन्ह्याच्या मानाने त्या शिक्षा अगदीच सौम्य होत्या. परंतु, तोर्गप्रोमच्या ब्रिटिश गुप्तचर सेवेच्या रशियात त्या काळी चालू असलेल्या कारवाया चिरडून टाकण्याचे सोविएत सरकारचे उद्दिष्ट साध्य झाले. खटल्याच्या समाप्तीनंतर काही दिवसांनी सोविएत व ब्रिटिश सरकार यांत तडजोड घडून आली. व्यापार पुन्हा सुरू झाला. थॉर्नटन व मॅकडोनल्ड यांना सागरमार्गे इंग्लंडला माघारी पाठवून देण्यात आले.

हे प्रकरण निकालात निघाले खरे. परंतु याच सुमारास ब्रिटिश टोरींपेक्षाही सोविएत रशियाच्या दृष्टीने कितीतरी भयानक असा एक शत्रू आंतरराष्ट्रीय क्षेत्रात उदयाला येत होता.

अडॉल्फ हिटलर जर्मनीचा हुकुमशहा बनला होता.

अनुक्रमणिका

प्रकरण १४

# युगान्त

बोल्शेविझमच्या तथाकथित धोक्याचा करण्यात आलेला विखारी प्रचार जर्मनीत नाझी सत्तेवर येण्यास कारणीभूत ठरला होता. साम्यवादापासून जर्मनीचे रक्षण करण्याचे आपले उद्दिष्ट असल्याचे घोषित करून, तोपर्यंत जगाला अज्ञात असलेला एके काळचा ऑस्ट्रियाचा कॉर्पोरल व राईश्वेरचा हेर जानेवारी १९३३ मध्ये जर्मन राष्ट्राचा चॅन्सलर बनला होता. २७ फेब्रुवारी १९३३ रोजी राईशस्टॅगच्या इमारतीला आग लावून देऊन तोपर्यत फक्त चॅन्सलर असलेल्या हिटलरने जर्मनीची सर्वाधिकारी सत्ता आपल्या हाती केंद्रित केली. साम्यवाद्यांविरुद्ध जनमत भडकावून द्यावे व त्यांच्याविरुद्ध कार्यवाहीकरिता निमित्त मिळवावे या हेतूने राईशस्टॅगला आग नाझींनीच लावली होती. परंतु ती आग म्हणजे जर्मन सरकारविरुद्ध साम्यवादी करणार असलेल्या कटाची नांदी असल्याचे हिटलरने घोषित केले व त्या निमित्ताने आणिबाणी जाहीर करून फासिस्ट–विरोधी अनेक नेत्यांची कत्तल केली; अनेकांना तुरुंगात डांबले; कामगार संघटना चिरडून टाकल्या. राईशस्टॅगच्या धगधगत्या ढिगाऱ्यातून ‘थर्ड राईस’चा हुकुमशहा म्हणून हिटलर उदयाला आला.

प्रतिक्रियावाद व लोकशाहीविरोध यांचा बालेकिल्ला म्हणून झारशाहीच्या श्वेत प्रतिक्रांतिवाद्यांची जागा आता ‘थर्ड राईश’ ने घेतली. उफाळून येणाऱ्या जर्मन साम्राज्यवादाची प्रचंड औद्योगिक व लष्करी शक्ती पाठीशी असलेला नाझीवाद प्रतिक्रांतिवाद्यांचे जणू दैवत बनला. झारकाळात होते ते सर्व पूर्वग्रह व विद्वेष हे त्यांचे राजकीय ब्रीद बनले. जर्मन लष्करात ज्यांना प्रतिष्ठेचे स्थान दिले गेले होते त्या नाझी धडक सैन्याच्या रूपाने झारशाहीतील ‘ब्लॅक हंड्रेडस्’ जणू नव्याने जन्माला आले होते. ज्यूंवर हल्ले व त्या समाजाचा पूर्ण निःपात हा तिसऱ्या जर्मन राष्टाच्या सरकारचा अधिकृत कार्यक्रम बनला. ‘प्रोटोकोल्स ऑफ झिऑन’ ने नाझींची सैद्धांतिक भूमिका तयार केली. खुद्द नाझी नेते हे बॅरन रँगल, व उन्गर्न यांसारख्या रशियन श्वेत दहशतवाद्यांचेच जणू वंशज होते. बोल्शेविझमविरोधाच्या घोषणा देऊन जागतिक लोकशाही व प्रगती यांविरुद्ध सतत पंधरा वर्षे चालविण्यात आलेल्या अघोषित युद्धाचे अपरिहार्य ते परिणाम झाले होते. राईशस्टॅग इमारतीची राखरांगोळी करणाऱ्या ज्वाळा लवकरच सर्व जगाला ग्रासणार होत्या.

हिटलरने आपल्या ‘माईन कांफ’ मध्ये उघडपणे घोषित केले–‘सहा शतकापूर्वी आम्ही जेथे थांबलो तेथून आता पुन्हा वाटचालीला प्रारंभ करणार आहोत. मात्र जर्मन–विस्ताराची पूर्वीची युरोपच्या दक्षिणेकडील व पश्चिमेकडील दिशा बदलून आम्ही आता पूर्वेकडे वळणार आहोत. युद्धपूर्व काळातील वसाहतवादाचे धोरण सोडून देऊन आम्ही प्रादेशिक विस्ताराची नीती अंगिकारणार आहोत. नव्या प्रादेशिक

प्राप्तीबद्दल जेव्हा आम्ही बोलतो तेव्हा स्वाभाविकपणेच आमच्या मनात प्रथम विचार येतो तो रशियाचा व रशियाच्या सीमावर्ती राज्यांचा...'

एखाद्या लोहचुंबकाकडे आकर्षित व्हावे त्याप्रमाणे जागतिक प्रतिक्रियावादी व साम्रज्यवादी शक्ती बोल्शेविझमविरोधाकरिता हिटलरकडे ओढल्या गेल्या. युरोपातील जे मुत्सद्दी व लष्करवादी सोविएत रशियाविरुद्ध श्वेत रशियनांच्या कटकारस्थानांना पाठिंबा देत होते ते सर्व आता नाझीवादाचे समर्थक बनले. फ्रान्समध्ये मार्शल फॉक, पेताँ, वेगाँ यांसारखे सर्व बोल्शेविक विरोधक, बोल्शेविझमच्या त्या नव्या बलशाली शत्रूशी हातमिळवणी करण्यास इतके उतावळे झाले की नाझी उदयामुळे त्यांच्या स्वतःच्या राष्ट्राला निर्माण झालेला धोकाही त्यांच्या दृष्टीआड झाला. फिनलंडचा मॅनरहीम, हंगेरीचा हॉर्थी, झेकोस्लोवाकियाचा सिरोवी, यांबरोबर युरोपातील सोविएतविरोधी युद्धातील अनेक मोहरी आता नाझींच्या पूर्वेकडे वळणाऱ्या मोहिमेचे आघाडीचे सैनिक बनले.

हिटलर जर्मनीचा हुकुमशहा झाल्यानंतर तीन–चारच महिन्यांनी हेन्री डेटरडिंगशी खलबत करण्याकरिता अल्फ्रेड रोझेनबर्ग इंग्लंडला गेला. विंडसर कासल नजीकच्या त्या तेल सम्राटाच्या बकहर्स्ट पार्क या निवासस्थानी त्या नाझी तत्त्वज्ञाची मोठी थाटात सरबराई केली गेली. त्यावेळी ब्रिटिश टोरी पक्षात नाझींना अनुकूल असलेला व बोल्शेविकांविरुद्ध लढ्याची मागणी करणारा एक शक्तिशाली गट अगोदरच संघटित झाला होता.

२८ नोव्हेंबर १९३३ रोजी रॉदरमिअरच्या 'डेली मेल'ने, ज्या एका मुद्याला धरून ब्रिटनची परराष्ट्र नीती लवकरच साकार होणार होती, त्याचे सूतोवाच केले. तो म्हणाला–'जर्मनीचे कणखर नाझी तरुण हे साम्यवादाविरुद्धचे युरोपचे रक्षणकर्ते आहेत. हातपाय हलवायला जर्मनीला थोडी जास्तीची जागा मिळालीच पाहिजे. जर्मनीचा उसळून येत असलेला उत्साह, संघटन कौशल्य व लष्करी सामर्थ्य बोल्शेविक रशियाच्या विरोधात वळविले तर पाश्चिमात्यांच्या सुसंस्कृत जगात रशियाचे पुनरागमन शक्य होईल व मग जागतिक व्यापारही भरभराटीला येईल.'

बोल्शेविक विरोधी व लोकशाही विरोधी सर्व गट व श्वेत प्रतिक्रांतिवादी शक्ती, युरोपातील लोकशाही चिरडून टाकण्याकरिता, सोविएत रशियावर हल्ला करण्याकरिता व शेवटी, सर्व जगावर प्रभुत्व प्रस्थापित करण्याकरिता, नाझींच्या नेतृत्वाखाली एका आंतर्राष्ट्रीय शक्तीत संघटित होणार होत्या.

परंतु त्याही काळात, नाझी केवळ बोल्शेविझमविरोधाला उभे ठाकले म्हणून त्यांचे सर्व गुन्हे व दुष्कृत्ये खपवून घेण्याची तयारी नसलेले काही दूरदृष्टीचे मुत्सद्दी पाश्चात्य लोकशाही राष्ट्रांत होते सतत पंधरा वर्षे सोविएत रशियाविरुद्ध चालविण्यात आलेल्या युद्धाने युरोपच्या मध्यभागी जणू एक भस्मासूर पोसला गेला होता व त्यामुळे आता सर्व स्वतंत्र राष्ट्रांच्या शांततेला व सुरक्षिततेला धोका निर्माण झाला होता.

अनुक्रमणिका

जर्मनीच्या रस्त्यांवरून आपले दंडुके फिरवीत व ‘आज जर्मन राष्ट्र आमचे आहे, उद्या सारे जग आमचे होणार आहे’ अशा अर्थाचे गीत गात हिटलरचे धडक सैनिक संचलन करीत हिंडू लागले, तेव्हा हिटलर व नाझीझम यांविरुद्ध धोक्याचा इषारा देणारा एक बुलंद इंग्लिश आवाज इंग्लंडच्या राजकीय क्षेत्रात ऐकू आला. आश्चर्य असे की तो आवाज होता विन्स्टन चर्चिलचा—कट्टर बोल्शविझमविरोधक टोरी नेत्याचा!

डिसेंबर १९३३ मध्ये एकदमच, मोठ्या नाट्यपूर्ण रित्या चर्चिलने त्याच्या टोरी सहकाऱ्यांची साथ सोडली; व ब्रिटिश साम्राज्यापुढे उभा ठाकलेला एक गंभीर धोका म्हणून नाझीवादाचा त्याने उघडपणे धिःक्कार केला. नाझी हे साम्यवादाविरुद्ध युरोपचे रक्षणकर्ते आहेत या रॉदरमिअरच्या विधानाला उत्तर म्हणून चर्चिल म्हणाला—

‘आज जर्मनीच्या रस्त्यांवर मोठ्या दिमाखात लष्करी शिस्तीत मिरविणाऱ्या ह्या ट्यूटॉनिक तरुणांच्या तुकड्या शस्त्रास्त्रांच्या शोधात आहेत. ती शस्त्रे एकदा त्यांना मिळाली की महायुद्धानंतर जर्मनीने गमावलेले प्रदेश व वसाहती परत मिळाव्यात अशी मागणी ते करू लागतील. आणि तसे झाले की युरोपातील प्रत्येक राष्ट्राच्या हृदयाचा थरकांप होईल; कदाचित काही राष्ट्रांचा पूर्ण चुराडा होऊन जाईल.’

नाझी जर्मनीविरुद्ध ब्रिटनने फ्रान्सशी, एवढेच नव्हे तर सोविएत संघाशीही युती करावी असे आवाहन चर्चिलने केले. त्याबरोबर, बोल्शेविकविरोधाचा एक मान्यवर नेता म्हणून ज्यांनी पूर्वी चर्चिलचा उदोउदो केला होता त्याच लोकांनी एक ‘देशद्रोही’ व ‘युद्धखोर’ अशी त्याची संभावना करून त्याचा धिःक्कार केला.

नाझींच्या उदयाबरोबर एका युगाचा अंत झाला असल्याची जाणीव असलेला दूरदृष्टीचा आणखी एक नेता अटलांटिक महासागरापलीकडे होता—अमेरिकेचा अध्यक्ष फ्रँकलिन डेलानो रूझवेल्ट. त्याच्या पूर्वाधिकाऱ्याने—हर्बर्ट हूवरने चालविलेली सोविएतविरोधी नीती, जर्मनीत नाझी सत्तेवर येताच त्याने सोडून दिली व १६ नोव्हेंबर १९३३ रोजी अमेरिका व सोविएत संघ या राष्ट्रांत राजनैतिक संबंध प्रस्थापित केले. त्याच दिवशी मॅक्झिम लिटविनोव याला पाठविलेल्या पत्रात रूझवेल्टने लिहिले—“आपल्या दोन्ही देशात नव्याने निर्माण झालेले संबंध सदैव सलोख्याचे व मित्रत्वाचे राहतील, व ही दोन्ही राष्ट्रे परस्परांचे हित व जागतिक शांतता याकरिता एकमेकांशी पूर्णपणे सहकार्य करतील असा मला विश्वास आहे.’

सत्तेवर आल्यानंतर एक वर्षाच्या आत नाझी जर्मनी राष्ट्रसंघातून बाहेर पडले. आंतर्राष्ट्रीय संघटनेतील ती जागा सोविएत संघाने घेतली.

एका नव्या युगाला प्रारंभ झाला होता. चित्तथरारक व अकल्पनीय अशा राष्ट्रद्रोहाचे, व दहशतवाद, असीम क्रौर्य, सामूहिक हत्या फसवणूक, कपट, कटकारस्थाने यावर आधारलेल्या गुप्त राजनीतीचे ते युग होते. मानवी इतिहासात त्याला तोड नव्हती.

त्याचे पर्यवसान दुसऱ्या महायुद्धात होणार होते.

अनुक्रमणिका

प्रकरण १५

# राष्ट्रद्रोहाचा मार्ग

### क्रांतिकारकांतील बंडखोर

जर्मनीत हिटलर सत्तारूढ झाल्या क्षणापासूनच आंतर्राष्ट्रीय प्रतिक्रांतीवाद हा नाझींच्या जग जिंकण्याच्या योजनेचा एक अविभाज्य अंग बनला. सोविएत क्रांतीनंतरच्या १५ वर्षांच्या काळात ज्या प्रतिक्रांतीवादी शक्ती क्रियाशील होत्या त्या सर्व शक्तींना, युरोपातील प्रत्येक देशात, हिटलरने संघटित केले. लवकरच त्या शक्तींचे रूपांतर नाझीकरिता कारवाया करणाऱ्या पंचमस्तंभात झाले; व ते पंचमस्तंभीय जर्मन युद्धयंत्रणेचे बिनीचे सैनिक ठरले.

त्यापैकी सर्वात शक्तिशाली व प्रभावी पंचमस्तंभ रशियात कार्यरत होता. मानवी इतिहासात ठळकपणे डोळ्यात भरण्याजोगा कुऱ्हाडीचा दांडा ठरलेला एक माणूस त्यांचा नेता होता. त्याचे नाव होते लिआँ ट्रॉट्स्की!

तिसऱ्या जर्मन राष्ट्राचा उदय होण्यापूर्वीच लिआँ ट्रॉट्स्की हा बोल्शेविक विरोधी आंतर्राष्ट्रीय कटाचा नेता बनला होता; व त्या कटाचा एक शक्तिशाली गट सोविएत संघात गुप्तपणे क्रियाशील होता चर्चिल त्याच्या 'ग्रेट कॉन्टेम्पोररीज' मध्ये म्हणतो—एक काळ असा होता की ट्रॉट्स्की रोमानोव झारांच्या रिकाम्या पडलेल्या—सिंहासनानजिक जाऊन पोचला होता; सत्ता अगदी हातात आलीच असे त्याला वाटू लागले होते. पण तसे होणे तर दूरच, १९२८ मध्ये तो हद्दपार झाला होता. आणि आता हद्दपार झालेला ट्रॉट्स्की, सोविएत सरकार उलथून पाडून ती सत्ता काबीज करण्याकरिता हद्दपारीतून कटकारस्थाने करीत होता.'

१९१९—१९२० च्या सुमारास जगातील सर्व वृत्तपत्रे ट्रॉट्स्कीचा 'लाल नेपोलियन' असा गौरवाने उल्लेख करीत होती. त्यावेळी तो युद्धमंत्री होता. मोठा ऐटदार लष्करी कोट, चमकते बूट, कमरेला पिस्तूल अशा थाटात लाल सैनिकांसमोर ज्वलज्जहाल भाषणे करीत तो युद्ध आघाड्यांचा दौरा करी. एका चिलखती रेल्वे गाडीतच त्याने आपले मध्यवर्ती कार्यालय थाटले होते. खास तयार करवून घेतलेल्या गणवेशातील सशस्त्र अंगरक्षकांचा त्याच्या भोवती सतत गराडा असे. लष्करी अधिकाऱ्यांत, बोल्शेविक पक्षात व सोविएत सरकारात त्याने आपला स्वतंत्र फुटीर गट तयार केला होता. ट्रॉट्स्कीची रेल्वेगाडी, ट्रॉट्स्कीचे अंगरक्षक, ट्रॉट्स्कीची भाषणे ट्रॉट्स्कीची चेहेरपट्टी, त्याची काळीभोर झुलपे, त्याची छोटीशी टोकदार दाढी व

चष्म्याआडून लुकलुकणारे त्याचे तीक्ष्ण डोळे हे सर्वच जगप्रसिद्ध होते. लाल लष्कराला मिळालेल्या विजयाचे सर्व श्रेय युरोपात व अमेरिकेत ट्रॉट्स्कीच्या नेतृत्वाला दिले जात होते.

मास्को येथील एका विराट सभेत भाषण देण्यास ट्रॉट्स्की आला असता एक अमेरिकन पत्रकाराने त्याचे केलेले वर्णन त्याच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारे आहे. आयझॅक एफ. मार्कोसन म्हणतो— ‘भाषणाकरिता तो (ट्रॉट्स्की) सभास्थानी आला तो एखाद्या नटाने मोठ्या नाट्यपूर्ण रीत्या रंगमंचावर प्रवेश करावा तसा,—श्रोत्यांना काही वेळ तिष्ठत ठेवत—त्यांची अधीरता पुरेशी वृद्धिंगत झाल्यानंतर! ट्रॉट्स्कीच्या आगमनाबद्दलची अपेक्षायुक्त उत्कंठा हजारो श्रोत्यांच्या कुजबुजीतून प्रतिबिंबित होत होती. सभास्थानी येताच झपाझप पावले टाकीत तो व्यासपीठावर चढला. त्याचा आवाज मोठा सखोल व भरदार होता. त्याचे व्यक्तिमत्त्व व भाषण यामुळे काही लोक प्रभावित होत होते तर इतरांवर मात्र नेमका उलटा परिणाम होत होता. एखाद्या धबधब्याप्रमाणे त्याचे शब्द श्रोत्यांच्या कानी आदळत होते. नाट्यपूर्ण वक्तृत्वाचा असा प्रकार मी पूर्वी कधी पाहिला नव्हता. अहंकार व औधत्य त्याच्या भाषणातून ओसंडून वाहात होते.’

१९२९ मध्ये ट्रॉट्स्की हद्दपार झाल्यानंतर जगातील सोविएत विरोधकांनी त्याच्या व्यक्तिमत्त्वाभोवती अनेक कपोलकल्पित कथांचे वलय उभे केले. ‘रशियनक्रांतीचा असाधारण कर्तृत्वाचा एक महान नेता,’ ‘लेनिनचा स्तूर्तिदाता’, ‘लेनिनचा निकटचा सहकारी व तार्किक दृष्ट्या त्याचा वारस,’ असे त्याचे वर्णन सर्वत्र करण्यात येत होते.

खुद्द लेनिनचे ट्रॉट्स्कीबद्दलचे मत मात्र याहून अगदीच भिन्न होते. ‘एकीकडे डाव्या गटाची भाषा बोलत असता दुसरीकडे त्याच वेळी डाव्यांविरुद्ध उजव्यांचा गट संघटित करणारा’ असा त्याच्याबद्दल उल्लेख लेनिनने, आपल्या फेब्रुवारी १९१७ च्या लिखाणात केला आहे. ट्रॉट्स्की हा रशियन क्रांतीचा ‘जुडास’ आहे असे लेनिन म्हणे. [रशियन क्रांतिपूर्वीच्या चळवळीच्या काळातील ट्रॉट्स्कीच्या भूमिकेबद्दल लेनिनने अधूनमधून केलेल्या भाष्यातून त्याचे ट्रॉट्स्कीबद्दलचे मत स्पष्ट होते. १९११:-‘१९०३ मध्ये ट्रॉट्स्की एक मेन्शेविक होता. १९०४ मध्ये त्याने मेन्शेविकांची साथ सोडली. पण पुन्हा १९०५ मध्ये तो त्यांना जाऊन मिळाला. काही काळ जहाल क्रांतिकारी भाषणे देत तो इकडे तिकडे फिरला पण १९०६ मध्ये त्याने पुन्हा मेन्शेविकांशी फारकत घेतली कधी या तर कधी दुसऱ्या एखाद्या गटाच्या कल्पना उचलून तो बोलत असतो; व तसे करीत असता स्वतःला मात्र त्या दोहोंपेक्षा श्रेष्ठ समजतो. ट्रॉट्स्की खऱ्या अर्थाने फक्त एकाच गटाचा आहे—त्याच्या स्वतःच्या! .’ १९११:—‘नुसते शब्दांचे अवडंबर माजवून आवेशपूर्ण भाषणे देत मिरविणारे ट्रॉट्स्कीसारखे लोक म्हणजे आजच्या जगाला भेडसावणारी एक रोगराई आहे. त्याला पाठिंबा देणे म्हणजे ढोंगीपणा व कामगारांची फसवणूक यांना पाठिंबा देण्यासारखे आहे. कामगारांच्या डोळ्यात धूळ फेकणे हेच एक काम ट्रॉट्स्की आजपर्यंत करीत आला आहे. त्याला स्वतःची अशी काही ठाम मते नसल्याने कोणत्याही मूलभूत मुद्यावर त्याच्याशी चर्चा करणे अशक्यच आहे. अगदी कमालीच्या हीन दर्जाचे राजकारण तो आज करीत आहे.’ १९१२:—‘ट्रॉट्स्की म्हणजे तत्त्वशून्यपणा, ढोंगीपणा व अर्थशून्य शब्दावडंबर! पोकळ क्रांतिकारी शब्दप्रयोगाद्वारा त्याच्या तत्त्वशून्यतेवर पांघरूण घालण्याचा त्याचा प्रयत्न असतो.’ १९१४:—‘ट्रॉट्स्की कसा आहे हे मार्क्सवादी चळवळीतील जुने कार्यकर्ते चांगले ओळखून आहेत. पण कामगारवर्गाच्या तरुण पिढीला मात्र त्याबद्दल काही माहिती नसल्याने सत्य काय ते त्यांच्यासमोर मांडणे आवश्यक आहे. मार्क्सवादासंबंधित कोणत्याही प्रश्नाबद्दल त्याची निश्चित अशी काही मते नाहीत कोणत्याही मुद्यावर दुमत झाले की तो एका बाजूकडून दुसरीकडे दोलायमान होत असतो. दिखाऊ समाजवादी देशभक्तांशी तो तत्त्वतः विरोध दर्शवितो, पण प्रत्यक्ष व्यवहारात मात्र तो त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून चालतो.’]

अनुक्रमणिका

जन्माने कोणीही राष्ट्रद्रोही नसतो. तो स्वार्थाने तसा बनतो. बेनिटो मुसोलिनी, पियरे लावेल, पॉल जोसेफ गोबेल्स, वँग चिंग-वै यांसारख्या आधुनिक काळातील कुप्रसिद्ध साहसी लोकांप्रमाणे ट्रॉट्स्कीच्या जीवनक्रमाला सुरुवात रशियाच्या क्रांतिकारी चळवळीतील एक अती डावा कार्यकर्ता म्हणून झाली.

ट्रॉट्स्की हे त्याचे टोपण नाव होते. त्याचे खरे नाव होते. लेव दाविदोविच ब्रोन्स्टीन. १८७९ मध्ये दक्षिण रशियातील यानोव्का या लहानशा खेड्यात मध्यमवर्गीय सुखवस्तू कुटुंबात त्याचा जन्म झाला. त्याची पहिली महत्त्वाकांक्षा होती ते लेखक बनण्याची. परंतु विद्यार्थी दशेतच एका अपरिपक्व जहाल गटात तो सामील झाला. वयाच्या अठराव्या वर्षी त्याला झारशाही पोलिसांनी डाव्या जहाल गटाचे प्रचारसाहित्य वाटण्याच्या गुन्ह्याकरिता पकडले व इतर शेकडो विद्यार्थी व क्रांतिकारक याबरोबर सैबेरियात हद्दपार केले. १९०२ च्या शरदात तो तेथून निसटला व त्याने रशिया सोडले. योगायोग असा की यानंतर त्याच्या जीवनाचा बराचसा काळ, कटकारस्थाने करणारा एक चळवळ्या म्हणून श्वेत रशियन निर्वासितांबरोबर निरनिराळ्या युरोपीय राष्ट्रांत व्यतीत होणार होता.

१९०३ च्या पूर्वार्धात, लंडनमध्ये लेनिन संपादित करीत असलेले मार्क्सवादी वृत्तपत्र 'इस्क्रा' याच्या संपादक मंडळावर त्याने काही महिने काम केले. १९०३ च्या ग्रीष्मात रशियन मार्क्सवादी चळवळ बोल्शेविक व मेन्शेविक अशा दोन गटात फुटली तेव्हा ट्रॉट्स्की लेनिनच्या राजकीय विरोधकांना—मेन्शेविक गटाला जाऊन मिळाला. त्याचे आकर्षक व्यक्तिमत्त्व, साहित्यिक गुणवत्ता व प्रभावी वक्तृत्व यामुळे एक बुद्धीवान तरुण मेन्शेविक कार्यकर्ता म्हणून तो लवकरच प्रसिद्ध झाला. ब्रुसेल्स, पॅरिस, लीज, स्वित्झर्लंड, जर्मनी येथे दौरे करून तेथील जहाल गटाच्या रशियन विद्यार्थ्यांसमोर तो भाषणे देऊ लागला; व झारशाहीविरुद्ध लढा देण्याकरिता अत्यंत शिस्तबद्ध व सुसंघटित असा क्रांतिकारी पक्ष प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत असलेल्या लेनिनवर व बोल्शेविक पक्षावर तो कडाडून हल्ला करू लागला. 'लेनिन रशियन जहालांवर 'बराकी शिस्त' लादण्याचा प्रयत्न करीत आहे,' 'तो आपल्या पक्षातील प्रतिक्रियावादी गटाचा नेता आहे' असे आरोप तो लेनिनवर करू लागला

रशिया—जपान युद्धात रशियाचा पराभव झाल्यानंतर १९०५ मध्ये रशियन कामगार व शेतकरी यांनी क्रांतीचा पहिला प्रयत्न केला, त्यावेळी घाईघाईने ट्रॉट्स्की रशियात परत आला व मेन्शेविक नियंत्रणाखाली असलेल्या सेंट पीटर्सबर्ग सोविएतचा प्रमुख सदस्य बनला. कटकारस्थाने, राजकीय संघर्ष व सत्ता हाती येण्याची शक्यता या सर्व वातावरणात ट्रॉट्स्कीला आपला सूर गवसल्यासारखे वाटले. वयाच्या सव्विसाव्या वर्षी मिळालेल्या त्या अनुभवातून, रशियन क्रांतीचे नेतृत्व त्यानेच करावे अशीच दैवी योजना आहे अशी त्याची पक्की खात्री पटली. त्याचे 'दैव,' त्याचे 'नशीब', त्याचा 'क्रांतिकारी आंतर—आवाज' अशा शब्दात तो स्वतःबद्दल बोलू लागला. बऱ्याच वर्षानंतर, १९०५ च्या अनुभवांबद्दल त्याच्या आत्मचरित्रात तो लिहितो—

"१९०५ च्या फेब्रुवारीत मी रशियात आलो. अन्य रशियन निर्वासित त्यानंतर बऱ्याच उशीरा आले. त्या माझ्या रशियन क्रांतिकारी साथीदारांत ज्याच्याकडून मला काही शिकता येईल असा कोणीही नव्हता.

अनुक्रमणिका

उलट मलाच त्यांच्या शिक्षकाची भूमिका बजावावी लागली. १९०५ च्या ऑक्टोबर–क्रांतीच्या त्या भयानक वादळात मी स्वतःला झोकून दिले. ती आणीबाणीची परिस्थिती म्हणजे, व्यक्तिगत दृष्ट्या, माझ्या कर्तृत्त्वाची परीक्षाच होती. सर्वत्र क्रांतीचा वणवा पेटलेला असता झटपट निर्णय घ्यावे लागत होते. त्या संदर्भात एक गोष्ट येथे नमूद केल्याशिवाय राहवत नाही; ती ही की ते निर्णय मी अगदी विनासायास घेऊ शकलो ते कोणत्या तरी अनामिक अंतःप्रेरणेमुळे! कोणतेही महत्कार्य अंतःप्रेरणेशिवाय साध्य होऊच शकत नाही. ती प्रेरणा माझ्यात असल्याची जाणीव १९०५ च्या क्रांतिवर्षाने मला करून दिली. माझ्या नंतरच्या जीवनात त्या अंतःप्रेरणेचा मला फार मोठा आधार मिळाला. कोणत्याही प्रकारची राजकीय परिस्थिती व तिचा क्रांतिकार्याशी संदर्भ अचूकपणाने जाणून तत्ससंबंधी निर्णय घेण्याबाबत माझ्याकडून एखादी चूक घडली असे कधीही झाले नाही!"

१९०५ सालची क्रांती अपयशी ठरल्यानंतर ट्रॉट्स्कीने पुन्हा रशिया सोडले. ऑस्ट्रियात येऊन व्हिएन्ना येथे त्याने आपले मध्यवर्ती कार्यालय स्थापिले. लेनिन हा 'हुकुमशाही पदाकरिता एक उमेदवार' आहे असे सांगून लेनिनवर त्याने जबरदस्त प्रचारकी हल्ला चढविला, व एक 'आंतरर्राष्ट्रीय क्रांतिकारी' म्हणून स्वतःची प्रतिमा उंचावून स्वतःच्या नेतृत्वाखाली चळवळ उभी करण्याकरिता त्याने प्रचार मोहीम सुरू केली. त्या दृष्टीने, रुमानिया, स्वित्झर्लंड, फ्रान्स, तुर्कस्थान या देशात दौरे करून, युरोपीय समाजवादी व डावे जहाल यांच्याशी, भविष्यात त्याला मोलाचे ठरणारे संबंध त्याने प्रस्थापित केले. लवकरच, रशियन क्रांतिकारी चळवळीतील लेनिनचा मुख्य स्पर्धक म्हणून आपली प्रतिमा त्याने रशियन निर्वासित, सोशल रेव्होल्यूशनरी व बोहेमियन बुद्धिवादी या गोटांत उभी केली.

२३ फेब्रुवारी १९१३ रोजी आपल्या एका रशियन मेन्शेविक मित्राला पाठविलेल्या एका खाजगी पत्रात ट्रॉट्स्की लिहितो–"लेनिनवादाची संपूर्ण उभारणी आज खोटेपणावर झालेली असून त्यातच त्याच्या विनाशाची विषारी बीजे दडलेली आहेत, रशियन कामगार चळवळीच्या अपरिपक्वतेचा फायदा घेणे हा लेनिनचा एक व्यवसायच बनला आहे.'

मार्च १९१७ मध्ये झारशाहीचे पतन झाले, त्यावेळी ट्रॉट्स्की न्यूयॉर्कमध्ये होता. तेथे कट्टर लेनिनविरोधक, डावा रशियन निर्वासित निकोलाय बुखारिन याच्या सहकार्याने तो 'न्यू वर्ल्ड' या जहाल वृत्तपत्राचे संपादन करित होता. [१९१६ च्या अखेरी फ्रान्समधून हद्दपार करण्यात आल्याने झारशाहीच्या पतनाच्या दोनच महिने अगोदर ट्रॉट्-स्की अमेरिकेला पोहोचला होता. बुखारिन ऑस्ट्रियातून त्यापूर्वीच अमेरिकेत आला होता.] मार्च–राज्यक्रांतीची बातमी कळताच घाईघाईने तो रशियात जाण्यास निघाला. वाटेत हॅलिफॅक्स येथे त्याला कॅनडाच्या अधिकाऱ्यांनी पकडले. पण रशियातील हंगामी सरकारच्या विनंतीवरून त्याला मुक्त करण्यात आले; त्यानंतर तो ताबडतोब पेट्रोग्राडच्या दिशेने निघाला. ट्रॉट्स्की रशियात गेला तर लेनिन–ट्रॉट्स्की मतसंघर्षाचा फायदा करून घेता येईल असे ब्रिटिश गुप्तहेरखात्याला वाटल्याने ट्रॉट्स्कीला रशियात जाऊ देण्याचे ब्रिटिश सरकारने ठरविले अशी नोंद त्या खात्याचा हस्तक ब्रूस लॉकहार्ट याने आपल्या स्मृतिचित्रात केली आहे, [ट्रॉट्स्कीसंबंधीचे ब्रिटिश सरकारचे ते धोरण काहीसे चुकीचेच ठरले असे भाष्य या संदर्भात ब्रूस लॉकहार्टने केले आहे. तो म्हणतो–पहिल्या राज्यक्रांतीच्या वेळी एक हद्दपार म्हणून तो अमेरिकेत होता. त्यावेळी तो मेन्शेविकही नव्हता व बोल्शेविकही नव्हता. लेनिन म्हणत असे त्याप्रमाणे तो

अनुक्रमणिका

फक्त होता ट्रॉट्स्काईट! ; म्हणजेच केवळ एक व्यक्तिवादी, एक संधीसाधू! एक चांगला पक्ष कार्यकर्ता होणे हे त्याच्याबाबतीत अशक्यच होते. मार्च–क्रांतीपूर्वीच्या त्याच्या वागणुकीमुळे लेनिनने अत्यंत कठोर शब्दात त्याची निर्भत्सना केली होती. १९१७ च्या वसंतात त्याला रशियात येऊ देण्याबद्दल केरेन्स्कीने ब्रिटिश सरकारला विनंती केली. नेहमीप्रमाणे त्याही वेळी आमचे रशियाबाबतचे धोरण धरसोडीचे ठरले. प्रारंभी एखाद्या गुन्हेगाराप्रमाणे हॅलिफॅक्स येथे आम्ही त्याला तुरुंगात डांबले; आणि त्यामुळे त्याच्या मनात आमच्याबद्दल द्वेष व संताप दाटल्यानंतर सोडून देऊन आम्ही त्याला रशियात जाऊ दिले.]

मे १९१७ मध्ये ट्रॉट्स्की पेट्रोग्राडला पोहोचला. पूर्वीचे रशियन निर्वासित व निरनिराळ्या जहाल पक्षातील अती डावे गट एकत्रित करून स्वतःच्या नेतृत्वाखाली एक वेगळा क्रांतिकारी पक्ष प्रस्थापित करण्याचा त्याने सुरुवातीला प्रयत्न करून पाहिला. परंतु तो फलदायी झाला नाही. क्रांतिकारी जनसामान्यांचा पाठिंबा बोल्शेविक पक्षालाच होता हे लवकरच त्याला कळून चुकले. त्यामुळे ऑगस्ट १९१७ मध्ये ट्रॉट्स्कीने राजकीय दृष्ट्या पुन्हा मोठी आश्चर्यजनक पालटी खाल्ली. १४ वर्षे सातत्याने लेनिनवर व बोल्शेविक पक्षावर ज्वलज्जहाल टीका केल्यानंतर एकाएकी त्याने बोल्शेविक पक्षाच्या सदस्यत्वाकरिता अर्ज केला.

वस्तुतः ट्रॉट्स्की व त्याची असीम वैयक्तिक महत्त्वाकांक्षा याबद्दल लेनिनने अनेकदा बोल्शेविक पक्षाला सावधगिरीचा इषारा दिला होता. पण आता सोविएत सरकारच्या प्रस्थापनेकरिता आणीबाणीचा संघर्ष करण्याची वेळ येऊन ठेपली असता सर्व क्रांतिकारी गटांची व पक्षांची एकजूट करून संयुक्त आघाडी निर्माण करणे लेनिनला अगत्याचे वाटत होते. ट्रॉट्स्की एका क्रांतिकारी गटाचा प्रवक्ता होता; आणि एक लेनिन वगळता अन्य कोणत्याही रशियन क्रांतिकारकापेक्षा ट्रॉट्स्कीचेच नाव रशियाबाहेर सर्वश्रुत होते. त्याची ओघवती, प्रभावी वाणी व संघटनकौशल्य या गुणांचा फार मोठा उपयोग क्रांतिकार्यात बोल्शेविक पक्षाकरिता करून घेता येणे शक्य होते. शिवाय त्याला बोल्शेविक पक्षात सामावून न घेतले तर त्या पक्षाला प्रभावी विरोधक निर्माण झाला असता. या कारणांमुळे ट्रॉट्स्कीने पक्षसदस्यत्वाकरिता केलेला अर्ज मंजूर करण्यात आला.

त्याच्या नेहमीच्या पद्धतीनुसार त्याचा बोल्शेविक पक्षप्रवेशही मोठ्या धडाक्यात झाला. तोपर्यंत निरनिराळ्या कारणांनी विखुरलेल्या भिन्न गटांतील सर्व डाव्यांना घेऊन त्याने पक्षात प्रवेश केला एका मोठ्या शक्तीशी तडजोड केल्याचाच भास आपल्याला ट्रॉट्स्कीच्या पक्षप्रवेशाने झाला असे लेनिनने त्यावेळी गमतीने म्हटले होते.

१९०५ मध्ये ज्या पेट्रोग्राड सोविएतच्या सदस्य म्हणून क्रांतिकारी चळवळीत ट्रॉट्स्कीने पदार्पण केले होते, त्या पेट्रोग्राड सोविएतचा तो आता पुन्हा अध्यक्ष बनला. ऑक्टोबर क्रांती होईपर्यंतच्या त्या आणीबाणीच्या काळात तो त्याच पदावर होता. क्रांतीनंतर बोल्शेविक्स, डावे सोशल रेव्होल्यूशनरी व पूर्वीचे मेन्शेविक्स यांचे मिळून पहिले सोविएत सरकार प्रस्थापित झाले, त्यावेळी त्या सरकारात तो परराष्ट्र मंत्री बनला. परदेशी भाषांचे त्याला असलेले ज्ञान व परराष्ट्रातील अनेकांशी त्याच्या असलेल्या ओळखी यामुळे त्या पदाकरिता त्याची निवड झाली होती.

अनुक्रमणिका

प्रारंभी परराष्ट्रमंत्री म्हणून व नंतर युद्धमंत्री म्हणून लवकरच, बोल्शेविक पक्षातील तथाकथित डाव्या विरोधकांचा ट्रॉट्स्की हा प्रमुख प्रवक्ता बनला. [परराष्ट्र मंत्री म्हणून ब्रेस्त लितोवस्क कराराच्या वेळी ट्रॉट्स्कीने विरोधकी स्वरूपाची कार्यवाही केल्याने (प्रकरण २ मध्ये तपशील आहे) त्या पदावरून त्याला दूर करण्यात आले, तेव्हा ब्रेस्त लितोवस्क येथे लेनिनला विरोध करण्यात आपली चूक झाली अशी उघड कबुली त्याने दिली; व लेनिनशी बिनशर्त सहकार्य करण्याची तयारी दर्शविली. तेव्हा, त्याच्या वक्तृत्वाचा व संघटन कौशल्याचा उपयोग होऊ शकेल असे युद्धमंत्र्याचे पद त्याला देण्यात आले. लष्करी डावपेच व व्यावहारिक नेतृत्व वस्तुतः त्यावेळी स्टालिन, फ्रुन्झ, वोरोशिलोव, किरोव, शोर्स व बुद्येनी यांच्याकडे होते. परंतु झारकालीन लष्करी तज्ज्ञांच्या सल्ल्यावर विसंबून ट्रॉट्स्कीने स्वतःच्या अधिकाराचे अतिक्रमण करून, अनेकदा बोल्शेविक पक्षाच्या केंद्रीय समितीच्या लष्करी निर्णयांना विरोध केला. त्याच्या एकतंत्री हुकुमशाही वागणुकीचा प्रतिकार करणाऱ्या, युद्ध आघाडीवरील बोल्शेविक लष्करी प्रतिनिधींना तर देहदंडाची शिक्षा देण्यापर्यंत त्याची मजल गेली; तेव्हा केंद्रीय समितीला तो अनर्थ टाळण्याकरिता मध्यस्थी करावी लागली.

१९१९ च्या ग्रीष्मात, पूर्वेकडे कोलचॅकचा धोका उरलेला नाही असे ठामपणे सांगून त्या आघाडीवरील लाल लष्कर डेनिकिनविरुद्ध दक्षिणेत पाठविले जावे अशी सूचना ट्रॉट्स्कीने केली. परंतु तसे केल्यास कोलचॅकला आपले सैन्य पुन्हा संघटित व सुसज्ज करण्यास वेळ दिल्यासारखे होईल; उरल क्षेत्रातून लाल लष्कर माघारी गेले तर तेथील उद्योगधंदे, दळणवळण यावर कोलचॅकचे नियंत्रण प्रस्थापित होईल व मग त्या क्षेत्रातील धनिक शेतकऱ्यांना त्याच्या बाजूला वळवून घेऊन बोल्गाच्या दिशेने चालून येणे त्याला सहज शक्य होईल, हे केंद्रीय समितीचा लष्करी प्रतिनिधी म्हणून स्टालिनने स्पष्ट केले. स्टालिनचा तर्कवाद सयुक्तिक वाटल्याने केंद्रीय समितीने ट्रॉट्स्कीची सूचना अमान्य केली. त्याबरोबर संतप्त होऊन पूर्वेकडील मोहिमेत सहभागी होण्याचे त्याने नाकारले. शेवटी कोलचॅकचा निर्णायक पराभव त्या पूर्वेकडील मोहिमेतच झाला. त्यामुळे स्टालिनचे मतच सयुक्तिक होते हे सिद्ध झाले.

१९१९ च्या अखेरी डेनिकिनविरुद्धच्या मोहिमेची योजना ट्रॉट्स्कीने आखली. त्याकरिता डॉनच्या गवताळ माळरानातून लाल लष्कराने आगेकूच करावी अशी त्याने सूचना केली. परंतु त्या क्षेत्रात रस्ते तयार झालेले नव्हते व कोसॅक प्रतिक्रांतिकारकांच्या बऱ्याच तुकड्या तेथे क्रियाशील होत्या. त्यावेळी केंद्रीय समितीने, दक्षिणेकडील मोहिमेसंबंधी प्रत्यक्ष पाहणी करण्याकरिता स्टालिनला मुद्दाम दक्षिणेत पाठविले होते. त्याने ट्रॉट्स्कीच्या त्या सूचनेला विरोध केला, व लाल लष्कराने डॉन क्षेत्राऐवजी दोनेत्स क्षेत्रातून आगेकूच करावी अशी सूचना केली. कारण दोनेत्स क्षेत्रात रेल्वेचे जाळे पसरलेले असल्याने दळणवळण सुलक्ष होणार होते. शिवाय तेथून होणारा कोळशाचा पुरवठा व तेथील कामगार वर्गाची बोल्शेविकांप्रती असलेली सहानुभूती या गोष्टीही लाल लष्कराच्या हालचालींना अनुकूल ठरणार होत्या. या सर्व बाबी विचारात घेऊन केंद्रीय समितीने स्टालिनची सूचना उचलून धरली. दक्षिण आघाडीवरून ट्रॉट्स्कीला दूर करण्यात आले. एवढेच नव्हे तर दक्षिणेकडील लष्करी कार्यवाहीत ढवळाढवळ न करण्याबद्दल त्याला सक्त ताकीद देण्यात आली. अखेरी स्टालिनच्या योजनेचा अवलंब होऊनच डेनिकिनचा पराभव झाला.

युद्धमंत्री ट्रॉट्स्कीच्या निकटच्या सहकाऱ्यात प्रमुख होता तो झारकालीन अधिकारी कर्नल वात्झेनिस. ट्रॉट्-स्कीबरोबर कोलचॅकविरुद्धच्या मोहीमात सरसेनापती म्हणून त्याने काम केले होते. लाल लष्कराच्या उच्चाधिकाऱ्यांविरुद्धच्या कटकारस्थानात त्याचा हात असल्याचे नंतर सिद्ध झाल्याने त्याला त्या पदावरून दूर करण्यात आले. तरीही 'माय लाईफ' या त्याच्या आत्मचरित्रपर ग्रंथात ट्रॉट्स्कीने त्याबाबत नोंद केली ती अशी–'सोविएत मंत्री किंवा केंद्रीय समिती यांची दखलही न घेता हुकुम सोडायची वात्झेनिस यास सवय होती. त्याच्या कारवाया व त्याचे लागेबाधे संशयास्पद असल्याच्या कारणाने त्याला नोकरीवरून काढून टाकणे भाग पडले. परंतु त्या आरोपात फारसे गंभीर असे तथ्य नव्हते.']

हे विरोधक अल्पसंख्य असले तरी त्यापैकी बरेच उत्कृष्ट वक्ते व संघटक होते. परराष्ट्रांतील काही पुढाऱ्यांशी, तसेच रशियातील मेन्शेविकांशी व सोशल रेव्होल्यूशनरींशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. क्रांतीच्या त्या सुरुवातीच्या काळात लष्करात, राजनैतिक क्षेत्रात व शासनाच्या कार्यकारी शाखेत त्यांनी महत्त्वाची पदे मिळविली होती.

विरोधकांच्या नेतृत्वात, ट्रॉट्स्कीशिवाय आणखीही दोन महत्त्वाचे फुटीर नेते होते. एक म्हणजे निकोलाय बुखारिन. तो स्वतःला मार्क्सवादाचा तत्त्ववेत्ता मानीत असे. तो तथाकथित डाव्या साम्यवाद्यांचा

नेता होता. दुसरा म्हणजे ग्रेगोरी झिनोवीव. ट्रॉट्स्कीचा मेहुणा लिओ कामेनेव याच्या सहकार्याने त्याने आपला एक वेगळाच गट संघटित केला होता. त्या गटाचे नेतृत्व झिनोवीव करीत असल्याने त्या गटाला 'झिनोवीवाईट्स्' म्हणत. ट्रॉट्स्की, झिनोवीव व कामेनेव यात आपआपसात अनेकदा स्पर्धा, असूया, महत्त्कांक्षा यामुळे तीव्र मतभेद व कलह होत. परंतु लेनिनला दूर करून सोविएत सत्तेवर त्यांचे नियंत्रण प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नात मात्र ते तिघेही एक होत.

ट्रॉट्स्कीच्या स्वतःच्या अनुयायात प्रमुख होते ते युरी प्यातकोव, कार्ल रादेक, निकोलाय क्रेस्टिन्स्की, ग्रेगोरी सोकोल्निकोव, व ख्रिश्चन रोकोवस्की. युक्रेनमधील एका धनाढ्य कुटुंबात जन्मलेला प्यातकोव डाव्या जहाल पक्षात सामील झाला होता. तीक्ष्ण बुद्धीचा कार्ल रादेक हा पोलीश वृत्तपत्रकार असून स्वित्झर्लंडमधून ट्रॉट्स्की लेनिनवर करीत असलेल्या टिकेच्या हल्ल्यात त्याचा सहकारी होता ग्रेगोरी सोकोल्निकोव. ह्या ट्रॉट्स्कीच्या हस्तकाने परराष्ट्र मंत्रालयात शिरकाव करून घेतला होता. रोकोवस्की जन्माने वल्गार होता, धनाढ्य होता. बरीच वर्षे युरोपच्या निरनिराळ्या राष्ट्रांत त्याने व्यतीत केली होती व १९१८ च्या युक्रेनियन उठावात त्याने मोलाची कामगिरी बजावली होती.

युद्धमंत्री म्हणून ट्रॉट्स्कीने आपल्याभोवती त्याला सर्वस्वी एकनिष्ठ राहतील अशा अनुयायांचा गट निर्माण केला होता. तसेच झारकालीन अनेक अधिकारी त्याचे मित्र होते; व बोल्शेविक पक्षाने तत्संबंधी अनेकदा नापसंती व्यक्त केलेली असूनही ट्रॉट्स्कीने त्यांना महत्त्वाच्या लष्करी पदांवर नेमले होते. त्यापैकी, १९२० च्या पोलंडविरुद्धच्या मोहिमेत त्याचा सहकारी असलेला व नेपोलियनसारखी लष्करी महत्त्वाकांक्षा असलेला झारकालीन अधिकारी मिखाईल निकोल्येविच तुखाचेवस्की हा प्रमुख होता. या सर्व विरोधकांचे एकच उद्दिष्ट होते—लेनिनला दूर करून सोविएत रशियाची सत्ता काबीज करणे.

श्वेत रशियनांचा व परकीय हस्तक्षेपवाद्यांचा यादवी युद्धात पराभव झाल्यानंतर लेनिन व रशियन यांपुढे मुख्य प्रश्न होता तो सोविएत सरकारची नीती निश्चित करण्यासंबंधीचा. मागासलेल्या रशियात समाजवादाची उभारणी करणे अशक्य आहे असे ट्रॉट्स्की, बुखारिन, झीनोवीव यांचे पक्के मत होते. म्हणून समाजवादी क्रांती घडून आल्यानंतर रशियाने आता इतर राष्ट्रांत क्रांती घडवून आणण्याच्या प्रयत्नाला लागावे व जागतिक क्रांती घडवून आणावी असे त्यांना वाटत होते. मात्र 'जागतिक क्रांती' संबंधीचे त्यांचे शब्दांचे अवडंबर काढून फेकले तर त्यामागे स्पष्ट दिसत होती ती त्यांची सत्ता काबीज करण्याची महत्त्कांक्षा! युद्धमंत्री ट्रॉट्स्कीच्या नेतृत्वाखाली त्यांना लष्करी हुकुमशाही प्रस्थापित करावयाची होती.

डिसेंबर १९२० च्या कॉंग्रेस ऑफ सोविएत्स्मध्ये हा प्रश्न धसाला लागला. मास्कोच्या हॉल ऑफ कॉलम्स्मध्ये कॉंग्रेसची सभा भरली होती. राजधानी जणू बर्फाने गोठली होती. सर्पणाच्या टंचाईमुळे हॉलमुळे उष्णतेकरिता अग्नी चेतविण्यात आला नव्हता. फरकोट, व चामड्याचे कपडे एकावर एक चढविलेले असूनही सोविएत प्रतिनिधी थंडीने कुडकुडत होते.

अनुक्रमणिका

फान्या काप्लान हिने झाडलेल्या विषारी गोळ्यांच्या प्राणघातक हल्ल्यातून कसाबसा बचावलेला लेनिन अजून फिक्कट दिसत होता. रशियात समाजवादाची उभारणी करण्याच्या प्रश्नावरून त्याचे विरोधकांना उत्तर दिले. प्रथम त्याने रशियातील तत्कालीन गंभीर परिस्थिती विशद केली, व जागतिक क्रांतीची कल्पना अव्यहार्य व धोक्याची असून रशियातच समाजवादाची उभारणी करणे आवश्यक व शक्यही कसे आहे ते आपल्या पक्षबांधवांना पटवून सांगितले व राष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक जीवनाच्या पुनरायोजनाकरिता राष्ट्रीय ऐक्य कायम टिकविण्याचे त्याने आवाहन केले. तथाकथित युद्धकालीन समाजवादी नीतीचा त्याग करून, आर्थिक परिस्थिती त्वरेने सुधारावी या हेतूने नव्या आर्थिक धोरणाचा अवलंब करण्याबाबत घोषणाही त्याने त्या सभेत केली. त्या नीतीनुसार काही प्रमाणात खाजगी व्यापार व भांडवलशाही अर्थव्यवस्था यांना परवानगी देण्यात येणार होती. प्रगतीच्या दिशेने दोन पावले पुढे जाण्याकरिता नाईलाज म्हणून, तात्पुरत्या काळाकरिता माघारी घेतलेले ते एक पाऊल होते हे त्याने स्पष्ट केले.

नव्या आर्थिक धोरणानुसार घेण्यात येत असलेली 'तात्पुरती माघार' लेनिनने घोषित करताच ट्रॉट्स्की टवाळी करीत हळूच उद्‌गारला—'सोविएत सरकारच्या अखेरीचे कोकिळेचे कूंजन सुरू झाले म्हणायचे.' पण सोविएत पद्धतीची अखेर तर दूरच, उलट राष्ट्रउभारणीच्या कार्याला खरा प्रारंभ तेव्हापासूनच होणार होता असे लेनिनला वाटत होते. 'संपूर्ण राष्ट्राचे विद्युतीकरण होऊन उद्योग, शेती व दळणवळण या सर्व क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे मोठ्या प्रमाणावर उत्पादनाला प्रारंभ होईल तेव्हाच खऱ्या अर्थाने आपण विजय संपादन केल्यासारखे होईल, लेनिन पक्षसदस्यांना सांगत होता. व्यासपीठावर रशियाचा एक भला मोठा नकाशा टांगलेला होता. लेनिनने खूण करताच एक बटन दाबले जाऊन तो संपूर्ण नकाशा विद्युत्‌दीपांनी झळाळून निघाला. त्या नकाशावर असंख्य ठिकाणी छोटे छोटे विद्युत्‌दीप लकाकत होते. राष्ट्राची भावी जलविद्युत्‌केंद्रे, धरणे, व अन्य भव्य प्रमाणावरील नियोजित प्रकल्प त्याद्वारा दाखविण्यात आले होते. त्या सर्व योजना साकार झाल्या की जुन्या मागासलेल्या रशियाचा एका आधुनिक उद्योगप्रधान समाजवादी राष्ट्रात कायापलट होणार होता. रशियाच्या भविष्याबद्दलचे लेनिनचे स्वप्न त्या नकाशात रंगविले गेले होते. भविष्यातील प्रगतीचे आखण्यात आलेले ते चित्र पाहून, सदस्यांनी भरगच्च भरलेल्या त्या सभागृहात टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला.

मात्र, ट्रॉट्स्कीचा मित्र रादेक याने लेनिनच्या विद्युतीकरण योजनेची 'विद्युतकल्पन' या शब्दात टवाळी केली तर 'विद्युतीकरणाची अर्थशून्य स्वप्नाळू बडबड करून लेनिन कामगार-शेतकऱ्यांना हेतुपुरस्सर फसवीत आहे' असा आरोप बुखारिनने केला.

रशियातील तत्कालीन परिस्थिती लक्षात घेता लेनिन राजवटीची घटिका भरली असेच रशियाबाहेर सर्वांना वाटत होते; एवढेच नव्हे तर ट्रॉट्स्की व डावे विरोधक लवकरच रशियात सत्तेवर येणार अशी अनेकांना खात्री वाटत होती. रशियातील कम्युनिस्ट तरुण, सर्व अधिकारी वर्ग व लाल लष्काराचे सैनिक या सर्वांचा ट्रॉट्-स्कीला भरीव पाठिंबा असल्याचे वृत्त अमेरिकेच्या बातमीदाराने—आयझॅक मार्कोसन—याने दिले. पण त्या सर्वांचेच अंदाज चुकीचे ठरले. खुद्द ट्रॉट्स्कीच्याच नव्हे तर

त्याच्या मित्रांच्याही ट्रॉट्स्कीच्या शक्तिसामर्थ्याबद्दलच्या व लोकप्रियतेबद्दलच्या कल्पना भलत्याच अवास्तव होत्या.

जनमत स्वतःच्या बाजूला वळवून घेण्याच्या हेतूने ट्रॉट्स्कीने भाषणे देत संपूर्ण रशियाचा दौरा केला. जुन्या बोल्शेविकांचे अधःपतन झालेले असून तरुणांनी आता त्याला पाठिंबा देण्यास पुढे यावे असे आवाहन तो आपल्या प्रक्षोभक भाषणातून करीत होता. पण श्वेतांच्या धोक्याला तोंड देऊन नुकतेच विजयी ठरलेले रशियन शेतकरी आता त्यांच्याचमधून पुढे येत असलेल्या त्या 'लाल नेपोलियन'ला पाठिंबा द्यायला तयार नव्हते.

मार्च १९२१ च्या दहाव्या बोल्शेविक पक्ष परिषदेत, क्रांतिकारी नेतृत्वाला व ऐक्याला पक्षांतर्गत गटबाजी धोक्याची ठरणार असल्याने ती बेकायदेशीर मानली जाईल, सर्व पक्षनेत्यांनी बहुमताचा निर्णय मान्य केलाच पाहिजे, अन्यथा त्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात येईल, अशा आशियाचा ठराव केंद्रीय समितीने लेनिनच्या नेतृत्वाखाली पारित केला. एवढेच नव्हे तर ट्रॉट्स्कीला तशी गटबाजी करण्याबद्दल खास ताकीद देऊन, त्याच्या फुटीर कारवायांमुळे निर्माण होणाऱ्या गोंधळाचा फायदा घेऊन राष्ट्राचे शत्रू पक्षात शिरकाव करीत आहेत व स्वतःला 'ट्रॉट्स्काईट' म्हणवून घेत आहेत हेही समितीने स्पष्ट केले. ट्रॉट्स्कीच्या काही अनुयायांना उच्च पदांवरून दूर करून इतरत्र कनिष्ठ स्तरांतील पदावर नेण्यात आले. मास्को लष्करी शिबंदीचा प्रमुख असलेल्या ट्रॉट्स्कीच्या प्रमुख लष्करी मदतनीसाची त्या महत्त्वाच्या पदावरून हकालपट्टी करण्यात येऊन त्या पदावर जुना निष्ठावंत बोल्शेविक क्लेमेंटी वोरोशिलोव याची नियुक्ती करण्यात आली. त्यानंतरच्या वर्षी, मार्च १९२२ मध्ये, पक्षाचा सरचिटणीस म्हणून जोसेफ स्टालिनची निवड केंद्रीय समितीने केली; व लेनिनच्या योजना कार्यान्वित करण्याची जबाबदारी त्याच्याकडे सोपविण्यात आली.

केंद्रीय समितीने ट्रॉट्स्कीला दिलेली ताकीद व त्याच्या काही सहकाऱ्यांची महत्त्वाच्या पदावरून झालेली हकालपट्टी याबरोबर ट्रॉट्स्कीच्या अनुयायांची संख्या घसरली. पक्षाचा सरचिटणीस म्हणून स्टालिनची झालेली निवड हा ट्रॉट्स्की–गटाला मोठाच धक्का होता. ट्रॉट्स्कीच्या हातून सत्ता सुटू लागली.

### राष्ट्रद्रोहाच्या मार्गावर

प्रारंभापासूनच डाव्या विरोधकांची फुटीर कार्यवाही दोन प्रकाराने चालू होती. उघडपणे, सभांतून, वृत्तपत्रांतून, भाषणांतून ते आपले म्हणणे जनतेपुढे मांडीत होते; व त्याचबरोबर, ट्रॉट्स्की, बुखारिन, झिनोवीव, रादेक, प्यातकोव, व त्यांचे अन्य सहकारी गुप्तपणे बैठकी भरवून सोविएत सरकारविरुद्धच्या योजना व डावपेच निश्चित करीत होते. त्याकरिता कटकारस्थाने करणारी एक गुप्त संघटना ट्रॉट्स्कीने उभारली. १९२३ पर्यंत फार मोठ्या क्षेत्रावर त्या संघटनेचे जाळे पसरले. त्यातील सदस्यांना गुप्तपणे परस्परांशी संपर्क साधणे शक्य व्हावे या हेतूने खास सांकेतिक भाषा व परवलीचे शब्द ट्रॉट्स्कीने निश्चित

केले. संपूर्ण राष्ट्रात लपूनछपून छापखाने सुरू झाले. लाल लष्कर, सोविएत मुत्सद्दी वर्तुळ, पक्षयंत्रणा, अशा सर्व क्षेत्रात ट्रॉट्स्की–अनुयायांची छोटी छोटी केंद्रे संघटित झाली. मात्र तेवढ्यावर विरोधकांच्या कारवाया थांबल्या नाहीत. ट्रॉट्स्कीच्या कारस्थानाचे जाळे रशियाबाहेरही पसरले. १९२१–२२ च्या हिवाळ्यात ट्रॉट्स्कीचा एक प्रमुख हस्तक निकोलाय क्रेस्टिन्स्की हा जर्मनीत रशियाचा दूत होता. बर्लिन येथे असता क्रेस्टिन्स्कीने जर्मन सेनापती हान्स वॉन सीक्ट याच्याशी संधान बांधले. क्रेस्टिन्स्की 'ट्रॉट्स्काईट' असल्याचे सीक्टला त्याच्या हेरांकडून कळले होतेच. व तो सोविएत सरकारविरुद्ध कार्यवाही करण्याकरिता योग्य संधीची वाटच पाहत होता. त्यामुळे सोविएत सरकारविरुद्ध युद्धमंत्री ट्रॉट्स्कीच्या नेतृत्वाखाली संघटित झालेल्या विरोधकांच्या गटाला जर्मनीची सहानुभूती असल्याचे त्याने क्रेस्टिन्स्कीला कळविले.

मास्कोला परतल्यानंतर ती बातमी क्रेस्टिन्स्कीने ट्रॉट्स्कीच्या कानी घातली. त्याच्या भूमीगत संघटनेच्या विस्ताराकरिता व कारवायांकरिता पैसा मिळण्याची गरज ट्रॉट्स्कीला जाणवत होती. त्यांकरिता परदेशांत त्यांचे काही मित्र असावेत हे त्याला निकडीचे वाटले. त्या हेतूने, जर्मनी काही रशियाचा शत्रू नाही, उलट जर्मनीची दृष्टी फ्रान्स व इंग्लंड यांचा सूड घेण्याच्या उद्दिष्टाने पश्चिमेवर खिळली आहे; तेव्हा या परिस्थितीचा फायदा ट्रॉट्स्की–गटाने करून घेतला पाहिजे असे ट्रॉट्स्कीने क्रेस्टिन्स्कीला पटविले.

१९२२ मध्ये क्रेस्टिन्स्की बर्लिनला परत जायला निघाला त्यावेळी, सीक्टशी वाटाघाटी करून रशियातील ट्रॉट्स्की–अनुयायांच्या बेकायदेशीर कारवायांकरिता सीक्टकडून नियमीतपणे पैशाचा पुरवठा होईल अशी व्यवस्था करण्याबद्दल सूचना ट्रॉट्स्कीने क्रेस्टिन्स्कीला दिल्या होत्या. या सर्व गैरव्यवहाराबाबत नंतर क्रेस्टिन्स्कीने सांगितले–

"हा मुद्दा मी सीक्टसमोर मांडला व अडीच लक्ष सुवर्ण मार्क्स त्याने ट्रॉट्स्की–संघटनेकरिता द्यावे असे सुचविले. आपल्या सहकाऱ्यांशी विचारविनिमय केल्यानंतर सीक्टने क्रेस्टिन्स्कीची मागणी मान्य केली; पण त्याचबरोबर सोविएत रशियातील महत्त्वाच्या लष्करी बाबीसंबंधी माहिती मास्कोहून ट्रॉट्स्कीने माझ्याद्वारा त्यांना पुरविली पाहिजे व सोविएत संघात जे जर्मन हेर ते पाठवतील त्यांना आवश्यक ते परवाने ट्रॉट्स्कीकडून मिळाले पाहिजेत अशी मागणी त्याने केली. जनरल सीक्टची ती मागणी मान्य करण्यात आली व तत्संबंधी करार होऊन त्याची अंमलबजावणी १९२३ मध्ये सुरू झाली. [रशियातील ट्रॉट्स्की गटाच्या कारवायांसंबंधी सर्व अवतरणे व संभाषणे (तत्संबंधी वेगळा काही निर्देश केला गेला नसल्यास) १९३६–३८ या काळात सोविएत संघाच्या सर्वोच्च न्यायालयात झालेल्या खटल्यांतील साक्षीपुराव्यातून घेतलेली आहेत; तर ट्रॉट्स्की व त्याचा पुत्र सेदोव यांच्या संबंधात उद्धृत करण्यात आलेली संभाषणे व घटना त्या त्या खटल्यातील आरोपींनी केलेल्या निवेदनांतून व कबुली जबाबातून घेतलेली आहेत.]

२१ जानेवारी १९२४ रोजी बोल्शेविक पक्षाचा व सोविएत संघाचा महान नेता व्लादिमिर इलीच लेनिन याने निधन झाले. त्यावेळी सौम्य स्वरूपाच्या इन्फ्लुएन्झाने आजारी असलेला ट्रॉट्स्की प्रकृती स्वास्थाकरिता कॉकेशसमध्ये सागरकिनारी सुखुम या गावी जाऊन राहिला होता. लेनिनच्या अन्त्य

अनुक्रमणिका

यात्रेकरिता तो मास्कोला परत आला नाही. आपल्या आत्मचरित्रात तो लिहितो, ‘सुमुख येथे सागराभिमुख असलेल्या बाल्कनीत आडवा पडून मी दिवसानुदिवस घालविले. जानेवारीचा महिना असूनही तेथे उबदार सूर्यप्रकाश होता. सागरावरून येणारे आरोग्यादायी वारे श्वासावाटे शरीरात भरून घेत असता, ऐतिहासिक दृष्ट्या, माझ्या योग्यतेबद्दलच्या विश्वासाची अनूभूती मला तेथे स्पष्टपणे होते होती.’

### सत्तेकरिता संघर्ष

लेनिनचे निधन होताच सत्ता बळकाविण्याकरिता उघडपणे पाऊले टाकण्यास ट्रॉट्स्कीने प्रारंभ केला. लेनिनचा उत्तराधिकारी म्हणून स्टालिनऐवजी त्याला मान्यता दिली जावी अशी सरळसरळ मागणी मे १९२४ च्या पक्षपरिषदेत त्याने केली; व त्याच्या सहकाऱ्यांनी दिलेला सल्ला धुडकावून लावून तो प्रश्न त्याने मताला घातला. उपस्थित बोल्शेविक प्रतिनिधींनी स्टालिनच्या बाजूने एकमुखी निर्णय दिला. ट्रॉट्स्कीविरुद्ध पक्षाने दिलेला कौल इतका निर्णायक होता की लाजेकाजेखातर बुखारीन, झिनोवीव व कामेनेव यांनाही वरकरणी का होईना बहुमताचा निर्णय मान्य करून ट्रॉट्स्कीविरुद्ध मत द्यावे लागले. त्यांनी केलेल्या या विश्वासघातामुळे ट्रॉट्स्की त्यांच्यावर विलक्षण संतप्त झाला. परंतु थोड्याच काळात ट्रॉट्स्की व झिनोवीव यांची स्टालिनविरोधात पुन्हा हातमिळवणी झाली; व त्यांनी स्टालिन—नेतृत्त्वाविरुद्ध विरोधी गट स्थापन केला. या गटाने पूर्वीच्या विरोधकांपुढे मजल मारली. सोविएत रशियात नवे नेतृत्व यायला पाहिजे असे उघड आवाहन त्यांनी केले व तसा प्रचार करण्याकरिता व सोविएत सरकारविरुद्ध लढा चालविण्याकरिता सर्व असंतुष्ट व विध्वंसक गटांना संघटित केले. सोविएत संघात गुप्तपणे कारवाया करणारे हेर, दहशतवादी व घातपात करणारे तोर्गप्रोमचे श्वेत प्रतिक्रांतिकारी, हे सगळेच, ट्रॉट्स्कीच्या नेतृत्वाखाली नव्या विरोधकांना जाऊन मिळाले. शस्त्रास्त्रांचा साठा होऊ लागला. गुप्तपणे ‘ट्रॉट्स्काईट’ लष्कर तयार होऊ लागले. ट्रॉट्स्कीने आपल्या आत्मचरित्रात स्पष्टपणे नमूद केले आहे की दूरदृष्टी ठेवून प्रदीर्घ व गंभीर संघर्षाची सिद्धता त्यावेळी त्यांनी चालविली होती.

रशिया बाहेरील सोविएतविरोधकही सोविएत संघावर आघात करण्यास टपलेले होतेच. ट्रॉट्स्कीने सोविएत सरकारविरुद्ध लढा पुकारणे ही त्याकरिता योग्य संधी आहे असे ब्रिटिश हेरखात्याच्या कॅप्टन सिडने रॅली याला वाटले. त्या हेतूने ब्रिटिशांच्या हातातील बाहुले बनलेल्या बोरिस साविन्कोवला प्रतिक्रांतिकारी उठाव घडवून आणण्याची सिद्धता करण्याकरिता त्यांनी रशियात पाठविले. जून १९२४ मध्ये कामेनेव व ट्रॉट्स्की यांनी साविन्कोवला रशियात येण्याचे आवाहन केले होते असा स्पष्ट उल्लेख त्या कटात थोडाफार सहभाग असलेल्या विन्स्टन चर्चिलने आपल्या ‘ग्रेट कॉन्टेम्पोररीज’ या ग्रंथात केला आहे.

त्याच वर्षी, ट्रॉट्स्कीचा एक हस्तक व त्याचा जिवलग मित्र ख्रिश्चन रोकोवस्की हा सोविएत संघाचा इंग्लंडमधील राजदूत बनला. लंडनला तो पोहोचल्यानंतर थोड्याच दिवसात कॅप्टन आर्मस्ट्रॉंग व कॅप्टन लॉकहार्ट हे ब्रिटिश हेरखात्याचे दोन अधिकारी रोकोवस्कीला भेटायला त्याच्या लंडन येथील कार्यालयात आले. लंडन येथील सोविएत प्रतिनिधी म्हणून रोकोवस्कीला मान्यता देण्यास प्रारंभी ब्रिटिश सरकारने वस्तुतः नकार दिला होता. पण नंतर त्यांनी तो निर्णय बदलला. रोकोवस्की हा ट्रॉट्स्कीचा निकटचा मित्र

अनुक्रमणिका

व त्याचा सहकारी असल्याची चौकशीअंती त्यांची खात्री पटल्यामुळेच सोविएत वकील म्हणून ब्रिटिश सरकारने त्याला मान्यता दिली असे त्या दोन ब्रिटिश अधिकाऱ्यांनी रोकोवस्कीला सांगितले. [हे विधान रोकोवस्कीने १९३८ मध्ये सोविएत सर्वोच्च न्यायालयासमोर केले. १९२०–२८ या काळातील घटनांसंबंधी तो बोलत होता. त्याकाळी अमेरिकन लेखक व पक्षकार मॅक्स ईस्टमन हा ट्रॉट्स्कीच्या लिखाणाचा अधिकृत अनुवादक व अमेरिकेतील ट्रॉट्स्कीवादाचा प्रमुख प्रचारक होता. तथाकथित 'लेनिन टेस्टमेंट' किंवा लेनिनचे इच्छापत्र याला प्रसिद्धी प्रथम ईस्टमननेच दिली. त्यांच्या मते १९२३ मध्ये लेनिनने लिहिलेले, व नंतर स्टालिनने तिजोरीत बंद करून ठेवलेले ते इच्छापत्र पूर्णपणे विश्वसनीय आहे, असा ईस्टमनच्या व तिकडील सर्व ट्रॉट्स्कीसमर्थकांचा दावा होता. पक्षाचा सरचिटणीस होण्यास स्टालिन नव्हे तर ट्रॉट्स्कीच सर्वस्वी पात्र होता असे त्या इच्छापत्रात नमूद केले असल्याचे सांगण्यात आले. १९२८ मध्ये 'रशियातील सत्यपरिस्थिती' या ट्रॉट्स्कीने लिहिलेल्या प्रचारात्मक पुस्तकाचा अनुवाद ईस्टमननेच केला. त्या अनुवादित पुस्तकाच्या पुरवणीत ईस्टमनने त्या इच्छापत्राचा अंतर्भाव केला व त्याने स्वतः ट्रॉट्स्काईट–विरोधकांना केलेल्या मदतीचा तपशीलही त्यात दिला.

लेनिनने कोणत्याही प्रकारे इच्छापत्र किंवा मृत्युपत्र केलेले नव्हते असे प्रारंभी खुद्द ट्रॉट्स्कीनेच कबूल केले होते. ८ ऑगस्ट १९२५ मध्ये न्यूयॉर्क डेलीला पाठविलेल्या पत्रात त्याने लिहिले–'इच्छापत्राबद्दल सांगायचे तर तसे कोणतेही इच्छापत्र लेनिनने केलेले नव्हते. लेनिन व पक्ष यांच्या संबंधांचे स्वरूपच असे होते की तसे इच्छापत्र त्याने करणे अशक्यच होते.' पक्षसंघटनेबाबत सल्ला देण्याकरिता लेनिनने लिहिलेले, आता अगदी जीर्ण झालेले एक पत्र रशियन निर्वासित, मेन्शेविक व परकीय विरोधक लेनिनचे इच्छापत्र म्हणून खपवीत होते; व आजही सर्व ट्रॉट्स्काईट प्रचारक ट्रॉट्स्की हाच लेनिनचा उत्तराधिकारी व्हावा अशी लेनिनची इच्छा होती असे सांगणारे ते बनावट पत्र म्हणजे अस्सल, विश्वसनीय दस्तऐवज असल्याचे ठासून सांगतात.]

मास्को, येथे परतल्यानंतर रोकोवस्कीचे ट्रॉट्स्कीशी बोलणे झाले, व जर्मनीप्रमाणे ब्रिटिश गुप्तहेर सेवेलाही ट्रॉट्स्कीच्या गटाशी संपर्क साधण्याची इच्छा असल्याचे त्याने ट्रॉट्स्कीला सांगितले. त्यावर, तसे संबंध प्रस्थापित करण्याचे आदेश ट्रॉट्स्कीने रोकोवस्कीला दिले. [१९२६ मध्ये रोकोवस्कीची बदली लंडनहून पॅरिसला करण्यात आली. पॅरिसला जाण्यापूर्वी तो ट्रॉट्स्कीला भेटला. त्यावेळी, रशियातील परिस्थिती आता निकरावर आली असून परराष्ट्रांतून शक्य ती सर्व मदत मिळविणे निकडीचे झाले आहे व त्या दृष्टीने सर्व भांडवलशाही राष्ट्रांतील स्थितिप्रिय गटांशी आपल्या राजदूतांनी व व्यापारी प्रतिनिधींनी संपर्क साधून ट्रॉट्स्काईटांना त्यांच्याकडून कितपत पाठिंबा व मदत मिळू शकेल याचा अंदाज घ्यावा असे आदेश ट्रॉट्स्कीने त्याला दिले.

फ्रान्सला गेल्यानंतर ट्रॉट्स्काईट विरोधकांतर्फे तेथील प्रतिक्रियावादी गटाचा रोकोवस्कीने अंदाज घेतला. फ्रान्स त्यावेळी तोर्गप्रोम-कटकारस्थानाचे केंद्र बनले होतेच. शिवाय, सोविएत संघावर हल्ला करण्याची योजना त्यावेळी मार्शल फॉक, पेताँ अशा फ्रेंच लष्करी अधिकाऱ्यांच्या विचाराधीन होती. फ्रान्समध्ये ट्रॉट्स्कीच्या आदेशानुसार रोकोवस्कीने केलेल्या वाटाघाटींची त्यानेच दिलेली माहिती अशी–'मी डेप्यूटी निकोल याला भेटलो. निकोल हा फ्रान्समधील फार मोठा कारखानदार व उजव्या रिपब्लिकन गटाचा सदस्य होता. सोविएत संघाप्रती आक्रमक भूमिका घेण्यास सज्ज असलेल्या फ्रेंच भांडवलदारांच्या गोटातून काही मदत मिळू शकेल का असे मी त्याला विचारले; तेव्हा त्याने उत्तर दिले, 'नक्कीच! तुम्ही अपेक्षाही केली नसेल इतकी भरीव मदत त्यांच्याकडून मिळू शकेल'; पण तो म्हणाला की ती मदत प्रामुख्याने दोन गोष्टींवर अवलंबून राहील. एक म्हणजे रशियातील ट्रॉट्स्काईट विरोधक, विजय मिळवू शकतील इतके शक्तिशाली असले पाहिजेत; व दुसरे म्हणजे ते सत्तेवर आल्यानंतर ट्रॉट्स्कीवादी फ्रेंचांना कोणत्या व किती प्रमाणात सवलती देऊ शकतील हे ठरले पाहिजे.' अशाच प्रकारच्या वाटाघाटी, नंतर सप्टेंबर १९२७ मध्ये फ्रेंच डेप्युटी ड्रेफ्युस याच्याशी रोस्कोवस्कीने केल्या.]

या सुमारास कॅप्टन सिडने रॅली सोविएत सरकारविरुद्ध उठाव घडवून आणण्याचा अटीतटीचा प्रयत्न करीत होता. कमांडर ई या रॅलीच्या हस्तकाने रशियातील विरोधकांशी संधान बांधले गेले असल्याबद्दल त्याला सांगितले होते. त्या भरवशावर, रशियन विरोधकांशी गुप्तपणे वाटाघाटी करण्याकरिता रॅली रशियात गेला व तेथून परत येण्याचा प्रयत्न करीत असता फिनलंडच्या सीमेवर सोविएत सीमारक्षकांकडून मारला गेला.

यानंतर काही दिवसांनी, ट्रॉट्स्कीला ताप येत असून त्याचे निदान मास्को येथील सोविएत डॉक्टरांना होत नसल्याने त्याचे त्याकरिता जर्मनीला जाणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. याबद्दल

ट्रॉट्स्की आपल्या आत्मचरित्रपर ग्रंथात लिहितो—'माझा परदेशी जाण्याचा प्रश्न पोलिटब्यूरोसमोर आला. एकंदर राजकीय परिस्थिती, व सरकारकडे आलेल्या काही बातम्या लक्षात घेता माझे तेथे जाणे धोक्याचे ठरण्याची शक्यता आहे असे त्या सभेत बोलले गेले; परंतु तरीही, जर्मनीला जाण्याबाबत त्यांनी निर्णय मात्र माझ्यावर सोडला. याचवेळी मला परदेशात जाऊ देऊ नये असे सूचित करणारे ओ. जी. पी. यू. चे एक पत्र पोलिट्ब्यूरोकडे आले होते. मी तेथे सोविएत सरकारच्या विरुद्ध परकीय मदत संघटित करण्याचा प्रयत्न करीन अशी धास्ती पोलिट्ब्यूरोलाही कदाचित वाटली असावी. पण शेवटी मी जाण्याचे ठरविले.'

जर्मनीला गेल्यावर, ट्रॉट्स्कीने स्वतःच लिहिलेल्या हकीककतीनुसार, तो बर्लिनच्या एका 'खाजगी दवाखान्यात' उतरला. तेथे, अगोदरच जर्मन लष्करी गुप्त हेरांशी संपर्क साधलेल्या निकोलय क्रेस्टिन्स्कीने त्याची भेट घेतली. त्या दोघांचे बोलणे चालू असता एकाएकी एक जर्मन पोलीस इन्स्पेक्टर तेथे आला व ट्रॉट्-स्कीची हत्या करण्याचा कट उघडकीस आला असल्याने त्याच्या संरक्षणाची खास व्यवस्था जर्मन गुप्त पोलीस करीत असल्याचे त्याने सांगितले. तो सर्व बनवाबनवीचा प्रकार होता. कारण त्या निमित्ताने ट्रॉट्स्की, क्रेस्टिन्स्की व जर्मन गुप्त हेर यांची खलबते निर्वेधपणे सुरू झाली.

त्या ग्रीष्मात जर्मन लष्करी गुप्त हेर व ट्रॉट्स्की यांच्यात एक नवा करार झाला. तत्संबंधी क्रेस्टिन्स्कीने नंतर माहिती दिली ती अशी—'त्या वेळेपर्यंत जर्मनीकडून नियमीतपणे पैसे मिळण्याची आम्हाला सवय झाली होती. हस्तकांचे प्रवास प्रचारसाहित्याचे प्रकाशन इत्यादी कामाकरिता तो पैसा वापरला जात होता. १९२८ मध्ये, रशियात व परदेशातही सोविएत नेतृत्वाविरुद्धचा लढा जेव्हा अगदी निकरावर आला, त्याचवेळी जनरल सीक्ट याने त्यांच्या नव्या मागण्या पुढे केल्या. तोपर्यंत रशियातील ट्रॉट्स्की—गटाकडून त्यांना अधूनमधून दिली जाणारी गुप्त माहिती यानंतर नियमीतपणे दिली जावी; आणि जागतिक युद्ध जर भडकले आणि त्यावेळी ट्रॉट्-स्की—गट सत्तेवर असला तर जर्मनीला रशियात सवलती देण्यासंबंधीच्या व नवे करार करण्यासंबंधीच्या जर्मनीच्या सर्व न्याय्य मागण्या मान्य करू अशी हमी द्यावी असे सीक्टच्या मागण्यांचे स्वरूप होते. ट्रॉट्स्कीशी विचारविनिमय केल्यानंतर त्यांच्या मागण्या आम्हाला मान्य असल्याचे मी सीक्टला कळविले. यानंतर आमच्याकडून अनेक महत्त्वाच्या बाबींसंबंधीची माहिती त्याच्याकडे नियमीतपणे जाऊ लागली; व युद्धोत्तर करारासंबंधी आश्वासनेही दिली गेली. आम्हासा पैसा मिळत राहिला. १९२३ ते १९३० या काळात सुमारे २० लक्ष जर्मन मार्क्स आम्हाला मिळाले.'

जर्मनीहून मास्कोला परत आल्यानंतर ट्रॉट्स्कीने बोल्शेविक पक्षनेतृत्वाविरुद्ध सर्व शक्तिनिशी मोहीम सुरू केली. १९२६ मध्ये पक्षांतर्गत लढा अधिकच उग्र बनला. पक्षाच्या स्थानिक सभांवर उघड हल्ले करण्यापर्यंत विरोधकांची मजल गेली. पण तशा कारवायांमुळे, ट्रॉट्स्कीला जनतेचा पाठींबा मिळणे तर दूरच, उलट त्याच्या विध्वंसक कामगार त्याच्याविरुद्ध खवळले. त्यामुळे विरोधकांना पाऊल मागे घ्यावे लागले.

१९२७ च्या ग्रीष्मात युद्धाचे ढग सोविएत क्षितिजावर गोळा होत असता ट्रॉट्स्कीने सोविएत सरकारविरुद्ध पुन्हा नव्याने हल्ला चढविला. 'पहिल्या महायुद्धाच्या प्रारंभी जर्मन सैन्य पॅरिसनजीक ८०

अनुक्रमणिका

मैलावर येऊन ठेपले असता क्लेमेंसोने फ्रेंच सरकारविरुद्ध जसा उठाव केला, तशीच कार्यवाही आता आपण करणे अगत्याचे आहे' असे आवाहन तो उघडपणे जनतेला करू लागला. स्टालिनने त्याच्या त्या देशद्रोही वक्तव्याचा साहजिकच धिक्कार केला, व ट्रॉट्स्की आणि चेंबर्लेन [कट्टर सोविएतविरोधी सर ऑस्टिन चेंबर्लेन हा त्यावेळी ब्रिटनच्या परराष्ट्रमंत्री होता.] यांची युती झाली असल्याबद्दलची शंकाही त्याने बोलून दाखविली.

ट्रॉट्स्कीवाद्यांच्या या उघड सरकारविरोधी भूमिकेमुळे त्या प्रश्नाबाबत पुन्हा जनतेचा कौल घेण्यात आला. सर्व बोल्शेविक पक्षसदस्यांचे सार्वमत घेण्यात आले त्यावेळी ट्रॉट्स्कीच्या बाजूने जेमतेम ४००० मते पडली तर ७ लक्ष ४० हजार पक्ष सदस्यांनी स्टालिनच्या नेतृत्वाला त्यांचा निःसंदिग्ध पाठिंबा व्यक्त केला. [विरोधकांच्या त्या चळवळीच्या काळात त्यांना ४००० वर मते कधीही मिळाली नाहीत. गटबाजीचा धिःक्कार करून अंतर्गत राजकारणात क्रांतिकारी ऐक्याची निकड पक्षाने पुन्हा पुन्हा अगत्याने प्रतिपादत केली असली तरी, आश्चर्य वाटावे इतके सभा, चर्चा व टीका स्वातंत्र्य सरकारने ट्रॉट्स्काईट विरोधकांना दिले होते. लेनिनच्या निधनानंतर अंतर्गत व आंतर्राष्ट्रीय क्षत्रात भयानक संकटे सोविएत सरकारपुढे उभी ठाकली असता, प्रत्येक लहानसहान व खऱ्या खोट्या गोष्टींचा फायदा घेऊन, स्वतःच्या गटाला पाठिंबा मिळवून घेण्याच्या हेतूने सरकारविरुद्ध तुफानी प्रचार विरोधकांनी चालविला. 'क्षमताशून्य शासन', 'अनियंत्रित उद्दाम नोकरशाही', 'एककेंद्री एकपक्षी हुकुमशाही', 'जुन्या नेतृत्वाचे अधःपतन' अशा शेलक्या घोषणा देऊन ट्रॉट्स्कीवादी विरोधकांनी स्टालिन राजवटीवर प्रखर हल्ला चढविला. परंतु ट्रॉट्स्की—चळवळीचे सरकारप्रती उघड शत्रुत्व व त्यांनी परकीयांशी जोडलेले राष्ट्रद्रोही संबंध पूर्ण उघडे होईपर्यंत ती चळवळ दडपून टाकण्याकरिता कोणतीही कार्यवाही सोविएत सरकारने केली नाही. १९२४ ते १९२७ या काळात हा संघर्ष अविरतपणे चालू होता. 'सोविएत कम्युनिझम, अ न्य सिव्हिलीझेशन' या आपल्या पुस्तकात सिडने व बिॲट्रिस वेब म्हणतात—"विरोधकांचा झटपट निकाल लावणाऱ्या हुकुमशाहीखाली रशिया भरडला जात आहे असे मानणाऱ्यांना आश्चर्य वाटावे इतक्या उघडपणे हा संघर्ष चालू होता. ऑल रशियन कॉंग्रेस ऑफ सोविएत्सची केंद्रीय कार्यकारी समिती, साम्यवादी पक्ष व पक्षाची केंद्रीय समिती यांत, तसेच स्थानिक सोविएत व पक्षाच्या स्थानिक शाखा यांत विरोधकांनी सरकार व सरकारी नीती यांवर अखंड व जळजळीत टीका चालविली होती. विरोधकांचे हजारो पानांचे प्रचार साहित्य देशाच्या मुद्रणालयांत छापले जात होते.

वेब पतीपत्नी म्हणतात—'या सर्व संघर्षाचा निकाल शेवटी एप्रिल १९२६ मध्ये पक्षाच्या केंद्रीय समितीने लावला व त्या निर्णयावर ऑक्टोबर १९२६ व डिसेंबर १९२७ मध्ये भरलेल्या १४ व्या व १५ व्या पक्ष परिषदांनी, बऱ्याच उलटसुटल चर्चेनंतर, शिक्कामोर्तब केले. त्या पक्षनिर्णयानंतरही सरकारविरुद्ध चळवळ आयोजित करणे, सरकारविरुद्ध चळवळ आयोजित करणे, सरकारविरुद्ध उठाव करण्यास चिथावणी देणे या गोष्टी ट्रॉट्स्की करीतच राहिला."]

सार्वमतात अशा प्रकारे निर्णायक पराभव होऊनही ट्रॉट्स्कीची कारस्थाने बंद झाली नाहीत. तत्संबंधाचे वर्णन त्याच्या आत्मचरित्रात सापडते. तो म्हणतो—'मास्को व लेनिनग्राड येथे आम्ही अनेकदा गुप्त बैठकी घेतल्या. त्यात विरोधकांपैकी कोणाचे तरी भाषण ऐकण्यास मिळेल म्हणून कामगार व विद्यार्थी वर्गातील स्त्रीपुरुष हजर राहात. एकाच दिवशी तीन—चार सभांत मी बोलत असे. एकदा तर अशी एक सभा उघडपणे एका उच्च तांत्रिक विद्यालयात आयोजित केली गेली होती. ती सभा भरू न देण्याचा शासनाने केलेला प्रयत्न विफल ठरला. मी कामेनेव सुमारे दोन तास त्या सभेत बोललो.'

या संघर्षाचा निकाल लावून घेण्याकरिता ऑक्टोबर १९२७ मध्ये ट्रॉट्स्कीने योजना आखली. बोल्शेविक क्रांतीच्या दहाव्या वर्धापनदिनी, ७ नोव्हेंबर १९२७ रोजी सरकार उलथून पाडण्याच्या हेतूने उठाव करण्याची सर्व सिद्धता त्याने केली. पूर्वी लाल लष्करात असलेले ट्रॉट्स्कीचे कट्टर व खंबीर अनुयायी त्या उठावाचे नेतृत्व करणार होते. संपूर्ण राष्ट्रात सत्ताकेंद्रे काबीज करण्याकरिता विरोधकांच्या तुकड्या निरनिराळ्या ठिकाणी सुसज्ज ठेवण्यात आल्या होत्या. ७ नोहेंबरला सकाळी कामगारांचे विशाल संचलन सुरू झाले की त्यावेळी राजकीय निदर्शने केली जावीत व त्याचवेळी संपूर्ण देशभर उठाव व्हावेत

अशी योजना होती. आपल्या आत्मचरित्रात ट्रॉट्स्की म्हणतो—‘विरोधकांचा आमचा प्रमुख गट डोळे उघडे ठेऊन या अखेरच्या संघर्षाला सज्ज झाला होता. केवळ मुत्सद्देगिरीचे किंवा लपवालपवीचे मार्ग पत्करून नव्या पिढीच्या गळी आमच्या कल्पना उतरविणे शक्य होणार नाही, तर संभाव्य परिणामांची तमा न बाळगता उघडपणे लढ्याला उभे ठाकणे आवश्यक आहे असे आम्हाला वाटले. त्यामुळे भविष्यात कधी तरी आमचा विजय होईलच हा विश्वास उराशी बाळगून व पराभव अटळ आहे हे कळत असूनही आम्ही लढ्याला सामोरे गेलो.’

ट्रॉट्स्कीच्या त्या उठावाला प्रारंभ होतो न होतो तोच त्याचा शेवटही झाला. ७ नोव्हेंबर रोजी सकाळी मास्कोच्या रस्त्यांवर कामगारांचे संचलन सुरू असता, दोन्ही बाजूंच्या उंच इमारतींवरून त्यांच्यावर, नव्या नेतृत्वाच्या उदयाची घोषणा करणाऱ्या प्रचारपत्रकांचा वर्षाव करण्यात आला. त्याच वेळी ट्रॉट्स्की—अनुयायांचे लहानलहान गट घोषणा—फलके व झेंडे फडकावीत समोर आले. परंतु कामगारांपुढे त्यांना मागे हटावे लागले. हे होताच सोविएत अधिकाऱ्यांनी विद्युत्वेगानें कार्यवाही केली. मुरालोव, स्मिर्नोव, म्राच्कोवस्की, द्रेईत्झर यांसह सर्व ट्रॉट्स्की—अनुयायांना पकडण्यात आले. कामेनेव व प्यातकोव यांना मास्कोत अटक करण्यात आली. ट्रॉट्स्काईटांच्या गुप्त मुद्रणालयांवर व शस्त्रास्त्र साठ्यांवर छापे घालून ते जप्त करण्यात आले. त्याचवेळी, उठाव आयोजित करण्याकरिता लेनिनग्राडला गेलेल्या झीनोवीव व रादेक यांनाही तेथे अटक झाली. ट्रॉट्स्कीचा एक प्रमुख सहकारी—जपानमधील राजदूत जॉफ याने आत्महत्या केली. काही ठिकाणी ट्रॉट्स्कीच्या साथीदारांबरोबर असलेले श्वेत रशियन अधिकारी, सोशल रेव्होल्यूशनरी दशहतवादी व परकीय हस्तक ह्यांचीही धरपकड झाली. ट्रॉट्स्कीची बोल्शेविक पक्षातून हकालपट्टी झाली व त्याला हद्दपार करण्यात आले.

## अल्मा आता

ट्रॉट्स्कीला सैबेरियात चीनच्या सीमेलगत कझाकस्तान सोविएत गणराज्यात अल्मा आता येथे हद्दपार करण्यात आले. तेथे तो, त्याची पत्नी नताली व मुलगा सेदोव यांच्याकरिता एक बंगला देण्यात आला. ट्रॉट्स्काईटांच्या कटाच्या खऱ्या व्याप्तीची व गांभीर्याची यर्थार्थ कल्पना त्याही वेळी न आल्याने त्याला तेथे मोठ्या सौजन्याने वागविण्यात आले. इफ्राईम द्रेईत्झरसह त्याच्या अंगरक्षकांना सोबत ठेऊन घेण्याची, खाजगी पत्रव्यवहार करण्याची, त्याचे वैयक्तिक ग्रंथसंग्रहालय व गुप्त लेखागार जवळ बाळगण्याची, तसेच अधून मधून त्याच्या मित्रांनी त्याला तेथे भेटण्याची परवानगी दिली गेली.

परंतु हद्दपार होऊनही ट्रॉट्स्कीची कटकारस्थाने थांबली नाहीत. २७ नोव्हेंबर १९२७ रोजी ट्रॉट्स्की अनुयायांतील सर्वात धूर्त जर्मन हस्तक निकोलाय क्रेस्टिन्स्की याने, त्यानंतरच्या काळात कोणते डावपेच व कार्यवाही करावयाची याची रूपरेषा स्पष्ट करणारे एक खाजगी पत्र ट्रॉट्स्कीला लिहिले. ट्रॉट् स्काईटांनी सरकारविरुद्ध उघडपणे संघर्ष करणे आता व्यर्थ आहे; उलट त्यांनी आता पक्षात पुन्हा शिरकाव करून घेऊन सरकारी यंत्रणेत अधिकाराची पदे मिळवून घ्यावीत, व सरकारी यंत्रणेत राहूनच, हळूहळू पण

सातत्याने प्रयत्न करून जनसामान्यांचा विश्वास संपादन करावा, त्यांच्यावर आपला प्रभाव प्रस्थापित करून सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न करावा, असे त्याचे मत त्याने त्या पत्रात स्पष्ट केले होते.

क्रेस्टिन्स्कीने सुचविलेले ते धूर्त डावपेच ट्रॉट्स्कीला एकदम पटले. त्या दृष्टीने, आपल्या कारवाया चालू ठेवण्याकरिता योग्य-अयोग्य सर्व मार्गांचा अवलंब करून पुन्हा पक्षात प्रवेश मिळवून घ्यावा व सरकारी यंत्रणेत शक्यतो स्वतंत्र व जबाबदारीची पदे मिळवून घ्यावीत असे आदेश ट्रॉट्स्कीने आपल्या अटक किंवा हद्दपार झालेल्या अनुयायांना लागलीच दिले. त्याबरोबर प्यातकोव रादेक, झिनोवीव, कामेनेव व इतर हद्दपार झालेले ट्रॉट्स्की–अनुयायी एकाएकी ट्रॉट्स्कीचा धिःक्कार करू लागले व सरकारला त्यांनी केलेला विरोध ही त्यांची एक मोठी घोडचूक असून त्यांना पुन्हा पक्षात प्रवेश मिळावा याकरिता विनंतीअर्ज करू लागले.

लवकरच अल्मा आता येथील ट्रॉट्स्कीचे निवासस्थान म्हणजे फार मोठ्या सोविएतविरोधी कटकारस्थानचे एक केंद्र बनले. सोविएत सरकार उलथून पाडण्याकरिता तेथून त्याने पुन्हा राष्ट्रव्यापी प्रचार मोहीम सुरू केली. [ट्रॉट्स्कीच्या गैरहाजरीत सोविएत रशियातीरल उरल्यासुरल्या विरोधकशक्तींना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी काही काळाकरिता बुखारिनकडे आली. नेतृत्वाबद्दल ट्रॉट्स्कीशी त्याचे मतभेद असल्यामुळे उठावात प्रत्यक्षपणे भाग घेण्याचे मोठ्या धूर्तपणे त्याने टाळले होते. विरोधकांना सैध्दांतिक बैठक देणारा खरा नेता ट्रॉट्स्की नव्हे तर तो स्वतः आहे असे त्याला वाटू लागले होते. मास्को येथील मार्क्सवादी विद्यालयाचा प्रमुख म्हणून काम करीत असता त्याने आपल्याभोवती निवडक तरुण कार्यकर्त्यांचा एक गट संघटित केला होता. औद्योगिक पक्षाला जाऊन मिळालेल्या तंत्रज्ञांशीही त्याने निकटचा संपर्क साधला होता. बुखारिन स्वतःला डावा कम्युनिस्ट म्हणवून घेत असे. परंतु ट्रॉट्स्कीच्या पतनानंतर, 'उजवे विरोधक' म्हणून ओळखला जाणारा विरोधकांचा एक गट त्याने संघटित केला.

'उघड विरोधाला तोंड फोडण्यात ट्रॉट्स्कीने फार घिसाडघाई केली व देशातील अन्य सर्व सोविएतविरोधी शक्तींशी एकजुटीने काम न केल्याने त्याला अपयश आले असे बुखारिनचे मत होते. ती चूक 'उजव्या विरोधकांना' संघटित करताना होऊ नये याची काळजी बुखारिन घेणार होता. ट्रॉट्स्कीवाद्यांची हकालपट्टी करण्यात आली त्यावेळी पहिली पंचवार्षिक योजना नुकतीच कार्यान्वित होत होती. नव्या अडचणी, हालअपेष्टा, तणाव, राष्ट्रापुढे आ वासून उभे होते. अशा वेळी उच्च पदस्थ सरकारी अधिकारी अलेक्सी रिकोव, कामगार–संघटना अधिकारी टॉम्स्की, तसेच तोर्गप्रोम हस्तक व मेन्शेविक या सर्वांच्या सहकार्याने बोल्शेविक पक्षातच 'उजवा विरोधक' गट बुखारिनने गठित केला. त्यांचा पहिल्या पंचवार्षिक योजनेला उघड विरोध होता. ट्रॉट्स्कीचे प्रतिनिधी व सर्व भूमीगत संघटनांचे हस्तक यांच्या सभा घेऊन बुखारिनने उजव्या विरोधकांचा कार्यक्रम निश्चित केला.

'माझा कार्यक्रम प्रत्यक्ष व्यवहारात उतरवायचा झाला तर तो प्रामुख्याने आर्थिक क्षेत्राशी संबंधिक असेल. राष्ट्रीय भांडवलशाहीचा पुरस्कार करणे, सुखवस्तू शेतकरी निर्माण करणे, सामूहिक शेतीत कपात करणे, परकीयांना सवलती देणे, परराष्ट्र व्यापाराचा एकाधिकार रद्द करणे,–एकंदरीत भांडवलशाहीची पुनर्स्थापना करणे असे ढोबळमानाने त्या कार्यक्रमाचे स्वरूप असेल. अंतर्गत क्षेत्रात आमचा कार्यक्रम म्हणजे मेन्शेविक व सोशल रेव्होल्यूशनरी यांच्याशी ऐक्य साधणे, फासिस्ट–मतप्रणालीची राजकीय पद्धती स्वीकारणे; असे त्याने स्पष्ट केले.'

बुखारिनने विरोधकांकरिता आखलेल्या नव्या राजकीय प्रणालीमुळे, पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या यशाबद्दल ज्यांना मुळीच विश्वास वाटत नव्हता असे अनेक उच्च पदस्थ अधिकारी बुखारिनकडे आकर्षित झाले. सामूहिक शेती कार्यक्रमाला हिरीरीने विरोध करणारे कुलाक संघटनांचे नेतेही बुखारिनकडे वळल्याने जनसामान्यांचा ट्रॉट्स्कीला जो कधीच पाठिंबा मिळाला नाही तो बुखारिनला, अल्पसा का होईना, मिळाला. उजव्या विरोधकांचे नेतृत्व बुखारिनकडे जावे हे प्रारंभी ट्रॉट्स्कीला साहजिकच रुचले नाही. परंतु थोड्याच काळात त्यांनी आपसातील सर्व मतभेद मिटवून टाकले. उजव्या विरोधकांचा हा प्रचार हल्ला नोव्हेंबर १९२७ पर्यंत चालला. शेवटी उजव्यांचा तो मतप्रचार पक्षसदस्यत्वाशी पूर्णपणे विसंगत असल्याचे बोल्शेविक पक्षाच्या केंद्रीय समितीने घोषित केले व बुखारिन, टॉम्स्की, रिकोव यांची त्यांच्या अधिकारपदावरून हकालपट्टी केली.]

अनुक्रमणिका

संपूर्ण देशात सरकारविरोधकांशी व आपल्या अनुयायांशी विचारविनिमय करण्याकरिता व त्यांना मार्गदर्शन करण्याकरिता ट्रॉट्स्कीने निर्माण केलेली गुप्त संपर्क यंत्रणा यशस्वीपणे राबविण्याची जबाबदारी ट्रॉट्स्कीचा मुलगा सेदोव याच्याकडे होती. त्यावेळी जेमतेम बावीस–तेवीस वर्षांचा असलेला तो मुलगा उत्साही तर होताच, परंतु त्याचबरोबर पित्याच्या मार्गदर्शनाखाली कपट-कारस्थानाच्या तंत्रात चांगलाच तरबेज झाला होता. पित्याचा अहंकारी स्वभाव व हुकुमशाही प्रवृत्ती त्याला प्रसंगी जाचक वाटत असली तरी त्याने विरोधकांच्या उद्दिष्टसिद्धीच्या कार्याला स्वतःला वाहून घेतले होते. संपर्क–यंत्रणा अत्यंत कौशल्याने राबवून विरोधकांच्या त्या सर्व संग्रामात सेदोवने बजावलेल्या मोलाच्या भूमिकेचे वर्णन ट्रॉट्स्कीने 'लिऑं सेदोव: पुत्र-मित्र-विग्रहक' या त्याच्या पुस्तकात केले आहे. आठवड्याला राजकीय स्वरूपाची हजारावर पत्रे, तारा, कागदपत्रे, ट्रॉट्स्कीकडे संपूर्ण देशातून व परदेशातूनही येत होती व त्याच्याकडून इतरांना जात होती.

शेवटी ट्रॉट्स्की करीत असलेल्या उपद्व्यापांचे गांभीर्य लक्षात आल्याने डिसेंबर १९२८ मध्ये सोविएत सरकारने आपला एक प्रतिनिधी अल्मा आता येथे ट्रॉट्स्कीकडे पाठविला. ट्रॉट्स्कीने आपल्या आत्मचरित्रात या प्रसंगाचे वृत्त दिले आहे. राष्ट्रात ट्रॉट्स्कीने चालविलेल्या कारवाया निश्चितपणे प्रतिक्रांती स्वरूपाच्या असल्याचे, व अल्मा आता येथे सोविएत सरकारने त्याला दिलेल्या सवलतींमुळेच त्या कारवाया करणे त्याला शक्य होत असल्याचे त्याने स्पष्ट केले, व एक तर कोणत्याही प्रकारे राष्ट्रद्रोही कारवाया यापुढे करणार नाही असे अभिवचन ट्रॉट्स्कीने द्यावे, अन्यथा त्याच्याविरुद्ध कार्यवाही करणे सोविएत सरकारला भाग पडेल असा इशारा त्याने ट्रॉट्स्कीला दिला. ट्रॉट्स्कीने त्याकडे पूर्ण दुर्लक्ष केल्याने हा प्रश्न ओ. जी. पी. यू. च्या खास समितीपुढे आला. सोविएत सरकारविरुद्ध बेकायदेशीर पक्ष प्रस्थापित करून त्या द्वारा प्रतिक्रांती–स्वरूपाच्या कारवाया करणे व त्या सरकारविरुद्ध सशस्त्र उठाव घडवून आणण्याचे कारस्थान करणे असे आरोप फौजदारी कायद्याच्या कलम ५८१० नुसार लावण्यात आले व त्या गुन्ह्यांकरिता त्याला १८ जानेवारी १९२९ रोजी सोविएत संघांतून हद्दपार करावे असा ठराव पास करण्यात आला. २२ जानेवारी १९२९ रोजी त्या शिक्षेची अंमलबजावणी केली गेली. ट्रॉट्स्कीच्या त्या हद्दपारीबरोबर त्यांच्या जीवनातील सर्वात विलक्षण व धाडसी अशा टप्प्याला प्रारंभ झाला. आयझॅक मार्कोसन आपल्या 'द टर्ब्युलंट इयर्स' या ग्रंथात म्हणतो–"हद्दपारी म्हणजे राजकीय अस्त असेच सामान्यतः मानले जाते. परंतु ट्रॉट्स्कीच्या बाबतीत मात्र अगदी उलटे घडले आहे. सोविएत संघात असताना त्या राष्ट्राला डसणारी एक भयानक विखारी मधमाशी बनून तो राहिला होता, तर आजही, हद्दपारीनंतर, हजारो मैल अंतरावरून, त्या मधमाशीचा डंख सोविएत संघाच्या दृष्टीने तितकाच विखारी ठरत आहे. रशियाबाहेर राहून सोविएतविरोधी चळवळ त्याने अशा काही कौशल्याने आयोजित केली की तो सोविएत रशियाच्या पहिल्या क्रमांकाचा कट्टर शत्रू बनला. युरोपला सळो की पळो करून सोडणाऱ्या नेपोलियनच्या जीवनात एकच सेंट हेलेना होते, पण ट्रॉट्स्कीकरिता मात्र आतापर्यंत, पाच ठिकाणे सेंट हेलेना बनली आहेत. त्याच्या वास्तव्यकाळात प्रत्येक ठिकाण त्याच्या सोविएतविरोधी कारस्थानाच्या जाळ्याचे केंद्र बनले. प्रचारतंत्राचे त्याचे कौशल अजोड होते. एखाद्या रहस्यकथेत शोभेल अशा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कपटकारस्थानाच्या अकल्पनीय वातावरणात त्याच्या जीवनाचा उर्वरित काळ त्याने घालविला."

अनुक्रमणिका

## प्रकरण १६

# पंचमस्तंभाचा प्रादुर्भाव

### एल्बा येथे ट्रॉट्स्की

१३ फेब्रुवारी १९२९ रोजी ट्रॉट्स्की कॉन्स्टॅटिनोपल येथे येऊन पोहोचला. तो तेथे आला तो एखाद्या अवमानित राजकीय बहिष्कृतासारखा नव्हे, तर परराष्ट्राला भेट देण्यास आलेल्या एखाद्या सत्ताधीशाच्या थाटात आला. त्याच्या तेथील आगमनाची बातमी ठळक मथळे देऊन जगातील सर्व प्रमुख वृत्तपत्रांनी दिली. ट्रॉट्स्कीला मोठ्या बोटीतून किनाऱ्यापर्यंत आणणाऱ्या छोट्या नौकेची वाट पाहात त्याचे स्वागत करण्याकरिता परकीय पत्रकार तिष्ठत किनाऱ्यावर उभे होते. पण मोठ्या ऐटीत त्यांना बाजूला सारून, तो सरळ त्याच्याकरिता तयार ठेवण्यात आलेल्या मोटारीत बसला व त्याच्या वास्तव्याकरिता निश्चित करण्यात आलेल्या बंगल्याकडे निघून गेला.

त्याच्या आगमनामुळे तुर्कस्थानात जणू एक राजकीय वादळच उठले. तुर्कस्थानातून त्याला हाकलून लावण्यात यावे अशी मागणी रशियानुकुल प्रवक्त्यांनी केली. तर सोविएत–विरोधकांनी सोविएत राजवटीचा कट्टर शत्रू म्हणून त्याचे अपार उत्साहाने स्वागत केले. यामुळे तुर्कस्थान सरकारसमोर मोठाच पेच निर्माण झाला. तुर्कस्थान रशियन सीमेला संलग्न असल्याने ट्रॉट्स्कीला तेथेच ठेवून घेण्यात यावे याकरिता त्या सरकारवर दडपण आणले गेले, अशा वदंता त्यावेळी ऐकू येत होत्या. अखेरी, परागंदा झालेला त्या 'लाल नेपोलियनला' तुर्कस्थानच्या अमलाखालील प्रिन्किपो बेटावर आश्रय देण्याचे निश्चित करण्यात आले. काही आठवड्यातच पत्नी व मुलगा यांसह ट्रॉट्स्की प्रिन्किपो येथे गेला. त्याच्याबरोबर त्याचे अंगरक्षक होतेच.

काळ्या समुद्रातील त्या निसर्गरम्य बेटावर (याच प्रिन्किपो बेटावर दोस्त राष्ट्रे व सोविएत रशिया यांची शांतता परिषद आयोजित करण्याचे वुड्रो विल्सन याचे स्वप्न होते.) ट्रॉट्स्कीने आपले नवे राजकीय मध्यवर्ती कार्यालय थाटले. त्याचा मुलगा लिऑं सेदोव त्याचा प्रमुख मदतनीस व सहकारी बनला. लवकरच निरनिराळ्या राष्ट्रांतील तरुणांचा एक गट तेथे संघटित झाला व ते सर्व सेदोवचे निकटचे सहकारी बनले. ट्रॉट्स्कीच्या त्या निवासस्थानाभोवती रहस्यमय कपटकारस्थानाचे गूढ असे वातावरण निर्माण झाले. त्या घराभोवती सशस्त्र अंगरक्षकांचा व पोलिस दलात वापरतात तशा प्रशिक्षित कुत्र्यांचा चोवीस तास जागता पहारा होता. रशिया, जर्मनी, स्पेन व अन्य राष्ट्रांतील जहाल साहसी लोकांची त्या घरात सतत गर्दी असे. ते तरुण त्याचे सचिव आहेत असे ट्रॉट्स्की म्हणे. ते त्याचे नवे 'ट्रॉट्स्की रक्षक' बनले. सोविएत विरोधी प्रचारक, राजकारणी मुत्सद्दी, वृत्तपत्रकार, ट्रॉट्स्कीप्रती अंधनिष्ठा असणारे, तसेच जागतिक क्रांती करण्याच्या उद्दिष्टाने भारलेले, अशा अनेकांची त्याच्या घरी रीघ लागलेली असे.

समाजवादी चळवळीशी द्रोह करून बाहेर पडलेले, तसेच इतरही अनेक असंतुष्ट, यांच्याशी त्याच्या ग्रंथालयात ट्रॉट्स्की खाजगी बोलणी करी त्यावेळी दाराशी त्याच्या अंगरक्षकांचा कडक पहारा असे. निरनिराळ्या गुप्तहेर सेवांचे हस्तक व इतरही अनेक अनामिक मंडळी, त्यांच्या हालचाली गुप्त राखण्याची खबरदारी घेऊन ट्रॉट्स्कीच्या मुलाखतीला येत.

१९२२—२३ पासून एखाद्या पाळीव कुत्र्याच्या निष्ठेने सतत ट्रॉट्स्कीच्या मागे असलेला सोशल रेव्होल्यूशनरी ब्लुम्किन हा ट्रॉट्स्की प्रिन्किपोला आला त्यावेळी त्याच्या सशस्त्र अंगरक्षक दलाचा प्रमुख होता. १९३० मध्ये ट्रॉट्स्कीने त्याला काही महत्त्वाच्या कामगिरीवर रशियात पाठविले. तेथे तो पकडला गेला. त्याच्यावर खटला गुदरण्यात येऊन, सोविएतविरोधी प्रचार साहित्य व शस्त्रास्त्रे बेकायदेशीरपणे, चोरून लपून रशियात आणण्याच्या गुन्ह्यासाठी त्याला देहदंडाची शिक्षा सोविएत न्यायालयाने ठोठावली. त्यानंतर रेमंड मोलिनीर हा फ्रेंच व शेल्डन हार्ट हा अमेरिकन, हे दोघे ट्रॉट्स्की—अंगरक्षक दलाचे प्रमुख बनले.

तात्पुरत्या काळाकरिता हद्दपारीत असलेला ‘एक महान क्रांतिकारी’ अशी आपली प्रतिमा कायम टिकविण्याचे सर्वतोपरी प्रयत्न ट्रॉट्स्कीने केले. त्याने आता वयाची पन्नाशी गाठली होती. त्याच्या दणकट शरीरयष्टीवर मेद चढू लागला होता. दाट काळ्या केसात व टोकदार दाढीत रुपेरी केसांची सरमिसळ झाली होती. त्याच्या हालचाली मात्र पूर्वी इतक्याच चंचल व चपळ होत्या नाकावर चमकणाऱ्या सोनेरी चष्म्याआडून लुकलुकणारे त्याचे तीक्ष्ण डोळे व काहीसा खिन्न अविर्भाव यामुळे एक प्रकारच्या विचित्र द्वेषभावाची छाया त्याच्या चेहऱ्यावर दिसे. अनेकांना त्याचे व्यक्तिमत्त्व घृणास्पद वाटे, तर काहींना ते आकर्षक वाटे.

सोविएत रशियाबाहेर, एक महान कर्तृत्त्वसंपन्न नेता असल्याबद्दलची आपली कीर्ती कायम टिकविण्याचे सर्वतोपरी प्रयत्न ट्रॉट्स्कीने केले. ‘दैव? ती तर मला एक केवळ हास्यापद बाब वाटते:’ ‘सामान्य माणसे तर इतकी मूर्ख व गुलामी प्रवृत्तीची असतात की त्यांच्यामुळे मला मनस्ताप कधीच होत नाही,’ फ्रेंच अराजकवादी प्रौधोनाच्या अशा शब्दांचा पुनरुच्चार तो मोठ्या प्रौढीने करी. भेटायला येणाऱ्या बड्या लोकांना मुलाखत देण्यापूर्वी, कोणत्या व कशा प्रकारच्या आविर्भावांनी त्याचा सर्वात जास्त प्रभाव पडू शकेल याची रंगीत तालीम त्याच्या शयनगृहाच्या आरशासमोर तो कटाक्षाने करी. प्रिन्किपो येथे त्याच्या मुलाखतीस आलेल्या पत्रकारांना, त्यांचे लेख प्रसिद्धीला पाठविण्यापूर्वी, ट्रॉट्स्कीच्या नजरेखालून घालावे लागत. भेटायला येणाऱ्या लोकांशी बोलताना, शब्दाशब्दांवर भर देत, जोरदार हातवारे करीत, दुराग्रही अट्टाहासाने तो सोविएत रशियावर हल्ला चढवी.

ट्रॉट्स्की प्रिन्किपोला आल्यानंतर थोड्याच दिवसांनी उदारमतवादी जर्मन लेखक एमिल लुडविग याने त्याची मुलाखत घेतली. ट्रॉट्स्की त्या दिवशी मोठ्या खुषीत दिसत होता. त्याने लुडविगला मोठ्या ठामपणे सांगितले की ‘सोविएत रशियासमोर सध्या मोठाच आणीबाणीचा प्रसंग उभा ठाकला आहे. पंचवार्षिक योजना सपशेल अपयशी ठरली आहे. त्यामुळे आता तेथे बेकारी फार मोठ्या प्रमाणावर वाढणार

आहे. आर्थिक व औद्योगिक क्षेत्रात अनर्थ ओढवणार आहे. कृषिक्षेत्रात सामूहिकीकरण योजनेचा तर चांगलाच बोजवारा उडाला आहे. स्टालिन देशाला पूर्ण विनाशाकडे नेत आहे. विरोधकांचे सामर्थ्य वाढत आहे...'

'रशियातील तुमच्या अनुयायांचा गट किती मोठा आहे?' लुडविगने विचारले.

हा प्रश्न ऐकताच ट्रॉट्स्की एकदम सावध झाला. आपला गुबगुबीत पांढुरका हात उडवीत तो उत्तरला, 'ते नक्की सांगणे कठीण आहे.' कारण त्याचे सर्व अनुयायी सर्वत्र विखुरले असून भूमीगत राहून कार्य करीत होते.

'तुम्ही पुन्हा राजकारणात उघडपणे कधी उतरणार? लुडविगने प्रश्न केला.

थोडा विचार करीत ट्रॉट्स्की म्हणाला 'जेव्हा त्याकरिता एखादी योग्य संधी पुढे येईल तेव्हाच ते शक्य होईल...कदाचित एखादे युद्ध किंवा युरोपीय राष्ट्रांचा लष्करी हस्तक्षेप...! तसे झाले की सोविएत सरकार दुबळे होईल व विरोधकांना उत्तेजन मिळेल.'

विन्स्टन चर्चिलला सोविएतविरोधी जागतिक चळवळीत अजूनही पूर्वीइतकाच रस वाटत होता. त्यामुळे प्रिन्किपो येथे राहणाऱ्या ट्रॉट्स्कीकडे त्याचे बारीक लक्ष होते. ट्रॉट्स्कीबद्दल त्याचे मत कधीच चांगले नव्हते असे त्याने नंतर १९४४ मध्ये म्हटले असले तरी कटकारस्थाने करण्याचे ट्रॉट्स्कीचे धारिष्ट, त्याचे अमोघ वक्तृत्त्व व असामान्य, दांडगा उत्साह यांचे चर्चिलच्या साहसी मनोवृत्तीला कौतुक वाटत होते. हद्दपारीनंतरच्या ट्रॉट्स्कीच्या संपूर्ण आंतर्राष्ट्रीय कारस्थानाचा गोषवारा देताना चर्चिल आपल्या 'ग्रेट कॉन्टेम्पोररीज' या ग्रंथात म्हणतो—'सोविएत सरकारच्या विनाशाकरिता संपूर्ण गुन्हेगारी जगाने एकत्र यावे याकरिता ट्रॉट्स्कीची सतत धडपड चालू आहे.'

याच सुमारास जॉन गंथर हा अमेरिकन पत्रकार प्रिन्किपो येथे ट्रॉट्स्कीच्या भेटीला आला. ट्रॉट्स्की व त्याचे अनेक रशियन व युरोपीय सहकारी यांच्याशी त्याने बातचीत केली. ट्रॉट्स्की एखाद्या पराभूत निर्वासितासारखा नव्हे तर उलट एखाद्या राजासारखा किंवा हुकुमशहासारखा वागतो हे पाहून त्याला नवलच वाटले त्याला पाहून एल्बा येथील नेपोलियनची व युरोपातील त्याच्या नाट्यपूर्ण पुनरागमनाची गंथरला आठवण झाली. ट्रॉट्स्कीने चालविलेल्या कारस्थानाबद्दल तो लिहितो—'ट्रॉट्स्कीवाद्यांची चळवळ युरोपच्या बहुतांश भागात फोफावली आहे. प्रत्येक राष्ट्रात ट्रॉट्स्कीवाद्यांचे एक केंद्र आहे. त्या सर्वांना सरळ प्रिन्किपोहून आदेश जातात. त्यांची प्रकाशने व जाहीरनामे यांद्वारा, व विशेषेकरून खाजगी पत्रव्यवहाराद्वारा त्यांचा परस्परांशी संपर्क असतो. बर्लिन येथे असलेल्या आंतर्राष्ट्रीय मध्यवर्ती कार्यालयाशी त्या सर्व समित्या जोडल्या गेल्या आहेत.'

ट्रॉट्स्कीच्या चवथ्या इंटरनॅशनबद्दल व त्याची उद्दिष्टे व कार्य याबद्दल ट्रॉट्स्कीला बोलते करण्याचा गंथरने बराच प्रयत्न केला. पण त्या विषयावर ट्रॉट्स्की मूग गिळून होता. मात्र बोलण्याच्या भरात गुप्त कागदपत्रे चोरून लपून पाठविण्याकरिता पोखरून तयार ठेवलेले पुस्तकांचे काही साचे त्याने गंथरला दाखविले. स्पेनमध्ये आंद्रे नील करीत असलेल्या कार्याची त्याने प्रशंसा केली [आन्द्रे नील व त्याचे स्पेनमधील पंचमस्तंभीयांशी संबंध याबद्दल हकीकत प्रकरण १९ मध्ये.]

अमेरिकेतही त्याचे बरेच अनुयायी व त्याच्या कार्याबद्दल सहानुभूती असलेली मंडळी आहेत; फ्रान्स, नॉर्वे व झेकोस्लोवाकिया येथेही ट्रॉट्स्कीवाद्यांचे गट संघटित होत आहेत व त्यांच्या गुप्त कारवायाही सुरू झाल्या आहेत असे त्याने गंथरला सांगितले.

मुलाखतीनंतर गंथरने ट्रॉट्स्कीबद्दल लिहिले, –'ट्रॉट्स्कीच्या हातून रशिया हे राष्ट्र कायमचे सुटले आहे; निदान आज तरी तसेच दिसते आहे. दहा-वीस वर्षांत तरी तो तेथे जाऊ शकेल याची शक्यता नाही. आज ट्रॉट्स्कीचा मुख्य उद्देश एकच आहे–रशियात स्टालिनचे पतन होण्याची वाट पाहात कसे तरी तग धरून राहाणे व तोपर्यंतच्या काळात स्टालिनला शह देणारी, त्याचा निःपात करणारी संघटना बळकट करण्याकरिता सर्व शक्ती पणाला लावणे!' गंथर शेवटी म्हणतो की फक्त एकच गोष्ट ट्रॉट्स्कीला रशियात परत नेऊ शकते–ती म्हणजे स्टालिनचा मृत्यू!'

१९३०–३१ मध्ये ट्रॉट्स्कीने प्रिन्किपोहून चालविलेला लोकविलक्षण सोविएतविरोधी प्रचार लवकरच सर्व राष्ट्रांत पसरला. त्याचे प्रचारतंत्र मोठे नाविन्यपूर्ण होते– मोठे धूर्त, गोंधळात पाडणारे, प्रभावी, तत्पूर्वीच्या कोणत्याही बोल्शेविकविरोधी प्रचारापेक्षा कितीतरी अधिक परिणामकारी! युरोपातही त्या काळी सोविएतांचे शत्रू उदयाला येत होते. इटलीत एके काळी समाजवादी म्हणवून घेणाऱ्या बेनिटो मुसोलिनीने फासिझमच्या रूपाने प्रतिक्रांती घडवून आणली होती व ती इटालियन क्रांती म्हणून तेथील जनतेच्या गळी उतरवली होती. जर्मनीत बोल्शेविकांविरुद्ध प्रचार करून व जर्मन कामगार व शेतकरी यांच्यासमोर आपण 'नॅशनल सोशलिस्ट' असल्याचा देखावा करून नाझी नेते फार मोठ्या प्रमाणावर जनतेचा पाठिंबा आपल्या पक्षाला मिळवून घेत होते.

१९०३ च्या काळातच ट्रॉट्स्कीने अत्यंत प्रभावी असे प्रचारतंत्र अवगत करून घेतलेले होते. त्यावेळी लेनिन व बोल्शेविक पक्ष यांविरुद्ध वापरलेल्या प्रचारतंत्राच्या शस्त्राचा प्रयोग आता जगत्व्यापी क्षेत्रात त्याने सुरू केला. अत्यंत ज्वलज्जहाल लेख, पुस्तके, पत्रके, भाषणे, याद्वारा ट्रॉट्स्की सोविएत राजवटीवर भयानक हल्ले चढवू लागला; व ती राजवट क्रांतिकारी म्हणून नव्हे तर 'प्रतिक्रांतिकारी' 'प्रतिक्रियावादी' असल्याने उलथून पाडणे अगत्याचे आहे असे आवाहन तो करू लागला.

ट्रॉट्स्कीने आरंभलेल्या या प्रचार हल्ल्यामुळे, बोल्शेविकांविरुद्ध लढा चालविणाऱ्या अनेकांनी, आपली झारनिष्ठ व प्रतिक्रांतिवादी भूमिका झाकून ठेऊन, डाव्या भूमिकेचा बुरखा चढवून रशियन क्रांतीवर हल्ला चढविण्याचे ट्रॉट्स्कीचे नवे प्रचारतंत्र अवलंबिण्यास सुरुवात केली. लॉर्ड रॉदरमिअर किंवा विलीयम

अनुक्रमणिका

रॅन्डॉल्फ यांच्यासारख्या कट्टर प्रतिक्रियावाद्यांनी जोसेफ स्टालिनवर क्रांतीचा विश्वासघात केल्याचा आरोप करणे ही एक अगदी स्वाभाविक बाब होऊन गेली.

आंतर्राष्ट्रीय प्रतिक्रांती-चळवळ पुढे रेटण्याकरिता हे नवे प्रचारतंत्र ट्रॉट्स्कीने मोठ्या कौशल्याने कसे राबविले याचे वर्णन त्याने 'माय लाईफ' या आपल्या पहिल्या, काहीशा काल्पनिक व प्रचारकी पुस्तकात केले आहे. स्टालिन व सोविएत संघ यांची अत्यंत तीव्र शब्दात निंदा करणे व त्याविरोधात ट्रॉट्स्कीवादी चळवळीची प्रतिष्ठा उंचावून एक अतुलनीय क्रांतिकारी म्हणून स्वतःची प्रतिमा जगापुढे ठेवणे हा त्या पुस्तकाचा प्रमुख हेतू होता. ट्रॉट्स्की हाच रशियन क्रांतीचा खरा प्रणेता, संघटक व नेता असून, त्याच्या आशियायी, निर्बुद्ध, धूर्त व कपटी विरोधकांनी, असल्याच्या त्याच्या ह्या न्याय्य स्थानापासून त्याला केवळ विश्वासघाताने दूर केले आहे असे स्वतःबद्दलचे चित्र त्याने त्या पुस्तकात रंगवले होते.

लागलीच, रशियन क्रांतीमागील खरी आतली कहाणी सांगणारा ग्रंथ म्हणून सर्व जगात ट्रॉट्स्कीचे ते पुस्तक खपविण्याचा विडा सोविएत विरोधी हस्तक व प्रचारक यांनी उचलला. अडॉल्फ हिटलरने ते वाचले तेव्हा तो त्यामुळे चांगलाच प्रभावित झाला. आपल्या अनुयायांसमोर ते पुस्तक ठेवीत त्याने त्याची तोंड भरून स्तुती केली. त्याला 'त्या पुस्तकापासून पुष्कळच काही शिकायला मिळाले, तुम्हालाही ते शिकता येईल,' असे आपल्या अनुयायांना सांगताना हिटलरचा उत्साह किती ओसंडत होता याचे वर्णन हिटलरचा चरित्रकर कॉनरॅड हेडेन याने केले आहे.

ट्रॉट्स्कीचे ते पुस्तक म्हणजे सगळ्या सोविएत विरोधी गुप्तहेर संस्थांसाठी जणू एक क्रमिक पुस्तक बनले. सोविएत राजवटीविरुद्धच्या प्रचाराला ते पुस्तक आधारभूत व मार्गदर्शक ठरले. जपानी कारागृहातील चिनी-जपानी साम्यवाद्यांनी ते पुस्तक वाचलेच पाहिजे असा दंडक जपानी गुप्त पोलिसांनी घालून दिला होता. त्यामुळे त्यांचे नीतिधैर्य खचेल व सोविएत रशियाने चिनी क्रांतीचा द्रोह केला असल्याची त्यांची खात्री पटेल अशी आशा त्यांना होती. त्या पुस्तकाचा असाच उपयोग जर्मन गेस्टॅपोंनीही करून घेतला.

'माय लाईफ' हा ग्रंथ म्हणजे ट्रॉट्स्कीच्या सोविएत विरोधी प्रचार साहित्याची केवळ एक सलामीची तोफ होती. त्यानंतर 'क्रांतीचा विश्वासघात,' 'सोविएत अर्थकारण धोक्यात,' 'पंचवार्षिक योजनेचा बोजवारा,' 'स्टालिन व चिनी क्रांती,' 'स्टालिनची फसवेगिरी,' अशी अनेक सोविएत विरोधी पुस्तके, पत्रके व लेख त्याने लिहिले. त्यातील बरेच लेख, ठळक मथळे देऊन युरोप व अमेरिकेतील वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केले.

सोविएत रशियात प्रसृत करण्याकरिता 'बुलेटिन ऑफ द अपोझिशन' हे वृत्तपत्र ट्रॉट्स्कीने सुरू केले. तुर्कस्थानातून व नंतर जर्मनी, फ्रान्स, नॉर्वे यांसह अन्य युरोपीय राष्ट्रांतूनही ते प्रकाशित होऊ लागले. गुप्त हेरांद्वारा चोरून लपून ते रशियात पाठविण्यात येत असे. रशियातील ट्रॉट्स्की-अनुयायी, मुत्सद्दी, सरकारी व लष्करी अधिकारी, बुद्धिवादी, यांच्यापर्यंत ते पोहोचावे असा प्रयत्न होता. रशियात व

रशियाबाहेर ट्रॉट्स्कीवाद्यांनी करावयाच्या प्रचारासंबंधी त्यात मार्गदर्शन असे. सोविएत राजवटीचा कसा भयानक शेवट होणार आहे, रशियाच्या औद्योगिक क्षेत्रावर कसा अनर्थ कोसळणार आहे, पुन्हा यादवी युद्धाचा कसा भडका उडणार आहे, व परकीयांच्या पहिल्याच लष्करी आघाताने लाल लष्कर कसे कोलमडणार आहे, अशा भाकितांची भडक कल्पनाचित्रे त्यात सतत रंगविली जात. राष्ट्रउभारणीच्या काळातील अपरिहार्य अशा हालअपेष्टा व आत्यंतिक तणाव यामुळे असंतुष्ट व गोंधळलेल्या रशियन जनमानसात निर्माण होणाऱ्या शंकाकुशंकांचा फायदा घेऊन सोविएत सरकारविरुद्ध हिंसक उठाव घडवून आणण्याचे आवाहन ट्रॉट्स्कीचे ते वृत्तपत्र करीत असे. त्या आवाहनाचे काही मासलेवाईक नमुने लक्षणीय आहेत—

"सोविएत संघाच्या नेतृत्वपदी असलेल्या स्टालिनचा लहानसा गट आज त्या देशाला भरवेगाने अनर्थाकडे व विनाशाकडे खेचून नेत आहे" (मार्च १९३० सोविएत संघाच्या कम्युनिस्ट पक्षसदस्यांना पत्र); 'सोविएत अर्थकारणासमोर उभ्या ठाकलेल्या भयावह संकटांमुळे एका राष्ट्रात समाजवाद उभारला जाऊ शकत नाही हे सत्य आता लवकरच जगापुढे उघड होणार आहे; त्यात अनेक माणसे मृत्युमुखी पडतील याबद्दल आम्हाला तिळमात्रही शंका नाही. तेथील अर्थव्यवस्था कोलमडताच कारखाने व उद्योग बंद पडणे व बेकारी फोफावणे हे त्याचे अपरिहार्य परिणाम ठरलेलेच आहेत, (सोविएत अर्थव्यवस्था धोक्यात १९३२);' उपासमारीने गांजलेले सोविएत संघातील कामगार पक्षनीतीबाबत, तसेत खुद्द पक्षही, नेतृत्वाबाबत अत्यंत असमाधानी आहे. औद्योगिकरण व शेतीचे सामूहिकीकरण यामुळे शेतकऱ्यांच्याही मनात असंतोष धुमसत आहे '('मिलिटंट या अमेरिकन वृत्तपत्रातील लेख, ४ फेब्रुवारी १९३३);' देशाच्या अंतर्गत क्षेत्रातून किंवा बाह्य जगाकडून थोडाही धक्का बसला की अगोदरच पोखरून निघालेल्या सोविएत समाजात लागलीच यादवी युद्धाचा भडका उडेल ('द सोविएत युनियन अँड द फोर्थ इंटरनॅशनल.' १९३३); 'पक्ष किंवा सोविएत ऑल रशियन काँग्रेस स्टालिनच्या नोकरशाहीला पदभ्रष्ट करू शकेल ही समजूत शुद्ध मूर्खपणाची आहे. सत्तारूढ गटाला अधिकारावरून दूर हटवता येईल असे घटनात्मक मार्गच तेथे शिल्लक राहिलेले नाहीत. कामगारांच्या हाती सत्ता सोपविण्यास त्यांना भाग पाडण्याचा एकच मार्ग आहे—बलप्रयोग!' (बुलेटिन ऑफ द अपोझिशन. १९३३); 'सोविएत संघात खदखदत असलेल्या राजकीय असंतोषाचा स्फोट लवकरच राष्ट्रीय संकटाच्या रूपाने होणार हे नक्की!' (किरोव हत्या. १९३५); 'पक्षात स्टालिनने आपले स्थान असे काही निर्माण करून ठेवले आहे की कोणत्याही प्रकारची टीका किंवा राष्ट्रहिताची भावना त्याच्यापर्यंत पोचतच नाही; त्याला दूर करण्यास हत्येशिवाय दुसरा कोणताही मार्ग उरलेला नाही. प्रत्येक राजकीय विरोधक प्रत्यक्ष व्यवहारात स्वाभाविकपणेच दहशतवादी बनतो (न्यूयॉर्क इव्हिनिंग जर्नलच्या विलियम रॅन्डॉल्फ हर्स्ट याला दिलेली मुलाखत, २६ जानेवारी १९३७). 'येत्या महायुद्धातून पराभूत न होता सोविएत संघ बाहेर पडेल हे अशक्यच आहे; तांत्रिक, आर्थिक व लष्करी दृष्ट्या सापेक्षतः साम्राज्यवाद कितीतरी अधिक बलशाली आहे. साम्राज्यवादी राष्ट्रांत क्रांती होऊन ती राष्ट्रे दुबळी झाली नाहीत तर सोविएत संघाच्या सध्याच्या राजवटीचा विनाश ठरलेलाच आहे. '(अमेरिकन मर्क्युरीतील लेख. मार्च १९३७).'

**बर्लिन येथे संकेतस्थळ**

ट्रॉट्स्की सोविएत संघाबाहेर पडल्या क्षणापासूनच, त्याच्याशी संपर्क साधून त्याच्या आंतर्राष्ट्रीय सोविएतविरोधी संघटनेचा फायदा करून घेण्यास परकीय गुप्तहेर सेवांचे हस्तक अत्यंत उत्सुक होते. पोलंडचे 'डिफेन्सिवा', इटालियन फासिस्टांचा 'ओवरा', फिनलंडचे लष्करी हेरखाते, रुमानिया, युगोस्लाविया व हंगेरी या राष्ट्रांत सोविएत विरोधी गुप्त हेर सेवेचे मार्गदर्शन करणारे श्वेत रशियन निर्वासित, आणि ब्रिटिश हेरखाते व फ्रेंच ब्यूरो यांच्यातील प्रतिक्रियावादी गट हे सर्वच स्वार्थ साधण्याच्या हेतूने रशियाच्या त्या पहिल्या क्रमांकाच्या शत्रूशी वाटाघाटी करण्यास अधीर झाले होते. त्यांच्या आंतर्राष्ट्रीय सोविएत विरोधी प्रचाराचा व कारवायांचा प्रसार करण्यासाठी आवश्यक तेवढा पैसा, मदतनीस, हेरगिरीचे जाळे व दूतसेवा हे सर्व भरपूर प्रमाणात ट्रॉट्स्कीच्या हाताशी होते. यापेक्षाही एक महत्त्वाची बाब होती ती म्हणजे जर्मन लष्करी हेरखात्याशी ट्रॉट्स्कीची वाढती जवळीक. त्या हेरखात्याचा प्रमुख कर्नल वॉल्थेर निकोलाय याचे हिमलरच्या गेस्टॅपोशी सहकार्य सुरू होतेच. त्यामुळे, अप्रत्यक्षपणे का होईना, गेस्टॅपो संघटनेपर्यंत ट्रॉट्स्कीचे संबंध पोहोचले होते.

सोविएत संघातील ट्रॉट्स्कीवाद्यांनी जर्मन हेरखात्याला पुरविलेल्या गुप्त माहितीच्या मोबदल्यात १९३० पर्यंत, ट्रॉट्स्कीवाद्यांच्या सोविएत संघातील कारवायांकरिता जर्मन राष्ट्राकडून क्रेस्टिन्स्कीला सुमारे २० लक्ष सुवर्ण मार्क्स मिळाले होते. क्रेस्टिन्स्कीने नंतर सांगितले की–'१९२७ पर्यंत त्या कराराच्या तरतुदींची अंमलबजावणी प्रामुख्याने मास्कोतच झाली. त्यानंतर १९२७ च्या अखेरीपासून तर १९२८ च्या शेवटपर्यंत सुमारे दहा महिन्यांच्या काळात जर्मनीतून ट्रॉट्स्कीवाद्यांकडे वाहणारा द्रव्योघ खंडित झाला; कारण सोविएत संघात ट्रॉट्स्कीवाद चिरडून टाकण्यात आल्याने मी (क्रेस्टिन्स्की) काहीसा एकाकी पडलो होतो. ट्रॉट्स्कीच्या काय योजना आहेत याची मला काहीच कल्पना नव्हती. मला त्याच्याकडून कोणत्याही सूचना किंवा आदेश मिळाले नव्हते. ऑक्टोबर १९२८ मध्ये मात्र मला ट्रॉट्स्कीकडून पत्र आले. त्यावेळी तो अल्मा आता येथे हद्दपारीत होता. जर्मनीकडून मी पैसा घ्यावा असा आदेश त्याने त्या पत्रात मला दिला होता. त्या आदेशानुसार जनरल सीक्टशी मी संपर्क साधला. त्यावेळी त्याने राजीनामा दिला असल्याने तो कोणत्याही पदावर नव्हता. परंतु त्याबद्दल हामरस्टीनशी बोलून त्याने पैसा मिळवला. हामरस्टीन हा त्यावेळी जर्मनीचा लष्करी प्रमुख होता. १९०३ मध्ये तो जर्मनीचा सरसेनापती बनला.'

१९३० मध्ये क्रेस्टिन्स्कीची उपपरराष्ट्रमंत्री पदावर नेमणूक झाल्याने तो बर्लिनहून मास्कोला आला. जर्मनीतील त्याची अनुपस्थिती व नाझींच्या वाढत्या सामर्थ्यामुळे जर्मनीचे ढवळून निघत असलेले राजकारण यामुळे ट्रॉट्स्कीकडे वाहणारा जर्मन द्रव्याचा ओघ पुन्हा अल्पकाळ खंडित झाला. परंतु त्याचसुमारास जर्मनीच्या लष्करी हेरखात्याशी करार करण्यासंबंधी ट्रॉट्स्कीने चालविलेल्या वाटाघाटी फलद्रूप होणार अशी लक्षणे दिसत होती.

फेब्रुवारी १९३१ मध्ये ट्रॉट्स्कीचा पुत्र सेदोव हा जर्मन विज्ञान संस्थेत शिक्षणाकरिता आल्याचा देखावा करून बर्लिन येथे येऊन पोहोचला. तेथे त्याने एक घर भाड्याने घेतले. त्याच्या पासपोर्टवर तो विद्यार्थी असल्याचा निर्देश होता. अर्थात् सेदोवच्या बर्लिन येथील वास्तव्याची खरी कारणे वेगळीच होती.

काही महिन्यांपूर्वी, 'जर्मनी: आंतर्राष्ट्रीय राजकारणाची गुरुकिल्ली' या मथळ्याखाली एक लेख ट्रॉट्स्कीने प्रसिद्ध केला होता. त्याच सुमारास जर्मनीत नाझी पक्षाला ६४ लक्ष मते मिळून त्यांचे १०७ प्रतिनिधी राईशस्टॅगवर निवडून आले होते. सेदोव बर्लिनला आला त्यावेळी जर्मनीची ती राजधानी अतीव उत्कंठा, अपेक्षा व तणाव यांनी भारलेली होती. 'होर्स्ट वेसेल' हे लष्करी गीत म्हणत, ज्यूंच्या दुकानांचा व घरांचा विध्वंस करीत, उदारमतवाद्यांच्या व कामगारांच्या क्लबांवर हल्ले करीत व बर्लिनच्या रस्त्यावरून जोड्यांचा खाडखाड आवाज करीत खाकी गणवेशातील नाझींचे धडक सैनिक संचालने करीत होते. लवकरच जर्मनीची सत्ता त्यांच्या हाती येणार या आत्मविश्वासाने नाझींची मने भरून गेली होती.

अधिकृतपणे जर्मनीत अजूनही लोकशाही शासन होते. जर्मनी व सोविएत रशिया या दोन राष्ट्रांतील व्यापाराने उच्चांक गाठला होता. जर्मन कंपन्यांकडून सोविएत सरकार यंत्रसामुग्री खरेदी करीत होते. रशियातील खनन व विद्युतीकरण प्रकल्पांत जर्मन तंत्रज्ञांना मोठमोठी कामे मिळत होती. सोविएत इंजीनिअर, व्यापारी व वाणिज्य प्रतिनिधी यांची, पंचवार्षिक योजनेशी संबद्ध वस्तूंची खरेदी करण्याकरिता मास्को व बर्लिन येथे सतत ये जा सुरू होती. त्यांपैकी काही ट्रॉट्स्कीचे जुने अनुयायी होते.

सेदोव जर्मनीत आला तो आपल्या पित्याच्या कारस्थानाबाबतच्या कामकाजाकरिता. आपल्या 'लिऑं सेदोव: पुत्र-मित्र-विग्रहक' या ग्रंथात ट्रॉट्स्कीने नमूद केले आहे की रशियाला परतणारे प्रवासी, परदेशात विद्यार्जनाकरिता आलेले सोविएत विद्यार्थी, ट्रॉट्स्कीबद्दल सहानुभूती असलेले परकीय प्रतिनिधी, तसेच, ज्यांच्याद्वारा रशियाशी संपर्क साधता येईल, अशा सर्व धाग्यादोऱ्यांच्या शोधात तो सदैव राहात असे. बर्लिन येथील सोविएत विरोधकांशी संपर्क साधून त्यांना ट्रॉट्स्कीचे आदेश पोचविणे व त्यांच्याकडील बातम्या व कागदपत्रे ट्रॉट्स्कीला पोचविणे हे महत्त्वाचे काम सेदोवकडे सोपविण्यात आले होते. तो व त्याला बातम्या पुरविणारे हस्तक पकडले जाऊ नयेत म्हणून ओ. जी. पी. यू. च्या हेरांना चुकवीत सेदोव बर्लिनच्या रस्त्यांवर तासन् तास भटकत फिरत असे.

बऱ्याच प्रमुख ट्रॉट्स्कीवाद्यांनी सोविएत परराष्ट्र व्यापार मंडळात महत्त्वाची पदे मिळवून घेतली होती. त्यापैकी एक प्रमुख होता तो इवान एन्. स्मिर्नोव—लाल लष्करातील एक माजी अधिकारी व पूर्वीच्या ट्रॉट्स्की—रक्षकांपैकी एक आघाडीचा सदस्य! हद्दपारीत काही काळ घालविल्यानंतर इतर ट्रॉट्स्कीवाद्यांची नीती स्मिर्नोबनेही अवलंबिली होती. ट्रॉट्स्कीचा धिक्कार करून बोल्शेविक पक्षात पुनः प्रवेश मिळवून घेण्याकरिता त्याने विनंती अर्ज केला होता. व्यवसायाने इंजीनिअर असलेल्या स्मिर्नोवने दळणवळण उद्योगात नोकरी मिळवली होती. १९३१ च्या प्रारभी बर्लिनला जाणाऱ्या सोविएत व्यापार-शिष्टमंडळात सल्लागार इंजीनिअर म्हणून तो बर्लिनला आला होता.

स्मिर्नोव बर्लिनला येताच सेदोवने त्याच्याशी संधान बांधले. कधी सेदोवच्या घरी, तर कधी उपनगरातील एखाद्या उपहारगृहात, किंवा बिअर हॉलमध्ये त्यांच्या गुप्त बैठकी होत. जर्मन लष्करी हेरखात्याच्या हस्तकांच्या सहकार्याने करण्यात येत असलेल्या विरोधकांच्या पुनःसंघटनेसंबंधीच्या

अनुक्रमणिका

ट्रॉट्स्कीच्या योजनांची माहिती सेदोवने स्मिर्नोवला दिली. सोविएत राजवटीविरुद्धच्या लढ्याचे स्वरूप आता लवकरच आक्रमक बनणार आहे, ट्रॉट्स्कीवादी, झिनोवीववादी, बुखारिनवादी, मेन्शेविक, रेव्होल्यूशनरी, या व अन्य सर्व सोविएतविरोधी गटांनी आपसातील राजकीय मतभेद किंवा स्पर्धा मिटवून टाकून एक संयुक्त आघाडी निर्माण केली पाहिजे, सोविएतविरोधी संघर्षाने आता आक्रमक भूमिका घेतली पाहिजे, सोविएत सरकारविरुद्ध घातपाताची व दहशतवादाची एक राष्ट्रव्यापी मोहीमच सुरू व्हायला पाहिजे. त्याचा सर्व तपशील आखणे अगत्याचे आहे; फार मोठ्या क्षेत्रात विरोधकांनी सर्व दिशांनी आघात केले तर सोविएत सरकारात निश्चितच गोंधळ माजेल, त्यांचे मनोधैर्य खचेल आणि मग विरोधकांना सहजपणे सत्ता काबीज करता येईल असे सेदोवने त्याला सांगितले.

मास्कोमधील सर्वात विश्वसनीय अशा सोविएत विरोधकांना भूमीगत कार्यवाहीच्या पुनःसंघटनेबाबत ट्रॉट्स्कीचे मार्गदर्शक आदेश पोचवायचे व घातपात व दहशतवाद याची सिद्धता करावयाची हे महत्त्वाचे काम स्मिर्नोवकडे सोपविण्यात आले. जर्मन लष्करी हेरखात्याला पुरवावयाची महत्त्वाची गुप्त माहितीही ट्रॉट्स्कीच्या दूतांद्वारा सेदोवकडे पोहोचेल अशी व्यवस्था त्याने करावयाची होती. ट्रॉट्स्कीदूतांची ओळख पटविण्याकरिता 'मी गाल्याकडून अभिवादनपर निरोप आणला आहे' हे परवलीचे शब्द असतील असेही त्याने स्मिर्नोवला सांगितले.

स्मिर्नोवने त्याच्या बार्लिन येथील मुक्कामात आणखी एक काम करावे अशी विनंती सेदोवने केली. बर्लिन येथे नुकत्याच आलेल्या सोविएत व्यापारी मंडळाच्या प्रमुखाला भेटून एका अत्यंत महत्त्वाच्या कामाकरिता सेदोवला त्याची भेट हवी असल्याबद्दल त्याला कळवावे असे त्याने स्मिर्नोवला सांगितले. त्या व्यापारी शिष्टमंडळाचा नेता होता युरी लिओनोदोविच प्यातकोव. हा ट्रॉट्स्कीबद्दल अपार कौतुक बाळगून असलेला जुना ट्रॉट्स्कीवादी होता. सडसडीत, उंच, अद्यावत पोषाख केलेला, फिक्कट अंगकांतीचा, कटकारस्थानात मुरलेला प्यातकोव एखाद्या विद्वान प्रोफेसरासारखा वाटायचा. १९२७ मध्ये स्टॉलिन सरकार उलथून पाडण्याचा कट अपयशी ठरल्यानंतर ट्रॉट्स्कीचा निषेध करून पुनः पक्षसदस्यत्वाकरिता विनंतीअर्ज करणारा प्यातकोव हा पहिला ट्रॉट्स्कीवादी होता. व्यापार, व्यवस्थापन व संघटन याबाबतचे त्याचे कौशल्य वादातीत होते. त्यामुळे विकासाचे टप्पे वेगाने पार करणाऱ्या सोविएत उद्योगात अनेक चांगली पदे, सैबेरियातील त्याच्या हद्दपारीच्या काळातही त्याला देण्यात आली होती. १९२९ अखेरी त्याला पक्षातही प्रवेश दिला गेला होता. दळणवळण व रसायन–नियोजन मंडळाचे अध्यक्षपदही नंतर त्याला मिळाले. १९३१ मध्ये तर सोविएत संघाच्या सर्वोच्च आर्थिक मंडळावरही त्याला घेण्यात आले. त्याच वर्षी सोविएत सरकार तर्फे औद्योगिक यंत्रसामुग्री व उपकरणे खरेदी करण्याकरिता जर्मनीला गेलेल्या व्यापारी मंडळाचा प्रमुख म्हणून तो बर्लिनला आला.

सेदोवच्या सूचनेनुसार त्याचा निरोप स्मिर्नोवने प्यातकोवला कळविला. त्यानंतर थोडेच दिवसात प्यातकोव सेदोवला भेटला. त्या भेटीचा खुद्द प्यातकोवने दिलेला वृत्तांत असा,–

अनुक्रमणिका

‘प्राणिसंग्रहालयाच्या नजीकच्या ‘आम झू’ या उपहारगृहात एका छोट्याशा टेबलाशी बसलेल्या सेदोवला मी भेटलो. आमची एकमेकांशी चांगली ओळख होतीच. मी बर्लिनमध्ये आल्याचे कळल्याने मला भेटून बोलणे करण्याबाबत ट्रॉट्स्कीने सेदोवला कळविले होते. ट्रॉट्स्कीच्या हद्दपारीनंतरच्या अस्थिरतेच्या काळात सोविएत नेतृत्त्वाविरुद्धचा लढा काहीसा थंडावला असला तरी तो आता पुन्हा नव्याने सुरू होत आहे असे सांगून त्या लढ्यात सहभागी होण्याची माझी तयारी आहे की नाही असे सेदोवने मला स्पष्टच विचारले. त्यावर माझा होकार असल्याचे मी सेदोवला सांगितले.’

प्यातकोवकडून सहकार्याचे आश्वासन मिळताच विरोधकांचे पुनःसंघटन ट्रॉट्स्की कोणत्या प्रकारे करणार आहे याची माहिती सेदोवने प्यातकोवला दिली. प्यातकोवने पुढे यासंबंधी माहिती दिली—

“यानंतर लढ्याच्या नव्या तंत्राची रूपरेषा सेदोवने स्पष्ट केली. त्यांच्या दृष्टीने रशियात जनतेची चळवळ उभी करण्याचा प्रश्नच उपस्थित होत नव्हता. कारण तसा प्रयत्न अपयशी ठरणार हे उघडच होते. म्हणून दहशतवाद व अंतर्घात या मार्गांनी स्टालिनचे नेतृत्व उलथून पाडण्याची कल्पना ट्रॉट्स्कीला अधिक ग्राह्य वाटते; तसेच हा लढा केवळ रशियापुरता मर्यादित राहणार नसून, त्याची आंतर्राष्टीय बाजू विचारात घेऊन त्यावर तोडगा शोधून काढणे अगत्याचे आहे; तो प्रश्न दृष्टीआड करणे म्हणजे आपली बौद्धिक दिवाळखोरी जाहीर करण्यासारखे आहे असे ट्रॉट्स्कीचे मत असल्याचे सेदोवने सांगितले.’

थोड्याच दिवसांनी सेदोव व प्यातकोव यांची दुसऱ्यांदा बैठक झाली. त्यावेळी सेदोव प्यातकोवला म्हणाला, ‘आता लढा सुरू होणार तर त्याकरिता पैसा लागणारच. तो पैसा तू पुरवू शकतोस.’ ते कसे करायचे हेही सेदोवने प्यातकोवला सांगितले. सोविएत सरकारचा अधिकृत व्यापारी प्रतिनिधी म्हणून प्यातकोवने बोर्सिंग व डेमाग या दोन व्यापारी कंपन्याकडून जास्तीत जास्त माल खरेदी करावा; किमतीबाबत त्याने त्या कंपन्यांशी मुळीच घासाघीस करू नये; ट्रॉट्स्कीने त्यांच्याशी एकंदर व्यवहाराबाबत व्यवस्था केलेली आहे; ‘तुम्ही केलेल्या खरेदीची तुम्हाला वाजवीपेक्षा जास्त किंमत द्यावी लागेल, पण तो पैसा आपल्या कार्याच्या कामी येईल.’ असे सेदोवने प्यातकोवला सांगितले. [बोर्सिंग व डेमाग या कंपन्या म्हणजे जर्मन लष्करी हेरखात्याचा केवळ एक दर्शनी भाग होता. त्या कंपन्यांशी खरेदीसंबंधीचा व्यवहार करून प्यातकोवने बराच मोठा पैसा ट्रॉट्स्कीला उपलब्ध करून दिला. सोने व तांबे—खाण उद्योगांचा तज्ज्ञ म्हणून सोविएत सरकारच्या सेवेत असलेला अमेरिकन इंजीनिअर जॉन डी लिटिलपेज याने प्यातकोवचे ते व्यवहार एका त्रयस्थाच्या भूमिकेतून स्वतः प्रत्यक्षपणे पाहिले होते. सोविएत रशियातील त्याच्या अनुभवांबद्दल एक लेखमाला लिटिलपेजने जानेवारी १९३८ मध्ये सॅटरडे इव्हिनिंग पोस्ट मध्ये प्रसिद्ध केली. तो लिहितो—‘१९३१ च्या वसंतात प्यातकोवच्या नेतृत्वाखाली एका खरेदी आयोगाबरोबर मी बर्लिनला गेलो. खनन उद्योगाला लागणारी यंत्रसामुग्री खरेदी करताना तांत्रिक सल्ला देणे हे माझे काम होते. बर्लिनला गेलेल्या या शिष्टमंडळाला, बाकीच्या अनेक बाबींबरोबर १०० ते १००० अश्वशक्तीचे अनेक यंत्री पाळणे खरेदी करावयाचे होते. दर किलोला किती फेनिंग्ज् या आधारावार आयोगाने काही जर्मन कंपन्यांना भाव विचारला होता. बऱ्याच चर्चेनंतर बोर्सिग व डेमाग या कंपन्यांनी दर किलोग्रामला ५ ते ६ फेनिंग्जपर्यंत त्यांचे भाव कमी केले. मी त्यांचे प्रस्ताव अभ्यासिले. तेव्हा माझ्या लक्षात आले की रशियाच्या मागणीत निर्देश केलेल्या कमी वजनाच्या पोलादाऐवजी कितीतरी टनांनी अधिक जड अशा ओतीव लोखंडाचे तळ असलेले यंत्री पाळणे त्या कंपन्यांनी विक्रीकरता पुढे केले होते; कारण त्या पाळण्यांचे उत्पादन मूल्य खूपच कमी होते. खरीद दाराला मात्र, त्यांचे वजन भलतेच जास्त असल्याने त्यांची पुष्कळच अधिक किंमत मोजावी लागणार होती.

‘त्या कंपन्यांची ती लबाडी पकडल्याच्या आनंदातच मी ती गोष्ट आयोगाच्या नजरेस आणून दिली. तो सर्व सौदा इतक्या चतुराईने केला गेला होता की कमीत कमी किंमतीत यंत्रीपाळणे खरेदी केल्याची प्रौढी प्यातकोव मास्कोला परतल्यानंतर मिरवू शकला असता. परंतु प्रत्यक्षात, तो जी किंमत मोजणार होता, ती अत्यंत कमी उत्पादन मूल्याच्या ओतीव लोखंडाची असल्याने सोविएत रशियाला तो सौदा फार महागात पडणार

अनुक्रमणिका

होता, तर उलट त्या कंपन्यांच्या पदरी पुष्कळच जास्त नफा पडणार होता मी ती बाब उघडकीस आणल्याने तो सौदा झाला नाही हे खरे; परंतु अन्य अनेक खाणींकरिता करावयाच्या खरेदीबाबत प्यातकोवने अशी लबाडी हेतुपुरस्सर केली.'

उरल क्षेत्रातील उद्योगांतही घातपाताची अनेक उदाहरणे लिटिल्पेजच्या लक्षात आली. तेथे काबाकोव या ट्रॉट्स्कीवादी इंजीनियरने तेथील खाणींचे उत्पादन कमीत कमी व्हावे अशी व्यवस्था केली. लिटिल्पेज म्हणतो की, १९३७ मध्ये औद्योगिक घातपाताच्या गुन्ह्याकरिता काबाकोवला अटक करण्यात आली तेव्हा त्याला त्याचे मुळीच आश्चर्य वाटले नव्हते. १९३७ मध्येच, प्यातकोवच्या मार्गदर्शनाखाली सोविएत उद्योगात घडून येत असलेल्या घातपाताचा आणखीही पुरावा लिटिल्पेजला मिळाला. कझाकस्तानमधील काही समृद्ध खाणींचे पुनरायोजन स्वतः करून, जास्तीत जास्त उत्पादन व्हावे या दृष्टीने त्या खाणींच्या कामकाजाबाबत सोविएत कामगारांकरिता लेखी सूचना लिटिल्पेजने देऊन ठेवल्या होत्या. लिटिल्पेज म्हणतो, 'असे असूनही रशियातून परत निघताना मी शेवटचे काम केले ते त्याच खाणींवर! त्या खाणींच्या कामकाजात आलेल्या अडचणींमुळे मला त्यावेळी तेथे घाईघाईने बोलावण्यात आले होते. तेथे जाताच माझ्या लक्षात आले की माझ्या लेखी सूचना धाब्यावर बसवून प्यातकोवच्या आदेशानुसार निराळ्याच पद्धतीने त्या खाणींचे कामकाज चालविण्यात आले होते व त्यामुळे हजारो टन खनिज द्रव्याचा पूर्ण नाश झाला होता. असेच आणखी काही दिवस चालले असते तर त्या खाणीच पूर्णपणे नष्ट झाल्या असत्या.' ट्रॉट्स्कीवाद्यांनी हेतुपुरस्सर केलेल्या घातपाताच्या अशा अनेक घटना लिटिल्पेजच्या लक्षात आल्या. रशिया सोडण्यापूर्वी तत्संबंधी अहवाल त्याने सोविएत श्रेष्ठींना सादर केला. त्या आधारे नंतर अनेक ट्रॉट्स्कीवाद्यांना अटक झाली. घातपात करण्याच्या हेतूने, लिटिल्पेजने दिलेल्या सूचनांच्या पूर्णपणे विरुद्ध कार्यवाही करून ट्रॉट्स्कीवादी त्यांचे उद्दिष्ट साध्य करून घेत होते. त्याच्या मार्गदर्शनाचा नेमका तेवढाच उपयोग त्यांनी करून घेतला. 'स्टालिन राजवटीचे उन्मूलन करून सत्ता काबीज करण्याइतके ते शक्तिशाली बनले आहेत अशी विरोधकांनी आमची समजूत करून दिली व आम्हाला त्यांच्या कारस्थानाच्या जाळ्यात अडकविले' अशी कबुली मागून झालेल्या न्यायालयीन चौकशीत घातपात करणाऱ्यांनी दिली असेही लिटिल्पेजने सॅटरडे इव्हिनिंग पोस्टला सांगितले.]

याशिवाय १९३१ मध्ये त्या काळी बर्लिनमध्ये असलेल्या आणखीही दोन गुप्त सोविएत विरोधकांना सेदोवने ट्रॉट्स्की-कारस्थानाच्या यंत्रणेला जुंपले. एक होता प्यातकोवच्या व्यापार आयोगातील इंजीनियर—अलेक्सी शेस्तोव, व दुसरा होता सोविएत संघाच्या बर्लिन येथील व्यापार प्रतिनिधी मंडळाचा सदस्य सर्जी बेसनोव. हे मंडळ युरोपातील निरनिराळ्या दहा देशांशी व्यापारी वाटाघाटी करणारे सोविएत संघाचे युरोपातील मध्यवर्ती व्यापारमंडळ होते. त्या मंडळाचा कायम सदस्य म्हणून बेसनोवची बर्लिन येथे नियुक्ती झाल्याने रशियातील ट्रॉट्स्कीवादी व त्यांचा हद्दपार नेता ट्रॉट्स्की यांतील दुवा म्हणून काम करणे त्याला सहज शक्य होत होते. रशियातून ट्रॉट्स्की—हस्तकांतर्फे गुप्त कागदपत्रे बेसनोवकडे यावीत व ती त्याने सेदोवकडे किंवा ट्रॉट्स्कीकडे पोचवावी अशी व्यवस्था होती.

अलेक्सी शेस्तोव ही एक निराळीच वल्ली होती. त्याला देण्यात आलेले काम त्याच्या स्वभावाला साजेसेच होते. सैबेरियाच्या 'ईस्टर्न अँड सैबेरियन कोलट्रस्ट' च्या बोर्डाचा तो सदस्य होता. त्यामुळे हेरगिरी व घातपात करणाऱ्या सैबेरियातील ट्रॉट्स्कीवादी गटांचा प्रमुख संघटक म्हणून त्याला नेमण्यात आले होते. १९२३ मध्ये, मास्को खननशिक्षण केंद्रात विद्यार्थी असतानाच तो ट्रॉट्स्कीवाद्यांना सामील झाला होता. १९२७ मध्ये, मास्को येथील ट्रॉट्स्की—अनुयायी चालवीत असलेल्या गुप्त मुद्रणालयाचा तो प्रमुख बनला. ट्रॉट्स्की म्हणजे त्याचे जणू दैवत होते. त्याच्या दृष्टीने खरा नेता एकच होता—ट्रॉट्स्की!

'अनुकूल संधीची वाट बघत नुसते बसून राहण्यात अर्थ नाही.' बर्लिन येथे सेदोव त्याला सांगीत होता, 'स्टालिनचे नेतृत्व व त्याची नीती यावर सर्व शक्तीनिशी आपण हल्ला चढविला पाहिजे, आणि दहशतवाद व बलप्रयोग या मार्गाने स्टालिन व त्याच्या सहकाऱ्यांना नाहीसे केले पाहिजे.'

अनुक्रमणिका

जर्मन उद्योगपती डेहलमन हा जर्मनीतील फ्रोलिच-क्लुफेल-डेहलमन कंपनीचा संचालक होता. त्या कंपनीचे बरेच इंजीनियर्स पश्चिम सैबेरियातील खाणींवर सोविएत संघाच्या नोकरीत होते. शेस्तोवही तेथेच कामाला होता. सोविएत अर्थव्यवस्था दुबळी करण्याकरिता डेहलमनचा चांगला उपयोग करून घेता येईल असे वाटल्याने रशियाला परत जाण्यापूर्वी त्याने डेहलमनला भेटावे असे सेदोवने शेस्तोवला सांगितले. सोवएत संघात चोरून लपून प्रचार साहित्य व हस्तक पाठविणे हे कार्य डेहलमन करीत होताच; त्या मोबदल्यात सैबेरियातील नव्या खाणी व उद्योग याबद्दल डेहलमनला हवी असलेली माहिती शेस्तोवने डेहलमनला पुरवावी असे आदेश सेदोवने शेस्तोवला दिले.

'म्हणजे तुम्ही मला हेर बनायला सांगत आहात!' शेस्तोव काहीसा अस्वस्थ होऊन उद्गारला.

'मग त्यात काय झाले? लढा द्यायचा तर असे चोखंदळ बनून चालत नाही'; सेदोव त्याला सांगत होता, 'तुला दहशतवाद चालतो, खाण उद्योगात विनाशकारी घातपात करणे तुला चालते, मग मी म्हणतो आहे तेवढे काम करण्यास तुला काय अडचण वाटते हेच मला समजत नाही.'

तरीही शेस्तोवच्या मनाची चलबिचल त्याला स्वस्थता लाभू देईना. तेव्हा त्याबाबत शेस्तोवने स्मिर्नोवकडे तक्रार केली. परंतु त्यानेही शेस्तोवची चांगलीच कानउघाडणी केली. तो म्हणाला—'आता अधिक वेळ वाया घालविण्यात अर्थ नाही. आपण आता ताबडतोब कार्यवाही केली पाहिजे. कुझबाजमधील सर्व प्रतिक्रांतीवादी शक्ती संघटित केल्यास स्टालिन राजवट उलथून पाडण्यास मदत होईल असे आम्हाला वाटले तर त्यात तुला इतके आश्चर्य कशाला वाटायला हवे? आणि जर्मन हस्तकांचा त्याकरिता उपयोग करून घेतला तर त्यात एवढे भयंकर ते काय? आता नको ती चिकित्सा करण्यात अर्थ नाही. कारण, दुसरा काही पर्यायच आपल्याजवळ उरलेला नाही.'

शेवटी ट्रॉट्स्कीच्या हुकुमाची तामिली करण्याचे शेस्तोवने कबूल केले. बर्लिन सोडण्यापूर्वी ट्रॉट्स्कीला पैसा पुरविणाऱ्या हर डेहलमनला तो भेटला. हेर म्हणून 'अल्योशा' या सांकेतिक नावाने त्याची जर्मन लष्करी हेरखात्यात भरती करण्यात आली. नंतर शेस्तोवने आपल्या निवेदनात सांगितले—'कंपनीचा संचालक डेहलमन व त्याचा मदतनीस कोच याला मी भेटलो. कुझनेत्स क्षेत्रात काम करणाऱ्या त्या कंपनीच्या प्रतिनिधींना गुप्त माहिती पुरविणे व ट्रॉट्स्कीवाद्यांसोबत त्यांच्या घातपाती कारवायांचे आयोजन करणे या मुद्यांवर त्यांच्याशी बोलणी झाली. आमच्या संघटनेला बळकटी आणण्याकरिता आमच्या मागणीनुसार जास्तीची माणसे पाठवून शक्य त्या सर्व मार्गांनी मदत करण्याचे त्यांनी मला आश्वासन दिले. [पश्चिम सैबेरियात व उरल प्रदेशात स्टालिन उभारीत असलेल्या मूलभूत अवजड उद्योगधंद्यांमुळे जर्मनी अत्यंत चिंताग्रस्त झाले होते. सोविएत उद्योगांना आधारभूत ठरणारे ते विशाल औद्योगिक प्रकल्प जर्मनीच्या बॉंबफेकी विमानांच्या झेपकक्षेबाहेर होते. त्यामुळे युद्धकाळात ती बाब जर्मनीला प्रतिकूल तर सोविएत संघाला अत्यंत अनुकूल ठरणार होती. या कारणामुळे या मूलभूत उद्योगांत हेरांद्वारा शिरकाव करून घेऊन घातपाती उद्योग जर्मनीने आरंभले होते. बोर्सिग, डेमाग, फ्रोलिच्-क्लुपफेल डेहलमन या कंपन्यांकडून पंचवार्षिक योजनेकरिता लागणारी यंत्रसामुग्री विकत घेणे व तांत्रिक मदत करणे याबाबत सोविएत संघाचे त्यांच्याशी करार झाले होते. त्या कंपन्यांचा उपयोग, इंजीनियर व तज्ज्ञ यांच्या नावाखाली जर्मन हेर सोविएत संघात पाठविण्याकरिता जर्मन लष्करी हेरखाते करून घेत होते.

अनुक्रमणिका

जर्मनीत असलेल्या सोविएत इंजीनियरांनाही (जे लाचलुचपतीला बळी पडणे शक्य होते त्यांना) जर्मन गुप्त हेर खात्याने आपल्या जाळ्यात ओढले होते. असाच एक इंजीनियर मिखाईल स्त्रोईलोव बर्लिन येथे जर्मन हेर म्हणून डिसेंबर १९३० मध्ये नेमला गेला होता. त्याला नंतर सैबेरियातील ट्रॉट्स्कीवाद्यांच्या कटात सामील करण्यात आले. १९३७ मध्ये त्याला अटक करण्यात आल्यानंतर न्यायालयासमोर त्याने जबानी दिली ती अशी—'जर्मन हेर वॉन बर्ग याच्याशी माझी भेट झाल्यानंतर त्या सर्व प्रकाराला सुरुवात झाली. क्रांतीपूर्वी सुमारे १५ ते २० वर्षे वॉन बर्ग रशियात राहिलेला असल्याने रशियन भाषा त्याला चांगली अवगत होती. या माणसाने टेक्निकल ब्यूरोला अनेकदा भेट दिली व व्यापारासंबंधी माझ्याशी चर्चा केली. बर्गने मला ट्रॉट्स्कीचे आत्मचरित्र वाचण्याची शिफारस केली. परवलीचा ठरलेला शब्द वापरून अनेक जर्मन तज्ज्ञ नोवोसिबिर्स्क येथ मला भेटायला येऊ लागले. १९३४ अखेरीपर्यंत एकूण सहा जर्मन हेर मला भेटायला आले. ते सर्व फ्रोलिच—क्लुपफेल डेहलमन या जर्मन कंपनीचे हस्तक होते. रशियातील कुझनेत्स क्षेत्रात औद्योगिक विकासाची जी प्रचंड प्रमाणावरील योजना साकार होत होती त्याबद्दल जानेवारी १९३२ मध्ये मी इंजीनियर फ्लेसाद्वारा दिलेला पहिला अहवाल म्हणजे शुद्ध हेरगिरीच होती. त्यानंतर, मी घातपाती व विनाशकारी कृत्ये करण्यास प्रारंभ करावा अशा सूचना मला देण्यात आल्या. त्याकरिता पश्चिम सैबेरियातील ट्रॉट्स्कीवादी संघटनेने योजना आखली होती.]

शेस्तोव सोविएत रशियात परत आला त्यावेळी प्यातकोवला देण्याकरिता एक पत्र सेदोवने त्याच्या स्वाधीन केले होते. ते पत्र ट्रॉट्स्कीने प्रिन्किपोहून लिहिले होते. सोविएत संघातील विरोधकांसमोर असलेल्या तीन निकडीच्या कामांचा उहापोह त्यात केलेला होता. दहशतवादाने स्टालिन व त्याचे सहकारी यांचे उन्मूलन करण्याकरिता शक्य त्या सर्व मार्गाचा अवलंब करणे, दुसरे म्हणजे सर्व स्टालिनविरोधी शक्ती संघटित करणे—म्हणजेच जर्मन लष्करी हेरखाते व इतर सर्व सोविएतविरोधी शक्तींशी हातमिळवणी करणे; व तिसरे म्हणजे सोविएत सरकारचे व पक्षाचे सर्व आदेश व सर्व कार्यवाही-विशेषेकरून आर्थित क्षेत्रातील—उधळून लावणे, याची निकड ट्रॉट्स्कीने प्रतिपादिली होती. प्यातकोव हा सोविएत रशियातील ट्रॉट्स्कीच्या कारस्थान यंत्रणेचा प्रमुख राहणार असल्याचेही त्या पत्रात नमूद करण्यात आले होते.

### तीन स्तर

१९३२ साली रशियातील विरोधकांच्या भूमीगत जगातील पंतमस्तंभ क्रियाशील होऊ लागला. छोट्या छोट्या छुप्या बैठकींत ट्रॉट्स्कीवाद्यांना कारस्थानाची नवी दिशा व सदस्यांनी करावयाची कामे समजावून सांगण्यात येऊ लागली. दहशतवाद्यांची लहानलहान केंद्रे व दूतसेवांचे जाळे देशभर पसरविण्यात आले. मास्को, लेनिनग्राड, कॉकेशस, सैबेरिया, डोनबास, उरल अशा सर्व क्षेत्रात, सोशल रेव्होल्यूशनरी मेन्शेविक डावे-उजवे राष्ट्रवादी, अराजकतावादी, श्वेत रशियन फासिस्ट, राजसत्तावादी, हेर, हस्तक, अशा सर्व सोविएत विरोधकांच्या गुप्त बैठकी घेऊन ट्रॉट्स्कीवादी संघटक त्यांना ट्रॉट्स्कीचा संदेश पोहोचवीत होते. सोविएत राजवटीविरुद्ध नवा आक्रमक पवित्रा साकार होत होता.

दहशतवादी कृत्यांची ट्रॉट्स्की करीत असलेल्या अट्टाहासी मागणीमुळे प्रारंभी ट्रॉट्स्की गटापैकी काही जुने बुद्धिवादी चांगलेच अस्वस्थ झाले. प्यातकोवने त्या नव्या मार्गाची माहिती करून देताच कार्ल रादेकच्या मनात तर धडकीच भरली. त्याने दहशतवादाच्या त्या मार्गाच्या योग्यायोग्यतेविषयी ट्रॉट्स्कीकडे साशंकता व्यक्त करताच फेब्रुवारी १९३२ मध्ये खुद्द ट्रॉट्स्कीकडून उत्तर आले. मनाची घालमेल होत असलेल्या आपल्या त्या अनुयायाला ट्रॉट्स्कीने लिहिले होते—'गतकाळच्या अनुभवावरून तुला एक गोष्ट तर कळलीच असेल, की ज्या मार्गावर तू एकदा पाऊल ठेवले आहेस तेथून आता परत फिरणे नाही.

अनुक्रमणिका

आपल्या संघर्षाचे नवे पर्व आता सुरू होत आहे; त्यात सोविएत संघासह एक तर आपण सगळे नष्ट होऊन जाऊ, अथवा नेतृत्व बदलाचा प्रश्न घसाला लावून आपण सत्ता काबीज करू.'

ट्रॉट्स्कीचे पत्र व प्यातकोवचा अत्याग्रह यामुळे शेवटी रादेकच्या मनाची तयारी झाली. दहशतवाद, घातपात, परकीय सत्तांशी हातमिळवणी याला रादेकने मान्यता दिली.

संपूर्ण सोविएत संघात दहशतवादी केंद्राची उभारणी करणाऱ्यात सर्वाधिक क्रियाशील व कुशल संघटक होते ते इवान स्मिर्नोव व त्याचे ट्रॉट्स्की-रक्षक-दलाचे जुने सहकारी सर्ज भ्राच्कोवस्की व इफ्राईम द्रेईत्झर. स्मिर्नोवच्या मार्गदर्शनाखाली त्या दोघांनी व्यावसायिक हत्यारे व हिंसक मार्ग पत्करण्याची तयारी असलेले ट्रॉट्स्कीचे यादवी युद्धकालीन सहकारी यांचे लहान लहान गट संघटित करण्यास प्रारंभ केला. १९३२ मध्ये अशा एका गटासमोर बोलताना भ्राच्कोवस्कीने सांगितले की सोविएत संघाच्या साम्यवादी पक्षाचे धोरण अपयशी ठरेल ही आशा दुरावली असून आजपर्यंत आपण अवलंबिलेल्या मार्गांचे कोणतेही अपेक्षित ते फळ आपल्या पदरात पडलेले नाही. आता आपल्या उद्दिष्टसिद्धीकरिता आपल्यासमोर एकच मार्ग उरला आहे—हिंसक मार्गाने सोविएत पक्षनेतृत्व नष्ट करणे. स्टालिन व अन्य सोविएत नेत्यांना नाहीसे केलेच पाहिजे. ही एकच कामगिरी आपल्याला करावयाची आहे.'

दरम्यान, निरनिराळ्या औद्योगिक क्षेत्रातील, विशेषतः शस्त्रास्त्र निर्मिती व दळणवळण या क्षेत्रातील विरोधकांना हुडकून काढून, सोविएत अर्थकारणाविरुद्ध ट्रॉट्स्की—नियोजित घातपाताच्या उद्योगाला त्यांना जुंपण्याची मोहीम प्यातकोवने सुरू केली. गतकाळातील सर्व मतभेद व चुरस विसरून जाऊन ट्रॉट्स्कीच्या सर्वोच्च नेतृत्वाखाली संघटित होऊन काम करण्याबाबत ट्रॉट्स्की-प्रतिनिधी म्हणून प्यातकोव, व उजव्या विरोधकांचा नेता म्हणून बुखारिन यांच्यात १९३२ च्या ग्रीष्मात वाटाघाटी झाल्या. झिनोवीव व कामेनेव या जुन्या विरोधकांनीही ट्रॉट्स्कीच्या नेतृत्वाखाली कार्य करण्याची तयारी दर्शविली. या वाटाघाटींबद्दल नंतर बुखारिनने सांगितले—'प्यातकोव, टोम्स्की, रिकोव यांच्याशी मी बोलणी केली. तर कामेनेव, झिनोवीव, प्यातकोव यांच्याशी रिकोवने वाटाघाटी केल्या. १९३२ मध्येच अवजड उद्योगधंद्यांच्या मंत्रालयात माझे प्यातकोवशी पुन्हा बोलणे झाले. यावेळी प्यातकोव माझा वरिष्ठ अधिकारी असल्याने कामकाजानिमित्त मी त्याच्या कार्यालयात जातच असे. त्यामुळे मी तेथे जाण्यामुळे कोणालाही शंका येण्याचे कारणच नव्हते. या बैठकीत, सर्व मतभेद बाजूला सारून नीती व कार्यवाही याबाबत आमच्यात एकवाक्यता व्हावी असे आम्ही ठरविले.'

त्याच वर्षीच्या शरदात मास्कोबाहेरील एका ओसाड पडलेल्या घरात विरोधकांची गुप्त बैठक होऊन शेवटची बोलणी झाली. बैठक चालू असता त्या घराभोवती व घराकडे येणाऱ्या सर्व मार्गांवर सशस्त्र पहारेकरी ठेवण्यात आले होते. लवकरच संपूर्ण रशियात सुरू व्हावयाच्या दहशतवादाच्या व घातपाताच्या मोहिमेचे मार्गदर्शन करण्याकरिता सर्व विरोधकांचे 'उजवे व ट्रॉट्स्कीवादी गट' या नावाने एक सर्वोच्च नेतृत्व यावेळी प्रस्थापित करण्यात आले. निरनिराळ्या तीन स्तरांवर या नेतृत्वाची उभारणी करण्यात आली होती. एका स्तरावरील दहशतवाद्यांच्या कारवाया उघडकीस येऊन कोणाची धरपकड झालीच तर

त्याबरोबर इतरही सर्वजण पकडले जाऊ नयेत, दुसऱ्या स्तराकडून कार्यवाही चालू राहावी याकरिता तशी व्यवस्था करण्यात आली होती. झिनोवीवच्या नेतृत्वाखालील ट्रॉट्स्कीवादी—झिनोवीववादी दहशत केंद्र हा पहिला स्तर होता. संपूर्ण रशियातील दहशतवादी कार्यवाहीचे संघटन व मार्गदर्शन करण्याची जबाबदारी या केंद्राकडे होती. ट्रॉट्-स्कीवाद्यांचे तशाच स्वरूपाचे केंद्र हा दुसरा स्तर होता. प्यातकोव हा त्याचा नेता असून घातपाती कार्यवाहीचे मार्गदर्शन ते केंद्र करणार होते. तर तिसरा सर्वात महत्त्वाचा स्तर होता तो उजवे व ट्रॉट्स्कीवादी यांचा गट. त्याचे नेते होते बुखारिन व क्रेस्टिन्स्की. यास्तरात सर्व विरोधक-गटांच्या सर्वोच्च नेत्यांचा अंतर्भाव होता. विरोधकांच्या या संपूर्ण यंत्रणेत चार पाच हजार सदस्य व वीस ते तीस नेते होते. हे सर्व नेते सोविएत संघाच्या लष्करात, परराष्ट्र मंत्रालयात, गुप्तहेर सेवेत, उद्योगधंद्यांत, कामगार संघटनांत बोल्शेविक पक्षात व सरकारी कार्यालयात उच्च पदांवर होते.

प्रारंभापासूनच विरोधकांच्या या संपूर्ण यंत्रणेत परकीय गुप्तचर सेवेच्या पगारी हस्तकांचा, विशेषतः जर्मन लष्करी गुप्तहेरांचा अंतर्भाव झालेला होता. प्रसंगी ते हस्तक त्या त्या गटांना मार्गदर्शनही करीत होते. या नव्याने संघटित झालेल्या कटकारस्थानी यंत्रणेत कांही प्रमुख परकीय हस्तक होते, ते म्हणजे—

निकोलाय क्रेस्टिन्स्की—हा ट्रॉट्स्कीवादी परराष्ट्र खात्यातील एक उपमंत्री असून १९२३ पासून जर्मन लष्करी गुप्तहेर सेवेत हस्तक म्हणून काम करीत होता. तेव्हापासूनच जनरल वॉन सीक्टकरिता त्याने हेरगिरीची कामे करण्यास प्रारंभ केला.

आर्कडी रोझेनगोल्ट्झ— ट्रॉट्स्कीवादी परराष्ट्र व्यापार मंत्री. १९२३ पासून हा जर्मन लष्करी श्रेष्ठींकरिता हेरगिरीची कामे करीत असे. ट्रॉट्स्कीच्या आदेशानुसार त्याने बरीच महत्त्वाची गुप्त माहिती जर्मन राष्ट्राचा सरसेनापती सीक्ट व लष्कर प्रमुख हास यांना पुरविली. १९२६ मध्ये जर्मनीकरिता हेरगिरीची कामे करीत असताच त्याने ब्रिटिश गुप्तहेर सेवेकरिताही हेरगिरी करणे सुरू केले.

ख्रिश्चन रोकोवस्की— ट्रॉट्स्कीवादी. इंग्लंड व फ्रान्स येथील माजी राजदूत व १९२४ पासून ब्रिटिश हेर खात्याचा हस्तक. १९३४ पासून तो जपानी हेरखात्याकरिताही कामे करून लागला.

स्तानिस्लाव राताईचक— ट्रॉट्स्कीवादी. रसायन उद्योगाच्या केंद्रीय प्रशासनाचा प्रमुख व जर्मन लष्करी हेरखात्याचा हस्तक. क्रांतीनंतर लागलीच जर्मनांनी त्याला रशियात पाठविले. उरलमध्ये सोविएत सरकार उभारीत असलेल्या उद्योगसमूहांत तो हेरगिरी व घातपात करीत होता.

इव्हान ऱ्हॉश— ट्रॉट्स्कीवादी. सोविएत रसायन उद्योगातील एक उच्चपदस्थ कार्यकारी अधिकारी. १९१९ मध्ये झेकोस्लोवाकियाच्या गुप्तहेर खात्यातर्फे, रशियाला परतणाऱ्या युद्धकैद्याच्या मिषाने हेर म्हणून रशियात आला. नंतर तो जर्मन लष्करी हेरखात्याचाही हस्तक बनला.

अनुक्रमणिका

अलेक्सी शेस्तोव– ट्रॉट्स्कीवादी. पूर्वीय व सैबेरियन कोळसा संघाच्या महामंडळाचा सदस्य. १९३१ मध्ये जर्मन गुप्तहेर खात्याचा तो हस्तक बनला. फ्रोलिच-क्लुपफेल-डेहलमन या जर्मन कंपनीतर्फे त्याने सैबेरियात हेरगिरी व घातपाती कृत्ये केली.

गावरिल पुशीन– ट्रॉट्स्कीवादी. डोर्लोव्का रसायन कारखान्याचा प्रशासक. १९३५ मध्ये जर्मन लष्करी हेरखात्याचा हस्तक बनला. त्यानेच दिलेल्या कबुलीजबाबानुसार, संपूर्ण सोविएत रसायन प्रकल्पांच्या १९३४ च्या उत्पादनाची आकडेवारी, १९३५ करिता आखण्यात आलेल्या त्या उद्योग-कार्यक्रमाची आकडेवारी, व १९३८ पर्यंत तयार व्हावयाच्या नैट्रोजन प्रकल्पांच्या उभारणीची योजना यासंबंधी तपशीलवार माहिती त्याने जर्मनांना पुरविली.

याकोव लिवशित्झ– ट्रॉट्स्कीवादी. सोविएत दूरपूर्व रेल्वेमंडळाचा अधिकारी. हा जपानी लष्करी हेरखात्याचा हस्तक असून सोविएत रेल्वेबाबत जपानला गुप्त माहिती पुरवीत होता.

इव्हान न्यात्सोव– ट्रॉट्स्कीवादी. उरल क्षेत्रातील रेल्वेच्या कार्यकारी शाखेतील अधिकारी. जपानी हेरखात्याचा हस्तक. उरल विभागातील उद्योगात तो घातपाती कृत्ये करीत होता. सोविएत वाहतूक विभागासंबंधीची माहिती तो जपानला पुरवित असे.

योसिक तुरोक– ट्रॉट्स्कीवादी. पर्म व उरल क्षेत्रातील रेल्वे वाहतूक विभागाचा उपव्यवस्थापक. जपानी हेर खात्याचा हस्तक. उरल प्रदेशात हेरगिरी व घातपात करण्याच्या मोबदल्यात १९३५ मध्ये त्याला जपानकडून ३५००० रुबल्स मिळाले होते.

मिखाईल चेर्नोव– उजव्या गटाचा सदस्य व रशियाच्या कृषिखात्याचा मंत्री. १९२८ पासून तो जर्मन हेरखात्यातर्फे हेरगिरी करीत होता. जर्मनांच्या देखरेखीखाली युक्रेनमध्ये फार मोठ्या प्रमाणावर घातपाताची व हेरगिरीची कामे त्याने केली.

वासिली शारंगोविच– उजव्या गटाचा सदस्य. व बायलोरशियाच्या साम्यवादी पक्षाच्या केंद्रीय समितीचा सचिव. १९२१ मध्ये पोलिश हेर म्हणून त्याला रशियात पाठविण्यात आले. त्यानंतरच्या काळात तो बायलोरशियात पोलंडतर्फे हेरगिरी व घातपात करीत होता.

ग्रेगोरी ग्रिन्को–उजव्या गटाचा सदस्य. व सोविएत रशियाच्या वित्तमंत्रालयातील अधिकारी. १९३२ पासून जर्मनी व पोलंड यांच्या हेरखात्यांचा हस्तक म्हणून त्याने काम केले. युक्रेनमधील फासिस्ट चळवळीचा तो नेता होता. चोरून लपून रशियात शस्त्रास्त्रे पाठवून, जर्मनी व पोलंड या राष्ट्रांतर्फे तो घातपाती कृत्ये करीत होता.

अनुक्रमणिका

ट्रॉट्स्कीवादी, उजवा गट, व झिनोवीववादी यांची कारस्थानयंत्रणा म्हणजे ॲक्सिस गटाचा सोविएत रशियातील पंचमस्तंभ होता.

अनुक्रमणिका

प्रकरण १७

# राष्ट्रद्रोह व दहशतवाद

## राष्ट्रद्रोहाचे राजकारण

१९३३–३४ मध्ये युरोपीय राष्ट्रे जणू एका गूढ अशा विचित्र रोगाच्या कचाट्यात सापडली होती. राज्यक्रांती, लष्करी उठाव, घातपात, राजकीय हत्या, भयानक कटकारस्थाने यामुळे युरोपीय राष्ट्रे मुळापासून हादरत होती. नित्य नव्या राष्ट्रद्रोही व हिंसक कृत्याशिवाय महिनाही उलटत नव्हता. संपूर्ण युरोपात राष्ट्रद्रोहाची व दहशतवादाची जणू साथच पसरली होती.

नाझी जर्मनी हे या रोगाचे मूळ होते. ते राष्ट्र नव्या फासिस्ट चळवळीचे केंद्र बनल्यापासून, जुन्या लोकशाही सरकारांची घटिका भरली असा विश्वास बाळगून असलेले लोक चळवळ व हिंसाचार यांचे लोण संपूर्ण युरोपात पसरवीत आहेत असे ११ जानेवारी १९३४ रोजी लंडनहून युनायटेड प्रेसने कळविले होते.

'पंचमस्तंभ' हा शब्दप्रयोग अजून सरसकट प्रचारात आला नव्हता. परंतु जर्मन लष्करश्रेष्ठींच्या गुप्त बिनीसैनिकांनी युरोपीय राष्ट्रांविरुद्ध आक्रमक कारवाया सुरू केलेल्या होत्या. फ्रान्समध्ये 'कागूलार्डस्' व 'क्रोईक्स द फे', 'ब्रिटन मधील 'युनियन ऑफ फासिस्टस्', बेल्जियममधील 'रेक्सिस्टस्', पोलंडमधील 'पी.ओ.डब्लू', झेकोस्लोवोकियातील 'हेनलिनिस्टस्' व 'लिंका गार्डस्', नॉर्वेमधील 'क्विस्लिंगाईटस्', रुमानियातील 'आयर्न गार्डस्', बल्गेरियातील 'आय्. एम्. आर.ओ.', फिनलंडमधील 'लाप्पो', लिथुआनियातील 'आयर्न वुल्फ', लातवियातील 'फायरी क्रॉस', अशा निरनिराळ्या नव्याने प्रस्थापित झालेल्या अनेक गुप्त नाझी संस्था किंवा पुनर्रचित प्रतिक्रांतिकारी संघटना क्रियाशील बनल्या होत्या. आणि त्याद्वारा संपूर्ण युरोपीय राष्ट्रांवर विजय मिळवून त्यांना गुलाम करून सोडण्याचा सोविएत संघावर हल्ला करण्याचा मार्ग मोकळा करून दिला जात होता.

जर्मनीत हिटलर सत्तारूढ झाल्यानंतर नाझींनी केलेली काही महत्त्वाची दहशतवादी कृत्ये अशी—

ऑक्टोबर १९३३: अलेक्स माईलोव या लवोव (पोलंड) येथील सोविएत दूतावासाच्या सचिवाची हत्या. नाझींच्या पैशावर पोसल्या गेलेल्या युक्रेनियन नॅशनॅलिस्ट संघटनेच्या हस्तकांकडून ही हत्या करविण्यात आली होती.

डिसेंबर १९३३: रुमानियाचा प्रधामंत्री इऑन डयूका याची नाझी रुमानियन दहशतवादी

'आयर्न गार्डस्' यांनी केलेली हत्या.

फेब्रुवारी १९३४: नाझी प्रणीत 'क्रोईक्स द फ्यू' या फ्रेंच फासिस्ट संघटनेने पॅरिस येथे केलेला उठाव.

मार्च १९३४: एस्तोनियातील नाझी पैशावर पोसल्या गेलेल्या 'फासिस्ट लिबर्टी फायटर्स' यांनी राज्यक्रांती करण्याचा केलेला प्रयत्न.

मे १९३४: बल्गेरियात फासिस्ट राज्यक्रांती.

मे १९३४: नाझी नियंत्रित 'बाल्टिक ब्रदरहुड' या संघटनेने लातवियात केलेला उठाव.

जून १९३४: नाझी द्रव्यावर संघटित झालेल्या 'आय्. यू. एन' या युक्रेनियन नॅशनॅलिस्टांच्या दहशतवादी संघटनेच्या हस्तकांकडून पोलिश गृहमंत्री जनरल ब्रोनिस्लाव पिएराकी याची हत्या.

जून १९३४: इवान बाबीए या कॅथलिक ॲक्शन संघटना प्रमुखाची पोलंडमध्ये ओ.एन.यू. हस्तकांनी केलेली हत्या.

जून १९३४: नाझींच्या 'आयर्न वुल्फ'संघटनेकडून लिथुआनियात झालेला गंभीर रक्तरंजित उठाव.

जुलै १९३४: ऑस्ट्रियात नाझींनी उठावाचा केलेला प्रयत्न व या प्रयत्नात ऑस्ट्रियाचा चॅन्सलर एंगलबर्ट डोलफस याची नाझी दहशतवाद्यांनी केलेली हत्या.

ऑक्टोबर १९३४: नाझी नियंत्रित 'क्रोशियन फासिस्ट' संघटनेकडून युगोस्लावियाचा राजा अलेक्झांडर व फ्रेंच परराष्ट्र मंत्री बार्थो यांच्या झालेल्या हत्या.

नाझींच्या या पंचमस्तंभीय कारवाया लवकरच युरोपबाहेर, अमेरिका, दक्षिण अमेरिका, आफ्रिका या खंडात जपानी गुप्तहेर संघटनेच्या सहकार्याने दूरपूर्वेतही सुरू झाल्या त्या पंचमस्तंभीयांच्या संघटनेचे व मार्गदर्शनाचे काम प्रामुख्याने अल्फ्रेड रोझेनबर्ग व रुडॉल्फ हेस या दोन नाझी नेत्यांकडे होते. रोझनबर्ग हा नाझी पक्षाच्या परराष्ट्रीय राजकीय कार्यालयाचा प्रमुख होता. संपूर्ण जगात व विशेषेकरून पूर्व युरोप आणि सोविएत रशिया यात क्रियाशील असलेल्या हजारो नाझी हेरांचे व प्रचारयंत्रणेचे मार्गदर्शन करणे हे त्याचे प्रमुख काम होते; तर हिटलरचा मुख्य सहाय्यक म्हणून नाझी सरकारच्या परराष्ट्रांशी चाललेल्या सर्व गुप्त

अनुक्रमणिका

वाटाघाटींची जबाबदारी रुडॉल्फ हेसकडे होती. अल्फ्रेड रोझेनबर्ग यानेच लिऑं ट्रॉट्स्कीचे नाझींशी अधिकृत पण गुप्त संबंध प्रस्थापित करून दिले. ते रुडॉल्फ हेसने दृढ करून दिले.

अडॉल्फ हिटलर जर्मनीत सत्तारूढ झाल्यानंतर आठ महिन्यांनी—सप्टेंबर १९३३ मध्ये, ट्रॉट्स्कीवादी मुत्सद्दी व जर्मन हस्तक निकोलाय क्रेस्टिन्स्की हा दर वर्षीप्रमाणे, विश्रांती घेण्याच्या निमित्ताने जर्मनीतील किसिंगेन येथील आरोग्यधामात गेला. तेथे जाताना वाटेत तो काही दिवसांकरिता बर्लिन येथे थांबला. त्यावेळी तो सोविएत परराष्ट्र खात्यात सहाय्यक मंत्री होता. बर्लिन येथे त्याने सर्जी बेसनोव या सोविएत दूतावासातील ट्रॉट्स्कीवादी हस्तकाची भेट घेतली. जर्मनीच्या परराष्ट्र खात्याचा नेता अल्फ्रेड रोझेनबर्ग हा जर्मनीचे नॅशनल सोशलिस्ट व ट्रॉट्स्कीवादी यांच्यात काही गुप्त करार होऊ शकतो काय याचा अंदाज घेण्याचा प्रयत्न करीत आहे असे त्याने बेसनोवला सांगितले; व त्या दृष्टीने, काहीही करून त्याची व ट्रॉट्स्कीची भेट होईल अशी व्यवस्था बेसानोवने करावी; क्रेस्टिन्स्की किंसिंगेन आरोग्यधामात सप्टेंबर अखेरीपर्यंत राहणार होता व नंतर तो इटालियन टिरोलमधील मेरानो येथे जाणार होता; तेव्हा गुप्ततेबद्दल आवश्यक ती काळजी घेऊन किंसिंगेन किंवा मेरानो यापैकी कोठेही ट्रॉट्स्कीने त्याच्याशी संपर्क साधावा असे क्रेस्टिन्स्कीने त्याला सांगितले. त्या आदेशानुसार भेटीची व्यवस्था करण्यात आली. ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात ट्रॉट्स्की, आपला पुत्र सेदोव यासह, बनावट पासपोर्टवर, फ्रान्स—इटली सीमा ओलांडून, मेरानो येथील हॉटेल बव्हेरियात क्रेस्टिन्स्कीला भेटला. [ट्रॉट्स्की त्यावेळी दक्षिण फ्रान्समध्ये पिरनीज पर्वताच्या पायथ्याशी सेंट पॅलेस या लहानशा खेड्यात राहात होता. जुलैमध्ये प्रिन्किपोला रामराम ठोकून आपल्या अंगरक्षकांच्या व सचिवांच्या लवाजम्यासह तो पॅरिसजवळील एका बंगल्यात येऊन राहिला होता. सुरक्षिततेची सर्व व्यवस्था तेथे करण्यात आली होती.

ट्रॉट्स्की फ्रान्समध्ये आला. त्यावेळी फ्रान्स व सोविएत रशिया यात व्हावयाच्या करारासंबंधी बोलणी सुरू होती व तो करार होऊ नये या करिता फ्रेंच फासिस्ट व प्रतिक्रियावादी आकाशपाताळ एक करीत होते.

ट्रॉट्स्कीला फ्रान्समध्ये येण्याची व तेथे त्याचे सोविऐत विरोधी मध्यवर्ती कार्यालय स्थापण्याची परवानगी फ्रेंच सरकारने दिली, त्यावेळी एडुअर्ड दलादियर हा त्या राष्ट्राचा प्रमुख होता. दलादियरने चालविलेल्या अनुनयाच्या नीतीमुळेच पुढे खुद्द फ्रान्स व युरोपातील अन्य गैर फासिस्ट राष्ट्रे नाझींच्या भक्ष्यस्थानी पडणार होती. फ्रान्समध्ये येण्याची परवानगी ट्रॉट्स्कीला द्यावी अशी शिफारस फ्रान्सचा रॅडिकल डेप्युटी गुएरनॉट याने केली होती.व गृहमंत्री कॅमिल चाटेम्प्स् याने तत्संबंधी सर्व व्यवस्था करून दिली. फ्रान्समध्ये ट्रॉट्स्कीला प्रवेश मिळाल्याने सोविएतांच्या विरुद्ध असलेल्या फ्रेंच हेरखात्यालाही साहजिकच आनंद वाटला.]

त्यांच्या त्या भेटीत सोविएत रशियातील त्यांच्या कारस्थानाबाबतच्या सर्वच मुद्यांवर चर्चा झाली. रशियात सत्ता हस्तगत करायची तर ते केवळ एकाच मार्गाने शक्य आहे-बलप्रयोगाच्या; पण केवळ त्यांच्या कटकारस्थानाच्या यंत्रणेवर विसंबून रशियात राज्यक्रांती घडवून आणणे व ती सत्ता टिकवून धरणे अशक्य असून त्याकरिता परकीय मदत आवश्यक आहे; म्हणून स्वतःच्या स्वार्थसिद्धीसाठी जी राष्ट्रे सोविएत रशियाविरुद्ध कार्यवाही करू इच्छितात अशा राष्ट्रांची मदत मिळवून घेणे व त्याकरिता त्यांच्याशी निश्चित स्वरूपाचा करार करणे अगत्याचे असल्याचे ट्रॉट्स्कीने स्पष्ट केले. तो म्हणाला—‘राईश्वेरशी आपला झालेला करार वस्तुतः आपल्या सर्व योजनेचा केंद्रबिंदू होता. पण त्या कराराने जर्मनीचे किंवा ट्रॉट्स्कीवाद्यांचेही समाधान झालेले नाही. ट्रॉट्स्कीवाद्यांच्या दृष्टीने पाहिले तर, आपला तो करार राईश्वेरशी झाला होता, जर्मन सरकारशी नव्हे... दुसरे म्हणजे त्या कराराचा मुख्य गाभा काय होता—तर

सोविएत रशियावरील हल्ल्यात उपयुक्त ठरू शकेल अशी माहिती आपल्या गुप्तहेरांनी त्यांना पुरविण्याच्या मोबदल्यात ते आपल्याला थोडाफार पैसा देत होते. पण जर्मन सरकारला—विशेषेकरून हिटलरला पाहिजे आहे ते केवळ हेरगिरीने मिळवलेली माहिती नव्हे, तर वसाहती व प्रदेश! सोविएत प्रदेश हिटलरला मिळाला तर वसाहतींचा आपला हट्ट सोडून देण्याची व त्या प्रदेशाकरिता इंग्लंड-फ्रान्स-अमेरिका यांविरुद्ध लढा देण्याचीही हिटलरची तयारी आहे. आपल्याबद्दल बोलायचे तर त्यांच्याकडून मिळणाऱ्या अडीच लक्ष सुवर्ण मार्क्सचे आपल्याला मोठेसे महत्त्व नाही. आपल्याला हवी आहे ती सत्ता काबीज करण्याकरिता त्यांच्या लष्कराची मदत. तेव्हा त्या दिशेने आता आपण पुढे पाऊल टाकले पाहिजे. म्हणजेच, ट्रॉट्स्कीच्या मते ट्रॉट्स्कीवाद्यांचे सर्वप्रथम उद्दिष्ट होते ते रशियाची सत्ता बळकावण्यासाठी मदतीकरिता जर्मन सरकारशी करार घडवून आणणे.

'अर्थात् त्याचबरोबर', ट्रॉट्स्की बोलत होता, 'जपानशीही सहकार्याकरिता आपल्याला थोडी फार तडजोड करावी लागणार आहे. त्याबाबत मास्को येथील जपानच्या प्रतिनिधींशी रशियातील ट्रॉट्स्कीवाद्यांनी बोलणी करून जपानच्या भूमिकेचा अंदाज घ्यायला पाहिजे.' या कामाकरिता परराष्ट्रमंत्रालयात पौर्वात्य क्षेत्राचे कामकाज पाहाणारा सोकोल्निकोव याचा उपयोग करून घेता येईल असे ट्रॉट्स्कीने क्रेस्टिन्स्कीला सांगितले.

रशियातील ट्रॉट्स्कीवाद्यांच्या कटकारस्थानी—यंत्रणेच्या अंतर्गत संघटनेबाबतही ट्रॉट्स्कीने क्रेस्टिन्स्कीला काही मार्गदर्शनपर सूचना केल्या.

'जर्मनीने सोविएत संघावर समजा हल्ला केलाही,' 'ट्रॉट्स्की क्रेस्टिन्स्कीला सांगत होता, 'तरी तेवढ्याने आपल्याला सत्ता काबीज करता येईल असे नाही. त्याकरता अंतर्गत क्षेत्रातही सिद्धता होणे आवश्यक आहे. शहरात व ग्रामीण भागात मध्यमवर्गीय व सधन शेतकरी यांच्यावर आपल्या संघटनेचा प्रभाव प्रस्थापित होणे, तेथे आपली पाळेमुळे खोलवर रुजणे अगत्याचे आहे. शेवटची एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे ऐन आणीबाणीचे वेळी सर्व सत्ताकेंद्रे हाती घेणे, व रशियाच्या सध्याच्या सरकारातील सर्व नेत्यांना अटक करून तेथे आपले सरकार प्रस्थापित करणे याकरिता लाल लष्करातील सैनिकांत व अधिकाऱ्यांत आपली मजबूत संघटना उभारली गेली पाहिजे.'

रशियात परत गेल्यानंतर क्रेस्टिन्स्कीने लाल लष्कराचा उपसेनाप्रमुख जनरल तुखाचेवस्की याच्याशी संपर्क साधावा, कारण 'वरील सर्व कामाच्या दृष्टीने तोच खरा लायक माणूस आहे, बोनापार्टसारखा धाडसी, महत्त्वाकांक्षी व केवळ लष्करीच नव्हे तर राजकीय भूमिका पार पाडण्यास सज्ज असलेला! तो नक्कीच आपल्याशी हातमिळवणी करेल,' असा विश्वास ट्रॉट्स्कीने व्यक्त केला. रशियातील ट्रॉट्स्की—अनुयायांनी जनरल तुखाचेवस्कीला सर्वतोपरी मदत करावयाची होती. परंतु राज्यक्रांती होईल त्यावेळी, ट्रॉट्स्कीला वगळून एकट्या तुखाचेवस्कीला नवे सरकार स्वतःच्या नेतृत्वाखाली स्थापन करता येऊ नये या दृष्टीने मोक्याच्या सर्व ठिकाणी आपली माणसे नेमली जातील याची काळजी घेणे आवश्यक असल्याचे ट्रॉट्स्कीने क्रेस्टिन्स्कीला बजावले.

अनुक्रमणिका

बैठक संपण्यापूर्वी, सोविएत रशियात दहशतवादाची व घातपाताची मोहीम सर्व शक्तिनीशी सुरू करण्यासंबंधी स्पष्ट आदेश प्यातकोवला ट्रॉट्स्कीने क्रेन्टिन्स्की मार्फत दिले. या दहशतवादी कृत्यांचा उद्देश राहणार होता, एक म्हणजे लाल लष्कराची संरक्षणक्षमता खच्ची करणे व, राज्यक्रांती होण्याचे वेळी सरकारात अराजक व गोंधळाची परिस्थिती निर्माण होईल अशी व्यवस्था करणे; व दुसरे म्हणजे त्या कार्यवाहीमुळे ट्रॉट्स्कीची स्थिती जास्तीत जास्त बळकट झाली पाहिजे, तरच आत्मविश्वासाने परराष्ट्रांशी वाटाघाटी करणे ट्रॉट्स्कीला शक्य होईल. हेही ट्रॉट्स्कीने क्रेस्टिन्स्कीच्या मनावर बिंबविले.

मास्कोला परत गेल्यानंतर ट्रॉट्स्कीवाद्यांच्या एका गुप्त बैठकीत ट्रॉट्स्कीशी त्याच्या झालेल्या बोलण्याचा अहवाल क्रेस्टिन्स्कीने सर्वांच्या पुढे ठेवला. त्यातील काही ट्रॉट्स्कीवाद्यांना, विशेषतः ट्रॉट्स्कीचा परराष्ट्रमंत्री असल्याचा दावा करणाऱ्या कार्ल रादेकला, ट्रॉट्स्कीने त्यांना न विचारता परस्पर परराष्ट्रांशी महत्त्वाच्या प्रश्नांवर वाटाघाटी कराव्या हे रुचले नाही. परराष्ट्र धोरणाच्या काही मुद्यांबाबत त्याने ट्रॉट्स्कीकडून खुलासा मागविला. त्याच्या त्या पत्राला उत्तर म्हणून ट्रॉट्स्कीने केलेल्या स्पष्टीकरणासंबंधी माहिती नंतर रादेकने इतरांना दिली. त्याने सांगितले की ट्रॉट्स्कीच्या मते—

'जर्मनीत फासिझमच्या झालेल्या उदयाने युरोपीय राजकारणाची स्थिती पार बदलून गेली आहे. नजीकच्या भविष्यात युद्ध होणार हे अटळ आहे. दूरपूर्वेतही आणिबाणीची परिस्थिती निर्माण होत आहे. या युद्धात सोविएत संघाचा पराभव होणार याबद्दल तिळमात्रही शंका नाही. तसे झाले की आपला गट सत्तेवर येण्यास अनुकुल परिस्थिती निर्माण होईल. दूरपूर्वेच्या एका राष्ट्राशी व एका मध्य युरोपीय राष्ट्राशी ट्रॉट्स्कीने संधान बांधले असून त्यांच्याकडून व्हावयाच्या मदतीच्या मोबदल्यात त्यांना बऱ्याच आर्थिक व प्रादेशिक स्वरूपाच्या सवलती देण्यास ट्रॉट्स्कीची तयारी असल्याचे त्याने त्या राष्ट्रांच्या निमसरकारी गोटाला उघडपणे सांगितले आहे...'

शिवाय, सोविएत रशियात निरनिराळ्या उच्च पदांवर असलेल्या ट्रॉट्स्कीवाद्यांशी बोलणी करण्याकरिता थोडेच दिवसात काही परकीय प्रतिनिधी येतील; तेव्हा सर्व ट्रॉट्स्कीवाद्यांनी त्यांना आपल्या ट्रॉट्स्कीनिष्ठेची, तसेच कोणत्याही परिस्थितीत ते ट्रॉट्स्कीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहातील याची निःसंदिग्ध हमी द्यावी असेही त्या पत्रात ट्रॉट्स्कीने कळविले असल्याचे रादेकने सांगितले.

यानंतर थोड्याच दिवसांनी रशियाच्या पौर्वात्य विभागाचा उपमंत्री ग्रेगोरी सोकोल्निकोव हा ट्रॉट्स्कीवादी घाईघाईने रादेकच्या 'इझवेत्सिया' कार्यालयात आला. तो फारच क्षुब्धचित्त दिसत होता. कार्यालयाचे दार बंद होताच त्याने रादेकला म्हटले—'परराष्ट्र मंत्रालयाच्या कार्यालयात मी जपानी शिष्टमंडळाशी वाटाघाटी करीत होतो. आमची बोलणी संपली व दुभाषा निघून गेला. त्याबरोबर, 'जपान सरकारशी ट्रॉट्स्कीने केलेल्या वाटाघाटींची तुला माहिती आहे ना?' असे त्या प्रतिनिधीने मला एकदमच उघडउघड विचारले. ही तर अगदी कमालच झाली,' अत्यंत अस्वस्थ झालेला सोकोल्निकोव बोलत होता, 'तुम्हीच सांगा, मी एक उपमंत्री आहे, अशा चोरट्या वाटाघाटी उघडपणे करणे मला कसे शक्य

आहे? छे! छे! हे तर अगदी अशक्यच आहे.' रादेकने आपल्या मित्राला शांत करीत पुन्हा तसे होणार नाही असे आश्वासन दिले. ओ. जी. पी. यू. च्या अगदी डोळ्यादेखत अशा प्रकारे जर्मन व जपानी हस्तकांशी बोलणी करणे रशियातील ट्रॉट्स्कीवाद्यांना शक्य होणार नाही, जी बोलणी करायची ती ट्रॉट्स्कीने परस्पर करावी; फक्त आपल्याला त्याबद्दल माहिती देत राहावे असे ट्रॉट्स्कीला त्याने अगोदरच कळविले असल्याचे रादेकने सोकोल्निकोवला सांगितले.

यानंतर काही दिवसांतच खुद्द रादेकवरही तसाच प्रसंग ओढवला, तेव्हा त्याचीही मोठीच पंचाईत झाली. मास्कोत एका राजनैतिक स्वरूपाच्या समारंभात एक जर्मन मुत्सद्दी त्याच्या शेजारी येऊन बसला व त्याने एकदमच रादेकला विचारले, 'ट्रॉट्स्की जर्मनीशी वाटाघाटी करण्याचा प्रयत्न करीत आहे हे आम्हाला माहीत आहे; पण त्याच्या त्या इराद्याला कितपत अर्थ आहे? झोप उडालेल्या रशियन निर्वासितांचे ते केवळ एक दिवास्वप्न तर नाही ना? त्याबद्दल सत्य परिस्थिती काय आहे ते आमच्या नेत्याला जाणून घ्यायचे आहे.' या अनपेक्षित प्रकाराबद्दल आपली प्रतिक्रिया व्यक्त करीत नंतर रादेकने सांगितले—'अर्थात् माझ्याशी त्याचे ते बोलणे मिनिटा दोन मिनिटाचेच असेल. अशा समारंभप्रसंगी आणखी जास्त वेळ कसे बोलणार? मला मात्र ताबडतोब निर्णय घेऊन उत्तर देणे व ते बोलणे बंद करणे भाग होते. 'सोविएत संघातील वास्तववादी राजनीतिज्ञ जर्मन—सोविएत सलोख्याचे महत्त्व चांगले जाणतात व तशी तडजोड घडून यावी याकरिता आवश्यक त्या सवलती देण्याची त्यांची तयारी आहे,' असे मी त्या जर्मन मुत्सद्याला सांगितले, व ते बोलणे निकालात काढले.'

३० जून १९३४ रोजी नाझी दहशतीची कुऱ्हाड खुद्द नाझींच्याच गोटातील काही नेत्यांवर कोसळली. आंधळ्या श्रद्धेने हिटलरचे हुकुम मानण्यास कां कू करणाऱ्यांचे हिटलरने क्रूरपणे निर्दालन केले. चोवीस तासांच्या आत हिटलरच्या स्टॉर्म ट्रुपर्सचा कॅप्टन अर्न्स्ट रोहेम, पूर्न जर्मनीतील नाझी गटाचा सर्वोच्च नेता एडमंड हाईन्स, बर्लिन स्टॉर्म ट्रुपर्सचा नेता कार्ल अर्न्स्ट, व त्याबरोबर त्यांचे अनेक मित्र व सहकारी म्युनिक व बर्लिन येथे हिटलरच्या मारेकऱ्यांच्या गोळ्यांना बळी पडले. आत्यंतिक चिंता व भीती यांनी नाझी गोटाला ग्रासले.

ही बातमी कळताच पॅरिसहून ट्रॉट्स्कीने ताबडतोब आपल्या एका विश्वासू 'सचिवाला'—कार्ल राईश उर्फ जोहानसन या आंतर्राष्ट्रीय हेराला बर्लिन येथे बेसनोवला भेटण्यास पाठविले. जर्मनीतील खऱ्या परिस्थितीची चक्षुर्वैसत्यम् माहिती बेसनोवकडून ट्रॉट्स्कीला हवी होती. जुलै अखेरी बेसनोव पॅरिसला आला व त्याने ट्रॉट्स्कीची भेट घेतली. जर्मन राजकारणाबाबत ट्रॉट्स्कीला माहिती देऊन त्याच रात्री तो बर्लिनला परतला. बेसनोव आला, त्यावेळी ट्रॉट्स्की त्याला खूपच अस्वस्थ दिसला. रोहेमच्या नेतृत्वाखालील जहाल नाझींच्या निर्मूलनामुळे ट्रॉट्स्कीवाद्यांच्या योजनेत अडथळे निर्माण होतील की काय अशी त्याला धास्ती होती. पण जर्मनीच्या अधिसत्तेवर हिटलर, हिमलर, हेस, रोझेनबर्ग, गोअरिंग, गोबेल्स या मंडळींची दृढ पकड असल्याचे बेसनोवने ट्रॉट्स्कीला सांगितले. त्यामुळे त्याच्या योजनांना नाझींचा पाठिंबा मिळेल की नाही ही ट्रॉट्स्कीची कुशंका दूर झाली. बेसनोवकडे एक महत्त्वाची कामगिरी लवकरच सोपविण्यात येणार असल्याचे त्या बैठकीत ट्रॉट्स्कीने बेसनोवला सांगितले. 'या मुद्यांबाबत निष्कारण

अनुक्रमणिका

चोखंदळपणा करण्यात आता अर्थ नाही', ट्रॉट्स्की बेसनोवला पटवीत होता, 'हेस व रोझेनबर्ग यांच्याकडून आपल्याला खरोखरीच भरीव मदत मिळवून घ्यायची असेल तर रशियाचा मोठा प्रदेश त्यांना तोडून देण्यास आपण कचरता कामा नये. आपण त्यांना युक्रेन देण्याचे कबूल करू या. जर्मनांशी वाटाघाटी होतील त्यावेळी तू हे ध्यानात ठेव. याबाबत प्यातकोव व क्रेस्टिन्स्की यांना मी लिहीनच.'

सोविएत कार्यालयांतील मुत्सद्यांच्या वर्तुळातही फितुरीचे जाळे विणले जात होते. राजदूत, सचिव, अटॅची, निम्न स्तरांवरील कोन्सुलर एजंट्स् असे अनेक लोक ट्रॉट्स्कीच्या त्या कारस्थानात गुंतले होते– युरोपात व दूरपूर्वेतही! जपानमधील सोविएत राजदूत युरेनेव हा असाच त्या कटात सामील झाला होता. १९२६ पासूनच तो ट्रॉट्स्कीवादी बनला होता. ट्रॉट्स्कीच्या आदेशानुसार त्याने जपानच्या गुप्तहेर खात्याशी संधान बांधले. त्यासंबंधात त्याला मदत करायला ट्रॉट्स्कीचा जुना मित्र व एके काळचा इंग्लंड व फ्रान्स येथील राजदूत ख्रिश्चन रोकोवस्की हा जपानमध्येच होता. तो त्यावेळी सोविएत परराष्ट्र खात्यात कामाला नव्हता, तर वेगवेगळ्या सार्वजनिक आरोग्य मंडळावर एक अधिकारी म्हणून तो काम करीत असे. ट्रॉट्स्कीच्या भूमीगत कारस्थानात त्याला अजूनही महत्त्वाचे स्थान होते. ऑक्टोबर १९३४ मध्ये टोकियो येथे भरणार असलेल्या रेड क्रॉसच्या आंतर्राष्टीय परिषदेला हजर राहण्याकरिता आलेल्या सोविएत शिष्टमंडळाबरोबर रोकोवस्की जपानला आला होता. जपानला जाण्यास निघण्यापूर्वी युरेनेवला देण्याकरिता एक पत्र प्यातकोवने त्याच्या स्वाधीन केले होते. वरवर पाहता व्यापारासंबंधी माहिती पुरविणारे ते एक नेहमीचेच पत्र होते. परंतु त्या पत्राच्या पाठीमागल्या बाजूला अदृश्य शाईत मजकूर लिहिलेला होता. त्यानुसार, जपानशी वाटाघाटी करताना रोकोवस्कीचा उपयोग करून घेण्याबाबत आदेश युरेनेवला देण्यात आला होता.

रोकोवस्की टोकियोत येताच एका जपानी हस्तकाने त्याच्याशी संपर्क साधला. टोकियो येथील जपानी रेड क्रॉसच्या इमारतीत त्यांची बोलणी झाली. रशियन ट्रॉट्स्कीवादी चळवळीची उद्दिष्टे जपानच्या उद्दिष्टांशी पूर्णपणे मिळती-जुळती असल्याचे सांगून, रशियातील अंतर्गत परिस्थितीबाबत मोलाची माहिती रोकोवस्की जपानला पुरवू शकेल असा विश्वास त्या हस्तकाने व्यक्त केला. ह्या संभाषणाचा वृत्तांत त्याच संध्याकाळी रोकोवस्कीने युरेनेवला दिला. 'एक हेर–जपानी हस्तक म्हणून माझा उपयोग करून घेण्याचा त्यांचा बेत दिसतोय्!' रोकोवस्की म्हणाला.

'पण त्यात एवढी तुझ्या मनाची घालमेल होण्याचे काय कारण आहे?' युरेनेव म्हणाला, 'आता मागे वळणे अशक्यच आहे.'

यानंतर काही दिवसांनी जपानी गुप्तचर सेवेचा एक उच्च पदस्थ अधिकारी व रोकेवस्की भोजनाकरिता एकत्र जमले. त्यावेळी त्या जपानी अधिकाऱ्याने एकदम मुख्य मुद्यालाच हात घातला. 'तुम्ही ट्रॉट्स्कीचे निकटचे मित्र व अनुयायी आहात याची जाणीव आम्हाला आहे,' तो रोकोवस्कीला म्हणाला, 'पण तुम्ही एक गोष्ट ट्रॉट्स्कीला कळवली पाहिजे. चिनी समस्येसंबंधीचे त्याचे लेख व चिनी ट्रॉट्स्कीवादी यांची वागणूक यामुळे आमचे सरकार सक्त नाराज आहे. ट्रॉट्स्कीकडून आम्हाला अगदी वेगळी अपेक्षा

अनुक्रमणिका

होती. तसा आम्हाला हक्कही आहे. जास्त खोलात जायचे कारण नाही. पण चीनमध्ये एखादी प्रक्षोभक घटना घडली तर चीनमध्ये हस्तक्षेप करायला आम्हाला हवे ते एक निमित्त मिळेल हे ट्रॉट्स्कीने लक्षात घ्यावे.

रशियन ट्रॉट्स्कीवाद्यांकडून जपानला कोणत्या प्रकारची गोपनीय माहिती अपेक्षित आहे तेही त्या जपानी अधिकाऱ्याने स्पष्ट केले. सामूहिक शेती, तसेच दूरपूर्व क्षेत्रातील रेल्वे, खाणी, उद्योगधंदे याबद्दल जपानला तपशीलाने माहिती हवी होती. ती माहिती रोकोवस्कीने कोणाच्या स्वाधीन करावयाची याकरिता काही सांकेतिक नावेही रोकोवस्कीला त्या जपानी अधिकाऱ्याने दिली. रेड क्रॉस शिष्टमंडळाचा सचिव डॉ. नाईदा याने जपानी गुप्तहेर सेवा व रोकोवस्की यातील दुवा म्हणून काम करावे अशी व्यवस्था करण्यात आली.

टोकियो सोडण्यापूर्वी रोकोवस्कीचे युरेनेवशी पुन्हा बोलणे झाले. तो ट्रॉट्स्कीवादी राजदूत त्यावेळी काहीसा खिन्न दिसत होता. 'आपण अशा काही जंजाळात अडकलो आहोत की कसे वागावे हेच कधीकधी कळत नाही.' हताशपणे तो रोकोवस्कीला सांगत होता, 'आपल्या एका साथीदार राष्ट्राचे समाधान करण्याकरिता काही करायला जावे तर दुसरा दुखावला जातो. आता हेच पहा ना! सध्या चीनच्या समस्येवरून ब्रिटन व जपान यात वैमनस्य वाढत आहे आणि आपल्याला तर ब्रिटन व जपान या दोहोंच्या गुप्तहेर सेवांशी चांगले संबंध ठेवणे आवश्यक आहे.'

उत्तरादाखल रोकोवस्की म्हणाला 'आपल्या ट्रॉट्स्कीवाद्यांना सध्या एकाचवेळी जर्मन, जपानी व ब्रिटिश असे तीन चेंडू खेळावयाचे आहेत. एकाच डावात सर्व काही पणाला लावून टाकायचे असे सध्याचे आपले धोरण आहे. ते अर्थातच् अत्यंत धोक्याचे आहे; पण ते धोरण जर यशस्वी ठरले तर मात्र त्यात सहभागी असलेल्या, आज साहसी मानल्या जाणाऱ्या, व्यक्ती उद्या थोर मुत्सद्दी ठरतील. [२० फेब्रुवारी १९३४ रोजी 'मियाको' या टोकियोच्या वृत्तपत्रात जपानी सरकारच्या नियोजन आणि अंदाजपत्रक आयोगाच्या एका गुप्त बैठकीचे वृत्त होते. या बैठकीत डेप्युटी योशिदा याने, युद्धमंत्री जनरल सुगियामा किंवा जपानी लष्कर यांना सोविएत सैबेरियातील व रेल्वेवाहतूक क्षमतेची काही माहिती आहे किंवा नाही असे युद्धमंत्री सुगियामाला विचारले. तेव्हा त्याबद्दल तपशीलासह सर्व माहिती त्याला असल्याचे व ती रशियन सरकारविरोधी गटाकडून त्याने मिळविली असल्याचे सुगियामाने सांगितले. हे वृत्त 'मियाको' ने प्रसिद्ध केल्याने टोकियोच्या वृत्तपत्रवर्तुळात चांगलीच खळबळ उडाली गोपनीय माहितीला प्रसिद्धी दिल्याच्या गुन्ह्याकरिता जपानी सरकारने 'मियाको' वृत्तपत्राला जबर दंड केला व त्या वृत्तपत्राचा प्रमुख संपादक यागुची गिलेई यास युद्धखात्याच्या दडपणामुळे आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला.]

### दहशतीचे राजकारण

जर्मनीशी व जपानशी त्यांचे फितुरीचे राजकारण तडीला नेण्याच्या खटपटीत रशियन ट्रॉट्स्कीवादी होते, त्याचवेळी सोविएत सरकारविरुद्ध दुसऱ्याही दिशेने आक्रमक पावले ती मंडळी टाकीत होती. राष्ट्रद्रोहाला दहशतीची जोड दिली जात होती.

अनुक्रमणिका

एप्रिल १९३४ मध्ये एके दिवशी सैबेरियातील कुझनेत्स कोळसा खाणीत काम करणारा बोयारशिनोव हा सोविएत इंजीनियर त्या खाणींच्या उभारणी प्रमुखाच्या कार्यालयात गेला, व त्याच्या विभागात गंभीर स्वरूपाची काहीतरी गडबड चालू आहे; अपघात, भूमीगत आगी, यांत्रिक बिघाड अशा गोष्टी फार मोठ्या प्रमाणावर होत आहेत अशी तक्रार त्याने केली; व त्या पाठीमागे पद्धतशीर घातपाताचे कटकारस्थान असावे अशी शंकाही त्याने बोलून दाखविली.

ही माहिती दिल्याबद्दल उभारणी प्रमुखाने बोयारशिनोवचे रीतसर आभार मानले व, त्या प्रकाराबद्दल संबंधित वरिष्ठांना तो कळवीलच; पण तोपर्यंत सुरक्षिततेच्या दृष्टीने बोयारशिनोवने तत्संबंधी कोणाजवळ चकार शब्दही उच्चारू नये असे त्याने सांगितले.

हा उभारणी प्रमुख होता अलेक्सी शेस्तोव–जर्मन हेर व सैबेरियातील घातपातांचे आयोजन करणारा एक प्रमुख ट्रॉट्स्कीवादी. यानंतर थोड्याच दिवसांनी घातपातासंबंधी तक्रार करणारा बोयारशिनोव एका खळग्यात मृतावस्थेत पडलेला आढळला. खाणीवरील काम आटोपून तो संध्याकाळी त्याच्या घराच्या दिशेने जात असता एकाकी रस्त्यावरून भरधाव जाणाऱ्या एका ट्रकने त्याला धडक दिली होती. ट्रकचालक शेरेपुखिन हा व्यावसायिक दहशतवादी होता. बोयारशिनोवची हत्या करण्याची कामगिरी शेस्तोवने त्याच्याकडे सोपविली होती व त्याकरिता मोबदला म्हणून त्याला १५००० रुबल्स दिले होते. [ट्रॉट्स्कीवादी मारेकऱ्यांनी शेस्तोवच्या मार्गदर्शनाखाली अन्झरेका स्टेट बँकेतून १ लक्ष ६४ हजार रुबल्सची रक्कम चोरली होती, त्या रकमेतून बोयारशिनोवच्या हत्येकरिता शेस्तोवने ते पैसे दिले होते. सैबेरियातील घातपाती व दहशतवादी कृत्यांकरिता तो निधी वापरला जात होता.]

सप्टेंबर १९३४ मध्ये, सोविएत संघाच्या मंत्रिपरिषदेचा अध्यक्ष व्ही. एम्. मोलोतोव खाण व उद्योग क्षेत्राची पाहाणी करण्यासाठी सैबेरियात आला. कुझनेत्स कोळसा क्षेत्रातील एका खाणीची पाहाणी करून तो परत जात असता त्याची मोटार एकाएकी रस्त्यावरून घसरली व बाजूच्या बांधावरून उलटून एका ओहोळाच्या उंच कड्याच्या अगदी टोकाला जाऊन थांबली. मोलोतोव व त्याचे सोबती चांगलेच हादरले. त्यांना थोड्याफार जखमाही झाल्या; पण गंभीर स्वरूपाची दुखापत मात्र झाली नाही. उलटलेल्या त्या मोटारीतून ते कसेबसे बाहेर पडले. त्यांचा काळ आला असला तरी वेळ आली नव्हती म्हणूनच ते बचावले होते.

मोलोतोवच्या मोटारीचा ड्रायव्हर होता व्हॅलेंटाईन अर्नोल्ड–ट्रॉट्स्कीवादी दहशतयंत्रणेचा एक सदस्य. मोलोतोवच्या हत्येचे आदेश शेस्तोवनेच त्याला दिले होते. त्या हेतूनेच ती मोटार अर्नोल्डने उंच कड्याच्या दिशेने नेली होती. ती गाडी कड्याखाली कोसळली तर मोलोतोवबरोबर त्याचाही कपाळमोक्ष होणार हे कळत असूनही शेस्तोवच्या आज्ञेचे पालन करायला तो निघाला होता. पण अगदी अखेरच्या क्षणी त्याचा धीर खचला आणि मोटार अगदी कोसळणार, तेवढ्यात त्याने ती कशीबशी थांबविली. गाडीला अपघात होऊन मोलोतोव मृत्युमुखी पडला असेच सर्वांना वाटावे अशा पद्धतीने तो सर्व बनाव घडवून आणला गेला होता.

अनुक्रमणिका

१९३४ च्या शरदापर्यंत संपूर्ण सोविएत संघात ट्रॉट्स्कीवादी व उजव्या गटाचे दहशतवादी क्रियाशील बनले होते. पूर्वीचे सोशल रेव्होल्यूशनरी, मेन्शेविक्स, व्यावसायिक मारेकरी, झारकालीन ओघ्रानाचे हस्तक हे सर्वच त्या कारस्थानात सामील झाले होते. युक्रेन, बायलोरशिया, जॉर्जिया, आर्मेनिया, उझबेकीस्तान, अझरबैजन, दूरपूर्वेचा सागरकिनाऱ्याचा प्रदेश, या सर्व क्षेत्रातील दहशतवादी यंत्रणेत फासिस्टांची व अन्य सोविएत विरोधकांची भरती करण्यात आली होती.

अनेक ठिकाणी नाझी व जपानी हस्तक त्या गटांच्या कारवायांवर प्रत्यक्षपणे देखरेख करीत होते.

कोणकोणत्या नेत्यांना ठार करावयाचे याची एक यादीच त्यांनी तयार केली होती. त्यात पहिल्या क्रमांकाचे नाव होते ते जोसेफ स्टालिनचे. शिवाय क्लेमेंती वोरोशिलोव, व्ही. एम्. मोलोतोव, सर्जी किरोव, लाझार कागानोविच, आन्द्रे झादनोव, व्याचेस्लाव मेन्झेन्स्की, मॅक्झिम गॉर्की, वालेरिन क्युबिशेव ही नावे त्यात प्रमुख होती.

या सर्व नेत्यांच्या हत्या करण्याची निकड लिऑं ट्रॉट्स्की सतत लावीत होता. ऑक्टोबर १९३४ मध्ये त्याचा असाच एक तातडीचा आदेश त्याचा पूर्वीचा अंगरक्षक इफ्राईम द्रेईत्झर याला मिळाला. एका जर्मन सिने मासिकाच्या पहिल्या काही पानांच्या मोकळ्या जागेत अदृश्य शाईने त्याने तो संदेश लिहिला होता.

स्टालिन व वोरोशिलोव यांची हत्या करणे, लष्करात लहानलहान दहशतवादी केंद्रे संघटित करणे व युद्ध भडकले की शत्रुहल्ल्यामुळे होणारी पिछेहाट व गोंधळ यांचा सत्ता काबीज करण्याच्या दृष्टीने फायदा करून घेणे ही अत्यंत महत्त्वाची कामे असल्याचे त्याने कळविले होते. त्या मजकुराखाली ‘स्टारिक’ ही ट्रॉट्स्कीची सांकेतिक सही होती.

ट्रॉट्स्कीच्या मार्गदर्शनानुसार रशियातील ट्रॉट्स्कीवादी व दहशतवादी कामाला लागलेले होतेच. मास्कोत संरक्षणमंत्री वोरोशिलोव सामान्यतः ज्या मार्गाने जात असे त्या फ्रुन्झ मार्गावर कित्येक दिवस सशस्त्र दहशतवादी दबा धरून बसलेले असत. परंतु वोरोशिलोवची मोटार नेहमीच अती वेगाने धावत असल्यामुळे त्यावर गोळीबार करणे व्यर्थ ठरेल असे दहशतवाद्यांना वाटले. तसे त्यांनी नंतर त्यांच्या वरिष्ठांना कळवलेही.

स्टालिनला ठार करण्याचे प्रयत्नही बरेचदा झाले. परंतु ते यशस्वी ठरले नाहीत. मास्कोतील एका महत्त्वाच्या पक्षपरिषदेत स्टालिनची हत्या करण्याची कामगिरी एका ट्रॉट्स्कीवाद्याकडे—इवान बाकायेवकडे सोपविण्यात आली होती. त्या हेतूने त्याने सभास्थानी प्रवेश मिळविलाही. परंतु गोळ्या घालण्याकरिता स्टालिनच्या आवश्यक तेवढ्या नजीक तो मारेकरी पोहोचू शकला नाही. एकदा काळ्या समुद्राच्या किनाऱ्याने स्टालिन मोटारबोटीतून जात असता शक्तिशाली रायफलने त्याच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. पण अंतर बरेच असल्याने मारेकऱ्यांचा नेम चुकला. याबद्दल मारेकरी इवान

बाकायेवजवळ दुःख प्रदर्शित करीत कामेनेव म्हणाला, 'पुढच्या वेळी तरी तू यशस्वी ठरशील अशी आशा आहे.' [पेट्रोग्राड सोविएतमधील झिनोवीवचा जुना मदतनीस बाकायेव याकडे दहशतवादी केंद्राच्या सर्व मारेकऱ्यांना शिस्तीत ठेवण्याची जबाबदारी होती. संघटनेचा विश्वासघात केल्याचा कोणाबद्दल केवळ संशय जरी आला तरी त्याला ठार करण्याचे काम झिनोवीवच्या आदेशानुसार बाकायेव करीत असे. १९३४ च्या मध्यात बोगदान या मारेकऱ्याचा शेवटच्या क्षणी धीर सुटल्यामुळे स्टालिन हत्येचे ते काम अयशस्वी ठरताच बोगदानला बाकायेवने अशा प्रकारे ठार केले की त्याच्या मृत्यूला सोविएत सरकार जबाबदार आहे असे सकृत्दर्शनी वाटावे.

सत्ता हाती आल्यानंतर झिनोवीव व कामेनेव हे बाकायेवला ओ.जी.पी.यू. मध्ये जबाबदारीच्या उच्च पदी नेमणार होते. व त्या यंत्रणेचा उपयोग करून घेऊन गृहखात्यातील व ओ.जी.पी.यू.तील ज्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या कटकारस्थानांबद्दल शंका होती त्या सर्वांना, तसेच स्टालिन व त्याचे सहकारी यांच्या हत्या करण्याच्या कटात जे जे सामील होते त्यांना बाकायेवकडून यमसदनी पाठवून आपल्या कृष्णकृत्यांवर पांघरूण घालण्याचा झिनोवीव–कामेनेव संघटनेचा डाव होता, असे ट्रॉट्स्की–झिनोवीववादी दहशत केंद्राचा एक कार्यकर्ता आयझॅक रेनगोल्ड याने मागून आपल्या जबानीत सांगितले.]

स्टालिन हत्येचे प्रयत्न विफल ठरत असल्याने ट्रॉट्स्कीला धीर निघेनासा झाला. त्यामुळे रशियातील त्याच्या अनुयायांना तो लिहीत असलेल्या पत्रांचा सूरही बदलला. भरीव असे कोणतेही काम न करता रशियातील ट्रॉट्स्कीवादी निष्फळ बडबडीत वेळ घालवीत आहेत असा दोषारोप तो त्यांच्यावर करू लागला. सोविएत संघातील त्याच्या अनुयायांकडून अपेक्षित ती कार्यवाही त्वरेने होत नाही असे वाटल्याने त्याकरिता तो आपले हस्तक सोविएत संघात पाठवू लागला. अशा प्रकारे बनावट पासपोर्टवर सोविएत संघात येणारा पहिला जर्मन ट्रॉट्स्कीवादी होता तो नाथान लुरे. त्याच्या पाठोपाठ आले कनोन बर्मन–युरीन, फ्रिट्झ डेविड उर्फ इल्या–डेविड क्रुग्लियान्स्की, व्हॅलेंटाईन एलबर्ग व मोईसी लुरे. हे शेवटचे दोघे मार्च १९३३ मध्ये सोविएत संघात आले होते. त्यावेळी सोविएत संघात नोकरीला असलेल्या फ्रान्झ वेईट्झ या ट्रॉट्स्कीवादी इंजीनियरच्या देखरेखीखाली मास्कोत असताना त्याने काम करावे असे आदेश नाथानलुरे बर्लिनहून निघाला त्यावेळी त्याला देण्यात आले होते. फ्रान्झ वेईट्झ् हा जर्मनीतील नाझी पक्षाचा सदस्य होता. नाझी गेस्टॅपोचा संचालक हेन्रिच हिमलर याचा खास गुप्त दूत म्हणून ट्रॉट्स्की–झिनोवीव दहशतकेंद्राच्या सहकार्याने हेरगिरीचे व दहशतवादी कृत्यांचे आयोजन करण्याकरिता त्याला सोविएत संघात पाठविण्यात आले होते. नाझी हस्तकाशी करण्यात आलेल्या त्या हातमिळवणीबद्दल एका झिनोवीव अनुयायाने नापसंती व्यक्त करताच त्याला झिनोवीव म्हणाला–'त्यात तुला एवढे अस्वस्थ व्हायला काय झाले? तू एक इतिहासकार आहेस; तुला लॅसेल व बिस्मार्क यांचे उदाहरण माहीत असेलच. क्रांतिकार्याकरिता बिस्मार्कचा उपयोग करून घेण्यात लॅसेलला काही गैर वाटले नाही तर हिमलरचा आपण उपयोग करून घेतला तर त्यात एवढे आक्षेपार्ह काय आहे?'

कनोन बर्मन-युरीन व फ्रीटस् डेविड हे ट्रॉट्स्की हस्तक नोव्हेंबर १९३२ च्या अखेरी रशियात जायला निघाले तेव्हा त्यांना कोपेनहेगन येथे भेटीस बोलवून ट्रॉट्स्कीने त्यांना काही खास सूचना दिल्या. सर्वाधिक निकडीचे काम म्हणजे स्टालिनची हत्या हे असून ते एक ऐतिहासिक महत्त्वाचे कार्य आहे व त्याकरिता जिवावर उदार होऊन कार्य करणाऱ्या निधड्या छातीच्या लोकांची गरज असल्याचे ट्रॉट्स्कीने त्यांना सांगितले. एकट्या दुकट्या व्यक्तीची हत्या करणे हे मार्क्सवादाशी कितपत सुसंगत आहे असे कनोन बर्मन-युरीन याने विचारताच,'सगळ्या समस्या केवळ सैद्धांतिक भूमिकेवरून सोडविता येत नाहीत, मार्क्सवादाचा निकष आपल्या कार्यपद्धतीला लावणे योग्य नाही, कारण सोविएत संघात आज जी

अनुक्रमणिका

परिस्थिती उद्‌भवली आहे त्याची कल्पनाच मार्क्सला येणे शक्य नव्हते', असे उत्तर ट्रॉट्स्कीने दिले व स्टालिनबरोबरच कागानोविच व वोरोशिलोव यांचीही हत्या करण्याची निकड त्याने स्पष्ट केली, त्याच्या त्या सगळ्या बोलण्यात स्टालिनबद्दलचा ट्रॉट्स्कीचा द्वेष ओतप्रत भरलेला स्पष्ट दिसत होता. सोविएत नेत्यांच्या या हत्या करावयाच्या त्या शक्यतोवर कॉमिन्टर्नची सभा सुरू असताना कराव्यात, म्हणजे स्टालिनवर झाडल्या गेलेल्या गोळ्यांचा कानठळ्या बसविणारा आवाज इतर सर्व राष्ट्रांतही घुमेल व त्या ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या ठरणाऱ्या राजकीय हत्येला जागतिक महत्त्व प्राप्त होईल अशी सूचना ट्रॉट्स्कीने केली, असे कनोन बर्मन-युरीन याने आपल्या निवेदनात नंतर सांगितले.

त्याचा दुसरा दूत फ्रिटझ डेविड याच्याशी बोलतानाही स्टालिनची हत्या हे सर्वाधिक महत्त्वाचे असे क्रांतिकार्य असून ते महत्कार्य करताना खऱ्या क्रांतिकारकाचे हात कापता कामा नयेत असे ट्रॉट्स्कीने बजावले. सोविएत संघातील जनतेच्या वाढत्या असंतोषाचाही त्याने उल्लेख केला, आणि युद्ध सुरू होताच तेथील सर्व सोविएतविरोधी शक्ती एक होतील व असंतोषाने पेटून निघालेल्या सामान्य रशियन जनतेचे नेतृत्व करून त्या शक्ती सत्ताधाऱ्यांना उलथून पाडतील असा आशावादी विश्वास त्याने व्यक्त केला.

ट्रॉट्स्की-झिनोवीव-दहशतवादी केंद्राने त्यांचा पहिला हल्ला लेनिनग्राड पक्षसचिव, स्टालिनचा जिवलग मित्र व सरकारी यंत्रणेतील एक प्रमुख सहकारी सर्जी किरोव यावर करण्याचे ठरविले. त्या दृष्टीने नोव्हेंबर १९३४ च्या प्रारंभी मास्को येथे असलेल्या झिनोवीवने लेनिनग्राड येथील दहशतवादी केंद्राच्या कामकाजाची पाहणी करण्याकरिता त्याचा अनुयायी बाकायेव याला लेनिनग्राडला रवाना केले. लेनिनग्राड येथील दहशतवाद्यांनी किरोवचा काटा काढण्याचा प्रयत्न त्यापूर्वी केला होता, पण त्यांना त्यात यश मिळाले नव्हते. त्यांना झिनोवीवच्या त्या हस्तकाचे तेथे येणे आवडले नाही. झिनोवीवचा त्यांच्यावर विश्वास नव्हता असाच त्यांनी त्याचा अर्थ केला.

किरोवच्या हत्येची योजना आखण्याकरिता लेनिनग्राड येथील सात दहशतवाद्यांची एक बैठक झाली. बाकायेव तेथे उपस्थित होता. किरोव दररोज घरून ज्या रस्त्याने स्मोल्नी इंस्टिट्यूटमधील त्याच्या कार्यालयात जातो त्या मार्गावर त्यांनी बारीक नजर ठेवली असल्याचे त्यांनी बाकायेवला सांगितले, व त्याची हत्या करण्याची कामगिरी ज्या लिओनिद निकोल्येववर सोपविण्यात आली होती त्याच्याशी बाकायेवची ओळखही करून दिली. फिक्कट अंगकांतीच्या नाजुक दिसणाऱ्या निकोल्येवला हिशोबात गडबड केल्याच्या आरोपावरून त्याच्या पदावरून दूर करण्यात आले होते व अविश्वसनीय व्यक्तिमत्त्वाचा म्हणून 'कॉमसोमोल' (कम्युनिस्ट युवक संघटना) मधूनही त्याची हकालपट्टी करण्यात आली होती. किरोवची हत्या किरोवच्याच घरानजीक, नाही तर स्मोल्नी इंस्टिट्यूटमध्ये करण्याचे त्याने ठरविले असल्याचे निकोल्येवने बाकायेवला सांगितले. तेव्हा, हत्येच्या कटाचे आयोजन अशा प्रकारे व्हावे की अन्य कोणाचेही नाव त्यात गोवले जाऊ नये, पकडले गेल्यास त्या हत्येचा कोणत्याही संघटनेशी सुतराम् संबंध नव्हता अशीच भूमिका अखेरपर्यंत ठेवावी, दहशतवादी कृत्ये केल्याचा आरोप केला गेल्यास तो साफ नाकबूल करावा, आणि दहशतवाद बोल्शेविझम व मार्क्सवाद यांच्याशी पूर्णपणे विसंगत असल्याचे

अट्टाहासाने सांगावे अशा, झिनोवीवने मास्को येथे दिलेल्या सावधगिरीच्या सूचना, निकोल्येवला बाकायेवने दिल्या.

लेनिनग्राड येथे किरोव हत्येची होत असलेली सिद्धता पाहून झिनोवीवला समाधान वाटले. किरोव लवकरच मारला जाणार अशी खात्री त्याला व कामेनेवला वाटू लागली. त्या घटनेने सोविएत सरकारात चांगलाच गोंधळ माजेल व इतर सोविएत नेत्यांच्या हत्येच्या प्रक्रियेलाही त्यामुळे गती मिळेल असा त्यांना विश्वास होता.

१ डिसेंबर १९३४ रोजी ४ वाजून २७ मिनिटांनी सर्जी किरोव स्मोल्नी इंस्टिट्यूमधील आपल्या कार्यालयातून बाहेर पडला. ब्रेडचे सरकारतर्फे होणारे नियंत्रित वाटप बंद करण्यासंबंधी केंद्रीय समितीने घेतलेल्या निर्णयावरील त्याचा अहवाल सादर करण्याकरिता तो निघाला असता कॉरिडोरमधून एक माणूस अकस्मात समोर आला व त्याने सरळ किरोवच्या मस्तकावर गोळ्या झाडल्या. ४·३० वाजता किरोवची प्राणज्योत मालवली. मारेकरी सर्जी निकोल्येवने पळून जाण्याचा प्रयत्न केला. ते शक्य न झाल्याने त्याने स्वतःवरच रिव्हॉल्वर रोखले. परंतु तेथे धावून आलेल्या मंडळींनी त्याला पकडले.

२८ डिसेंबर १९३४ रोजी सोविएत संघाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या लष्करी शाखेपुढे निकोल्येवविरुद्धचा खटला सुरू झाला. ‘मी किरोववर गोळ्या झाडल्या तेव्हा ती घटना म्हणजे सोविएत संघाच्या साम्यवादी पक्षाविरुद्ध व सरकारविरुद्ध उठावाची नांदी ठरावी अशी माझी अपेक्षा होती’ असे निकोल्येवने आपल्या जबानीत सांगितले. न्यायालयाने त्याला मृत्यूदंडाची शिक्षा सुनावली. [किरोव हत्येचे रशियन फासिस्टांनी, तसेच उजव्या विरोधकांनी व ट्रॉट्स्कीवाद्यांनी सहर्ष स्वागत केले. झारकालीन अधिकारी व जपानी हस्तक काऊंट अनास्तसे वान्सियात्स्की याने अमेरिकेत ‘द फासिस्ट’ या थॉम्पसन येथून (कनेक्टिकट) प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्राच्या मार्च १९३५ च्या अंकात मोठ्या हर्षभराने जाहीर केले, किरोव नष्ट झालाच आहे. आता पिस्तुलाचा पुढचा नेम स्टालिनवर धरला गेला पाहिजे—ती घटना सार्वत्रिक उठावाची नांदी निश्चितच ठरेल! माझ्या रशियन बंधूंनो! निकोल्येवच्या समाधीपुढे मानवंदना द्या. निकोल्येव अमर होवो!’] झिनोवीव—कामेनेव व अन्य ट्रॉट्स्कीववादी झिनोवीववादी दहशतकेंद्राचे नेते त्या हत्येच्या कटात गुंतले असल्याचा गौप्यस्फोट त्याने केला नाही. परंतु किरोवच्या हत्येची योजना व सिद्धता ज्या प्रकाराने केली गेली होती त्यावरून त्या पाठीमागे केवळ निकोल्येव नसून बरेच मोठे धोकादायक कारस्थान असले पाहिजे हे सोविएत सरकारला कळून चुकले. त्यामुळे त्या हत्येची चवकशी करण्याकरिता एका खास तज्ज्ञाची नेमणूक बोल्शेविक पक्षाने केली. तो होता एन्.आय्. येझोव—पक्षाच्या केंद्रीय समितीचा सदस्य व नियंत्रण—मंडळाचा प्रमुख.

निकोल्येवच्या न्यायालयीन चवकशीनंतर पंधरा दिवसांनी किरोव हत्येच्या संबंधात ग्रेगोरी झिनोवीव व लिऑं कामेनेव, तसेच बाकायेव व त्यांचे बरेच सहकारी यांच्यावर किरोव हत्येच्या कटात सामील असल्याचा आरोप ठेवण्यात येऊन त्यांना न्यायालयासमोर उभे करण्यात आले. त्या संपूर्ण खटल्याच्या काळात पूर्वी कटवाल्यांनी निश्चित केल्याप्रमाणे, जेवढे काही पुराव्यानिशी सोविएत सरकारने सिद्ध केले त्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही कबुली त्यांनी दिली नाही. झाल्या प्रकाराबद्दल त्यांनी मोठा खेद व्यक्त केला. सरकारला ती मंडळी करीत असलेल्या राजकीय विरोधामुळे सोविएत सरकारविरुद्धच्या

अनुक्रमणिका

हिंसक कारवायांकरिता अनुकूल वातावरण तयार झाले असल्याची व ते विरोधकांच्या 'मास्को केंद्रा' चे नेते असल्याची कबुली त्यांनी दिली व त्यांच्या त्या राजकीय विरोधातून किरोव हत्येचा कट साकार झाला असल्याने त्या गुन्ह्याची नैतिक जबाबदारी तेवढी त्यानी मान्य केली. परंतु हत्येच्या कटात त्यांचा प्रत्यक्षपणे हात होता किंवा त्याबद्दल त्यांना माहिती होती हे त्यांनी साफ नाकारले.

'मी नेता असल्याने मला हे सर्व माहीत असायला हवे होते हे तर खरेच! या भयानक हत्येने आजपर्यंतच्या पक्षविरोधी लढ्यावर इतका विदारक प्रकाश पडला आहे की पक्षाला पूर्वी ज्या झिनोवीव गटाने विरोध केला त्या गटाकडेच या हत्येची राजकीय जबाबदारी जाते असे पक्ष मानीत असेल तर त्यात वावगे किंवा असमर्थनीय असे काही नाही' असे निवेदन झिनोवीवने न्यायालयासमोर केले. कामेनेवनेही तोच सूर धरला. 'स्वभावतः मी भित्रा नसलो तीर विरोधाकरिता शस्त्र उचलण्याचे माझ्या मनातही कधी आले नाही. आम्ही करीत असलेल्या विरोधामुळे केंद्रीय समितीला शेवटी आमच्याशी तडजोड करणे भाग पडेल व सत्ता आमच्या हाती येऊ शकेल एवढेच मला वाटत होते' असे त्याने सांगितले.

त्याचे ते ढोंग सफल ठरले. किरोव हत्येत त्यांचा प्रत्यक्षपणे हात होता हे न्यायालयात निर्विवादपणे सिद्ध होऊ शकले नाही. सोविएत विरोधी व राष्ट्रविरोधी कारवाया त्यांनी केल्या एवढ्यावरच त्यांचा गुन्हा सीमित राहिला. न्यायाधीशांनी आपल्या निकालात म्हटले, 'मास्को केंद्राच्या सदस्यांच्या कारवायामुळे १ डिसेंबर १९३४ रोजी कॉम्रेड किरोवच्या झालेल्या घृणास्पद हत्येला प्रत्यक्षपणे चिथावणी मिळाली असे सिद्ध करणारा पुरावा न्यायालयापुढे आला नाही. तरीही त्या प्रतिक्रांतिवादी केंद्राच्या लेनिनग्राड गटाच्या दहशतवादी प्रवृत्तीची जाणीव होती व त्यांनी त्यांच्या सरकारविरोधी भावना भडकाविल्या हे मात्र निश्चितपणे सिद्ध झाले आहे.'

सोविएतविरोधी कारवायांकरिता झिनोवीव यास दहा वर्षाची तर कामेनेव याला पाच वर्षांची कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. या खटल्याने सोविएत विरोधी कारस्थानाच्या केवळ वरवरच्या स्तराला स्पर्श केला होता. सरकारविरोधी गुप्त दहशतवादी यंत्रणेला त्यामुळे फारसा धक्का पोहोचला नाही.

लेनिनग्राड खटल्याच्या वेळी अनेक गोष्टी उघडकीस येऊ शकल्या नाहीत. त्यापैकी काही गोष्टी मोठ्या आश्चर्यजनक होत्या. झिनोवीव व कामेनेव यांना जेव्हा अटक झाली त्यावेळी चार सोविएत गुप्त पोलिसांनी त्यांना एन्.के.व्ही.डी. च्या मध्यवर्ती कार्यालयात नेले होते. [१९३४ च्या अखेरी सोविएत संघाची अंतर्गत सुरक्षा यंत्रणा म्हणून ओ.जी.पी.यू. च्या जागी एन्.के.व्ही.डी. (सार्वजनिक सुरक्षा विभाग) ची निर्मिती करण्यात आली होती.] ते चार जण होते एन्.के.व्ही.डी. च्या गुप्त राजकीय विभागाचा प्रमुख मोल्यनोव, कार्यवाही विभागप्रमुख पौकर, त्याच विभागाचा सहाय्यक प्रमुख वोलोविच व एन्.के.व्ही.डी. च्या अध्यक्षाचा मदतनीस बुलानोव.

झिनोवीव—कामेनेव यांच्या अटकेच्या संदर्भात या चारही एन्.के.व्ही.डी. हस्तकांची वागणूक मोठी विचित्र होती. गुन्ह्यासंबंधित कागदपत्रे किंवा अन्य पुरावा शोधण्याकरिता त्यांनी झिनोवीव व कामेनेव

अनुक्रमणिका

यांच्या घरांची झडती तर घेतली नाहीच, उलट ज्यावरून त्यांचा गुन्हा सिद्ध होऊ शकला असता अशी बरीच कागदपत्रे जाळून टाकण्याची त्यांना त्यांनी मोकळीक दिली.

मोल्यनोव व बुलानोव हे उजवा गट– ट्रॉट्स्कीवादी कारस्थानी यंत्रणेचे सदस्य होते तर पौकर व वोलोविच हे जर्मन हस्तक होते.

झिनोवीव व कामेनेव यांना अटक करण्याकरिता याच चौघांची निवड केली होती ती एन्.के.व्ही.डी. चा अध्यक्ष हेन्री यगोदा याने!

अनुक्रमणिका

प्रकरण १८

# क्रेमलिनमध्ये हत्या

किरोव हत्येच्या सहा महिने अगोदर, ओ.जी.पी.यू. चा काही दिवसापासून आजारी असलेला अध्यक्ष व्याचेस्लाव मेन्झिन्स्की याचे हृदयविकाराने निधन झाले. त्याच्या जागी काहीसा ठेंगणा, शांत व मोठा कार्यक्षम दिसणारा, त्यावेळी ओ.जी.पी.यू. चा उपाध्यक्ष असलेला त्रेचाळिस वर्षाचा हेन्री जी. यगोदा याची नेमणूक झाली.

हेन्री यगोदा हा ट्रॉट्स्कीवादी तर होताच पण शिवाय उजव्या विरोधकांच्या गटाचा सदस्य म्हणून १९२९ मध्येच त्यांच्या कारस्थानी यंत्रणेत तो सामील झाला होता. पण बुखारिन, झिनोवीव किंवा ट्रॉट्स्की यांच्यावर त्याचा विश्वास होता म्हणून तो त्यांना सामील झाला होता असे नव्हे तर, रशियात ते लवकरच सत्तेवर येणार अशी त्याला खात्री वाटत होती म्हणून! शेवटी विजयी ठरणाऱ्या गटाशीच हातमिळवणी करावयाची असे त्याने ठरविले होते असे त्याने नंतर आपल्या निवेदनात सांगितले, तो म्हणाला—

'विरोधकांनी चालविलेल्या लढ्याकडे माझे बारिक लक्ष होते. कारण त्या लढ्यात जो पक्ष विजयी ठरेल त्याला जाऊन मिळण्याचे मी अगोदरच ठरवून टाकले होते. ट्रॉट्स्कीवाद्यांच्या कारवाया दडपून टाकण्याकरिता जेव्हा कार्यवाही सुरू झाली त्यावेळी शेवटी ट्रॉट्स्कीवाद्यांचा विजय होणार की साम्यवादी पक्षाची केंद्रीय समिती लढा जिंकणार या प्रश्नाचा निकाल लागलेला नव्हता. त्यामुळे ओ.जी.पी.यू चा उपाध्यक्ष म्हणून ट्रॉट्स्कीवाद्यांविरुद्धची दंडात्मक कार्यवाही मी अशा पद्धतीने केली की ज्यामुळे ट्रॉट्स्कीवाद्यांचा माझ्यावर रोष होऊ नये. त्यांना हद्दपारीची शिक्षा झाली की जेथून त्यांना त्यांच्या कारवाया निर्धोकपणे चालविणे शक्य होईल अशाच ठिकाणी मी त्यांची सर्व व्यवस्था लावून देत असे.'

एकंदर कटकारस्थानात यगोदा बजावीत असलेल्या भूमिकेबद्दल माहिती फक्त बुखारिन, रिकोव व ट्रॉट्स्की या तीन उजव्या नेत्यांना होती. १९३२ मध्ये उजवे व ट्रॉट्स्कीवादी यांचा एक गट तयार झाला तेव्हा यगोदाबद्दलची ती माहिती प्यातकोव व क्रेस्टिन्स्की यांना कळली.

ओ.जी.पी.यू चा उपाध्यक्ष असल्याने कटवाल्यांची कारस्थाने उघडकीस येऊ नयेत व त्यांना अटक होऊ नये अशी व्यवस्था करणे यगोदाला शक्य होत असे. उजवे व ट्रॉट्स्कीवादी गटांच्या सदस्यांना ओ.जी.पी.यू चे खास हस्तक म्हणून तो भरती करून घेत असे. त्यामुळे सोविएत गुप्त पोलीस यंत्रणेत ट्रॉट्स्कीवाद्यांचा व परकीय हेरगिरी सेवेतील अनेक हस्तकांचा शिरकाव झाला होता व यगोदाच्या संरक्षक पंखाखाली आपापल्या क्षेत्रात हेरगिरीची कामे ते बिनधोकपणे करीत होते. झिनोवीव व कामेनेव यांना

अनुक्रमणिका

अटक करण्यास पाठविण्यात आलेल्या पौकर व वोलोविच यांची ओ.जी.पी.यू त नियुक्ती यगोदानेच केली होती. 'परकीय हेरखात्यांशी संबंध ठेवण्याच्या दृष्टीने व कारस्थानांच्या योजना सफल करण्याच्या दृष्टीने त्या दोघांची मोलाची मदत होईल अशी मला खात्री होती' असे त्यांच्या नियुक्तीबद्दल बोलताना नंतर यगोदाने सांगितले.

१९३३ मध्ये ट्रॉट्स्की—झिनोवीववादी केंद्राचा प्रमुख संघटक इवान स्मिर्नोव याला एकाएकी सोविएत सरकारच्या हस्तकांनी अटक केली. यगोदा ती अटक अडवू शकला नाही. पण कैद्याची तपासणी करण्याची सबब करून यगोदाने तुरुंगात स्मिर्नोवची भेट घेतली व न्यायालयासमोर चौकशीच्या वेळी काय व कसे बोलायचे हे त्याला समजवून सांगितले.

१९३४ मध्ये किरोव हत्येपूर्वी लेनिनग्राडमधील ओ.जी.पी.यू हस्तकांनी लिओनिद निकोल्येव याला पकडून त्याची झडती घेतली होती. तेव्हा त्याच्या जवळ एक पिस्तूल व किरोव ज्या मार्गाने नेहमी जात असे त्या भागाचा नकाशा सापडला होता. त्याबद्दल यगोदाला कळविण्यात येऊनही, जास्त चौकशी न करता निकोल्येवला सोडून देण्यात यावे असा आदेश त्याने ओ.जी.पी.यू चा सहाय्यक प्रमुख झपोर्झेतस् याला दिला. झपोर्झेतस् हा यगोदाचाच माणूस होता. यगोदाच्या आदेशानुसार त्याने निकोल्येवला सोडून दिले. यानंतर काही आठवड्यातच त्याने किरोवची हत्या केली.

यगोदाच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदतीने उजव्या व ट्रॉट्स्कीवादी गटाने केवळ किरोवची नव्हे तर आणखीही अनेक हत्या केल्या. वरवर शांत व कार्यक्षम दिसणाऱ्या यगोदाच्या मनात असीम महत्त्वाकांक्षा, क्रौर्य व कपट दडलेले होते. उजवे व ट्रॉट्स्कीवादी गट त्यांच्या गुप्त कारवायांकरिता जसजसे यगोदावर अधिकाधिक विसंबू लागले तसतसे त्या संपूर्ण कारस्थानाचा तोच स्वतः केंद्रबिंदू व सूत्रधार आहे अशी ओ.जी.पी.यू. च्या त्या उपाध्यक्षाची खात्री होऊ लागली. तो लवकरच रशियाचा हिटलर बनणार असे स्वप्न तो पाहू लागला. हिटलरचे 'माईन काम्फ' त्याला अत्यंत रोचक वाटले. एका साध्य सार्जंटच्या पदावरून चढत चढत हिटलर जर्मन राष्ट्राचा हुकुमशाहा बनला आहे ही गोष्ट तर त्याला विशेष कौतुकास्पद वाटत होती. यगोदा हा प्रारंभी लाल लष्करात एक सार्जंटच होता. मग हिटलरप्रमाणे त्यालाही राष्ट्रप्रमुख बनायला काय हरकत असावी?

स्टालिनच्या उन्मूलनानंतर रशियात प्रस्थापित व्हावयाच्या सरकारच्या स्वरूपाविषयी यगोदाच्या काही ठाम कल्पना होत्या. ते सरकार जर्मनीतील नाझी सरकारच्या धर्तीचे असावे व हिटलरप्रमाणे तो त्या सरकारचा सर्वाधिकारी नेता असावा; पुनः संघटित पक्षाचा सचिव म्हणून स्टालिनची जागा रिकोवने घ्यावी; टॉम्स्की कामगार—संघटना प्रमुख बनावा व नाझींच्या पद्धतीप्रमाणे त्या संघटना सर्वस्वी सरकारच्या नियंत्रणाखाली राहाव्या; आणि 'तत्त्वज्ञ' बुखारिन हा त्या सरकारातील 'डॉ. गोबेल्स' असावा असे स्वप्न यगोदा मनाशी रंगवीत होता. ट्रॉट्स्कीचाही विचार करणे अर्थातच् भाग होते. परंतु ट्रॉट्स्कीला रशियात परत येऊ द्यायचे की नाही याबद्दल यगोदाच्या मनाचा निश्चय होत नव्हता. एकंदर परिस्थितीवर ते अवलंबून राहणार होते. पण दरम्यान स्वतःची महत्त्वाकांक्षा फलद्रूप करण्याकरिता ट्रॉट्स्कीने जर्मनी व

अनुक्रमणिका

जपान या राष्ट्रांशी सुरू केलेल्या वाटाघाटींचा फायदा करून घेण्याची त्याची तयारी होती. सोविएत संघाविरुद्ध युद्धाला प्रारंभ झाला की राज्यक्रांती घडवून आणावयाची असे यगोदाने पक्के ठरविले होते.

'स्टालिन—सरकार उलथून पाडण्याकरिता सशस्त्र कार्यवाही, प्रक्षोभक कृत्ये, विषप्रयोग अशा सर्वच मार्गांचा अवलंब आपल्याला करावा लागेल', यगोदा आपल्या निष्ठांवत अनुयायाला—बुलानोवला सांगत होता, 'परिस्थितीनुसार कधी अत्यंत सावधगिरीने हळूहळू पावले टाकावी लागतात तर कधी त्वरेने व आकस्मिकपणे हल्ला करणे आवश्यक असते.' सोविएत राजवटीविरुद्ध एक राजकीय शस्त्र म्हणून दहशतीच्या मार्गाचा अवलंब करण्यास यगोदाची पूर्ण संमती होती. परंतु दहशतवाद्यांची कार्यपद्धती अत्यंत रावनट व धोक्याची आहे असे त्याला वाटत होते. राजकीय हत्येकरिता चाकू, पिस्तूल, बॉंब अशा गोष्टींचा उपयोग करण्याऐवजी अधिक धूर्त व सावधगिरीचे मार्ग अवलंबिले पाहिजेत असे त्याचे मत होते.

त्या दृष्टीने हत्येचे एक साधन म्हणून विषाचा उपयोग करून घेण्याबाबत त्याने प्रथम अंदाज घेतला. त्याकरिता एक गुप्त प्रयोगशाळा प्रस्थापित करून त्यात त्याने काही रसायनतज्ज्ञांना कामाला जुंपले. हत्या झाल्याचे उघडकीस येऊन नये अशी पद्धती तो शोधून काढू इच्छित होता. लवकरच यगोदाने हत्येचे स्वतःचे एक वेगळे तंत्र विकासित केले. उजवे व ट्रॉट्स्कीवादी गटाच्या नेत्यासमोर त्याने त्या हत्यातंत्राची जोरदार शिफारस केली. 'ते तंत्र अगदीच साधे सरळ आहे', यगोदा हत्येच्या हमीचे आश्वासन देत होता, 'माणूस म्हटला की आजारपण यायचेच. तसे झाले की रोगी एक तर बरा होणार किंवा मरणार या कल्पनेची त्याच्या आप्तस्वकीयांना सवय होते; आणि त्या रोग्याला रोगमुक्त करायचे की मृत्युमुखी पाडायचे हे त्याच्या डॉक्टरच्या हाती असते. कळले ना? त्याकरिता फक्त आपल्याला हवे तसे डॉक्टर सापडले की काम फत्ते!'

**मेन्झिन्स्कीची हत्या**

या विलक्षण हत्या योजनेत यगोदाने प्रथम डॉ. लिओ लेविन याला गोवले. मध्यम वयाचा डॉ. लेविन हा खुद्द यगोदाचा डॉक्टर तर होताच, पण शिवाय, क्रेमलिनच्या वैद्यकीय सेवेचा तो एक प्रमुख सदस्य होता. यगोदाचा वरिष्ठ अधिकारी ओ.जी.पी.यू. अध्यक्ष व्याचेस्लाव मोन्झिन्स्की यासह अनेक उच्च स्तरीय सोविएत नेते त्याच्याकडून औषधोपचार करवून घेत होते.

डॉ.लेविनला आपल्या कटाच्या जाळ्यात पकडण्याच्या हेतूने यगोदा त्याच्यावर कृपेचा वर्षाव करू लागला. उंची परदेशी मद्य, फुले, अशा भेटवस्तू त्याच्या पत्नीला पाठवू लागला. मास्कोबाहेर एका उपनगरात एक बंगलाही त्याने त्या डॉक्टरला बहाल केला. डॉ. लेविन परदेशात गेला की परत येताना हवे तेवढे सामान जकात न भरता रशियात आणण्याची परवानगी त्याला दिली गेली. या सर्व प्रकारामुळे डॉ. लेविन हुरळून गेला. ओ.जी.पी.यू. च्या त्या उच्चपदस्थ अधिकाऱ्याची आपल्यावर एवढी मेहेरनजर का आहे हेच त्याला कळेना.

अनुक्रमणिका

लवकरच यगोदाच्या युक्त्याप्रयुक्त्यांच्या सापळ्यात फसून अनवधानी डॉ. लेविनने काही वेळा लाच घेतली; काही बारिकसारिक बेकायदेशीर गोष्टीही केल्या. त्याबरोबर, आवश्यक ती पूर्वतयारी झाली असे वाटून यगोदा सरळसरळ मुद्यावर आला. सोविएत संघात एक गुप्त सरकारविरोधी चळवळ चालू असून तो स्वतः त्या चळवळीचा एक नेता आहे. स्टालिन सरकार लवकरच उलथून पडेल व विरोधक सत्तेवर येतील. ती सर्व कार्यवाही फलद्रूप होण्याच्या प्रक्रियेत लेविन त्यांना मोलाची मदत करू शकतो, त्याच्याकडून औषधोपचार करून घेणाऱ्या काही सोविएत नेत्यांना जगातून नाहीसे करण्याचे महत्त्वाचे काम त्याला पार पाडायचे आहे असे यगोदाने लेविनला सांगितले.

ते ऐकताच लेविनची भीतीने गाळण उडाली. तो कां कू करू लागताच यगोदाने त्याला दमदाटी करण्यास प्रारंभ केला. 'मी सांगेन तसेच तू सर्व केले पाहिजेस', यगोदा लेविनला बजावीत होता, 'त्यातून तुझी सुटका नाही. याबद्दल तू कोणाजवळही काही बोलण्याचा प्रश्नच उद्‌भव नाही. कारण मी सांगेन त्याविरुद्ध तू काही बोललास तर तुझ्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही. मी तुला जे सुचविले त्यावर घरी जाऊन नीट विचार कर. थोड्याच दिवसात मी तुला पुन्हा बोलावणे पाठवीन.'

यगोदाच्या त्या बोलण्यामुळे त्याच्या मनावर झालेल्या प्रतिक्रियेबद्दल नंतर लेविनने सांगितले— 'त्याचे ते सर्व बोलणे मला भयंकर वाटले हे वेगळे सांगण्याची गरज नाही. यानंतर माझ्या अखंड मनःस्तापाला व क्लेशांना प्रारंभ झाला. तुझ्याशी कोण बोलत आहे-कोणत्या विभागाचा प्रमुख बोलत आहे ते तुला कळत आहे ना?' असा धाकदपटशा तो मला करी. मी जर त्याच्या आदेशानुसार काम केले नाही तर माझा व माझ्या कुटुंबाचा सर्वनाश होईल असे तो मला पुन्हा पुन्हा वजावी. त्यामुळे तो म्हणेल ते करणे मला भाग पडले.' यगोदाच्या दडपणाखाली वाकून डॉ. लेविनने मेन्झिन्स्कीला औषधोपचार करणाऱ्या आणखी एका डॉक्टरला त्या कटात ओढले. तो डॉक्टर होता डॉ. इगनाती एन् काझाकोव. या डॉक्टरच्या औषधी-उपाययोजनेच्या नाविन्यपूर्ण पद्धतींवर झालेल्या गरमागरम चर्चेने सोविएत वैद्यकीय वर्तुळात त्याकाळी चांगलीच खळबळ उडवून दिली होती. त्याच्या त्या नव्या तंत्राला तो 'ल्यासाटोथेरपी' म्हणे. अनेक रोगांकरिता ते एक बिनचूक औषध शोधून काढले असल्याचा त्याचा दावा होता. अन्जायना पेक्टोरिस व अस्थमा या रोगांचा त्रास असलेल्या मेन्झिन्स्कीचा काझाकोवच्या औषधपचारावर फार विश्वास होता व त्याचे औषध तो नेमाने घेत असे.

यगोदाच्या दडपणाखाली वाकून डॉ. लेविनने डॉ. काझाकोवची भेट घेतली. तो काझाकोवला म्हणाला 'मेन्झिन्स्की तर आता जवळजवळ मेल्यासारखाच आहे तू कशाला त्याच्यावर इतका वेळ खर्च करीत आहेस?' लेविनच्या त्या बोलण्याने थक्क झालेल्या काझाकोवला लेविन पुढे म्हणाला, 'मला वाटलं होतं तू मोठा हुशार आहेस. पण मला काय म्हणायचे आहे ते तुला अजून कसे समजत नाही? मेन्झिन्स्कीला औषधोपचार करण्याचे काम तू मोठ्या उत्साहाने करीत आहेस.त्याची प्रकृती आता सुधारलीही आहे. पण तू त्याला पुन्हा कामावर जाऊ द्यायला नको होतंस!"

अनुक्रमणिका

लेविनच्या त्या विचित्र बोलण्याने काझाकोवचे आश्चर्य व धास्ती अधिकच वाढली. लेविन पुढे बोलत होता, 'मृत्यूच्या दाराशी उभ्या असलेल्या मेन्झिन्स्कीची पुन्हा कामावर जाण्याइतपत तू प्रकृती सुधारलीस, यामुळे तू निष्कारण यगोदाचा रोष ओढवून घेत आहेस. मेन्झिन्स्की हा यगोदाच्या वाटेतील काटा आहे व तो लवकरात लवकर दूर व्हावा अशी यगोदाची इच्छा आहे. ते काम तो कोणत्याही भल्याबुऱ्या मार्गाने साध्य करेलच. यातील अवाक्षरही मेन्झिन्स्कीजवळ बोलू नकोस. तसे तू केलेस तर यगोदा तुलाच नष्ट करील. तू कुठेही पळालास, अगदी भूमीगत झालास तरी त्याच्या तावडीतून आता तुझी सुटका नाही.'

६ नोव्हेंबर १९३३ रोजी मेन्झिन्स्कीच्या घरून डॉ. काझाकोवला तातडीचे बोलावणे आले. तो मेन्झिन्स्कीच्या घरी गेला त्यावेळी तेथे टारपेंटाईनचा व रंगाचा उग्र दर्प भरलेला होता. थोड्याच वेळात त्याला स्वतःला श्वासोश्वासाला किंचित् त्रास होऊ लागला. घराला नुकताच रंग दिलेला असून तो लवकर वाळावा म्हणून रंगात टाकलेल्या द्रव्याचा तो उग्र गंध आहे असे मेन्झिन्स्कीच्या सचिवाने त्याला सांगितले. डॉ. काझाकोव माडीवर गेला तेव्हा मेन्झिन्स्की वेदनांनी तळमळत असल्याचे त्याला दिसले. त्या रंगद्रव्यामुळे त्याचा अस्थम्याचा त्रास खूपच वाढला होता. गुडघे पोटाशी मुडपून तो कसाबसा कण्हत बसला होता. त्याचे सर्व शरीर सुजले होते. नीट बोलणेही त्याला अशक्य झाले होते. श्वासोश्वास मोठ्या कष्टाने होत असून घरघर होत होती. काझाकोवने त्याला ताबडतोब एक इंजेक्शन दिले. व घराच्या सर्व दारेखिडक्या उघडण्यास सांगितले. हळूहळू तो दर्प नाहीसा झाला व रोग्याला पुष्कळच बरे वाटले. मेन्झिन्स्कीला बरे वाटल्यानंतर काझाकोव परत आपल्या घरी गेला. तो दारात पाऊल ठेवतो न ठेवतो तोच टेलिफोनची घंटी खणाणली. ओ.जी.पी.यू च्या मध्यवर्ती कार्यालयातून फोन होता, यगोदाने त्याला तात्काळ भेटीस बोलविले होते. काझाकोवला घ्यायला यगोदाने गाडी पाठविली होती.

डॉ. काझाकोव व यगोदा या व्यातिरिक्त त्या कार्यालयात तिसरे कोणीही नव्हते. टापटिपीचा पोषाख केलेल्या यगोदाने काझाकोवकडे थंडपणे पाहात एकदम विचारले 'मग कशी काय आहे मेन्झिन्स्कीची प्रकृती?' एकाएकी दम्याचा त्रास वाढल्याने त्याची प्रकृती एकदम फार बिघडली होती असे काझाकोवने सांगितले. त्यावर क्षणभर गप्प राहून यगोदाने त्याला विचारले, 'तुझे लेविनशी बोलणे झाले आहे काय?' 'होय' काझाकोव उत्तरला. त्याबरोबर, एकदम काझाकोवकडे वळून संतप्त स्वरात यगोदा म्हणाला, 'मग तू उगीचच चालढकल का करीत आहेस? करायचे ते लवकर उरकून का टाकीत नाहीस? दुसऱ्याच्या भानगडीत निष्कारण लुडबुड करायला तुला कोणी सांगितले?'

यगोदाच्या त्या रुद्रावताराने हबकलेल्या काझाकोवने भीतभीत विचारले, 'मी काय करावे अशी तुमची अपेक्षा आहे?'

'मेन्झिन्स्कीला वैद्यकीय उपचार करायला तुला कोणी सांगितले?' यगोदाची दडपशाही सुरू होती. 'मेन्झिन्स्की जिवंत राहण्यात आता काही फायदा नाही. उलट तो इतरांच्या मार्गातील अडथळा होऊन बसला आहे. तू व लेविन यांनी मिळून मेन्झिन्स्कीच्या जीवनाचा लवकरात लवकर अंत होईल अशी व्यवस्था करावी असा माझा तुला हुकुम आहे. आणि काझाकोव, एक गोष्ट चांगली लक्षात ठेव. माझ्या या

अनुक्रमणिका

आज्ञेचे पालन न केलेस तर तुला नष्ट करण्याचे मार्ग माझ्याजवळ आहेत. माझ्या तावडीतून तू सुटू शकणार नाहीस.'

यानंतर, कधी स्वप्नातही कल्पना केली नव्हती अशा भयानक जीवघेण्या धास्तीने काझाकोवचे जीवन विषवत बनले. एखाद्या झपाटलेल्या माणसाप्रमाणे तो वावरत होता. त्या सर्व प्रकाराबद्दल सोविएत अधिकाऱ्यांना कळवावे की नाही? काझाकोवच्या मनस्तापाला मर्यादा नव्हती.

या काळात डॉ. लेविन त्याला बरेचदा भेटायला आला. सोविएत सरकारविरुद्ध शिजत असलेल्या कटाबद्दल त्याने काझाकोवला माहिती दिली. यगोदा, रिकोव, प्यातकोव यासारखे सुप्रसिद्ध शक्तिशाली सरकारी अधिकारी त्यात सामील असून, कार्ल रादेक, बुखारिन यांसारखे बुद्धिवान लेखक व तत्त्वज्ञही त्यात गुंतले आहेत, लष्करातील काही अधिकारीही त्यांच्या पाठीशी आहेत; काझाकोवने यावेळी यगोदाला मदत केली तर सत्तेवर आल्यानंतर यगोदा त्याने केलेल्या मदतीचा मोबदला नक्कीच त्याच्या पदरात टाकील; सोविएत संघात एक अघोषित युद्ध गुप्तपणे सुरू झाले असून कोणत्या पक्षाला मिळायचे ते इतरांप्रमाणे डॉक्टरांनीही ठरविले पाहिजे असे त्याने काझाकोवला पटविले. यगोदाच्या दडपणाखाली शेवटी काझाकोव नमला. यगोदाच्या हुकुमाची तामिली होईल असे त्याने लेविनला सांगितले.

यानंतर लेविन व काझाकोव यांनी मेन्झिन्स्कीवर अशी काही औषधयोजना केली की त्यामुळे, कोणाला संशयही न येता हळूहळू मेन्झिन्स्कीचा रोग बळावून १० मे १९३४ रोजी त्याचे निधन झाले. ओ.जी.पी.यू चा प्रमुख म्हणून त्याची जागा यगोदाने घेतली. मेन्झिन्स्कीची हत्या घडवून आणण्यात त्याचा कोणत्याही प्रकारे स्वार्थी हेतू नव्हता, तर त्यांच्या कारस्थानी संघटनेची कार्यवाही यशस्वी व्हावी याकरिता त्याला ओ.जी.पी.यू. चा अध्यक्ष व्हावयाचे होते असे यगोदाने नंतर त्याच्या निवेदनात सांगितले.

### हत्येची हमी

ज्या सोविएत नेत्यांची त्यांना हत्या करावयाची होती त्यांची एक यादीच उजवे व ट्रॉट्स्कीवादी गटाने तयार केली होती. त्यात स्टालिन, वोरोशिलोव, किरोव, मेन्झिन्स्की, मोलोतोव, क्युबिशेव, कागानोविच, इदानोव व गोर्की यांची नावे होती. दहशतवाद्यांपासून त्यांना धोका असल्याची जाणीव त्या नेत्यांना असल्याने त्यांच्या संरक्षणाची अगदी चोख व्यवस्था करण्यात आली होती, यगोदाला अर्थातच् त्याची कल्पना होती. किरोवची हत्या उघड उघड करण्याचे ट्रॉट्स्की–झिनोवीववादी दहशत केंद्राने ठरविल्याचे जेव्हा येनुकिड्झ या उजव्या दहशतवादी संघटकाने यगोदाला कळविले, तेव्हा यगोदाने हत्येच्या त्या पद्धतीवर आक्षेप घेतला होता. तत्संबंधी यगोदाने मागून निवेदन केले–'अशा प्रकारे उघडपणे हत्या केल्यास मीच केवळ नव्हे तर संपूर्ण संघटनाच एखादे वेळी उघडकीस येईल ही मला वाटणारी धास्ती मी व्यक्त केली. यापेक्षा कितीतरी कमी धोक्याच्या पद्धती वापरण्याजोग्या आहेत असे मी येनुकिड्झला सांगितले; व डॉक्टरांच्या मदतीने मेन्झिन्स्कीचा मृत्यू कसा बिनधोकपणे घडवून आणला गेला त्याचीही मी त्याला आठवण करून दिली. पण किरोवच्या हत्येची योजना ट्रॉट्स्की–झिनोवीववाद्यांनी तयार केलेली

असून ती पार पाडण्याची जबाबदारी त्यांनी स्वतःकडे घेतली आहे, त्यामुळे त्याबाबत आता काही बदल करणे शक्य नाही; पण डॉक्टरांच्या सहाय्याने निर्धोकपणे व हमखास मृत्यू घडवून आणण्याच्या पद्धतीवर, व पक्ष व सरकार यातील कोणकोणत्या नेत्यांना त्या पद्धतीने यमसदनास पाठवायचे यावर दहशतवादी केंद्रात लवकरच विचारविमर्ष होणार असल्याचे येनुकिड्झने मला सांगितले.'

ऑगस्ट १९३४ च्या अखेरी विरोधकांच्या उजव्या गटाच्या मॅक्झिमोव नावाच्या सदस्याला येनुकिड्झच्या क्रेमलिन येथील कार्यालयात बोलाविण्यात आले. १९२८ मध्ये, मास्को मधील बुखारिनच्या नेतृत्वाखाली चालत असलेल्या मार्क्सवादी विद्यालयाचा मॅक्झिमोव हा एक हुशार विद्यार्थी होता. त्याचवेळी बुखारीनने त्याला उजव्यांच्या गटात ओढले होते; व त्याला कटकारस्थानाची शिकवण दिली होती. ऑगस्ट १९३४ मध्ये राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या सर्वोच्च मंडळाचा अध्यक्ष, कम्युनिस्ट पक्षाच्या पोलिटिकल ब्यूरोचा सदस्य व स्टालिनचा निकटचा सहकारी व मित्र वालेरिन व्ही. क्युबिशेव याचा तो खाजगी सचिव होता.

'रशियन जनतेपैकी सोविएत विरोधी लोकांना, विशेषतः कुलाकांना संघटित करून स्टालिन सरकारचे उन्मूलन करता येईल असा पूर्वी उजव्या गटाचा अंदाच होता,' येनुकिड्झ मॅक्झिमोवला सांगत होता; 'पण आता परिस्थिती बदलली आहे. आता सत्ता काबीज करण्याकरिता अधिक कृतिप्रवण होण्याची गरज आहे' कारस्थानाचे नवे तंत्र येनुकिड्झ मॅक्झिमोवला समजावू सांगत होता. दहशतवादाच्या मार्गे अनेक राजकीय विरोधकांचा काटा काढला पाहिजे हा टॉट्स्कीवाद्यांचा निर्णय उजव्या विरोधकांनी मान्य केला असून ते उद्दिष्ट त्या नेत्यांच्या आरोग्यावर आघात करून साध्य करावयाचे त्यांनी ठरविले आहे; तसे केल्याने, केवळ दुर्दैवाने ते नेते रोगाला बळी पडल्याचा आभास निर्माण होऊन त्यांचे कटकारस्थान उघडकीस येण्याची शक्यताच उरणार नाही; त्या दृष्टीने तयारी अगोदरच सुरू झालेली आहे; या सर्व कार्यवाहीचा सूत्रधार यगोदा असून कटवाल्यांना त्याचे संरक्षण आहे असे त्याने मॅक्झिमोवला सांगितले; आणि राष्ट्राच्या सर्वोच्च आर्थिक मंडळाचा अध्यक्ष क्युबिशेव याचा सचिव म्हणून क्युबिशेवच्या हत्येच्या कटात मॅक्झिमोवचा उपयोग करून घेण्याचे संघटनेने ठरविले आहे असेही युनिकिड्झने मॅक्झिमोवला कळविले.

हे ऐकताच मॅक्झिमोव चांगलाच धास्तावला. त्याच्या मनाची घालमेल सुरू झाली. थोड्याच दिवसांनी त्याला येनुकिड्झने पुन्हा आपल्या कार्यालयात बोलाविले. यावेळी क्युबिशेवच्या हत्येच्या योजनेची तपशीलाने चर्चा झाली. त्यावेळी आणखी एक माणूस त्या खोलीच्या एका कोपऱ्यात स्तब्ध बसला होता एक शब्दही त्याने उच्चारला नाही. परंतु हत्येच्या कटाची चर्चा चालू असता त्या माणसाने तेथे उपस्थित असावे एवढ्यावरूनच मॅक्झिमोव सर्व काही समजून चुकला. तो माणूस होता हेन्री यगोदा.

'तुझ्याकडून नेमकी काय अपेक्षा आहे ते नीट समजून घे,' येनुकिड्झ मॅक्झिमोवला बजावीत होता. पहिली गोष्ट म्हणजे रोग्याला तपासणे व औषधीयोजना करणे याकरिता यगोदाचे डॉक्टर, कोणतीही अडचण न येता रोग्याला बघण्यास जाऊ शकतील अशी व्यवस्था करणे, आणि दुसरे म्हणजे रोग्याचा

अनुक्रमणिका

आजार बळावला व त्याला अतिशय त्रास होऊ लागला तरी डॉक्टरांना बोलावण्याची घाई न करणे, आणि शक्यतोवर यगोदाच्या डॉक्टरांखेरीज कोणत्याही डॉक्टरला न बोलावणे.'

१९३४ च्या अखेरी क्युबिशेवची प्रकृती एकदमच पार ढासळली. त्याला असह्य वेदना होऊ लागल्या. कामकाज करणे त्याला अशक्य झाले. यगोदाच्या मार्गदर्शनानुसार क्युबिशेवचा मृत्यू ओढवून आणण्याकरिता त्यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत डॉ. लेविनने नंतर सांगितले.-'त्याच्या शरीरयंत्रणेत त्याचे हृदय सर्वात निःशक्त होते. त्यावरच आम्ही हल्ला चढविला. त्याच्या हृदयाच्या रक्तवाहिन्या नीट काम करीत नव्हत्या व त्याला क्वचित् एखादे वेळी 'अन्जायना पेक्टोरिसचा' त्रास व्हायचा. अशा वेळी हृदयावर ताण पडेल असे कोणतेही उत्तेजक औषध वस्तुतः द्यायचे नसते. कारण त्यामुळे हृदयक्रियेला उत्तेजना मिळून त्याला जास्त काम करावे लागल्याने ते अधिकच दुबळे बनते. क्युबिशेवच्या बाबतीत आम्ही नेमके तेच केले. हृदयाला ताण देणारी औषधे व इन्जेक्शन्स् आम्ही त्याला ऑगस्टच्या प्रारंभापासून ते ऑक्टोबर १९३४ पर्यंत, खंड न पडू देता दिली. त्यामुळे 'अन्जायना पेक्टोरिसचा' त्याला वारंवार व अत्यंतिक त्रास होऊ लागला.

२५ जानेवारी १९३५ रोजी दुपारी दोन वाजता क्युबिशेव त्याच्या कार्यालयात बसलेला असता त्याला हृदयविकाराचा झटका आला. मॅक्झिमोव त्यावेळी त्याच्या नजीकच होता. असा झटका आला तर रुग्णाने अजीबात हालचाल न करता शांतपणे पडून राहायचे असते परंतु क्युबिशेवला झटका आला की त्याला स्वस्थ बसू द्यायचे नाही, एवढेच नव्हे तर त्याला पायी घरी जाण्यास प्रवृत्त करायचे अशा सूचना डॉ. लेविनने मॅक्झिमोवला दिल्या होत्या.

पांढरा फटक पडलेला, वेदनांनी तळमळणारा क्युबिशेव मोठ्या कष्टाने त्याच्या कार्यालयातून बाहेर पडला. काय झाले ते मॅक्झिमोवने तात्काळ येनुकिड्झला कळविले. तेव्हा त्याने गप्प राहावे, डॉक्टरला मुळीच बोलावू नये असे येनुकिड्झने मॅक्झिमोवला सांगितले.

असह्य वेदनांनी विव्हळत क्युबिशेवने कार्यालयापासून त्याच्या घरापर्यंतचा रस्ता कसाबसा पार केला. त्याच्या यातना वाढतच होत्या. तसाच तो त्याच्या घराचा जिना चढून गेला. त्याची मोलकरीण तेथे दाराशीच होती. क्युबिशेवच्या चेहऱ्याकडे पाहताच त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे तिच्या लक्षात आले. डॉक्टरांना ताबडतोब पाठविण्याबाबत तिने त्याच्या कार्यालयात फोन केला. पण डॉक्टर येईपर्यंत क्युबिशेवचे प्राणोत्क्रमण झाले होते.

### ऐतिहासिक गरज

यगोदाच्या मार्गदर्शनाखाली सर्वात क्रूर हत्या कोणाची झाली असेल तर ती मॅक्झिम गॉर्की व त्याचा पुत्र पेश्कोव यांची.

अनुक्रमणिका

हत्या झाली त्यावेळी गॉर्की अडुसष्ट वर्षाचा होता. रशियाचा सर्वात प्रतिथयश लेखक व जगातील एक थोर मानवतावादी म्हणून संपूर्ण जगात त्याची आदरपूर्ण प्रशंसा होत होती. त्याला क्षयाचा व हृदयविकाराचा थोडाफार त्रास होता. फुफ्फुसविकाराचा तो वारसा त्याचा मुलगा पेश्कोव याच्याकडेही आला होता. दोघेही डॉ. लेविनकडून औषधोपचार करवून घेत होते.

उजवे व ट्रॉट्स्कीवादी यांच्या गटाने निश्चित केल्यानुसार यगोदाने गॉर्की व पेश्कोव यांच्या हत्या घडवून आणल्या. १९३४ मध्ये त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास त्याने डॉक्टर लेविनला सांगितले.

'गॉर्की सर्वोच्च सोविएत नेतृत्वाशी घनिष्ट संबंध असलेला माणूस आहे.' यगोदा लेविनला समजावीत होता, 'सरकारी नीतीला त्याचा भरीव पाठिंबा असून व्यक्तिशः स्टालिनप्रती त्याची निष्ठा आहे. शिवाय गॉर्कीच्या शब्दाला आपल्या देशातच नव्हे तर परराष्ट्रातही किती मान व वजन आहे हे तुला माहीतच आहे. त्याचा एखादा शब्दही आपल्या चळवळीला घातक ठरू शकतो याचीही जाणीव तुला असेलच. तेव्हा गॉर्कीला नाहीसे करण्याचे काम तू केलेच पाहिजे. नवे सरकार सत्तारूढ होताच या कामगिरीचा भरपूर मोबदला तुझ्या पदरात नक्कीच पडेल.'

गॉर्की–हत्येबाबत डॉ. लेविन काहीसा अस्वस्थ झाल्याचे लक्षात येताच यगोदा त्याला म्हणाला, 'या कामगिरीबाबत तुझ्या मनाची चलबिचल होण्याचे कारण नाही. हा ऐतिहासिक महत्त्वाचा काळ आहे; व गॉर्कीला दूर करणेही एक ऐतिहासिक गरज आहे. क्रांतिकाळातील हा एक अपरिहार्य असा टप्पा आहे. त्यातून आमच्यासह तू सहीसलामत पार पडशील याची खात्री असू दे. तुला शक्य त्या सर्व मार्गांनी तू आम्हाला मदत केलीच पाहिजे. [गॉर्कीबद्दल ट्रॉट्स्कीवाद्यांना आत्यंतिक द्वेष व भीती वाटत होती. ट्रॉट्स्कीचा दूत सर्जी बेसनोव याने नंतर सांगितले की, 'गॉर्की हा स्टालिनचा मोठा जिवाभावाचा मित्र आहे व जगातील लोकशाही राष्ट्रांकडून–प्रामुख्याने पश्चिम युरोपकडून सोविएत संघाप्रती सहानुभूती मिळवून घेण्याच्या प्रयत्नात गॉर्कीची भूमिका प्रभावी ठरत आहे; गॉर्कीच्या प्रभावाखाली येऊन पूर्वी आम्हाला पाठिंबा देणारे हेरखात्यातील काही लोक आपला पक्ष सोडून जात आहेत. तेव्हा गॉर्कीचा काटा काढलाच पाहिजे; हा निरोप अगदी निःसंदिग्ध शब्दात प्यातकोवला कळव. काहीही झाले तरी गॉर्कीला नाहीसे केलेच पाहिजे', असे १९३४ च्या जुलैमध्ये ट्रॉट्स्कीने त्याला बजावले होते.

नाझींच्या बरोबर काम करणाऱ्या फासिस्ट रशियन निर्वासितांनी तयार केलेल्या सोविएत नेत्यांच्या हत्येच्या यादीतही गॉर्कीचे नाव होते. 'लेनिनग्राड येथे किरोवला नाहीसा केलाच पाहिजे. दक्षिण रशियातून कोसिओर व पोस्तिशेव यांनाही नष्ट केले पाहिजे; आमच्या फासिस्ट बंधूनो, स्टालिनपर्यंत तुमचे हात पोचू शकत नसतील तर गॉर्कीला तरी ठार करा, कागानोविचला ठार करा', असे आवाहन फासिस्ट रशियन नॅशनल लीग ऑफ न्यू रीजनरेशन' या संघटनेचे बेलग्रेडहून प्रसिद्ध होणारे मुखपत्र 'द रोसिया' या वृत्तपत्राच्या १ नोव्हेंबर १९३४ च्या अंकात करण्यात आले होते.

पेश्कोवला मारण्यात यगोदाचा हेतू केवळ राजकीय नव्हता. मुलगा मेला तर गॉर्कीच्या मनावर फार मोठा आघात होईल, मानसिक दृष्ट्या तो अगदी खचून जाईल, व मग त्याच्याकडून आपल्याला काही धोका उरणार नाही असे यगोदाने एका कटवाल्याला म्हटले होते. पण त्याच्या खटल्याच्या सुनावणीच्या वेळी मात्र पेश्कोवच्या हत्येचे कारण न्यायालयाच्या बंद दाराआड सांगण्याची परवानगी त्याने मागितली. न्यायाधीशांनी ती मान्य केली. ते कारण नंतर जाहीर करण्यात आले नसले तरी त्याचे स्पष्टीकरण राजदूत डेविस याने त्याच्या 'मिशन टू मास्को' या पुस्तकात नमूद केले आहे. तो म्हणतो–'पेश्कोवच्या हत्येमागील खरी परिस्थिती अशी की त्याच्या सुंदर पत्नीच्या आकर्षणामुळे यगोदा आपली शुद्धबुद्ध गमावून बसला होता.']

अनुक्रमणिका

गॉर्कीला मारण्यापूर्वी दहशतवाद्यांनी प्रथम पेश्कोवच्या जिवावर घाला घातला. त्याच्या शरीररचनेत त्याचे हृदय व फुफ्फुसे काहीशी दुबळी होती. त्याचा फायदा घेऊन ते विकार बळावतील अशी औषधीयोजना करून डॉ. लेविनद्वारा त्याचा बळी घेण्यात आला. वरवर दिसायला मात्र सर्वांना असेच वाटले की अतीव थंडी व न्युमोनिया यामुळे एप्रिल १९३४ मध्ये पेश्कोव आजारी पडला. काही काळ तर तो बरा होणार असे वाटले. पण त्यामुळे यगोदा भलताच संतप्त झाला. डॉक्टरांवर शिव्याशापांची लाखोली वाहत तो म्हणाला, 'हे लोक चांगल्या निरोगी माणसालाही त्यांच्या औषधोपचाराने मारतात; पण एका रोग्यावर मात्र त्यांची मात्रा चालू नये म्हणजे काय?'

पण शेवटी डॉ. लेविनने प्रयत्न फलदायी ठरले. पेश्कोव हळूहळू अत्यंत निःशक्त झाला. त्याची हृदयाची स्थिती चिंताजनक बनली, हृदयविकार बरा होण्याकरिता सामान्यतः देण्यात येणारी औषधे बंद करून, तो विकार बळावणारी औषधे दिली गेल्याने पेश्कोवच्या आजाराला गंभीर वळण लागले व तो ११ मे रोजी मृत्यूमुखी पडला.

अशीच कार्यवाही मॅक्झिम गॉर्कीबाबतही केली गेली. १९३५ मध्ये कामकाजानिमित्त अनेकदा तो मास्कोबाहेर गेल्याने काही काळ तो डॉ. लेविनच्या तावडीतून बचावला. पण १९३६ च्या प्रारंभी डॉ. लेविनला हवी असलेली संधी मिळाली. मास्को येथे गॉर्की आकडीच्या विकाराने आजारी पडताच तो विकार बळावण्याकरिता औषधे डॉ. लेविनने फार जास्त प्रमाणात दिली. त्याचा व्हायचा तो परिणाम झाला. गॉर्कीला न्युमोनियाने घेरले; व जून १९३६ रोजी तो महान रशियन लेखक दिवंगत झाला.

## प्रकरण १९

# निर्णयाचे दिवस

**पश्चिमेकडे युद्धाचे आगमन**

१९३५ च्या सुमारास, सोविएत संघावर संयुक्तपणे हल्ला करण्याच्या जर्मनी व जपान या राष्ट्रांच्या योजना आकाराला आल्या होत्या. मांचूरियातील जपानी लष्कर पूर्व रशियन सीमाक्षेत्रात अधूनमधून छापे घालून व चकमकी घडवून आणून अंदाज घेत होते. सोविएतविरोधी लष्करी युती करण्याच्या हेतूने जर्मन सेनाश्रेष्ठी पोलंडच्या फासिस्ट लष्करी अधिकाऱ्यांशी गुप्त वाटाघाटी करीत होते. बाल्टिक व बाल्कन राज्ये, तसेच ऑस्ट्रीया व झेकोस्लोवाकिया यातील जर्मन पंचमस्तंभीयांना 'दक्ष' चा इषारा देण्यात आला होता. 'पूर्वेकडे आगेकूच' करण्याच्या हिटलरने दिलेल्या आश्वासनाला मूर्त स्वरूप यावे याकरिता ब्रिटिश व फ्रेंच प्रतिक्रियावादी त्याला हेतुपुरस्सर उत्तेजन देत होते.

फ्रेंच प्रधानमंत्री पियरे लावल व ब्रिटिश परराष्ट्रमंत्री सर जॉन सायमन यांच्यात विचारविनिमय झाल्यानंतर व्हर्साय कराराच्या निःशस्त्रीकरणाबाबतच्या काही अटींतून जर्मनीची मुक्तता करण्यासंबंधी त्या दोन्ही सरकारांत एकमत झाले व ३ फेब्रुवारी रोजी त्यांनी तत्ससंबंधी घोषणा केली.

१७ फेब्रुवारीच्या 'ऑब्झर्वर' ने लिहिले होते—'वॉर्सा व बर्लिन येथे जपानी मुत्सद्यांची एवढी घाईगर्दी कसली चालू आहे? त्याचे उत्तर एकच आहे—मास्को! जर्मनी, पोलंड व जपान यांचे संबंध झपाट्याने घनिष्ट होत आहेत व त्याची परिणती सोविएतविरोधी युतीत होणार आहे.'

नाझी जर्मनी आपल्या शस्त्रसंभाराचा वापर सोविएत रशियाविरुद्ध करणार आहे अशी खात्री वाटल्याने नाझींच्या पुनर्लष्करीकरणाच्या कार्यक्रमाला सोविएतविरोधी ब्रिटिश व फ्रेंच मुत्सद्दी सर्वतोपरी मदत करीत होते. फेब्रुवारी १९३५ मध्ये व्हर्साय कराराने फ्रान्सकडे देण्यात आलेल्या सार जिल्ह्यात सार्वमत घेण्यात आले. त्यापूर्वी नाझींनी प्रक्षोभक प्रचार व दहशतवाद यांची त्या जिल्ह्यात एकच धमाल उडवून दिली होती. ते सार्वमत नाझींना अनुकूल ठरल्याने कोळसा खाणींनी अत्यंत समृद्ध असलेला तो जिल्हा फ्रान्सकडून काढून घेऊन जर्मनीच्या स्वाधीन करण्यात आला होता.

१६ मार्च रोजी नाझी जर्मनीने व्हर्साय करार अधिकृतपणे उधळून लावला. सार्वत्रिक लष्करी प्रशिक्षणाचा हुकुम जारी करून त्याबाबत त्यांनी बर्लिन येथील फ्रेंच, ब्रिटिश, पोलीश व इटालियन

राजदूतांना कळविले. त्यापाठोपाठ, मोठ्या बॉंबफेकी विमानांचा ताफा निर्माण करण्याचा जर्मनीचा मानसही १३ एप्रिल रोजी त्या सरकारने घोषित केला.

स्टॅन्ले बाल्डविन याच्या नेत्तृत्वाखाली इंग्लंडमध्ये टोरी सरकार अधिकारारूढ झाल्यानंतर अकराच दिवसांनी, १८ जून १९३५ रोजी अँग्लो-जर्मन नाविक करार घोषित करण्यात आला. त्या करारानुसार नवे नौदल उभारण्याचा, व सर्व ब्रिटिश राष्ट्रकुल सदस्यांजवळ संयुक्तपणे जितक्या टनाच्या पाणबुड्या असतील तेवढ्या टनाच्या पाणबुड्या बाळगण्याचा अधिकार नाझी जर्मनीला देण्यात आला. तो करार म्हणजे नाझी परराष्ट्रमंत्री जोआकिम वॉन रिबेनट्रॉप व ब्रिटिश परराष्ट्र मंत्री सर सॅम्युअल होअर यांत झालेल्या पत्रव्यवहाराची फलश्रुती होती.

३ नोव्हेंबर रोजी ‘ला इको द पॅरिस’ या वृत्तपत्राने नाझी बंकर डॉ. हजाल्मर शाक्ट, बँक ऑफ इंग्लंडचा गव्हर्नर सर मॉंटेग्यू नॉर्मन, व फ्रान्स बँकेचा गव्हर्नर एम्. टॅनेरी यांच्या बैठकीचे वृत्त प्रसिद्ध केले. त्या फ्रेंच वृत्तपत्राच्या कथनानुसार त्या बैठकीत डॉ. शाक्टने असे स्पष्ट निवेदन केले की, ‘आमच्या पश्चिम सीमांत कोणताही बदल घडवून आणण्याचा आमचा इरादा नाही; आणि आज ना उद्या जर्मनी व पोलंड युक्रेनचा प्रदेश आपसात वाटून घेतीलच. पण आज फक्त बाल्टिक प्रांतावर जरी आमचा प्रभाव प्रस्थापित झाला तरी तेवढ्याने आमचे समाधान होईल.’

११ नोव्हेंबर १९३५ रोजी न्यूयॉर्क हेराल्ड ट्रिब्यूनने लिहिले होते––‘फ्रान्स व जर्मनी यांत करार व्हावा असे फ्रान्सचा प्रधानमंत्री व परराष्ट्रमंत्री असलेल्या पियरे लावल याला अत्यंत तीव्रतेने वाटते. फ्रान्स व रशिया यात नुकताच झालेला, पण फ्रेंच पार्लमेंटचे त्यावर अजून शिक्कामोर्तब न झालेला करार उधळून लावावा, त्याऐवजी हिटलरशी करार करून फ्रान्सच्या पूर्व सीमेच्या सुरक्षिततेची हमी मिळवून घ्यावी; व त्या मोबदल्यात मेमेल व युक्रेन या क्षेत्रात जर्मनीला पूर्ण मोकळीक द्यावी असा त्याचा प्रयत्न आहे.’

युद्धाचा धोका बळावू लागताच, फासिस्ट आक्रमणाची धास्ती असलेल्या सर्व राष्ट्रांनी संयुक्तपणे संरक्षणात्मक कार्यवाही करावी असे आवाहन सोविएत सरकारने वारंवार केले. युद्धविरोधी राष्ट्रांची लष्करी युती व्हावी व सामूहिक सुरक्षेकरिता योजना आखण्यात यावी याची निकड सोविएत परराष्ट्र मंत्री मॅक्झिम लिट्विनोव हा राष्ट्रसंघात व युरोपच्या राजधान्यांत, पुन्हा पुन्हा लावीत होता. २ मे १९३५ रोजी सोविएत सरकारने फ्रान्सशी परस्पर मदतीचा करार केला; व तशाच स्वरूपाचा करार १६ मे रोजी झेकोस्लोवाकियाशी केला. ‘शांततेकरिता आतापर्यंत जाणीवपूर्वक व भरीव असे कोणतेही प्रयत्न केले गेले नाहीत,’ राष्ट्रसंघाच्या व्यासपीठावरून लिट्विनोव युरोपीय राष्ट्रांना आवाहन करीत होता, ‘परंतु युद्ध आता अगदी दाराशी येऊन ठेपले आहे. ते लक्षात घेऊन तरी आपण सर्वांनी शांततेकरता संघटित झाले पाहिजे.’

ऑक्टोबर १९३५ मध्ये पियरे लावल व सर सॅम्युअल होअर यांच्या मूक राजनैतिक आशीर्वादाने मुसोलिनीच्या फासिस्ट लष्कराने इथिओपियावर हल्ला केला. १९३१ मध्ये जपानच्या मांचूरियावरील

अनुक्रमणिका

हल्ल्याबरोबर सुरू झालेले दुसरे महायुद्ध आता पश्चिमेकडे येत होते. [सामूहिक सुरक्षेकरिता सोविएत सरकार करीत असलेले प्रयत्न हरप्रकारे हाणून पाडावे असे आदेश ट्रॉट्स्कीने आपल्या रशियतील अनुयायांना दिले. पूर्वी लंडन व पॅरिस येथे सोविएत राजदूत असलेला ट्रॉट्स्कीवादी व जपानी हस्तक ख्रिश्चन रोकोवस्की याला मास्कोत एक पत्र ट्रॉट्स्कीकडून आले होते. आंतर्राष्ट्रीय क्षेत्रात सोविएत संघाला एकाकी पाडण्याच्या आवश्यकतेवर ट्रॉट्स्कीने त्यात भर दिला होता. त्याकरिता परदेशातील डाव्यांना जाणवत असलेल्या शांततेच्या निकडीचा उपयोग करून घ्यावा अशी सूचना त्याने केली होती. उजव्यांच्या बाबतीत तर त्यांच्या दृष्टीने काही अडचणच नव्हती. कारण त्यांच्या सोविएतविरोधी भावनांची सर्वांनाच कल्पना असल्याने त्यांच्याशी त्याबाबत मोकळेपणाने बोलणे करणे सहज शक्य होणार होते.

१९३५ मध्ये फ्रॅंको–सोविएत करारासंबंधी वाटाघाटी करण्यास एक फ्रेंच शिष्टमंडळ मास्कोत आले होते. त्याबरोबर पॅरिस येथील ‘ला ओर्ड्रे’ या उजव्या आघाडीच्या वृत्तपत्राचा संपादक एमिल बुरे हाही मास्कोत आला होता. रोकोवस्की राजदूत म्हणून फ्रान्समध्ये होता त्यावेळी त्याची बुरेशी चांगली मैत्री झाली होती. बुरे मास्कोत येताच हॉटेल मेट्रोपोलमध्ये रोकोवस्की त्याला भेटायला गेला. फ्रॅंको–सोविएत करारात फार मोठे धोके दडलेले आहेत; तो करार झाल्यास जर्मनी एखादे वेळी फ्रान्सविरुद्ध प्रतिबंधात्मक युद्ध पुकारण्याची शक्यता आहे, असे फक्त त्याला एकट्यालाच वाटते असे नाही तर सोविएत संघातील बऱ्याच उच्च पदस्थ अधिकाऱ्यांचे व राजनीतिज्ञांचेही तेच मत आहे असे त्याने बुरेला सांगितले.

परंतु नाझी जर्मनीप्रती कोणत्याही प्रकारे अनुनयाचे धोरण अवलंबिण्यास त्याचा प्रखर विरोध असल्याचे बुरेने रोकोवस्कीला स्पष्टच सांगितले. ‘नाझी जर्मनीच्या वाढत्या लष्करीकरणाचा धोका लक्षात घेता फ्रान्स एकाकी राहूच शकत नाही; आक्रमकाला अडवून धरलेच पाहिजे; युद्ध टाळण्याचा तो एकमेव मार्ग आहे’ असे त्याने निःसंदिग्धपणे स्पष्ट केले.

पण फ्रेंच परराष्ट्रनीतीची दिशा ठरविणे दुर्दैवाने बुरेच्या हाती नव्हते. मास्कोत आलेल्या फ्रेंच शिष्टमंडळाचा नेता होता पियरे लावल.]

सोविएत संघातील गुप्त फासिस्ट आघाडीने लाल लष्कराच्या लष्करी सामर्थ्याविरुद्ध जोरदार लढा चढविला होताच. जर्मन व जपानी हस्तकांच्या सहकार्याने उजवे विरोधक व ट्रॉट्स्कीवादी यांनी सोविएत उद्योगधंदे, दळणवळण, व कृषी याविरुद्ध मोठ्या काळजीपूर्वक तयार केलेली मोहीम कार्यान्वित केली होती. लवकरच सुरू होणाऱ्या युद्धात सोविएत संरक्षणात्मक पद्धती सपशेल कोलमडावी हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते. अवजड उद्योगधंद्याचा उद्योगमंत्री प्यातकोव या ट्रॉट्स्कीवाद्याच्या देखरेखीखाली घातपाताची प्रचंड मोहीम साकार होत होती.

‘दहशतवाद हा एक जहाल मार्ग आहे हे खरे,’ उजवे विरोधक व ट्रॉट्स्काईट यांच्या एका बैठकीत प्यातकोव बोलत होता, ‘पण केवळ दहशतवादाने कार्यभाग साधणार नाही. सोविएत राजवटीने साध्य केलेल्या यशाला आणि स्टालिनच्या प्रतिष्ठेला व नेतृत्वाला सुरुंग लावणे व राष्ट्राचे आर्थिक जीवन पूर्णपणे विस्कळीत व दुबळे करणे याकरिता सर्वशक्तिनिशी आपण कार्यवाही केली पाहिजे. त्याकरिता भल्याबुऱ्या सर्वच मार्गांचा अवलंब समर्थनीय ठरेल असा ट्रॉट्स्कीचा आदेश आहे व तो या ट्रॉट्स्की केंद्राला मान्य आहे.’

१९३५ च्या शरदात संपूर्ण सोविएत संघात सर्व महत्त्वाच्या क्षेत्रांत ट्रॉट्स्कीवाद्यांच्या योजनाबद्ध घातपाताच्या कारवाया सुरू होत्या, उरल विभागातील अवजड उद्योगधंद्यात दोनबास व कुझबास या क्षेत्रातील कोळसा खाणींत रेल्वेत, विद्युत्पादन केंद्रांत, बांधकामाच्या प्रकल्पात, अशा सोविएत उत्पादनाच्या सर्वच महत्त्वाच्या शाखात अनेक ट्रॉट्स्कीवादी एकाच वेळी घातपाताचे जोरदार आघात करीत होते; तर बुखारिन व अन्य उजवे नेते यांच्या मार्गदर्शनाखाली सामूहिक कृषी क्षेत्रात, सहकारी संस्थात, व्यापार-वाणिज्य व वित्त क्षेत्रातही घातपाती कारवाया सुरू होत्या.

अनुक्रमणिका

अनेक ठिकाणी या घातपाताच्या मोहिमेचे आयोजन जर्मन व जपानी हेरखात्याचे हस्तक करीत होते. मोठ्या प्रमाणावर रेल्वे अपघात घडवून आणणे (त्यात अर्थात्‌च अनेक माणसे मृत्युमुखी पडत); दळणवळण व मालवाहतूक खंडित होईल अशी व्यवस्था करणे, अपघात होतील, आगी लागतील, खाण कोसळून शेकडोंनी माणसे मरतील व उत्पादनावर अत्यंत विघातक परिणाम होईल अशा पद्धतीने खाणींचे काम चालविणे; बिनमहत्त्वाच्या, अनावश्यक व अनुत्पादक प्रकल्पांवर बेसुमार पैसा ओतणे, घोडी-उत्पादन केंद्रात रोगजंतूचा प्रादुर्भाव करून लाल लष्कराला चांगल्या जातीची घोडी मिळू नयेत अशी व्यवस्था करणे (१९३६ या एकाच वर्षात फक्त बायलोरशियात, विरोधकांच्या अशा कारवायामुळे ३०००० घोडी दगावली अशी माहिती वासिली शारंगोविच या उजव्या विरोधकाने आपल्या निवेदनात नंतर दिली); कृषीसामूहिकीकरणाच्या योजना हाणून पाडणे, सरकारच्या धान्य खरेदी मोहिमेत अडथळे आणणे, रोगजंतूद्वारा मोठ्या प्रमाणावर डुकरांचा नाश करणे, असे अनेक विनाशकारी उद्योग ट्रॉट्स्कीवादी व उजवे विरोधक करीत होते, हे नंतर न्यायालयीन चवकशीच्या वेळी त्यांनीच केलेल्या निवेदनांतून स्पष्ट झाले.

## ट्रॉट्स्कीचे पत्र

१९३५ च्या अखेरी युरोपीय क्षितीजावर युद्धाच्या ढगांची दाटी वाढताच ट्रॉट्स्कीने आपल्या खास दूताद्वारा एक पत्र मास्को येथे असलेल्या कार्ल रादेकला पाठविले. ते नार्वेहून आलेले होते. [जून १९३५ मध्ये फ्रान्सच्या पॉप्युलर फ्रंट सरकारने फ्रान्समधून ट्रॉट्स्कीला हद्दपार केले. तेथून ट्रॉट्स्की नॉर्वेला गेला व ओस्लोच्या उपनगरातील एका बंगल्यात (सुरक्षेची काटेकोर व्यवस्था तेथे केलेली होती) त्याने आपले मध्यवर्ती कार्यालय थाटले. त्यावेळी कॉमिन्टर्नपासून फुटून निघालेला नॉर्वेतील 'कामगार पक्ष' नॉर्वेच्या राजकारणात प्रबळ होता. त्या पक्षाने ट्रॉट्स्कीच्या नॉर्वेप्रवेशाची सर्व व्यवस्था करून दिली. नॉर्वेतील ट्रॉट्स्कीवादी त्यावेळी नॉर्वेत सोविएत विरोधी प्रचार जोमाने करीत होतेच. पण त्याच वेळी तशाच प्रकारचा प्रक्षोभक प्रचार नॉर्वेचा माजी युद्धमंत्री मेजर विडकुन क्विस्लिंग याच्या नेतृत्वाखालील उजव्या साम्यवादविरोधी 'नॅशनल युनिटी' पक्षाने चालविला होता.

मेजर विडकुन क्विस्लिंग हा पूर्वी नॉर्वेजियन मिलिटरी अटॅची म्हणून लेनिनग्राडध्ये होता. १९२२–२३ मध्ये राजनैतिक कामगिरीच्या निमित्ताने त्याला युक्रेन व क्रिमियात पाठविण्यात आले होते. एका श्वेतरशियन बाईशी त्याने विवाह केला होता. १९२७ मध्ये ब्रिटिश सरकारने सोविएत रशियाशी राजनैतिक संबंध तोडले त्यावेळी नॉर्वेजियन दूतावासाचा सचिव असलेल्या क्विस्लिंगकडे रशियातील ब्रिटिश हितसंबंधाची जपणूक करण्याची जबाबदारी ब्रिटिश सरकारने सोपविली होती. त्याचा मोबदला म्हणून, ब्रिटिश सरकारचा मानसेवी सेनापती नियुक्त करून ब्रिटिश सरकारने त्याला गौरविले.

१९३० मध्ये सोविएत रशियात घातपाती कृत्ये करण्याच्या आरोपावरून सोविएत सरकारने क्विस्लिंगला सोविएत रशियात प्रवेशाची परवानगी नाकारली. त्यामुळे त्याच्या सोविएत भूमीवरील कारवाया बंद झाल्या. पण नॉर्वेत येताच तेथे सोविएत विरोधी फासिस्ट गट त्याने उघडपणे संघटित केला. लवकरच जर्मन लष्करी हेरखात्याच्या नॉर्वेमधील पंचस्तंभाचा तो नेता बनला. त्यात अनेक ट्रॉट्स्कीवाद्यांचा भरणा झालेला होता.

इतर अनेक राष्ट्रांप्रमाणे नॉर्वेतही ट्रॉट्स्कीवादी केंद्रे संघटित झाली तेव्हा इतर राष्ट्रांतील ट्रॉट्स्कीवाद्यांप्रमाणेच नॉर्वेतील सामान्य ट्रॉट्स्कीवाद्यांनाही, ट्रॉट्स्कीवादी नेतृत्वाचे ॲक्सिस (जर्मन–इटली–जपान युती) हेरखात्याशी असलेल्या संबंधाची माहिती नव्हती. शेवटपर्यंत 'जागतिक क्रांतीच्या' नावाने त्या कल्पनेच्या समर्थकांना ट्रॉट्स्की आपल्या जाळ्यात ओढीत राहिला. ट्रॉट्स्की मोठा तत्त्वनिष्ठ व ध्येयवादी असल्याचीच त्यांची समजूत होती. सोविएतविरोधी प्रचारक व संघटक म्हणून व ट्रॉट्स्कीच्या उद्दिष्टांकरिता झटणारे म्हणून ट्रॉट्स्कीने त्यांचा पूरेपूर उपयोग करून घेतला.] मोठ्या उत्सुकतेने रादेकने ते पत्र वाचले. उत्तम दर्जाच्या इंग्लिश कागदावर लिहिलेल्या

त्या लांबलचक आठ पानी पत्रात, जर्मनी व जपानच्या सरकारांशी तो करीत असलेल्या गुप्त कराराचा आराखडा तपशीलासह ट्रॉट्स्कीने दिला होता.

आंतर्राष्ट्रीय युद्धाचा लवकरच होणार असलेला भडका व जर्मन फासिझमचा विजय याबद्दल प्रारंभी उल्लेख करून ट्रॉट्स्कीने मूळ मुद्याला हात घातला होता. 'आपण सत्तेवर यावयाचे तर ते दोनच मार्गांनी शक्य आहे—एक म्हणजे युद्ध सुरू होण्यापूर्वी सत्ता बळकाविणे व दुसरे म्हणजे युद्धाची धुमश्चक्री चालू असताना उठाव करून सत्ता हाती घेणे. युद्धात सोविएत संघाचा पराभव झाला तरच आपला गट सत्तेवर येण्याच्या कल्पनेला मूर्त स्वरूप येऊ शकेल हे सत्य आपण मान्य करायलाच पाहिजे. त्याकरिता आपल्या गटाने जोमाने तयारीला लागले पाहिजे यापुढे, युद्धउद्योगातील ट्रॉट्स्कीवाद्यांच्या घातपाती कारवाया जर्मन व जपानी सेनाश्रेष्ठींच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीच व्हाव्यात हे आवश्यक आहे. त्या आपल्या मित्रांच्या पूर्वपरवानगीशिवाय ट्रॉट्-स्कीवाद्यांनी काहीही करता कामा नये. जर्मनी व जपान यांच्या पाठिंब्याशिवाय आपण सत्तेवर येऊ शकू ही कल्पनाच अशक्य कोटीतील आहे. त्यामुळे त्यांचा भरीव पाठिंबा मिळवून घ्यायचा असेल तर त्यांना बऱ्याच सवलती देण्याची तयारी आपण ठेवली पाहिजे.'

त्या सवलतींचे स्वरूपही ट्रॉट्स्कीने त्याच्या पत्रात स्पष्ट केले होते. त्याने लिहिले होते- 'जर्मनीला अन्नधान्य, कच्चामाल व बाजारपेठा यांची गरज आहे. तेव्हा ठराविक काळाकरिता जागतिक भावापेक्षा कमी भावाने आपण त्यांना अन्नधान्य व खाद्यतेल वगैरे पुरविण्याचे कबूल केले पाहिजे. तसेच लोखंड, मँगनीज, सोने, खनिज तेल इत्यादींच्या खनन—अधिकारात आपण त्यांना सहभाग दिला पाहिजे. साखलिन बेटाचे खनिज तेल जपानला देण्याचे आपण कबूल केले पाहिजे व अमेरिका—जपान युद्ध भडकले तर त्या युद्धकाळात जपानला खनिज तेल पुरविण्याची हमी आपण दिली पाहिजे. तसेच सोन्याच्या खाणींचे खनन-अधिकारही जपानला आपण द्यायला पाहिजेत. जर्मनीने डॅन्यूबच्या क्षेत्रावर व बाल्कन प्रदेशावर त्यांचे नियंत्रण प्रस्थापित करण्याला व जपानने चीनवर ताबा मिळविण्याला आपण विरोध करता कामा नये ही जर्मनीची मागणी आपण मान्य केली पाहिजे. प्रादेशिक सवलती आपण त्यांना देणे याशिवाय आपल्याजवळ दुसरा पर्याय नाही. पूर्वेकडील समुद्रकिनाऱ्याचा प्रांत व अमूर प्रदेश जपानला व युक्रेन जर्मनीला आपण दिलेच पाहिजे.'

सोविएत सरकारच्या उन्मूलनानंतर रशियात ट्रॉट्स्कीवाद्यांच्या नेतृत्वाखाली प्रस्थापित होणाऱ्या राजवटीचे चित्रही ट्रॉट्स्कीने त्या पत्रात रेखाटले होते. त्याने लिहिले होते—'काही प्रमाणात का होईना रशियाची समाजरचना भांडवलशाही राष्ट्रांच्या धर्तीवर उभारल्याखेरीज आपल्या गटाचे सरकार सत्तेवर टिकून राहू शकणार नाही हे आपण लक्षात घेतले पाहिजे सोविएत संघाच्या उद्योगांत जर्मन व जपानी भांडवल ओतले गेले की भांडवलशाही हितसंबंध सोविएत राष्ट्रात निर्माण होतील. कृषी—सामूहिकीकरणामुळे असंतुष्ट झालेले भांडवलशाही विचारांचे ग्रामीण विभागातील लोकही आपल्याकडे आकृष्ट होतील. तसेच ग्रामीण क्षेत्रातील तणाव नाहीसा व्हावा अशी मागणी जर्मनी व जपानची असेल. त्यामुळे कृषी सामूहिकीकरणाचा कार्यक्रमही आपल्याला रद्द करावा लागेल.

अनुक्रमणिका

'प्रादेशिक, राजकीय व आर्थिक दृष्ट्या नव्या रशियात अगदी मूलभूत स्वरूपाचे बदल घडून येणे अपरिहार्य ठरेल. लोकशाहीची भाषा बोलणे अशक्यच होईल. क्रांतीनंतरचा अठरा वर्षांचा काळ कामगार वर्गाने अनुभवला आहे. त्यांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. असे असता, त्यांना खाजगी मालकीच्या किंवा निमसरकारी कारखान्यांतून आपल्याला कामाला पाठवावे लागेल; आणि अत्यंत प्रतिकूल प्रतिस्थितीत परकीय मालाशी त्यांना स्पर्धा करावी लागेल. परिणामी कामगारांचे राहणीमान खालावून त्यांच्यात असंतोष पसरण्याची दाट शक्यता आहे. ग्रामीण क्षेत्रात गरीब व मध्यमवर्गीय शेतकऱ्यांचा कुलाकांविरुद्धचा—सधन शेतकऱ्यांविरुद्धचा लढा पुन्हा नक्कीच सुरू होईल अशा परिस्थितीत सत्ता हाती टिकवून धरायची, तर आपले सरकार शक्तिशाली असणे अत्यंत आवश्यक आहे. मग त्याचे स्वरूप कसेही असो!'

ट्रॉट्स्कीच्या त्या पत्राने रादेकच्या मनात चांगलीच अस्वस्थता दाटली. 'त्या पत्रावर मी रात्रभर विचार केला' नंतर रादेकने सांगितले, 'वस्तुतः तोपर्यंत ट्रॉट्स्की जे जे बोलत होता त्यापेक्षा वेगळे असे त्या पत्रात काही नव्हते. परंतु ट्रॉट्स्की जे सुचवित होता त्यामुळे योग्यायोग्यतेच्या मर्यादा सुटत आहेत, आपण त्यामुळे परकीयांच्या हातातील बाहुले बनू असेच मला निश्चितपणे वाटले, बेचैन झालेल्या रादेकने दुसरेच दिवशी सकाळी ते पत्र प्यातकोवला दाखविले. ते वाचल्यानंतर, काहीही झाले तरी एकंदर प्रकाराबद्दल ट्रॉट्स्कीशी एकदा प्रत्यक्ष बोलणे करणे अगत्याचे आहे असे प्यातकोवला वाटले. तो स्वतः लवकरच सरकारी कामाकरिता बर्लिनला काही दिवसाकरिता जाणार होता. त्याबद्दल ट्रॉट्स्कीला कळवून, बर्लिन येथे ट्रॉट्स्कीने लवकरात लवकर प्यातकोवशी संपर्क साधावा, असा तातडीचा संदेश ट्रॉट्स्कीला पाठवावा असे प्यातकोवने रादेकला सांगितले.

### विमानमार्गे ओस्लोला प्रयाण

१० डिसेंबर १९३५ रोजी प्यातकोव बर्लिनला पोहचला तोपर्यंत रादेकचा निरोप ट्रॉट्स्कीला कळला होता; व नाझींच्या त्या राजधानीत प्यातकोवशी संपर्क साधण्यास दिमित्री बुखारत्सेव हा ट्रॉट्स्कीचा खास दूत बर्लिनमध्ये त्यांची वाटच पाहत होता. इझवेस्तिया या रशियन वृत्तपत्राचा तो बर्लिन येथील प्रतिनिधी होता. स्टिर्नर नावाचा ट्रॉट्स्कीचा बर्लिन येथील हस्तक ट्रॉट्स्कीचा संदेश घेऊन त्याला लवकरच भेटेल असे त्याने प्यातकोवला सांगितले.

बुखारत्सेवबरोबर प्यातकोव टिअर गार्डटनच्या एका अरुंद बोळात गेला तेव्हा एक माणूस त्याची तेथे वाटच पाहत होता. त्याने ट्रॉट्स्कीची चिठ्ठी प्यातकोवला दिली. ती चिठ्ठी घेऊन येणारी व्यक्ती पूर्णपणे विश्वसनीय आहे एवढेच शब्द त्यात होते.

स्टिर्नरनेही अगदी मोजक्याच शब्दात प्यातकोवला ट्रॉट्स्कीचा निरोप कळवला. प्यातकोवला भेटणे अत्यंत निकडीचे वाटत असून तत्संबंधी शक्य ती व्यवस्था करण्यास ट्रॉट्स्कीने स्टिर्नरला सांगितले

अनुक्रमणिका

होते. ट्रॉट्स्कीला भेटण्याकरिता विमानाने ओस्लोला जाण्याची प्यातकोवची तयारी आहे काय असे त्याने रोखठोकपणे प्यातकोवला विचारले.

ओस्लोला जाण्यातील धोके प्यातकोवला कळतच होते. एखादे वेळी सर्व प्रकार उघडकीस येण्याचा संभव होता. परंतु काहीही झाले तरी एकदा ट्रॉट्स्कीची भेट व्हायलाच हवी असे प्यातकोवला वाटत होते. त्यामुळे ओस्लोला जाण्यास त्याने होकार दिला. पासपोर्टची व्यवस्था स्टिर्नर करणार होता. दुसरे दिवशी ठरल्या वेळी प्यातकोव टेंपलहॉफ विमान तळावर गेला. स्टिर्नर त्याची वाटच पाहत होता. त्याने त्याच्या पाठोपाठ येण्यास प्यातकोवला खुणावले, व त्याच्या पासपोर्ट त्याच्या हातावर ठेवला. जर्मनीच्या नाझी सरकारने दिलेला तो पासपोर्ट होता.  त्याच दिवशी संध्याकाळी ओस्लोबाहेर ते विमान उतरले. प्यातकोव व स्टिर्नर यांच्याकरिता एक मोटार तेथे तयार होती. अर्ध्या तासात त्या गाडीने त्यांना ओस्लो उपनगरातील एका लहानशा घरासमोर आणून सोडले. त्या घरात ट्रॉट्स्की त्याच्या जुन्या मित्राची वाट पाहात बसला होता.

अनेक वर्षांच्या त्या हद्दपारीच्या काळात, ज्याला प्यातकोव आपला नेता मानीत होता तो ट्रॉट्स्की पूर्ण बदलून गेला होता. पन्नाशीच्या आसपास असलेला ट्रॉट्स्की वाजवीपेक्षा अधिक वयस्क वाटत होता. केस व दाढी जवळजवळ पांढरी झाली होती. तो वाकला होता. जाड भिंगांच्या चष्म्याआडून लुकलुकणाऱ्या त्याच्या तीक्ष्ण डोळ्यांत मात्र एक विचित्र, अस्वस्थ करणारी चमक होती.

औपचारिक शिष्टाचारात वेळ न घालवता ट्रॉट्स्कीने मूळ विषयाला हात घातला. तेथे त्या दोघांशिवाय तिसरे कोणीही नव्हते. दोन तास ते बोलत होते. रशियातील एकंदर परिस्थिती प्यातकोवने स्पष्ट करून सांगितली. ऐकता ऐकता, संयम सुटून, तिखट उपहासात्मक शब्दात ट्रॉट्स्की त्याला पुन्हा पुन्हा अडवीत होता. ‘स्टालिनचा पदर सोडून स्वतंत्रपणे तुम्हाला कधी विचार करताच येणार नाही का? स्टालिनचा कार्यक्रम म्हणजे तुम्हाला समाजवादी उभारणी वाटते काय?’ ट्रॉट्स्की चिडून चिडून बोलत होता. नुसता बोलण्यात वेळ घालवून प्रत्यक्ष काहीही कृती न केल्याबद्दल प्यातकोव व रशियातील ट्रॉट्स्कीवादी यांना तो कठोर शब्दात दोष देत होता. ‘तुम्हाला तेथे राहून आंतरर्राष्ट्रीय समस्यांवर नुसती अर्थशून्य बडबड करायला पाहिजे. त्यापेक्षा तुमच्याकडे जे काम सोपविलेले आहे ते करण्याकडे तुम्ही जरा अधिक लक्ष पुरविले तर बरेच काही साध्य होण्यासारखे आहे. आंतरर्राष्ट्रीय बाबींबद्दल तुमच्यापेक्षा मला पुष्कळ जास्त कळते!’ ट्रॉट्स्की संतापून बोलत होता. स्टालिनची राजवट उलथून पाडण्यावर तो वारंवार भर देत होता.

लवकरच युद्धाचा भडका होणार असल्याची खात्रीही त्या भेटीत ट्रॉट्स्कीने बोलून दाखविली. तो म्हणाला, ‘सोविएत सत्तेचा विकास व प्रगती फासिझम अधिक काळ चालू देईल हे अशक्यच आहे. रशियातील ट्रॉट्स्कीवाद्यांसमोर एकच पर्याय आहे. स्टालिन राजवटीच्या विनाशाबरोबर नष्ट होऊन जाणे किंवा स्टालिन राजवट उलथून पाडण्याकरिता सर्व शक्तिनिशी प्रयत्नाला लागणे. या निर्णायक संघर्षात जर्मनी व जपान या राष्ट्रांची मदत मार्गदर्शन मान्य करण्याबाबत आपण जराही कां कू करता कामा नये.

अनुक्रमणिका

सोविएत संघ व फासिस्ट राष्ट्रे यात लष्करी संघर्ष लवकरच उद्भवणार यात तिळमात्रही शंका नाही. त्या युद्धाची वेळही निश्चित झाली आहे—१९३७!' ट्रॉट्स्की खात्रीपूर्वक सांगत होता.

ट्रॉट्स्की हे जे बोलत होता ते सर्व त्याचे केवळ कल्पनेचे खेळ नाहीत हे प्यातकोवला कळत होते. जर्मन नॅशनल सोशलिस्ट पक्षाच्या उपाध्यक्षाशी—हेसशी बरेच दिवसापासून ट्रॉट्स्कीच्या वाटाघाटी सुरू असून त्याची परिणती जर्मन सरकारशी निश्चित स्वरूपाच्या करारात झाली असल्याचे व ट्रॉट्स्कीवाद्यांनी सोविएत संघात सत्तेवर यावे याकरिता सर्वतोपरी मदत करण्याची नाझींची तयारी असल्याचे ट्रॉट्स्कीने खात्रीपूर्वक प्यातकोवला सांगितले. 'अर्थात् ट्रॉट्स्कीवाद्यांबद्दल त्यांना प्रेम आहे म्हणून ते ती मदत करीत नाहीत हे तर उघडच आहे.' ट्रॉट्स्की बोलत होता; 'सोविएत संघात त्यांचे जे हितसंबंध अडकलेले आहेत त्याकरिता व सत्तेवर आल्यानंतर आपण त्यांच्या पदरात जे लाभ टाकणार आहोत त्याकरिता आपल्याला पाठिंबा देण्याचे त्यांनी कबूल केले आहे.'

ट्रॉट्स्की व नाझी नेते यांच्यात झालेल्या करारात पाच मुद्दे होते. ट्रॉट्स्कीवादी सत्तेवर येण्याकरिता नाझी देणार असलेल्या मदतीच्या मोबदल्यात ट्रॉट्स्कीने त्यांना खालील गोष्टी कबूल केल्या होत्या —

१) सत्तेवर आल्यानंतर ट्रॉट्स्कीवाद्यांची जर्मन सरकारप्रती भूमिका सामान्यतः अनुकूल राहावी व महत्त्वाच्या सर्व आंतर्राष्ट्रीय प्रश्नाबाबत जर्मन सरकारला आवश्यक वाटेल त्या सहकार्याची हमी त्यांनी द्यावी.

२) प्रादेशिक सवलती देण्याचे कबूल करावे. (युक्रेन)

३) जर्मन अर्थकारणाला सहाय्यक ठरतील अशा, लोखंड, मँगनीज, खनिज, तेल, सोने, इमारती लाकूड या सर्व उद्योगधंद्यांबाबत जर्मन उद्योगपतींना सोविएत संघात सवलती देणे.

४) सोविएत संघात जर्मनांना खाजगी उद्योगांकरिता परिस्थिती अनुकूल राहील अशी व्यवस्था करणे.

५) युद्धकाळात शस्त्रास्त्रांचे व युद्धोपयोगी वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या उद्योगात व आघाडीवर मोठ्या प्रमाणावर घातपात घडवून आणणे. ती सर्व कार्यवाही जर्मन लष्करश्रेष्ठींच्या संमतीने ट्रॉट्स्कीच्या मार्गदर्शनाखाली व्हावी.

ट्रॉट्स्कीने नाझींशी केलेल्या त्या कराराच्या अटी कळताच प्यातकोव काहीसा अस्वस्थ झाला. असा करार करणे म्हणजे रशियाने स्वतःला नाझींना विकून घेतल्यासारखेच होईल, रशियातील उजवे व ट्रॉट्स्कीवादी गटांच्या सामान्य सदस्यांच्या गळी तो करार उतरविणे कठिण होईल अशी भीती त्याने ट्रॉट्स्कीजवळ बोलूनही दाखविली.

अनुक्रमणिका

‘पण आपल्या योजनेबाबतचे हे सर्व प्रश्न सामान्य सदस्यांपुढे ठेवण्याचे कारणच काय? ते योग्यही नाही व शक्यही नाही.’ ट्रॉट्स्की अधीरतेने उद्गारला, ‘आता अधिक वेळ वाया घालविण्यात अर्थ नाही.’ त्यांच्या योजनेला मूर्त स्वरूप देण्याची निकड ट्रॉट्स्की प्यातकोवला पटवून सांगत होता. ‘आपण ही संधी गमावली तर त्यामुळे दुहेरी धोका आपल्या पुढे उभा ठाकण्याचा संभव आहे; एक तर आपल्याकडून काही निर्णायक कार्यवाही होण्याच्या आतच एखादे वेळी ट्रॉट्स्कीवादाचे रशियातून निर्मूलन होईल; नाहीतर आर्थिक क्षेत्रात स्टालिन राजवटीने मिळविलेल्या यशामुळे रशियात नव्याने उदयास आलेली नवी पिढी स्टालिनला पाठिंबा देईल व त्यामुळे स्टालिन शासनाचा राक्षस अधिकच स्थिर व दृढ होईल.नव्या पिढीला अन्य कोणत्याही शासनप्रणालीची कल्पनाच येणे शक्य नसल्याने सध्याचे स्टालिन नेतृत्वाखालील रशियन राष्ट्र हे समाजवादी सोविएत राष्ट्र आहे अशीच त्यांची समजूत होईल.तेव्हा स्टालिन राजवटीचे उच्चाटन करणे हे आपल्यापुढील आज सर्वात महत्त्वाचे व निकडीचे काम आहे.’

प्यातकोव परत जाण्यास निघाला तेव्हा ट्रॉट्स्की त्याला पुन्हा पुन्हा बजावून सांगत होता – ‘हे बघ, एक वेळ अशी होती की भांडवलशाहीचा विकास ही एक प्रागतिक व विधायक स्वरूपाची बाब आहे असे आपण सर्व सोशल डेमोक्रॅट्स् मानीत होतो; पण भांडवलशाहीविरुद्ध लढा संघटित करण्याचे, नव्हे भांडवल-शाहीची कबर खणण्याचे कार्य आपल्याला करावे लागले. आता आपल्याला स्टालिन राजवटीची एकच सेवा करायची आहे – ती म्हणजे त्या राजवटीची कबर तयार करणे.’

दोन तासांच्या चर्चेनंतर प्यातकोवने त्या छोट्याशा घरात ट्रॉट्स्कीचा निरोप घेतला, व बनावट नाझी पासपोर्ट वापरूनच खाजगी विमानाने तो बर्लिनला परत आला.

## निर्णायक क्षण

१९३७ मध्ये सोविएत संघावर युद्धाचा आघात होणार हे जे भाकित ट्रॉट्स्कीने केले होते ते युद्ध युरोपात अगोदरच येऊन पोहोचले होते. मुसोलिनीच्या इथिओपियावरील हल्ल्यानंतर घटनाचक्रे वेगाने फिरू लागली होती. जून १९३६ मध्ये हिटलरने ऱ्हाईनलँडचे लष्करीकरण केले. जुलैमध्ये स्पेनमधील लष्करी अधिकाऱ्यांनी स्पेनच्या लोकसत्ताक सरकारविरुद्ध केलेल्या उठावाच्या रूपाने फासिस्टांनी स्पेनवर घाला घातला. बोल्शेविझमविरुद्ध व कम्युनिस्ट क्रांतीविरुद्ध लढा देण्याच्या निमित्ताने जर्मन व इटालियन फौजा स्पेनमधील जनरल फ्रँकोच्या फासिस्ट फौजांना मदत करण्याकरिता स्पेनमध्ये उतरल्या. स्पेनमधील फासिस्ट नेता जनरल फ्रान्सिस्को फ्रँको उघडपणे माद्रिदवर चाल करून गेला. ‘माद्रिदवर चार तुकड्या (Columns) चालून जात आहेत,’ मद्याच्या धुंदीत फासिस्ट सेनापती कुईपो दी लानो प्रौढी मिरवीत होता, व ‘पाचवा स्तंभ शहरात आमचे स्वागत करण्याची वाट बघत आहे.’ या त्याच्या शब्दांनी जगाला पंचमस्तंभ या शब्दप्रयोगाची प्रथमच ओळख पटली. [ॲक्सिस राष्ट्रांच्या पाठिंब्याने फ्रँकोने १९३६-३८ मध्ये स्पेनमध्ये उठाव केला, त्यावेळी स्पेनमधील ट्रॉट्स्कीला अनुकूल असलेली ‘पार्टीडो ओब्रेरो दी’ युनिफिकेशन मार्क्सिस्टा’ या नावाची निमडावी स्पॅनिश संघटना (ही संघटना पी.ओ.यु.एम्.या नावाने ओळखली जात असे) आन्द्रे आस निन याच्या नेतृत्वाखाली क्रियाशील होती. ती संघटना

अधिकृतपणे ट्रॉट्स्कीच्या चौथ्या इंटरनॅशनलशी संलग्न नसली तरी त्या संघटनेत ट्रॉट्स्कीवाद्यांचा बहुसंख्येने भरणा होता व महत्वाच्या अनेक प्रश्नाबाबत ट्रॉट्स्कीच्या नीतीचीच री ती संघटना ओढीत असे.

फ्रँक्रोने उठाव केला त्यावेळी ट्रॉट्स्कीचा मित्र निन हा काटालोनियात न्यायमंत्री होता. तोंडाने फासिस्ट विरोधकांचे समर्थन तो करीत असला तरी त्याची पी.ओ.यु.एम्. ही संघटना स्पेनच्या रिपब्लिकन सरकारविरूद्ध अखंड प्रचार व चळवळ चालवीत असे. प्रारंभी निनच्या कारवाया केवळ राजकीय स्वरूपाच्या असल्याचा देखावा निर्माण करण्यात आला होता. परंतु १९३७ मध्ये जेव्हा निनने स्पेनच्या लोकशाही (लॉयलिस्ट) सरकारच्या पडद्याआडून बार्सिलोना येथे सरकार उलथून पाडण्याचे आवाहन केले, तेव्हा निन व अन्य पी. ओ.यू.एम्.नेते हे खऱ्या अर्थाने फासिस्टांचे हस्तक असल्याचे व फ्रँक्रोचे हस्तक व सहकारी म्हणून स्पेन सरकारविरुद्ध हेरगिरी, घातपात व दहशतवाद यांची पद्धतशीर मोहीम चालवीत असल्याचे उघडकीस आले.

२३ ऑक्टोबर १९३७ रोजी बार्सिलोनाचा पोलिसप्रमुख लेफ्टनंट कर्नल बुरिलो याने काठालोनिया येथे पी.ओ.यू.एम्.ही करीत असलेल्या कटकारस्थानाचा तपशील जाहीर केला. पी.ओ.यू.एम्.ही संघटना गंभीर स्वरूपाच्या हेरगिरीत गुंतलेली असून स्पेनच्या रिपब्लिकन लष्कराला होणारा साधनसामुग्रीचा पुरवठा ती संघटना खंडित करीत होती व आघाडीवर घातपाती कृत्येही करीत होती हे बार्सिलोना पोलिसांनी हस्तगत केलेल्या गुप्त कागदपत्रांवरून निर्विवादपणे सिद्ध झाले. लेफ्टनंट कर्नल बुरिलो याने आपल्या अहवालात हेही स्पष्ट केले की लोकशाही सरकारच्या लष्करातील अधिकाऱ्यांच्या हत्या करण्याची योजना त्या संघटनेच्या विचाराधीन होती व लोकशाही सरकारातील मंत्र्यांच्या हत्या करण्याच्या योजनाही त्यांनी आखल्या होत्या.]

१२ सप्टेंबर रोजी न्यूरेंबर्ग येथे भरलेल्या नाझी पक्ष परिषदेत हजारो जर्मन सैनिकांसमोर केलेल्या भाषणात, सोविएत संघावर आक्रमण करण्याचा आपला इरादा हिटलरने स्पष्टपणे बोलून दाखविला. 'कोणत्याही क्षणी हल्ला करण्यास आम्ही सज्ज आहोत,' हिटलर तावातावाने बोलत होता, 'माझ्या दाराशी सडलेली नासलेली राष्ट्रे असावीत हे मी कधीही सहन करणार नाही—कच्च्या मालाच्या अमाप संपत्तीने समृद्ध असलेला उरल प्रदेश, सैबेरियाची घनदाट वनश्री व गव्हाचे एक प्रचंड कोठारच असलेले युक्रेन, हे सर्व माझ्या हाती आले तर जर्मनी व नॅशनल सोशलिस्ट नेतृत्व समृद्धीत डुंबू लागेल,' हिटलर मोठ्या आवेशाने व आत्मविश्वासाने आपल्या सैनिकांसमोर भविष्याची स्वप्ने रंगवीत होता.

२५ नोव्हेंबर १९३६ रोजी नाझी परराष्ट्रमंत्री रिबेनट्रॉप व जर्मनीतील जपानी राजदूत एम. मुशाकोजी यांनी बर्लिन येथे कॉमिन्टर्नविरोधी करारावर स्वाक्षऱ्या केल्या व संयुक्तपणे जागतिक बोल्शेविझमवर हल्ला करण्याचे निश्चित केले.

या सर्व घटनांवरून युद्धाचा धोका अगदी नजीक येऊन ठेपल्याचे सोविएत सरकारने ओळखले, व त्यामुळे सोविएत संघातील त्यांच्या शत्रूंवर त्यांनी एकाएकी जोरदार प्रतिहल्ला चढविला. १९३६ च्या वसंतात व ग्रीष्मात एकामागून एक छापे घालून नाझी हेर, गुप्त ट्रॉट्स्कीहस्तक, उजवे संघटक, दहशतवादी, घातपाती व हेर अशा अनेकांची धरपकड करण्यात आली. सैबेरियात अलेक्सी शेस्तोव व व अन्य ट्रॉट्स्कीवाद्यांच्या सहकार्याने केमेरोवो खाणीत घातपाती कृत्ये करणाऱ्या एमील स्टिक्लिंग या नाझी हस्तकाला, तर ट्रॉट्स्कीचा खास दूत व नाझी हस्तक वॅलेंटाईन ओलबर्ग याला लेनिनग्राडमध्ये अटक करण्यात आली. ओलबर्ग हा फ्रिट्झ् डेविड, नाथान लुरे, कोनान बर्मन—युरीन या व इतर दहशतवाद्यांशी संपर्क राखून होता. उजवे व ट्रॉट्स्कीवादी—कटकारस्थानाच्या पहिल्या स्तरातील अनेक नेते त्या धडपकडीत तुरुंगाआड डांबले गेले.

अनुक्रमणिका

त्यावेळी सोविएत तुरुंगात शिक्षा भोगीत असलेल्या स्मिर्नोवने आपल्या कारस्थानी बंधूंना निरोप कळविण्याकरिता तुरुंगातून सांकेतिक भाषेत पाठविलेली एक चिठ्ठी सोविएत अधिकाऱ्यांच्या हाती आली. त्यावरून धागेदोरे जुळवून त्यांनी इफ्राईम द्रेइत्सर व सर्जी म्राच्कोवस्की या दहशतवाद्यांनाही पकडले.

या धरपकडीमुळे सगळ्या ट्रॉट्स्कीवादी रशियन कटवाल्यांच्या हृदयात चांगलीच धडकी भरली. आता बाहेरून सोविएत संघावर हल्ला झाला तरच त्यांची धडगत आहे, अन्यथा त्यांचे सर्व कटकारस्थान व परिश्रम धुळीला मिळणार असे त्यांना वाटू लागले.

या सर्व गुन्हेगारांच्या न्यायालयीन चौकशीत अडथळे निर्माण करण्याचे यगोदाने आटोकाट प्रयत्न केले. त्याबाबत दिवसेंदिवस तो अधिकाधिक बेदरकार बनू लागला. बोल्शेविक पक्षाच्या केंद्रीय नियंत्रक आयोगाच्या खास चौकशी समितीचा प्रमुख येझोव हा लेनिनग्राड येथे झालेल्या हत्या–प्रकरणाच्या बुडाशी जाणार अशी त्याला वाटणारी धास्ती त्याने त्याचा सचिव बुलानोव याच्याशी बोलताना व्यक्तही केली.

एन्.के.व्ही.डी. त नोकरीला असलेला यगोदाचा एक खास हस्तक बोरिसोव याला लेनिनग्राड येथील स्मोल्नी इन्स्टिट्यूटच्या खास चौकशी कार्यालयात एक दिवस अचानक पाचारण करण्यात आले. किरोव हत्येच्या कटात बोरिसोवचा महत्वाचा सहभाग होता. बोरिसोवच्या त्या चौकशीतून त्यांचे सर्व बिंग फुटून त्याच्यावरही सरकारी रोषाची कुऱ्हाड कोसळणार या धास्तीने यगोदा अत्यंत अस्वस्थ झाला. त्यांचे कारस्थान उघडकीस येऊ नये म्हणून, सगळा सारासार विचार धडकावून लावून, बोरिसोव स्मोल्नी इन्स्टिट्यूटमध्ये पोचण्यापूर्वीच यगोदाने त्याला या जगातून नाहीसा केला. मोटार अपघातात तो मृत्युमुखी पडल्याचा देखावा निर्माण करण्यात आला होता.

अर्थात् एखादा साक्षीदार नाहीसा केल्याने ते सर्व प्रकरण दबणार नव्हते. चौकशीचे काम नेटाने चालू होते. नित्य नव्या संशयितांना अटक होत होती. एका एका घटनेचे व पुराव्याचे धागेदोरे उचलून संपूर्ण राष्ट्रद्रोहाचे, कारस्थानाचे व हत्यांचे जाळे उलगडले जात होते. ऑगस्ट १९३६ पर्यंत ट्रॉट्स्काईट–झिनोवीवाईट दहशतवादी केंद्राचे जवळजवळ सर्वच प्रमुख सदस्य पकडले गेले. किरोव हत्येबाबतच्या खास चौकशीत अत्यंत खळबळजनक असा नवा पुरावा हाती आल्याचे सोविएत सरकारने घोषित केले. झिनोवीव व कामेनेव यांच्यावर पुन्हा खटले भरण्यात येऊन त्यांना न्यायालयासमोर उभे करण्यात आले.

सोविएत संघाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या लष्करी शाखेसमोर मास्को येथील ट्रेड-युनियन हाऊसच्या ऑक्टोबर हॉलमध्ये १९ ऑगस्ट १९३६ रोजी खटल्याच्या सुनावणीला प्रारंभ झाला. किरोवहत्येच्या प्रकरणात झालेली शिक्षा भोगीत झिनोवीव व कामेनेव हे त्यावेळी कारागृहातच होते. त्यांच्यावर राष्ट्रद्रोहाचा आरोप ठेवण्यात येऊन, त्यांच्या चौदा साथीदारांसह त्यांना पुन्हा न्यायालयासमोर उभे करण्यात आले. त्यांशिवाय अन्य आरोपी होते ट्रॉट्स्की-रक्षकांचे एके काळचे प्रमुख–इवान स्मिर्नोव, सर्जी म्राच्कोवस्की व इफ्राईम द्रेइत्सर झिनोवीवचा सचिव ग्रेगोरी एव्दोकिमोव व त्याचा मदतनीस इवान

अनुक्रमणिका

बाकायेव व ट्रॉट्स्कीच्या दहशतवादी गटाचे प्रमुख पाच हस्तक फ्रीट्झ् डेविड, नाथन लुरे, मोईसे लुरे, कनोव बर्मन-युरीन व वॅलेंटाईन ओलबर्ग.

नंतर मास्को-खटले' म्हणून प्रसिद्धीला आलेल्या खटल्यांपैकी हा पहिला खटला होता. यावेळी पुढे आलेल्या साक्षीपुराव्यांनी रशियातील कटकारस्थानी यंत्रणेच्या दहशतवादी केंद्रासंबंधीच्या गोष्टी सर्व उघडकीस आल्या, व ते केंद्र चिरडले गेले. पण त्याचबरोबर, ते संपूर्ण कटकारस्थान पकडण्यात आलेल्या ट्रॉट्स्कीवाद्यांपुरते किंवा झिनोवीववाद्यांपुरते मर्यादित नसून, त्यांची पाळेमुळे दूरवर व खोलवर पसरली आहेत हेही स्पष्ट झाले.

खटल्यात जसजसे पुरावे पुढे आले व साक्षी झाल्या, तसतशी ट्रॉट्स्की व नाझी नेते यांतील जवळिकिची खरी कल्पना प्रथमच जनतेला येऊ लागली. सोविएत अभियोगी विशिन्स्की याने ट्रॉट्स्कीवादी जर्मन हस्तक वॅलेंटाईन ओलबर्ग याच्या केलेल्या उलट तपासणीत पुढे आलेले सत्य चांगलेच धक्कादायक होते.

विशिन्स्की : फ्रीडमनबद्दल तुम्हाला काय माहिती आहे?

ओलबर्ग : बर्लिनच्या ट्रॉट्स्कीवादी संघटनेचा तो हस्तक होता. त्याला सोविएत संघातही पाठविण्यात आले होते.

विशिन्स्की : फ्रीडमनचे जर्मन गुप्त पोलिसांशी संबंध होते हे तुम्हाला माहीत होते काय?

ओलबर्ग : होय. त्याची मला कल्पना होती.

विशिन्स्की : जर्मन गुप्त पोलिस व जर्मन ट्रॉट्स्कीवादी यातील संबंध योजनाबद्ध होते काय?

ओलबर्ग : होय; आणि ते सर्व ट्रॉट्स्कीच्या मार्गदर्शनानुसार होत होते.

विशिन्स्की : ते तुम्ही कशावरून म्हणता?

ओलबर्ग : त्या दोहोमधील एक दुवा मी स्वतःहोतो, व ट्रॉट्स्कीनेच माझे ते संबंध प्रस्थापित करून दिले होते.

विशिन्स्की : तुमचे कोणाशी संबंध प्रस्थापित केल्याचे म्हणता?

ओलबर्ग : फासिस्ट गुप्त पोलिसांशी.

विशिन्स्की : म्हणजे गेस्टॅपोशी तुमचे संबंध होते हे तुम्हाला कबूल आहे असे म्हणायला हरकत नाही होय ना?

ओलबर्ग : मी ते नाकारीत नाही.१९३३ पासूनच जर्मन ट्रॉट्स्कीवादी व फासिस्ट पोलिस यांत पद्धतशीर संपर्क सुरू झाला होता.

सोविएत संघात प्रवेश मिळवून घेण्याकरिता दक्षिण अमेरिकेचा बनावट पासपोर्ट त्याने कसा मिळविला तेही ओलबर्गने सांगितले. प्रागमधील जर्मन गुप्त पोलिस तुकालेवस्की याच्या द्वारा त्याने तो मिळविला होता.त्या संबंधात त्याचा बंधू पॉल ओलबर्ग याची त्याला मदत झाली होती असे त्याने सांगितले.

'तुमच्या भावाचेही गेस्टॅपोशी संबंध होते काय?' विशिन्स्कीने विचारले.

'तो तुकालेवस्कीचा हस्तक होता,'

म्हणजे फासिस्ट पोलिसांचाच हस्तक ना?'

'होय!' ओलबर्ग उत्तरला.

सोविएत संघात आल्यानंतर जर्मन इंजिनियर फ्रान्झ वेईट्झ याच्याबरोबर काम करण्याबाबत जर्मनी सोडण्यापूर्वी आपल्याला स्पष्ट आदेश देण्यात आले होते. असे नाथान लुरे या ट्रॉट्स्की दूताने न्यायालयापुढे सांगितले.

'हा फ्रान्झ वेईट्झ् कोण?' विशिन्स्कीने विचारले.

'तो जर्मनीच्या नॅशनल सोशलिस्ट पक्षाचा सदस्य होता' लुरेने सांगितले. त्यावेळी एस् एस्. या जर्मन संघटनेचा प्रमुख असलेल्या व नंतर गेस्टॅपोचा प्रमुख बनलेल्या हिमलरच्या आदेशानुसार तो सोविएत संघात आला होता.

'फ्रान्झ वेईट्झ् त्याचा प्रतिनिधी होता काय?'

'हिमलरच्या आदेशानुसार दहशतवादी कृत्ये करण्यास तो सोविएत संघात आला होता.'

या सर्व गोष्टी उघडकीला आल्या तरी, आपली शंभर वर्ष भरली अशी धास्ती खऱ्या अर्थाने उजव्या गटाला व ट्रॉट्स्कीवादी नेत्यांना वाटू लागली ती कामेनेवने दिलेल्या कबुलीजबाबानंतर! त्यांच्या

अनुक्रमणिका

कारस्थानाच्या यंत्रणेच्या अन्य स्तरांबाबत माहिती घाबरलेल्या कामेनेवने आपल्या कबुलीजबाबात दिली. 'आमचे कारस्थान उघडकीला येईल याची शक्यता ओळखून, आमची कार्यवाही चालू राहावी या हेतूने आम्ही एक छोटासा गट निर्माण केला होता. आमच्यातर्फे सोकोल्निकोव व ट्रॉट्स्कीवाद्यांतर्फे सेरेब्रयाकोव व रादेक हे ते कार्य यशस्वीपणे करू शकतील असे आम्हाला वाटत होते.१९३२—३३—३४ या काळात ट्रॉट्स्की व बुखारिन यांच्याशी मी स्वत: संपर्क राखला. त्यांची आम्हाला सहानुभूती होती. रिकोवही आमच्याच मताचा आहे असे आश्वासन ट्रॉम्स्कीने मला दिले.' बुखारिनबद्दल तो म्हणाला की 'त्याची राजकीय भूमिका आमच्यासारखीच असली तरी त्याची कार्यप्रणाली व डावपेच याबाबत मात्र त्याची मते भिन्न होती. पक्षात पक्केपणाने पाय रोवून व व्यक्तिश: पक्षनेतृत्वाचा विश्वास संपादन करून, आतून तोडफोड करून कार्यभाग साधण्यावर त्याचा भर होता' असे त्याने न्यायालयापुढे सांगितले.

काही आरोपींनी दयेची याचना केली तर काहींनी पुढे येईल त्याला सामोरे जाण्याची तयारी ठेवली. ' आमचे सर्वांचे राजकीय महत्त्व व गतकाळ सारखा नाही. पण मारेकरी म्हणून आम्ही सर्वच आता एकाच पातळीवर आलो आहोत. निदान माझ्यापुरते तरी मी सांगतो की दयेची अपेक्षा किंवा मागणी करण्याचा मला काहीही अधिकार नाही' असे एके काळचा ट्रॉट्स्की— अंगरक्षकांचा प्रमुख द्रेईत्झर म्हणाला, तर, न्यायालयापुढे कबुलीजबाब देताना, ट्रॉट्स्कीमुळे त्याचे जीवन उध्वस्त झाले व नको ते भयंकर गुन्हे करण्यास ट्रॉट्स्कीने त्याला उद्युक्त केले म्हणून फ्रीट्झ् डेविडने ट्रॉट्स्कीला तळतळून शिव्याशाप दिले.

२३ ऑगस्ट रोजी सोविएत सर्वोच्च न्यायालयाच्या लष्करी शाखेने आपला निकाल जाहीर केला. झिनोवीव, कामेनेव, स्मिर्नोव व अन्य १३ आरोपी यांना दहशतवादी व राष्ट्रद्रोही कृत्यांकरिता मृत्युदंडाची शिक्षा ठोठावण्यात आली.

यानंतर एकाच आठवड्याने प्यातकोव, रादेक, सोकोल्निकोव व सेरेब्रयाकोव यांना अटक करण्यात आली २७ सप्टेंबर रोजी यगोदाला एन्.के.व्ही.डी. च्या अध्यक्षाच्या पदावरून दूर करण्यात येऊन त्या पदावर बोल्शविक पक्षाच्या केंद्रीय नियंत्रक आयोगाच्या खास चौकशी समितीचा प्रमुख एन्.आय्.येझोव याची नियुक्ती करण्यात आली. एन्.के.व्ही.डी. कार्यालयातून हकालपट्टी होण्याच्या आदल्या दिवशी विषप्रयोग करून येझोवला मारण्याचा आसुरी प्रयत्न यगोदाने केला. पण तो अपयशी ठरला.

रशियन कटवाल्यांकरिता तो अखेरचा क्षण होता. कोणत्याही क्षणी त्यांना अटक होऊ शकते हे बुखारिन, रिकोव व टॉम्स्की जाणून होते. त्यामुळे बाहेरून सोविएत संघावर हल्ला होईल याची वाट न पाहता त्यांनीच आता अखेरची निर्णायक कार्यवाही करावी असा विचार ते करू लागले. उरात धडकी भरलेल्या टॉम्स्कीने तर उघडउघड क्रेमलिनवर सशस्त्र हल्ला करावा असा सल्ला दिला. पण तशा कार्यवाहीकरिता पुरेशी सिद्धता झालेली नसल्याने तसे करणे धोक्याचे ठरेल असे इतरांचे मत पडले.

अनुक्रमणिका

प्यातकोव व रादेक याची तुरुंगात रवानगी होण्यापूर्वी उजवा गट व ट्रॉट्स्कीवादी यांच्या प्रमुख नेत्यांच्या झालेल्या अखेरच्या बैठकीत सशस्त्र उठावाची सिद्धता करण्याचे निश्चित करण्यात आले. या उठावाचे व संपूर्ण कारस्थानी यंत्रणेचे मार्गदर्शन व संचालन परराष्ट्र खात्यातील उपमंत्री निकोलाय क्रेस्टिन्स्की ह्याच्या हाती सोपविण्यात आले. क्रेस्टिन्स्कीविषयी अजून सरकारला संशय आलेला नव्हता व त्याचे ट्रॉट्स्कीशी व जर्मनांशी निकटचे संबंधही होते. त्यामुळे बुखारिन, रिकोव, टॉम्स्की, यांना अटक झाली तरी क्रेस्टिन्स्की विरोधकांच्या योजना कार्यान्वित करण्याची जबाबदारी पार पाडू शकेल अशी त्यांची अपेक्षा होती.

त्याच्यावर सोपविण्यात आलेली कामगिरी पार पाडण्याकरिता मदतनीस म्हणून नुकत्याच बर्लिनहून मास्कोला परत आलेल्या आर्कडी रोझेनगोल्ट्झची निवड क्रेस्टिन्स्कीने केली.उंच, गोरापान, पिळदार शरीरयष्टीचा, बर्लिन येथील सोविएत परराष्ट्र व्यापार आयोग प्रमुख म्हणून बरीच वर्षे बर्लिनमध्ये राहिलेला सोविएत प्रशासकीय यंत्रणेत अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केलेल्या रोझेनगोल्टझ्ने त्याचे ट्रॉट्स्कीशी असलेले संबंध गुप्त राखण्याची अतोनात खबरदारी घेतली होती. एक ट्रॉट्स्कीवादी व १९२३ पासून जर्मन लष्करी हेरखात्याचा हस्तक [परकीय हस्तक्षेपाच्या युद्धाच्या वेळी लाल सैन्याचा एक सेनापती म्हणून रोझेनगोल्ट्झ्ने काम केले होते. त्यानंतर जर्मनीतील सोविएत दूतावासात व्यापारी प्रतिनिधी म्हणून त्याला बर्लिनला पाठविण्यात आले होते. १९२३ मध्ये ट्रॉट्स्कीने जर्मन लष्करी हेरखात्याशी त्याचा संपर्क साधून दिला. जर्मन हेरखात्याकडून त्याला मिळत असलेल्या पैशाच्या मोबदल्यात (ट्रॉट्स्कीवाद्यांच्या गुप्त बेकायदेशीर कारवायांकरिता तो पैसा कामाला येत असे) रोझेनगोल्ट्झ् जर्मनांना सोविएत वायुदलाबद्दल गुप्त माहिती पुरवीत असे. ट्रॉट्स्की त्यावेळी युद्धमंत्री असल्याने ती माहिती त्यांच्याजवळ तयारच असे. ट्रॉट्स्कीवाद्यांच्या कारवायात उघडपणे रोझेनगोल्ट्झ्ने कधीच भाग घेतला नाही. परंतु १९३४ मध्ये मात्र त्याने परराष्ट्र व्यापार क्षेत्रात विघातक कारवाया सुरू कराव्यात असा संदेश त्याला ट्रॉट्स्कीने पाठविला होता.त्यावेळी तो बर्लिनमधील सोविएत व्यापारमंडळात परराष्ट्र व्यापार मंत्री होता. ट्रॉट्स्कीच्या आदेशनुसार काही काळ नाझी जर्मनीला तर नंतर जपानला लाभदायक ठरेल अशा प्रकारे सोविएत परराष्ट्र व्यापाराचे आयोजन त्याने केले १९३६ मध्ये रोझेनगोल्ट्झ्ला मास्कोला माघारी बोलावण्यात आले होते.] म्हणून त्याने केलेल्या कारवायांबद्दल माहिती होती ती केवळ ट्रॉट्स्की व क्रेस्टिन्स्की यांना!

यानंतर उजव्या व ट्रॉट्स्कीवादी गटाचे नियंत्रण क्रेस्टिन्स्की व रोझेनगोल्ट्झ् या दोन ट्रॉट्स्कीवादी जर्मन हस्तकांच्या हाती गेले. बऱ्याच चर्चेनंतर, रशियातील पंचमस्तंभीयांनी आता आपली अखेरची खेळी खेळण्याची—म्हणजे लष्करी उठाव करण्याची वेळ आली आहे असे त्या दोघांनी ठरविले. त्या लष्करी उठावाचे नेतृत्व करण्याकरिता निवड करण्यात आली होती—सोविएत संघाच्या सहाय्यक संरक्षण मंत्र्याची —मार्शल तुखाचेवस्कीची!

अनुक्रमणिका

प्रकरण २०

# न्यायालयीन चौकशीची अखेर

सोविएत संघाच्या त्या संकटकाळात, एके काळी रशियाचा ग्रास घेण्यास निघालेल्या नेपोलियनची छाया पुन्हा रशियन राष्ट्राला भेडसावू लागली. त्यावेळी त्या कॉर्सिकन लष्करवाद्याची भूमिका वठवीत होता तो लाल लष्कराचा एक उच्चपदस्थ अधिकारी –मार्शल मिखाईल निकोल्येविच तुखाचेवस्की. रशियातील एका बड्या जमीनदाराचा तो मुलगा झारशाहीत एक लष्करी अधिकारी, व क्रांतीनंतर लाल लष्करातील एक नेता बनला होता.

सुप्रसिद्ध अलेक्झांद्रोविच लष्करी प्रशिक्षण केंद्रातून पदवी परिक्षा पास झालेला तुखाचेवस्की अत्यंत महत्वाकांक्षी होता. 'वयाच्या तिसाव्या वर्षी एक तर मी सेनापती बनेन नाहीतर आत्महत्या करून घेईन असे विद्यार्थी असताना तो म्हणे. पहिल्या महायुद्धात झारलष्करातील एक अधिकारी म्हणून आघाडीवर लढत असता १९१५ मध्ये तो जर्मनांच्या हाती पडला.त्याच्याचबरोबर युद्धकैदी बनलेल्या लेफ्टनंट फेखाक या फ्रेंच अधिकाऱ्याने, एक अत्यंत बेदारकार, अविवेकी व बेसुमार महत्त्वाकांक्षी व्यक्ती, असे वर्णन तुखाचेवस्कीचे केले होते.नित्शेच्या तत्त्वज्ञानाने त्याचे डोके भारले होते. 'रशियात ख्रिश्चन धर्म आणून पाश्चात्य संस्कृतीच्या तावडीत रशियाला नेऊन सोडणाऱ्या सेंट ब्लादिमिरचा मला फार संताप येतो. आम्ही आमच्या मूळच्या मूर्तिपूजेच्या अपक्व असद्धर्मालाच चिकटून रहायला हवे होते. पण ते सर्व अजूनही परत येईल. खात्री आहे मला त्याची!' असे बोलताना त्याला अनेकांनी ऐकले होते. होऊ घातलेल्या रशियन क्रांतीबद्दल तो म्हणे, 'अनेकांना ही क्रांती व्हायला हवी आहे. पण आपण लोक मुळातच मोठे आळशी व विध्वंसक प्रवृत्तीचे आहोत.तशी क्रांती झालीच तर त्याचे पर्यवसान कशात होणार हे एका परमेश्वरालाच ठाऊक! मला स्वत: ला तर वाटते की घटनात्मक शासनपद्धती रशियाकरिता एक शापच ठरेल. आपल्याला एखादा हुकुमशहाच पाहिजे! '

बोल्शेविक क्रांतीची तुतारी फुंकली जात असता जर्मनीतून निसटून तुखाचेवस्की रशियात परत आला; व त्यावेळी बोल्शेविकांविरुद्ध श्वेत फौजा संघटित करीत असलेल्या झारकालीन लष्करातील आपल्या सहकाऱ्यांना जाऊन मिळाला.पण थोडेच दिवसात त्याने पगडी बदलली. श्वेत लष्कराकडून काहीही साध्य होणे शक्य नाही, त्यांच्यात कोणी नेताही नाही असे वाटून त्याने बोल्शेविकांना जाऊन मिळण्याचे ठरविले. दिमित्री गोलम-बेक या आपल्या श्वेत लष्करी मित्राला तो म्हणाला, 'तुला माझ्याबरोबर यायचे नसेल तर येऊ नकोस. पण मी जे करतो आहे तेच योग्य असल्याची मला खात्री आहे. रशिया आता पूर्वीपेक्षा अगदी वेगळा होणार हे नक्की!'

अनुक्रमणिका

१९१८ मध्ये तुखाचेवस्की बोल्शेविक पक्षाचा सदस्य बनला, व लवकरच, युद्धमंत्री ट्रॉट्स्कीभोवती गोळा होणाऱ्या साहसी अधिकाऱ्यांत तो सामिल झाला. मात्र ट्रॉट्स्कीच्या राजकीय कारस्थानात स्वतःला फार गुंतवून न घेण्याची त्याने खबरदारी घेतली. लाल लष्करातील अननुभवी सैनिकांच्या व अधिकाऱ्यांच्या तुलनेत तो प्रशिक्षित व अनुभवी असल्याने त्या लष्करातील ज्येष्ठत्वाच्या पायऱ्या तो भराभर चढत गेला. रँगलविरुद्ध पहिल्या व पाचव्या लाल लष्करी तुकड्यांचे नेतृत्व त्यानेच केले.डेनिकिनविरुद्धच्या मोहिमेतही त्याचा सहभाग होता.त्यानंतर पोलिश लष्कराविरुद्धच्या अपयशी ठरलेल्या प्रतिहल्ल्यातही तो ट्रॉट्स्कीबरोबर होता. १९२२ मध्ये लाल लष्करी प्रशिक्षण केंद्राचा तो प्रमुख बनला. त्याच वर्षी, जर्मनीच्या वायमार सरकारशी सोविएत सरकारने केलेल्या रापोलो करारानंतर रशिया व जर्मनी यात झालेल्या लष्करी वाटाघाटीतही त्याची भूमिका महत्वाची होती.

त्यानंतरच्या काळात बोल्शेविक गनिमी नेते मार्शल बुद्येनी व मार्शल वोरोशिलोव यांचे लाल लष्करातील जेष्ठत्त्व सहन न होणाऱ्या झारकालीन व्यावसायिक लष्करवाद्यांच्या छोट्याशा गटाचा तुखाचेवस्की नेता बनला. त्या गटात याकिर, कोर्क, उबोरेविच व फेल्डमन हे लाल लष्करातील सेनापती सामील होते. त्या सर्वांना जर्मन लष्करवादाचे विलक्षण आकर्षण होते.शिवाय, बर्लिन, लंडन व टोकियो येथील मिलिटरी ॲटची व्ही.आय्.पुतना, व जर्मन राष्ट्राचे उच्चस्तरीय लष्करी अधिकारी सीक्ट व हामरस्टीन यांचा खास मित्र जनरल जान बी. गामर्निक हे ट्रॉट्स्कीवादी अधिकारी तुखाचेवस्कीचे अगदी निकटचे सहकारी होते.

पुतना व गामर्निक यांच्या सहकार्याने, लाल लष्करातील जर्मनीला अनुकूल असलेल्या अधिकाऱ्यांचा एक गट तुखाचेवस्कीने संघटित केला. त्याला व त्याच्या सहकाऱ्यांना जर्मन राष्ट्राशी ट्रॉट्स्की करीत असलेल्या हितगुजाची माहिती होती. पण ती केवळ एक राजकीय स्वरूपाची व्यवस्था आहे, ट्रॉट्स्कीच्या योजना यशस्वी व्हावयाच्या तर जर्मन–ट्रॉट्स्की हातमिळवणीला तुखाचेवस्कीचा लष्करी गट व जर्मन लष्करश्रेष्ठी यांच्या युतीची जोड मिळाली पाहिजे असे त्याचे मत होते. हिटलर अधिकारारूढ झाल्यानंतरही जर्मन लष्करी नेते व तुखाचेवस्की यांतील संपर्क चालूच राहिला.

उजवे व ट्रॉट्स्कीवादी यांचा गट संघटित झाल्यापासूनच तुखाचेवस्कीकडे ट्रॉट्स्कीचे लक्ष लागले होते. त्यांच्या संपूर्ण कारस्थानी यंत्रणेतील तुखाचेवस्की हा हुकुमाचा एक्का असून त्याचा वापर शत्रूविरुद्ध अगदी निर्णायक क्षणी करावयाचा अशीच त्याच्याबद्दल ट्रॉट्स्कीची धारणा होती. क्रेस्टिन्स्की व पुतना यांच्या द्वारा त्याने तुखाचेवस्कीशी सतत संबंध ठेवले होते. नंतर बुखारिन व तुखाचेवस्कीचा लष्करी गट यांच्यातील व्यक्तिगत दुवा म्हणून बुखारिनने टॉम्स्काची नेमणूक केली होती.

राजकारणी व सिद्धांतवादी यांच्याबद्दल तुखाचेवस्कीला वाटणारी तुच्छता ट्रॉट्स्की व बुखारिन चांगले जाणून होते; आणि त्याच्या महत्वाकांक्षेची त्यांना धास्तीही वाटत होती. त्याच्या लष्करी गटाचा उपयोग आपल्या उद्दिष्टसिद्धीकरिता करून घेण्याच्या शक्यतेबाबत बुखारिन म्हणाला, –'आपला उठाव लष्करी गटाच्या पुढाकाराखाली होणार असल्याने त्या गटाला भलतेच महत्व प्राप्त होईल व

नेपोलियनप्रमाणे तुखाचेवस्कीही आपल्यासारख्या सहकाऱ्यांना शेवटी परास्त करुन सर्व सत्ता बळकावून बसेल की काय ही धास्ती आहे. तुखाचेवस्की हा एक छुपा नेपोलियनच आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे; आणि नेपोलियनने तेथील सिद्धांतवाद्यांची काय गत केली हे तर तुम्हाला माहीतच आहे.' तुखाचेवस्की उठाव कोणत्या प्रकारे घडवून आणणार आहे असे बुखारिनने विचारताच ट्रॉट्स्की म्हणाला— 'ते सर्व लष्करी गटाने निश्चित केले आहे. नाझींनी सोविएत संघावर हल्ला केला की लागलीच या लष्करी अधिकाऱ्यांनी जर्मन लष्करश्रेष्ठींपुढे शरणागती पत्करावी व त्यांना जाऊन मिळावे अशी योजना आहे. तत्संबंधीचा सर्व तपशीलही तुखाचेवस्की,पूतना,गामर्निक व जर्मन अधिकारी यांनी तयार केला आहे.' त्यावर बुखारिन हायसे होऊन म्हणाला, 'तसे असेल तर बोनापार्टसारखा धोका निर्माण होणार नाही अशी व्यवस्था करता येईल.'याचा अर्थ ट्रॉट्स्कीच्या लक्षात न आल्याने बुखारिन त्याला समजावून सांगू लागला की 'तुखाचेवस्की लष्करी हुकुमशाही प्रस्थापित करण्याचा डाव टाकील, एवढेच नव्हे तर कटकारस्थानातील राजकीय नेत्यांना बळी देऊन जनतेचा पाठिंबा मिळवून घेण्याचाही एखादे वेळी प्रयत्न करील; परंतु एकदा सत्ता हाती आली की युद्धात अपयशी ठरल्याच्या गुन्ह्याकरिता (नाझींविरुद्धच्या लढ्यात सोविएत संघाचा पराभव तर अटळच आहे.) त्यांना जबाबदार धरून त्यांचा काटा काढणे आपल्याला कठीण होणार नाही; राष्ट्रभक्तीचे आवाहन करून त्यांच्याविरुद्ध जनतेला आपल्या बाजूला वळवून घेता येईल.'

१९३६ च्या प्रारंभी इंग्लंडचा राजा पाचवा जॉर्ज याच्या अन्त्ययात्रेला उपस्थित राहण्याकरिता सोविएत लष्करी प्रतिनिधी म्हणून तुखाचेवस्की लंडनला गेला.तत्पूर्वी, सोविएत संघाचा 'मार्शल' हा किताब बहाल करून सोविएत सरकारने त्याला गौरविले होते. त्यामुळे त्याच्या स्वत:च्या मोठेपणाबद्दलच्या कल्पना आकाशाकडे झेपावल्या होत्या. सोविएत राजवट उलथून पाडण्याचा व जर्मनी व जपान या राष्ट्रांशी झालेल्या लष्करी युतीच्या आधारे संपूर्ण जगावर प्रभुत्व प्रस्थापित करण्याचा क्षण नजीक आला आहे अशी खात्री त्याला वाटू लागली.

लंडनला जाताना तुखाचेवस्की थोड्या वेळाकरिता वॉर्सा व बर्लिन येथे थांबला. तेथील लष्करी उच्चाधिकाऱ्यांशी त्याने बोलणी केली. त्याचा आत्मविश्वास इतका उफाळून आला होता की जर्मन लष्करवाद्यांबद्दल त्याला वाटणारे कौतुक उघडपणे प्रदर्शित करू नये एवढीही साधी दक्षता त्याने घेतली नाही.

लंडनहून परतताना तो पॅरिस येथे उतरला. तेथे सोविएत दूतावासाने आयोजित केलेल्या भोजन समारंभात बोलताना, पश्चिमी लोकशाही राष्ट्रांच्या सहकार्याने सामूहिक सुरक्षा साध्य करून घेण्याकरिता सोविएत संघ करीत असलेल्या प्रयत्नांवर त्याने उघड उघड हल्ला चढविला. त्यामुळे सर्व उपस्थितांना व युरोपीय राजनीतीज्ञांना चांगलाच धक्का बसला. भोजन चालू असता त्याच्या शेजारी बसलेल्या निकोलस तितुलेस्कू या रुमानियन परराष्ट्र मंत्र्याला तुखाचेवस्की म्हणाला — 'मंत्रीमहोदय, ग्रेट ब्रिटन व फ्रान्स या सारख्या जुनाट व राजकीय महत्त्व संपुष्टात आलेल्या राष्ट्रांशी तुमच्या राष्ट्राचे भवितव्य निगडीत करण्यात तुमची फार मोठी चूक होत आहे. तुम्ही—आम्ही आता वळायला पाहिजे ते नव-जर्मनीकडे. काही काळ तरी

युरोप खंडाच्या राजकारणाचे नेतृत्व तेच राष्ट्र करणार आहे. आपणा सर्वांचेच संरक्षण हिटलरच्या मदतीने होऊ शकेल याची मला खात्री आहे!' तुखाचेवस्कीचे हे वक्तव्य त्या भोजन समारंभाला उपस्थित असलेला पॅरिस येथील रुमानियन दूतावासाचा वृत्तसेवाप्रमुख ईश्वाचानन ऐसेझ या रुमानियन मुत्सद्याने त्यावेळी नमूद केले होते. शिवाय, त्या प्रसंगी उपस्थित असलेली सुप्रसिद्ध पत्रकारविदुषी गेनेवीव ताबोई हिने 'दे कॉल मी कॅसेंड्रा' या आपल्या ग्रंथात तुखाचेवस्कीसंबंधी केलेली नोंद उल्लेखनीय आहे ती म्हणते—'राजा पंचम जॉर्ज याच्या अन्त्यसंस्कारानंतर दुसरे दिवशी माझी तुखाचेवस्कीशी भेट झाली, ती शेवटचीच. सोविएत दूतावासातील त्या भोजनसमारंभात तो रशियन जनरल (तुखाचेवस्की), पोलिटिस, तितुलेस्कू, हेरियट, बॉनकर यांच्याशी सतत बोलत होता. तो नुकताच जर्मनीला जाऊन आला होता व नाझींची बेफाम स्तुती करीत होता; आणि युरोपची बडी राष्ट्रे व नाझी जर्मनी यातील वायुदल करारासंबंधी बोलताना 'मादाम ताबोई, ते नाझी तर आजच अगदी अजिंक्य आहेत' असे मला वारंवार सांगत होता.

'इतक्या खात्रीपूर्वक नाझींच्या श्रेष्ठत्वाबद्दल तो का बोलत होता? तो जर्मनीला गेला असता जर्मन मुत्सद्यांनी त्याच्या केलेल्या भव्य स्वागतामुळे तो हुरळून गेला होता का? ते काहीही असले तरी नाझींच्याबद्दलचे त्याचे कौतुक व उल्हास पाहून केवळ माझ्याच मनात अस्वस्थता व धास्ती दाटली असे नव्हे तर इतर अनेकांवरही तशीच प्रतिक्रिया झाली. उपस्थित पाहुण्यांपैकी एक सुप्रसिद्ध मुत्सद्दी तुखाचेवस्कीचे ते बोलणे ऐकून माझ्या कानात हळूच कुजबुजला, 'ही तर कमालच झाली! निदान इतर रशियनांना तरी असेच वाटत नसेल अशी मी आशा करतो!'

ऑगस्ट १९३६ मध्ये ट्रॉट्स्की—झिनोवीव—दहशतवादी गटाच्या खटल्याचेवेळी उघडकीस आलेले खळबळजनक सत्य व त्यापाठोपाठ प्यातकोव व रादेक यांना झालेली अटक यामुळे तुखाचेवस्की चांगलाच धास्तावला. त्यांच्या कटकारस्थानासंबंधीच्या योजनात आता पुष्कळच बदल करावा लागेल असे त्याने क्रेस्टिन्स्कीला सांगितले. सोविएत संघावर परराष्ट्राचा हल्ला होईपर्यंत लष्करी गटाने कोणतीही हालचाल करू नये असे पूर्वी ठरले होते. परंतु फ्रान्स—रशिया परस्पर मदतीचा करार, माद्रिदचा अनपेक्षित बचाव अशा आंतर्राष्ट्रीय घटनांमुळे परराष्ट्राचा सोविएत संघावरील हल्ला लांबणीवर पडत असल्याने देशातील कटवाल्यांनी आता ठरल्या वेळेपेक्षा अगोदरच उठाव करणे आवश्यक झाले आहे, तसा उठाव अंतर्गत क्षेत्रात झाला तर जर्मनी आपल्या रशियन मित्रांच्या मदतीला नक्कीच धावून येईल असे तुखाचेवस्कीने क्रेस्टिन्स्कीला पटविले. कार्यवाहीची त्वरा करण्याबाबत ट्रॉट्स्कीला निरोप पाठविण्याची व्यवस्था करण्याचे क्रेस्टिन्स्कीने कबूल केले. त्यानुसार, बऱ्याच ट्रॉट्स्कीवाद्यांची धरपकड झालेली असली तरी त्या गटाच्या शक्तीला अद्याप धक्का लागलेला नाही; तेव्हा उठाव करता येऊ शकेल, परंतु यशसिद्धीकरिता परकीय हल्लाही लवकरात लवकर व्हावा अशी व्यवस्था व्हायला पाहिजे, असा निरोप ट्रॉट्स्कीला क्रेस्टिन्स्कीने पाठविला.'परकीय हल्ला' म्हणजे नाझींचा सोविएत संघावरील हल्ला हे उघडच होते.

ट्रॉट्स्कीला निरोप पाठविल्यानंतर थोड्याच दिवसांनी नोव्हेंबर १९३६ मध्ये कॉंग्रेस ऑफ सोविएत्स् ची आठवी असाधारण सभा चालू असता तुखाचेवस्कीने क्रेस्टिन्स्कीला बोलणे करण्याकरिता थोडे बाजूला नेले. 'सोविएत सरकारचे अटक सत्र चालूच आहे,' उत्तेजित मनःस्थितीतील तुखाचेवस्की क्रेस्टिन्स्कीला

अनुक्रमणिका

सांगत होता, 'आणि आपल्या कारस्थानी यंत्रणेच्या खालच्या स्तरावरील लोकांना पकडूनच ते थांबतील असे लक्षण दिसत नाही. ट्रॉट्स्कीचा लष्करी मध्यस्थ पुतना याला अटक झालेली आहे; व या सर्व प्रकारामागे फार मोठे कटकारस्थान दडलेले असल्याची स्टालिनची खात्री झालेली असून त्याविरुद्ध कठोर कार्यवाही करण्याचा त्याचा निर्धार आहे. प्यातकोव व अन्य ट्रॉट्स्कीवाद्यांचे गुन्हे सिद्ध करणारे भरपूर पुरावे त्याच्याजवळ आहेत. पुतनाची अटक व एन्.के.व्ही.डी.च्या अध्यक्षपदावरून यगोदाची हकालपट्टी या दोन्ही घटनांवरून एक गोष्ट स्पष्ट होते ती ही की सोविएत अधिकाऱ्यांना आपल्या कटकारस्थानाचा पूर्ण सुगावा लागलेला आहे; आणखी त्यांना कोणता पुरावा सापडेल व त्यांचे हात कोठपर्यंत पोचतील याचा नेम नाही. आपल्या सर्व योजनांचा अंत अनर्थात होणार की काय कळत नाही; 'अशा परिस्थितीत तात्काळ कार्यवाही करणे हा एकच इलाज मला दिसतो.' असे तुखाचेवस्की म्हणाला. आता अधिक वेळ न घालवता त्यांनी ताबडतोब उठावाबद्दल निर्णय घ्यावा व त्याकरिता सर्व शक्ती पणाला लावावी अशी निकड त्याने लावली.

यावर क्रेस्टिन्स्कीने रोझेनगोल्ट्झशीही चर्चा केली. तुखाचेवस्कीचे म्हणणे बरोबर असल्याचे त्या दोघांचेही मत होते. त्यामुळे परकीय हल्ल्याची वाट न पाहता लष्करी उठाव करण्याच्या तुखाचेवस्कीच्या निश्चयाबद्दल ट्रॉट्स्कीला पुन्हा कळविण्यात आले. त्याच पत्रात त्या उठावाच्या राजकीय डावपेचांबाबतही काही महत्त्वाच्या मुद्द्यांचा उल्लेख क्रेस्टिन्स्कीने केला. त्याने लिहिले—

'लष्करी उठावाची आपली खरी उद्दिष्टे आपण गुप्त राखली पाहिजेत. जनता, लष्कर व परकीय राष्ट्रे यांना उद्देशून आपण उघड निवेदने केली पाहिजेत.पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे जनतेला उद्देशून काढावयाच्या आपल्या निवेदनात सध्याची समाजवादी व्यवस्था उलथून पाडण्याचे आपले उद्दिष्ट आहे असा पुसटसाही उल्लेख कोठे येता कामा नये; आपण सोविएत बंडखोर आहोत, व एक अपकारक व अकार्यक्षम सोविएत शासन उलथून पाडून त्याऐवजी एक कल्याणकारी व कार्यक्षम सोविएत सरकार प्रस्थापित करण्याचा आपला हेतू आहे असेच चित्र आपण रंगविले पाहिजे. यापेक्षा अन्य कोणत्याही गोष्टीची वाच्यता आपण करता कामा नये.'

ट्रॉट्स्कीने यावर पाठविलेले उत्तर क्रेस्टिन्स्कीला डिसेंबर अखेरी मिळाले. क्रेस्टिन्स्कीने केलेल्या सर्व सूचना ट्रॉट्स्कीला मान्य होत्या. आता अधिक विलंब न करता लष्करी गटाने त्वरीत कार्यवाही करायला पाहिजे असेच त्यालाही प्यातकोवच्या अटकेनंतर वाटू लागले होते. क्रेस्टिन्स्कीचे पत्र मिळण्यापूर्वीच त्याने रोझेनगोल्ट्झला तसे कळविलेही होते.

'ट्रॉट्स्कीचे उत्तर येताच आम्ही प्रत्यक्षपणे उठावाच्या तयारीला प्रारंभ केला. तुखाचेवस्कीला कार्यवाहीबाबत पूर्ण मोकळीक देण्यात आली,' क्रेस्टिन्स्कीने नंतर आपल्या निवेदनात सांगितले.

**ट्रॉट्स्कीवादी केंद्राचा खटला**

अनुक्रमणिका

एकीकडे ट्रॉट्स्की-क्रेस्टिन्स्की यांच्या या योजना आकाराला येत असता त्याचवेळी सोविएत सरकारही कार्यप्रवण होत होते. सोविएत सरकारविरुद्धचे कारस्थान म्हणजे केवळ देशातील डाव्यांचा विरोध नसून त्याची पाळेमुळे फार दूरवर पसरलेली आहेत, त्या कटाची मुख्य केंद्रे रशियात नव्हे तर बार्लिन व टोकियोत होती हे झिनोवीव–कामेनेव यांच्या जबानीवरून निर्विवादपणे सिद्ध झाले होते. चौकशी चालू असता एकंदर कटकारस्थानासंबंधीचा जसजसा अधिकाअधिक पुरावा व तपशील सरकारच्या हाती येऊ लागला तसतसे ॲक्सिस पंचमस्तंभाचे खरे स्वरूप सोविएत सरकारला स्पष्ट होत गेले.

२३ जानेवारी १९३७ रोजी मास्को येथे सोविएत संघाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या लष्करी शाखेपुढे प्यातकोव, रादेक, सोकोल्निकोव, शेस्तोव, मुरालोव व जर्मन व जपानी गुप्तहेरांसह त्यांचे बारा कटवाले सहकारी यांच्यावर राष्ट्रद्रोहाच्या आरोपावरून खटल्याला प्रारंभ झाला. ट्रॉट्स्कवादी केंद्राच्या त्या सदस्यांनी त्यांच्यावर ठेवण्यात आलेले आरोप तोपर्यंत साफ नाकबूल केले होते. पण त्यांच्याविरुद्ध सरकारतर्फे न्यायालयापुढे ठेवण्यात आलेला पुरावा इतका सबळ व बिनतोड होता की एकामागून एक त्या आरोपींनी घातपाती व दहशतवादी कृत्यांचे आयोजन व मार्गदर्शन केल्याची व ट्रॉट्स्कीच्या आदेशानुसार जर्मनी व जपानशी संपर्क राखल्याची कबुली दिली. परंतु न्यायालयापुढील प्रांरभीच्या तपासणीत त्यांनी संपूर्ण कारस्थानाचा गौप्यस्फोट मात्र केला नाही. लष्करी गटाच्या अस्तित्वाबद्दल त्यांनी चकार शब्दही उच्चारला नाही, की क्रेस्टिन्स्की किंवा रोझेनगोल्ट्झ् यांचा नामनिर्देशही केला नाही. खटल्याचे कामकाज चालू असतानाच, एकूण कारस्थानातील ज्या सर्वात महत्वाच्या गटाने सत्ता काबीज करण्याकरिता उठावाची सिद्धता चालविली होती त्या गटाबद्दल त्यांनी पूर्ण मौन बाळगले.

पूर्वी परराष्ट्र खात्याच्या पौर्वात्य विभागाचे कामकाज सांभाळणारा उपमंत्री सोकोल्निकोव याने तुरुंगात असताना, हेसशी त्यांचा झालेला करार, सोविएत संघाच्या विघटनाची व सोविएत राजवट उलथून पाडून त्याऐवजी फासिस्ट हुकुमशाही प्रस्थापित करण्याची त्यांनी आखलेली योजना याबद्दल कबूली दिली होती. न्यायालयासमोर त्याने सांगितले-‘फासिझम म्हणजे भांडवलशाहीचे सर्वात सुसंघटित स्वरूप आहे, व शेवटी फासिझम संपूर्ण जग ग्रासणार व आपल्यालाही नामोहरम करणार असे आमचे मत होते. त्यामुळे फासिझमशी तडजोड करण्यात सूज्ञपणा आहे असे आम्ही ठरविले. ‘सर्वनाशे समुत्पन्ने अर्घ्यं त्यजतिपंडितः’ हा विचार आम्हाला राजकीय दृष्ट्या शहाणपणाचा वाटला.’

प्यातकोव हा ट्रॉट्स्कीवादी केंद्राचा पुढारी होता याची कबुली खुद्द प्यातकोवने दिली. सर्वोच्च राष्ट्रीय आर्थिक मंडळाच्या त्या माजी सदस्याने, अगदी शांतपणे, विचारपूर्वक, मोजक्याच शब्दात, अटक होईपर्यंत तो घातपाती व दहशतवादी कारवायांचे पद्धतशीरपणे मार्गदर्शन करीत होता हे मान्य केले. हा कबुलीजबाब देताना न्यायालयासमोर उभ्या असलेल्या प्यातकोवचा लांबट, रोडकासा, फिकट्ट चेहरा पूर्णपणे निर्विकार होता. ‘शिक्षण केंद्रात विद्यार्थ्यांसमोर भाषण देणाऱ्या एखाद्या प्रोफेसरासारखा तो दिसत होता’ असे भाष्य त्याबद्दल न्यायालयात उपस्थित असलेल्या जोसेफ ई.डेविस या अमेरिकन राजदूताने केले आहे.

अनुक्रमणिका

ट्रॉट्स्कवाद्यांनी जर्मनी व जपान यांच्याशी कसा संपर्क साधला हे प्यातकोवकडून काढून घेण्याचा विशिन्स्कीने पुष्कळ प्रयत्न केला. परंतु प्यातकोवने दाद दिली नाही.

विशिन्स्की : 'रातैचक हा जर्मन हस्तक आहे ही गोष्ट तुमच्याजवळ उघड करण्याइतपत विश्वास तुमच्याबद्दल त्याला कशामुळे वाटला?'

प्यातकोव : 'दोन माणसे त्याबद्दल माझ्याशी बोलली.'

विशिन्स्की : 'परस्पर संपर्क साधण्याच्या हेतूने त्याने प्रथम तुम्हाला त्यांची ओळख पटवून दिली की ते काम प्रथम तुम्ही केले? '

प्यातकोव : 'कदाचित त्या दोन्ही गोष्टी एकदमच झाल्या असतील.'

विशिन्स्की : 'प्रथम तुम्ही स्वतःची ओळख पटवून दिली का? '

प्यातकोव : 'प्रथम कोण—तो की मी, कोंबडी की अंडे, हे सांगणे कठिण आहे.'

या खटल्यांबद्दल आपल्या 'इन्साईड युरोप 'या ग्रंथात जॉन गंथर लिहितो—'सर्व आरोपी एकच कथा सांगत होते कसाया पुढे उभ्या करण्यात आलेल्या मेंढ्याप्रमाणे ते अगदी असहाय्य व हीनदीन बनले होते हा सर्वत्र पसरलेला समज अजीबात सत्याला धरून नाही. सोविएत अभियोगीशी ते आडमुठेपणाने हुज्जत घालीत होते व अगदी नाईलाज होईल तेवढेच कबूल करीत होते . . .'

खटला जसजसा पुढे सरकला व एकंदर साक्षीपुराव्यातून प्यातकोव हा अत्यंत उलट्या काळजाचा राजकीय मारेकरी व राष्ट्रद्रोही असल्याचे जसे निर्विवादपणे सिद्ध होऊ लागले तसा तसा वरवर शांत व संयमित वाटणाऱ्या प्यातकोवच्या आवाजात अस्वस्थता व निराशा डोकावू लागली. त्याच्यविरुद्ध सादर करण्यात आलेल्या काही पुराव्याने तर त्याला धक्काच बसला. त्याच्या वागण्यातील उद्दामपणा व आडमुठेपणा हळूहळू नाहीसा झाला; आणि अटक होण्यापूर्वीच ट्रॉट्स्कीच्या नेतृत्वाबद्दल त्याला साशंकता वाटू लागली होती, हेसशी ट्रॉट्स्कीने करार करावा हे त्याला पसंत पडले नव्हते; तो जणू एका चक्रव्यूहात सापडला होता व त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधण्याकरिता तो धडपडत होता असे तो बोलू लागला. शेवटी, न्यायालयासमोर त्याने आवर्जून सांगितले—

'होय! बऱ्याच वर्षांपासून मी एक ट्रॉट्स्कीवादी होतो. ट्रॉट्स्कीवाद्यांच्या हातात हात घालून मी काम केले. पण न्यायाधीश महाराज, ज्यावेळी ट्रॉट्स्कीवादाच्या गुदमरून टाकणाऱ्या भूमीगत जगात मी काम करीत होतो त्यावेळी रशियात काय घडत होते, उद्योगक्षेत्रात कोणते क्रांतिकारी बदल घडून येत होते याची मला जाणीव नव्हती असे आपण समजू नये. तुम्हाला खरे सांगायचे तर ट्रॉट्स्कीवादाच्या गुन्हेगारी

अनुक्रमणिका

जगातून बाहेर पडून मी जेव्हा दैनंदिन कामकाजाकडे वळत असे त्यावेळी एक प्रकारे सुटका झाल्यासारखे मला हायसे वाटत असे. माझ्या व्यक्तिमत्वाच्या या दोन बाजू केवळ व्यावहारिक बाजूपुरत्या मर्यादित नव्हत्या, तर माझ्या अंतर्मनातही एक प्रकारचे द्वंद्व सुरू होते. थोड्या वेळातच आपण आपला निकाल जाहीर कराल, तेव्हा न्यायाधीश महाराज, एक गोष्ट तरी आपण माझ्यापासून हिरावून घेऊ नये—ती म्हणजे माझ्या गुन्हेगारी गतकाळाचे सर्व बंध तोडून टाकण्याची शक्ती माझ्यात निर्माण झाली आहे असा विश्वास आपल्याला वाटतो, असे मानण्याचा अधिकार मला असू द्यावा.' मात्र हे सर्व बोलत असता त्यांच्या कारस्थानाच्या कार्यवाहीसंबंधी किंवा त्यांच्या संघटनेच्या सदस्यासंबंधी एक अवाक्षरही त्याच्या तोंडून बाहेर पडले नाही.

आरोपींपैकी निकोलाय मुरालेव हा एक आंडदांड पुरुष होता. एके काळी तो मास्को लष्करी शिबंदीचा सेनापती होता व १९३२ पासून उरल क्षेत्रात शेस्तोव व जर्मन तंत्रज्ञ यांच्या बरोबरीने त्याने ट्रॉट्स्काईट केंद्राच्या कारवायांचे मार्गदर्शन केले होते. त्याने दिलेली मनमोकळी जबानी विचारात घेऊन न्यायधीशांनी त्याला दयेची भीक घालावी अशी त्याची विनंती होती. अटक झाल्यानंतर त्याच्या अंतर्मनात झगडा सुरू झाला व कोणताही आडपडदा न ठेवता संपूर्ण सत्य न्यायालयापुढे उघडे करायचे त्याने ठरविले असल्याचे त्याने सांगितले. तो म्हणाला, 'माझ्या बचावाकरिता वेगळे काहीही मला सांगावयाचे नाही, कारण त्याकरिता माझ्याजवळ आवश्यक तो पुरावा नाही. मला फसवून कोणी ट्रॉट्स्की संघटनेच्या जाळ्यात मला ओढले असा आरोप मी कोणावरही करणार नाही. त्याबद्दल मला कोणाला दोषही द्यायची इच्छा नाही. दोष असलाच तर तो माझा स्वतःचाच आहे. हा गुन्हा मी केला हे माझे दुर्दैव होय!'

आपल्या जाड भिंगांच्या चष्म्याआडून न्यायालयातील गर्दीकडे लुकलुकत्या डोळ्यांनी पाहणारा रादेक प्रथम अगदी मवाळ आणि गोडबोल्या वाटला तरी विशिन्स्की त्याची उलटतपासणी करू लागताच त्याचे औधत्य व दुरुत्तरे करण्याची त्याची ढब स्पष्ट झाली. प्यातकोवप्रमाणेच पण काहीशा अधिक प्रांजलपणे त्याने आपल्या राष्ट्रद्रोही कारवायांची कबुली दिली; एवढेच नव्हे तर नाझी जर्मनी व जपान यांच्याशी झालेल्या कराराची रूपरेषा कळविणारे ट्रॉट्स्कीचे पत्र त्याला मिळाले तेव्हाच, म्हणजे अटक होण्यापूर्वी, ट्रॉट्स्कीचे नेतृत्व व त्याचा पक्ष झुगारून देऊन त्याचे संपूर्ण कारस्थान उघडे करून सांगण्याचे त्याने ठरविले होते व ते कसे करायचे याबद्दल बरेच दिवस त्याच्या मनाची घालमेल सुरू होती असे त्याने सांगितले. त्यावर बिशिन्स्कीने त्याला विचारले—मग तुम्ही काय ठरविले?

रादेक : पहिली गोष्ट म्हणजे पक्षाच्या केंद्रीय समितीकडे जाऊन सर्वांची नावे सांगून निवेदन करायला हवे होते.पण मी तसे केले नाही. मी ओ.जी.पी.यू.कडे जाण्यापूर्वी ओ.जी.पी.यू.च माझ्याकरता आले.

विशिन्स्की : मोठे मार्मिक उत्तर आहे तुमचे!

रादेक : मार्मिक नव्हे दुर्दैवी!

अनुक्रमणिका

शंकाकुशंकांनी मनाची कुतरओढ होत असलेले, व एकीकडे सोविएत राजवटीबद्दल विश्वास तर दुसरीकडे क्रांतिकाळापासून ज्या गटाचा तो सदस्य होता त्या डाव्या विरोधी गटाबद्दल निष्ठा अशा कात्रीत सापडलेले एक दुभंगलेले व्यक्तीमत्व, असे स्वतःचे चित्र रादेकने रंगविले. परकीय राष्ट्रांच्या शत्रुत्वापुढे सोविएत सरकार टिकाव धरू शकणार नाही याची त्याला खात्री होती, मात्र पहिल्या पंचवार्षिक योजनेविरुद्ध लढा देण्याबाबत त्याचे ट्रॉट्स्कीवाद्यांशी मतभेद होते, व परकीय हेरखात्याशी ट्रॉट्स्कीने प्रस्थापित केलेले संबंध व अल्फ्रेड रोझेनबर्ग व रुडॉल्फ हेस यांच्याशी त्याने केलेल्या वाटाघाटी याबद्दल त्याला कळले ते तो करार होऊन गेल्यानंतर, असे तो म्हणाला. एकंदर कारस्थानाबद्दल माहिती व गुन्ह्याची कबुली त्याने का दिली याबद्दल त्यांने सांगितले—'दोन अडीच महिने मी तपासणी अधिकाऱ्यांना चांगलेच त्रस्त करून सोडले. चौकशी चालू असता सोविएत अधिकाऱ्यांनी आमचा छळवाद केला की काय असा प्रश्न येथे उपस्थित केला गेला आहे. याबाबत एक गोष्ट मी करू इच्छितो ती ही की छळवाद झालाच असेल तर तो माझा नव्हे तर तपासणी अधिकाऱ्यांचा. खोटे नाटे सांगून बरीच निरर्थक शोधाशोध करण्यास मी त्यांना भाग पाडले. आमच्यापैकी कोणी कोणी गुन्हा कबूल केला, त्यांनी काय कबूल केले हे जाणून घेण्याच्या हेतूने उलट सुलट उत्तरे देऊन तपासणी अधिकाऱ्यांकडून माहिती काढून घेण्याचा मी प्रयत्न केला. शेवटी एक दिवस प्रमुख चौकशी अधिकारी माझ्याकडे आला व मला म्हणाला, की 'सर्व आरोपींपैकी कबुलीजबाब न दिलेला आता एकटा तूच उरला आहेस. आता तू कशाची वाट पाहात आहेस? जे तुला सांगायचे असेल ते सांगून का टाकीत नाहीस?' हे जेव्हा मला कळले तेव्हा दुसरेच दिवशी कबुलीजबाब देण्याचे मी मान्य केले.'

३० जानेवारी १९३७ रोजी न्यायाधीशांनी त्यांचा निकाल जाहीर केला. सर्व आरोपी हे जर्मन व जपानी फासिस्टांचे हस्तक असून, हेरगिरी व घातपाती कृत्ये करून व रशियाचा प्रदेश बळकाविण्याबाबत परकीय राष्ट्रांना मदत करण्याची योजना आखून त्यांनी राष्ट्रद्रोह केल्याचे सिद्ध झाले असल्याचे घोषित करण्यात आले. प्यातकोव, मुरालोव, शेस्तोव व अन्य १० आरोपी यांना मृत्युदंडाच्या तर रादेक, सोकोल्निकोव व इतर दोन हस्तक यांना दीर्घ मुदतीच्या कारावासाच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या.

खटल्याची सुनावणी संपल्यानंतर केलेल्या समारोपाच्या भाषणात २८ जानेवारी १९३७ रोजी सोविएत अभियोगी विशिन्स्की म्हणाला,—

'ट्रॉट्स्की व प्यातकोव यांच्या मार्गदर्शनाखाली परकीयांशी हातमिळवणी करून ज्या उद्दिष्टांनी या मंडळींनी घातपाती व दहशतवादी कृत्ये केली, ती उद्दिष्टे साध्य झाली असती तर केवळ आपल्याच नव्हे तर आपल्याबरोबर आज शांततेकरिता धडपडणाऱ्या इतरही राष्ट्रांच्या हितसंबंधावर अत्यंत विघातक परिणाम झाला असता. जागतिक शांतता टिकावी असे ज्या राष्ट्रांना वाटते त्या राष्ट्रांच्या सरकारांनी त्यांच्या राष्ट्रांत फासिस्ट गट घडवून आणीत असलेल्या घातपाती व दहशतवादी कारवाया हाणून पाडण्याचे सर्वतोपरी प्रयत्न करावेत असे आमचे त्यांना कळकळीचे आवाहन आहे; कारण ती मंडळी आज शांततेला, एवढेच नव्हे तर संपूर्ण मानवतेच्या हितसंबंधाना सुरुंग लावीत आहेत.'

अनुक्रमणिका

विशिन्स्कीच्या या आवाहनाला रशियाबाहेर मुळीच प्रसिद्धी मिळाली नाही. काही प्रागतिक विचारसरणीचे मुत्सद्दी व वृत्तपत्रकार मात्र त्याच्या शब्दांचे महत्त्व जाणून होते.

मास्को येथील अमेरिकेचा राजदूत जोसेफ ई.डेविस हा या खटल्यामुळे चांगलाच प्रभावित झाला. खटला चालू असता तो दररोज न्यायालयात हजर असे. दुभाष्याच्या मदतीने सर्व साक्षीपुरावे त्याने काळजीपूर्वक समजून घेतले. डेविस स्वतः एक वकील होता. त्याने विशिन्स्कीबाबत केलेले भाष्य लक्षणीय आहे. एक क्रूर राक्षसी तपासनीस असे जे विशिन्स्कीचे वर्णन आज सोविएतविरोधी प्रचारक सर्वत्र करीत आहेत ते पूर्णपणे असत्य असून होमर फ्युमिंग्जप्रमाणे विशिन्स्की हा मोठा शांत, संयमी, निःपक्षपाती, बुद्धिवान व कार्यक्षम वकील असल्याचे त्याच्या प्रत्ययाला आले; राष्ट्रद्रोहाचे ते खटले चालविण्याच्या त्याच्या पद्धतीबद्दल एक वकील म्हणून त्याच्याबद्दल डेविसला केवळ कौतुकच नव्हे तर आदरही वाटला असे त्याने नमूद केले आहे.

२७ फेब्रुवारी १९३७ रोजी अमेरिकन परराष्ट्र सचिव कॉर्डेल हल याला पाठविलेल्या एका खाजगी खलित्यात राजदूत डेविस याने कळविले की मास्को खटल्यांचे निकाल पूर्णपणे न्याय्य होते असे केवळ त्याचेच नव्हे तर मास्कोमधील अन्य सर्व परकीय मुत्सद्यांचेही मत आहे. त्याने लिहिले—'मी येथे परकीय राजनैतिक सेवेतील सर्वांशी नव्हे, पण बहुतेक सर्व अधिकाऱ्यांशी बोललो. सोविएत सरकार उलथून पाडण्याचा फार गंभीर स्वरूपाचा कट रचण्यात आलेला होता हे या खटल्यावरून निःसंशयपणे सिद्ध झालेले आहे असेच, एक संभाव्य अपवाद वगळता, अन्य सर्वांचे मत पडले.'

परंतु डेविसच्या त्या मताला प्रसिद्धी देण्यात आली नाही. सोविएत रशियातील पंचमस्तंभाबद्दलचे सत्य लपवून ठेवण्यात आले.११ मार्च १९३७ रोजी राजदूत डेविस याने त्याच्या मास्को रोजनिशीत केलेली नोंद त्या दृष्टीने मोठी सूचक आहे. तो लिहितो -'दुसरा एक मत्सुदी XXX याने तर काल माझ्याजवळ एक मोठे उद्‌बोधक विधान केले. मास्को खटल्याबद्दल चर्चा चालू असता तो म्हणाला की 'हे सर्व आरोपी गुन्हेगार आहेत याबद्दल तिळमात्रही शंका नाही; खटल्याचे वेळी न्यायालयात हजर असलेल्या आपल्या सर्वांचेच त्याबद्दल एकमत आहे. परंतु सोविएत संघाबाहेर मात्र, तो सर्व प्रकार म्हणजे एक फार मोठा बनाव होता—देखावा होता असेच सर्वांना वाटते असे वृत्तपत्रातील बातम्यांवरून वाटते. अर्थात् ते सर्व खटले म्हणजे बनाव नाही हे त्याला स्वतःला चांगले ठाऊक असले तरी बाहेरच्या जगाला तसे वाटावे हेच योग्य आहे असेही तो पुढे म्हणाला.' [युरोप व अमेरिकेतील ट्रॉट्स्की अनुयायांनी, मास्को खटले ही स्टालिनच्या ट्रॉट्स्कीद्वेषाची, त्याच्या 'पौर्वात्य' सूडबुद्धीची परिणती आहे असा अपप्रचार त्यांच्या अनेक निवेदनांतून, पत्रकांतून, लेखांतून अविरतपणे चालविला. अनेक सुप्रसिद्ध वृत्तपत्रांत व नियतकालिकांत त्यांची पोच होती. अमेरिकेत फॉरिन अफेअर्स क्वॉर्टर्ली, रीडर्स डायजेस्ट, सॅटर्डे इव्हिनिंग पोस्ट, अमेरिकन मर्क्युरी, न्यूयॉर्क टाईम्स अशा अनेक वृत्तपत्रांतून व नियतकालिकांतून त्यांचे लेख व निवेदने प्रसिद्ध झाली. अनेक ट्रॉट्स्की—मित्रांचे या खटल्यावरील भाष्य रेडिओवरूनही प्रसृत झाले. अशा मंडळीपैकी प्रमुख होता तो पूर्वीचा ट्रॉट्स्कीचा अमेरिकन प्रतिनिधी व अधिकृत अनुवादक मॅक्स ईस्टमन. तसेच, एके काळी सोविएत परराष्ट्र मंत्रालयात असलेला व आता फितूर झालेला अलेक्झांडर बर्माईन, अमेरिकन लष्कराविरुद्ध राष्ट्रद्रोही कटकारस्थान केल्याच्या गुन्ह्याकरिता १९४१ मध्ये फेडरल कोर्टाने ज्याला शिक्षा दिली तो ट्रॉट्स्कीचा वकील अलबर्ट गोल्डमन; सुप्रसिद्ध सोविएत विरोधी प्रचारक व हीअर्स्ट प्रेसमध्ये लेखन करणारा आयझॅक डॉन लेवीन अशा अनेक लेखकांनी व पत्रकारांनी या खटल्याच्या संदर्भात सोविएत संघाविरुद्ध नानाप्रकारे अपप्रचार व टीका यांची झोड उठवून दिली. 'द मॅनेजेरियल रिव्होल्यूशन'चा लेखक, सुप्रसिद्ध ट्रॉट्स्कीवादी जेम्स बर्नहॅम

अनुक्रमणिका

याने तर 'मास्को खटले म्हणजे ॲक्सिस सत्तांविरुद्ध फ्रान्स, ग्रेट ब्रिटन व अमेरिका यांची सहानुभूती मिळवून घेण्याचा स्टालिनने केलेला अत्यंत निंद्य व असमर्थनीय प्रयत्न 'असे भाष्य त्या खटल्याबाबत केले.१५ एप्रिल १९३७ रोजी प्यातकोव–रादेक खटल्यावर लिहिलेल्या एका पत्रकाच्या प्रस्तावनेत बर्नहॅमने लिहिले–'हे खटले म्हणजे येत्या युद्धाकरिता स्टालिनवादाने चालविलेल्या तयारीचा एक महत्वाचा भाग होय.फ्रान्स, ग्रेट ब्रिटन व अमेरिका या राष्ट्रातील जनतेची सहानुभूती मिळवून घ्यावी, जर्मनी व जपान या राष्ट्रांकडून सोविएत संघावर होणाऱ्या हल्ल्याचे वेळी (ती राष्ट्रे सोविएत संघावर हल्ला करणार याबाबत त्याला खात्रीच आहे) त्या जनतेच्या पाठिंब्याचा फायदा मिळवून घ्यावा हा स्टालिनचा मुख्य उद्देश आहे.]

## मे महिन्यातील कार्यवाही

प्यातकोव–रादेक यांविरुद्धच्या खटल्याचा निकाल लागला म्हणून संपूर्ण कटकारस्थान चिरडले गेले असे मात्र नाही. प्यातकोवप्रमाणेच रादेकचे निवेदनही वरवर पाहता मोकळेपणाचे व पूर्ण माहिती देणारे वाटले तरी त्याने पुष्कळच महत्वाची माहिती दिलेली नव्हती. मात्र खटल्याची सुनावणी सुरू झाल्यानंतर दुसरेच दिवशी त्याच्या चवचाल जिभेने त्याला दगा दिला होता. विशिन्स्कीच्या आडव्यातिडव्या प्रश्नांना उत्तरे देतादेता अनवधानाने तुखाचेवस्कीचे नाव त्याच्या तोंडून निघून गेले होते. 'वित्ले पुतना तुखाचेवस्कीचा एक निरोप घेऊन माझ्याकडे आला होता' असे शब्द अजाणता त्याच्या बोलण्यात आले.

दुसरे दिवशी आदल्या सत्रातील रादेकची जबानी विशिन्स्कीने वाचून दाखविली व तुखाचेवस्कीचे नाव त्याने कोणत्या संदर्भात घेतले असे त्याने रादेकला विचारले. विशिन्स्कीच्या या प्रश्नावर क्षणभर न्यायालयात स्तब्धता पसरली. नंतर, कोणत्याही प्रकारे मनाची चलबिचल न दर्शविता रादेकने अगदी सहजपणे सांगावे तसे सांगितले की इझवेस्तिया कार्यालयात असलेली काही माहिती सरकारी कामाकरिता तुखाचेवस्कीला हवी होती, त्याकरिता त्याने पुतनाला रादेककडे पाठविले होते एवढेच! तो पुढे म्हणाला– 'अर्थात् तुखाचेवस्कीला माझ्या राजकीय भूमिकेबद्दल काहीच कल्पना नव्हती. पक्ष व सरकार यांच्याप्रती तुखाचेवस्कीची निष्ठा संशयातीत व अभंग आहे ह्याची मला पूर्ण खात्री आहे.'

यानंतर त्या खटल्याच्या सुनावणीच्या काळात तुखाचेवस्कीच्या नावाचा' पुन्हा उल्लेखही रादेकने केला नाही. पण तरीही कारस्थानी नेत्यांच्या मनातील अस्वस्थता चांगलीच वृद्धिंगत झाली व उठाव करण्यात आता दिरंगाई करणे म्हणजे आत्मघात करून घेण्यासारखे आहे असे त्यांना खात्रीपूर्वक वाटू लागले. क्रेस्टिन्स्की, रोझेनगोल्टझ्, तुखाचेवस्की व गामर्निक यांनी घाईघाईने विचार–विनिमयाकरिता बैठकी घेतल्या. उठावाची योजना कार्यान्वित करण्याच्या हेतूने लष्करी गटाच्या अधिकाऱ्यांना निरनिराळी कामे तुखाचेवस्की सोपवून देऊ लागला.

मार्च १९३७ अखेरीपर्यंत लष्करी गटाने उठावाची सिद्धता जवळजवळ पूर्ण केली. सहा आठवड्याच्या आत लष्करी गट उठावाकरिता तयार असेल असे तुखाचेवस्कीने मास्को येथे रोझेनगोल्टझ् च्या घरी त्यांच्या झालेल्या बैठकीत क्रेस्टिन्स्की व रोझेनगोल्टझ् यांना सांगितले. मे महिन्याच्या प्रारंभीचा, किंवा निदान १५ मे पूर्वीचा एखादा दिवस उठावाकरिता निश्चित करण्याचे ठरले. सत्ता हस्तगत करण्याच्या निरनिराळ्या मार्गांबद्दल त्यांच्यात चर्चा झाली. लष्करी गटातील काही अधिकाऱ्यांनी व सैनिकांनी

अनुक्रमणिका

काहीतरी कामकाजाच्या निमित्ताने क्रेमलिनमध्ये शिरून तेथील टेलिफोन एक्सचेंज ताब्यात घेऊन बोल्शेविक पक्ष व सोविएत सरकार यांच्या नेत्यांची सरसकट हत्या करावयाची, याच वेळी गामर्निक व त्याच्या सहकाऱ्यांनी गृहमंत्रालयाची इमारत ताब्यात घ्यावी अशी योजना तुखाचेवस्कीने आखली होती. हा धाडसी बेत यशस्वी होण्याजोगा आहे असेच क्रेस्टिन्स्की व रोझेनगोल्ट्झ् यांचेही मत पडले.

रोझेनगोल्ट्झ्च्या घरी झालेल्या त्या बैठकीनंतर त्या कारस्थानी नेत्यांच्या मनात पुन्हा आशेची ज्योत प्रज्ज्वलित झाली. तुखाचेवस्कीची ती योजना फलदायी ठरण्याची पुष्कळच शक्यता होती असे त्यांना वाटत होते. ज्या क्षणाची वर्षानुवर्षे त्यांनी वाट पाहिली होती व ज्याकरिता ते अहोरात्र खपले होते तो उद्दिष्टपूर्तीचा क्षण आता नजीक येऊन ठेपला होता.

उठावाची अखेरची सिद्धता करता करता एप्रिल महिना उलटला. कोणकोणत्या नेत्यांना अटक करावयाची व त्यांच्या जागी कोणकोणाला नेमावयाचे याची भली मोठी यादी क्रेस्टिन्स्की तयार करू लागला. गामर्निकच्या नेतृत्वाखाली मारेकऱ्यांनी मोलोतोव व वोरोशिलोव यांना ठार करावे, व परराष्ट्र व्यापार मंत्री म्हणून रोझेनगोल्ट्झने स्टालिनची भेट मागावी व त्याच्या कार्यालयात शिरून त्याला मारावे असे ठरले. . . .

तेवढ्यात, मे १९३७ च्या दुसऱ्या आठवड्यात, विद्युत्वेगाने सोविएत सरकारने त्या कारस्थानी नेत्यांवर घाला घातला. ११ मे रोजी सहाय्यक युद्धमंत्र्याच्या पदावरून तुखाचेवस्कीला दूर करून वोल्गा जिल्ह्यात एका कनिष्ठ पदावर त्याची रवानगी करण्यात आली. त्याचवेळी जनरल गामर्निक व त्यांचे दोन सहकारी याकिर व उबोरविच यांचीही त्यांच्या पदावरून हकालपट्टी करण्यात आली, तर त्यांचे इतर दोन मदतनीस जनरल कोर्क व जनरल एदेमन यांना नाझी जर्मनीशी गुप्तपणे संबंध ठेवण्याच्या आरोपावरून अटक करण्यात आली.

हे होताच, आता आपल्यालाही अटक होणार हे क्रेस्टिन्स्कीला कळून चुकले. क्रस्टिन्स्कीने नंतर सांगितले, 'मी सर्व गोष्टींची रोझेनगोल्टझ्शी चर्चा केली. त्याला अटक होण्याची शक्यता फारशी नव्हती. त्यामुळे ट्रॉट्स्कीशी संपर्क राखण्याची जबाबदारी त्याने स्वतःकडे घेतली. थोडेच दिवसात मला अटक झाली.'

बुखारिन, रिकोव व टॉम्स्की यांच्यावरही सरकारची बारिक नजर होतीच. पुरेसा पुरावा हाती येताच राष्ट्रद्रोहाच्या आरोपावरून बुखारिन व रिकोव यांना पकडण्यात आले; तर अटक होणार हे कळताच टॉम्स्कीने आत्महत्या करून घेतली. त्याच्याच पावलावर पाऊल ठेऊन ३१ मे रोजी जनरल गामर्निक यानेही स्वतःवर गोळी झाडून घेतली. त्यापाठोपाठ तुखाचेवस्की, रोझेनगोल्ट्झ् व लष्करातील काही उच्च पदस्थ अधिकारी यांनाही अटक झाली. संपूर्ण देशभर संशयित पंचमस्तंभीयांची धरपकड सुरू झाली.

अनुक्रमणिका

११ जून १९३७ रोजी मार्शल एम्.एन्.तुखाचेवस्की व लाल लष्कराचे इतर सात सेनापती यांना सोविएत सर्वोच्च न्यायालयाच्या खास लष्करी न्यायालयासमोर उभे करण्यात आले. ती लष्करी चौकशी असल्याने तो खटला बंद दाराआड गुप्तपणे चालविण्यात आला. सोविएत संघाविरुद्ध शत्रुराष्ट्रांशी हातमिळवणी करून सरकार उलथून पाडण्याकरिता कट केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला. त्या लष्करी न्यायालयात मार्शल वोरोशिलोव, बुद्येनी, शोपोश्निकोव व लाल लष्करातील काही उच्च पदस्थ अधिकारी यांच्यासमोर आरोपी म्हणून, जनरल तुखाचेवस्की, लंडन, टोकियो व बर्लिन येथील माजी मिलिटरी ॲटची जनरल व्ही. आय्. पुतना, लेनिनग्राड लष्करी शिबंदीचा पूर्वीचा सेनापती जनरल आय्. ई. याकिर, बायलोरशियातील लाल लष्कराचा पूर्वीचा सेनापती जनरल पी. उबोरविच, लष्करी संरक्षण संघटनेचा माजी प्रमुख जनरल ए.पी.एदेमन, फ्रुन्झ लष्करी प्रशिक्षण केंद्राचा माजी प्रमुख जनरल ए. आय् .कोर्क, लष्करी अधिकाऱ्यांच्या खाजगी विभागाचा माजी प्रमुख जनरल बी. एम्. फेल्डमन, खार्कोव लष्करी शिबंदीचा माजी सेनापती व्ही.एम्. प्रायमाकोव हे लष्करी अधिकारी उभे होते.

सरकारी विज्ञप्तीत म्हटले होते—'सोविएत संघाच्या शत्रुराष्ट्रांच्या प्रमुख लष्करी अधिकाऱ्यांशी सोविएत राष्ट्राच्या हितसंबंधाना विघातक ठरतील अशा स्वरूपाचे बेकायदेशीर व राष्ट्रद्रोही संबंध जनरल जान गामर्निक यांसह सर्व आरोपी राखून होते हे चौकशी अंती सिद्ध झाले आहे. लाल लष्कराबद्दलच्या गुप्त बातम्या शत्रुराष्ट्रांच्या लष्करी अधिकाऱ्यांना या आरोपींनी पद्धतशीरपणे पुरविल्या व सोविएत संघावर शत्रुराष्ट्राचा हल्ला होताच लाल लष्कराचा पराभव निश्चितपणे व्हावा या हेतूने त्यांनी घातपाती कारवाया केल्या.'

१२ जून रोजी लष्करी न्यायालयाने आपला निकाल दिला. आरोपीवरील राष्ट्रद्रोहाचा गुन्हा सिद्ध झाल्याने त्यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली. लाल लष्कराच्या गोळीबार पथकाकडून चोवीस तासांच्या आत त्या शिक्षेची अंमलबजावणी झाली.

त्याबरोबर, संपूर्ण जगात सोविएतविरोधी बातम्या व बेफाम प्रचार यांचे पीक फोफावले. 'संपूर्ण लाल लष्कर सोविएत सरकारविरुद्ध उठाव करण्याच्या इर्षेने खदखदत आहे,' 'वोरोशिलोव याच्या नेतृत्वाखाली स्टालिनविरोधी सैन्य मास्कोवर चाल करून जात आहे' 'संपूर्ण रशियात सामूहिक कत्तली सुरू आहेत,' 'लाल लष्कराचे सर्वात कार्यक्षम व अनुभवी सेनापती नाहीसे झाल्याने ते आता अगदी दुबळे झाले असून आंतर्राष्ट्रीय राजकारणात आता त्याचे महत्व उरले नाही' अशा बातम्या सर्वत्र प्रसृत होत होत्या.

सोविएत संघातील या घडामोडींमुळे अनेक प्रामाणिक निरीक्षकही विचलित झाले. त्या पंचमस्तभीयांचे तंत्र कारवाया यांबद्दल बाहेरच्या जगाला तोपर्यंत फारशी माहिती नव्हती. ४ जुलै १९३७ रोजी मास्कोत अमेरिकन राजदूत जोसेफ ई. डेविस याने सोविएत परराष्ट्र मंत्री मॅक्झिम लिटविनोव याची मुलाखत घेतली. तुखाचेवस्की व अन्य लष्करी अधिकारी यांना देण्यात आलेले देहांत शासन व ट्रॉट्स्कीवाद्यांविरुद्धचे खटले यांची युरोप व अमेरिकेत झालेली प्रतिक्रिया सोविएत संघाला अत्यंत

अनुक्रमणिका

प्रतिकूल ठरणारी आहे असे त्याने स्पष्टपणे लिटविनोवला सांगितले. सोविएत रशिया आता हिटलरला तोंड देऊ शकेल असा विश्वास इंग्लंड व फ्रान्स यांना उरलेला नाही असेही त्याने लिटविनोवला सांगितले.

लिटविनोवनेही डेविसला तितक्याच स्पष्टपणे उत्तर दिले. तो म्हणाला, युद्ध अटळ आहे हे तर दिसतेच आहे त्या दृष्टीने, सोविएत संघातील राष्ट्रद्रोही व पंचमस्तंभी मंडळी युद्धकाळात शत्रूराष्ट्रांशी हातमिळवणी करणार नाहीत याची खात्री करून घेणे सोविएत सरकारला भाग होते. राष्ट्रद्रोहाच्या भयानक संकटापासून आमच्या सरकारचे रक्षण करण्याकरिता म्हणून आम्ही हे सर्व केले; एवढेच नव्हे तर हिटलर व नाझी जर्मनीच्या संपूर्ण जगावर प्रभुत्व प्रस्थापित करण्याच्या महत्त्वाकांक्षेविरुद्ध स्वतःचे संरक्षण करून, नाझी जर्मनीविरुद्ध सोविएत संघाचा बालेकिल्ला मजबूत करून आम्ही वस्तुतः सर्व जगाला एक प्रकारे उपकृत करीत आहोत हे आज ना उद्या जगाला नक्कीच कळेल.'

सोविएत संघातील एकंदर परिस्थितीबाबत स्वतः बारीक चौकशी केल्यानंतर २८ जुलै १९३७ रोजी राजदूत डेविसने अत्यंत गोपनीय स्वरूपाचा 'खलिता क्रमांक ४५७' अमेरिकन परराष्ट्र सचिव कॉर्डेल हल याला पाठविला. सोविएत संघातील एकंदर घडामोडींचा आढावा त्याने त्यात घेतला, व तेथील सामान्य जनतेत फार मोठा असंतोष दाटलेला असून सोविएत सरकारचे पतन लवकरच होणार असल्याच्या सर्व वदंता पूर्णपणे निराधार असल्याचे त्याने स्पष्ट केले; व कोसॅक क्रेमलिन समोर छावणी ठोकून आहेत किंवा लाल चौकाचा जणू त्यांनी ताबा घेतला आहे अशा ज्या बातम्या वृत्तपत्रांतून पाश्चिमात्य राष्ट्रांत प्रसृत होत आहेत तसे कोणतेही लक्षण येथे दिसत नाही असे त्यांनी कळविले. तुखाचेवस्की खटल्याच्या संदर्भात त्याने लिहिले 'की आणखी काही हत्या झाल्या किंवा युद्ध झाले तर काय होईल हे नक्की सांगणे कठीण आहे; परंतु सध्या, व पुढेही, येथील सरकार व राजवट यांची स्थिती चांगली भक्कम व मजबूत राहणार असे स्पष्ट दिसत आहे. लष्करी उठावाचे संकट पूर्णपणे नाहीसे झालेले आहे.'

## अखेर

मास्कोच्या त्या सुप्रसिद्ध खटल्यांपैकी अखेरचा खटला सोविएत रशियाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या लष्करी शाखेसमोर २ मार्च रोजी सुरू झाला. सकाळ, दुपार, संध्याकाळ अशा तीनही वेळा बंद दाराआड खटल्याची सुनावणी सुरू होती. खटल्याचे कामकाज ७ दिवस चालले होते.

या खटल्यात आरोपी म्हणून एकूण २१ लोक उभे होते. ओ.जी.पी.यू.चा माजी अध्यक्ष यगोदा व त्याचा सचिव पावेल बुलानोव, निकोलाय बुखारिन व अलेक्सी रिकोव हे उजवे नेते, निकोलाय क्रेस्टिन्स्की व आर्कडी रोझेनगोल्ट्झ् हे ट्रॉट्स्कीवादी जर्मन हस्तक, ख्रिश्चन रोकोवस्की हा ट्रॉट्स्कीवादी जपानी हस्तक, मिखाईल चेर्नेव व ग्रेगोरी ग्रिन्को व अन्य उजवे जर्मन हस्तक, वासिली शारंगोविच हा पोलिस हस्तक या सर्वांचा, शिवाय सर्जी बेसनोव, डॉक्टर लेविन व काझाकोव यांचाही त्यात समावेश होता.

अमेरिकन वार्ताहार वॉल्टर दुरान्टी याने आपल्या 'द क्रेमलिन अँड द पीपल्' या पुस्तकात या खटल्याबाबत लिहिले—हा खटला म्हणजे सर्व खटल्याचा अंत करणारा खटला होता; कारण त्यात गुंतलेले सर्व प्रश्न स्पष्टच होते. देशातील व देशाबाहेरील शत्रूंची खरी ओळख पटलेली असल्याने अभियोगींनी सर्व घटना व साक्षीपुरावे यांची मांडणी स्पष्टपणे व तर्कशुद्धपणे केली होती. पूर्वीची साशंकता किंवा अनिश्चिती पार नाहीशी झाली होती. लष्करी अधिकाऱ्यांविरुद्धच्या खटल्यांमुळे किरोव हत्येच्या वेळेचे धूसर व अपूर्ण राहिलेले चित्र आता स्पष्ट व तर्कसंगत झाले होते.

खटल्याची मांडणी सोविएत सरकारने अत्यंत काळजी पूर्वक केली होती. त्यापूर्वी अनेक महिने कसोशीने व बारकाईने चौकशी करून पुरावा गोळा केला होता. तत्पूर्वीचा खटल्यांतील साक्षीपुरावे व उलटतपासणी यातून बाहेर पडलेली माहिती या सर्व गोष्टी आरोपपत्रे तयार करताना विचारात घेतल्या गेल्या होत्या. अटक करण्यात आलेल्या त्या राष्ट्रद्रोही व्यक्तींवर पुढीलप्रमाणे आरोप ठेवण्यात आले होते—

१) सोविएत संघाच्या शत्रुराष्ट्रांच्या मार्गदर्शनानुसार १९३२—३३ मध्ये 'उजवे-ट्रॉट्स्कीवादी कारस्थानी गट आरोपींनी प्रस्थापित केला. त्या परकीय राष्ट्रांकरिता हेरगिरी करणे, घातपाती व दहशतवादी कृत्ये करणे, सोविएत लष्करी सामर्थ्य खच्ची करणे, आणि सोविएत संघावर शत्रूराष्ट्रांनी हल्ला करावा व त्यात सोविएत संघाचा पराभव होऊन राष्ट्राचे विघटन व्हावे अशी व्यवस्था करणे ही त्या गटाची प्रमुख उद्दिष्टे होती.

२) त्यांच्या त्या गुन्हेगारी उद्दिष्टांच्या पूर्तीकरिता परकीय लष्करी मदत मिळवून घेण्याच्या हेतूने उजवे व ट्रॉट्स्कीवादी गटाने काही परकीय राष्ट्रांशी हात मिळवणी करून त्यांच्याशी संबंध प्रस्थापित केले.

३) त्या राष्ट्रांच्या वतीने त्या गटाने पद्धतशीरपणे हेरगिरीची कामे करून त्यांना अत्यंत महत्त्वाची गोपनीय माहिती पुरवली.

४) उद्योग, कृषी, रेल्वे, वित्त, विकास अशा समाजवादी स्वरूपाच्या निरनिराळ्या विधायक क्षेत्रात या गटाने विघातक व घातपाती कृत्ये केली.

५) सोविएत सरकारच्या व पक्षाच्या नेत्यांविरुद्ध अनेक दहशतवादी कृत्ये या गटाने केली. त्यात एस्. एम्. किरोव, वी आर. मेन्झिन्स्की, व्ही. बी. क्युविशेव व ए. एम्.गॉर्की यांच्या त्या गटाने केलेल्या हत्या प्रमुख होत.

उजवे व ट्रॉट्स्कीवादी गटाविरुद्धच्या या खटल्याचे वेळी इतिहासात प्रथमच ॲक्सिस पंचमस्तंभीयांची कार्यपद्धती तपशीलासह उघडकीस आली. उद्दिष्ट साध्य करण्याकरिता, उच्च स्तरातील लोकांना प्रचाराच्या, हेरगिरीच्या, दहशतवादाच्या व राष्ट्रद्रोहाच्या जाळ्यात ओढणे, देशाच्या अंतर्गत क्षेत्रात विरोधकांचे एक सैन्यच तयार करून त्याच्या द्वारा त्या सरकारवर आघात करणे, व अशा प्रकारे त्या

अनुक्रमणिका

सरकारला शक्यतो जास्त दुबळे करून नाझींच्या प्रभुत्वाकरिता परिस्थिती अनुकूल करणे, अशा सर्व गैरमार्गांचा अवलंब नाझींनी स्पेन, ऑस्ट्रिया, झेकोस्लोवाकिया, नॉर्वे, बेल्जियम, फ्रान्स इत्यादी राष्ट्रांत यशस्वीपणे केला होता. तेच तंत्र उजवे व ट्रॉट्स्कीवादी गटाला हाताशी धरून सोविएत रशियातही वापरले गेले हे या खटल्याचे वेळी पूर्णपणे स्पष्ट झाले. ११ मार्च १९३८ रोजी आपल्या समारोपाच्या भाषणात विशिन्स्की म्हणाला त्याप्रमाणे, यगोदा, बुखारिन, रिकोव, बुलानोव, क्रेस्टिन्स्की, रोझेनगोल्ट्स् हे सर्व पंचमस्तंभीय म्हणजे त्या तंत्राकरिता वापरली गेलेली शस्त्रे होती.

अमेरिकन राजदूत डेविस खटल्याच्या सुनावणीचे वेळी दररोज न्यायालयात हजर असे. कायदा, मानवता, व राजकीय नाट्य या सर्वच दृष्टींनी त्या खटल्यात उघडकीस आलेल्या गोष्टी त्याला फार भयानक वाटल्या. ८ मार्च १९३८ रोजी त्याच्या मुलीला पाठविलेल्या पत्रात त्याने लिहिले,—'मानवी स्वभावातील सगळा मूलभूत कमकुवतपणा, दुर्गुण व अत्यंत नीच स्वरूपाची व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा या सर्वांचे अत्यंत गलिच्छ व लाजिरवाणे प्रदर्शन या खटल्यांचे वेळी झाले. हे सरकार उलथून पाडण्याच्या जवळजवळ सिद्धीस गेलेल्या त्यांच्या योजनेची संपूर्ण रूपरेषा, या खटल्यातून स्पष्ट झाली.'

काही आरोपींनी, त्यांनी केलेल्या गुन्ह्यांची जबाबदारी दुसऱ्यांवर ढकलण्याचा, व ते दिशाभूल झालेले पण प्रामाणिक देशभक्त आहेत असे दर्शविण्याचा प्रयत्न करून जीवनदानाची भीक मागितली, तर काहींनी अगदी स्थितप्रज्ञ वृत्तीने, शिक्षेतून सुटका होण्याची अपेक्षाही न दर्शविता, त्यांनी केलेल्या हेरगिरीच्या व घातपाती कृत्यांचा घृणास्पद तपशील स्पष्ट केला.

न्यायालयासमोर केलेल्या आपल्या अखेरच्या निवेदनात, स्वतःला त्या कारस्थानी गटाचा 'सिद्धांतवादी' म्हणवून घेणाऱ्या बुखारिनने सोविएत संघाविरुद्ध शत्रुराष्ट्रांशी हातमिळवणी करून दहशतवादी कृत्ये केलेल्या त्या सर्व राष्ट्रद्रोही जहालांच्या अंतर्मनातील तणाव व संघर्ष (अटक झाल्यानंतर) यांचे मोठे मार्मिक चित्र रंगविले. तो म्हणाला—'खटल्याच्या सुनावणीच्या वेळी दिलेल्या कबुलीजबाबात मी एक गोष्ट अगोदरच स्पष्ट केली आहे ती ही की आमच्या लढ्यामागे काही तर्कशुद्ध विचारसरणी होती, म्हणून आम्ही प्रतिक्रांतीवादी कटवाल्यांनी गुन्हेगारीच्या या गलिच्छ भूमीगत जीवनाचा स्वीकार केला असे नाही तर त्यात प्रमुख भाग होता तो आदर्शांच्या अधःपतनाचा! इतिहासातही अशा अधःपतनाची, ब्रियाँ, मुसोलिनीसारखी काही ठळक उदाहरणे आहेत. आम्हीही अधःपतितच बनलो.

'मला थोडेसे माझ्या पश्चात्तापाबद्दलही सांगायचे आहे. अर्थात् त्यात माझ्याविरुद्ध न्यायालयात पुढे ठेवण्यात आलेला पुरावा याचा फार मोठा भाग आहे. तब्बल तीन महिने एक शब्दही उच्चारण्याचे मी नाकारले. नंतर मात्र कबुलीजबाब देण्यास मी तयार झालो. का? कारण तुरुंगात असताना मी माझ्या संपूर्ण गतायुष्याचे पर्यावलोचन केले; आणि मी स्वतःला विचारू लागलो, की तू मरणार हे तर नक्की! पण तू कशाकरिता मरण पत्करणार आहेस?' उत्तरादाखल माझ्यासमोर उभी राहिली ती एक भयानक पोकळी. . ! पश्चात्ताप न होता अभिमानाने मरणाला सामोरे जावे असे माझ्या जीवनात काहीच नव्हते. आणि मग मी स्वतःला विचारले की समजा काही चमत्कार होऊन तुझे मरण टळले व तू जिवंत राहिलास तर

जगण्यासारखे तुझ्या आयुष्यात काही उरले आहे का? सर्वांपासून दूर गेलेला, जनतेचा शत्रू बनलेला, जीवनात जे काही उदात्त किंवा वांछनीय आहे त्यापासून दुरावलेला असा तू! —हा विचार आला की पुन्हा तेच उत्तर नजरेसमोर येते आणि अशा वेळी न्यायाधीश महोदय, सर्व द्वेष, राग, लोभ, अहंकार सर्व काही गळून पडते . . . माझ्या जीवनात बोलण्याची अशी माझी ही शेवटचीच वेळ असेल. ट्रॉट्स्की व गुन्हेगारी जीवनातील माझे सहकारी हे आमच्या बाजूने सफाई देतील अशी मी आशा करतो. या न्यायालयात माझ्या बचावाकरिता मला काहीही सांगावयाचे नाही. मी फक्त निकालाची वाट पाहत आहे . . .’

सर्व आरोपींचा गुन्हा सिद्ध होऊन १३ मार्च १९३८ रोजी निकाल जाहीर करण्यात आला. २१ आरोपीपैकी प्लेत्नेव, बेसनोव व रोकोवस्की यांना दीर्घ मुदतीच्या कारावासाच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. इतरांना देहान्त शासन देण्यात आले.

तीन वर्षानंतर १९४१ च्या ग्रीष्मात सोविएत संघावर जेव्हा नाझींनी हल्ला केला त्यावेळी, १९३६—३८ मध्ये सोविएत संघातील अमेरिकेचा राजदूत राहिलेल्या डेविसने लिहिले, ‘नाझींच्या त्या आक्रमणाच्या वेळी जर्मन लष्करी अधिकाऱ्यांशी सहकार्य करणारा व अंतर्गत क्षेत्रात सरकारवर हल्ला करणारा पंचमस्तंभ रशियात उरला नव्हता. १९३९ मध्ये हिटलर जेव्हा प्रागमध्ये शिरला त्यावेळी झेकोस्लोवाकियातील हेनलिन संघटनेचा सक्रिय लष्करी पाठिंबा त्याला मिळाला होता. तेच त्याच्या नॉर्वेवरील हल्याचे वेळीही घडले. पण रशियात मात्र सुडेटन हेनलिन्स् किंवा स्लोवाकियन टिसोज् किंवा बेल्जियन डी ग्रेल्स् किंवा नॉर्वेजियन क्विस्लिंग्ज् शिल्लक उरले नव्हते. याचे कारण म्हणजे १९३७—३८ मधील रशियातील राष्ट्रद्रोहाचे व शुद्धीकरणाचे खटले! या खटल्यांच्या वेळी मी स्वतः न्यायालयात उपस्थित होतो. त्यातील साक्षीपुरावे मी स्वतः ऐकले. त्या सर्व साक्षीपुराव्यांचे व त्यावरील माझ्या त्यावेळेच्या भाष्याचे पुनःपरीक्षण करता एक गोष्ट प्रामुख्याने माझ्या मनात ठसली ती ही की आज आपल्याला चांगल्या प्रकारे परिचित झालेल्या जर्मन पंचमस्तंभीयांच्या सर्व कारवाया मास्को खटल्यातील पंचमस्तंभीयांच्या कबुलीजबाबातून व साक्षीपुराव्यांतून उघडकीस आल्या होत्या.

‘त्यावेळी हिंसक दयामायाशून्य, व जगाला धक्कादायक वाटलेले ते खटले, शुद्धीकरण व पंचमस्तंभीयाचे निर्मूलन म्हणजे अंतर्गत क्षेत्रातील संभाव्य उठाव व परकीय आक्रमण याविरुद्ध स्टालिन सरकारने स्वतःच्या संरक्षणाकरिता निर्धाराने केलेले प्रयत्न होते. त्या खटल्यांनी राष्ट्रद्रोहाची पाळेमुळे देशातून खणून काढली. सरकारविरोधाच्या सर्व कुशंका व संभाव्यता त्यांमुळे नष्ट झाली. १९४१ मध्ये रशियात पंचमस्तंभ उरला नव्हता. त्यांना गोळ्या घालण्यात आल्या होत्या. त्या शुद्धीकरणाने रशियाची राष्ट्रद्रोहाच्या रोगापासून मुक्तता झाली होती.’

अनुक्रमणिका

प्रकरण २१

# मेक्सिकोत हत्या

मास्को खटल्यांबरोबर रशियातील पंचमस्तंभीयांचा नायनाट झाला खरा. परंतु त्या खटल्यांतील खरा आरोपी मात्र बाहेर, रशियापासून पाच हजार मैल दूर होता.

डिसेंबर १९३६ मध्ये झिनोवीव-कामेनेव खटल्यानंतर व प्यातकोव-रादेक इत्यादींच्या अटकेनंतर ट्रॉट्स्कीला नॉर्वे सोडणे भाग पडले होते. अटलांटिक महासागर ओलांडून तो मेक्सिकोत १३ जानेवारी १९३७ रोजी पोहोचला. तेथे दिआगो रिव्हेरा या एका श्रीमंत कलाकार मित्राच्या घरी तो काही काळ राहिला व नंतर मेक्सिको सिटीच्या कोयोकन या उपनगरातील एका मोठ्या बंगल्यात त्याने आपले नवे कार्यालय थाटले. त्यानंतरच्या काळात सोविएत सरकारच्या घणाघाती आघातांखाली रशियातील पंचमस्तंभीय व त्यांच्या कारस्थानाचे जाळे कोसळून पडत असता असहाय्यपणे ते पाहण्यापलीकडे ट्रॉट्स्की काहीही करू शकला नव्हता.

२६ जानेवारी १९३७ रोजी प्यातकोव व रादेक यांच्या खटल्यासंबंधी आपल्या स्वाक्षरीसह एक निवेदन ट्रॉट्स्कीने अमेरिकेतील हिअर्स्ट प्रेसला पाठविले. त्यातही त्याने स्टालिन हत्येच्या आवश्यकतेवर भर दिला. 'बोल्शेविक पक्षात व राष्ट्रात स्टालिनवर कोणी टिका करू शकेल, किंवा त्याच्याविरुद्ध ब्र ही उच्चारू शकेल अशी परिस्थिती तेथे उरलेली नाही. त्याच्या हत्येशिवाय अन्य कोणत्याही मार्गाने त्याला दूर करणे शक्य नाही' असे त्या खटल्यांतील कबुलीजबाबासंबंधी भाष्य करताना त्याने निवेदनात म्हटले.

अमेरिकेतील ट्रॉट्स्की-अनुयायांनी त्याच्या समर्थनार्थ लिऑं ट्रॉट्स्की अमेरिकन बचाव समिती नावाची एक संस्था न्यूयॉर्क सिटीमध्ये स्थापन केली. त्या समितीच्या सदस्यांच्या यादीत काही सोविएतविरोधी समाजवादी, पत्रकार, शिक्षणतज्ज्ञ यांची नावे होती. प्रारंभी काही उदारमतवादीही त्यात होते. पण सोविएतविरोधी प्रचाराचे एक साधन एवढाच त्या संस्थेचा खरा उद्देश असल्याचे स्पष्ट होताच 'बाल्टिमोर सन'चा सहसंपादक मॉरिट्झ् हॉलग्रेन हा त्यातून बाहेर पडला. २७ जानेवारी रोजी तत्संबंधी केलेल्या जाहीर निवेदनात त्याने म्हटले, 'लिऑं ट्रॉट्स्कीच्या समर्थनार्थ प्रस्थापित झालेली अमेरिकन बचाव समिती म्हणजे सोविएत संघात राजकीय हस्तक्षेप करण्याकरिता ट्रॉट्स्कीवाद्यांच्या हातातील एक हत्यार बनले आहे अशी माझी खात्री झाली आहे. त्यामुळे त्या समितीतून मी माझे नाव मागे घेत आहे'.

ट्रॉट्स्की हा रशियन क्रांतीचा एक हुतात्मा असून मास्को खटले म्हणजे स्टालिनने उभे केलेले एक भयावह नाट्य आहे असे चित्र जगापुढे उभे करण्याकरिता या समितीने तुफानी प्रचार आरंभला. त्या

समितीने पहिले काही काम केले असेल तर ऑगस्ट १९३६ ते जानेवारी १९३७ या काळात मास्को खटल्यांत लिऑं ट्रॉट्स्कीवर करण्यात आलेल्या आरोपांचा खरेपणा पडताळून पाहण्याकरिता एक 'प्रारंभिक चौकशी आयोग' प्रस्थापित केला. वार्धक्याकडे झुकलेला जॉन डेवी, लेखक कार्लटन बील्स, जर्मन राईश्टॅगचा माजी समाजवादी सदस्य ऑटो रूहल, माजी सोविएतविरोधी अमेरिकन पत्रकार बेंजामिन स्टोलबर्ग व सुझाने ला फोलेट ही कट्टर ट्रॉट्स्कीसमर्थक पत्रकार, ही मंडळी त्या आयोगाचे सदस्य होती.

वारेमाप प्रसिद्धी व गाजावाजा केल्यानंतर कोयोकन येथे १० एप्रिल रोजी त्या आयोगाने साक्षीपुरावे ऐकण्यास प्रारंभ केला. साक्षीदार दोनच होते. एक खुद्द लिऑं ट्रॉट्स्की व दुसरा म्हणजे प्रिन्किपो येथे १९३० मध्ये त्याचा अंगरक्षक असलेला त्याचा सचिव जॉन फ्रँकेल. ट्रॉट्स्कीचा कायदेविषयक सल्लागार म्हणून काम करीत होता अमेरिकन वकील अल्बर्ट गोल्डमन. [अमेरिकन लष्कराचे व नौदलाचे नीतिधैर्य खच्ची करण्याचा कट केल्याच्या आरोपावरून मिनिआपोलीसच्या (मिनीसोटा) फेडरल कोर्टाने १ डिसेंबर १९४१ रोजी गोल्डमनला गुन्हेगार ठरविले होते.]

या आयोगाची सुनावणी सतत सात दिवस चालली होती. ट्रॉट्स्कीची साक्ष म्हणजे रशियन क्रांतीत त्याने बजावलेल्या भूमिकेची अतिरेकी बढाई व स्टालिन व रशियन सरकार यांची त्याने केलेली जहरी निंदानालस्ती याशिवाय दुसरे काहीही नव्हते. ट्रॉट्स्कीच्या त्या साक्षीला युरोपात व अमेरिकेतही भरपूर प्रसिद्धी दिली गेली. मास्को खटल्यात पुढे आलेल्या भरीव व संशयातीत पुराव्याकडे चौकशी आयोगाने पूर्ण दुर्लक्ष केले.

या सर्व प्रकारामुळे, आयोगाच्या कार्यपद्धतीबद्दल तीव्र नापसंती व्यक्त करून १७ एप्रिल १९३७ रोजी कार्लटन बील्स याने आयोगाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. तत्संबंधी जाहीर निवेदन करताना तो म्हणाला, 'चौकशी आयोगाचे काम ज्या प्रकाराने चालू आहे त्यावरून एखाद्या सर्वश्रेष्ठ व्यक्तीबद्दल वाटावा तसा आदर व कौतुक आयोग-सदस्यांना ट्रॉट्स्कीबद्दल वाटते हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे प्रामाणिक सत्यशोधनाचे कार्य या आयोगाकडून होईल हे अशक्यच आहे . . . अगदी सुरुवातीलाच मी विचारलेले प्रश्न अयोग्य होते असे मला बजावण्यात आले; आणि उलट तपासणी तर अशा प्रकारे करण्यात आली की त्यातून सत्य बाहेर पडणे तर दूरच, उलट बेफाम निंदानालस्ती व प्रचारकी थाटाचे आरोप करणारी वक्तव्ये करण्याची भरपूर संधी त्यामुळे ट्रॉट्स्कीला मिळाली. त्याचे ते आरोप साधार आहेत किंवा नाहीत याचा विचारही केला गेला नाही. असा हा चौकशीचा देखावा आयोगाने, सामान्य जनतेच्या गळी, तशी त्यांची इच्छा असल्यास जरूर उतरवावा, पण या सर्व पोरकटपणाच्या संदर्भात माझे नाव यापुढे गोवले जावे अशी माझी मात्र मुळीच इच्छा नाही.'

या अमेरिकन समितीच्या पुढाकाराखाली, ट्रॉट्स्कीला अमेरिकेत आणण्याच्या हेतूने अमेरिकेत तुफानी प्रचार मोहीम सुरू करण्यात आली. ट्रॉट्स्कीची पुस्तके, त्याचे लेख, त्याची निवेदने, संपूर्ण अमेरिकेत प्रसृत करण्यात आली; तर मास्को खटल्यांबद्दलचे सत्य मात्र परराष्ट्र खात्याच्या फाईल्समध्ये व मास्को येथील अमेरिकन वार्ताहारांच्या मनात दडून राहिले. वॉल्टर डुरान्टी म्हणाला त्याप्रमाणे, अमेरिकन वाचकांना रशियाबद्दल वाईटाशिवाय दुसरे काही ऐकण्याची इच्छाच नव्हती असेच जणू त्या वार्ताहारांना

अनुक्रमणिका

वाटत होते. [मास्को खटल्यांच्या वेळी त्याच्या एके काळच्या निकटच्या मित्रांनी व सहकाऱ्यांनी जे कबूलीजबाब दिले त्याची निरनिराळ्या वेळी स्पष्टीकरणे ट्रॉट्स्कीने दिली. झिनोवीव व कामेनेव यांनी दिलेल्या कबुलीजबाबाबाबत तो म्हणाला की त्यांनी ट्रॉट्स्कीविरुद्ध सरसकट खोटे आरोप केले तर त्यांना जीवदान दिले जाईल असे अभिवचन सोएिवत सरकारने त्यांना दिले होते व म्हणून त्यांनी त्याच्यावर तसे आरोप केले. झिनोवीव-कामेनेव व त्यांचे कटवाले सहकारी त्यांना गोळ्या घातल्या गेल्या त्यावेळी ट्रॉट्स्की म्हणाला की सुरक्षिततेसंबंधी दिलेली वाचने धाब्यावर बसवून सरकारने त्यांचा विश्वासघात केला. प्यातकोव, रादेक व इतर आरोपी यांनी झिनोवीव-कामेनेव यांपेक्षाही भयानक कबुलीजबाब दिले तेव्हा त्याचे स्पष्टीकरण देताना ट्रॉट्स्की म्हणाला की त्यांचा करण्यात आलेला अमानुष छळ व त्यांना पाजण्यात आलेले 'द्रावण' यामुळे तसे कबुलीजबाब त्यांच्याकडून सोविएत सरकार घेऊ शकले. एखाद्या लेखात त्यांच्याबद्दल लिहिताना, 'स्टालिनने क्रांतीचा विश्वासघात केल्याने त्याचे विरोधक बनलेले हुतात्मे, किंवा स्टालिनच्या द्वेषाला व क्रौर्याला बळी पडलेले उदात, चारित्र्यसंपन्न, प्रामाणिक जुने बोल्शेविक्स, असा त्यांचा उल्लेख तो करी, तर एखादे वेळी, प्यातकोव, रादेक, बुखारिन यांची 'अत्यंत नीच दुबळ्या मनाची, स्टालिनच्या हातातील बाहुली बनलेली मंडळी' अशी संभावना करून त्यांच्याबद्दलच्या त्याच्या संतापाला तो वाट मोकळी करून देई. ते जर गुन्हेगार नव्हते तर त्यांनी तसे कबुलीजबाब का दिले, त्यांच्याविरुद्ध करण्यात आलेल्या खुल्या न्यायालयीन चौकशीचा फायदा घेऊन त्यांनी न्यायालयात आपले निरपराधित्व जाहीर का केले नाही असे १९३७ मध्ये मेक्सिको सुनावणीचा वेळी त्याला विचारले असता 'चौकशीचे स्वरूप लक्षात घेता अशा प्रश्नांना उत्तरे देण्यास मी बांधलेली नाही' असे उत्तर त्याने दिले.]

तुर्कस्थान, फ्रान्स व नॉर्वे या राष्ट्रांप्रमाणे मेक्सिकोतही लवकरच ट्रॉट्स्कीने आपल्याभोवती अनुयायी व सशस्त्र रक्षक गोळा केले. पुन्हा त्याच्याभोवती गूढ कटकारस्थानाचे वातावरण निर्माण झाले. कोयोकन येथील त्याचे निवासस्थान म्हणजे एक जणू किल्लाच होता. त्या मोठ्या बंगल्याच्या चारही बाजूंना २० फूट उंचीची संरक्षक भिंत होती. चार कोपऱ्यांना असलेल्या टॉवर्समध्ये टॉमीगन्स घेतलेले सशस्त्र सैनिक रात्रंदिवस खडा पाहारा देत होते. त्याकरिता मेक्सिकन पोलिसांची एक खास तुकडी नेमून देण्यात आली होती; व त्या तुकडीच्या बरोबरीने ट्रॉट्स्कीचे सशस्त्र अंगरक्षकही ट्रॉट्स्कीच्या त्या मध्यवर्ती कार्यालयासमोर अहोरात्र गस्त घालीत. ट्रॉट्स्कीच्या भेटीस येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला प्रथम आपली ओळख पटवून द्यावी लागे. एका देशाची सीमा ओलांडून दुसऱ्या देशात जाणाऱ्या व्यक्तीची सीमेवर घेतली जाते तशी गुप्त शस्त्रास्त्रांकरिता झडती ट्रॉट्स्कीच्या भेटीस जाणाऱ्या प्रत्येकी व्यक्तीची घेतली जाई. त्यांना देण्यात येणारे प्रवेश परवाने दोनदा तपासले जात.

ट्रॉट्स्कीच्या त्या बंगल्यातील वातावरण तणावपूर्ण गडबडीचे असे. कर्मचाऱ्यांची संख्या बरीच मोठी होती. सोविएतविरोधी प्रचार, ट्रॉट्स्कीची निवेदने, लेख, पुस्तके, खाजगी गुप्त पत्रे या सर्वांचे इंग्लिश, फ्रेंच,स्पॅनिश, जर्मन रशियन अशा निरनिराळ्या भाषांत भाषांतरे करण्यात कार्यक्षम सचिव गुंतलेले असत. प्रिन्किपो, पॅरिस व ओस्लोप्रमाणे कोयोकन येथेही ट्रॉट्स्की-सचिवांच्या कमरेला पिस्तुले लटकलेली असत. संपूर्ण निवासस्थान गूढतेच्या-कटकारस्थानाच्या वातावरणाने भारलेले असे.

संपूर्ण जगातून ट्रॉट्स्कीला येणारी व त्याच्याकडून जाणारी अशी पत्रांची संख्या फार मोठी होती. अनेकदा त्या पत्रांवर रासायनिक प्रक्रिया करणे आवश्यक असे. कारण खरा मतलबाचा मजकूर वरवर साध्या दिसणाऱ्या ओळींत अदृश्य शाईने लिहिलेला असे. युरोप, आशिया व अमेरिका या खंडांशी त्याचा सततचा संपर्क होता. निरनिराळ्या क्षेत्रातील नामवंत नेते, पत्रकार, मुत्सद्दी, वेषांतर करून लपूनछपून येणारी कारस्थानी मंडळी यांचा ओघच त्या सोविएतविरोधी चळवळीच्या नेत्याला भेटण्याकरिता, त्याची मुलाखत घेण्याकरिता त्या बंगल्याकडे वळलेला असे. फ्रेंच, अमेरिकन, इंडियन व चिनी ट्रॉट्स्कीवादी यांची शिष्टमंडळे, तसेच स्पेनच्या पी. ओ. यू. एम्. चे हस्तक ट्रॉट्स्कीकडे येत.

अनुक्रमणिका

एखाद्या सत्ताधीश हुकुमशहाप्रमाणे तो त्यांची भेट घेई. अमेरिकन पत्रकार बेरी कर्क हिने मेक्सिकोतील ट्रॉट्स्कीची काही छायाचित्रे देऊन त्याची मुलाखत 'लाईफ' मासिकात छापली होती. त्यात तिने त्याच्या नाट्यपूर्ण आविर्भावांचे व त्याच्या हुकुमशाही वागणुकीचे वर्णन केले होते. त्याची मुलाखत घेण्यास ती गेली तेव्हाच्या तिच्या अनुभवांचे शब्दांकन तिने केले ते असे . . .

'आम्ही गेलो तेव्हा, तो आम्हाला फक्त आठच मिनिटे वेळ देऊ शकेल असे आपल्या घड्याळ्याकडे बघत एखाद्या अनियंत्रित राज्यकर्त्याच्या ऐटीत त्याने आम्हाला सांगितले. नंतर, तो बोलेल ते त्याचा सचिव लिहून घेत आहे, असे छायाचित्र घेतले जावे याकरिता त्याने त्याच्या सचिवाला तयारीत बसण्यास सांगितले. अपेक्षित तेवढ्या त्वरेने ती फोटोकरिता सज्ज होऊन बसली नाही. म्हणून तो तिच्या अंगावर वसकन ओरडला. त्याचा अमेरिकन सचिव बर्नार्ड वुल्फ यालाही त्याने फोटोकरिता बसण्यास सांगितले. त्याकरिता वुल्फ ठरलेल्या जागेकडे जात असता, हातातील पेन्सिलीने टेबलावर टक्टक् करीत अधीरतेने ट्रॉट्स्की खेकसत होता– 'लवकर आटपा! फालतू वेळ वाया घालवू नका.!'

कोयोकन येथील त्याच्या त्या प्रासादतुल्य बंगल्यातून संपूर्ण जगातील सोविएतविरोधी संघटनेच्या–चौथ्या इंटरनॅशनलच्या कामकाजाचे मार्गदर्शन ट्रॉट्स्की करीत होता. युरोप, आशिया व उत्तर दक्षिण अमेरिका या खंडात चौथ्या इंटरनॅशनलचे व ॲक्सिस पंचमस्तंभीयांचे निकटचे संबंध होते. झेकोस्लोवाकियात, नाझी हस्तक कोनरॅड हेनलिन व त्याचा जर्मन सुडेटन पक्ष यांच्याशी हात मिळवणी करून तेथील ट्रॉट्स्कीवादी कारवाया करीत होते. १९३८ मधील मास्को खटल्यांचे वेळी ट्रॉट्स्कीवाद्यांचा दूत म्हणून काम करणाऱ्या बेसनोवने न्यायालयापुढे सांगितले की १९३५ च्या ग्रीष्मात प्रागमध्ये कोनरॅड हेनलिनशी त्याने संपर्क साधला होता व ट्रॉट्स्की व हेनलिनचा गट यांतील मध्यस्थ म्हणून तो काम करीत होता. फ्रान्समध्ये नाझी हस्तक व फासिस्ट पॉप्युलर पक्षाचा संस्थापक जॅक्विस दोरियत हा मूळ साम्यवादी पक्षातून फुटून निघालेला एक ट्रॉट्स्कीवादी होता. इतर नाझी हस्तक व फ्रेंच फासिस्ट यांप्रमाणे दोरियत हाही ट्रॉट्स्कीच्या चौथ्या इंटरनॅशनलच्या फ्रेंच विभागाशी हातमिळवणी करून काम करीत होता. स्पेनमध्ये पी. ओ. यू. एम्. मध्ये ट्रॉट्स्कीवाद्यांचा भरणा फार मोठ्या प्रमाणावर झाला होता. याच पंचमस्तंभीय संघटनेने फ्रँक्रोच्या फासिस्ट उठावाला मदत केली होती. पी. ओ. यू. एम्. चा प्रमुख आन्द्रिअस नीन हा ट्रॉट्स्कीचा निकटचा मित्र व सहकारी होता. चीनमध्ये जपानी लष्करी हेरखात्याच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली तेथील ट्रॉट्स्कीवादी काम करीत होते. प्रमुख जपानी लष्करी अधिकारी त्या ट्रॉट्स्कीवाद्यांच्या कारवायांचे महत्व चांगले जाणून होते. जपानने चिनी ट्रॉट्स्कीवाद्यांच्या गटाला पाठिंबा द्यावा अशी शिफारस जपानी सरकारला जपानी हेरखात्याच्या प्रमुखाने १९३७ मध्ये केली होती. कारण त्यांच्या मते त्याच्या कारवाया जपानी साम्राज्याच्या हिताला पोषक तर चीनच्या ऐक्याला बाधक ठरणाऱ्या होत्या व विघातक कारवाया करण्याचे त्यांचे कौशल्य कौतुकास्पद होते.

जपानमधील ट्रॉट्स्कीवादी गट म्हणजे जपानच्या गुप्तहेरखात्याचा बुद्धिनिधी मानला जात असे. सोविएत संघाच्या साम्यवादी पक्षात शिरकाव करून घेण्याच्या व चीन व जपान यातील फासिस्टविरोधी

अनुक्रमणिका

कारवायांविरुद्ध लढा देण्याच्या तंत्राबाबत ते ट्रॉट्स्कीवादी जपानी गुप्त हेरांना व हस्तकांना शिक्षण देत असत. स्वीडनमध्ये प्रमुख ट्रॉट्स्कीवादी नील्स हायिग याला नाझींना अनुकूल असलेला भांडवलदार इव्हार क्रेऊगर याच्याकडून पैशाची भरपूर मदत मिळत असे. ट्रॉट्स्कीवादी चळवळीला क्रेऊगरकडून पैसा मिळत होता हे सत्य क्रेऊगरच्या आत्महत्येनंतर त्याच्या कागदपत्रांत, बऱ्याच राजकीय संधीसाधूंच्या (अडॉल्फ हिटलरसह) सापडलेल्या पावत्यांवरून स्पष्ट झाले.संपूर्ण जगात, उदारमतवादी, जहाल गट व कामगार चळवळ यांत स्वतःच्या उद्दिष्टसिद्धीकरिता शिरकाव करून घेण्यासाठी ॲक्सिस हेर ट्रॉट्स्कीवाद्यांचा उपयोग करून घेत होते. [ट्रॉट्स्कीच्या मृत्यूनंतरही फोर्थ इंटरनॅशनल त्यांच्या पंचमस्तंभीय कारवाया चालवीतच राहिले. ग्रेट ब्रिटनमध्ये, ब्रिटनचे युद्धप्रयत्न हाणून पाडण्याच्या हेतूने संपूर्ण राष्ट्रात ट्रॉट्स्कीवादी संप घडवून आणीत असल्याचे कळल्याने एप्रिल १९४४ मध्ये स्कॉटलंड यार्ड व पोलिस अधिकारी यांनी लंडन, ग्लास्गो, वॉलसेंड व नॉटिंगहॅम येथील ट्रॉट्स्कीवादी केंद्रांवर छापे घातले.

अमेरिकेत, अमेरिकन लष्कर व नौदल यांतील शिस्त व निष्ठा यांचा विध्वंस करण्याच्या आरोपावरून १ डिसेंबर १९४१ रोजी १८ अमेरिकन ट्रॉट्स्कीवाद्यांना अटक करण्यात आली. चौकशीनंतर मिनिआपोलिस फेडरल कोर्टाने त्यांना गुन्हेगार घोषित केले. ट्रॉट्स्कीचा वकील अल्बर्ट गोल्डमन, सोशलिस्ट वर्कर्स पार्टीचा (या नावाखाली अमेरिकेतील ट्रॉट्स्कीवादी चळवळ कारवाया करीत होती) सचिव जेम्स पी. कॅनन, 'मिलिटंट' या ट्रॉट्स्कीवादी वृत्तपत्राचा संपादक फेलिक्स मॉरो, ट्रॉट्स्कीचा मेक्सिको येथील एक अंगरक्षक जॅक कूपर, यांसह १४ ट्रॉटस्कीवाद्यांना लहान मोठ्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. अमेरिकन कामगार चळवळीतील एक प्रमुख ट्रॉट्स्कीवादी ग्रांट इन याने फेडरल पोलिसांच्या यादीत गुन्हेगार म्हणून त्यांचे नाव येताच खटला सुरू होण्यापूर्वी आत्महत्या करून घेतली.

मार्च १९४३ मध्ये 'मिलिटंट'या ट्रॉट्स्कीवादी वृत्तपत्रामुळे अमेरिकन सरकारच्या युद्ध प्रयत्नांत अडथळे निर्माण होतात म्हणून त्या वृत्तपत्रावर अमेरिकेत बंदी घालण्यात आली. ७ डिसेंबर पासूनच, सामान्य जनतेने सरकारच्या युद्ध प्रयत्नांना सहकार्य देऊ नये व लष्कराचे नीतिधैर्य खच्ची व्हावे, याकरिता 'मिलिटट' पद्धतशीरपणे प्रयत्न करीत होते असे निवेदन, चौकशीनंतर अमेरिकेच्या न्यायखात्याने प्रसृत केले होते.

युद्धोत्तर काळात नाझी करणार असलेल्या घातपाताच्या कारवाया व कटकारस्थाने यांकरिता युरोपिय ट्रॉटस्कीवाद्यांचा उपयोग गेस्टापोचा प्रमुख हेन्रिच हिमलर करून घेत आहे असे शिकागो डेली न्यूजचा अमेरिकन परदेशी वार्ताहार पॉल घाली याने २८ सप्टेंबर १९४४ रोजी स्वित्झर्लंडहून कळविले. शिवाय फासिस्ट संघटनांच्या तरूणांना ट्रॉट्स्कीवादी मार्क्सवादाचे धडे दिले जात असून, बनावट पासपोर्ट, अन्य कागदपत्रे व शस्त्रे देऊन, मुक्त झालेल्या राष्ट्रांच्या साम्यवादी पक्षांत त्यांनी शिरकाव करून घ्यावा याकरिता त्यांना दोस्त लष्करांच्या पिछाडीला सोडून देण्याचे आदेश दिले गेले आहेत, आणि फ्रान्समध्ये जोसेफ दारनांद याच्या फासिस्ट लष्करी संघटनेला दहशतवाद व युद्धानंतरच्या काळात करावयाच्या पंचमस्तंभीय कारवाया यांकरिता नाझी शस्त्रे पुरवीत आहेत असेही घालीने कळविले. त्याने सांगितले की 'फ्रान्समधील त्या अत्यंत नीच अशा मंडळींना बोल्शेविकांविरुद्धच्या कारवायांकरिता हिमलरच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली प्रशिक्षण देण्यात येत आहे. दोस्तांचे दळणवळण तोडणे, द गॉल पक्षाच्या मुत्सद्यांची हत्या करणे, रशियातील सध्याची सोविएत पद्धती म्हणजे लेनिनच्या मूळ तत्वांचे विकृत स्वरूप असून, ती पद्धती हाणून पाडून मूळची विशुद्ध स्वरूपाची बोल्शेविक तत्त्वे व आदर्शवाद यांना मूर्त स्वरूप देण्याची आवश्यकता रशियन जनतेला पटवून सांगणे, ही त्यांच्याकडे सोपविलेली प्रमुख कामे आहेत. या लाल दहशतवादी गटाचे आयोजन हे हिमलरच्या नीतीला नव्याने आलेले एक अत्यंत विषारी फळ असून त्या गटाचा रोख ब्रिटिशांविरुद्ध व अमेरिकनांविरुद्ध तर आहेच, पण प्रामुख्याने त्यांचे लक्ष्य आहे-रशिया'!]

रशियातील पंचमस्तंभीयांचा मास्को खटल्यांद्वारा झालेला निःपात हा ट्रॉट्स्कीवर झालेला एक जबरदस्त आघात होता.त्याच्या लेखनात निराशेने बळावलेले वैफल्य व मतिभ्रष्टता डोकावू लागली. सोविएत संघाविरुद्धच्या त्याच्या प्रचारात संयम, सावधानता किंवा शहाणपण यांचा लवलेशही उरला नाही. बेफाम परस्परविरोधी तर्कशून्य विधाने तो करू लागला. स्टालिनवरील त्याच्या हल्ल्यांना तर विवेक किंवा सारासार विचार किंवा तर्कसंगती यांचा पुसटता आधारही कोठे उरला नाही. स्टालिनबद्दल त्याला वाटणारा व्यक्तीगत द्वेष व शत्रूत्व हे त्याच्या जीवनाचे जणू एकमेव सूत्र बनले. स्टॉलिनला शिव्यांची लाखोली वाहून त्याला जास्तीत जास्त बदनाम करण्याच्या हेतूने स्टालिनचे जीवन चरित्र लिहिण्याचा आदेश त्याने त्याच्या सचिवांना दिला [न्यूयॉर्कच्या हार्पर ब्रदर्सकडून हे पुस्तक प्रकाशित व्हावे अशी व्यवस्था अमेरिकेतील ट्रॉट्स्कीच्या मित्रांनी केली. पुस्तकाची छपाई पूर्ण झाली, परंतु त्यावेळी ते पुस्तक प्रकाशित करावयाचे नाही असे हार्परने ठरविले. त्या पुस्तकाच्या

अनुक्रमणिका

काही प्रती बाहेर गेल्या होत्या त्या माघारी बोलाविण्यात आल्या. त्यापूर्वी त्या पुस्तकाचा काही भाग लेखांच्या रूपाने ट्रॉट्स्कीने प्रकाशित केला होता. ट्रॉट्स्कीच्या मृत्यूपूर्वी त्याचा अखेरचा लेख 'लिबर्टी' मासिकात ऑगस्ट १९४० मध्ये प्रकाशित झाला होता त्याचे शीर्षक होते 'स्टालिनने लेनिनला विषप्रयोग करून मारले काय?' एप्रिल १९४६ मध्ये सोविएत विरोधी प्रचाराची लाट पुन्हा नव्याने अमेरिकेत उसळली त्यावेळी हार्परने आपला पूर्वीचा निर्णय बदलून स्टालिनची यथेच्छ निंदा नालस्ती करणाऱ्या त्या ट्रॉट्स्कीच्या पुस्तकाला प्रसिद्धी दिली.]

१९३९ मध्ये टेक्सासचा काँग्रेसमधील प्रतिनिधी मार्टिन डाईस याच्या नेतृत्वाखाली गैर-अमेरिकन कारवायांची चौकशी करण्याकरिता प्रस्थापित झालेल्या एका काँग्रेसच्या समितीशी ट्रॉट्स्कीने संपर्क साधला. ती समिति म्हणजे सोविएत विरोधी प्रचाराचे एक माध्यम बनली होती. डाईस समितीच्या हस्तकांनी मास्कोच्या धोक्याविषयी एक तज्ज्ञ साक्षीदार म्हणून समितीपुढे साक्ष देण्याकरिता ट्रॉट्स्कीला आमंत्रित केले. डाईस समितीपुढे साक्ष देणे हे त्याचे राजकीय कर्तव्य आहे असे तो मानतो असे ट्रॉट्स्कीने म्हटल्याचे वृत्त न्यूयॉर्क टाईम्सने ८ डिसेंबर १९३९ च्या अंकात छापले होते. ती साक्ष देण्याकरिता ट्रॉट्स्कीला अमेरिकेत नेण्याची व्यवस्था करण्याबाबत बोलणे सुरू झाले. पण त्या योजनेला मूर्त स्वरूप येऊ शकले नाही.

सप्टेंबर १९३९ मध्ये फ्रँक जॅक्सन या नावाने प्रवास करणारा एक युरोपीय ट्रॉट्स्कीवादी हस्तक फ्रेंच जहाजाने अमेरिकेत येऊन पोहोचला. [फ्रँक जॅक्सनचे खरे नाव होते जॅक्विस मोनार्ड वान् डेन ड्रेश. लिआँ जाकोय व लिआँ हायकैस ही नावेही त्याने अधूनमधून वापरली होती.] पॅरिसमध्ये तो विद्यार्थी म्हणून राहत असता ॲमेरिकेन ट्रॉट्स्कीवादी सिल्विया एजलॉफ हिने त्याला ट्रॉट्स्कीवादी चळवळीत ओढले होते.१९३९ मध्ये चौथ्या इंटरनॅशनलच्या गुप्त ब्यूरोच्या प्रतिनिधीने जॅक्सनशी संपर्क साधला व ट्रॉट्स्कीचा सचिव म्हणून काम करण्याकरिता त्याला मेक्सिकोत जावयाचे आहे असे त्याने जॅक्सनला कळविले. कॅनडाचा एक नागरिक टोनी बाबिच याचा पासपोर्ट त्याला देण्यात आला (बाबिच हा स्पेनच्या रिपब्लिकन लष्करात सैनिक होता व तो स्पेनमध्ये फासिस्टांकडून मारला गेला होता.) पासपोर्टमधून बाबिचचा फोटो काढून टाकून तेथे जॅक्सनचा फोटो चिकटविण्यात आला.

न्यूयॉर्क सिटीमध्ये सिल्विया एजलॉफ व अन्य ट्रॉट्स्कीवादी जॅक्सनला भेटले; व त्याची रवानगी त्यांनी कोयोकन येथे करून दिली. जॅक्सनने नंतर पोलिसांसमोर केलेल्या निवेदनात सांगितले,— 'सोविएत संघात पुन्हा उठावाचा प्रयत्न करण्याकरिता ट्रॉट्स्की मला रशियात पाठविणार होता. मी प्रथम शांघायला जावे; तेथे मला इतर काही हस्तक भेटतील. त्यानंतर आम्ही सर्वांनी मांचुकुओ ओलांडून रशियात जावे असे त्याने मला सांगितले. लाल लष्कराचे नीतिधैर्य खच्ची करणे व शस्त्रास्त्रनिर्मिती करणाऱ्या व अन्य कारखान्यांतही घातपात घडवून आणणे ही कामगिरी आम्हाला प्रामुख्याने सांगण्यात आली होती.'

ती कामगिरी करण्यास जॅक्सन सोविएत संघात कधी गेलाच नाही. उलट, २० ऑगस्ट १९४० रोजी दुपारी कोयोकनच्या कडेकोट बंदोबस्त असलेल्या त्या बंगल्यात ट्रॉट्स्कीच्या डोक्यात हातोडा हाणून जॅक्सनने त्याची हत्या केली.

अनुक्रमणिका

मेक्सिकन पोलिसांनी जॅक्सनला पकडले तेव्हा त्याने आपल्या जबानीत सांगितले की सिल्विया एजलॉफशी विवाहबद्ध होण्याची त्याची इच्छा होती. पण विवाह न करण्याबद्दल ट्रॉट्स्कीने त्याला सक्त ताकीद दिली होती. त्या मुलीवरून त्या दोघात कडाक्याचे भांडण झाले. तिच्याकरिता सर्वस्वाचा होम करण्याचे त्याने ठरविले. त्याच्या निवेदनात तो म्हणाला, – 'कामगार वर्गाच्या मुक्तीकरिता लढा चालविणाऱ्या एका राजकीय नेत्याऐवजी, ट्रॉट्स्कीत मला दिसला तो, कामगार वर्गांच्या कल्याणाच्या बुरख्याआड स्वतःच्या मनाचा कोतेपणा व निंद्य महत्त्वाकांक्षा लपवू पाहणारा, व सूडाच्या व द्वेषाच्या भावनेने अखंड जळफळणारा व त्यामुळे मनःसंतुलन घालवून बसलेला एक क्षुद्र माणूस! एखाद्या किल्ल्याप्रमाणे सुरक्षिततेची व अन्य सर्व व्यवस्था असलेले हे त्याचे विशाल निवासस्थान पाहिल्यावर त्या सर्व गोष्टींकरिता व कारस्थानांकरिता पैसा कुठून येतो हा प्रश्न माझ्या मनात अनेकदा उपस्थित झाला. येथे येणाऱ्या एका बड्या राष्ट्राचा वकील कदाचित या प्रश्नाचे उत्तर देऊ शकेल . . . ट्रॉट्स्कीने माझे नाव, माझा स्वभावधर्म, माझे भविष्य, माझे भावजीवन सर्व काही नासून टाकले. मी म्हणजे एक माणूस नव्हे, तर त्याच्या हातातील त्याच्या हीन महत्त्वाकांक्षेकरिता वापरले जाणारे एक हत्यार, एवढाच माझ्या अस्तित्वाला त्याच्या दृष्टीने अर्थ होता. माझे भवितव्य पूर्णपणे अंधारले होते. एखाद्या कागदाचा चोळामोळा करावा तसे ट्रॉट्स्कीने माझे जीवन चुरगळून टाकले–उध्वस्त केले.'

ट्रॉट्स्कीच्या मृत्यूने रशियात नेपोलियनची भूमिका वठविण्याकरिता एकच उमेदवार शिल्लक राहिला–अडॉल्फ हिटलर.

अनुक्रमणिका

भाग ४

# म्युनिक ते सानफ्रान्सिस्को

अनुक्रमणिका

## प्रकरण २२

# दुसरे महायुद्ध

### म्युनिक

जागतिक शांततेला प्राणघातक ठरलेल्या १९३१—१९४१ या दशकाचा प्रारंभ व शेवट, दोन्हीही जपानच्या हिंसाचाराने झाला. संपूर्ण जगावर वर्चस्व प्रस्थापित करण्याची, जपान, जर्मनी व इटली या राष्ट्रांची नीती याच दशकात साकार झाली, असे वक्तव्य अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याने 'शांतता व युद्धः युनायटेड स्टेट्स् फॉरिन पॉलिसी' या त्यांच्या अधिकृत प्रकाशनात केले होते.

आशियाचे साम्यवादापासून संरक्षण करण्याची सबब पुढे करून जपानने १९३१ मांचूरियावर केलेल्या आक्रमणाबरोबर दुसऱ्या महायुद्धाला प्रारंभ झाला. त्यानंतर दोन वर्षांनी साम्यवादापासून जर्मनीचे रक्षण करण्याचे आवाहन करून हिटलरने जर्मनीचे वायमार लोकसत्ताक सरकार उलथून पाडून सत्ता बळकावली; तर १९३५ मध्ये 'बोल्शेविझम व रानवटपणा' यापासून इथिओपियाचे रक्षण करण्याच्या हेतूने इटलीने त्या राष्ट्रावर आक्रमण केले. १९३६ मध्ये, हिटलरने ऱ्हाईनलँडचे पुनर्लष्करीकरण केले; जर्मनी व जपान यांनी आपसात कॉमिन्टर्नविरोधी करार केला, तर जर्मनी व इटली यांच्या फौजा स्पेनवर चालून गेल्या. या सर्व घटनांकरिता सबब एकच होती—साम्यवादापासून संरक्षण!

१९३७ मध्ये जर्मनी—जपान अँटी—कॉमिन्टर्न कराराला इटली जाऊन मिळाले. जपानने चीनवर पुन्हा आघात करून पेकिंग, टिएन्ट्सीन व शांघाय ताब्यात घेतले. त्यानंतरच्याच वर्षी, १९३८ मध्ये, जर्मनीने ऑस्ट्रीया बळकावले. साम्यवादापासून जगाचे रक्षण करण्याकरिता बार्लिन—रोम—टोकियो यांचा एक अक्षगट (ॲक्सीस) तयार झाला.

राष्ट्रसंघ महासभेपुढे सप्टेंबर १९३७ मध्ये बोलताना सोविएत परराष्ट्रामंत्री मॅक्झिम लिट्विनोव म्हणाला— 'अलीकडील काही वर्षात तीन राष्ट्रांनी इतर राष्ट्रांवर आक्रमण केले आहे हे आपणा सर्वांना माहीतच आहे. शासनपद्धती, सैद्धांतिक भूमिका, भौतिक व सांस्कृतिक पातळी याबाबत त्या तीन राष्ट्रांत भिन्नत्व असेलही; परंतु, त्यांनी केलेल्या हल्ल्यांच्या समर्थनार्थ मात्र ती तीनही राष्ट्रे एकच कारण पुढे करीत आहेत—साम्यवादाविरुद्धच्या संघर्षाचे! त्या राष्ट्रांनी स्वतःची मोठी सोयिस्कर समजूत करून घेतली आहे—निदान ती राष्ट्रे तसे दर्शवितात—की 'साम्यवादविरोध' हे एक कारण पुढे केले की त्यांनी केलेले सर्व आंतर्राष्ट्रीय कपट कारस्थान व गुन्हे माफ होतील.'

कॉमिन्टर्नविरोधी कराराचा मुखवटा घालून जर्मनी, जपान व इटली ही राष्ट्रे संपूर्ण युरोप व आशिया खंड जिंकून तेथील जनतेला गुलामगिरीच्या दावणीला बांधण्यास सज्ज झाली होती.

यावेळी जगापुढे दोनच पर्याय होते. नाझी फासिस्ट व जपानी आक्रमकांविरुद्ध इतर सर्व राष्ट्रांची युती करून, फार उशीर होण्याअगोदरच, त्या ॲक्सीस राष्ट्रांच्या आक्रमणाला व विस्तारवादी धोरणाला पायबंद घालणे, किंवा एकी न करता, प्रत्येक राष्ट्राने आक्रमकांविरुद्ध शरणागती पत्करून विजयाचा मार्ग नाझी–फासिस्ट आक्रमकांना मोकळा करून देणे. ॲक्सीस राष्ट्रांची प्रचार मंत्रालये, लिऑं ट्रॉट्स्कीचे हस्तक, तसेच फ्रेंच, ब्रिटिश व अमेरिकन प्रतिक्रियावादी हे सर्वच सामूहिक सुरक्षेविरुद्ध फासिस्टांनी सुरू केलेल्या मोहिमेत सामील झाले होते. आक्रमणाविरुद्ध ऐक्याची शक्यता हा केवळ साम्यवादी प्रचार आहे, ते केवळ एक कल्पनेच्या राज्यातील स्वप्न आहे; सामूहिक सुरक्षा म्हणजे युद्धाला उत्तेजन देणे आहे असे वारंवार सांगून तो विचार धुडकावून लावण्यात येत होता; व अटळ दिसणारे युद्ध सोविएत संघाच्या दिशेने वळविण्याकरता फासिस्टांचा अनुनय करण्याची नीती अंगिकारली जात होती. पाश्चात्य राष्ट्रांच्या त्या अनुनयाच्या नीतीचा पूरेपूर फायदा नाझी जर्मनी करून घेत होते.

सामूहिक सुरक्षेमुळे युरोप दोन शस्त्रसज्ज गटात विभागले जाईल असे वक्तव्य अनुनयाच्या धोरणाचा हिरीरीने पुरस्कार करणारा ब्रिटनचा प्रधानमंत्री नेव्हील चेंबरलेन करीत होता.' सामूहिक सुरक्षितता म्हणजे केवळ अर्थशून्य बडबड असेच आमच्याप्रमाणे ब्रिटिश प्रधानमंत्र्याचेही मत आहे हे आता स्पष्ट झालेले आहे,' असे भाष्य फेब्रुवारी १९३८ मध्ये एका नाझी वृत्तपत्राने केले होते.

नेव्हिल चेंबरलेनच्या त्या अनुनयाच्या धोरणाचा धिःक्कार करताना १० मे १९३८ रोजी मँचेस्टर येथे केलेल्या एका भाषणात विन्स्टन चर्चिल म्हणाला, 'युरोप दोन सशस्त्र गटात विभागला जाता कामा नये असे आपल्याला सांगितले जात आहे. याचा अर्थ युरोपात एकच सशस्त्र गट राहाणार असा आहे का? आणि तो गट म्हणजे हुकुमशहांचा, आणि ते हुकुमशहा कोणत्या राष्ट्राचा अगोदर बळी घेणार, कोणत्या राष्ट्रांना ते गुलाम करणार व त्यांचे शोषण करणार याचा अंदाज घेत त्यांच्या आजूबाजूला दबकत घोटाळणाऱ्या भयग्रस्त लोकांचा असणार का?'

सप्टेंबर १९३८ मध्ये अनुनयाच्या धोरणाने जणू कळस गाठला. नाझी जर्मनी, फासिस्ट इटली, ग्रेट ब्रिटन व फ्रान्स या राष्ट्रांनी म्युनिक करारावर स्वाक्षऱ्या करून हिटलरपुढे जणू सपशेल शरणागती पत्करली. १९१८ पासून जगातील प्रतिक्रियावादी ज्या सोविएतविरोधी युतीची आशा बाळगून होते ती 'पवित्र' युती म्युनिक कराराने साकार झाली होती. त्या कराराने राजनैतिक क्षेत्रात सोविएत रशिया एकाकी पडले; युरोपीय सामूहिक सुरक्षेला आधारभूत ठरणारा फ्रँको-रशियन करार मृतवत झाला; झेकोस्लोवाकियाचा सुडेटन प्रदेश नाझी जर्मनीच्या घशाखाली उतरला. जर्मन सैन्याला पूर्वेकडील द्वारे खुली करून देण्यात आली. [नाझी झेकोस्लोवाकियावर चालून जाण्याच्या तयारीत असता २४ सप्टेंबर १९३८ रोजी सोशलिस्ट अपील या न्यूयॉर्कच्या ट्रॉट्स्कीवादी वृत्तपत्राने आपल्या अग्रलेखात लिहिले–'झेकोस्लोवाकिया म्हणजे कुप्रसिद्ध व्हर्साय परिषदेच्या प्रसव वेदनांतून झालेल्या भयानक गर्भपातापैकी एक सर्वात भयंकर असा राष्ट्रीय गर्भपात आहे. झेकोस्लोवाकियाची लोकशाही म्हणजे, तेथील भांडवलशाही

अनुक्रमणिका

पिळवणुकीने पांघरलेला एक विकृत व गलिच्छ बुरखा आहे. अशा परिस्थितीत झेकोस्लोवाकिया या भांडवलशाही राष्ट्राला क्रांतिकारी विरोध व्हावा हे स्वाभाविकच आहे. या भांडवलशाही राष्ट्राला क्रांतिकारी विरोध व्हावा हे स्वाभाविकच आहे.' अशा खोट्या, दिखाऊ, क्रांतिकारी घोषणा देऊन संपूर्ण युरोपातील व अमेरिकेतील ट्रॉट्स्कीवाद्यांनी, ॲक्सीस राष्ट्रांच्या आक्रमणाविरुद्ध लहान राष्ट्रांचे संरक्षण करणे व सामूहिक सुरक्षा साकार करणे याविरुद्ध अविरत प्रचार मोहिम चालवून प्रचंड गोंधळ उडवून दिला. अबिसिनिया, स्पेन, उत्तर व मध्य चीन, ऑस्ट्रीया व झेकोस्लोवाकिया यांवर जर्मनी, इटली व जपान ही राष्ट्रे हल्ला चढवीत होती त्याचवेळी, सामूहिक सुरक्षा म्हणजे युद्धाला चिथावणी देणे आहे असा अपप्रचार ट्रॉट्स्कीच्या चौथ्या इंटरनॅशनलचे सदस्य सतत करीत होते. 'राज्यांचा बचाव हे मूलतःच एक प्रतिक्रियावादी कार्य आहे', असे ट्रॉट्स्की ठासून सांगत होता. सामूहिक सुरक्षेविरुद्धच्या त्यांच्या लढ्यात प्रचाराचा गदारोळ उठविण्याकरिता 'द फोर्थ इंटरनॅशनल अँड द वॉर' ह्या ट्रॉट्स्कीच्या पुस्तिकेचा मूलभूत साधन म्हणून उपयोग करून घेतला जात होता. 'युरोपातील या लहान लहान राष्ट्रिक राज्यांचे संरक्षण करणे हे खऱ्या अर्थाने एक प्रतिक्रियावादी काम आहे, त्या राष्ट्रिक राज्यांच्या सीमा, त्यांचे पासपोर्ट, त्यांची चलनपद्धती, त्यांच्या संरक्षणाकरिता ते बाळगीत असलेले लष्कर या सर्व गोष्टी मानवाच्या आर्थिक व सांस्कृतिक विकासाच्या मार्गातील फार मोठे अडथळे बनून राहिलेल्या आहेत. त्यांचे संरक्षण नव्हे तर त्यांचा सर्वनाश घडवून आणणे हे कामगार वर्गापुढील आज एक आद्य कर्तव्य आहे,' असे आवर्जून पुन्हा पुन्हा सांगण्यात येत होते.

फ्रान्सचे पॉप्यूलर फ्रंट सरकार व स्पेनचे लोकशाही सरकार यांविरुद्ध, तसेच राष्ट्रीय ऐक्य साधून सामूहिक सुरक्षेकरिता सोविएत संघाशी करार करू इच्छिणाऱ्या अन्य फासिस्ट विरोधी राष्ट्रांविरुद्ध व तेथील जनआंदोलनांविरुद्ध ट्रॉट्स्कीवाद्यांनी युरोप व अमेरिकेत चिकाटीने व निर्धाराने लढा चालविला. तशा जनआंदोलनामुळे ती राष्ट्रे निष्कारण युद्धात ओढली जातील असे जनमनावर ठसविण्याचा प्रयत्न वारंवार प्रचाराद्वारे ट्रॉट्स्कीवादी करू लागले. 'स्टालिनच्या योजनेतील सामूहिक आघाडी म्हणजे कार्यवाहीचे ऐक्य नसून संपूर्ण कामगार वर्गाला साम्राज्यवादी युद्धात ओढणारे ऐक्य आहे' असे सीएल जेम्स हा ब्रिटनमधील एक प्रमुख ट्रॉट्स्कीवादी पुन्हा पुन्हा पोटतिडिकेने लोकांना सांगत होता.

आक्रमणविरोधी राष्ट्रांकडून ॲक्सिस राष्ट्रांचा पराभव झाल्यास त्यात कोणकोणते धोके दडलेले असतील याबद्दल खुद्द ट्रॉट्स्कीने वारंवार इषारे दिले होते एप्रिल १९३७ मध्ये मेक्सिको येथील साक्षीच्या वेळी बोलताना तो म्हणाला—'जर जर्मनी व जपान या राष्ट्रांविरुद्ध फ्रान्स, ग्रेट ब्रिटन व सोविएत संघ ही राष्ट्रे युद्धात विजयी ठरली तर त्यामुळे सोविएत संघाचे परिवर्तन एका बुर्ज्वा राष्ट्रात होण्याची, व फ्रान्स एक फासिस्ट राष्ट्र बनण्याची शक्यता आहे; कारण एका राक्षसी लष्करी यंत्रणेशिवाय हिटलरवर विजय मिळविणे अशक्य आहे; त्यामुळे फ्रान्सला जर्मनीविरुद्ध तशा लष्करी सामर्थ्याच्या आधारावर विजय मिळाला तर जर्मनीतील फासिझम नष्ट होईल, पण फ्रान्स हे एक फासिस्ट राष्ट्र बनेल.'

एकंदरीत, सामूहिक सुरक्षा म्हणजे युद्धखोरी असून तशा सुरक्षिततेकरिता धडपडणाऱ्या व्यक्ती किंवा राष्ट्रे ही स्टालिनच्या हातातील बाहुली आहेत असे युरोपीय जनतेला पटवून देण्याचा आटोकाट प्रयत्न, अनुनयाचे धोरण अवलंबिणारे युरोपातील नेते व ॲक्सीस प्रचारक यांच्या हातात हात घालून, ट्रॉट्स्की व त्याचे सहकारी यांनी चालविला होता.] ब्रेस्त लितोवस्ककरारानंतर सर्वात जबरदस्त अवहेलना व धक्का सोविएत संघाला कशामुळे बसला असेल तर तो म्युनिक करारामुळे, असे भाष्य वॉल्टर डुरान्टी याने आपल्या 'द क्रेमलिन अँड द पीपल' या पुस्तकात केले आहे.

म्युनिक करार होताच नाझी—सोविएत युद्ध भडकण्याची जग वाट पाहू लागले; तर चेंबरलेन मात्र हिटलरची स्वाक्षरी असलेला एका कागद इंग्लंडच्या जनतेपुढे फडकावित त्यांना आश्वासन देत होता 'या कराराचा अर्थ आहे आपल्या काळातील टिकाऊ शांती!'

वीस वर्षांपूर्वी कॅप्टन सिडने रॅली हा ब्रिटीश हेर तळतळून बोलला होता—'काहीही झाले तरी रशियात जन्माला आलेली ही अमंगल हिडीस विकृती चिरडून टाकलीच पाहिजे. त्याकरिता जर्मनीशी- नव्हे कोणत्याही राष्ट्राशी कोणत्याही अटींवर करार करावा लागला तरी तो स्वागतार्हच ठरेल. मानवाच्या या खऱ्या शत्रूविरुद्ध संयुक्त आघाडी प्रस्थापित झालीच पाहिजे.' सिडनेचे ते स्वप्न म्युनिक कराराने साकार होणार होते.सोविएत संघाविरुद्ध अशाच संयुक्त आघाडीची निकड प्रतिपादित असता ११ जून १९३८ रोजी कॉमन्स सभागृहात चेंबरलेनचा समर्थक सर अर्नोल्ड विल्सन म्हणाला होता, 'अशी युती व्हावी हे आज

अनुक्रमणिका

अगत्याचे झाले आहे. कारण आज जगाला खरा धोका आहे तो जर्मनी किंवा इटलीकडून नव्हे तर रशियाकडून!'

मात्र सोविएतविरोधी म्युनिक कराराचा पहिला बळी ठरला तो सोविएत संघ नव्हे तर युरोपातील लोकशाही जनता. सोविएतविरोधाच्या नावाखाली लोकशाहीच्या गळ्याला नख लावण्यात आले. फेब्रुवारी १९३९ रोजी ब्रिटीश व फ्रेंच सरकारांनी जनरॅलीसिमो फ्रँकोच्या फासिस्ट हुकुमशाहीला स्पेनचे कायदेशीर सरकार म्हणून मान्यता दिली. भयानक अडचणींना व संकटांना तोंड देत अडीच वर्षे लढा चालविल्यानंतर स्पेनच्या लोकशाहीने अखेरचा श्वास सोडला. स्पेन हे एक फासिस्ट राष्ट्र बनले.

१५ मार्च १९३९ रोजी स्वतंत्र राष्ट्र म्हणून झेकोस्लोवाकियाचे अस्तित्व संपुष्टात आले. नाझी रणगाड्यांच्या तुकड्या रोंरावत प्रागमध्ये शिरल्या. फासिस्ट इटलीतील शस्त्रास्त्रनिर्मिती उद्योगापेक्षा तिपटीने अधिक शस्त्रास्त्र निर्मिती करणारे झेकोस्लोविकियाचे स्कोडा आर्म्स वर्क्स व अन्य तेवीस कारखाने हिटलरची मालमत्ता बनले. एके काळी सोविएत संघात क्रियाशील असलेल्या हस्तक्षेपवादी लष्कराचा फासिस्ट धार्जिणा सेनापती जनरल जान सिरोवी याने झेकोस्कोवाकियन लष्कराची सर्वोत्तम शस्त्रास्त्रे, हजार विमाने, व दारूगोळ्याचे समृद्ध भांडार नाझी जर्मनीच्या स्वाधीन केले.

२० मार्च रोजी लिथुआनियाने त्यांचे एकमेव बंदर मेमेल हिटलरच्या हवाली केले. ७ एप्रिल रोजी गुड फ्रायडेचा शुभ मुर्हूत साधून मुसोलिनीने अल्बानियावर आक्रमण केले. त्यानंतर पाचच दिवसांनी अल्बानियाचा राजमुकुट इटलीचा राजा व्हिक्टर इमॅन्युएल याच्या मस्तकावर चढला.

हिटलर ज्यावेळी झेकोस्लोवाकियात शिरत होता त्यावेळी ब्रिटन व फ्रान्स यांचे सोविएतविरोधी धोरण त्यांच्याच हितसंबंधाच्या दृष्टीने अनर्थकारी ठरेल असा धोक्याचा इषारा, सोविएत संघाच्या साम्यवादी पक्षाच्या १८ व्या काँग्रेसमध्ये बोलताना, हिटलरप्रती अनुनयाचे धोरण चालविणाऱ्या ब्रिटीश—फ्रेंच मुत्सद्यांना, स्टालिनने दिला होता. कॉमिन्टर्न कराराच्या बुरख्याआड ॲक्सिस राष्ट्रांनी युरोपात व आशिया खंडात सुरू केलेले अघोषित युद्ध हे केवळ सोविएत संघाविरुद्धचे नसून ते इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका याही राष्ट्रांविरुद्धचे आहे—नव्हे ते आता प्रामुख्याने त्या राष्ट्रांविरुद्धच सुरू आहे हेही स्टालिनने स्पष्ट केले. तो म्हणाला 'आक्रमक राष्ट्रांनी चालविलेले युद्ध हे प्रामुख्याने इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका या अनाक्रमक राष्ट्रांच्या हितसंबंधावर आघात करणारे युद्ध आहे; असे असूनही ती राष्ट्रे आक्रमकांपुढे प्रतिकाराचा प्रयत्न करणे तर दूरच उलट त्यांच्या आक्रमक हालचालींकडे कानाडोळा करीत आहेत; केवळ माघार घेत आहेत असे नव्हे तर त्यांना एकामागून एक सवलती देत आहेत. या सर्व गोष्टींवर विश्वास ठेवणे कठिण असले तरी ती सत्य परिस्थिती आहे. पाश्चिमात्य लोकशाही राष्ट्रांतील प्रतिक्रियावादी नेत्यांनी, विशेषकरून इंग्लंड व फ्रान्समधील मुत्सद्यांनी सामूहिक सुरक्षेची नीती अमान्य केली आहे. अजूनही अनुनयाची नीती, हस्तक्षेपविरोधी धोरण अशा राजनैतिक शब्दप्रयोगांच्या बुरख्याआड ते आपले सोविएतविरोधी स्वप्न उराशी बाळगून आहेत. पण ती नीती पूर्णपणे अपयशी ठरली आहे,' असे सांगून स्टालिन पुढे म्हणाला, 'काही अमेरिकन व युरोपीय नेते व वृत्तपत्रकार यांना, सोविएत युक्रेनवर हल्ला होण्याची वाट पाहता पाहता आता

अनुक्रमणिका

धीर निघेनासा झाला आहे; व हस्तक्षेपविरोधी धोरणामागे कोणते हेतू दडलेले आहेत हे आता त्यांच्याच तोंडून बाहेर पडत आहे. ‘जर्मनीकडून त्यांच्या पदरी केवळ निराशाच आली आहे, कारण पूर्वेच्या दिशेने सोविएत संघाविरुद्ध आगेकूच करण्याऐवजी जर्मनी पश्चिमेकडे वळत आहे; ते राष्ट्र आता वसाहतींची मागणी करीत आहे,’ असे ते आता उघडपणे बोलत आहेत. या सर्व प्रकारावरून, जर्मनीने सोविएत संघावर हल्ला करावा या अटीवरच झेकोस्लोवाकियाचा प्रदेश जर्मनीच्या पदरात घालण्यात आला होता, व आता जर्मनी त्या अटीची पूर्तता करण्यास का कूं करीत आहे, असेच स्वाभाविकपणे कोणालाही वाटेल . . . .

‘हस्तक्षेपविरोधी धोरणाच्या नैतिक बाजूसंबंधी, किंवा विश्वासघात, राष्ट्रद्रोह यासंबंधी मी काही बोलावे असे नाही. मानवी मूल्ये किंवा नीतीमत्ता जे लोक मानीतच नाहीत त्यांच्याशी नैतिकतेबद्दल बोलणे म्हणजे मूर्खपणाच आहे. राजकारणात काहीही समर्थनीय असते असेच बुर्ज्वा राजकारणात मुरलेल्या मुत्सद्यांना वाटते. ते काहीही असो. एक गोष्ट मात्र नक्की की हस्तक्षेपविरोधी नीतीच्या समर्थकांनी कुटिल राजनीतीचा हा जो घातक खेळ सुरू केला आहे तो एक दिवस त्यांच्यावरच उलटल्याखेरीज राहणार नाही.

‘सोविएत संघाला अजूनही आक्रमकांविरुद्ध आंतर्राष्ट्रीय सहकार्य व वास्तववादी सामूहिक सुरक्षा हवी आहे. पण ते सहकार्य मनापासूनचे व खरेखुरे असले पाहिजे. इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांतील अनुनयाच्या धोरणाच्या समर्थकांच्या हातातील, लाल सैन्य हे एक बाहुले बनून कधीही राहणार नाही. आणीबाणीच्या वेळी स्वतःचे सामर्थ्य व सोविएत जनतेचे ऐक्य व निष्ठा या बळावर शत्रूविरुद्ध निश्चितपणे विजय मिळवता येईल याचा लाल सैन्याला पूर्ण भरवसा आहे. युद्ध झालेच तर, आमच्या लष्कराची आघाडी काय किंवा पिछाडी काय, दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राच्या लष्करापेक्षा अधिक बलशाही राहील हे आमच्या सीमेपलीकडील युद्धखोरांनी चांगले जाणून असावे.’

पण स्टालिनच्या या रोखठोक व स्पष्ट इशाऱ्याकडे कोणीही लक्ष दिले नाही.

एप्रिल १९३९ मध्ये इंग्लंडमध्ये घेण्यात आलेल्या सार्वमतात नाझी जर्मनीविरुद्ध ब्रिटिश—सोविएत युती व्हावी असा स्पष्ट कौल ८७ % ब्रिटिश जनतेने दिला. ‘अँग्लो—सोविएत करार म्हणजे आपल्या जीवनमरणाचा प्रश्न आहे’ असे चर्चिलने उघडपणे घोषित केले. २७ मे रोजी केलेल्या एका भाषणात तो म्हणाला,—झेकोस्लोवाकियासारख्या लष्करी दृष्ट्या महत्वाच्या राष्ट्राचा बळी देऊन व पोलंड व रुमनिया यांना संरक्षणाची हमी देऊन, आपल्या सरकारने आपल्या राष्ट्राच्या संरक्षणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. रशियाची आपल्याला अनिवार्य व मोलाची ठरणारी मदतही आपले सरकार धुडकावून लावीत आहे. त्यामुळे अत्यंत घातक व विनाशकारी युद्धात आपण ढकलले जात आहोत. तसे झाले तर, या सर्व गोष्टींना जबाबदार असलेल्या आपल्या नेत्यांना आपल्या देशबांधवांनी औदार्याने व सन्मानाने वागवावे अशी त्यांची लायकी नाही असेच शेवटी म्हणावे लागेल.’

अनुक्रमणिका

२९ जुलै रोजी डेविड लॉईड जॉर्ज यानेही चेंबरलेन सरकारच्या नीतीवर कठोर टीका करुन चर्चिलच्या आवाहनाला पाठिंबा दिला. तो म्हणाला, —चेंबरलेन महाशयांनी हिटलरशी स्वतः वाटाघाटी केल्या. त्याकरिता ते स्वतः जर्मनीला गेले. ते व लॉर्ड हॅलिफॅक्स यांनी रोमलाही भेटी दिल्या. तेथे मद्यपान करताना त्यांनी मुसोलिनीचे अभिष्टचिंतन करून त्याची तोंड भरून स्तुती केली. रशियाला मात्र वाटाघाटी करण्याकरिता त्यांनी कोणाला पाठविले? मंत्रिमंडळाच्या अगदी कनिष्ठ स्तरापैकीही कोणाला त्यांनी मास्कोला पाठविले नाही; पाठविले ते परराष्ट्र खात्यातील एका लिपिकाला! हा रशियाचा उघडउघड अपमान आहे . . . आपल्या सरकारला वस्तुस्थितीचे आकलनच झालेले नाही की, जग आज एका भयंकर अनर्थाच्या कड्यावर डगमगत्या पावलांनी उभे आहे ह्या संकटाचे गांभीर्य त्यांना उमगत नाही हेच कळत नाही.'

पण ब्रिटीश जनतेची मागणी व चर्चिल आणि लॉईड जॉर्ज यांसारख्या नेत्यांचे आवाहन याकडे चेंबरलेन सरकारने पूर्ण दुर्लक्ष केले. रशियाशी पक्केपणाने करार केला तर अन्य कोणत्याही राष्ट्राशी वाटाघाटी करण्याबाबत अडथळे निर्माण होतील, असे भाष्य रशियाशी करार न करण्याच्या संदर्भात लंडन टाईम्सने केले होते [नाझी लष्कर ज्या दिवशी प्रागमध्ये शिरले त्याच दिवशी फेडरेशन ऑफ ब्रिटिश इंडस्ट्रीजचे एक शिष्टमंडळ जर्मनीतील बड्या उद्योगाशी मोठ्या प्रमाणावर करावयाच्या कराराचा तपशील नक्की करण्याकरिता डुसेलडॉर्फ येथे येऊन पोहोचले होते. त्या पाठोपाठ, नाझी जर्मनीला ५ कोटी १० लक्ष पौंडाचे ब्रिटिश कर्ज देण्याच्या प्रस्तावाबाबत चर्चा करण्याकरिता ब्रिटिश व्यापार मंडळाचा पार्लमेंटरी सचिव रॉबर्ट एस्. हडसन हा हिटलरचा आर्थिक सल्लागार डॉ. हेलमुथ वोहलथाट याला भेटण्यास गेला असल्याची मोठी खळबळजनक बातमी जुलैमध्ये ब्रिटिश वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली.

अर्थात् नाझींप्रती अंगिकारण्यात येत असलेले अनुनयाचे धोरण ब्रिटनमधील सगळ्याच उद्योगपतींना पसंत होते असे नाही. त्या दृष्टीने ८ जून रोजी, कोळसा उद्योगातील एक बडा उद्योगपती व बँकर, लॉर्ड डेविस याने हाऊस ऑफ लॉर्डसमध्ये केलेले भाषण अर्थपूर्ण होते. त्या भाषणात तो म्हणाला, 'हिटलरने त्याच्या 'माईन कांफ' मध्ये जी मूळ कल्पना विशद केली होती त्यानुसार जर्मन गरुड पश्चिमेच्या नव्हे तर पूर्वेच्या दिशेने उड्डाण करील अशी आशा या देशातील काही गट उराशी बाळगून आहेत, याची सोविएत सरकारला चांगली जाणीव आहे.' चेंबरलेन सरकार सोविएत सरकारशी करीत असलेल्या वाटाघाटींबद्दल तो म्हणाला—'सोविएत सरकारशी वाटाघाटी करण्याची ब्रिटिश मंत्रिमंडळाची खरोखरीच प्रामाणिक इच्छा आहे किंवा नाही, की लोकमताची फसवणूक करण्याकरिता वाटाघाटींचा ते केवळ देखावा करीत आहेत याबद्दल मला जबरदस्त शंका वाटते.']

युद्धाचा भडका लवकरच होणार अशी स्पष्ट लक्षणे १९३९ च्या ग्रीष्माखेरी युरोपात दिसू लागली. त्यावेळी, चेंबरलेनने रशियाशी वाटाघाटींकरिता मास्कोला पाठविलेला ब्रिटनच्या परराष्ट्र खात्याचा अगदी कनिष्ठ स्तरावरील एक अधिकारी, विलीयम स्ट्रँग, हा एकमेव ब्रिटिश प्रतिनिधी मास्कोत होता. मात्र लोकमताच्या दडपणामुळे रशियाशी बोलणी करण्याचा देखावा पुन्हा एकदा करणे चेंबरलेन सरकारला भाग पडले. ११ ऑगस्ट रोजी एक ब्रिटिश लष्करी शिष्टमंडळ दोन्ही राष्ट्रांच्या लष्करी अधिकाऱ्यांत बोलणी व्हावीत याकरिता मास्कोत येऊन पोहचले. विमान युगाच्या त्या काळात, युद्धाच्या ढगांची युरोपीय क्षितिजावर गर्दी झालेली असता, हे लष्करी शिष्टमंडळ एका जुन्यापुराण्या अगदी मंद गतीच्या बोटीने रशियाला पाठविण्यात आले होते; आणि ते शिष्टमंडळ मास्कोत येऊन पोहोचल्यानंतर रशियनांना कळले की स्ट्रँगप्रमाणेच, सोविएत सरकारशी कोणताही करार करण्याचे अधिकार त्यांना देण्यात आलेले नव्हते.

अनुक्रमणिका

म्युनिक कराराशी सहमत असलेल्या युरोपीय राष्ट्रांच्या सक्रिय मदतीने, संमतीने, किंवा त्यांच्या अप्रत्यक्ष पाठिंब्याने नाझी जर्मनीने सोविएत संघावर हल्ला करावा व नाझींना एकाकीपणे तोंड देण्याचा प्रसंग सोविएत सरकारवर यावा हा त्या ब्रिटिश नीतीचा उद्देश स्पष्टच होता. अशा परिस्थितीत स्वहिताचा विचार करून स्वतंत्रपणे निर्णय घेणे सोविएत संघाला भाग पडले.

या संबंधी सोविएत रशियातील एके काळचा अमेरिकेचा राजदूत जोसेफ ई.डेविस याने १८ जुलै १९४२ रोजी राष्ट्राध्यक्ष रूझवेल्टचा सल्लागार हॅरी हॉप्किन्स याला लिहिलेल्या पत्रात म्हटले,—'१९३६ पासून मी स्वतः राजकीय परिस्थितीचे केलेले निरीक्षण व निरनिराळ्या युरोपीय मुत्सद्यांशी माझे असलेले संबंध यावरून एक गोष्ट प्रकर्षाने मला जाणवली ती ही की एक अमेरिकन अध्यक्ष वगळता, जागतिक शांततेला हिटलरमुळे निर्माण झालेला धोका व त्याविरुद्ध अनाक्रमक राष्ट्रात सामूहिक सुरक्षेकरिता करार होण्याची आवश्यकता याची जाणीव सोविएत सरकारइतकी प्रकर्षाने अन्य कोणत्याही राष्ट्राला झाली नाही. झेकोस्लोवाकियाच्या संरक्षणाकरिता नाझींविरुद्ध युद्धाला सामोरे जाण्याचीही सोविएत सरकारची तयारी होती. झेकोस्लोवाकियावर हल्ला झालाच तर, त्या दोन राष्ट्रांत झालेल्या परस्पर मदतीच्या करारानुसार त्यांच्या मदतीला जाता यावे त्याकरिता पोलंडमधून त्यांच्या लष्कराला मार्ग मिळावा म्हणून पोलंडशी त्यांचा असलेला अनाक्रमणाचा काररही म्युनिक करार होण्यापूर्वीच त्यांनी रद्द केला. म्युनिक करारानंतरही, अगदी १९३९ च्या वसंतापर्यंत, पोलंड किंवा रुमानियावर नाझी हल्ला झालाच तर त्या राष्ट्रांच्या संरक्षणाकरिता ब्रिटन व फ्रान्सशी सहकार्य करण्याची तयारीही त्यांनी दर्शविली. त्यांचे फक्त एकच म्हणणे होते की तशा परिस्थितीत कोणत्या राष्ट्राने नक्की कोणती जबाबदारी पार पाडायची हे व्यावहारिक व वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून ठरविण्याकरिता अनाक्रमक राष्ट्रांची एक आंतर्राष्ट्रीय परिषद बोलाविली जावी व ती राष्ट्रे संयुक्तपणे ॲक्सीस आक्रमणाचा प्रतिकार करतील असे निःसंदिग्धपणे हिटलरला कळविण्यात यावे . . . पण तशा कोणत्याही वाटाघाटीत रशियाला सहभागी करून घेण्यास पोलंड व रुमानियाचा विरोध असल्याची सबब पुढे करून चेंबरलेनने सोविएत नेत्यांची ती सूचना धुडकावून लावली.

'१९३९ च्या संपूर्ण वसंतात, हिटलरला पायबंद घालण्याच्या हेतूने नीतीची व कृतीची सुसूत्रता, ऐक्य व लष्करी कार्यवाहीचा समन्वय साधण्याच्या हेतूने पाश्चिमात्य राष्ट्रांशी करार घडवून आणण्याचा प्रयत्न सोविएत सरकारने केला. परंतु बेल्जियम किंवा हॉलंड यांवर आक्रमण झाले तर त्यांच्या संरक्षणाची हमी देण्याची तयारी जशी रशियाने दर्शविली तशाच प्रकारची हमी बाल्टिक राज्यांच्या संरक्षणासाठी रशियाला देण्याचे मात्र ब्रिटनने साफ नाकबूल केले. या सर्व कारणांमुळे इंग्लंड किंवा फ्रान्सशी, हिटलरविरुद्ध संरक्षणाची कोणतीही परिणामकारी किंवा व्यवहार्य अशी योजना साकार होणे शक्य नाही अशी स्वाभाविकपणेच सोविएतांची खात्री झाली. स्वसंरक्षणाच्या दृष्टीने हिटलरशी अनाक्रमणाचा करार करण्याव्यतिरिक्त सोविएतांना अन्य कोणताही मार्गच उरला नाही.'

अनुक्रमणिका

ब्रेस्त लितोवस्क करारानंतर वीस वर्षांनी, युरोपीय मुत्सद्यांच्या सततच्या सोविएतविरोधी नीतीमुळे, कितीही नकोसे वाटत असले तरी, स्वसंरक्षणाकरिता जर्मनीशी करार करणे सोविएतांना भाग पडले.

२४ ऑगस्ट १९३९ रोजी सोविएत रशियाने जर्मनीशी अनाक्रमणाचा करार केला.

## दुसरे महायुद्ध

१ सप्टेंबर १९३९ रोजी जर्मनीच्या यंत्रचलित तुकड्यांनी एकदम सात निरनिराळ्या बाजूंनी पोलंडवर हल्ला चढविला. दोन दिवसानंतर इंग्लंड व फ्रान्स यांनी जर्मनीविरुद्ध युद्धघोषणा केली. नाझींशी हातमिळवणी केलेल्या सोविएतविरोधी लष्करी अधिकाऱ्यांच्या प्रभावाखाली येऊन ज्या पोलंडने सोविएत मदत नाकारून सामूहिक सुरक्षेचा प्रस्ताव धुडकावून लावला होता, ते पोलंड अल्पावधीतच नाझींच्या घणाघाती प्रहारांनी पूर्ण कोसळले.

नाझींच्या लष्करी वरवंट्याखाली पोलंड चिरडले जात असता धास्तावलेले पोलिश सरकार १७ सप्टेंबर रोजी पोलंड सोडून पळून गेले. त्याच वेळी लाल लष्कराने पोलंडची पूर्व सीमा ओलांडून, बायलोरशिया, पश्चिम युक्रेन व गॅलिशिया, हे प्रदेश नाझी सैन्य तेथे येऊन पोचण्याच्या आतच, ताब्यात घेतले. विद्युत्वेगाने आगेकूच करून, १९२० मध्ये सोविएत संघाचा जेवढा प्रदेश पोलंडने बळकावला होता तो सर्व प्रदेश लाल लष्कराने व्यापला.

१ ऑक्टोबर रोजी रेडिओवरून केलेल्या भाषणात सोविएत रशियाच्या त्या कार्यवाहीचे समर्थन करताना विन्स्टन चर्चिल म्हणाला, ‘पोलंडमध्ये या सीमारेषेपर्यंत जाऊन सोविएत लष्कराने उभे ठाकावे, हे नाझींच्या विरुद्ध रशियाचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने आवश्यकच होते हे उघड आहे. लाल लष्कराच्या या कार्यवाहीमुळे, ज्यावर आघात करण्याची नाझींची हिंमत होणार नाही अशी एक पूर्व आघाडी निर्माण झाली आहे. बाल्टिक राज्ये व युक्रेन बळकावण्याच्या नाझींच्या कारवाया आता यापुढे बंद व्हायला पाहिजेत हे नाझींना बजावून सांगण्याकरिताच गेल्या आठवड्यात हर वॉन रिबेनट्रॉप याला मास्कोला बोलावून घेण्यात आले होते.’

नाझींच्या विस्तारवादाला शह देण्याच्या, व जर्मनविरुद्ध अनिवार्य दिसणाऱ्या युद्धात सोविएत संरक्षक तटबंदी मजबूत करण्याच्या हेतूने जी पावूले सोविएत संघाने उचलली त्यापैकी पश्चिमेच्या दिशेने लाल लष्कराची ही आगेकूच हे पहिले पाऊल होते. त्यानंतर, सप्टेंबर अखेरी व ऑक्टोंबरच्या प्रारंभी एस्तोनिया, लातविया व लिथुआनिया या सीमावर्ती राष्ट्रांशी सोविएत सरकारने परस्पर मदतीचे करार केले. लाल लष्कराची शिबंदी व सोविएत नाविक व विमानतळ तेथे प्रस्थापित करण्याची तरतूद त्या करारान्वये करण्यात आली होती.

अनुक्रमणिका

उत्तरेला फिनलंड मात्र जर्मनीचे मित्रराष्ट्र म्हणून सोविएत सीमेवर उभे होते. फिनलंडचा लष्करी नेता बॅरन वॉन मॅनरहीम हा जर्मन लष्करी अधिकाऱ्यांशी निकटचा संपर्क राखून होता. दोन्ही राष्ट्रांच्या लष्करी अधिकाऱ्यांत विचारविनिमयार्थ बैठकी होत होत्या. फिनिश लष्कराची शस्त्रसज्ञता व डावपेच यांवर जर्मन अधिकाऱ्यांची बारीक देखरेख असे. फिनिश लष्करी अधिकारी कार्ल ओएर, आणि पहिल्या महायुद्धात जर्मन लष्करात कामगिरी बजावलेला त्याचा प्रमुख मदतनीस जनरल ह्यूगो ओस्टरमन या दोघांचेही लष्करी प्रशिक्षण जर्मनीत झाले होते.

फिनलंड व नाझी जर्मनी यांचे राजकीय संबंधही घनिष्ट होते. फिनलंडचा सोशलिस्ट प्रधानमंत्री रिस्तो रायती याला हिटलर म्हणजे एक मोठा प्रतिभाशाली महापुरुष वाटत होता; तर जर्मनीने आयरन क्रॉस देऊन गौरविलेला व जर्मनीला सर्वस्वी अनुकूल असलेला फिनलंडचा सर्वात धनाढ्य व शक्तिशाली उद्योगपती पेर स्विन्हुफ्रूद हा पडद्याआडून फिनलंडच्या राजकारणाची सर्व सूत्रे हलवीत होता.

सोविएत संघावर आक्रमण करण्याकरिता तळ म्हणून फिनलंडचा उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने जर्मनीने, जर्मन अधिकारी व इंजिनिअर्स यांच्या देखरेखीखाली फिनलंडची एखाद्या बळकट अभेद्य किल्ल्याप्रमाणे लष्करी सज्ञता केली होती. फिनलंडच्या वायुदलात जितकी विमाने होती त्याच्या दसपट विमाने उतरविता येईल असे तेवीस लष्करी विमानतळ फिनलंडमध्ये उभारण्यात आले होते. संपूर्ण फिनिश सोविएत सीमेवर अत्यंत मजबूत गुंतागुंतीची व अभेद्य अशी तटबंदी नाझी तंत्रज्ञांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली उभारण्यात आली होती. या संपूर्ण मॅनरहीम रेषेवर शस्त्रसज्ञ लष्कर भरपूर संख्येने ठेवण्यात आले होते. अवजड तोफांनी सज्ञ ठेवण्यात आलेल्या त्या तटबंदीचे एक टोक लेनिनग्राडपासून जेमतेम २१ मैल अंतरावर होते. फ्रान्सच्या पश्चिम सीमेवरील मँजिनॉट तटबंदी प्रामुख्याने संरक्षणाच्या दृष्टीने उभारण्यात आली होती, तर फिनलंडच्या सीमेवरील मॅनरहीम तटबंदी मात्र केवळ संरक्षणाच्या हेतूने नव्हे तर मोठ्या प्रमाणावरील आक्रमक हल्ल्याकरिता सर्व सज्ञता राखता येईल या दृष्टीने उभारण्यात आली होती. मॅनरहीम लाईनच्या उभारणीचे काम पूर्ण होत आले तेव्हा १९३९ च्या ग्रीष्मात हिटलरचा सर्वोच्च लष्करी अधिकारी हाल्डर हा स्वतः त्या अवाढव्य व बलशाली तटबंदीची पाहाणी करण्याकरिता जर्मनीहून फिनलंडला आला होता.

एस्तोनिया, लातविया व लिथुआनियाशी सोविएत सरकारने केलेल्या कराराप्रमाणेच परस्पर मदतीचा करार फिनलंडशीही करावा याकरिता सोविएत संघाने प्रयत्न केला. मध्य कारोलियाचा हजारो चौरस मैलांचा प्रदेश सोविएत संघाने फिनलंडला द्यावा, व त्या मोबदल्यात लेनिनग्राडनजीकची लष्करी दृष्ट्या महत्वाची असलेली काही बेटे, कारेलियन संयोग भूमीचा काही भाग व सोविएत नाविक तळाच्या उभारणीकरिता हान्गो बंदराचे ३० वर्षाचे भाडेपट्टीचे अधिकार फिनलंडने सोविएत सरकारला द्यावेत असा प्रस्ताव सोविएत सरकारने फिनलंडपुढे ठेवला. क्रोन्स्तातचा नाविक तळ व लेनिनग्राड यांच्या संरक्षणाच्या दृष्टीने तो प्रदेश सोविएत नेत्यांना महत्वाचा वाटत होता.

अनुक्रमणिका

नोव्हेंबरच्या मध्यात नाझी प्रभावाखाली असलेल्या फिनिश सरकारने सोविएत संघाशी सुरू असलेल्या वाटाघाटी एकाएकी तोडून टाकल्या. नोव्हेंबर अखेरी फिनलंड व सोविएत संघ यात युद्धाला प्रारंभ झाला. बरेच दिवसापासून सोविएत संघाविरुद्धच्या ज्या युद्धाची ते वाट पाहत होते तेच हे युद्ध आहे असेच त्यावेळी इंग्लंड व फ्रान्समधील सोविएतविरोधी गटांना वाटले. त्यांच्या दृष्टीने पश्चिमेकडील पूर्णपणे थंडावलेले युद्ध हे मुळातच चुकीचे होते. खरे युद्ध होते ते हे पूर्वेकडचे! फिनलंडला मदत करण्याच्या निमित्ताने फ्रान्स, इंग्लंड व अमेरिका या राष्ट्रांत पुन्हा गंभीर स्वरूपाचा सोविएतविरोधी प्रचार उफाळून आला.

फिनिश-सोविएत युद्धाला तोंड लागण्यापूर्वी थोडेच दिवस अगोदर, नाझींविरुद्धच्या युद्धाकरिता ब्रिटनजवळ पुरेशी शस्त्रास्त्रे नाहीत अशी उघडपणे तक्रार करणाऱ्या प्रधानमंत्री चेंबरलेनने ताबडतोब ११४ ब्रिटिश विमाने, ११४ मोठ्या तोफा, १ लक्ष ८५ हजार तोफ गोळे, ५०००० ग्रेनेड्स्, १५७०० बॉम्ब्स्, १ लक्ष मोठे लष्करी कोट व ४८ रुग्णवाहिका फिनलंडला रवाना केल्या; आणि नाझी हल्ल्याला तोंड देण्याकरिता जेव्हा प्रत्येक बंदूक फ्रान्सला मोलाची वाटायला हवी होती, अशा वेळी फ्रेंच सरकारने १७९ विमाने, ४७२ तोफा, ७९५००० तोफ गोळे, ५१०० मशीनगन्स व २ लक्ष हँडग्रेनेड्स् इतके लष्करी साहित्य फिनलंडला पाठविले.

ब्रिटन व फ्रान्स यांनी जर्मनीविरुद्ध सप्टेंबरच्या प्रारंभी युद्धघोषणा केली असली तरी पश्चिमेकडे युद्धाची कोणतीही हालचाल दिसत नव्हती. पश्चिम आघाडीवरील युद्धस्तब्धता तशीच चालू असता जनरल आयरनसाईडसारख्या सोविएतविरोधी लष्कर प्रमुखांच्या प्रभावाखाली असलेल्या ब्रिटिश सर्वोच्च लष्करी अधिकारी वर्गाने सोविएत संघाविरुद्ध फिनलंडच्या वतीने लढण्याकरिता १ लक्ष सैनिक स्कँडिनेवियातून फिनलंडनला पाठविण्याची योजना आखली; तर त्याच वेळी जनरल वेगाँ याच्या नेतृत्वाखाली कॉकेशस क्षेत्रावर हल्ला करण्याकरिता फ्रेंच सर्वोच्च लष्करी अधिकारी तयारी करू लागले. बाकू तेल क्षेत्रावर बॉंब हल्ले करण्यास फ्रेंच बॉंबफेकी विमाने अगदी तयारीत आहेत अशी प्रौढी जनरल वेगाँ त्यावेळी उघडपणे मिरवीत होता.

फिनलंडच्या कौतुकास्पद विजयाच्या व सोविएत संघाच्या भयानक पराभवाच्या बातम्या, मोठमोठे मथळे देऊन ब्रिटिश, फ्रेंच व अमेरिकन वृत्तपत्रे मोठ्या चवीने छापीत होती.

अत्यंत दुर्गम प्रदेश, कधीकधी शून्याच्या ६० ते ७० डिग्री खाली जाणारे अत्यंत प्रतिकूल हवामान अशा अडचणींना सतत तीन महिने सामना करीत शेवटी मॅनरहीमची अभेद्य मानली गेलेली तटबंदी फोडण्यात व फिनिश लष्कराचे कंबरडे मोडण्यात लाल लष्कराला यश मिळाले. [अलीकडील काळात झालेल्या कोणत्याही युद्धापेक्षा फिनिश युद्धासंबंधी कमीत कमी सत्य व जास्तीत जास्त कपोलकल्पीत असत्य अमेरिकन वृत्तपत्रांनी पुरविले, असा अहवाल न्यूयॉर्क सिटी येथील 'इन्स्टिट्यूट फॉर प्रोपगँडा अनालिसिस'ने जून १९४० मध्ये दिला होता.]

अनुक्रमणिका

२९ मार्च १९४० रोजी सोविएत संघाच्या सुप्रीम सोविएतपुढे बोलताना मोलोतोव म्हणाला— 'फिनलंडच्या लष्कराचा दणदणीत व निर्णायक पराभव केल्यानंतर संपूर्ण फिनलंड व्यापणे सहजशक्य असूनही सोविएत संघाने तसे केले नाही, किंवा इतर कोणत्याही राष्ट्राने मागितली असती तशी नुकसानभरपाईही आपण मागितली नाही. शांतता करार करताना आमचा एकमेव उद्देश होता तो लेनिनग्राड—मर्मन्स्क व मर्मन्स्क रेल्वे यांची सुरक्षितता मिळवून घेण्याचा . . .'

ज्या दिवशी फिनिश सोविएत युद्ध थांबले त्याचदिवशी, पूर्वेकडे पाश्चिमात्य संस्कृतीचा बालेकिल्ला बनून राहाणे हे आपल्या लष्कराचे पवित्र कर्तव्य आहे, असे मॅनरहीमने फिनिश लष्कराला उद्देशून काढलेल्या जाहीरनाम्यात घोषित केले. नव्या सीमेवर नवी तटबंदी उभारण्यास लागलीच फिनिश सरकारने प्रारंभ केला. त्या बांधकामावर देखरेख करण्यास जर्मनीहून खास तंत्रज्ञ आले. स्वीडन व जर्मनीकडून मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रे विकत घेतली गेली. फिनलंडमधील जर्मन सैनिकांची वर्दळ वाढली. फिनिश व जर्मन लष्करी अधिकाऱ्यांचे एक संयुक्त मध्यवर्ती कार्यालय स्थापन करण्यात येऊन त्यात लष्करी डावपेचांवर विचार विनिमय सुरू झाला. त्यांची संयुक्त लष्करी संचलने सुरू झाली. हेलसिंकी येथील जर्मन दूतावासामधील व त्या देशातील ११ जर्मन कॉन्सुलेट्समधील हस्तकांची संख्याही झपाट्याने काढली.

१९४० च्या वसंतात पश्चिमेकडील युद्ध शांतता एकाएकी भंगली. ९ एप्रिल रोजी जर्मन सैन्याने डेन्मार्क व नॉर्वेवर हल्ला चढविला. अजिबात प्रतिकार न झाल्याने एका दिवसातच जर्मनीने डेन्मार्क व्यापले; व नॉर्वेने केलेला प्रतिकार मोडून काढून त्या महिना अखेर त्यांनी नॉर्वेही ताब्यात घेतले. नॉर्वेच्या मदतीला आलेल्या ब्रिटिश लष्कराला नॉर्वे सोडून निघून जावे लागले. मेजर विडकुन क्विस्लिंग याच्या नेतृत्वाखाली ओस्लो येथे जर्मनीच्या हातातील कळसूत्री बाहुले बनून राहणारे नॉर्वेचे नवे सरकार नाझींनी प्रस्थापित केले.

या सर्व घटना म्हणजे ब्रिटनच्या चेंबरलेन सरकारच्या अनुनयाच्या धोरणाचा दारूण पराभव होता. त्यामुळे १० मे रोजी ब्रिटनमध्ये चेंबरलेन सरकारने राजीनामा दिला. त्याच्या अदूरदर्शी नीतीमुळे अत्यंत विनाशकारी असे युद्ध त्याने ओढवून घेतले होते. त्याच दिवशी, इंग्लंडच्या राजाच्या आदेशानुसार विन्स्टन चर्चिल इंग्लडचे नवे मंत्रिमंडळ बनवीत असता, जर्मन लष्कराने हॉलंड बेल्जियम व लेक्झेंबर्ग यांवर हल्ला चढविला. २१ मे पर्यंत त्या क्षेत्रातील सर्व प्रतिकार जर्मनांनी मोडून काढला, व फ्लँडर्समध्ये दोस्त सैन्याला अडवून ते इंग्लिश खाडीपर्यंत जाऊन पोहोचले.

त्याबरोबर फ्रान्स भयग्रस्त झाले. ते संपूर्ण राष्ट्र पंचमस्तंभीयांनी पोखरले होते. फ्रेंच तुकड्यांना वाऱ्यावर सोडून फ्रेंच लष्करी अधिकारी निघून गेले होते. त्या तुकड्यांना लष्करी साहित्यही मिळेनासे झाले. कल्पनाही करवणार नाही अशा घोडचुका फ्रेंच लष्करी अधिकाऱ्यांनी केल्या असे पॉल रेमाँ फ्रेंच सेनेटला सांगत होता. 'फ्रान्सच्या पतनाला कारणीभूत ठरणाऱ्या राष्ट्रद्रोही, पराभूत मनोवृत्तीच्या भ्याडांचा' त्याने कठोर शब्दात धिक्कार केला. अनेक उच्चस्तरीय फ्रेंच अधिकाऱ्यांना तडकाफडकी अटक करण्यात

आली, पण या सर्व गोष्टींना आता फार उशीर झाला होता. फ्रान्सवर पंचमस्तंभीयांचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते.

माजी फ्रेंच वायुदल परिवहन मंत्री पियरे कॉट याने फ्रान्समधील तत्कालीन परिस्थितीबाबत आपल्या 'ट्राईम्फ ऑफ ट्रीझन' या पुस्तकात म्हटले—फ्रान्समध्ये व फ्रान्सच्या लष्करातही फासिस्टांचा इतका बुजबुजाट झाला होता की फ्रान्स जणू पूर्णपणे त्यांच्या प्रभावाखाली गेले होते. सोविएतविरोधाच्या बुरख्या आडून, फ्रान्सला पांगळे करून तेथे हिटलरचा मार्ग निष्कंटक व्हावा याकरिता अत्यंत गर्हणीय असे राजकीय कारस्थान शिजवले जात होते. वेगाँ, पेताँ व लावल हे त्या पंचमस्तंभीयांचे प्रमुख हस्तक होते. १२ जून १९४० रोजी कँज येथे भरलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत युद्ध समाप्त करण्याचे आवाहन जनरल वेगाँने सरकारला केले. पॅरिसमध्ये साम्यवादी क्रांती झालेली असून फ्रेंच साम्यवादी पक्षाचा सरचिटणीस मॉरिस तोरेझ याने राष्ट्राध्यक्षाच्या राजवाड्याचा ताबा घेतला असल्याने तसे करणे निकडीचे झाले आहे असे त्याने सांगितले. गृहमंत्री जॉर्जेस मँडेल याने ताबडतोब पॅरिसमधील पोलिस प्रमुखाला फोन लावून चौकशी केली तेव्हा वेगाँची बातमी पूर्णपणे असत्य असून राजधानीत कोणतीही गडबड नाही, लोक अगदी शांत आहेत असे कळले. परंतु रणक्षेत्रावर पराभव होऊन फ्रान्स कोलमडले, त्या गोंधळाचा फायदा घेऊन लावल व डार्लन यांच्या मदतीने पेताँ व वेगाँ यांनी फ्रान्सची सत्ता काबीज केली. त्यांनी राजकीय अधिकारांची मुस्कटदाबी करून जनतेचा आवाज कोंडून टाकला व फासिस्ट राजवट प्रस्थापित केली.

क्षणाक्षणाला फ्रान्समधील गोंधळ वाढत होता. सामान्य फ्रेंच सैनिक देशरक्षणाकरिता प्राणपणाने देत असलेला लढा निष्फळ ठरून पराभव दाराशी येऊन ठेपला होता. जगाच्या इतिहासात कधी नव्हे असे राष्ट्रद्रोहाचे विस्मयजनक नाट्य फ्रेंच राजकीय रंगभूमीवर उभे झाले होते.

फ्रान्सच्या मदतीला आलेले ब्रिटिश लष्कर २९ मे ४ जून या काळात प्रयत्नांची पराकाष्ठा करून डंकर्कहून ब्रिटिश सरकारने माघारी नेले.त्यामुळे ३ लक्ष ३५ हजार ब्रिटीश सैनिक बचावले.

१० जून रोजी फासिस्ट इटलीने फ्रान्स व इंग्लंड यांविरुद्ध युद्धघोषणा केली. १४ जून रोजी पॅरिस पडले. पेताँ, वेगाँ, लावल व ट्रॉट्स्कीवादी दोरियत ही नाझींच्या हातातील बाहुली फ्रान्सचे शासक बनली. २२ वर्षापूर्वी कोम्पेनच्या बनातील ज्या आगगाडीच्या डब्यात मार्शल फॉकने शरणागतीच्या अटी पराभूत जर्मनीवर लादल्या होत्या. त्याच डब्यात आता विजयी जर्मनी व पराभूत फ्रान्स यांनी २२ जून रोजी युद्धबंदी करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

❖ ❖ ❖

पश्चिमेकडे फ्रान्स कोलमडताच संघाची संरक्षक फळी अधिक मजबूत करण्याच्या हेतूने लाल लष्कराने वेगाने हालचाली सुरू केल्या.

अनुक्रमणिका

पश्चिमेकडून मोकळीक होताच नाझी जर्मनी बाल्टिक राज्ये ताब्यात घेण्यास सरसावेल हे ओळखून जूनच्या मध्यात सोविएत चिलखती तुकड्यांनी एस्तोनिया, लातविया व लिथूआनिया ही राज्ये ताब्यात घेतली; व बोल्शेविक क्रांतीनंतर सोविएत संघापासून रुमानियाने हिरावून घेतलेले बेसअरेबिया व उत्तर बुकोविना हे प्रदेशही २७ जून रोजी सोविएत लष्कराने व्यापले. त्याबरोबर नाझी जर्मनी व सोविएत संघ आमोरासमोर उभे ठाकले. त्या दोन राष्ट्रांतील भावी युद्ध आघाडी जणू तयार झाली.

जुलै अखेरी नाझी विमानांनी लंडन व इंग्लंडची इतर शहरे यावर भयंकर बॉंबफेक सुरू केली. ऑगस्टमध्ये त्या हल्ल्यांची तीव्रता खूपच वाढली. त्या हल्ल्यांमुळे संपूर्ण इंग्लंड भयभीत व पांगळे व्हावे व त्या राष्ट्राने शरणागती पत्करावी हा नाझींचा उद्देश होता परंतु त्या सर्व संकटमय परिस्थितीत ग्रेट ब्रिटनमध्ये फार मोठा बदल घडून आला होता चेंबरलेन मंत्रिमंडळाच्या अदूरदर्शी नेतृत्वामुळे उद्‌भवलेला गोंधळ व मतभेद नाहीसा होऊन एक नवे राष्ट्रीय ऐक्य व निर्धार जनतेत निर्माण झाला होता. पंचमस्तंभीयांच्या कारवायांमुळे युरोपीय राष्ट्रांवर केवढा अनर्थ गुदरला होता हे सरकारला कळतच होते त्या अनुभवाने खडबडून जागे होऊन ब्रिटिश सरकारने राष्ट्रातून फितुरीचे विष निपटून काढण्याच्या हेतूने निग्रहाने कार्यवाही केली नाझी हस्तक, ब्रिटिश फासिस्ट्स् व पंचमस्तंभीय कारस्थानांचे नेते यांच्यावर स्कॉटलंड यार्ड व ब्रिटिश गुप्त पोलिस यांनी अकस्मात धाडी घातल्या ब्रिटिश युनियन ऑफ फासिस्ट्स यांना लंडन येथील मध्यवर्ती कार्यालयावर घातलेल्या छाप्यात त्यांच्या हेरगिरीसंबंधाची महत्वाची कागदपत्रे त्यांच्या हाती आली. अनेक पंचमस्तंभीय पकडले गेले. ब्रिटिश फासिस्ट पक्षाचा नेता सर ओस्वाल्ड मोस्ले, तसेच राजकीय व सामाजिक क्षेत्रातील बरीच ख्यातनाम मंडळी पकडली गेली. माजी पार्लमेंट सदस्य व नाझीधार्जिण्या पीपल्स पार्टीचा संस्थापक जॉन बेकेट, पार्लमेंटचा टोरी सदस्य कॅप्टन ए.एच.रॅम्से, आरोग्य मंत्रालयातील एक अधिकारी एडवर्ड डडले इलान व त्याची पत्नी मिसेस द्राके फॉक्स यासह, नाझींना व फासिस्टांना अनुकूल असलेल्या अनेकांची रवानगी गजाआड करण्यात आली. राष्ट्रद्रोहाकरिता मृत्युदंडाची शिक्षा देण्याची तरतूद करणारे फितुरी-प्रतिबंधक विधेयक पार्लमेंटमध्ये पारित करण्यात आले.

फ्रान्समधील घटनांमुळे व मास्को खटल्यामुळे आवश्यक तो धडा ब्रिटिश सरकार शिकले होते. जुलै १९४० मध्ये नाविक हेर खात्याचा माजी संचालक अॅडमिरल सर बॅरी डोमविल याला अटक झाली असल्याचे सरकारने जाहीर केले. डोमविल हा अल्फ्रेड रोझेनबर्गचा व दिवंगत मॅक्स हॉफमनचा निकटचा मित्र होता. व १९१८ पासून जवळजवळ सर्वच सोविएतविरोधी कारस्थानांत त्याचे हात गुंतलेले होते. अटक झाली तेव्हा गेस्टॅपो-प्रमुख हेन्रिच हिमलरच्या मदतीने प्रस्थापित झालेल्या ‘द लिंक’ या नाझीधार्जिण्या गुप्त संस्थेचा डोमविल हा प्रमुख होता.

अशा प्रकारे अन्तर्गत क्षेत्रातून फितुरीची पाळेमुळे खणून काढली गेल्याने नाझी वायुहल्ल्याच्या दिव्याला निर्धाराने तोंड देणे ब्रिटीशांना शक्य झाले.१७ सप्टेंबर १९४० या एकाच दिवशी ब्रिटिश विमानभेदी तोफांनी जर्मनीची १८५ विमाने इंग्लंडच्या भूमीवर पाडली.

अनुक्रमणिका

ब्रिटनच्या अनपेक्षित प्रखर प्रतिकाराने व जर्मनीच्या पूर्व सीमेवर लाल लष्कर उभे ठाकले असल्याच्या जाणीवेमुळे हिटलरने ब्रिटनविरुद्धचे युद्ध आवरते घेतले. ब्रिटीश बेटांवर आक्रमण करण्याची कल्पना त्याने बाजूला ठेवली.

१९४१ मध्ये नाझी जर्मनी व सोविएत संघ या दोन लष्करी महासत्ता परस्परांसमोर युद्ध सज्जतेत उभा ठाकलेल्या असल्याने संपूर्ण युरोपचे वातावरण तंग झाले होते. १ मार्च रोजी नाझी लष्कर सोफियात शिरले. बल्गेरिया हे राष्ट्र नाझींचा लष्करी तळ बनले.

६ एप्रिल रोजी युगोस्लाव जनतेने उठाव करून रीजंट प्रिन्स पॉलची राजवट उलथून पाडली. त्यामुळे नाझी हस्तकांना युगोस्लावियातून पळून जाणे भागच दडले. सोविएत सरकारने नव्या युगोस्लाव सरकारशी आक्रमणाचा करार केला. त्याच दिवशी नाझींनी युगोस्लावियावर आक्रमण केले.

५ मे रोजी सोविएतसंघात प्रधानमंत्रीपदाची सूत्रे स्टालिनने स्वतःच्या हाती घेतली. [शनिवार, १० मे रोजी १९४१ च्या रात्री साडेदहा वाजता एका जर्मन विमानाने स्कॉटलंडमधील लानार्कशायर येथे जर्मनीच्या दिशेने झेप घेतली, व ड्यूक ऑफ हॅमिल्टनच्या डंगावेल कासलनजीकच्या शेतात नाक खुपसून ते विमान थांबले. त्या विमानाला आग लागल्याचे व एक पांढऱ्या रंगाचे पॅराशूट खाली उतरत असल्याचे ड्यूकच्या एका कर्मचाऱ्याच्या लक्षात आले. त्याबरोबर तो तिकडे धावला, तो तेथे पायाच्या घोट्याला दुखापत होऊन जमीनीवर पडलेला एक माणूस त्याला दिसला. तो होता रूडॉल्फ हेस, अडॉल्फ हिटलरचा प्रतिनिधी. 'मानवजातीचे संरक्षण करण्याकरिता मी आलो आहे. मला ड्यूक ऑफ हॅमिल्टनकडे घेऊन चल.' हेसने इंग्रजीतून त्या कर्मचाऱ्याला सांगितले. हॅमिल्टन व त्याचे सहकारी यांच्या द्वारा नाझींच्या सोविएत संघावरील हल्ल्याकरिता ब्रिटीश टोरी पक्षाचा पाठिबा मिळवून घेण्याचा त्याचा उद्देश होता.

११ जून १९४१ रोजी ग्लास्गोचा लॉर्ड प्रोव्होस्ट सर पॅट्रीक डोलान म्हणाला, 'स्कॉटलंडमध्ये दोन दिवस राहून इंग्लंडमधील काही गटांशी ब्रिटिश-जर्मन हातमिळवणीबाबत बोलणी करता येतील या अपेक्षेने हेस येथे आला. येथून जर्मनीत परत जाण्याकरिता त्याला पेट्रोल व नकाशे मिळतील व त्याच्या कामगिरीच्या फलनिष्पत्तीबाबत त्याला हिटलरला अहवाल देता येईल अशी त्याची अपेक्षा होती.'

६ नोव्हेंबर १९४१ रोजी केलेल्या एका भाषणात हेस शिष्टाईचा उल्लेख करताना स्टालिन म्हणाला, "निरनिराळ्या देशातील परस्परविरोधी गटांतील अंतर्विरोध व त्या राष्ट्रांना सोविएत संघाबद्दल वाटणारा द्वेष यांचा स्वतःच्या उद्दिष्टसिद्धीकरता उपयोग करून घेण्याच्या नाझी नीतीमुळे फ्रान्समध्ये त्यांच्या पदरात जसे भरीव यश पडले, क्रांतीच्या धास्तीने, त्यांनी नाझींना प्रतिकार तर केला नाहीच उलट आपला देश त्यांनी नाझींना जसा पायाखाली तुडवू दिला, तसेच ग्रेट ब्रिटन व अमेरिकेबाबतही घडेल असे जर्मन फासिस्टांना वाटले. सोविएत संघाविरुद्धच्या त्यांच्या मोहिमेत ब्रिटनने सहभागी व्हावे याकरिता ब्रिटिश मुत्सद्यांचे मन वळविण्याच्या उद्देशानेच जर्मन फासिस्टांनी हेसला ग्रेट ब्रिटनला पाठविले होते. पण त्याबाबत त्यांचे अंदाज चुकले. हेस शिष्टाईचा हेतू सफल होणे दूरच उलट तो ब्रिटिश सरकारचा कैदी मात्र बनला.]

२२ जून १९४१ रोजी पहाटे चार वाजता, युद्धघोषणा न करताच हिटलरचे रणगाडे विमानदळ, तोफखाना, पायदळ असा जर्मनांचा अफाट सेनासागर बाल्टिकपासून काळ्या समुद्रापर्यंतच्या सोविएत रशियाच्या पश्चिम सीमेवर आदळला.

नंतर त्याच दिवशी गोबेल्सने हिटलरचे युद्धघोषणेसंबंधीचे वक्तव्य रेडिओवरून प्रसृत केले. त्यात त्याने म्हटले—' जर्मन लोक हो! आजपर्यंतच्या जगाच्या इतिहासात अभूतपूर्व ठरणारी अशी जर्मनांची प्रचंड आगेकूच रशियात सध्या सुरू आहे. आपल्या फिनिश सहकाऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून नॉर्वेवर विजय मिळवलेले ते शूर लढवय्ये उत्तर आर्क्टिकनजीक सध्या उभे ठाकले आहेत. नॉर्वे विजेत्यांच्या नेतृत्वाखाली

अनुक्रमणिका

जर्मन तुकड्या फिनिश स्वातंत्र्यवीरांसह फिनलंडच्या भूमीचे रक्षण करीत आहेत. जर्मनीच्या पूर्व आघाडीवर पूर्व प्रशियापासून ते दक्षिणेला कार्पेथियन पर्वतापर्यंत जर्मन तुकड्या आगेकूच करीत आहेत.

प्रूथच्या किनाऱ्यापासून ते काळ्या समुद्रकिनाऱ्यापर्यंत जर्मन व रुमानियन सैन्य रशियाला धडक देत आहे. या संपूर्ण लष्करी कार्यवाहीचा हेतू एखाद्या दुसऱ्या राष्ट्राचे रक्षण करण्याचा नसून संपूर्ण युरोपचे रक्षण करण्याचा आहे—म्हणजेच, सर्वांच्या उद्धाराचा आहे.

सोविएत रशियाविरुद्धच्या नाझी हल्ल्यात इटालियन, रुमानियन, हंगेरीयन, व फिनिश लष्करी दलेही सहभागी झाली होती. प्रतिक्रांतिकारी युरोपच्या त्या संयुक्त लष्करांनी सोविएतांविरूद्ध ‘धर्मयुद्ध’ सुरू केले होते. जनरल हॉफमनने काही वर्षापूर्वी कल्पिलेल्या योजनेला मूर्त स्वरूप येत होते.

७ डिसेंबर १९४१ रोजी कोणतीही पूर्व सूचना न देता जपानी बॉंबफेकी विमाने व युद्धनौका यांनी अमेरिकेच्या पर्ल हार्बर या बंदरावर हल्ला केला. त्या पाठोपाठ नाझी जर्मनी व फासिस्ट इटली यांनीही अमेरिकेविरुद्ध युद्ध घोषणा केली.

९ डिसेंबर रोजी अमेरिकन जनतेला उद्देशून केलेल्या भाषणात अध्यक्ष रूझवेल्ट म्हणाला, ‘गेल्या १० वर्षात जपानने आशियात चोखाळलेली नीती हिटलर व मुसोलिनी यांनी युरोप व अफ्रिकेत अवलंबिलेल्या नीतीशी पूर्णपणे मिळती जुळती आहे. आता तर त्या हुकुमशाही राष्ट्रांत नीतीची व कार्यवाहीची सुसूत्रता व समन्वय इतका योजनाबद्ध झालेला आहे की जगातील सर्व देश व सर्व महासागर यांना त्या लष्करवाद्यांनी एक अती विशाल रणभूमी बनवून टाकले आहे.

१९३१ मध्ये कोणतीही पूर्वसूचना न देता जपानने मांचूरियावर हल्ला केला.

१९३५ मध्ये पूर्वसूचनेशिवाय मुसोलिनीने इथिओपियावर आक्रमण केले.

१९३८ मध्ये पूर्वसूचनेशिवाय हिटलरने ऑस्ट्रिया गिळंकृत केले.

१९३९ मध्ये कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय हिटलरने प्रथम झेकोस्लोवाकिया व नंतर पोलंड यांवर आक्रमण केले.

१९४० मध्ये हिटलरने नॉर्वे, डेन्मार्क, हॉलंड, बेल्जियम, लक्झेंबर्ग व फ्रान्स यांवर आक्रमण केले. पूर्वसूचनेशिवायच!

१९४० मध्ये इटलीने फ्रान्सवर व नंतर ग्रीसवर पूर्वसूचनेशिवायच हल्ला केला.

अनुक्रमणिका

१९४१ हिटलरने रशियावर हल्ला केला, पूर्वसूचनेशिवायच!

१९४१ आता जपानाने मलाया, थायलंड, व अमेरिकेवर पूर्वसूचनेशिवाय हल्ला केला आहे. हे सर्व एकाच कार्यपद्धतीने झाले आहे.

आता सर्व मुखवटे गळून पडले होते. सोविएत रशियाविरुद्धच्या ॲक्सीस-कॉमिन्टर्नविरोधी लढा आता जगातील सर्व स्वतंत्र जनतेविरुद्धचे एक जागतिक युद्ध बनले होते.

१५ डिसेंबर १९४१ रोजी काँग्रेसला पाठविलेल्या एका संदेशात अध्यक्ष रूझवेल्ट म्हणाला— '१९३६ मध्ये जर्मनीशी कॉमिन्टर्नविरोधी करार करून जपानने त्या राष्ट्राशी उघडपणे हातमिळवणी केली. वरवर दिसायला हा करार सोविएत संघाविरुद्ध होता हे सर्वांना माहीतच आहे. पण त्या कराराचा प्रमुख हेतू होता तो म्हणजे जगातील मुक्त जनतेविरुद्ध, विशेषेकरून ग्रेट ब्रिटन, फ्रान्स व अमेरिका यांविरुद्ध फासिस्ट राष्ट्रांची युती साधणे हा होता.

आंतर्राष्टीय फासिझम व प्रागतिक मानवजातीची लष्करे यांतील संघर्ष संपूर्ण जगाच्या रणांगणावर सुरू झाला. दुसऱ्या महायुद्धाच्या अंतिम फेरीला प्रारंभ झाला.

अनुक्रमणिका

## प्रकरण २३

# अमेरिकेतील कॉमिन्टर्नविरोध

### ‘ब्लॅक हंड्रेस्’ चा वारसा

२२ जून १९४१ नंतर ॲक्सीस गटाच्या राजनीतीचा एकच प्रमुख उद्देश होता, तो म्हणजे नाझी जर्मनीविरुद्ध घडून आलेल्या अँग्लो सोविएत युतीत अमेरिकेला सामील होऊ न देणे. अमेरिकेला एकाकी पाडणे हे जर्मन लष्करवाद्यांच्या योजनासिद्धीच्या दृष्टीने अत्यंत अगत्याचे होते. त्यामुळे त्यांच्या प्रचाराचा व कारस्थानी यंत्रणेचा सगळा रोख त्यांनी अमेरिकेकडे वळविला.

१९१८ पासूनच सोविएत रशियासंबंधी अमेरिकन जनतेवर नानाप्रकारच्या खोट्यानाट्या प्रचाराचा मारा सतत चालू होताच. रशियन क्रांती म्हणजे खुनी, अधःपतित गुन्हेगारांच्या चिथावणीमुळे बेताल व रानटी गुंडांनी केलेले एक गर्हणीय कृत्य आहे, लाल लष्कर म्हणजे केवळ एक बेशिस्त जमाव आहे; सोविएत अर्थकारण हे सर्वस्वी अव्यवहार्य असून सोविएत उद्योग व शेती म्हणजे केवळ फार मोठे अराजक आहे, त्यांतून कोणतीही फलनिष्पती अशक्य आहे; मास्कोतील क्रूर शासकांविरुद्ध बंड करून उठण्याकरिता युद्धासारख्या योग्य संधीची सोविएत जनता अगदी वाटच पाहात आहे, असा अविरत प्रचार तेथे सुरू होता. नाझी जर्मनीने सोविएत रशियावर हल्ला करताच, ते राष्ट्र लवकरच कोसळणार अशी भविष्यवाणी अमेरिकेत अनेक मुखांनी ऐकू येऊ लागली. त्यातील काही मासलेवाईक नमुने असे—

‘हिटलर ३० दिवसाच्या आतच रशिया काबीज करणार!’ काँग्रेस सदस्य मार्टिन डाईस २४ जून १९४१.

‘अल्पावधीतच सोविएतांचा निर्णायक पराभव न झाला तर बायबलमध्ये वर्णन केलेल्या अनेक अकल्पनीय कथांपेक्षाही तो एक फार मोठा चमत्कार ठरेल.’ फ्लेचर प्रॅट. न्यूयॉर्क पोस्ट, २७ जून १९४१.

‘रशियाची शंभर वर्षे आता भरली आहेत. नाझी लष्कराच्या घणाघाती प्रहारामुळे होणाऱ्या विनाशापासून रशियाचा बचाव करणे हे अमेरिका व ग्रेट ब्रिटन यांच्या शक्तीबाहेरचे काम आहे.’ हीअर्स्टचे न्यूयॉर्क जर्नल-अमेरिकन, २७ जून १९४१.

‘कर्मचाऱ्यांची क्षमता, नेतृत्व, प्रशिक्षण, शस्त्रास्त्रे व अन्य युद्धसाहित्य या कोणत्याच बाबतीत रशियन्स जर्मनांच्या पासंगालाही पुरे पडू शकत नाहीत. तिमोशेन्को, बुद्येनी, व स्टर्न यांची तुलनाही

अनुक्रमणिका

कायटेल व ब्राऊचिटझ् यांच्याशी करणे शुद्ध मूर्खपणाचे ठरेल. पक्षशुद्धी व रशियन राजकारणातील अराजक यामुळे लाल लष्कराच्या सामर्थ्यावर अत्यंत विदारक परिणाम झालेला आहे' हॅन्सन डब्लू.बाल्डविन. न्यूयॉर्क टाईम्स, २९ जून १९४१.

'अकार्यक्षमता, हुकुमशाही शासन, व्यवस्थापन व उपक्रमक्षमतेचा पूर्ण अभाव, दहशत व पक्षशुद्धी यावर आधारलेले राजकारण व सरकार, यामुळे अवाढव्य दिसणारे रशिया अगदी दुबळे व असहाय्य झालेले आहे. त्याकरिता वेगळे काही स्पष्टीकरण देण्याची गरजच नाही. सतत २५ वर्षे सोविएत संघ जगाच्या डोळ्यात धूळ फेकीत आले आहे. पण आता त्या सगळ्याच गोष्टींचा शेवट होणार आहे. युद्धात सोविएत रशियाची इतिश्री होणार हे नक्की! तो धक्का सहन करण्याची आपण आपल्या मनाची तयारी ठेवावी ते बरे!' जॉर्ज ई. सोकोलस्की, २६ जून १९४१.

२० नोव्हेंबर १९४१ रोजी 'हाऊस्टन पोस्ट' मध्ये 'रशियाबद्दलचे अज्ञान' या शीर्षकाखाली एक संपादकीय लेख प्रसिद्ध झाला. अमेरिकन जनसामान्यांच्या मनात पुन्हा पुन्हा डोकावणारा एक प्रश्न त्यात उपस्थित केला होता. 'सोविएत रशियाने केलेल्या प्रगतीबद्दल गेली वीस वर्षे अमेरिकन जनतेला पूर्णपणे अज्ञानात का ठेवले गेले याचे समाधानकारक उत्तर अजूनही दिले गेलेले नाही. हिटलरने सोविएत संघावर हल्ला केला तेव्हा स्टालिन फार काळ टिकू शकणार नाही याबद्दल या देशात सर्वांचे एकमत होते. रशियाबद्दल आता आशा करण्यात अर्थ नाही, नाझी जर्मनी लवकरच संपूर्ण रशिया काबीज करणार असेच आपल्या तज्ज्ञांना वाटत होते. नाझींच्या लष्करी आगेकूचीबरोबर रशिया गुंडाळला जाणार अशी बहुसंख्य अमेरिकनांची खात्री होती. परंतु तसे काही झालेले नाही. रशियाबद्दलची खरी माहिती अमेरिकन जनतेपासून का लपवून ठेवण्यात आली?' असा प्रश्न त्या लेखात विचारला होता.

अमेरिकन लोक व सोविएत जनता यांच्यात १९१८ पासूनच जणू एक भिंत उभारण्यात आली होती. प्रतिक्रियावादी मुत्सद्दी व उद्योगपती, श्वेत रशियन निर्वासित व त्यांचे प्रतिक्रांतिकारी हस्तक यांनी, व ॲक्सीस प्रचार मंत्रालय व गुप्तचर सेवा यांच्या हस्तकांनी सोविएतसंघाबद्दल अमेरिकेत हेतुपुरस्सर विद्वेषाची व भीतीची भावना रुजवली होती. रशियात क्रांती होताच श्वेत रशियनांनी बनावट कागदपत्रांच्या आधारावर अमेरिकेत तुफानी प्रचार करून सोविएत रशियाबद्दल अमेरिकेत साशंकता व शत्रुत्व निर्माण केले; आणि त्यानंतर लवकरच, फासिस्टांनी खुद्द अमेरिकेविरुद्ध गुप्तपणे चालविलेल्या प्रचारमोहिमेत श्वेत रशियनांचा प्रचार एकरूप झाला.

१९२४ पासूनच अमेरिकेत नाझी गट प्रस्थापित होऊ लागले. शिकागो येथील 'नाझी ट्युटोनिया सोसायटी' चा प्रमुख फ्रीटझ गिसिब्ल याच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे कार्य चाले. त्याच वर्षी कॅप्टन सिडने रॅली व त्याचे श्वेत रशियन सहकारी यांनी त्यांच्या बोल्शेविझमविरोधी इंटरनॅशनल लीगची एक शाखा अमेरिकेत स्थापन केली. १९२० ते १९३० या दशकात रुडॉल्फ हेस व अल्फ्रेड रोझेनबर्ग यांच्या आदेशानुसार फ्रिटझ् गिसिब्ल व हाईन्स स्पांकनोबेल यासारखे नाझी हस्तक श्वेत रशियनांच्या हातात हात घालून अमेरिकेत लोकशाहीविरोधी व सोविएतविरोधी कारवाया करीत होते.

श्वेत रशियन पीटर अफनासिएव उर्फ प्रिन्स पीटर कुशुब्यू उर्फ पीटर आर्मस्ट्राँग १९२२ मध्ये सानफ्रान्सिस्को येथे आला. 'प्रोटोकोल्स ऑफ झिऑन'ह्या पुस्तकाच्या अमेरिकेतील वितरणाला त्याने चांगलाच हातभार लावला. तसेच नाझीधार्जिणा झारकालीन अधिकारी कॅप्टन व्हिक्टर डी कायोविल याच्या सहकार्याने ज्यूविरोधी व नाझीसमर्थक प्रचारपत्रिका प्रकाशित करण्यास त्याने प्रारंभ केला. त्यात फ्रिट्झ् गिसिब्ल व ओस्कार फॉस या नाझी हस्तकांचाही सहभाग होता.

अतामन ग्रेगोरी सेम्योनोव याच्या जपानी वर्चस्वाखाली श्वेत रशियन लष्कराचा माजी कर्नल निकोलाय रिबाकोव हा १९२२—२३ च्या सुमारास अमेरिकेत आला. सोविएत ज्यूविरोधी प्रचार त्याने अमेरिकेत सुरू केला.

हिटलर १९३३ मध्ये सत्तेवर येताच रिबाकोव याने 'रोसिया' हे नाझीधार्जिणे वृत्तपत्र न्यूयॉर्क सिटीत सुरू केले. जपानी हस्तक सेम्योनोव व त्याचा मदतनीस रोद्झेवस्की हे जपानच्या मांचुकुओतील श्वेत लष्कराचे नेते रिबाकोवशी संपर्क साधून होते. रोसियात नाझी प्रचाराबरोबरच मांचुकुओ येथून जपान करीत असलेल्या प्रचारालाही प्रसिद्धी दिली जात होती. १९४१ मध्ये नाझींनी रशियावर हल्ला केला तेव्हा 'नाझी लष्कर म्हणजे न्याय शिक्षा देणाऱ्या दैवाची तळपती तलवार आहे. हिटलरचे नाझी सैन्य हे राष्ट्रभक्त, ख्रिश्चन व बोल्शेविकविरोधी असे विजयी लष्कर आहे,' असे नाझी लष्कराचे वर्णन रिबाकोवच्या वृत्तपत्राने केले होते. [कट्टर ज्यूविरोधी प्रचारक व झारकालीन ओघ्राानाचा हस्तक बोरिस ब्रासोल हा रिबाकोवच्या बरोबरीने रोसियात लेख लिहित असे. रशियन क्रांतीनंतर लागलीच त्याने पहिली सोविएतविरोधी संघटना अमेरिकेत प्रस्थापित केली. 'प्रोटोकोल्स ऑफ झिऑन' या पुस्तकाच्या वितरणातही तो आघाडीवर होता.

कधी ना कधी रशियात झारशाहीची पुनर्स्थापना होईल ही ब्रासोलच्या हृदयात दडून असलेली आशा कधीच नाहीशी झाली नव्हती. १९२० ते १९४० या काळात त्याने अमेरिकेत सोविएत संघाविरुद्ध अविश्रांतपणे प्रचार केला. श्वेत रशियनांच्या सोविएतविरोधी संस्था त्याने स्थापन केल्या. सोविएत संघावर हल्ला चढविणारे लेख व पुस्तके लिहिली; व सोविएतविरोधी बनावट कागदपत्रे अमेरिकन सरकारला भरपूर प्रमाणात पुरवली. श्वेत रशियन संघटनांच्या प्रतिनिधींच्या न्यूयॉर्क येथे १५ नोव्हेंबर १९३५ ला भरलेल्या एका गुप्त सभेत, १९१६ मध्ये अमेरिकेत आल्यापासून त्याच्या सोविएतविरोधी कारवायांचा अहवाल देत तो तासभर बोलत होता. १९३३ पर्यंत सोविएत संघाला अमेरिकेने राजनैतिक मान्यता न देण्याचे बरेचसे श्रेय त्याच्याकडे कसे जाते याचा त्याने त्यावेळी मोठ्या अभिमानाने उल्लेख केला.

सोविएत कायद्याचा तो तज्ज्ञ असल्याची त्याने स्वतःहून बरीच जाहिरात केली, व न्यूयॉर्कसिटीतील एका कायदासंस्थेचा तो सल्लागार बनला. सोविएत संघासंबंधित तज्ज्ञ सल्ला देण्याकरिता अमेरिकन सरकारी संस्थांनीही त्याची नेमणूक केली. रशियन साहित्य व तत्सम विषयांवर कोलंबिया विद्यापिठात व अन्य शिक्षणसंस्थात तो व्याख्याने द्यायला जात असे. या सर्व गोष्टींमुळे बऱ्याच बड्या व प्रभावी मंडळीशी त्याने संपर्क प्रस्थापित केला व सोविएत रशियाबद्दल सांशकता व शत्रुत्व वृद्धिगंत होईल याकरिता त्यांचा उपयोग करून घेतला.

१९४० च्या शरदात जेव्हा 'अमेरिका फर्स्ट' कमिटी ही अलिप्ततावादी व सोविएतविरोधी संस्था प्रस्थापित झाली त्यावेळी लागलीच ब्रासोल त्या संस्थेचा तो सक्रिय पाठिराखा बनला. फार मोठ्या प्रमाणावर सोविएतविरोधी प्रचार साहित्य तयार करून त्या कमिटीद्वारा ते वितरित करण्याची त्याने व्यवस्था केली. त्या कमिटीच्या प्रकाशनात त्याचे लेखही प्रसिद्ध होत. ब्रासोलने अमेरिका फर्स्ट कमिटीला पुरविलेल्या प्रचार साहित्यापैकी एक महत्वाचा लेख होता तो उधारउसनवार योजनेनुसार अमेरिका रशियाला करणार असलेल्या मदतीचा धिक्कार करणारे एक पत्रक. दूरपूर्वेतील, जपानी देखरेखीखाली सोविएतविरोधी कारवाया करणाऱ्या २१ 'श्वेत रक्षक' संघटनांच्या त्याच्यावर सह्या होत्या. व त्यात अतामन ग्रेगोरी सेम्योनोवचा प्रमुख मदतनीस कॉन्स्टटाईन रोद्झेवस्की याच्या नेतृत्वाखाली काम करणाऱ्या रशियन फासिस्ट युनियनचाही समावेश होता.]

अनुक्रमणिका

अमेरिकेतील नाझी व श्वेत रशियन्स यातील मुख्य दुवा होता तो ‘जर्मन अमेरिकन बंडचा’ सचिव जेम्स व्हीलर-हिल.हा जर्मन नसून बाकूत जन्माला आलेला श्वेत रशियन होता. रशियात श्वेत लष्कराचा पराभव झाल्यानंतर तो प्रथम जर्मनीत व नंतर अमेरिकेत गेला. १९३९ मध्ये नाझी हेर असल्याच्या आरोपावरून फेडरल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशनने त्याला अटक केली होती.

अमेरिकेतील श्वेत रशियनांपैकी सर्वात आघाडीचा जर्मन व जपानी हस्तक तो ‘काऊंट’ अनास्तसे ए. वोन्सियात्स्की. २५ सप्टेंबर १९३३ रोजी नाझी हस्तक पॉल एवॉन लिलियनफेल्ड-टोल याने ‘सिल्वर शर्टस्’ या नाझीधार्जिण्या संघटनेचा प्रमुख विलियम डडले पेली याला लिहिलेल्या पत्रात, वोन्सियात्स्की हा रशियन फासिस्टांच्या सेनाश्रेष्ठींचा नेता असल्याचा उल्लेख केला होता. थॉम्पसन (कनेक्टिकट) येथे राहणारा काऊंट वोन्सियात्स्की हा पूर्वी डोनिकिनच्या श्वेत लष्करात एक अधिकारी होता. डेनिकिनच्या पराभवानंतर एका दहशतगटाचे नेतृत्व करून क्रूर मार्गांनी त्याने जनतेकडून अमाप पैसा उकळला. १९२१ च्या सुमारास तो अमेरिकेत आला. तेथे मिसेस मरियन बकिंगहॅम रीम स्टीफन्स ह्या त्याच्यापेक्षा २२ वर्षांनी मोठ्या असलेल्या धनाढ्य बाईशी त्याने लग्न केले, तो अमेरिकन नागरिक बनला आणि थॉम्पसन येथील तिच्या ‘रीम’ इस्टेटीवर मोठ्या ऐषारामात राहू लागला. त्याच्या पत्नीच्या अफाट पैशाच्या बळावर सोविएतविरोधी लष्कर उभारण्यास त्याने प्रारंभ केला. त्या लष्कराचे नेतृत्व करून मास्कोवर चाल करून जाण्याचे त्याचे स्वप्न होते. युरोप, दक्षिण अमेरिका व आशिया खंडात हिंडून तोर्गप्रोम, बोल्शेविझमविरोधी इंटरनॅशनल लीग व अन्य सोविएतविरोधी संघटनांशी त्याने निकटचा संपर्क प्रस्थापित केला. ऑगस्ट १९३३ मध्ये ‘रशियन फासिस्ट नॅशनल रेव्होल्यूशनरी पार्टी त्याने प्रस्थापित केली. हिटलरच्या नाझी पक्षाचे चिन्ह स्वस्तिक हेच त्या संघटनेचे अधिकृत चिन्ह होते व थॉम्पसन येथील ‘रीम इस्टेट’ मध्ये तिचे मध्यवर्ती कार्यालय होते. तेथे रायफल्स, बंदुका, मशीनगन्स इत्यादी युद्ध साहित्याचे कोठार निर्माण करून स्वस्तिक चिन्हाच्या गणवेशातील सैनिक गटांना तो लष्करी प्रशिक्षण देऊ लागला.

मे १९३४ मध्ये टोकियो, हार्बिन व दूर पूर्वेतील अन्य केंद्रांना भेटी देऊन जपानी लष्करी अधिकारी व अतामन सेम्योनोवसह सर्व श्वेत रशियन नेते यांच्याशी त्याने विचारविनियम केला. जपानहून तो जर्मनीत गेला. तेथे अल्फ्रेड रोझेनबर्ग, डॉ. गोबेल्स व जर्मन लष्करी हेरखात्याचे प्रतिनिधी यांची त्याने भेट घेतली, व अमेरीकेत हेरगिरी करून महत्वाची माहिती जर्मनी व जपानला नियमीतपणे पुरविण्याचे त्याने कबूल केले.

वोन्सियात्स्कीच्या संघटनेच्या शाखा न्यूयॉर्क, सानफ्रान्सिस्को, लॉस एन्जल्स, एवढेच नव्हे तर साओ पावलो, ब्राझील, हार्बिन, मांचुकुओ, येथेही प्रस्थापित करण्यात आल्या. त्या सर्व शाखांचे कामकाज जर्मन व जपानी लष्करी हेरखात्यांच्या देखरेखीखाली चाले.

अमेरिकेत हेरगिरी करण्याव्यतिरिक्त वोन्सियात्स्कीची संघटना अमेरिकेत आणखी एक महत्वाचे काम करीत होती; ते म्हणजे सोविएत संघाविरुद्ध दहशतवादी व, घातपाती कृत्यांची मोहीम चालविणे.

अनुक्रमणिका

थॉम्पसन येथून तो चालवीत असलेल्या 'द फासिस्ट' या वृत्तपत्राच्यां फेब्रुवारी १९३४ च्या अंकात पुढील वृत्त प्रसिद्ध झाले होते—

'७ ऑक्टोबर रोजी नं. ए-५ या फासिस्ट त्रिकुटाने एका लष्करी आगगाडीला अपघात घडवून आणला. हाती आलेल्या वृत्तानुसार त्यात १०० माणसे ठार झाली.'

'स्टोरोबिन्स्क जिल्ह्यात 'बंधूं' नी केलेल्या कार्यवाहीमुळे पेरणीच्या कार्यक्रमाचा पूर्ण बोजवारा उडाला. त्या पेरणी-मोहिमेचे आयोजन करणारी अनेक साम्यवादी मंडळी मोठ्या रहस्यमय रित्या एकाएकी दिसेनाशी झाली.'

'३सप्टेंबर रोजी 'बंधू' नंबर १६७ व १६८ यांनी ओझेरा मियाझ जिल्ह्यातील सामूहिक कृषिक्षेत्राच्या कम्युनिस्ट अध्यक्षाची हत्या केली.'

एप्रिल १९३४ मध्ये वोन्सियात्स्कीने बराच पैसा 'द फासिस्ट' च्या कार्यालयाला पाठविला. पोलंडमधील सोविएत राजदूत वोईकोव याची वॉर्सा येथे हत्या करण्याच्या गुन्ह्याकरिता त्यावेळी कारावासाची शिक्षा भोगीत असलेला बोरिस कोवेरदा हा सुटून बाहेर आला की भेट म्हणून त्याला ते पैसे दिले जावेत असा वोन्सियात्स्कीचा आदेश होता.

रशियन नॅशनल फासिस्ट रेव्होल्यूशनरी पार्टीचा अधिकृत कार्यक्रम होता तो असा—सोविएत लष्करी प्रशिक्षकांची, लष्करी वार्ताहारांची, राजकीय नेत्यांची व प्रमुख साम्यवाद्यांची-सर्वप्रथम पक्षाच्या चिटणिसांची हत्या करणे; साम्यवादी सत्ताधीशांच्या हुकुमांची अंमलबजावणी होणार नाही अशी व्यवस्था करणे; त्यांची दळणवळण संपर्क साधने विस्कळित करणें—त्या दृष्टीने टेलीफोनचे खांब, तारा इत्यादींची नासधूस करणे. 'फासिस्ट बंधूंनो! एक गोष्ट पक्की ध्यानात घ्या. आपण घातपाताची कार्यवाही पूर्वी केलेली आहे व पुढेही आपल्याला ती चालू ठेवायची आहे.' असे उघड आवाहन वोन्सियात्स्कीने केले होते. [जून १९४० मध्ये 'द अवर' च्या वार्ताहाराला वोन्सियात्स्कीने कळविले की सोविएत राजवटीविरुद्धच्या संघर्षात त्याचे व लिऑं ट्रॉट्स्कीचे हितसंबंध समान होते.]

जपानने पर्ल हार्बरवर हल्ला करताच वोन्सियात्स्की याला एफ्. बी. आय. ने अटक केली. अमेरिकन लष्करासंबंधीची महत्वाची बातमी हेरगिरी करून जर्मन व जपानी सरकारला पुरविल्याचा आरोप त्याच्यावर ठेवण्यात येऊन त्या गुन्ह्याकरिता त्याला ५ वर्षांची कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. [अमेरिकेत सोविएतविरोधी चळवळ केवळ श्वेत रशियन फासिस्ट निर्वासितांनी चालविली होती असे नव्हे तर अमेरिकेत आलेले अनेक रशियन मेन्शेविक्स, सोशल रेव्होल्यूशनरी व अन्य सोविएतविरोधी राजकीय गट तेथे सोविएतविरोधी प्रचार व कारस्थाने करीत होते. त्या निर्वासितांचे व्हिक्टर चेर्नोव, राफेल अब्रामोविच, निकिफर ग्रिगोरिएव व नाथान चानिन हे काही मासलेवाईक नमूने होते.

झारकालीन रशियात व्हिक्टर चेर्नोव हा सोशल रेव्होल्यूशनरी चळवळीतील एक नेता होता. झारनिष्ठ हस्तक व मारेकरी इवानो असेफ व कटकारस्थानाच्या तंत्रात प्रवीण असलेला बोरिस साविन्कोव या दोन प्रमुख सोविएतविरोधी कटवाल्यांशी त्याचे निकटचे संबंध होते. झारचा गृहमंत्री प्लेहव याच्या हत्येच्या योचनेबाबत चेर्नोवशी विचारविनिमय करण्याकरिता १९०३ मध्ये साविन्कोव जिनीवाला कसा गेला, तो व असेफ हे

अनुक्रमणिका

स्तोलिपिनच्या हत्येची त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या कामगिरीतून त्यांना मुक्त करावे अशी विनंती करायला सोशल रेव्होल्यूशनरी टेररिस्ट ब्रिगेडच्या केंद्रीय समितीकडे १९२६ मध्ये कसे गेले, ती विनंती केंद्रीय समितीने कशी नाकारली व स्तोलिपिनबद्दलची कामगिरी पार पाडण्याबद्दल केंद्रीय समितीने त्यांना पुन्हा कसे कडक आदेश दिले याचे वर्णन साविन्कोवच्या 'मेमॉयर्स ऑफ ए टेररिस्ट' या आत्मचरित्रात्मक पुस्तकात सापडते.

झारशाही कोलमडल्यानंतर पहिल्या हंगामी सरकारात चेर्नोव हा कृषिमंत्री बनला. लेनिन व बोल्शेविक्स यांविरुद्ध त्याने मोठ्या ईर्षेने व जिद्दीने लढा चालविला. सोविएत सरकार प्रस्थापित झाल्यानंतर सोशल रेव्होल्यूशनरी पक्ष त्या सरकारविरुद्ध करीत असलेल्या कारस्थानात तो अग्रेसर होता. १९२० नंतर त्याने रशिया सोडले व प्राग, बर्लिन, पॅरिस व अन्य युरोपीय राजधानीच्या शहरांत श्वेत रशियनांनी चालविलेला प्रचार व कारस्थाने यात तो हिरीरीने सहभागी झाला. दुसरे महायुद्ध सुरू झाले तेव्हा तो फ्रान्समधून अमेरिकेत आला. अमेरिकन कामगार चळवळीतील सोविएतविरोधी सोशालिस्ट गटांशी हातमिळवणी करून सोविएत संघाविरुद्ध प्रचार व संघटनकार्य त्याने उत्साहाने चालविले.

अमेरिकेतील त्याच्या सोविएतविरोधी कारवायात त्याचा सहकारी होता राफेल अब्रामोविच. हा पूर्वीचा मेन्शेविक होता व सोविएत सरकार उलथून पाडण्याच्या हेतूने चाललेल्या हेरगिरीत व घातपातात त्याचा सक्रिय सहभाग होता. बर्लिन व लंडन येथे तशा कारवाया केल्यानंतर अब्रामोविच अमेरिकेत आला; व तेथे सोविएतविरोधी प्रकाशनांतून त्याने त्या राष्ट्रावर प्रचारकी हल्ले सुरू केले.

निकिफर ग्रिगोरीएव हा एक युक्रेनियन निर्वासित व युक्रेनियन सोशल रेव्होल्यूशनरी पक्षाचा प्रमुख सदस्य होता. १९३९ मध्ये तो अमेरिकेत आला. युरोपच्या निर्वासित गटातील एक नावाजलेला सोविएतविरोधी प्रचारक म्हणून त्याने व्हिक्टर चेर्नोव बरोबर काम केले होते. प्रागमध्ये असताना 'सास्पिल्स्त्वो' (कम्युनिटी) या प्रतिक्रियावादी वृत्तपत्राचा तो संपादक होता. 'सोविएत रशिया व युक्रेन आज ज्यूंच्या हाती आहेत;' 'श्वेत रशिया, लिथुआनिया, पोलंड आदी क्षेत्रात ज्यूंविरोधी चळवळ सर्वशक्तिनिशी चालविली पाहिजे', अशा प्रकारचा प्रचार तो त्या वृत्तपत्रातून करी अमेरीकेत आल्यावर तेच त्याचे प्रचार कार्य चालू होते. नाझींनी रशियावर हल्ला केल्यानंतर, 'युक्रेन व अन्य सोविएत गणराज्ये सोविएत संघाच्या कचाट्यातून मुक्त केली गेली पाहीजेत' असे आवाहन ग्रिगोरिएव व चेर्नोव करू लागले. त्याकरिता न्यूयॉर्क मध्ये त्यांनी 'लोकशाही संरक्षण समिती' स्थापन केली. युक्रेनमधील उद्योग, वित्त, राजकारण या सर्वांवर ज्यूंचे वर्चस्व असल्याचा 'पुरावा' देणारी पत्रके व अन्य प्रचारसाहित्य ते प्रकाशित करीत. तसेच लाल लष्करातून सैनिकांनी बाहेर पडावे, जुलुमी शासकांकरिता त्यांनी विनाकारण स्वतःचा जीव धोक्यात टाकू नये असे उघड आवाहन ते करीत असत.

अमेरिकेत स्वतःला डावे म्हणवून घेणाऱ्या निर्वासितांपैकी एक प्रमुख होता तो 'कामगार सर्कलचा' संचालक व 'फॉर्वर्ड' या सोविएतविरोधी वृत्तपत्रात नेमाने प्रचारात्मक लेख लिहिणारा नाथान चानिन. १९३१-३२ पासून रशियात गुप्तपणे काम करीत असलेल्या सोशल डेमोक्रॅटिक गटाकरिता पैसा उभारण्यास त्याने प्रारंभ केला. 'सोविएत संघाविरुद्ध अखेरची गोळी अमेरिकेतून मारली जाणार आहे व त्या गोळीने सोविएत राजवट तुकडेतुकडे होऊन कोसळेल' असे भविष्य त्याने आपल्या जानेवारी १९४२ च्या एका लेखात वर्तविले होते.]

## साम्यवादापासून अमेरिकेचे रक्षण

१९३१ मध्ये अमेरिकेतील 'नॅशनल सिव्हिक फेडरेशन' या संस्थेने 'लाल धोक्या' विरुद्ध लढा देण्याकरिता एक आंतर्राष्ट्रीय चळवळ सुरू करण्याची योजना आखली. साम्यवादविरोधी व कामगारविरोधी चळवळीचा तज्ज्ञ समजला गेलेला शिकागोचा एक माजी पत्रकार राल्फ एम्. ईस्ले हा त्या संस्थेचा संस्थापक व नेता होता. झारशाहीचे तो उघडपणे समर्थन करीत असे. नॅशनल सिव्हिक फेडरेशनच्या सदस्यांत न्यूयॉर्कचा काँग्रेस प्रतिनिधी हॅमिल्टन फिश, शिकागोचा माजी कामगार हेर व ज्यूविरोधी प्रचारक ऑगस्टस जंग, एके काळचा कैसरचा कट्टर समर्थक व नंतर नाझी हस्तक बनलेला जॉर्ज सिल्व्हेस्टर विरेक, अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबरचा प्रतिक्रियावादी उपाध्यक्ष व सोविएत रशियाला 'लाल राक्षस', पूर्ण पागल झालेला एक माणूस म्हणून उघडपणे हिणवणारा नॅशनल सिव्हिक फेडरेशनचा प्रभारी अध्यक्ष मॅथ्यूवोल यांसह बोल्शेविझमविरोधी धर्मयुद्धात सहभागी होण्यास उत्सुक असलेले अन्य अनेक अमेरिकन अग्रणी त्या संस्थेचे सदस्य होते.

अनुक्रमणिका

१९३३ च्या प्रारंभी अमेरिकन सेक्शन ऑफ द इंटरनॅशनल कमिटी टु कॉम्बॅट द वर्ल्ड मेनेस ऑफ कम्युनिझम' या संघटनेचा राल्फ ईस्ले अध्यक्ष बनला. बर्लिन येथील 'यूरोपा हाऊस' येथे त्या संघटनेचे आंतर्राष्ट्रीय मध्यवर्ती कार्यालय होते. नॅशनल सिव्हिक फेडरेशनचे अनेक सदस्य ईस्लेच्या नव्या संघटनेत सामील झाले. [१९३३ मध्ये आंतर्राष्ट्रीय सोविएत विरोधी चळवळीचे मार्गदर्शन करण्याकरिता बर्लिन येथे अल्फ्रेड रोझेनबर्गने एक केंद्रीय संस्था प्रस्थापित केली. पुढे साकार झालेल्या अँटी-कॉमिन्टर्नची ती मूळ संस्था होती. जनरल लीग ऑफ अँटी-कम्युनिस्ट असोसिएशन, अँटी-कम्युनिस्ट ब्लॉक ऑफ साऊथ अमेरिका, अँटी-कम्युनिस्ट युनियन ऑफ द प्रॉव्हिन्स ऑफ नॉर्थ चायना, युरोपियन अँटी-कम्युनिस्ट लीग, अमेरिकन सेक्शन ऑफ द इंटरनॅशनल कमिटी टु कॉम्बॅट द वर्ल्ड मेनेस ऑफ कम्युनिझम या सर्व समित्या या संस्थेशी संलग्न होत्या.] ईस्लेच्या त्या संघटनेने नाझी प्रचाराचे कार्य हिरीरीने व अव्याहतपणे चालविले. 'कम्युनिझम इन जर्मनी' हे त्याचे पहिले प्रकाशन होते. वस्तुतः तो त्याचा ग्रंथ प्रथम जर्मनीत प्रकाशित झाला. परंतु त्याच्या हजारो प्रती अमेरिकेत विनामूल्य वितरित केल्या गेल्या. वृत्तपत्रातील लेख, भाषणे इत्यादि माध्यमांद्वाराही त्या पुस्तकाला अमेरिकेत अमाप प्रसिद्धी दिली गेली. 'सध्या सोविएत सरकारला अमेरिकन सरकारने राजनैतिक मान्यता देण्याच्या प्रश्नावर बराच उहापोहा चालू असल्याने साम्यवादी प्रचार व कारवाया हा प्रत्येक अमेरिकन नागरिकाकरिता एक जिव्हाळ्याचा विषय बनला आहे.त्या दृष्टीने प्रत्येक अमेरिकन माणसाने 'कम्युनिझम इन जर्मनी, हे पुस्तक अवश्य वाचले पाहिजे,' असे त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत आग्रहाने प्रतिपादित केले होते. शिवाय, 'कम्युनिझम इन जर्मनी, हे एक आव्हान देणारे पुस्तक आहे; साम्यवादाविरुद्ध जर्मनीने चालविलेल्या जीवनमरणाच्या लढ्याचा इतिहास प्रभावीपणे पुढे मांडणारे हे पुस्तक असल्याने प्रत्येक विचारवंत नागरिकाने ते वाचलेच पाहिजे; जर्मनीतील सरकार उलथून पाडण्याकरिता त्या सुसंस्कृत जर्मन राष्ट्राच्या शत्रूंनी अवलंबिलेले मार्ग व त्यांची घातक उद्दिष्टे व अमेरिकेतील त्यांची उद्दिष्टे व कारवाया सारख्याच आहेत; जर्मनीने उघडकीस आणलेल्या साम्यवाद्यांच्या त्या कारवायांवरून इतर राष्ट्रांनी धडा शिकणे आवश्यक आहे असे वाटल्याने अमेरिकन जनमताच्या नेत्यांपुढे हे पुस्तक आमच्या समितीने ठेवले आहे,' असेही त्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हटले होते. त्याखाली 'अमेरिकन सेक्शन ऑफ द इंटरनॅशनल कमिटी टु कॉम्बॅट द वर्ल्ड मेनेस ऑफ कम्युनिझम' या संस्थेच्या प्रमुख सदस्यांची नावे होती.

अमेरिका दुसऱ्या महायुद्धात पडणाच्या सुमारास साम्यवादविरोधी अनेक फासिस्ट संघटना त्या राष्ट्रात कार्यरत होत्या. त्या सर्वांना पैसा व मार्गदर्शन बर्लिन टोकियोकडून मिळत असे. शिवाय नाझी जर्मनीच्या प्रत्यक्ष सेवेत असलेल्या हस्तकांनीही संघटना स्थापल्या होत्या. साम्यवादाच्या संकटापासून अमेरिकेचे रक्षण करू पाहणाऱ्या अशा त्या राष्ट्रनिष्ठ संघटना आहेत असा मुखवटा त्यांनी चढविला होता. १९३९ मध्ये अशा एकूण ७५० संघटना अमेरिकेत होत्या ॲक्सिस राष्ट्रांना पाठिंबा देणारी व साम्यवादविरोधी प्रचार करणारी वृत्तपत्रे, पत्रके, नियतकालिके यांचा जणू पूरच त्याकाळी अमेरिकेभर पसरला होता. साम्यवादापासून अमेरिकेचे रक्षण करावयाचे असेल तर अमेरिकेचे सरकार उलथून पाडून व तिथे फासिस्ट सरकार प्रस्थापित करून सोविएत संघाविरुद्ध ॲक्सिस राष्ट्रांशी युती केली पाहिजे असे उघड आवाहन केले जात होते.

अनुक्रमणिका

१८ नोव्हेंबर १९३६ रोजी नाझीप्रणीत सिल्व्हर शर्टस्‌चा प्रमुख विलीयम डडले पेली याने उघडपणे घोषित केले की, 'एक गोष्ट आपण पक्केपणाने ध्यानात घेतली पाहिजे की या देशात जर पुन्हा यादवी युद्ध भडकले तर जे लोक आज अमेरिकन सरकारी यंत्रणा बळकावून बसले आहेत व जे अमेरिकन सरकारला मास्कोचे एक शाखा-कार्यालय करू पाहात आहेत त्या ज्यू-साम्यवादी लुटारूंच्या विरुद्धचे असेल.'

सोविएत संघावर नाझी हल्ला होताच नाझीधार्जिण्या ख्रिश्चन फ्रंटचा नेता फादर चार्लस्‌ ई कौहलीन याने ७ जुलै १९४१ रोजी त्यांच्या 'सोशल जस्टिस्‌' या प्रचारकी वृत्तपत्रात म्हटले––'जर्मनीने रशियात चालविलेले युद्ध हे ख्रिश्चन धर्माच्या रक्षणाकरिता चाललेले युद्ध आहे. धर्म न मानणाऱ्या साम्यवादाची उत्पत्तीच केवळ ज्यूंनी केलेली आहे असे नव्हे तर त्या विचारसरणीला रशियात मूर्त स्वरूप प्रामुख्याने निरीश्वरवादी ज्यूंनीच दिले हे आम्ही विसरू शकत नाही'. असाच प्रचार जिराल्ड विनरॉडचे 'डिफेंडर ऑफ विचिता' (कन्सास), विलियम कुलग्रेनचे 'बीकन लाईट ऑफ अटास्का डेरो' (कालिफोर्निया), इ. जे. गार्नरचे 'पब्लिसिटी' (विजिता, कन्सास), चार्लस्‌ हडसनचे 'अमेरिका इन डेंजर.' (ओमाटा नेब्रास्का), अशी अनेक नाझीधार्जिणी व सोविएत विरोधी प्रकाशने करीत होती.

पर्ल हार्बरवर जपानी हल्ला होताच यांपैकी काही मंडळींवर, राष्ट्रद्रोही प्रचार करणे व नाझी हस्तकांशी हातमिळवणी करून अमेरिकन सरकार उलथून पाडण्याकरिता कारस्थाने करणे असे आरोप लावून अमेरिकन न्यायखात्याने त्यांच्याविरुद्ध खटले चालविले. परंतु तरीही संपूर्ण युद्धकाळात ॲक्सिस राष्ट्रे पवित्र धर्मयुद्ध लढत असून वॉशिंग्टन, लंडन व मास्को येथील ज्यू–साम्यवाद्यांच्या कारस्थानामुळे अमेरिका हे राष्ट्र निष्कारण युद्धात ओढले गेले आहे असा अखंड प्रचार अमेरिकेत चालू होता.

### पॉल शेफर

पर्ल हार्बरवरील हल्ल्यानंतर थोड्याच दिवसात अमेरिकेच्या फेडरल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशनने न्यूयॉर्क येथे एका अद्यावत घरात राहणारा एक मध्यमवयीन जर्मन पत्रकार पॉल शेफर याला अटक केली. नाझी प्रचार मंत्रालयाचे मुखपत्र 'दास राईश' चा तो अमेरिकन वार्ताहार असल्याचा उल्लेख परराष्ट्र मंत्रालयाच्या फाईलमध्ये होता. सोविएत विरोधाचा मुखवटा घालून कारवाया करणाऱ्या नाझी हस्तकांचा पॉल शेंफर हा एक मासलेवाईक नमुना होता. [जपानी हस्तकही सोविएतविरोधी प्रचार अमेरिकेत हिरीरीने करीत होते. इंटरनॅशनल टेलिफोन कंपनीचा उपसंचालक व न्यूयॉर्क व बुकलिन येथे कॉलेजमधील इतिहासाचा प्राध्यापक जॉन सी. ले. क्लेअर याचे उदाहरण त्याबाबत नमूद करण्याजोगे आहे. दूर पूर्व राजकारणाचा मान्यवर तज्ज्ञ म्हणून अमेरिकेतील सुप्रसिद्ध नियतकालिकांत त्याने अनेक लेख लिहून त्यांत जपानची बेफाम प्रशंसा केली; व अमेरिकेला खरा धोका जर्मनी-जपानकडून नव्हे तर सोविएत संघाकडून असल्याचे ठासून सांगितले. सोविएत संघ व अमेरिका यात सलोखा प्रस्थापित होता कामा नये यावर त्यात सतत भर असे. १९४३ च्या अखेरी फेरडरल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशनने त्याला अटक केली. न्यूयॉर्क फेडरला कोर्टापुढे ८ सप्टेंबर रोजी, तो स्वतः पर्ल हार्बरवरील हल्ल्यापूर्वी तीन वर्षे जपानी सरकारचा गुप्त हस्तक म्हणून तो काम करीत होता अशी कबूली त्याने दिली.]

एके काळी पॉल शेफर हा आंतरराष्ट्रीय कीर्तीचा पत्रकार होता. १९२२–१९२९ या काळात 'बर्लिनेर टागेब्लाट' चा तो मास्कोमधील वार्ताहार होता. सोविएत रशियातील सर्वात हुशार वार्ताहार म्हणून त्याची

अनुक्रमणिका

त्यावेळी ख्याती होती. त्याची लिखाणाची पद्धती अत्यंत रंजक असल्यामुळे १२ निरनिराळ्या भाषांतून त्याचे लेख भाषांतरित होत असत. अमेरिकेतील बडेबडे मुत्सद्दी, उद्योगपती, भांडवलदार व अन्य नामवंत मंडळी त्याची चाहती होती.

१९२९ च्या शरदात मास्को येथील वार्ताहार म्हणून त्याच्या जीवनक्रमाचा अनपेक्षितपणे व तडकाफडकी शेवट झाला. अधूनमधून तो जर्मनीला जात असे. १९२९ मध्ये तो नेहमीप्रमाणे थोड्या दिवसांकरिता बर्लिनला गेला असता, सोविएत अधिकाऱ्यांनी त्याला पुन्हा सोविएत संघात येण्याचा परवाना देण्याचे नाकारले. त्याबरोबर त्याच्या सर्व मित्रमंडळींकडून निषेधाचा व संतापाचा एकच सूर उमटला. सोविएत संघात येण्याची परवानगी त्याला नाकारण्याची कारणे ते मागू लागले. त्यांच्या त्या प्रश्नाचे उत्तर सोविएत गुप्त पोलिसांच्या फाईलमध्ये दडलेले होते. आठ वर्षांनंतर २ मार्च १९३८ रोजी सोविएत कृषिमंत्री मिखाईल चेर्नोव याने सोविएत सर्वोच्च न्यायालयाच्या लष्करी शाखेपुढे जेव्हा कबुलीजबाब दिला तेव्हा सोविएत सरकारने शेफरला १९२९ मध्ये प्रवेश नाकारण्याची काही कारणे स्पष्ट झाली. जर्मनीला सोविएत लष्करी व व्यापारी बाबीसंबंधी गुप्त माहिती पुरविणे व फार मोठ्या क्षेत्रावर घातपाती कारवायांचे आयोजन करणे याकरिता जर्मन लष्करी हेरखात्याकडून त्याला दरमहा ४००० रुबल्स मिळत होते व ज्या जर्मन हस्तकाद्वारा हा सर्व व्यवहार सुरू झाला होता तो होता 'बार्लीनेर टागेब्लाट' चा वार्ताहार पॉल शेफर, असा कबुलीजबाब चेर्नोवने त्या खटल्याचे वेळी दिला.

चेर्नोवला देण्यात आलेल्या मृत्युदंडाच्या शिक्षेची अंमलबजावणी १३ मार्च १९३८ रोजी सोविएत गोळीबार पथकाने केली; त्यावेळी बर्लिनेर टागेब्लाटचा अमेरिकन वार्ताहार म्हणून शेफर अमेरिकेत आला. १९२९ नंतर तो युरोपातील एक लठ्ठ पगाराचा प्रमुख सोविएतविरोधी प्रचारक बनला होता. सोविएत संघावर जळजळीत टीका करणारा व ते राष्ट्र लवकरच कोसळणार आहे असे भविष्य वर्तविणारा त्याचा लेख युरोप–अमेरिकेतील कोणत्या ना कोणत्या प्रमुख वृत्तपत्रात प्रसिद्ध झाला नाही असा एखादा आठवडाही उलटत नसे १९३१ मध्ये अमेरिकेने सोविएत सरकारला राजनैतिक मान्यता देऊ नये याकरिता प्रचार करण्यासाठी तो अमेरिकेत आला. 'अमेरिकेने सोविएत सरकारला राजनैतिक मान्यता दिली तर, बुर्ज्वा युरोप व सोविएत्स् यांपैकी एकाची निवड जणू अमेरिकेने केली आहे, असाच त्याचा अर्थ होईल; अमेरिकेच्या त्या मान्यतेमुळे बुर्ज्वा युरोपीय राष्ट्रांप्रती साम्यवादी रशियाची भूमिका अधिकच ताठर व आक्रमक बनून सोविएत रशियाचे त्या राष्ट्रांवरील हल्ले तीव्रतर होतील', असा स्पष्ट इशारा शेफरने 'फॉरिन अफेअर्स'या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या त्याच्या एका लेखात (हाच लेख रीडर्स डायजेस्ट मध्येही नंतर प्रकाशित झाला होता) दिला होता. हिटलर अधिकारारूढ झाला त्यावेळी बर्लिनेर टागेब्लाटचा लंडन येथील वार्ताहार म्हणून शेफर काम करीत होता. तो ताबडतोब जर्मनीला परतला. नाझी सरकारने ते वृत्तपत्र नाझी प्रचार मंत्रालयाच्या देखरेखीखाली घेतले व त्याचा प्रमुख संपादक म्हणून पॉल शेफरची नेमणूक केली. [शेफर हा एक उदारमतवादी पत्रकार आहे अशी त्याच्या काही उच्चस्तरीय मित्रांची समजूत होती. त्यांना १९३३ मध्ये शेफरच्या जर्मनीला परत जाण्याचे मोठेच नवल वाटले. भविष्यात तो करणार असलेल्या कामगिरीवर नजर ठेऊन, जर्मनीमध्ये तो अतिशय गुप्त अशा नाझीविरोधी कामगिरीवर आलेला आहे अशी च समजूत त्याने त्यांची करून दिली. आश्चर्य असे की त्याच्या अनेक मित्रानां ते खरेही वाटले.

अनुक्रमणिका

तो नाझीविरोधी आहे अशी फसगत ज्यांची तो करून देऊ शकला नाही त्यात प्रमुख होता तो जर्मनीतील तत्कालीन फासिस्टविरोधी अमेरिकन राजदूत विलियम ई डाड. १५ नोव्हेंबर १९३६ रोजी त्याने आपल्या रोजनिशीत शेफरबद्दल नोंद केली ती अशी ब-याच वर्षापासून माझी या शेफरवर बारिक नजर होती.काही वर्षापूर्वी तो एक सोशल डेमोक्रेट आहे असे दिसत होते.बरीच वर्षे जर्मन वत्तपत्रांकरिता वार्ताहर म्हणून तो अमेरिकेत होता.आणि आता तो एक सक्रिय व उत्साही नाझी बनला आहे.]

१९३७ च्या हिवाळ्यात त्याला अमेरिकेत पाठविण्यात आले. लागलीच, न्यूयॉर्कहून 'बर्लिनेर टागेब्लाट' करिता तो बातम्या पाठवू लागला. त्याच्या त्या बातम्यात, मोठा कुशल असा अमेरिकाविरोधी प्रचार, व जर्मन लष्करी अधिकाऱ्यांना उपयुक्त ठरेल अशी माहिती यांचे मोठे रंजक मिश्रण असे. थोडेच दिवसात 'दास राईश' या नाझी प्रचार मंत्रालयाच्या मुखपत्राचा अमेरिकन वार्ताहार म्हणून त्याला बढती देण्यात आली. त्या पदावर झालेल्या त्याच्या नियुक्तीमुळे तो डॉ. गोबेल्सचा अमेरिकेतील खास प्रतिनिधी बनला. अमेरिकेत सोविएतविरोधी भावना भडकविणे हे त्याचे मुख्य काम होते. 'रशियन तज्ज्ञ' म्हणून वाखाणण्यात येत असलेल्या शेफरचे सोविएत संघावर टीकेचे प्रहार करणारे लेख अमेरिकेतील आघाडीच्या वृत्तपत्रांत व मासिकांत नियमीतपणे प्रकाशित होत होते. मास्को खटले हा त्याच्या लिखाणाचा एक आवडता विषय होता. 'एक हेतुपुरस्सर उभे करण्यात आलेले रौद्र नाट्य' असे वर्णन तो त्या खटल्यांचे करी; व बुखारिन, प्यातकोव, रादेक व अन्य रशियन पंचमस्तंभीय हेच खरे बोल्शेविक असून खरा महान नेता कोणी असेल तर तो लिऑँ ट्रॉट्स्की असे तो ठासून सांगे.

'फॉरिन अफेअर्स' च्या अमेरिकन त्रैमासिकात एप्रिल १९३८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'फ्रॉम लेनिन टु स्टालिन' या त्याच्या एका मासलेवाईक लेखात 'स्टालिन तो नाझी विरोधी आहे अशी फसगत ज्यांची तो करून देऊ शकला नाही त्यात प्रमुख होता तो जर्मनीतील तत्कालीन फासिस्टविरोधी अमेरिकन राजदूत विलियम ई डॉड. १५ नोव्हेंबर १९३६ रोजी त्याने आपल्या रोजनिशीत शेफरबद्दल नोंद केली ती अशी, 'बऱ्याच वर्षांपासून माझी या शेफरवर बारिक नजर आहे. काही वर्षांपूर्वी तो एक सोशल डेमोक्रॅट आहे असे दिसत होते. बरीच वर्षे जर्मन वृत्तपत्रांकरिता वार्ताहार म्हणून तो अमेरिकेत होता; आणि आता तो एक सक्रिय व उत्साही नाझी बनला आहे.'

हा एक अत्यंत स्वार्थी, सूडबुद्धी, सत्तापिपासू, धूर्त आशियायी असून त्याच्या वैयक्तिक महत्वाकांक्षेच्या मार्गात सर्व ट्रॉट्स्कीवादी धोंड बनून राहिले असल्यामुळेच त्या सर्वांचा त्याने बळी घेतला' असे स्पष्टीकरण त्याने मास्को खटल्यांचे दिले होते.

पर्ल हार्बरवरील हल्ल्यानंतर अमेरिकन सरकारने शेफरला अटक केली. पण त्यामुळे त्याचे ते प्रचार कार्य थांबले असे मात्र घडले नाही. १३ सप्टेंबर १९४३ रोजी न्यूयॉर्क टाईम्सच्या रविवारच्या मॅगझीन विभागाच्या पहिल्या पानावर कोनरॅड लॉंग या नावाखाली जर्मनीसंबंधीत एक लेख प्रसिद्ध झाला. 'सध्याच्या युद्धातील जर्मनबाबीसंबंधीचा एक सखोल अभ्यासक' असे वर्णन त्या लेखकाचे त्या वृत्तपत्राने दिले होते. युक्रेन जर्मनीच्या ताब्यात येताच जर्मन कृषिपद्धतींमुळे त्या प्रदेशाचे कृषिउत्पादन एकदम दुप्पटीने वाढले असल्याची बातमी त्या लेखात कोनरॅड लॉंगने दिली होती. हा कोनरॅड लॉंग दुसरा तिसरा कोणी नसून तो पॉल शेफर होता. त्याला अटक झाल्यानंतर त्याच्या काही प्रभावी अमेरिकन मित्रांनी

अनुक्रमणिका

त्याच्या सुटकेची व्यवस्था केली होती; व टाईम्समध्ये टोपण नावाने तो लिखाण करू लागला होता. एवढेच नव्हे तर जर्मनीसंबंधी तज्ज्ञ सल्लागार म्हणून अमेरिकन लष्करी सेवा कार्यालयात त्यांनी त्याला नोकरीही मिळवून दिली होती. १९४४ च्या वसंतात अमेरिकन न्यायखात्याच्या हस्तकांनी शेफरला पुन्हा अटक केली. यावेळी मात्र युद्ध चालू असेपर्यंत त्याला तुरुंगातून सोडू नये अशी तरतूद करण्यात आली.

### डाईस कमिटी

म्युनिक करार होण्यापूर्वी थोडेच दिवस अगोदर, ऑगस्ट १९३८ मध्ये, गैर-अमेरिकन कारवायांचा तपास करण्याकरिता म्हणून अमेरिकन काँग्रेसची एक खास समिती अमेरिकन सरकारने नेमली. टेक्सासचा प्रतिनिधी मार्टिन डाईस हा त्या समितीचा अध्यक्ष होता. त्या समितीने अमेरिकेत ॲक्सिस राष्ट्रांनी चालविलेल्या कारवायांचा तपास करावा अशी अपेक्षा होती. पण तसे करणे तर दूरच, उलट डाईस कमिटीने मुख्य भर कशावर दिला असेल तर अमेरिकेचा सर्वात प्रमुख व घातक शत्रू सोविएत रशिया आहे हे अमेरिकन जनतेला पटवून सांगण्यावर!

डाईस समितीने गैर अमेरिकन कारवायांचा तपास करण्याकरिता प्रमुख संशोधक म्हणून प्रथम नेमणूक केली ती कामगार वर्गात पूर्वी हेर म्हणून काम केलेला कट्टर सोविएतविरोधी प्रचारक एडवर्ड एफ्. सलिव्हन याची. हेटमन स्कोरोपादस्की व बर्लिनमधील अन्य श्वेत रशियन यांच्या नियंत्रणाखाली अमेरिकेत चालू असलेल्या सोविएतविरोधी युक्रेनियन राष्ट्रवादी चळवळीशी त्याचा निकटचा संबंध होता. अमेरिकेतील युक्रेनियन मंडळींत सोविएतविरोधी भावना भडकविण्याचे त्याने सर्वतोपरी प्रयत्न केले व स्वतंत्र युक्रेन प्रस्थापित करण्याकरिता अविरत प्रचार केला. मार्टिन डाईसचा हा प्रमुख संशोधक लवकरच फासिस्ट-युक्रेनियन-अमेरिकन चळवळीचा पुढारी बनला. त्या चळवळीचा प्रवक्ता म्हणून नाझी हस्तक व प्रचारक यांच्याशी त्याचा निकटचा संबंध प्रस्थापित झाला.

सलिव्हनचा पोलिस रेकॉर्डही चांगला नव्हता. या ना त्या गुन्ह्याकरिता त्याला पाच-सहा वेळा पोलिसांनी अटक केली होती. त्याबद्दल व सलिव्हनच्या नाझीधार्जिण्या कारवायांबद्दल अमेरिकेतील उदारमतवाद्यांना माहिती मिळाल्याने प्रमुख संशोधक म्हणून त्याची नेमणूक रद्द करणे नाईलाजाने डाईसला भाग पडले. यानंतर फासिस्ट-युक्रेनियन चळवळीत सलीव्हन उघडपणे सामील झाला. थोडेच दिवसात पिट्स्बर्ग येथे त्याने एक युक्रेनियन-अमेरिकन शैक्षणिक संस्था स्थापन केली. अमेरिकेतील १० लक्ष युक्रेनियन लोकात सोविएतविरोधी चळवळ मजबूत करणे हे त्या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट असून वॉशिंग्टन येथील जर्मन दूतावासाशी त्या संस्थेचा निकटचा संबंध होता. शिवाय एक साम्यवाद विरोधी तज्ज्ञ म्हणून अनधिकृतपणे का होईना डाईस समितीशी त्याचा संपर्क होताच.

वॉशिंग्टन येथे अनेक आठवडे, डाईस समितीचे साक्षीपुराव्यांचे काम चालू होते. गुन्हेगार म्हणून शिक्षा झालेले, कामगार हेर, परकीय हस्तक इत्यादी मंडळी 'तज्ज्ञ' म्हणून समितीपुढे साक्ष द्यायला येत होती; व मास्कोचे हस्तक अमेरिकन सरकार उलथून पाडण्याचा प्रयत्न मोठ्या धूर्तपणे व नेटाने करीत

आहेत असे खात्रीपूर्वक सांगत होते. 'धोकादायक' बोल्शेविकांच्या नावांच्या याद्यांनी डाईस समितीच्या फाईल लवकरच भरून गेल्या. मास्कोच्या मार्गदर्शनाखाली अमेरिकेत चालू असलेल्या पंचमस्तंभीयांच्या राष्ट्रव्यापी कारवाया उघडकीस आणल्या गेल्याच्या नाट्यपूर्ण घोषणा डाईस समितीकडून होत होत्या.

१९४० मध्ये त्या समितीचा अहवाल सामान्य जनतेपर्यंत पोचविण्याच्या हेतूने काँग्रेस प्रतिनिधी डाईस याने 'ट्रोजन हॉर्स' इन अमेरिका; ए रिपोर्ट टु द नेशन' या नावाने एक पुस्तक प्रकाशित केले. सोविएतविरोधी प्रचार हे त्या पुस्तकाचे एकमेव उद्दिष्ट होते. ज्यावेळी जर्मन-अमेरिकन बंड व ख्रिश्चन फ्रंटतर्फे अमेरिकन शहरांतून, नाझी पंचमस्तभियांच्या पुढाकाराखाली नाझींना पाठिंबा व्यक्त करणारी निदर्शने आयोजित केली जात होती त्याच वेळी १५० डिव्हिजन्सचे सोविएत लष्कर घेऊन स्टालिन लवकरच अमेरिकेवर हल्ला करणारा आहे; नव्हे, त्या हल्ल्याची सुरुवात मास्को हस्तकांनी अगोदरच केलेली आहे. [ॲक्सिस राष्ट्रांना पाठिंबा देणारे अमेरिकेतील गट मार्टीन डाईसने चालविलेल्या कार्याला उघडउघड पाठिंबा व्यक्त करीत होते; तर, अमेरिकेत ती समिती करीत असलेल्या कार्याची प्रशंसा बर्लिनही मुक्त कंठाने करीत होते.] असे चित्र अमेरिकन नागरिकांपुढे डाईस उघडपणे उभे करीत होता.

नाझींनी सोविएत संघावर हल्ला केल्ल्यानंतर दोनच दिवसांनी, रशिया तीस दिवसांच्या आतच हिटलरच्या ताब्यात जाईल अशी भविष्यवाणी डाईसने उच्चारली. लाल लष्कराला अमेरिकेने कोणत्याही स्वरूपाची मदत करण्याच्या कल्पनेचा त्याने तीव्र शब्दांत निषेध केला. 'तसे करणे म्हणजे शुद्ध मूर्खपणाच ठरेल, कारण ते सर्व युद्धसाहित्य शेवटी जर्मनांच्याच हाती पडणार आहे' असा स्पष्ट इशारा त्याने अमेरिकन सरकारला दिला. 'रशियाला मदत करून आपल्या सरकारने खुद्द अमेरिकेच्या राजधानीत स्टालिनकरिता एक पश्चिम आघाडी उघडून दिल्यासारखे झाले आहे' अशा शब्दात लाल लष्कराला पाठिंबा देण्याच्या अमेरिकन सरकारच्या धोरणावर त्याने प्रखर हल्ला चढविला.

'सोविएत संघाचे संरक्षण व्हावे हे अमेरिकेच्या संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत अगत्याचे आहे' या अध्यक्ष रूझवेल्टच्या वक्तव्याच्या संदर्भात २ ऑक्टोबर १९४१ रोजी रूझवेल्टला पाठविलेल्या पत्रात, स्टालिन आणि हिटलर यात वैधर्म्यापेक्षा अनेक दृष्टींनी साम्यच अधिक आहे हे अमेरिकन जनतेला पटवून सांगण्याकरिता मिळेल त्या संधीचा मी उपयोग करून घेणार आहे' असे सांगून सोविएतविरोधी प्रचार मोहीम जोमाने चालू ठेवण्याचा त्याचा निर्धार त्याने अमेरिकन सरकारला कळवला.

अमेरिका व सोविएत संघ यात लष्करी युती घडून आल्यानंतरही मार्टीन डाईसची सोविएतविरोधी मोहीम चालूच होती. त्या सोविएतविरोधी मोहीमेसंबंधी बोलताना, २९ मार्च १९४२ रोजी, अमेरिकेचा उपाध्यक्ष हेन्री वॅलेस म्हणाला—– सध्याचा काळ शांततेचा असता तर विकृत मनांचे चाळे म्हणून या सर्व गोष्टींकडे कदाचित् आपण दुर्लक्षही केले असते. पण आज आपण युद्धाच्या भोवऱ्यात अडकलो आहोत. अशा वेळी, प्रत्यक्ष डॉ. गोबेल्सच्या बोलण्याचा झाला असता तसाच घातक परिणाम जनमनात साशंकता व गोंधळ उडवून देण्याच्या दृष्टीने डाईसच्या विधानांचा होत आहे. डाईस हा उघडउघड हिटलरचा भाडोत्री

अनुक्रमणिका

नोकर असता तरी त्याच्या कारवायांचा आज होत आहे तितका विघातक परिणाम झाला नसता ही वस्तुस्थिती आहे, या किळसवाण्या सत्याचा अर्थ आपण अमेरिकनांनी ओळखला पाहिजे.'

**एकाकी गरुड**

१९४० च्या उत्तरार्धात, संपूर्ण युरोप हिटलरच्या लष्करी वरवंट्याखाली भरडले जात असता, व सोविएत संघाविरुद्धच्या संघर्षाकरिता तो जोमाने तयार करीत असता अमेरिका फर्स्ट कमिटी ही एक नवीनच संस्था अमेरिकेच्या राजकारणात प्रस्थापित झाली. त्यानंतरच्या वर्षी, १९४१ मध्ये, वृत्तपत्रे, रेडिओ, विशाल सभा, निदर्शने, चौकाचौकातील लहानलहान सभा या सर्व प्रचार माध्यमांद्वारा अमेरिका फर्स्ट कमिटीने अमेरिकेच्या राष्ट्रव्यापी क्षेत्रात सोविएतविरोधी, ब्रिटिशविरोधी व अलिप्ततावादी प्रचाराची धमाल उडवून दिली. जनरल रॉबर्ट ई. वुड, हेन्री फोर्ड, कर्नल रॉबर्ट आर. मॅककॉर्मिक, सेनेटर बर्टन के. व्हीलर, जिराल्ड पी. नाय, रॉबर्ट आर. रेनॉल्डस्, कॉंग्रेस सदस्य हॅमिल्टन फिश, क्लेअर हॉफमन, स्टीफन डे इत्यादी मंडळी अमेरिका फर्स्ट कमिटीची मूळ सदस्य होती. त्या कमिटीची एक प्रमुख महिला सदस्य होती ती एक माजी वैमानिक व समाजधुरीण लौरा इन्ग्लास. नाझी सरकारची एक पगारी हस्तक असल्याच्या आरोपावरून तिला नंतर पकडण्यात येऊन शिक्षा ठोठावण्यात आली होती. अमेरिका फर्स्ट कमिटी प्रसृत करीत असलेले बहुतांश प्रचार साहित्य नाझी गुप्त हस्तक जॉर्ज सिल्व्हेस्टर विरेक हा तयार करून देत असे. नंतर जपानी हस्तक म्हणून पकडला गेलेला राल्फ टाऊनशेंड हा पश्चिम किनाऱ्यावरील अमेरिका फर्स्ट कमिटीच्या शाखेचा प्रमुख व 'स्क्रिब्नेर कॉमेंटेटर' व 'हेराल्ड' या त्या कमिटीच्या प्रचारात्मक मुखपत्राच्या संपादक मंडळाचा सदस्य होता [हेराल्डचे संपादक दिवसरात्र त्यांचे रेडीओ चालू ठेऊन जपान व हिटलर नियंत्रित युरोपीय राष्ट्रे यांनी चालविलेला अधिकृत ॲक्सिस प्रचार ऐकत व तो त्यांच्या वृत्तपत्रांद्वारा प्रसृत करीत. ती वृत्तपत्रे संपूर्ण अमेरिकेत विनामूल्य वाटली जात. तसेच हॅमिल्टन फिश, सेनेटर बर्टन, नाझी हस्तक फ्रॅंक बर्च या सारख्यांनी पुरविलेल्या यादीत नमूद केलेल्या लोकांनाही ती पाठविली जात.] नाझींच्या पैशाच्या बळावर त्यांच्याकरिता प्रचारात्मक कार्य करणारी इतरही काही प्रमुख अमेरिकन मंडळी या संस्थेशी संबंधित होती. अमेरिकन लष्कराचे नीतिधैर्य खच्ची करण्याकरिता अमेरिका फर्स्ट कमिटीचा एक माध्यम म्हणून उपयोग करून घेण्यात येत असे असा आरोप न्यायखात्याच्या जुलै २९४२ च्या अहवालात नमूद करण्यात आला होता.

सोविएतविरोधी नाझीधार्जिण्या चळवळीत अग्रेसर असलेला सुप्रसिद्ध अमेरिकन वैमानिक चार्लस् ए. लिंडबर्ग हा अमेरीका फर्स्ट कमिटीचा एक अग्रणी होता. जर्मन सरकारचा खास पाहुणा म्हणून प्रथम १९३६ मध्ये त्याने जर्मनीला भेट दिली. त्यावेळी तेथे त्याचे शानदार स्वागत करण्यात आले. जर्मन शस्त्रास्त्र निर्मिती कारखाने, विमानतळ, इत्यांदींना त्याने भेटी द्याव्या अशी व्यवस्था करण्यात आली. अशा वेळी नाझी उच्चाधिकारी सतत त्याच्याबरोबर असत. नाझी जर्मनीच्या प्रगतीमुळे लिंडबर्ग चांगलाच प्रभावित झाला.

हर्मन गोअरिंग व अन्य नाझी नेत्यांनी लिंडबर्गच्या सन्मानार्थ भोजनसमारंभ आयोजन केले. त्यावेळी केलेल्या एका भाषणात, जर्मन वायुदल अजिंक्य असल्याचा विश्वास लिंडबर्गने व्यक्त केला. त्या वक्तव्यामुळे अमेरिकनांच्या नीतिधैर्यावर विघातक परिणाम होईल अशी नाझींना आशा होती.

त्यानंतर दोन वर्षांनी, म्युनिक करार होण्यापूर्वीच्या तणावपूर्ण काळात लिंडबर्गने सोविएत संघाला भेट दिली. तो तेथे अगदीच थोडे दिवस होता. परत आल्यानंतर, लाल लष्कराची शस्त्रसज्जता अगदीच दयनीय आहे, त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण दिले गेलेले नाही, त्यांचे नेतृत्वही अगदी हीन दर्जाचे आहे असा प्रचार त्याने सुरू केला. नाझी जर्मनीविरुद्ध, एक लष्करी मित्र म्हणून सोविएत रशिया हे राष्ट्र अगदीच कुचकामाचे ठरणार आहे, अमेरिकेने सहकार्य किंवा हातमिळवणी करायची ती नाझींविरूद्ध नव्हे तर नाझींशी करायला हवी, असे तो अधिकारवाणीने ठासून सांगू लागला. युरोपीय राष्ट्रांनीही नाझींशी राजकीय व आर्थिक युती करावी यासाठी त्या राष्ट्रांची मनोभूमिका तयार करण्याकरिता त्याने युरोपच्या अनेक राष्ट्रांतून दौरे केले. त्याचे काळ्या व नारिंगी रंगाचे विमान युरोपीय राष्ट्रांच्या विमानतळावर उभे असलेले पाहाणे हे युरोपीय लोकांकरिता एक परिचित दृश्य बनले होते.

म्युनिक करारासंबंधीची बोलणी चालू असता निवडक सोविएतविरोधी ब्रिटिश व्यापारी, उमराव, मुत्सद्दी यांचा एक छोटासा गट युरोपीय राजकारणाबाबत लिंडबर्गची मते व दृष्टीकोन समजून घेण्याकरिता लेडी ॲस्टरच्या इस्टेटीवर एकत्र जमला. त्या सर्वांच्या समोर, जर्मनीचे वायुदल, लष्करी सामर्थ्य, झपाट्याने वाढत असलेले युद्धसाहित्याचे उत्पादन व अतुलनीय लष्करी नेतृत्व यांची त्याने बेसुमार प्रशंसा केली. नाझी अगदी अजिंक्य आहेत असे तो वारंवार खात्रीलायकपणे बोलत होता. फ्रान्स व इंग्लंड यांनीही स्वहिताच्या दृष्टीने हिटलरशी तडजोड करावी व सोविएत रशियाच्या दिशेने विस्तार करण्याची जर्मनीला परवानगी द्यावी हे अत्यंत अगत्याचे असल्याचे आवर्जून सांगत होता. ब्रिटिश पार्लमेंटच्या सदस्यांशी व अन्य राजकीय नेत्यांशीही लिंडबर्गने याबाबत चर्चा करावी अशी व्यवस्था करण्यात आली. डेविड लॉईड जॉर्जलाही तो भेटला. त्या अमेरिकन वैमानिकाबद्दल नंतर लॉईड जॉर्जने नोंद केली,—‘तो फार तर एखादा आठवडा रशियात असेल. त्यावेळी कोणत्याही बड्या रशियन नेत्यांशी त्याची गाठभेट झाली नाही. रशियाच्या वायुदलाचेही त्याने निरीक्षण केले असेल हे अशक्यच आहे. तरीही, परत आल्यानंतर रशियन लष्कर वायुदल कुचकामाचे आहे, तेथील उद्योगात भयानक गोंधळ माजला आहे असे तो आम्हाला ठामपणे सांगत आहे. आणि नवल असे की एक हिटलर वगळता अनेक लोकांनी त्याच्या त्या बोलण्यावर विश्वासही ठेवला.’ लिंडबर्ग हा अत्यंत धूर्त व धोकादायक अशा लोकांच्या हातातील एक कळसूत्री बाहुले बनला असल्याची लॉईड जॉर्जची खात्री झाली होती.

अशाच स्वरूपाचा आरोप लिंडबर्गवर मास्कोकडूनही अधिक स्पष्ट शब्दात करण्यात आला. इंग्लंड, फ्रान्स, रशिया व झेकोस्लोवाकिया यांच्या संयुक्त वायुदलालाही सहजपणे खडे चारू शकेल इतके जर्मनीचे वायुदल सामर्थ्यसंपन्न आहे असा भयानक  व असत्य प्रचार, जर्मन फासिस्टांचे व त्यांचे समर्थन करणाऱ्या ब्रिटिश उमरावांचे स्तुतीपाठ गाणारा लिंडबर्ग करीत आहे; झेकोस्लोवाकियाबाबत म्युनिक येथे हिटलरपुढे चेंबरलेनने शरणागती पत्करावी या हेतूने सोविएत वायुदलाच्या दौर्बल्याविषयी चेंबरलेनची

खात्री पटवून देण्याची कामगिरी इंग्लिश प्रतिक्रियावादी गटाने लिंडबर्गवर सोपविली होती, अशा अर्थाचे निवेदन रशियन वायुदलातील काही नामवंत वैमानिकांनी त्यावेळी जाहीरपणे केले होते.

लिंडबर्गने केलेल्या त्या मोलाच्या कामगिरीचे बक्षीस जर्मन सरकारने म्युनिक करार झाल्यानंतर तीनच आठवड्यांनी त्याच्या पदरात अधिकृतपणे टाकले. बर्लिन येथे त्याच्या सन्मानार्थ आयोजित करण्यात आलेल्या भोजन समारंभात त्या अमेरिकन वैमानिकाला 'ऑर्डर ऑफ द जर्मन ईगल' हा जर्मन राष्ट्राचा सर्वोच्च किताब बहाल करून फील्ड मार्शल गोअरिंगने त्याचा गौरव केला. साडेतीन वर्षे अशा प्रकारे परदेशात राहून १९३९ मध्ये, युद्धाचा भडका होण्याचा थोडेच दिवस अगोदर, लिंडबर्ग अमेरिकेला परतला.

नाझींनी पोलंडवर हल्ला केला त्या पाठोपाठ इंग्लंड व फ्रान्स यांनी जर्मनीविरुद्ध युद्धघोषणा केली. त्यावेळी, जर्मनीविरुद्धचे ते युद्ध हे सर्वस्वी अयोग्य व चुकीचे असून खरे युद्ध पूर्वेकडे सुरू व्हायला हवे होते अशा अर्थाचे लेख लिंगबर्ग तळतळून लिहू लागला. विमानविद्या, भूगोल व वंश या शीर्षकाखाली, रीडर्स डायजेस्टच्या नोव्हेंबरच्या अंकात लिहिलेल्या एका लेखात (अल्फ्रेड रोझेनबर्गचे लिखाण व तो लेख यांत विलक्षण साधर्म्य होते) त्याने म्हटले, 'युरोपीय संस्कृतीचे वारस असलेले आपण पाश्चिमात्य, आज एका अत्यंत घातक अशा युद्धाच्या सीमेवर उभे ठाकले आहोत. हे युद्ध आपले आपसातील, एका राष्ट्रकुटुंबातील युद्ध आहे. या अंतःस्थ युद्धामुळे आपला शक्तिपात होईल व गौरवर्णीयांचा अनमोल खजिना—युरोपीय संस्कृती त्यात नष्ट होईल. रशियाच्या सीमेवरून आशिया आपल्यावर दबाव आणीत आहे, अशा परिस्थितीत आपण आपले ऐक्य शाबूत राखले आणि परकीय लष्कराविरुद्ध आणि परवंशीय लोकांच्या सरमिसळीविरुद्ध आपण आपला बचाव करू शकलो तरच युरोपीय रक्ताचा बहुमोल वारसा जतन करण्यास आवश्यक ती शांतता व सुरक्षितता आपल्याला मिळू शकेल.'

१९४० मध्ये अमेरिकेत त्यावेळी फोफावलेल्या सोविएतविरोधी ॲक्सिसधार्जिण्या व अलिप्ततावादी चळचळीत लिंडबर्ग हा एक अग्रणी होता. अलिप्ततावादाचा हिरीरीने पुरस्कार करणाऱ्या 'नो फॉरिन वॉर्स, कमिटीचा तो आघाडीचा प्रवक्ता व अमेरिकेतील पंचमस्तंभीयांचा एक उत्साही नेता बनला. अमेरिका फर्स्ट कमिटीने आयोजन केलेल्या सभांत, विशाल जनसमुदायासमोर भाषणे देत त्याने संपूर्ण देशाचा दौरा केला. 'अमेरिकनांचा खरा शत्रू नाझी जर्मनी नव्हे तर सोविएत रशिया आहे, एका बाजूला नाझी जर्मनी व दुसऱ्या बाजूला इंग्लंड व फ्रान्स असे युद्ध झाले तर त्याचे पर्यवसान एक तर जर्मन विजयात होईल, किंवा भुईसपाट उध्वस्त झालेल्या युरोपात होईल. तसे होता कामा नये. सर्वांनी ऐक्य साधून सोविएत संघाविरुद्ध युद्ध चालविले पाहिजे' असे तो वारंवर आवर्जून सांगू लागला.

अमेरिकेने उधारउसनवार योजनेखाली सोविएत संघाला मदत देऊ नये याकरिता राष्ट्रव्यापी मोहीम सुरू करण्याकरिता अमेरिका फर्स्ट कमिटीची संपूर्ण यंत्रणा राबविली गेली. लिंडबर्ग, हॅमिल्टन फिश, सेनेटर बर्टन व्हीलर व जिराल्ड नाय यांसह अमेरिका फर्स्ट कमिटीच्या अनेक प्रवक्त्यांनी लाल

लष्कराला मदत देण्याच्या योजनेचा तीव्र निषेध केला. सोविएत रशियाच्या भवितव्याशी अमेरिकेचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही असे ते आग्रहाने पटवून सांगत होते.

या मोहिमेत हर्बर्ट हूवरही आघाडीला होता. ५ ऑगस्ट रोजी जॉन लेविस, हॅनफोर्ड मॅकनायडर व अन्य १३ सुप्रसिद्ध अलिप्ततावाद्यांसह त्याने एक घोषणापत्रक जारी केले; व रशियाला मदत करण्याबाबत कॉंग्रेसने अधिकृतपणे संमती दिलेली नसूनही रशियाला दिलेल्या मदतीच्या आश्वासनाचा व तत्सम 'युद्धखोर' गोष्टींचा निःसंदिग्ध शब्दात धिक्कार केला.

जपानने पर्ल हार्बरवर हल्ला केल्यानंतर अमेरिका फर्स्ट कमिटी अधिकृतपणे विसर्जित करण्यात आली. त्या संस्थेचा अध्यक्ष जनरल वुड याने जपान व जर्मनी यांविरुद्धच्या अमेरिकेच्या युद्धप्रयत्नात त्यांचे सर्वतोपरी सहकार्य अमेरिकन सरकारला मिळेल असे उघडपणे घोषित केले. लिंडबर्ग अमेरिकेच्या सार्वजनिक क्षेत्रातून निवृत्त झाला व फोर्ड मोटार कंपनीत तांत्रिक सल्लागार म्हणून नोकरीला लागला. पण अनधिकृतपणे त्यांचा सोविएतविरोधी प्रचार चालूच राहिला.

नाझींच्याविरुद्ध लाल लष्कराने त्यांच्या प्रतिहल्ल्याला प्रारंभ करताच अमेरिका फर्स्टच्या ज्या प्रवक्त्याने थोड्याच दिवसांपूर्वी रशिया अल्पावधीतच चिरडले जाणार असे भाकित केले होते. त्यानेच आता मास्को व कॉमिन्टर्नचे हस्तक संपूर्ण युरोपला लवकरच साम्यवादी करून सोडतील असा ओरडा करण्यास प्रारंभ केला. पराभूत नाझी सैन्याला रशियाबाहेर पिटाळीत लाल लष्कर रशियाच्या पश्चिम सीमेपर्यंत जाऊन पोहोचले तेव्हा, ती सीमा ओलांडण्याऐवजी सोविएत सरकार नाझींशी स्वतंत्रपणे शांतता करार करील व अमेरिका व ब्रिटन यांना नाझींना तोंड द्यायला एकाकी सोडून देईन असा प्रचार ते करू लागले; तर, रशियाची पश्चिम सीमा ओलांडून बर्लिनच्या दिशेने लाल लष्कराची आगेकूच सुरू झाली तेव्हा युरोप आता लवकरच मास्कोच्या वर्चस्वाखाली जाणार अशी धास्ती व्यक्त करून जनमत भडकविण्याचा प्रयत्न अमेरिका फर्स्ट कमिटी करू लागली.

नाझी जर्मनीविरुद्धच्या युद्धात अमेरिका व सोविएत संघ यात युती घडून आलेली असूनही अमेरिका फर्स्ट कमिटीने त्यांच्या वृत्तपत्रांद्वारा सोविएत संघाविरुद्ध विखारी प्रचार चालूच ठेवला. विलियम रॅन्डॉल्फ हिअर्स्ट, कॅप्टन जोसेफ पॅटर्सन, कर्नल रॉबर्ट मॅकोर्मिक ही मंडळी त्यांच्या वृत्तपत्रांतील संपादकीयांतून व लेखांतून अविरतपणे अमेरिकेचे मित्रराष्ट्र बनलेल्या सोविएत संघाविरुद्ध अमेरिकन जनमनात साशंकता व शत्रुत्व निर्माण करण्याचे कार्य करीत होती. त्यांच्या त्या प्रचाराचे कांही नमुने असे—

'रशियापासून आपण कोणत्याही चांगल्या गोष्टीची अपेक्षा करू शकत नाही हे आपल्याला कळतच आहे. एखादे अस्वल माणसासारखे दिसले म्हणून ते माणसाप्रमाणे विचार करू शकेल हे अशक्यच आहे. रशियाचे प्रतिकात्मक चिन्ह अस्वल आहे; त्या जनावराप्रमाणे रशियनांच्या विचारसरणीतही, क्रौर्य, स्वार्थ व अविश्वसनीयता पूरेपूर भरलेली असते.' न्यूयॉर्क जर्नल-अमेरिकन, ३० मार्च १९४२.

अनुक्रमणिका

'निरनिराळ्या युद्ध आघाड्यांबद्दल सांगायचे तर रशियातील एकंदर परिस्थिती सोविएत हितसंबंधांना मोठी अनुकूल अशी साकार होत आहे. अर्थात् रशिया 'युनायटेड नेशन्स'चा खऱ्या अर्थाने भागीदार नाही. कारण ते राष्ट्र ॲक्सिक गटाचे अर्ध-भागीदार आहे.' न्यूयॉर्क जर्नल-अमेरिकन, २० मार्च १९४२.

'स्टालिनची सध्या एकाच उद्दिष्टपूर्तीच्या दिशेने वाटचाल सुरू आहे, ती म्हणजे त्यांना हितावह ठरेल त्यावेळी जर्मनीशी स्वतंत्रपणे शांतता करार करता यावा या दृष्टीने तयारी करून ठेवणे. सोविएत रशियाशी केलेल्या करारांचे दोस्त राष्ट्रे प्रामाणिकपणे परिपालन करीत नाहीत असा आरोप दोस्तांवर करून त्याने त्याकरिता तयारी चालविली आहे. दोस्त राष्ट्रेच करारपालनाची टाळाटाळ करीत असल्याने त्या करारांचे पालन करण्याच्या जबाबदारीतून रशियाची अनायासेच मुक्तता होईल अशी त्याची कल्पना आहे'. मॅकोर्मिक, शिकागो ट्रिब्यून, १० ऑगस्ट १९४३.

'विश्वासघात हे स्टालिनच्या स्वभावाचे मुख्य सूत्र बनलेले असून तो अत्यंत स्वार्थी व आत्मकेंद्रीत माणूस आहे. त्यामुळे युद्धसमाप्तीनंतर दोस्त राष्ट्रांकडून जेवढे मिळू शकेल असे स्टालिनला वाटते त्यापेक्षा अधिक, कमीतकमी त्रास होऊन जर जर्मनीकडून त्याला मिळवून घेता आले तर, त्याकरिता जर्मनीशी स्वतंत्रपणे करार केल्याशिवाय तो कसा राहील? क्रेमलिनमध्ये राहणाऱ्या त्या जॉर्जियन माणसाचे संपूर्ण जीवन म्हणजे त्याला हवे ते मिळवून घेण्याकरीता कोणत्याली भल्याबुऱ्या, अनीतीमान व दुष्ट मार्गाचा अवलंब पुन्हा पुन्हा केल्याची एक कहाणी आहे.'मॅकर्मिक, शिकागो ट्रिब्यून, २४ ऑगस्ट १९४३.

'रशियन युरोप, किंवा जर्मन युरोप यांपैकी तुम्ही काय पसंत कराल?' पॅटर्सन डेली न्यूज, २७ ऑगस्ट १९४३.'

'रशियाच्या सहकार्याने शांतता टिकवून धरण्याची योजना आखणे ह्या सारखी हास्यास्पद गोष्ट दुसरी नसेल. रशियाने गरीब बिचाऱ्या फिनलंडवर ज पोलंडवर दुष्टपणाने आक्रमण केले; आणि, इंग्लंडच्या मूक संमतीने जर्मनीवर झडप घालण्यास स्टालिन अगदी तयारीतच होता; केवळ हिटलरने सावध होऊन त्वरा केल्यानेच तसे करणे रशियाला शक्य झाले नाही.' २ नोव्हेंबर १९४३ च्या पॅटर्सनच्या न्यूयॉर्क डेली न्यूजमधील एक पत्र.

अशा जहरी प्रचाराविरुद्ध अध्यक्ष रूझवेल्टने २८ एप्रिल १९४२ रोजी त्याच्या देशवासियांना सतर्क केले होते. 'देशभक्तीचा मुखवटा घालून टोकियो व बर्लिन येथे चाललेल्या प्रचाराची री ओढण्याकरिता बहुमोलाच्या अशा वृत्तपत्र स्वातंत्र्याचा दुरुपयोग करणाऱ्या मंडळींच्या या प्रचारामुळे युद्धप्रयत्नांना खीळ बसता कामा नये' असा स्पष्ट इशारा अमेरिकन जनतेला त्याने दिला होता.

हिअर्स्ट, पॅटर्सन व मॅकोर्मिक यांनी अहर्निश चालविलेल्या सोविएतविरोधी प्रचाराचा अत्यंत रोखठोक शब्दात निषेध अमेरिकन सरकारचा गृहमंत्री हेरॉल्ड एल्. आईक्स यानेही उघडपणे केला. ८

अनुक्रमणिका

नोव्हेंबर १९४३ रोजी अमेरिका-सोविएत संघ राजनैतिक संबंधाच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त मॅडिसन स्क्वेअर गार्डन येथे भरलेल्या सभेत बोलताना तो म्हणाला,—'या देशातील काही प्रभावी व सक्रिय गट हेतुपुरस्सर सोविएतविरोधी भावना भडकविण्याचा प्रयत्न करीत आहेत ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. त्या संदर्भात हिअर्स्ट, पॅटर्सन, मॅकोर्मिक या ॲक्सिस वृत्तपत्रांचा मला मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. या वृत्तपत्रांचे प्रकाशक रशिया व ग्रेट ब्रिटन या राष्ट्रांचा द्वेष करीत असतील तर तसे करण्याने पर्यायाने ते स्वतःच्या राष्ट्राचाच द्वेष करीत आहेत असाच त्याचा अर्थ होईल. व दुराचारापेक्षाही ते कृत्य कितीतरी अधिक गर्हणीय ठरेल. हिटलरविरुद्धच्या युद्धात ज्या राष्ट्राची मदत आपल्याला बहुमोलाची ठरत आहे त्या राष्ट्राविरुद्ध अशा प्रकारे जाणूनबुजून द्वेषभावना व शत्रुत्व रुजविणाऱ्या या मंडळींना त्यांच्या स्वतःच्याच राष्ट्राबद्दल व तेथील संस्थांबद्दल केवळ तिरस्कार व तुच्छताच वाटत असली पाहीजे हे उघडच आहे.

१९४४ च्या शरदात अमेरिका, ग्रेट ब्रिटन व सोविएत संघ यांच्या लष्करांच्या घणाघाती आघातांमुळे नाझी जर्मनीचा पराभव होणार हे स्पष्ट दिसताच सोविएत रशियाविरुद्ध युद्धाला उभे ठाकावे अशी मागणी अमेरिकेतील काही गट उघडपणे करू लागले; तर, सोविएत साम्राज्यवादाच्या धोक्यापासून पाश्चात्य संस्कृतीचे रक्षण करण्याकरिता सोविएतविरोधी युती करावी असे आवाहन नाझी पकडीतून नुकत्याच मुक्त झालेल्या रोममधून, मास्को व पॅरिस येथील माजी राजदूत विलियम सी. बुलिट याने केले.

१९१९ मध्ये विलियम बुलिट बुड्रो विल्सनचा प्रतिनिधी म्हणून प्रथम सोविएत रशियात आला होता. त्यानंतर १५ वर्षांनी, १९३४ मध्ये, तो अमेरिकेचा सोविएत रशियातील पहिला राजदूत बनला. धनाढ्य, महत्वाकांक्षी व राजनैतिक कारस्थानात तरबेज असलेल्या बुलिटने मास्कोला असताना अनेक ट्रॉट्स्कीवाद्यांशी सलोख्याचे व मैत्रीचे संबंध साधले, व ट्रॉट्स्कीवादी म्हणतात त्याप्रमाणे सोविएत रशियाने व्लादिवस्तोक जपानला, तर पश्चिमेकडे काही प्रादेशिक सवलती नाझी जर्मनीला दिल्या पाहिजेत असे तो आग्रहाने बोलू लागला. १९३५ मध्ये बुलिटने बर्लिनला भेट दिली. तत्संबंधी जर्मनीतील त्याकाळचा अमेरिकेचा राजदूत विलियम ई डॉड याने आपल्या रोजनिशीत नोंद केली की—'सहा महिन्यांच्या आत जपान पूर्व रशियावर हल्ला करणार आहे व संपूर्ण दूरपूर्वेचा रशियन प्रदेश जपानच्या ताब्यात जाणार आहे याची त्याला पूर्ण खात्री आहे असे बुलिटने १९३५ च्या वसंतात बर्लिनला आल्यानंतर मला निःसंदिग्धपणे सांगितले. तो म्हणाला की जपानच्या समुद्रातील व्लादिवस्तोकचे ते द्वीपकल्प स्वतःच्या नियंत्रणाखाली ठेवण्याचा रशियाला काहीही अधिकार नाही. ते द्वीपकल्प लवकरच जपान व्यापणार! मी त्याला म्हटले की जर्मनी व जपान यांना रशियाबाबत वाटेल ते करण्याची मुभा दिली गेली तर १६ कोटी लोकसंख्येच्या रशियाकरिता पॅसिफिक व बाल्टिक समुद्रकिनाराच उरणार नाही ते तरी तुला कबूल आहे ना?' त्यावर तो अगदी बेफिकिरीने उत्तरला 'मग त्यात काय बिघडले? त्यामुळे काय फरक पडणार आहे?' एका जबाबदार मुत्सद्याच्या तोंडून अशा प्रकारचे बोलणे ऐकून मी तर थक्कच झालो.'

जर्मनीतील यावेळच्या त्याच्या मुक्कामात एका भोजन प्रसंगी फ्रेंच राजदूताशीही असेच सोविएतविरोधी बोलणे बुलिटने लावले. तत्पूर्वी, फ्रँको-रशियन करार (त्यावेळी त्या करारासंबंधी वाटाघाटी सुरू होत्या) म्हणजे युरोपीय शांततेची सर्वोत्तम हमी ठरेल असे भाष्य तत्संबंधी ब्रिटिश राजदूताने

अनुक्रमणिका

माझ्याजवळ केले होते. तो फ्रँको-रशियन करार वाटेल ते झाले तरी उधळून लावला पाहिजे असे त्याने फ्रेंच राजदूताला पटवून सांगण्याचा प्रयत्न केला. त्याच सुमारस इटलीचा नवा राजदूतही मास्कोहून परस्पर बर्लिनला आला होता. तेव्हा आम्हाला कळले की मास्को सोडण्यापूर्वीच बलिट फासिझमकडे आकर्षित झाला होता.'

'इटली व जर्मनी यांची लष्करे अगोदरच जागतिक शांततेला धोकादायक ठरावीत इतकी सामर्थ्यसंपन्न आहेत. पण तरीही त्या राष्ट्रांना मोठमोठ्या रकमा अमेरिकन बँकांकडून कर्जाऊ देण्यासंबंधी वाटाघाटी सुरू आहेत, व बुलिट त्या योजनांना भरघोस पाठिंबा देत आहे अशा बातम्या नुकत्याच माझ्या कानावर आल्या आहेत' अशीही एक नोंद २७ जानेवारी १९३७ रोजी राजदूत डॉड याने केली.

१९४० मध्ये फ्रान्सचे पतन झाल्यानंतर बुलिट अमेरिकेला परत आला. मार्शल पेताँ हा एक महान देशभक्त असून, नाझींच्या पुढे शरणागती पत्करून त्याने आपल्या देशाचे साम्यवादापासून रक्षण केले आहे असे त्याने अमेरिकन जनतेला आवर्जून सांगितले.

चार वर्षांनंतर, युद्ध समाप्ती दृष्टीपथात येऊ लागली तेव्हा 'लाईफ' मासिकाचा वार्ताहार म्हणून बुलिट पुन्हा युरोपात आला. इटलीहून पाठविलेला त्याचा एक खळबळजनक लेख 'लाईफ' च्या ४ सप्टेंबर १९४४ च्या अंकांत प्रकाशित झाला. फासिस्टांच्या जग जिंकण्याच्या योजनेचा एक भाग म्हणून जो सोविएतविरोधी प्रचार आंतर्राष्ट्रीय फासिझमनी सतत वीस वर्षे चालविला होता त्याचीच री काही रोमन लोकांचे मत सांगण्याच्या मिषाने बुलिटने त्या लेखात ओढली होती. त्याने लिहिले होते,—'फिनलंड, एस्तोनिया, लातबिया, लिथुआनिया, पोलंड, रुमानिया, बल्गेरिया, हंगेरी, झेकोस्लोवाकिया या राष्ट्रांवर सोविएत संघाचे वर्चस्व प्रस्थापित होणार; तसेच पूर्व पोलंडबरोबर कोनिग्जबर्गसह पूर्व प्रशियाही रशिया काबीज करणार अशीच रोमन लोकांची अपेक्षा आहे. अलीकडे रोममध्ये प्रचलित असलेल्या एका दुःखद विनोदातून रोमन लोकांना वाटणारी आशा प्रतिबिंबित झाली आहे. ते म्हणतात आशावादी कोण, तर, सोविएत संघ एकीकडे व ग्रेट ब्रिटन व अमेरिका यांचा पाठिंबा असलेला संपूर्ण पश्चिम युरोप दुसरीकडे असे तिसरे महायुद्ध साधारणतः १५ वर्षांनी सुरू होणार अशी ज्याला खात्री वाटते तो! आणि निराशावादी कोण, तर पश्चिम युरोप, ग्रेट ब्रिटन व अमेरिका यांना रशियाविरुद्ध लढण्याची हिंमतच होणार नाही असे ज्याला वाटते तो!'

मास्को व त्यांचे कॉमिन्टर्न हस्तक यांच्या धोक्याविरुद्ध पश्चिमी संस्कृतीने ऐक्य साधलेच पाहिजे असे बुलिट मोठ्या तळमळीने व आग्रहाने बोलत होता. पंचवीस वर्षांपूर्वी, पहिले महायुद्ध संपता संपता, जगातील सर्व प्रतिक्रांतिवाद्यांना संघटित करण्याकरिता असेच आवाहन कॅप्टन सिडने रॅली याने केले होते.

['टाईम', 'लाईफ', 'फॉरच्यून', या मासिकांच्या प्रकाशकाची पत्नी व काँग्रेसमधील एक प्रतिनिधी क्लेअर ल्यूस तिच्या युरोप दौऱ्यावरून परत आली तेव्हा, लाल लष्कराच्या विजयामुळे बोल्शेविझमच्या लोंढ्याखाली संपूर्ण युरोप बुडून जाण्याचा धोका निर्माण झाला आहे, तेव्हा अमेरिकेने युरोपातील सर्व सोविएतविरोधी शक्तींना पाठिंबा दिला पाहिजे, अशी हाक तिने अमेरिकन सरकारला दिली. डॉ.गोबेल्सने बर्लिन रेडिओवरून केलेल्या अखेरच्या भाषणात हीच आशा व्यक्त केली होती.

अनुक्रमणिका

असेच आवाहन १९४५ मध्ये अमेरिकन सेनेटर्सच्या एका गटाने रोमला भेट दिली त्यावेळीही ऐकू आले. तेव्हा तेथील अमेरिकन सैनिकांपुढे बोलताना, 'ते सेनेटर्स करीत असलेल्या कामगिरीची परिपूर्ती सोविएत संघाविरुद्ध लढा देऊन अमेरिकन सैनिकांनी करावी अशी सूचना त्या सेनेर्टसनी त्यांना केली. पण त्यांच्या त्या आवाहनला त्या सैनिकांकडून प्रतिसाद मिळाला नाही.

सोविएतविरोधी प्रचार करणारी अनेक पुस्तकेही त्याकाळी अमेरिकेत प्रकाशित झाली. विलियम व्हाईटचे 'रिपोर्ट ऑन द रशियन्स', अलेक्झांडर बार्माईनचे 'वन हू सर्व्हाईव्हड' व व्हिक्टर क्रावचेन्कोचे 'आय चोज फ्रीडम' ही पुस्तके त्या प्रचाराचे मासलेवाईक नमुने होत.

विलियम व्हाईट या अमेरिकन पत्रकाराचे 'रिपोर्ट ऑन द रशियन्स' हे पुस्तक म्हणजे सोविएत जनता, त्यांचे नेते व त्यांचे युद्ध प्रयत्न यांवर निर्दयपणे यालविण्यात आलेले एक विखारी हत्यार होते. ते पुस्तक अमेरिकेतील सोविएतविरोधी गटांनी व हिअर्स्ट, पॅटर्सन, मॅकोर्मिक यांसारख्या पत्रकारांनी डोक्यावर घेतले, तर जॉन हर्से, रिचर्ड लाऊटेरबाख, राल्फ पार्कर, एडगर स्नो यांसारख्या युद्धकाळात रशियात काही दिवस काम केलेल्या सुप्रसिद्ध पत्रकारांनी व्हाईटचा रिपोर्ट अत्यंत पक्षपाती व पूर्वग्रहदूषित स्वरुपाचा असून, एरवी इंग्लंड-अमेरिकेला जो भयानक रक्तपात व हालअपेष्टा सोसाव्या लागल्या असत्या, त्या ज्या राष्ट्राच्या त्यागामुळे वाचल्या त्या रशियन राष्ट्राबद्दल हेतुपुरस्सर दिशाभूल करणारा आहे असे त्यांनी जाहीर निवेदन केले.

सोविएत राजकरण व नेतृत्व याबद्दलची 'गुपिते' सांगणारे बार्माईनचे 'वन हू सर्व्हाईव्हड' हे पुस्तक सोविएत संघासंबंधित सर्वच गोष्टींवर जळजळीत टीकास्त्र परजणारे पुस्तक होते. 'सोविएत संघात आज यशस्वी ठरलेल्या प्रतिक्रांतीचा स्टालिन हा नेता असून तो एक प्रतिक्रियावादी हुकुमशहा आहे' अशी 'खात्रीलायक' माहिती त्या पुस्तकात बार्माईनने दिली होती. १९३६-३८ च्या पक्षशुद्धीच्या काळातील तुखाचेवस्कीसह अनेक पंचमस्तंभीय बार्माईनचे निकटचे सहकारी व मित्र होते. आर्कडी रोझेनगोल्टझ् या जर्मन हस्तकाच्या मार्गदर्शनाखाली त्याने स्वतःही घातपाती स्वरूपाची थोडी बहुत कामगिरी पार पाडली होती, पॅरिसमध्ये लिऑं सेदोव आणि ट्रॉट्स्की यांच्याशी याची भेट झाली होती, इत्यादी गोष्टीही त्याने त्या पुस्तकात नमूद केल्या होत्या.

व्हाईट व बार्माईन यांच्या ह्या लिखाणाचा भरपूर फायदा नाझींनी त्यांच्या सोविएतविरोधी प्रचार मोहिमेत करून घेतला.

व्हिक्टर क्रावचेन्को यानेही 'आय चोज फ्रीडम' या आपल्या पुस्तकात सोविएत संघावर टीकेची तोफच डागली होती पंचवार्षिक योजना व कृषिसामूहिकीकरण यामुळे रशियाच्या नशीबी अतीव दारिद्र्य आले आहे, जनतेच्या कल्पनातीत हालअपेष्टा होत आहेत. त्यांचे जीवनमान बेसुमार घसरले आहे, लाल लष्कर म्हणजे केवळ एक बेशिस्त नेतृत्वहीन गुंडागर्दी आहे, त्यातील सैनिक हे लंगडे, क्षयी व रोगट अशी वयस्क माणसे आहेत, फारशा प्रतिकाराला तोंड देण्याची गरजही न भासता जर्मनांना मास्को सहजपणे जिंकता येऊ शकत होते, असे असूनही ते माघारी का फिरले हे इतिहासातील एक गूढच आहे, त्याची उकल केवळ जर्मनच करू शकतात, अशी बेफाम विधाने त्यात केलेली होती; व सोविएत संघाविरुद्ध पुन्हा नव्याने धर्मयुद्धाला प्रारंभ करण्याचे आवाहन त्याने केले होते. 'जागतिक सुरक्षितता साध्य करावयाची असेल तर ते जागतिक संघटनेद्वारा होणे शक्य नाही, जुलुमी शासकांच्या पकडीतून रशियन जनतेची मुक्तता करूनच ते शक्य होणार आहे, असे तो आवर्जून सांगत होता.

दुसरे महायुद्ध संपले म्हणून बोल्शेविकविरोधी 'धर्मयुद्धा'तील नेत्यांची प्रचारतोफ यत्किंचतही थंडावली नाही. मात्र वुड्रो विल्सनच्या निधनानंतर अमेरिकेतील व अन्य राष्ट्रांतीलही जनता अनुभवाने बरेच काही शिकली असल्याने त्या विषारी प्रचाराचा परिणाम पूर्वीइतका घातक ठरला नाही एवढेच!]

मात्र १९४५ पर्यंत जगात प्रचंड बदल घडून आले होते. सोविएत संघाविरुद्ध नव्या धर्मयुद्धाचे आवाहन विलियम बुलिट करीत होता त्याच वेळी सोविएत संघ, ग्रेट ब्रिटन अमेरिका यांची लष्करे प्रतिक्रांतीचा बालेकिल्ला असलेल्या बर्लिनवर चारही दिशांनी चाल करून जात होती. फासिस्ट गुलामगिरीच्या भयानक संकटाला तोंड देताना पश्चिमी राष्ट्रांना बहुमोलाची मदत झाली होती ती रशियन क्रांतीतून उभ्या झालेल्या सोविएत राष्ट्राची. ती राष्ट्रे व सोविएत संघ यांत झालेली युती ही एक अकस्मात घडून आलेली घटना नव्हती. २५ वर्षांच्या हेतुपुरस्सर पोसल्या गेलेल्या गैरसमजानंतर व शत्रुत्वानंतर, परिस्थितीच्या दडपणामुळे जगातील स्वातंत्र्यप्रेमी जनतेत घडून आलेली ती युती होती. दुसऱ्या महायुद्धातील अभूतपूर्व रक्तपात व हालअपेष्टा यातून संयुक्त राष्ट्रसंघाचा उदय झाला होता.

अनुक्रमणिका

# प्रकरण २४

## सोळा हस्तकांचे प्रकरण

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरच्या काही महिन्यात ग्रेट ब्रिटन व अमेरिका या राष्ट्रांतील सोविएतविरोधी चळवळीच्या नेत्यांचा प्रचार केंद्रित झाला होता तो पोलंडच्या प्रश्नावर! पश्चिमेच्या दिशेने लाल लष्कराची वेगवान आगेकूच जशी चालू झाली व पोलिश सीमा ओलांडून त्यांनी नाझी आक्रमकांच्या पकडीतून पोलंडचा प्रदेश मुक्त केला, त्याबरोबर ब्रिटिश टोरींनी व अमेरिकन अलिप्ततावाद्यांनी सोविएत संघामुळे पोलिश स्वातंत्र्याला धोका निर्माण झाला असल्याची ओरड सुरू केली. पोलंडचे बोल्शेविकांपासून संरक्षण करण्याकरिता सोविएतांविरुद्ध कार्यवाही करण्यात यावी असे आवाहन हिअर्स्ट–पॅटर्सन–मॅकोर्मिक ही वृत्तपत्रे करू लागली. सोविएत संघाच्या पोलंडमधील 'लाल साम्राज्यवादी' आकांक्षा व संयुक्त राष्ट्रसंघाच्या तत्वांचा सोविएत संघाने केलेला विश्वासघात यांचा निषेध करण्याकरिता अमेरीकन काँग्रेसमध्ये व ब्रिटिश पार्लमेंटमध्ये त्या राष्ट्रांतील काही लोकप्रतिनिधी तावातावाने भाषणे देऊ लागले. हा बहुतांश प्रचार लंडनस्थित परागंदा पोलिश सरकार व वॉशिंग्टन डी.सी. येथील त्यांचे प्रतिनिधी यांनी तथाकथित अधिकृत कागदपत्रांनी पुरविलेल्या माहितीवर आधारीत होता. लंडनमध्ये असलेल्या त्या पोलिश सरकारात प्रमुख होते ते पोलिश लष्करवादी, पोलंडमधील सरंजामशाही जमीनदारांचे प्रवक्ते, काही पोलिश समाजवादी व शेतकरी नेते. [सोविएत संघाप्रती सातत्याने शत्रुत्वाची नीती चोखाळणाऱ्या पोलंडच्या पिल्सुदस्की सरकारचे आपण वारस आहोत असा लंडनमधील परागंदा पोलिश सरकारचा दावा होता. 'पोलंडः द की टु युरोप' या आपल्या पुस्तकात रेमंड लेस्ली ब्युएल म्हणतो–'पोलंडला आणखीही बराच मोठा प्रदेश मिळायला पाहिजे व ऐतिहासिक दृष्ट्या विचार करता तो जास्तीचा प्रदेश जर्मनीकडून मिळवण्यापेक्षा सोविएत संघाकडून मिळवणे न्याय्य, शक्य व सोयीचे होईल असे त्याला वाटत होते.' पोलंडच्या हेरखात्यातील सोविएतविरोधी अधिकारी कर्नल जोसेफ बेक याच्या मार्गदर्शनाखालील युद्धपूर्व पोलिश राजनीतीचा रोख नाझी जर्मनीविरुद्ध नव्हे तर सोविएत संघाविरुद्ध होता. जगातील अन्य कोणत्याही राष्ट्रापेक्षा पोलिश लष्करात घोडदळाचे प्रमाण सर्वात जास्त होते व युक्रेनच्या भूसपाटीवर मोहिमा चालविण्याच्या खास हेतूने त्यांना प्रशिक्षण देण्यात आले होते. पोलंडचे सर्व उद्योगधंदे जर्मन–पोलिश सीमेवर केंद्रित करण्यात आले होते, तर पोलिश लष्करी तटबंदी उभारली गेली होती ती पूर्वेला–सोविएत सीमेवर!

ती तटबंदी उभारली गेल्यापासून, पोलिश लष्करवादी व सरंजामशाही जमीनदार यांच्या वर्चस्वाखाली असलेले पोलंड सोविएत संघाविरुद्ध पश्चिमी राष्ट्रांनी उभारलेल्या संरक्षक लष्करी कड्याचा कोनशिला बनले होते. तसेच सोविएत सरकार उलथून पाडण्याकरिता नाना प्रकारची कारस्थाने करणाऱ्या हस्तकांचे पोलंड हे एक प्रमुख संकेतस्थळ बनले होते. रशियातून पळून आल्यानंतर बोरिस साविन्कोवने आपले मध्यवर्ती कार्यालय पोलंडमध्येच थाटले होते व पिल्सुदस्कीच्या प्रत्यक्ष मदतीने सोविएत संघाविरुद्ध लढण्याकरिता ३०००० सैनिकांचे पोलिश लष्कर त्याने तेथे उभारले होते. १९२८–२९ च्या सुमारास ज्यावेळी तोर्गप्रोम कटवाले सोविएत संघामध्ये लष्करी हस्तक्षेप करण्याच्या योजना आखीत होते, तेव्हा तशा युद्धात पोलंड हा एक मुख्य लष्करी तळ असावा असा करार तोर्गप्रोम नेते व पोलिश सर्वोच्च लष्करी अधिकारी यांत घडून आला होता.

ट्रॉट्स्कीवादी व बुखारिनवादी भूमीगत संघटनांसह सर्व सोविएतविरोधी शक्तींशी पोलिश हेरखात्याने निकटचे कार्यसंबंध राखले होते. १९३३ मध्ये म्युनिक कराराचे वेळी तर पोलिश राजनीतीचे सोविएतविरोधी स्वरूप प्रकर्षाने स्पष्ट झाले. सुडेटन लॅंडच्या कारणावरून नाझींनी झेकोस्लोवाकियाला निर्वाणीचा खलिता पाठविला आणि झेक नेते प्रतिकाराची सिद्धता करीत होते त्यावेळी, युद्धसज्जता करून, सोविएत लष्कर ज्या मार्गाने झेकोस्लोवाकियाच्या मदतीला जाणे शक्य होते त्या सीमेवर अडसर म्हणून पोलंडने आपले लष्कर उभे केले. नाझींना अनुकूल ठरलेल्या त्या कार्यवाहीचे बक्षीस म्हणूनच झेकोस्लोवाकियाच्या विभाजनाच्या वेळी झेकोस्लोवाकियाचा तेश्चेन जिल्हा व्यापण्याची परवानगी हिटलरने पोलिश नेत्यांना दिली.

अनुक्रमणिका

अगदी १९३९ मध्येही, पोलंडवर नाझी हल्ला लवकरच होणार हे स्पष्ट दिसत असूनही पोलिश लष्करवादी नेते आपल्या आत्मघातकी नीतीत थोडाही बदल करायला तयार नव्हते. त्यामुळे पोलिश–सोविएत लष्करी कराराचा त्यांच्यापुढे सोविएत सरकारने ठेवलेला प्रस्ताव त्यांनी उधळून लावला, व नाझी लष्कराला त्यांच्या पूर्व सीमेवरच अडवून धरण्याकरिता पोलंडमधून लाल लष्कराला मार्ग देण्याचेही त्यांनी साफ नाकारले. या सर्व नीतीचे परिणाम पोलडच्या दृष्टीने अनर्थावह ठरले. नाझींनी पोलंडवर आक्रमण करताच, देशाचा संपूर्ण सुवर्णाचा साठा बरोबर घेऊन ते पोलिश सरकार देशाबाहेर पळून गेले. काही दिवस फ्रान्समध्ये राहिल्यानंतर त्या सरकारचे प्रतिनिधी नंतर इंग्लंडमध्ये स्थायिक झाले ते परागंदा असले तरी पोलंडचे खरे सरकार तेच आहे असा त्यांचा दावा होता.

ज्या सोविएत विरोधी कारस्थानांमुळे त्यांच्या राष्ट्राचा घात झाला होता तीच कारस्थाने त्या काळातही लंडनस्थित परागंदा प्रतिक्रियावादी पोलिश नेत्यांनी चालू ठेवली; आणि युद्धात नाझींच्या विरुद्ध सोविएत रशियाचा विजय झाला तर ते त्यांच्या हितसबंधांना घातक ठरेल असे ज्यांना ज्यांना वाटत होते त्या आंतर्राष्ट्रीय आर्थिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रातील सर्व प्रभावी गटांचा त्यांना पुरेपुर पाठिंबा होता.]

एकंदरीत युद्धकाळात दोन पोलिश सरकारे अस्तित्वात होती–पोलंडचे खरे सरकार म्हणजे आपणच, असा दावा करणारे लंडनमधील परागंदा पोलिश सरकार व खुद्द पोलंडमधील वॉर्सा सरकार. सर्व फासिस्टविरोधी पक्षांची युती होऊन बनलेल्या त्या वॉर्सा सरकारने १९३५ ची पिल्सुदस्कीची फासिस्ट राज्यघटना उधळून लावली, तर लंडनमधील पोलिश सरकार मात्र त्याच घटनेचा पुरस्कार करीत होते. पोलंडमधील सरंजामशाही इस्टेटी मोडून मूलभूत स्वरूपाच्या आर्थिक व राजकीय सुधारणा घडवून आणण्याची वॉर्सा सरकारची नीती होती, व सोविएत सरकारशी त्यांना निकटचे मैत्रीसंबंध हवे होते.

फेब्रुवारी १९४५ मध्ये याल्टा येथे भरलेल्या परिषदेत रूझवेल्ट, स्टालिन व चर्चिल यांनी पोलंडच्या भवितव्याबाबत तपशीलाने चर्चा केली. पोलंडमधील व पोलंडच्या बाहेरील लोकशाहीवादी पोलीश नेत्यांचा समावेश करून लोकशाही तत्वांच्या व्यापक आधारावर पोलिश सरकारची पुनर्रचना करून त्या सरकारला पोलंडचे कायदेशीर सरकार म्हणून मान्यता द्यावी असे त्यावेळी सर्वानुमते निश्चित करण्यात आले.

या याल्टा–निर्णयाला लंडनमधील पोलिश निर्वासित नेते व त्यांचे ब्रिटिश व अमेरिकन समर्थक यांनी प्रखर विरोध सुरू केला. तो निर्णय म्हणजे पोलंडचा विश्वातघात होय अशी जळजळीत टीका ते करू लागले. याल्टा–निर्णयाला मूर्त स्वरूप येऊ नये याकरिता कारस्थानांना प्रारंभ झाला.

मे १९४५ मध्ये सोविएतविरोधी कारस्थाने करण्याच्या आरोपावरून लंडनस्थित परागंदा पोलिश सरकारच्या १६ पोलिश हस्तकांना अटक करण्यात आली असल्याची घोषणा सोविएत सरकारने केली; त्याबरोबर पोलिश प्रश्नाभोवती केंद्रीत झालेल्या सोविएतविरोधी चळवळीला व कारस्थानांना ऊत आला. सोविएत सरकारची ती कृती म्हणजे पोलंडच्या लोकशाहीचा गळा घोटून पोलिश जनतेवर लाल हुकुमशाही लादण्याच्या मास्कोच्या कटाचा एक निःसंदिग्ध पुरावा आहे अशी ओरड लंडनमधील पोलिश निर्वासितांनी सुरू केली.

अटक झालेल्या सोळा पोलिश हस्तकांपैकी सर्वप्रमुख होता तो जनरल लिओपोल्ड ब्रोनिस्लाव ओकुलिकी–पूर्वीच्या पोलिश लष्करातील एक उच्चपदस्थ अधिकारी. पोलिश निर्वासितांनी चालविलेल्या सोविएतविरोधी मोहिमेत त्याने मोलाची कामगिरी बजावली होती.

अनुक्रमणिका

हे पोलिश लष्कर, ऑगस्ट १९४१ मध्ये झालेल्या पोलिश–सोविएत करारानुसार, नाझी जर्मनीविरुद्धच्या युद्धात त्यांनी लाल लष्कराशी सहकार्य करावे या उद्दिष्टाने सोविएत भूमीवर उभारण्यात आले होते. पिल्सुदस्की–हुकुमशाहीच्या काळात ज्या लष्करी अधिकाऱ्यांचा प्रभाव पोलंडवर होता त्यापैकी एक प्रमुख अधिकारी जनरल व्लादिस्लाव अँडर्स हा त्या लष्कराचा नेता होता त्या लष्कराला प्रशिक्षण देऊन जर्मनीविरुद्ध लष्करी कार्यवाहीकरिता शस्त्रसज्ज करण्याच्या हेतूने तीस कोटी रुबल्सचे बिनव्याजी कर्ज, तसेच लष्करभरती करण्याकरिता व छावण्या उभारण्याकरिता सवलती सोविएत सरकारने त्यांना दिल्या होत्या. परंतु जनरल अँडर्स, जनरल ओकुलिकी व अन्य पोलिश लष्करवादी, लाल लष्कराशी झालेल्या त्या युतीला आतून आतून विरोधच करीत होते. नाझी जर्मनीकडून सोविएत रशियाचा लवकरच पराभव होणार अशी त्यांची पक्की खात्री होती; व त्यानुसार ते त्यांची नीती ठरवीत होते.

वॉर्सा राजवटीच्या लष्कराचा नेता लेफ्टनंट कर्नल बर्लिन याने सादर केलेल्या अहवालानुसार, १९४१ मध्ये पहिल्या पोलिश तुकड्या सोविएत भूमीवर उभारल्या गेल्यानंतर थोडेच दिवसात जनरल अँडर्सने त्याच्या हाताखालील अधिकाऱ्यांची एक बैठक बोलाविली होती. 'जर्मनांच्या घणाघाती आघातांमुळे दोन-तीन महिन्यातच लाल लष्कर कोसळणार याबद्दल शंका नाही; तसे झाले की कास्पियन समुद्राद्वारे इराणमधून आपल्याला पुढे मुसंडी मारता येईल; त्या क्षेत्रात संघटित लष्करी शक्ती फक्त आपलीच शिल्लक राहणार असल्याने आपण तेथे आपल्याला हवे ते करू शकू' असे त्याने त्या अधिकाऱ्यांना सांगितले.

परंतु नाझी लष्करी झंझावातापुढे लाल लष्कर कोसळेल ही अँडर्सची अपेक्षा विफल ठरली. तेव्हा, नाझींविरुद्ध संयुक्तणे लढा देण्याच्या पोलिशसोविएत कराराच्या अटीची पूर्ती करण्याच्या भानगडीत पडण्याची काहीही गरज नाही असे अँडर्सने त्याच्या हाताखालील अधिकाऱ्यांना सांगितले. एवढच नव्हे, तर जर्मनी विरुद्ध युद्ध आघाडीवर त्यांना पाठविण्यात येऊ नये या हेतूने पोलिश तुकड्यांना प्रशिक्षण देऊन युद्धसज्ज करण्याची त्याने टाळाटाळ चालविली. त्या सैनिकांना शस्त्रे पुरविण्याच्या कार्यात जनरल ओकुलिकीने हेतुपुरस्सर जास्तीत जास्त अडथळे निर्माण केले. इराणामार्गे इंग्लंडकडून येणाऱ्या युद्धसामुग्रीकरिता कास्पियन समुद्रावर तळ प्रस्थापित करण्याचे सोविएत लष्करी अधिकाऱ्यांनी सुरू केलेले काम सुरळीतपणे व जलदपणे होऊ नये असे प्रयत्न त्याने केले. कास्पियन समुद्रावरील त्या तळावर शस्त्रास्त्रे लवकरात लवकर पोहोचावी म्हणून सोविएत सरकारने एक खास रेल्वेलाईन त्या ठिकाणापर्यंत घातली होती. पण त्या मार्गे एकही रायफल, रणगाडा किंवा थोडेही युद्धसाहित्य त्या तळावर पोहोचू नये अशी व्यवस्था जनरल अँडर्स करीत होता.

वस्तुतः, सोविएत मदतीने नाझी आक्रमकांविरुद्ध लढण्यास सामान्य पोलिश अधिकारी व सैनिक उत्सुक होते. परंतु जनरल अँडर्स व जनरल ओकुलिकी यांच्या प्रतिक्रियावादी गटाने धाकदपटशा करून त्यांनी गप्प बसविले. सोविएतांबद्दल मैत्रीची भावना बाळगून असलेल्या पोलिश 'राष्ट्रद्रोह्यां' च्या नावांच्या याद्या तयार करण्यात आल्या. फासिस्ट–ज्यूविरोधी प्रचाराला चालना देण्यात आली. ज्यूंविरुद्ध कार्यवाही करण्याची निकड उघडपणे प्रतिपादित केली जाऊ लागली ज्यूंना मारहाण होऊ लागली. द्वाजका या

अँडर्स लष्कराच्या हेरगिरी यंत्रणेद्वारा सोविएत शस्त्रास्त्र निर्मिती करखाने, तेथील सरकारी कृषी क्षेत्रे, रेल्वे, युद्धसाहित्याचे तळ, लाल लष्कराच्या हालचाली, याबाबत गुप्त माहिती गोळा करण्यास सुरूवात झाली.

१९४२ च्या वसंतापर्यंत, रशियात नाझींविरुद्ध लढा देण्याच्या हेतूने उभारले गेलेले अँडर्सचे लष्कर जर्मनांविरुद्ध एकदाही रणक्षेत्रात उतरले नव्हते. उलट जनरल अँडर्स, ओकुलिकी या त्यांच्या अधिकाऱ्यांच्या मनात भिनलेले ज्यूविरोधी व सोविएतविरोधी विषारी तत्वज्ञान सामान्य पोलिश अधिकारी व सैनिक यांच्या गळी उतरविण्याचे प्रयत्न सर्वतोपरी करण्यात येत होते. शेवटी, त्यांचे लष्कर ब्रिटिश देखरेखीखाली इराणला पाठविण्यात यावे अशी विनंती त्या पोलिश नेत्यांनी केली. त्यानुसार ऑगस्ट १९४२ पर्यंत ७५४९१ पोलिश अधिकारी व सैनिक त्यांच्या कुटुंबियांसह नाझी आक्रमकांविरुद्ध एकदाही साधी बंदूकही न उचलता निघून गेले.

१३ मार्च १९४४ रोजी ऑस्ट्रेलियन वार्ताहार जेम्स आल्ड्रिज याने इराणला गेलेल्या पोलिश लष्करी नेत्यांच्या फासिस्ट भूमिकेबद्दल एक अहवाल न्यूयॉर्क टाईम्सला सादर केला. त्या पोलिश निर्वासितांसंबंधी सत्य परिस्थिती जाहीरपणे सांगण्याचा प्रयत्न एक वर्षापासून तो सतत करीत होता; पण दोस्त राष्ट्रांच्या मुद्रणनियंत्रण यंत्रणेमुळे ते शक्य झाले नाही असे आल्ड्रिजने आपल्या अहवालात नमूद केले होते. एक मुद्रणनियंत्रक दोस्त अधिकारी तर आल्ड्रिजला स्पष्टच म्हणाला की आल्ड्रिजचे सर्व म्हणणे खरे आहे याची त्यालाही कल्पना आहे; पण पोलिश सरकारला त्यांची राजनैतिक मान्यता असल्यामुळे आल्ड्रिजने पाठविलेल्या बातम्या नियंत्रित करण्याव्यतिरिक्त दुसरा काही पर्यायच नव्हता. आल्ड्रिजने पाठविलेल्या अहवालातील काही भाग पुढीलप्रमाणे होता—'संपूर्ण पोलिश छावणी वर्गविग्रहाने पोखरलेली आहे. शिबिरात ज्याच्या त्याच्या दर्जानुसार वागणूक मिळते. कनिष्ठ स्तरांतील लोकांची स्थिती तर अत्यंत दयनीय आहे. ज्यूंना 'घेट्टो' मध्ये वेगळे ठेवण्यात येते. छावणीचे शासन हुकुमशाही पद्धतीचे आहे. अती प्रतिक्रियावादी गट रशियाविरुद्ध अविरतपणे प्रचार करीत असतात. एकदा ३०० ज्यू मुलांना पॅलेस्टाईनमध्ये पाठविण्याचे ठरले असूनही त्या उच्चभ्रू पोलिश अधिकाऱ्यांनी इराकी अधिकाऱ्यांवर दडपण आणून त्या मुलांना अडविले.

'पोलिश प्रश्नाबाबत सत्य परिस्थिती सांगण्याची त्यांची इच्छा आहे असे बऱ्याच अमेरिकनांनी म्हटल्याचे मी ऐकले आहे. पण वॉशिंग्टन येथे स्वार्थपोषणाकरिता सतत जागरूक असलेला पोलिश गट इतका प्रभावी होता की त्यामुळे त्यांना ते करणे शक्य होत नव्हते.'

इराणमधून ते पोलिश निर्वासित इटलीला गेले. तेथे ब्रिटिश लष्करी नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली, व्हॅटिकनच्या पाठिंब्याने, त्यांनी पोलिश निर्वासित लष्कराचे मध्यवर्ती कार्यालय स्थापले. रशियाविरुद्ध लष्करी कार्यवाही करण्याकरिता उभारल्या जावयाच्या श्वेत लष्कराचा केंद्रबिंदू म्हणून त्या पोलिशलष्कराचा उपयोग व्हावा अशी जनरल अँडर्स, ओकुलिकी व त्यांचे सहकारी यांची अपेक्षा होती. तो त्याचा उद्देश लपवून ठेवण्याचा त्यांनी प्रयत्नही केला नाही.

१९४४ च्या वसंतात लाल लष्कर रशियन पोलिश सीमेनजीक येऊन पोहोचतात लंडनस्थित पोलिश निर्वासितांनी त्यांच्या सोविएतविरोधी मोहिमेला चांगलीच चालना दिली. 'सोविएत रशिया पराभूत होणे शक्य न झाले तर निदान ते राष्ट्र दुबळे तरी व्हावे हे आपल्या विजयाकरिताच नव्हे तर अगदी आपल्या अस्तित्वाकरिता अगत्याचे आहे' असे जाहीरपणे सांगणारी 'पेन्स्वो पोल्स्की' सारखी भूमीगत वृत्तपत्रे निर्वासित पोलिश सरकारचे पोलंडमधील हस्तक पोलंडमध्ये सर्वत्र वाटत होते. सर्व जर्मन अधिकाऱ्यांशी, कोणत्याही परिस्थितीत सलोख्याचेच संबंध राखावेत असे आदेश लंडनमधील पोलिश नेते पोलंडमधील त्यांच्या हस्तकांना देत होते. सोविएत संघाविरुद्ध करावयाच्या लष्करी कार्यवाहीकरिताही निर्वासित पोलिश सरकार सज्ञता करीत होते. पोलंडमधील 'आर्मिया क्राजोवा' 'उर्फ' 'ए.के.' या नावाच्या लंडन निर्वासितांच्या प्रभावाखालील भूमीगत लष्करी यंत्रणेद्वारा ती कार्यवाही व्हावयाची होती. त्या लष्करी संघटनेचा नेता होता जनरल बोर-कोमोरोवस्की.

मार्च १९४४ च्या प्रारंभी लंडनमधील पोलिश निर्वासितांचा लष्करी प्रतिनिधी जनरल सोस्नकोवस्की याच्या कार्यालयात जनरल ओकुलिकी याला पाचारण करण्यात आले. या कार्यालयात झालेल्या गुप्त बैठकीचा नंतर खुद्द ओकुलिकीने दिलेला वृत्तांत असा—ओकुलिकी पोलंडला परत जाण्यापूर्वी त्याला बोलावून जनरल सोस्नकोवस्कीने त्याला सांगितले की लवकरच लाल लष्कराच्या मोहिमा पोलंडमध्ये सुरू होतील व परिणामी पोलंडमधील जर्मन सैन्याचा नक्कीच पराभव होईल; तसे झाले तर लाल लष्कर पोलंड व्यापील व लंडनमधील पोलिश सरकारच्या नियंत्रणाखाली असलेली आर्मिया क्राजोवा ही लष्करी संघटना ते पोलिश भूमीवर राहू देणार नाहीत; अशा परिस्थितीत लाल लष्कराने नाझींना पोलंडमधून हाकून लावल्यानंतर लागलीच, आर्मिया क्राजोवाने स्वतःहून ती संघटना विसर्जित केल्याचा देखावा करावा, आणि लाल लष्कराच्या पिछाडीला, लष्करी कार्यवाहीकरिता त्या संघटनेचे राखीव कार्यालय स्थापन करावे; या कार्यालयाने आर्मिया क्राजोवा ही लष्करी संघटना लाल लष्कराविरुद्ध जो लढा देणार होती त्या लढ्याचे मार्गदर्शन करावे. हा आदेश पोलंडमधील आर्मिया क्राजोवाचा सेनापती जनरल बोर कोमोरोवस्की याला कळविण्याबाबतही जनरल सोस्नकोवस्कीने ओकुलिकीला बजावले.

यानंतर कोणालाही कळू न देता जनरल ओकुलिकी जर्मन व्याप्त पोलंडमध्ये गेला. तेथे त्याने ताबडतोब जनरल बोर कोमोरोवस्कीची भेट घेऊन सोस्नकोवस्कीचा निरोप कळविला. आर्मिया क्राजोवाऐवजी, त्यांच्या उद्दिष्टसिद्धीकरिता तो लवकरच एक यंत्रणा प्रस्थापित करील असे त्यावेळी कोमोरोवस्कीने ओकुलिकीला सांगितले. भूमीगत कारवायांकरिता व सोविएत संघाविरुद्ध करावयाच्या उठावाच्या सिद्धतेकरिता शस्त्रास्त्रांचा साठा करणे, साठ सैनिकांची एक अशा सशस्त्र लढाऊ तुकड्या तयार करणे, आर्मिया क्राजोवाचे शत्रू व सोविएत लष्करी दलांचे सेनापती यांना ठार करण्याकरिता प्रशिक्षण देऊन दहशतवाद्यांचे गट तयार करणे, सोविएत सैन्याच्या पिछाडीला घातपाती कारवाया करण्याकरिता खास दलांची उभारणी करणे, लाल लष्कराच्या पिछाडीला राहून लष्करी हेरगिरी आयोजन करणे, आर्मिया, क्राजोवाने चालविलेली रेडिओ केंद्रे टिकवून धरणे व लंडनच्या केंद्रीय कार्यालयाशी रेडिओ संपर्क चालू ठेवणे, सोविएत संघाविरुद्ध छापील व तोंडी प्रचार चालू ठेवणे ही या यंत्रणेची प्रमुख उद्दिष्टे राहणार होती.

अनुक्रमणिका

१९४४ च्या शरदात लाल लष्कर विश्चुला नदीच्या किनाऱ्यापर्यंत जाऊन पोहोचले. त्यांच्या प्रदीर्घ ग्रीष्मकालीन मोहिमांनंतर सैन्याचे पुनःसंघटन करण्याकरिता, नवी रसद येऊन पोचण्याची वाट बघत त्यांनी वॉर्सा शहरासमोर तळ ठोकला. त्या पोलिश राजधानीवर उघड उघड हल्ला करण्याऐवजी शहराला वेढा घालून ते अकस्मात काबीज करावे असा लाल लष्कराचा बेत होता. परंतु सोविएत लष्करी अधिकाऱ्यांच्या नकळत, लाल लष्कर वॉर्सावर हल्ला करण्याच्या तयारीत आहे अशी चिथावणी लंडन निर्वासित सरकारच्या आदेशानुसार जनरल बोर-कोमोरोवस्की याने वॉर्सामधील पोलिश देशभक्तांना देऊन त्यांना उठाव करण्यास उद्युक्त केले. यावेळी विश्चुला नदी ओलांडण्याची लाल लष्कराची सिद्धता नव्हती. तेवढ्याचा फायदा घेऊन पोलिश देशभक्तांची वस्ती असलेल्या भागावर पद्धतशीरपणे बॉंबहल्ले नाझींनी केले. वॉर्सामधील पोलिश लष्कराने शेवटी पत्करलेल्या शरणागतीच्या प्रकरणात जनरल बोर-कोमोरोवस्कीने बजावलेल्या भूमिकेचा जनरल ओकुलिकीने दिलेला वृत्तांत असा-सप्टेंबर १९४४ च्या अखेरी आर्मिया क्राजोवाच्या जनरल बोर-कोमोरोवस्कीने वॉर्सामधील जर्मन लष्कराचा सेनापती एस्. एस्. ओबेरग्रुपेन फ्युरेर वॉन डेन-बाख याच्याशी शरणागतीबाबत वाटाघाटी केल्या. ती बोलणी करण्याकरिता आर्मिया क्राजोवाच्या लष्करश्रेष्ठींचा प्रतिनिधी म्हणून त्याने कर्नल बोगुलावस्कीची नियुक्ती केली होती. जर्मनांनी नमूद केलेल्या शरणागतीच्या अटी जेव्हा त्याने बोर-कोमोरोवस्कीला सांगितल्या त्यावेळी ओकुलिकी तेथे उपस्थित होता. जर्मनी व पोलंड यांचा सोविएत संघ हा समान शत्रू असल्याने जर्मनीविरुद्ध लढा पोलिश लष्कराने संपुष्टात आणावा असे डेन-बाख याने म्हटल्याचे कर्नल बोगुलावस्कीने सांगितले. पोलिश लष्कराने शरणागती पत्करली त्या दिवशी वॉन डेन-बाखचे मत बरोबर असल्याचे ओकुलिकी व कोमोरोवस्की या दोघांनीही उघडपणे कबूल केले.

१९४४ च्या शरणापासून ते जवळजवळ १९४५ च्या वसंतापर्यंत, ज्यावेळी पूर्व आघाडीवरील जर्मन लष्करी सामर्थ्य मोडून काढण्याकरिता लाल लष्कराच्या प्रचंड प्रमाणावर आक्रमक मोहिमा सुरू होत्या. त्याचवेळी जनरल ओकुलिकीच्या नेतृत्वाखाली आर्मिया क्राजोवाने व्यापक क्षेत्रात, सोविएत लष्कराच्या पिछाडीला, दहशतवाद, घातपात, हेरगिरी, व सशस्त्र हल्ले यांची धमाल उडवून दिली होती.

लंडनस्थित निर्वासित पोलिश सरकारचा पोलंडमधील उपप्रधानमंत्री व आकुलिकीचा प्रमुख मदतनीस स्तानिस्लाव जासीकोविक्झ याने नंतर सांगितले की ‘त्या काळात सोविएत लष्करीं अधिकाऱ्यांचे सर्व डावपेच व योजना हाणून पाडण्याचे अटीतटीचे प्रयत्न करण्यात आले आमची सर्व वृत्तपत्रे व रेडिओ केंद्रे सोविएत रशियाची शक्य तेवढी जास्त बदनामी करण्याच्या हेतूने प्रचार करीत होती. पोलिश जनतेला रशिंयनांविरुद्ध भडकविले जात होते.’ लाल सैनिक घेऊन येणारी वाहने बॉंबफेक करून उडवून देण्यात येत होती. सोविएत पुरवठा केंद्रे नष्ट करण्यात येत होती. सोविएत लष्कराच्या मार्गांवर सुरुंग पेरून त्यांची वाहतूक व दळणवळण व्यवस्था पूर्णपणे मोडून पडेल अशी व्यवस्था केली जात होती. लष्करी आगगाड्या, ट्रक्स् व रेल्वेचे रूळ उडवून देणे, पूल मोडून-जाळून टाकणे, पुरवठा केंद्रे व ग्राम-सोविएत्स नष्ट करणे, अशी कारवाया सरसकट करण्यात याव्यात असे खास आदेश आर्मिया क्राजोवाला देण्यात आले होते. खास प्रशिक्षण देण्यात आलेल्या आर्मिया क्राजोवाच्या दहशतवादी गटांनी वॉर्सा राजवटीचे प्रवक्ते व लाल

लष्कराचे सैनिक यांच्या जमेल तेवढ्या कत्तली चालविल्या होत्या. सोविएत सरकारने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, आठ महिन्यांच्या काळात त्यांनी ५९४ लाल सैनिकांना ठार, तर २९४ सैनिकांना गंभीर रीत्या जखमी केले. लंडनस्थित पोलिश सरकारच्या आदेशानुसार, सोविएत लष्कराच्या पिछाडीला हेरगिरी करून सोविएत लष्करी दले, पुरवठा, तटबंदी, विमानतळ, शस्त्रास्त्रे, युद्धसाहित्य निर्मिती कारखाने याबाबत माहिती आकुलिकीचे हस्तक त्यांच्या गुप्त बेकायदेशीर रेडिओ केंद्राद्वारा पुरवीत होते.

२२ मार्च १९४५ रोजी आर्मिया क्राजोवाच्या पश्चिमी जिल्ह्याचा प्रमुख कर्नल स्लावबोक याला पाठविलेल्या एका गुप्त आदेशात लंडनमधील त्याच्या वरिष्ठांच्या आशाआकांक्षेचे सार जनरल ओकुलिकीने विशद केले होते. तो म्हणाला—'जर्मनीविरुद्ध सोविएत संघाला विजय मिळाला तर त्यामुळे केवळ ग्रेट ब्रिटनच्या युरोपीय हितसंबंधांनाच धोका निर्माण होईल असे नव्हे तर संपूर्ण युरोपच भयग्रस्त होईल. त्यामुळे युरोपातील त्यांच्या हितरक्षणाच्या दृष्टीने युरोपची सर्व शक्ती एकवटून सोविएत संघाविरुद्ध लढ्याची सिद्धता ब्रिटिशांना करावीच लागेल. अशा सोविएतविरोधी युरोपीय गटात आपण आघाडीवर असू हे वेगळे सांगायला नकोच. अर्थात् त्या युरोपीय गटात ब्रिटिश नियंत्रित जर्मनीचाही समावेश अपरिहार्यपणे होणार याबद्दलही शंका नाही.'

परंतु पोलिश निर्वासितांच्या त्या सर्व आशा-आकांक्षा व योजना अल्पजीवी ठरल्या. सोविएत लष्कराच्या पिछाडीला कारवाया करणाऱ्या पोलिश कटवाल्यांना पकडून तुरुंगात डांबण्यात १९४५ च्या प्रारंभी सोविएत लष्करी हेरखात्याने सुरू केली. १९४५ च्या ग्रीष्मापर्यंत त्या कटवाल्यांचे सर्व नेते सोविएतांच्या हाती पडले होते. त्यापैकी जनरल ओकुलिकीसह १६ पोलिश हस्तकांवर सोविएत सर्वोच्चन्यायालयाच्या लष्करी शाखेसमोर खटले भरले गेले.

१८ जून रोजी मास्कोतील ट्रेड युनियन भवनात खटल्यांची सुनावणी सुरू झाली. सोविएत रशियाबद्दलच्या द्वेषाने प्रेरित होऊन त्या पोलिश निर्वासितांनी व त्यांच्या भूमीगत यंत्रणेने त्यांच्याच राष्ट्रावर हल्ला करणाऱ्या नाझींना भरीव मदत केल्याचे साक्षीपुराव्यांनी सिद्ध झाले.

त्या पोलिश हस्तकांचे गुन्हे पुराव्यानिशी सिद्ध झाल्याने त्यांना देहदंडाची शिक्षा व्हावी हे स्वाभाविकच होते. परंतु अटक झालेले पोलिश हस्तक हे लंडन येथील पोलिश निर्वासित नेत्यांच्या हातातील केवळ कळसूत्री बाहुली असल्याने, शिवाय, विजयाचा आनंद उपभोगीत असलेल्या सोविएत लोकांनी आता त्या पोलिश हस्तकांकडून फारसा धोकाही उरला नसल्याने, त्यांचा गुन्हा शाबीत झालेला असला तरी त्यांना मृत्युदंडांची शिक्षा ठोठावणे योग्य होणार नाही असे मत सोविएत अभियोगी मेजर जनरल अफनासीव याने व्यक्त केले. पण त्याचबरोबर, सोविएत संघाविरुद्ध वर्षानुवर्षे पोलिश प्रतिक्रियावाद्यांनी केलेल्या कारवायांचे प्रतिबिंब या खटल्यांत स्पष्टपणे उमटलेले आहे, त्यांच्या त्या नीतीचीच परिणती नाझींच्या पोलंड व्याप्तीत झाली, शेवटी लाल लष्करामुळेच नाझींचा पराभव झाला; असे असूनही ओकुलिकी व त्याचे सहकारी यांनी लाल लष्कराच्या छातीत सुरा खुपसण्याचे आटोकाट प्रयत्न केले; असे भाष्यही त्याने केले.

अनुक्रमणिका

२१ जून १९४५ रोजी सोविएत सर्वोच्च न्यायालयाच्या लष्करी शाखेने त्यांचा निकाल जाहीर केला. १६ आरोपींपैकी तिघांना सोडून देण्यात आले तर जनरल ओकुलिकी व त्याचे अकरा सहकारी यांनी ४ महिने ते १० वर्षे पर्यंतच्या कारावासाच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. [ या आरोपींपैकी १६ नंबरचा अटन पाईदाक नावाच्या आरोपीविरुद्धचा खटला तो त्यावेळी आजारी असल्यामुळे लांबणीवर टाकण्यात आला. या सोळा पोलिश हस्तकांना जेव्हा प्रथम सोविएत अधिकाऱ्यांनी अटक केली त्यावेळी अमेरिकन परराष्ट्रमंत्री अँथनी एडन यांनी सोविएत संघाची तीव्र शब्दांत निर्भत्सना केली. ते पोलिश हस्तक पोलंडमधील लोकशाही नेते होते असा त्यांचा दावा होता. खटला संपल्यानंतर मात्र त्यांनी एकदम त्या प्रकाराबाबत मौन बाळगले.]

या खटल्यानंतर लंडनस्थित पोलिश सरकारला ग्रेट ब्रिटन व अमेरिका यांनी दिलेली राजनैतिक मान्यता त्या सरकारांनी रद्द केली [पोलिश निर्वासित सरकार करीत असलेल्या सोविएतविरोधी कारस्थानांमुळे सोविएत सरकारचे त्या सरकारशी दोन वर्षापूर्वीच संबंध तोडले होते. तर पोलंडचे ते सरकार प्रस्थापित झाल्यापासूनच ब्रिटिश सरकारने त्याला सर्वतोपरी पाठिंबा दिला होता. वॉर्सा राजवटीला मान्यता दिल्यानंतरही पोलिश निर्वासितांपैकी कांही मंडळींना ब्रिटिश नागरिकत्व बहाल करून, ब्रिटिश वसाहतींत पोलिस खात्यात त्याना नोकरी देण्याचे ब्रिटिश सरकारने ठरविले होते. परंतु वॉर्सा राजवटीला मान्यता देण्याचा दोस्त राष्ट्रांचा निर्णय कळताच, ‘पोलिश निर्वासित अधिकारी व सैनिक दोस्त राष्ट्रांचा तो निर्णय कधीही मान्य करणार नाहीत, त्यांच्या निष्ठेची बांधिलकी लंडनस्थित पोलिश सरकारप्रतीच राहील, एवढेच नव्हे तर ते त्यांच्या मायदेशी परत जातील ते त्यांच्याजवळ असलेल्या शस्त्रांसहच जातील’असे जाहीर निवेदन जनरल अँडर्स व त्याच्या सहकाऱ्यांनी केले.

मात्र १९४५ च्या शरदापर्यंत बरेच पोलिश निर्वासित सैनिक त्यांच्या प्रतिक्रियावादी अधिकाऱ्यांची साथ सोडून जाऊ लागले; व वॉर्सा राजवटीने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देऊन नवपोलंडची उभारणी करण्याच्या कार्यात सहभागी होण्यास ते मायदेशी परतले.] व याल्टा कराराच्या तरतुदीनुसार पुनर्रचित वॉर्सा राजवटीला पोलंडचे हंगामी सरकार म्हणून मान्यता देण्यात आली.

अनुक्रमणिका

प्रकरण २५

# संयुक्त राष्ट्रसंघ

माणसाचे अस्तित्वच जेव्हा धोक्यात येते व त्याचा जीवनमरणाचा लढा सुरू होतो, तेव्हा सत्य काय व असत्य काय, मित्र कोण व शत्रू कोण, स्पृहणीय काय व गर्हणीय काय याची खरी ओळख माणसाला पटते. सोविएत राष्ट्राबाबत दुसऱ्या महायुद्ध काळात असेच घडले. त्या युद्धकाळात अनेक खोट्या व भ्रामक कल्पना गळून पडल्या; व जगाला आश्चर्यजनक वाटणाऱ्या अनेक गोष्टी पुढे आल्या. महायुद्धापूर्वी काही वर्षे, आशिया व युरोप या खंडातील अनेक देशात पंचमस्तंभीयांच्या प्रतिक्रियावादी कायवाया सुरू होत्याच. मात्र त्यांच्या शक्तिसामर्थ्याचे व व्यापक क्षेत्रावरील त्यांच्या विघातक कृत्यांचे खरे गांभीर्य जगापुढे उघड झाले नव्हते. परंतु नाझी व जपानी लष्करांच्या मदतीने भूमीगत विश्वातून बाहेर पडून ते पंचमस्तंभीय जेव्हा आपापल्या राष्ट्रात सत्ता बळकावण्याकरिता एकाएकी उघडपणे पुढे सरसावले तेव्हा जगाला चांगलाच धक्का बसला. ॲक्सिस राष्ट्रांनी त्यांच्या उद्दिष्टसिद्धीकरिता वर्षानुवर्षे गुप्तपणे केलेली पूर्वतयारी, त्यांनी केलेली हेरगिरी, कटकारस्थाने, घातपात, दहशतवादी कृत्ये याबद्दल ज्यांना काहीच माहिती नव्हती, ती मंडळी, युद्धाच्या प्रारंभीच्या काळात ॲक्सिस राष्ट्रांनी एका पाठोपाठ एक मिळविलेल्या विजयामुळे आश्चर्याने स्तंभितच झाली.

परंतु दुसऱ्या महायुद्धकाळात याहीपेक्षा सर्वात नवलपूर्ण अशी कोणती बाब ठरली असेल तर ती म्हणजे सोविएत रशिया! त्या राष्ट्राभोवती दाटून राहिलेल्या खोट्या कल्पनांच्या धुक्याचा पडदा त्या युद्धातील घटनांमुळे जणू एकाएकी गळून पडला; व सोविएत संघाचे नेते, त्यांची अर्थव्यवस्था, त्यांचे लाल लष्कर, सोविएत जनता व त्यांचे राष्ट्रप्रेम व दृढ निर्धार,——कॉर्डेल हलच्या शब्दांत सांगायचे म्हणजे सोविएतांच्या 'शौर्य-धैर्याचे व उत्कृष्ट व उज्ज्वल राष्ट्रभक्तीचे भव्य उदात स्वरूप' या सगळ्याची खरी कल्पना प्रथमच जगाला आली. मार्शल स्टालिनच्या नेतृत्वाखालील लाल लष्कर म्हणजे दुबळ्या, क्षमताशून्य बाजार-बुणग्यांचा जमाव नव्हे तर, जागतिक प्रगतीकरिता व लोकशाहीकरिता निर्धाराने व प्राणपणाने लढा देणारी एक अत्यंत कार्यक्षम व सामर्थ्यसंपन्न अशी लष्करी शक्ती आहे याची जाणीव त्या युद्धकाळात प्रथमच जगाला झाली.

२३ फेब्रुवारी १९४२ रोजी अमेरिकन लष्कराचा सेनापती डग्लस मॅकआर्थर याने आपल्या देशबांधवांना उद्देशून लष्करासंबंधी केलेले भाष्य त्या दृष्टीने उल्लेखनीय आहे. तो म्हणाला—'आजच्या जागतिक परिस्थितीवरून एक गोष्ट आपल्याला स्पष्टपणे जाणवते ती ही की मानवी संस्कृतीच्या सर्व आशा आता शौर्य-धैर्य-सामर्थ्यसंपन्न अशा सोविएत लष्करावर विसावलेल्या आहेत. माझ्या जीवनकाळात मी अनेक युद्धे पाहिली आहेत. अनेक युद्धात मी प्रत्यक्षपणे सहभागीही झालो. एवढेच नव्हे तर गतकाळातील

अनुक्रमणिका

महान लष्करी नेत्यांच्या मोहिमांचा व लष्करी डावपेच व तंत्र यांचा बारकाईने अभ्यासही केला आहे. पण अजिंक्य मानल्या गेलेल्या शत्रूच्या-नाझींच्या-भयानक प्रहारांना करण्यात आलेला (लाल लष्कराने केलेला) असा निर्धारपूर्ण परिणामकारी प्रतिकार, व त्या शत्रूला मागे पिटाळून लावणारा असा घणाघाती प्राणघातक प्रतिहल्ला मी आजपर्यंत कोठेही पाहिला नाही. रशियाच्या आजच्या युद्ध प्रयत्नांची व्याप्ती व भव्यता लक्षात घेता, रशियनांनी मिळवलेले यश जगाच्या इतिहासात अतुलनीय असे ठरते'.

या महायुद्धकाळात जगाला आणखीही एक गोष्टीची जाणीव प्रकर्षाने झाली. पूर्वी कधीही अनुभवाला आली नसेल अशा प्रतिकूल परिस्थितीतही प्रचंड प्रमाणावर उत्पादन चालू राहू शकेल इतकी सोविएत संघाची अर्थव्यवस्था कार्यक्षम व समर्थ आहे याचा प्रत्यय जगाला आला. १९४२ मध्ये रशियाच्या युद्धप्रयत्नांची पाहणी करण्यास मास्कोला अधिकृत भेट देणाऱ्या अमेरिकेच्या युद्धसाहित्य-उत्पादन-मंडळाचा उपाध्यक्ष विलियम बॅट याने अमेरिकेला परत आल्यानंतर सांगितले——

'मी रशियाला गेलो तेव्हा अशा सर्वंकष युद्धाला तोंड देऊन टिकून राहण्याच्या रशियाच्या क्षमतेबद्दल माझ्या मनात चांगलीच साशंकता होती; परंतु तेथील परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर रशियातील स्त्रिया—मुलांसह संपूर्ण जनता शत्रूविरुद्ध अखेरपर्यंत निर्धाराने लढा देण्यास सिद्ध असल्याची माझी लवकरच खात्री पटली.

'मी तेथे गेलो तेव्हा रशियनांच्या तांत्रिक ज्ञानाबद्दल व कौशल्याबद्दल माझ्या मनात दाट साशंकता होती. परंतु त्यांच्या कारखान्यांचे कामकाज व त्यांची क्षमतापूर्ण विविध स्वरूपाची शस्त्रास्त्रनिर्मिती यांचे परीक्षण केल्यानंतर सोविएत राष्ट्र अत्यंत परिश्रमी, दृढनिश्चयी व कुशल असल्याचे माझ्या प्रत्ययाला आले.

'मी रशियाला गेलो त्यावेळी रशियन सरकारचे एकतंत्री शासन व त्या राष्ट्रातील फुटीरता याबद्दल तेथे सर्रास प्रसृत झालेल्या बातम्यांमुळे माझे मन चांगलेच अस्वस्थ होते; पण तेथे केलेल्या प्रत्यक्ष निरीक्षणानंतर, तेथील शासन चांगले सुदृढ व कार्यक्षम असून तेथील सामान्य जनतेचा त्या सरकारला पुरेपूर पाठिंबा असल्याची माझी खात्री पटली.

'थोडक्यात म्हणजे, जाताना माझ्यासमोर एकच कूट प्रश्न होता. सोविएत संघ एक भरवशाचा व क्षमतापूर्ण मित्र ठरू शकेल काय? माझ्या रशिया भेटीत त्या माझ्या प्रश्नाचे अगदी निःसंदिग्ध होकारार्थी उत्तर मला मिळाले.'

दुसऱ्या महायुद्धकाळात आणखी एक सत्य अगदी स्पष्टपणे जगाच्या प्रत्ययाला आले, ते हे की जगाच्या इतिहासात अभूतपूर्व अशा उज्ज्वल देशभक्तीच्या व ऐक्याच्या भावनेने प्रेरित झालेल्या संपूर्ण सोविएत जनतेचा पाठिंबा सोविएत सरकारला आहे.

अनुक्रमणिका

३१ ऑगस्ट १९४३ रोजी क्विबेक येथे सोविएत सरकार व सोविएत नेतृत्व याबद्दल बोलताना ब्रिटिश प्रधानमंत्री विन्स्टन चर्चिल म्हणाला, 'हिटलरने सोविएत रशियावर इतके क्रूर व भयानक आघात केले की तशा भयंकर आघातातून कोणतेही सरकार तग धरून टिकून राहू शकले आहे असे आजपर्यंत माझ्यातरी ऐकीवात नाही. रशियन राष्ट्र मात्र केवळ तगूनच राहिले आहे असे नाही तर जगातील कोणत्याही शक्तीला शक्य झाले नसते असे प्राणघातक प्रतिहल्ले त्यांनी जर्मन युद्धयंत्रणेवर केले आहेत व त्यात त्यांनी अभूतपूर्व असे यश मिळवले आहे.'

महायुद्धकाळात जगाला झालेली आणखी एक महत्वपूर्ण जाणीव म्हणजे सोविएत रशिया व पाश्चिमात्य लोकशाही राष्ट्रे यांच्या युतीमुळे युद्धोत्तर नव्या आंतर्राष्ट्रीय व्यवस्थेत जगातील सर्व लोकांकरिता शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करता येईल या आशेला वास्तव रूप मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

११ फेब्रुवारी १९४३ रोजी न्यूयॉर्क हेराल्ड ट्रिब्यूनने आपल्या संपादकीयात म्हटले,—'लोकशाही राष्ट्रांपुढे आता केवळ दोनच पर्याय आहेत. एक म्हणजे नव्या जगाच्या उभारणीकरिता रशियाशी सहकार्य करणे. आपल्या तत्वांच्या व आदर्शांच्या दृढतेवर आपला विश्वास अढळ असेल व त्या तत्वांना प्रत्यक्ष व्यवहारात आपण मूर्त स्वरूप दिले, तर रशियाशी सहकार्य करून नव्या जगाची हितकारक अशी पुनर्रचना करण्याची सध्या उत्तम संधी आज आपल्यापुढे आहे. दुसरा पर्याय म्हणजे युरोपातील सर्व प्रतिक्रियावादी व लोकशाहीविरोधी शक्तींशी हातमिळवणी करून पुन्हा कटकारस्थानात स्वतःला गुंतवून घेणे त्याचा परिणाम एकच होईल—क्रेमलिन पश्चिमेपासून कायमचे दुरावेल.'

अमेरिकेच्या युद्ध-उत्पादन मंडळाचा अध्यक्ष डोनाल्ड नेल्सन याने रशिया भेटीहून परत आल्यानंतर ८ नोव्हेंबर १९४३ रोजी न्यूयॉर्क शहरात सांगितले, 'रशियाच्या उज्ज्वल भवितव्याबद्दल पूर्ण खात्री, व आपणासह सर्व जगाला त्यांच्या या यशामुळे फार मोठा लाभ होणार आहे असा दृढ विश्वास, रशियाभेटीनंतर माझ्या मनात निर्माण झाला आहे. एकदा आपल्याला विजय मिळून या युद्धाची ही काळरात्र संपली की कोणत्याही गोष्टीची धास्ती वाटण्याचे आपल्याला कारणच उरणार नाही. फक्त धोका उरेल तो एकाच गोष्टीचा-परस्पर भीतीचा व साशंकतेचा! शांतता प्रस्थापित करणे व सर्वत्र सामान्य जनतेचे जीवनमान उंचावून कल्याण साधणे या उद्दिष्टांच्या सिद्धीकरिता संयुक्त राष्ट्रांच्या सहकार्याने आपण कामाला लागलो तर समृद्धीची व समाधानाची पूर्वी कधी नव्हे अशी नवी उच्च पातळी आपल्याला निश्चितच गाठता येईल.'

सतत २५ वर्षे जगात अखंडपणे अस्वस्थता व प्रक्षोभ निर्माण करणाऱ्या सोविएतविरोधी व लोकशाहीविरोधी कटकारस्थानांना, मानवाला गुलाम करू पाहणाऱ्या व आक्रमक युद्धाला कारणीभूत ठरणाऱ्या ॲक्सिस राष्ट्रांच्या गुप्त कुटिल राजनीतीला, तसेच, प्रतिक्रांतीवाद, दहशतवाद, भीती व द्वेष या सर्वांना सणसणीत उत्तर १ डिसेंबर १९४३ रोजी ऐतिहासिक महत्वाच्या तेहरान परिषदेत देण्यात आले. जगातील सर्वात सामर्थ्यसंपन्न अशा तीन राष्ट्रांचे नेते, अमेरिकेचा अध्यक्ष फ्रँकलिन डेलोनो रूझवेल्ट, ग्रेट ब्रिटनचा प्रधानमंत्री विन्स्टन चर्चिल व सोविएत संघाचा नेता मार्शल स्टालिन हे प्रथमच तेहरान येथे

एकत्रित आले. त्या बैठकीत झालेल्या लष्करी व राजनैतिक स्वरूपाच्या प्रदीर्घ चर्चेनंतर त्या तीन राष्ट्रांनी संयुक्तपणे एक घोषणापत्रक प्रसिद्ध केले. ती तीन बलशाली दोस्त राष्ट्रे संयुक्तपणे कार्यवाही करून नाझीझमचे समूळ उच्चाटन करतील अशी हमी त्या घोषणापत्रकाद्वारे जगातील जनतेला देण्यात आली.

चिरंतन शांतता व सर्व राष्ट्रांत सद्‌भाव व सलोखा नांदणाऱ्या एका नव्या युगाला आता प्रारंभी होणार अशी आशा त्या घोषणापत्रकाने युद्धआघातांनी जर्जर झालेल्या जगात निर्माण केली. त्या घोषणापत्रकात म्हटले होते–

‘जगातील बहुसंख्य जनसामान्यांचा विश्वास व सदिच्छा मिळू शकतील व युद्ध व भीती यांच्या शापापासून पुढील अनेक पिढ्यांची मुक्तता होऊ शकेल असा शांतता करार साकार करण्याची जबाबदारी सर्वस्वी आमच्यावर आहे याची पुरेपूर जाणीव आम्हाला आहे.

‘आमच्या राजनैतिक सल्लागारांसह भविष्यातील सर्व समस्यांची पाहणी आम्ही केली आहे. जुलुम, गुलामी, दडपशाही, असहिष्णुता या सर्वांच्या उच्चाटनाकरिता झटण्याची तयारी असलेल्या सर्व लहान मोठ्या राष्ट्रांचे सरकार्य आपल्या उद्दिष्टसिद्धीकरिता मिळावे अशी आमची अपेक्षा व आशा आहे. त्याकरिता लोकशाही राष्ट्रांच्या विश्वकुटुंबात एकत्रित येण्याची ज्यांची इच्छा असेल, त्या सर्व राष्ट्रांचे आम्ही स्वागतच करू.’

तेहरान घोषणापत्रकापाठोपाठ फेब्रुवारी १९४५ मध्ये क्रिमियातील याल्टा या शहरी महत्वाचे निर्णय घेण्यात आले. पुन्हा रूझवेल्ट, चर्चिल व स्टालिन हे जगातील मान्यवर नेते तेथे एका परिषदेत एकत्रित जमले. त्या परिषदेत जर्मनीच्या पराभवाच्या व जर्मन लष्करी सामर्थ्याच्या विनाशाच्या अखेरच्या योजना आखण्यात आल्या. या परिषदेत झालेल्या चर्चेमुळे शांततेच्या युगाला आता प्रारंभ होणार अशी आशा वाटू लागली. तसेच, जागतिक सुरक्षिततेकरिता युगप्रवर्तक अशा संयुक्त राष्ट्र संघटनेची प्रस्थापना व्हावी म्हणून एप्रिलमध्ये सानफ्रान्सिस्को येथे भरावयाच्या परिषदेची सिद्धता करण्याचे कार्यही याल्टा येथे झालेल्या चर्चेने फलद्रूप केले.

सानफ्रान्सिस्को परिषद ११ एप्रिल १९४५ रोजी सुरू झाली. त्यापूर्वी थोडेच दिवस अगोदर अध्यक्ष फ्रँकलिन डेलानो रूझवेल्ट याचे निधन झाले. त्याच्या त्या मृत्यूने रशियाने आपला एक खरा मित्र, व संपूर्ण जगाचे एक थोर लोकशाहीवादी नेता गमावला. परंतु त्याने सुरू केलेले कार्य मात्र चालूच राहिले. अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतलेल्या हॅरी एस्. ट्रुमनने, अंतिम निर्णायक विजय मिळेपर्यंत संयुक्त राष्ट्रांसह ॲक्सिस आक्रमणाविरुद्ध लढा चालू ठेवला जाईल, व ग्रेट ब्रिटन व सोविएत रशिया यांच्या सहकार्याने युद्धोत्तर काळात जागतिक शांततेसाठी रूझवेल्टने आखलेल्या सर्व योजनांना मूर्त स्वरूप देण्यात येईल अशी घोषणा केली.

अनुक्रमणिका

८ मे १९४५ रोजी अमेरिकन, ब्रिटिश व सोविएत सेनापतींच्या उपस्थितीत उध्वस्त बर्लिनमध्ये नाझी लष्कराच्या बिनशर्त शरणागतीच्या करारावर जर्मन लष्कर श्रेष्ठींच्या प्रतिनिधींनी स्वाक्षऱ्या केल्या. त्याबरोबर युरोपातील युद्ध संपले. त्यावेळी मार्शल स्टालिनला पाठविलेल्या एका संदेशात विन्स्टन चर्चिलने म्हटले होते––'लाल लष्कराने केलेल्या बहुमोलाच्या कामगिरीमुळे आजचे हे अभिमानास्पद यश आपल्या पदरात पडले आहे हे सत्य आम्ही अगदी निःसंदिग्धपणे मान्य करतो. आमच्या प्रमाणेच पुढील पिढ्याही त्याकरिता लाल लष्कराला सदैव ऋणी राहतील याबद्दल माझ्या मनात तिळमात्रही संदेह नाही.'

## नव्याने धर्मयुद्ध

नाझी जर्मनी व सोविएत रशिया यांत झालेल्या युद्धासारखे घनघोर युद्ध जगाच्या इतिहासात पूर्वी कधी झाले नव्हते. सतत चार वर्षे पूर्व आघाडीवरील च्या विशाल रणक्षेत्रावर जीवनमरणाचा तो भयानक संघर्ष पेटलेला होता. लाल लष्कराने नाझी लष्करी सामर्थ्याच्या अगदी हृदयावरच-बर्लिनवर हल्ला करून जर्मनीची ती राजधानी काबीज केली. त्याबरोबर २ मे १९४५ रोजी तो लढा संपुष्टात आला. राईशस्टॅगच्या भव्य इमारतीवर एका अनामिक लाल सैनिकाने लाल ध्वज उभारला. संपूर्ण युरोपात स्वातंत्र्याचे ध्वज फडकू लागले. [ॲक्सिस गटाचा तिसरा भागीदार, साम्राज्यवादी जपान या राष्ट्राविरुद्ध दूरपूर्वेत यावेळी अँग्लो-अमेरिकनांचे युद्ध सुरूच होते. या क्षेत्रातही सोविएत लष्कराचे सामर्थ्य व त्यांच्या हितसंबंधांची लोकशाही आदर्शांशी असलेली बंधिलकी जगाच्या प्रत्ययाला आली.

पश्चिम आघाडीवर नाझी जर्मनीविरुद्ध झुंजण्यात लाल लष्कर गुंतले असता, पूर्वेकडे जवळजवळ ५ लक्षाचे सर्वोत्कृष्ट जपानी लष्कर मांजूरियन सीमेवर लाल लष्कराने अडकवून ठेवले होते. जर्मनीविरूद्धचे युद्ध संपल्यानंतर ९० दिवसांच्या आत जपानविरुद्ध युद्धात सहभागी होण्याच्या याल्टा परिषदेत दिलेल्या आश्वासनानुसार ९ ऑगस्ट १९४५ रोजी सोविएत रशिया जपानविरूद्ध रणक्षेत्रात उतरले. त्याच सुमारास अमेरिकेने जपानच्या दोन औद्योगिक केंद्रांवर अणुबॉंब टाकले. जपानने लागलीच शरणागती पत्करली. त्याबरोबर दुसरे महायुद्ध संपुष्टात आले.]

इतके सगळे होऊनही ॲक्सिसविरोधी राष्ट्रांची युद्धोत्तर युती व फासिझम यांचा समूळ नायनाट करण्याच्या उद्दिष्टाने उभारण्यात आलेल्या राष्ट्रसंघाच्या स्थापनेनंतर, थोड्याच काळात पुन्हा, सोविएतविरोधी प्रचार व कारस्थाने यांची लाट उफाळून आली, व त्यामुळे जागतिक शांततेच्या मुळावरच आघात झाला. पहिल्या महायुद्धानंतरच्या काळाप्रमाणे दुसऱ्या महायुद्धानंतरही युरोपची जनता त्यांच्या लोकशाही उद्दिष्टांची पूर्ती व्हावी अशी मागणी करीत होती. साम्राज्यवादाच्या वरवंट्याखाली भरडली गेलेली वसाहतींतील जनता स्वातंत्र्य व राष्ट्रीयता प्राप्त करून घेण्याकरिता धडपडत असताना आंतर्राष्ट्रीय प्रतिक्रियावाद व साम्राज्यवाद या शक्ती स्वार्थ साधण्याकरिता जनतेच्या त्या आशाआकांक्षा चिरडून टाकण्याच्या हेतूने पुन्हा संघटित होऊ लागल्या. पुन्हा एकदा जगातील लोकशाही विरोधी शक्तींनी चालविलेल्या लढ्याशी हातमिळवणी करून प्रतिक्रांतिवाद्यांनी बोल्शेविक रशियाविरुद्ध लढ्याचे रणशिंग फुंकले.

दुसरे महायुद्ध संपून जेमतेम सहा महिनेही उलटले नव्हते तोच सोविएतविरोधी धर्मयुद्धातील एक प्रमुख बिनीचा सैनिक म्हणून आंतर्राष्ट्रीय राजकारणात आपली भूमिका बजावण्यास विन्स्टन चर्चिल पुन्हा पुढे सरसावला. युद्धानंतर इंग्लंडमध्ये घेण्यात आलेल्या सार्वत्रिक निवडणुकात टोरी पक्षाचा दणदणीत

अनुक्रमणिका

पराभव झाला, व वसाहतींवर ब्रिटिश साम्रज्यवादी पकड कायम टिकविण्याची गंभीर समस्या ब्रिटिश सरकारपुढे उभी ठाकली. त्यावेळी चर्चिलला बोल्शेविझमच्या धोक्याची पुन्हा नव्याने आठवण झाली. ५ मार्च १९४६ रोजी फुल्टन (मिसूरी) येथे अमेरिकन जनतेला उद्देशून केलेल्या भाषणात (या त्याच्या भाषणाला संपूर्ण युरोपात फार मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी देण्यात आली) रशियन साम्यवादामुळे ख्रिश्चन संस्कृतीपुढे उभ्या ठाकलेल्या वाढत्या धोक्याचा उल्लेख चर्चिलने केला व त्याविरुद्ध लढा देण्याकरिता ग्रेट ब्रिटन व अमेरिका या राष्ट्रांची सोविएतविरोधी युती व्हावी असे उघड आवाहन त्याने केले.

त्याबरोबर सोविएतविरोधी लढ्याचे रणशिंगच जणू पुन्हा नव्याने फुंकले गेले. अमेरिका व ग्रेट ब्रिटन या राष्ट्रांत सोविएतविरोधी मोहीम पुन्हा नव्या जोमाने सुरू झाली. तिसऱ्या महायुद्धाच्या धास्तीने संपूर्ण जगातील जनता पुन्हा भयग्रस्त झाली. २० मार्च १९४६ रोजी अमेरिकन सिनेट पुढे बोलताना फ्लोरिडाचा सिनेटर क्लॉड पेपर याने पुन्हा युद्ध भडकण्याबद्दल धोक्याचा गंभीर इषारा दिला. सोविएत संघाला युद्धाची धास्ती वाटावी हे स्वाभाविकच आहे हे सांगताना तो म्हणाला—‘सोविएत संघाजवळ अणुबाँब नाही, बर्फमुक्त बंदरे नाहीत, त्यांच्याशी आर्थिक बाबीसंबंधी वाटाघाटी करण्याचे साधे सौजन्यही दोस्त राष्ट्रे दाखवीत नाहीत; मोठमोठे उद्योगसंघ, प्रतिक्रियावादी व सोविएत रशियाच्या भीतीने पछाडलेले नेते, यांच्या प्रभावाखाली असलेल्या राष्ट्रांना त्यांचे सैद्धांतिक तत्त्वज्ञान कधीही मान्य होऊ शकणार नाही याची त्यांना पुरेपूर जाणीव आहे. या परिस्थितीमुळे सोविएत संघाला युद्धाची जबरदस्त धास्ती वाटत आहे.

‘युद्ध म्हणजे काय याचा चांगला अनुभव रशियाला आलेला आहे त्यामुळे युद्धाबद्दल त्या राष्ट्राला वाटणारी धास्ती केवळ काल्पनिक नाही. त्यांनी सोसलेले अपार दुःख व कल्पनातीत हालअपेष्टा यामुळे त्यांची ती धास्ती बळावली आहे. त्या राष्ट्राची उध्वस्त झालेली शहरे व खेडी, राखरांगोळी झालेला विशाल भूप्रदेश, दुसऱ्या महायुद्धात मृत्यूमुखी पडलेली त्यांची दीड कोटी माणसे (आपल्यापेक्षा ही हानी ५० पटींनी अधिक आहे), बेघर होऊन उपासमारीने तळमळणारे त्यांचे अडीच कोटी नागरिक, भयानक क्रौर्य, रानटीपणा व अवर्णनीय अत्याचार करणाऱ्या शत्रूचा हल्ला परतवून लावून त्याचा पराभव करताना त्यांनी सोसलेल्या हालअपेष्टा, या सर्व गोष्टींमुळे युद्धाबद्दलची भीती रशियाच्या मनात खोलवर रुजून बसली आहे....

‘गतकाळातील घटना आठवल्या की त्या राष्ट्राला वाटणारी ती धास्ती अधिकच बळावते. ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका, जपान यांसह एकूण १४ राष्ट्रांच्या लष्करांनी नव्याने उदयाला आलेल्या सोविएत संघाविरुद्ध सोविएत भूमीवर युद्धाचे महाकुंड पेटवून दिले तो १९१९ चा ग्रीष्मकाळ त्या राष्ट्राला आठवतो. लष्करी हस्तक्षेप करणाऱ्या त्या परकीय लष्करांना त्यांच्या भूमीवरून त्यांनी पिटाळून लावल्या नंतरही जगातील प्रमुख भांडवलशाही राष्ट्रांनी रशियाविरुद्ध, कधी गुप्तपणे तर कधी उघडपणे, अखंडपणे केलेली कटकारस्थानेही त्यांना आठवतात. सोविएत रशियाचा पाश्चिमात्य राष्ट्रांनी वर्षानुवर्षे केलेला तिरस्कार व द्वेष व रशियाला राजनैतिक मान्यता न देण्याचा त्यांचा अट्टाहास, या सर्व गोष्टीमुळे रशियन मनांत अस्वस्थता व भीती ह्या भावना दाटून येत असतील तर ते स्वाभाविकच आहे. हिटलरने रशियावर हल्ला करावा या हेतूने पाश्चिमात्य भांडवलशाही राष्ट्रांनी हिटलरच्या शक्तीला कसे खतपाणी घातले, म्युनिक

अनुक्रमणिका

कराराच्या वेळी त्यांनी रशियाला कसे वाळीत टाकले, एवढेच नव्हे तर हिटलर रशियावर हल्ला करील याची त्यांनी त्या कराराने कशी खात्री करून घेतली, हे सर्व रशियन लोकांच्या चांगले लक्षात आहे. रशियाला नेस्तनाबूत करण्याकरिता, कॉमिन्टर्नविरोधाच्या बुरख्याआडून, जर्मनी-जपान-इटली युतीने कशी कारस्थाने केली, व ॲक्सिस राष्ट्रे रशियावर हल्ला करणार हे उघड दिसत असूनही एकाही बड्या राष्ट्राने त्यांच्या त्या आक्रमक धोरणाविरुद्ध निषेधाचा शब्दही कसा उच्चारला नाही, उलट त्यांना अप्रत्यक्षपणे उत्तेजनच कसे दिले हे सर्व रशियनांना साहजिकच आठवते.'

चर्चिलने सुचविलेल्या रशियाविरोधी अँग्लो-अमेरिकन युतीमुळे उद्‌भवणाऱ्या धोक्यावर सेनेटर पेपरने आपल्या भाषणात विशेष भर दिला. तो म्हणाला, 'बड्या तीन राष्ट्रांपैकी दोन राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या नावाखाली तिसऱ्या बड्या राष्ट्राविरुद्ध लष्करी कडे उभारले तर संयुक्त राष्ट्रसंघ उध्वस्त व्हायला वेळ लागणार नाही.

'भीतीच्या या पेचप्रसंगातून मार्ग कसा काढायचा? संयुक्त राष्ट्रसंघ व जागतिक शांतता यांचे संरक्षण कसे करता येईल? माझ्या मते त्या प्रश्नाचे एकच उत्तर आहे ते म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघाची योजना साकार करण्याकरिता झटलेल्या फ्रँकलिन डेलानो रुझवेल्टचे ते भव्यदिव्य स्वप्न साकार करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करणे, ग्रेट ब्रिटन, रशिया व अमेरिका या राष्ट्रांत पुन्हा ऐक्य प्रस्थापित करणे, शांतता व समृद्धी या उद्दिष्टांप्रती वाटचाल करण्याकरिता आवश्यक ती मनोभूमिका व आत्मिक बळ या राष्ट्रांनी तयार करणे.'

परंतु सिनेटर पेपरचे ते शब्द अमेरिकन परराष्ट्र नीतीची सूत्रे हाताळणाऱ्या मुत्सद्यांच्या कानावर पालथ्या घागरीवरील पाण्याप्रमाणे विफल ठरले. त्यानंतरच्या काही महिन्यांत सोविएतविरोधी आंदोलन शमण्याऐवजी तीव्रतर होत गेले, व त्याबरोबर जगातील राजकीय तणावही वाढतच गेला. १९४७ च्या वसंतापर्यंत संयुक्त राष्ट्रसंघाची पहिली परिषद होऊन दोन वर्षेही उलटली नव्हती तोच काही प्रमुख अमेरिकन मंडळी सोविएत संघाविरुद्ध ताबडतोब युद्ध पुकारण्याची मागणी करू लागली. अणुशक्ती नियंत्रणाकरिता अमेरिकेने घालून दिलेल्या अटी सोविएत सरकारने अमान्य केल्यास अमेरिकेने विनाविलंब सोविएत रशियावर अणुबाँब टाकावेत अशी शिफारस, राजनैतिक क्षेत्रात अनेक उच्चपदांवर जबाबदारीने कामे केलेला पेन्सिलव्हॅनियाचा माजी गव्हर्नर जॉर्ज एच्. अर्ल याने २४ मार्च १९४७ रोजी 'अन्-अमेरिकन ॲक्टिव्हिटीज' कमिटीपुढे बोलताना उघडपणे केली. त्यावर काँग्रेस प्रतिनिधी जे.पार्नेल थॉमसने विचारले 'काय? ताबडतोब?' तेव्हा अर्लने पुन्हा ठासून सांगितले, 'होय! ताबडतोब!'

फॉरिन अफेअर्स कमिटीपुढे ३१ मार्च १९४७ रोजी बोलताना मिशिगनचा काँग्रेस प्रतिनिधी कॉफोर्ड यानेही अशी सूचना केली की सोविएत रशियाने तात्काळ आपली सर्व शस्त्रास्त्रे नष्ट करून टाकावीत असा निर्वाणीचा खलिता अमेरिकन सरकारने सोविएत सरकारला पाठवावा, व तसे करण्याचे सोविएत सरकारने नाकारले तर अमेरिकन वायुदलाने सोविएत शहरांवर अणुबाँब टाकण्यास लागलीच सुरुवात करावी. अमेरिकेची ती मागणी मान्य करण्याऐवजी रशिया लढणे अधिक पसंत करील ही शक्यता

अनुक्रमणिका

क्रॉफोर्डला कळत नव्हती असे नाही. परंतु तरीही त्या प्रश्नाला आज ना उद्या तोंड द्यावे लागणारच आहे असे सांगून, मोलोतोव, स्टालिन, विशिन्स्की या सर्वांनी ‘निःशस्त्र व्हा अन्यथा तुमच्या विनाशाकरिता आम्ही पाऊले उचलू’ असे सडेतोड आव्हान अमेरिकेने द्यावे असे त्याने सुचविले. कॅप्टन ए. डी. रिकेनबॅकर या ईस्टर्न एअरलाईन्सच्या अध्यक्षाने कनेक्टिकट कायदेमंडळापुढे १ एप्रिल १९४७ रोजी बोलताना स्पष्ट सांगितले की, ‘रशियात अंतर्गत क्रांती होऊन सोविएत रशिया नष्ट न झाले तर तिसरे महायुद्ध झालेच पाहिजे. येत्या ५० वर्षात शांतता टिकेल अशी व्यवस्था करावयाची असेल तर येन केन प्रकारेण सोविएत सरकार उलथून पाडलेच पाहिजे’

हिटलर आपल्या भाषणांतून देत होता तशाच प्रकारचा पिसाट धमक्या सोविएत संघाविरुद्ध १९४७ च्या वसंतात अमेरिकेतून ऐकू येत होत्या.

अनुक्रमणिका

## प्रकरण २६

# शांतता की युद्ध?

### सोविएतांप्रती 'कणखर धोरण'नीती

क्रिमियात याल्टा येथे फेब्रुवारी १९४५ मध्ये बड्या तिघांच्या झालेल्या बैठकीत, युद्धोत्तर काळात जागतिक शांतता व सुरक्षितता टिकवून धरण्याकरिता एक आंतरराष्ट्रीय संघटना प्रस्थापित करण्याची योजना प्रथम घोषित करण्यात आली; त्यावेळी, अमेरिका, रशिया व इंग्लंड, तसेच अन्य शांतताप्रेमी राष्ट्रे यांत सलोखा, सामंजस्य व सहकार्य सातत्याने नांदणे, जागतिक शांतता व सुरक्षितता टिकण्याच्या दृष्टीने अत्यंत अगत्याचे आहे हे सत्य रूझवेल्ट, स्टालिन व चर्चिल यांनी निःसंदिग्धपणे मान्य केले होते.

संयुक्त राष्ट्रांत फूट पडल्यास जागतिक शांततेला धोका निर्माण होईल या अध्यक्ष रुझवेल्टने दिलेल्या गंभीर इषाऱ्याचा पुनरुच्चार रुझवेल्टच्या मृत्यूनंतर त्याचा उत्तराधिकारी अध्यक्ष ट्रुमन यानेही केला होता. सानफ्रान्सिस्को येथे भरलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या दहाव्या व अखेरच्या सभेत बोलताना २६ जून १९४५ रोजी अध्यक्ष ट्रूमनने निवेदन केले की—

'संयुक्त राष्ट्रसंघात ऐक्य नांदू नये याकरिता सर्वतोपरी प्रयत्न संपूर्ण जगातील जुलमी व प्रतिक्रियावादी शक्ती करतील. युरोपात ॲक्सिस राष्ट्रांची लष्करी यंत्रणा नष्ट करण्याकरिता आम्ही प्राणपणाने लढा देत होतो तेव्हाही आमच्यात फूट पाडण्याचे प्रयत्न त्यानी सातत्याने अखेरपर्यंत केले. त्यावेळी त्यांना त्यात यश मिळाले नाही. परंतु तसा प्रयत्न ते पुन्हा निश्चितच करतील. आजही त्या प्रतिक्रियावादी शक्ती तसा प्रयत्न करीत आहेतच. आमच्यात फूट पाडून विजय मिळवणे हा त्यांचा एक कुटिल डाव होता. आजही, आमच्यात सांशकतेचे व विद्वेषाचे विष ओतून आम्हाला एकमेकांपासून फोडण्याचा प्रयत्न ते करीत आहेत. परंतु संयुक्त राष्ट्रसंघ संघटितच राहील, काहीही झाले तरी त्यात फूट पडणार नाही हे मी आपणा सर्वांना खात्रीपूर्वक सांगू इच्छितो. त्या माझ्या विश्वासात आपणा सर्वांच्या भावनांचे प्रतिबिंब उमटलेले आहे हे मला माहित आहे.'

परंतु अध्यक्ष ट्रुमन हे बोलत असतानाच त्याच्याच प्रशासनातील काही मंडळी संयुक्त राष्ट्रसंघात फूट पाडण्याच्या दिशेने कार्यप्रवण झाली होती. संयुक्त राष्ट्रसंघाच्या ऐक्याला पहिला तडा सानफ्रान्सिस्को येथे भरलेल्या पहिल्याच परिषदेत गेला. अर्जेंटिनाला परिषदेला आमंत्रित करावयाचे की नाही व त्या राष्ट्राला संयुक्त राष्ट्रसंघाचे सदस्यत्व द्यावयाचे की नाही ही मतभेदाचा मुख्य मुद्दा होता. ब्रिटिश व अमेरिकन प्रतिनिधी अर्जेंटिनाच्या वतीने जोरदार शिफारस करीत होते, तर सोविएत प्रतिनिधी मोलोतोव

अनुक्रमणिका

याचा अर्जेंटिनाला सदस्यत्व देण्याच्या प्रस्तावाला विरोध होता. परंतु संयुक्त राष्ट्रसंघात तोपर्यंत एक वेगळा अँग्लो-अमेरिकन गट तयार झालेला होता. त्यामुळे अर्जेंटिनाला सदस्यत्व मिळाले.

यानंतर नऊ महिन्यांनी फेब्रुवारी १९४६ मध्ये, अमेरिकन सरकारने 'ब्लू बुक ऑन अर्जेंटिना'या शीर्षकाखाली एक अधिकृत अहवाल प्रसिद्ध केला. त्यात प्रसिद्ध झालेल्या कागदपत्रांच्या पुराव्यावरून अर्जेंटिना सरकारचे नाझी फासिस्ट स्वरूप निर्विवादपणे स्पष्ट होत होते. संयुक्त राष्ट्रांच्या युद्धप्रयत्नांना सुरुंग लावण्याच्या हेतूने हेरगिरी व घातपात करण्याकरिता अर्जेंटिना सरकारने शत्रूशी हातमिळवणी केली होती, व नाझी नेते व संघटना यांनी अर्जेंटिनातील हुकुमशाही गटांनी अर्जेंटिनात फासिस्ट राजवट प्रस्थापित करण्याकरिता पूर्ण सहकार्य दिले होते. ॲक्सिस राष्ट्रांची अर्जेंटिनातील औद्योगिक व व्यापारी शक्ती अक्षुण्ण राखण्याकरिता आर्थिक बाबीत त्या सरकारने ॲक्सिस राष्ट्रांना सर्वतोपरी मदत केली होती. जर्मनीकडून त्यांनी शस्त्रेही मिळविली होती. [१४ ऑगस्ट १९४३ रोजी अर्जेंटिनाचा मायग्रेशन मिनिस्टर डॉ.सान्तियागो एम्. पेराल्ता याने त्यांच्या सरकारच्या वतीने स्कॅंडिनेवियन राष्ट्रांतील सुमारे १००० युरोपीय फासिस्ट नेत्यांना व कुप्रसिद्ध पंचमस्तंभीयांना अर्जेंटिनात नेहमी करिता स्थायिक होण्यास अधिकृतपणे आमंत्रित केले. ते सर्व लोक म्हणजे युरोपातील प्रतिष्ठित मंडळी असल्याने ते अर्जेंटिनात स्थायिक झाले की अर्जेंटिनातील स्त्री-पुरूषांशी त्यांचे विवाह होतील आणि त्यामुळे अर्जेंटिनाच्या वांशिक श्रेष्ठत्वाला उत्तेजन मिळेल असे अर्जेंटिना सरकारचे मत असल्याने त्यांना तेथे स्थायिक होण्याबद्दल आमंत्रण अर्जेंटिना सरकारने पाठविले असे पेराल्ताने उघडपणे सांगितले.]

अर्जेंटिना सरकारला संयुक्त राष्ट्रसंघाचे सदस्यत्व देण्याकरिता अमेरिका व ब्रिटन यांनी केलेली जबदस्त शिफारस व त्याकरीता दिलेला लढा म्हणजे जगातून फासिझमचे पूर्णपणे निर्मूलन करण्याच्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या मूलभूत नीतीशी उघडउघड प्रतारणा होती. फासिझमचे उच्चाटन करणे तर दूरच, उलट अर्जेंटिनाला संयुक्त राष्ट्रसंघात जबरीने स्थान देऊन अमेरिका व ब्रिटन यांनी फासिझमला खतपाणी मात्र घातले. 'रशियाप्रती कडक धोरण' या त्यांच्या नव्या नीतीचाच तो एक अविष्कार होता. त्यानंतरच्या काळात त्या सरकारांच्या परराष्ट्र धोरणाचे ते एक प्रमुख सूत्र बनणार होते. [अशीच परिस्थिती त्याकाळी इटलीतही होती. तेथे, सोविएतविरोधी पोलिश सेनापती व्लादिस्लाव अँडर्स याच्या नेतृत्वाखाली दोन लक्षाचे पोलिश फासिस्ट लष्कर पोसले जात होते. त्या लष्करावर देखरेख ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यांची होती व त्या लष्कराचा खर्चही ब्रिटिश तिजोरीतून केला जात होता. 'इटलीतील पोलिश लष्करासंबंधीची सत्यकथाही अत्यंत लज्जास्पद व गर्हणीय आहे; त्या पोलिश सैनिकांना केवळ शस्त्रास्त्रे दिली जात आहेत असे नव्हे तर अत्यंत काटेकोरपणे लष्करी डावपेचांचे अद्यावत प्रशिक्षणही त्यांना देण्यात येत असून, पोलंड पुन्हा फासिस्टांच्या ताब्यात घेण्याकरिता व सोविएत संघावर हल्ला करण्याकरिता त्यांना अगदी सुसज्ज ठेवण्यात येत आहे, अशी बातमी हर्बर्ट मॅथ्यूज याने ४ फेब्रुवारी १९४६ रोजी न्यूयॉर्क टाईम्सला पुरविली होती.

जनरल अँडर्सच्या फासिस्ट पोलिश लष्कराचे गुप्त हेर अगदी पद्धतशीरपणे हेरगिरी व घातपात करण्याकरिता व ज्यूविरोधी हल्ले आयोजित करण्याकरिता पोलंडमध्ये पाठविण्यात येत होते. या हेरांनी संघटित केलेल्या पोलिश पंचमस्तंभीयांनी, स्वतःच्या मार्गदर्शनाखाली, १९४५ मध्ये, सुमारे २००० प्रमुख पोलिश उदारमतवादी, कामगार संघटना-नेते व सरकारी अधिकारी यांच्या हत्या केल्या. पोलिश सरकारी अधिकाऱ्यांनी नंतर पकडलेल्या अँडर्सच्या त्या अनेक हेरांजवळ व दहशतवाद्यांजवळ ब्रिटिश गुप्तहेर खात्याची परिचय पत्रे होती हे नंतर त्यांच्याविरुद्ध चालविण्यात आलेल्या न्यायालयीन चौकशीत सिद्ध झाले.]

युद्धोत्तर काळात संयुक्त राषट्रसंघाच्या मूलभूत तत्वांची त्या राष्ट्रांनी केलेली पायमल्ली उघडपणे प्रत्ययाला आली ती, सर्वात घातक व भयानक शत्रू म्हणून ज्याच्याविरुद्ध त्यांनी नुकताच प्राणपणाने लढा दिला होता त्या जर्मनीबाबत त्यांनी चालविलेल्या धोरणात! सर्व जर्मन लष्कराचे विसर्जन करण्यात यावे, जागतिक शांततेविरुद्ध ज्यांनी अत्याचार व गुन्हे केले असतील त्या सर्व जर्मन अधिकाऱ्यांना शिक्षा करण्यात

याव्या, जर्मनीच्या युद्धक्षमतेचा पूर्ण नायनाट करण्यात यावा व जर्मनीतील नाझीवादाचे समूळ उच्चाटन करण्यात यावे अशा तरतुदी याल्टा व पॉट्स्डॅम करारांनी करण्यात आल्या होत्या. परंतु या सर्व महत्वाच्या निर्णयांना अमेरिका व ब्रिटिश व्याप्त जर्मन प्रदेशात अमेरिकन व ब्रिटिश सरकारांनी मूर्त स्वरुप दिले नाही.

नाझी लष्कराच्या बिनशर्त शरणागतीनंतर बरेच महिने उलटून गेल्यानंतरही जवळजवळ पाच लक्ष गणवेशधारी जर्मन सैनिक ब्रिटिश व्याप्त जर्मन क्षेत्रात पूर्वीप्रमाणेच शस्त्रसज्ज होते, तर अमेरिका व्याप्त जर्मन क्षेत्रात अमेरिकन लष्करी अधिकारी, 'कामगार सेवा तुकड्यात कामाला माणसे पाहिजेत या निमित्ताने हजारो फासिस्ट पोलिश, युगोस्लावियन व युक्रेनियन सैनिकांची भरती करून त्यांना शस्त्रास्त्रे व अन्य साहित्य पुरवीत होते. ३ फेब्रुवारी १९४६ रोजी न्यूयॉर्क टाईम्सला पाठविलेल्या एका खलित्यात रेमंड डानिएल याने अशी बातमी कळविली होती की अमेरिका व्याप्त जर्मन क्षेत्रात सुमारे १७००० पोलिश सैनिक अमेरिकन लष्करात आहेत, सुमारे १०००० युगोस्लाव आहेत व 'रॉयल युगोस्लाव' लष्कर म्हणून संघटित होऊन त्यांनी युगोस्लावियाचा पूर्वीचा राजा पीटर याच्याप्रती निष्ठेची शपथ घेतली आहे'. अमेरिकन सैनिकांचे गणवेष घातलेल्या पोलिश सैनिकांपैकी बहुसंख्य सैनिक हे युद्धकाळात पूर्व आघाडीवर जर्मन नाझी लष्कराबरोबर रशियाविरुद्ध लढलेले सैनिक होते आणि ते बहुधा सर्वच नाझींच्या इतकेच कट्टर ज्यू व रशियाविरोधी आहेत, अशीही माहिती डानिएलने आपल्या त्या बातमीपत्रात दिली होती.

रशियाविरुद्धच्या भावी युद्धात सामर्थ्यसंपन्न म्हणून बहुमोलाचा ठरणारा एक भरवशाचा बालेकिल्ला म्हणून प्रतिगामी जर्मनीचे पुनरुज्जीवन करण्याच्या अँग्लो-अमेरिकन नीतीची, फासिस्ट लष्कर पोसून सुसज्ज राखणे ही एक महत्वाची बाजू होती. पहिल्या महायुद्धानंतरही त्या राष्ट्रांनी अशाच धोरणाचा अवलंब केला होता. जर्मन उद्योग संघ व एकाधिकार, आणि फासिस्ट लष्करी दले टिकवून धरणे हा अँग्लो-अमेरिकनांच्या सोविएतविरोधी धोरणाचाच अविष्कार आहे अशी निःसंदिग्ध टीका त्यासंबंधी रेडस्टार या सोविएत नियतकालिकाने त्याकाळी केली होती.

१९४५—४६ या काळात सिनेटच्या मिलिटरी अफेअर्स कमिटीच्या युद्धसज्जता उपसमितीचा अध्यक्ष सिनेटर हार्ले एम्. किलगोर याने, जर्मन उद्योगसंघ यंत्रणा नष्ट केली जाण्याऐवजी पुन्हा उभारली जात आहे असे सांगून त्याविरुद्ध वारंवार धोक्याचा इशारा दिला होता. अमेरिकन लष्करी शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या जर्मन प्रदेशातील जर्मन उद्योग संघ व परदेशी मालमत्ता यांच्या चौकशी विभागाचा संचालक कर्नल बर्नाड बर्नस्टीन यानेही, डिसेंबर १९४५ मध्ये, किलगोर समितीपुढे साक्ष दिली तेव्हा जर्मन उद्योग सम्राट आय्. जी. फार्बेन याच्या अमेरिका व्याप्त जर्मन क्षेत्रातील औद्योगिक युद्ध यंत्रणेचा ८७ टक्के भाग आजही अक्षुण्ण आहे असे स्पष्ट निवेदन केले होते. तसेच, तटस्थ राष्टांतील जर्मन मालमत्तेचा शोध घेण्याच्या कार्यात सोविएत संघाला सहभागी न करण्याचे हेतुपुरस्सर प्रयत्न अमेरिका व ग्रेट ब्रिटन करीत आहेत अशी स्पष्ट कबुली, किलगोर समितीपुढे निवेदन करताना बर्नस्टीनचा उत्तराधिकारी रसेल निक्सन याने २५ फेब्रुवारी १९४६ रोजी दिली होती. तशा चौकशीत सोविएत संघाला सहभागी होऊ दिल्यास स्पेन, पोर्तुगाल, स्वित्झर्लंड, स्वीडन व अर्जेंटिना या राष्ट्रांच्या सरकारांचे फासिस्ट प्रतिगामी स्वरूप उघडे पडले असते व त्या राजवटींशी दोस्त राष्ट्रांचे निगडित असलेले विशेष हितसंबंध व त्यांची

त्या फासिस्ट राजवटींशी असलेली हातमिळवणीही स्पष्ट झाली असती असे सांगून, ब्रिटिश व अमेरिकन अधिकारी त्यांच्या जर्मन व्याप्ती प्रदेशात हेतुपुरस्सर जर्मन उद्योगसंघ-यंत्रणा पोसत आहेत असे स्पष्ट निवेदन रसेल निक्सन याने केले. दरम्यान १९४६ मध्ये म्युनिक व फ्रँकफर्ट येथे आय्. जी. फार्बेनच्या भाग भांडवलाचा भाव ६८ पासून १४२ ½ पर्यंत चढला.

१ मे १९४६ रोजी रेडिओवरून बोलताना माजी अर्थमंत्री हेन्री मार्गेनथाऊ याने जर्मनीबाबत अमेरिकन परराष्ट्र खात्याने चालविलेल्या धोरणाचा तीव्र शब्दात धिक्कार केला. जर्मनीची युद्धक्षमता नष्ट करण्याचा थोडाही प्रयत्न ब्रिटन व अमेरिका व्याप्त जर्मन क्षेत्रात केला जात नाही हे निःसंदिग्धपणे कबूल करून तो पुढे म्हणाला—'क्विबेक, याल्टा व पॉट्स्डॅम येथे दोस्त राष्ट्रांनी आखलेला कार्यक्रम परराष्ट्र मंत्री बिर्नेस यांना पूर्णपणे उधळून लावायचा आहे की काय हे मला अजून स्पष्ट झालेले नाही. पॉट्स्डॅम करार फाडून फेकून देण्याचे जर बिर्नेस यांनी ठरविले असेल तर मला एकच गोष्ट सांगावीशी वाटते ती ही की तसे करण्याने व्हर्साय येथील घातक चुकांचीच पुनरावृत्ती करून आपण तिसऱ्या महायुद्धाची तयारी करून ठेवीत आहोत.' हेन्री मार्गेनथाऊ याचे हे वक्तव्य म्हणजे संभाव्य युद्धाच्या धोक्याचा स्पष्ट इशाराच होता.

६ सप्टेंबर १९४६ रोजी अमेरिकन परराष्ट्र मंत्री जेम्स एफ्. बिर्नेस याने जर्मनीतील स्टटगार्ट शहरी केलेल्या एका भाषणात जर्मनीबाबतचे नवे अमेरिकन धोरण विशद केले. त्यानंतर चारच दिवसात फ्रँकफर्ट येथील जर्मन उद्योगधंद्यांच्या भाग भांडवलाचे भाव सरासरी १० टक्क्यांनी व बँकांचे भाग भांडवलाचे भाव सुमारे ३० टक्क्यांनी वाढले. पाश्चिमात्य राष्ट्रांनी व्यापलेल्या जर्मन क्षेत्रातून व्हावयाची वसूली अमेरिका पूर्णपणे रद्द करील व रशिया व्याप्त जर्मन क्षेत्राला काटशह म्हणून सामर्थ्यसंपन्न पश्चिम जर्मनीची पुर्नउभारणी करण्याचा अमेरिका व ग्रेट ब्रिटन यांचा पक्का निर्धार आहे असाच अर्थ बिर्नेसच्या भाषणाचा जर्मन व्यापारी व उद्योगपती लावीत आहेत, [बिर्नेसच्या नीतीच्या समर्थकांत सर्वात उत्साही व स्पष्टवक्ता समर्थक होता तो जर्मनीचा पोटॅश सम्राट व कापड उद्योगपती अर्नोल्ड रेशबर्ग. १९२१—२२ च्या सुमारास जनरल मॅक्स हॉफमनचा विश्वासू मदतनीस म्हणून काम केलेला, हिटलर व रोझेनबर्ग यांची पहिली भेट घडवून आणणारा व नाझी पक्षाला भरपूर आर्थिक पाठिंबा देणारा हाच तो रेशबर्ग होता. नाझी राजवटीत २० कोटी डॉलर्सच्या मालमत्तेचा तो मालक बनला होता. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व्याप्त जर्मन क्षेत्रात स्टार्नबर्गिज किनाऱ्यावर त्याच्या विशाल व समृद्ध इस्टेटीवर तो ऐषारामात राहात होता. ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी व अमेरिका यांची औद्योगिक व लष्करी युती व्हावी अशी शिफारस करणारी खाजगी पत्रके प्रमुख अमेरिकन व्याप्ती-अधिकाऱ्यांना पाठविण्याकरिता तो नियमीतपणे प्रसिद्ध करी. सोविएत संघाविरुद्ध अँग्लो-अमेरिकन सरकारे योजीत असलेल्या युद्धाकरिता व सामर्थ्यसंपन्न जर्मनीच्या पुर्नउभारणीरकरिता रेशबर्गने जोमाने प्रचार मोहीम आरंभली आहे असे वृत्त ओव्हरसीज न्यूज एजन्सीने १३ मार्च १९४६ रोजी दिले होते. राजप्रासादासारख्या भव्य अशा त्याच्या निवासस्थानी युद्धानंतर एक अमेरिकन वार्ताहार त्याची मुलाखात घेण्यास गेला असता रेशबर्गने त्याला एकाएकी विचारले, 'जॉर्ज कसा काय आहे? ठीक आहे ना तो ?' कोणत्या जॉर्जबद्दल तो इतक्या आपुलकीने विचारतो आहे हे त्या वार्ताहाराला साहजिकच कळले नाही. त्याने तसे विचारताच उत्तरादाखल रेशबर्ग उद्‌गारला, 'म्हणजे काय? अहो, जॉर्ज म्हणजे तुमचा जॉर्ज मार्शल—तुमचा चीफ ऑफ स्टाफ! एके काळी तो व मी अगदी निकटचे मित्र होतो.'] असे एडविन हार्टरिच याने ११ सप्टेंबर १९४६ रोजी न्यूयॉर्क ट्रिब्यूनला कळविले होते; तर पॉटस्डॅम व याल्टा करारांना मूठमाती देणारे वक्तव्य म्हणून फ्रँकोच्या स्पेनमध्ये बिर्नेसच्या भाषणाचे स्वागत होत आहे असे हर्स्टचा परदेशी वार्ताहार कार्ल वॉन वेगाँ याने कळविले.

जानेवारी १९४७ मध्ये जेम्स एफ्. बिर्नेसच्या जागी परराष्ट्र मंत्री म्हणून जॉर्ज सी. मार्शलची नियुक्ती झाली. अर्थात् त्या बदलामुळे अमेरिकेच्या जर्मनीसंबंधीच्या धोरणात काही बदल झाला असे नाही. उलट,

अनुक्रमणिका

मार्च व एप्रिलमध्ये मास्को येथे बड्या चार राष्ट्रांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या झालेल्या परिषदेत जर्मनीशी करावयाच्या शांतता करारासंबंधी झालेल्या चर्चेच्या वेळी अमेरिकेच्या त्या नव्या परराष्ट्र सचिवाने सोविएत संघाप्रती अतिशय आडमुठी व आक्रमक भूमिका राखली.

चार बड्या राष्ट्रांत परस्पर तडजोड होऊन लवकरच शांतता कराराच्या, अटी सर्व संमतीने निश्चित होतील अशी आशा स्टालिनने व्यक्तिशः त्याच्याजवळ व्यक्त केल्याचे, मार्शल याने अमेरिकेला परत गेल्यानंतर राष्ट्राला उद्देशून रेडिओवरून केलेल्या भाषणात सांगितले. परंतु त्यापाठोपाठच, कोणत्याही तडजोडीकरिता थांबण्याची अमेरिकेची तयारी नाही, जी कोणती कार्यवाही करावयाची ती विनाविलंब केली गेली पाहिजे असेही त्याने घोषित केले.

काही दिवसांतच उपपरराष्ट्र सचिव डीन ॲचिसन याने मार्शलच्या विधानाचा अर्थ विशद करून सांगितला. क्लीव्हलंड (मिसिसिपी) येथे डेल्टा कौन्सिलपुढे अध्यक्ष ट्रूमनच्या वतीने भाषण करताना ८ मे रोजी ॲचिसन म्हणाला—'जर्मनी व जपान या दोन राष्ट्रांवरच युरोप व आशिया या खंडांचे पुनरुत्थान अवलंवून असल्याने त्या राष्ट्रांतील उद्योगधंद्यांच्या पुर्नउभारणीच्या योजनांना आपण वेगाने चालना दिली पाहिजे. जर्मनीसह युरोपच्या पुनरुज्जीवनाकरिता जी कोणती पाऊले उचलणे शक्य आहे ती, त्याकरिता चार बड्या राष्ट्रांत एकदम होण्याची वाट न पाहता आपण ताबडतोब उचलली पाहिजेत.'

लाल लष्कराच्या घणाघाती आघातांखाली बर्लिन कोलमडल्याला व जर्मन लष्कराने शरणागतीच्या करारावर स्वाक्षऱ्या केल्याला जवळजवळ दोन वर्षे उलटली होती. परंतु तरीही जर्मनीशी शांतता करार होऊ शकला नव्हता. तत्त्वतः, जर्मनी व संयुक्त राष्ट्रे यांत अजूनही युद्ध परिस्थितीच चालू होती.

दूरपूर्वेतही, जपानने सुमारे १५ वर्षे चालू ठेवलेल्या युद्धाचा, जपानच्या शरणागतीबरोबर शेवट होऊनही शांतता प्रस्थापित झालेली नव्हती. १९४७ च्या वसंतात चीनमध्ये रक्तरंजित यादवी युद्धाचा भडका उडाला होता. आणि जर्मनीप्रमाणेच चीनमध्येही रशियाप्रती कठोर नीती पत्करून तेथील लष्करवाद्यांना व प्रतिक्रियावाद्यांना पाठिंबा देण्याचे धोरण अमेरिकन सरकार चालवीत होते.

टोकिओने शरणागती पत्करल्यानंतर, चीनमध्ये, सुमारे सात लक्ष सैनिकांच्या कोमिन्टांग तुकड्यांना प्रशिक्षण देऊन शस्त्रसज्ज करण्यास अमेरिकेने प्रारंभ केला होता. याशिवाय ५० हजार कोमिन्टांग पोलिस सैनिकांना अमेरिकन अधिकाऱ्यांनी प्रशिक्षण देऊन शस्त्रे पुरविली होती व अमेरिकन लष्करी सल्लागारांच्या देखरेखीखाली पाच वायुदल-अधिकारी—प्रशिक्षण केंद्रांसह एकूण २७ लष्करी प्रशिक्षण संस्था चीनमध्ये प्रस्थापित करण्यात आल्या होत्या. चीनमधील लोकशाही भावना चिरडून टाकण्याकरिता जनरलिसिमो चँग-काय शेकने अत्यंत क्रूर अशी मोहीम सुरू केली तेव्हा त्याचे ४ लक्ष ८० हजार सैनिक [संपूर्ण दुसऱ्या महायुद्धकाळात अमेरिकन लष्कराने प्रशिक्षण देऊन शस्त्रसज्ज केलेल्या चिनी लष्करापेक्षा हे लष्कर दुपटीने मोठे होते.] अमेरिकेच्या वायुदलाने उत्तर चीन व मांचुरिया येथे आणून सोडले. अमेरिकन वायुदलाच्या त्या

अनुक्रमणिका

कार्यवाहीकरिता अमेरिकेने तीस कोटी डॉलर्स खर्च केले, व पॅसिफिकमधील बेटांकडून जास्तीची अमेरिकन शस्त्रास्त्रे विकत घेण्याकरिता चँग-काय शेकला साठ कोटी डॉलर्सचे कर्ज मंजूर केले. १९४७ पर्यंत अमेरिकन सरकारने ४०० कोटी डॉलर्सची मदत व युद्धसाहित्य कोमिन्टांग राजवटीला पुरविले. चीन—जपान युद्धकाळात अमेरिकेने चीनला केलेल्या एकूण द्रव्य सहाय्यापेक्षा ही रक्कम कितीतरी मोठी होती.

१९४७ च्या वसंतातील चीनमधील घटना म्हणजे ह्यू. डी. लेसी याने २६ नोव्हेंबर १९४५ रोजी हाऊस ऑफ रिप्रेझेन्टेटिव्हमध्ये केलेल्या भाषणावरील जणू एक दुर्दैवी शिक्कामोर्तब होते. ट्रुमन प्रशासनाने रूझवेल्टच्या चीनसंबंधी नीतीचा परित्याग केला आहे असा आरोप करून अमेरिकेच्या नव्या नीतीमुळे चीनमध्ये यादवी युद्ध अपरिहार्य ठरत आहे हे डी. लेसीने स्पष्ट केले. आपल्या त्या भाषणात तो म्हणाला, 'उत्तर चीनमध्ये साम्यवादविरोधी तळ प्रस्थापित करण्याकरिता जर अमेरिकेने आपल्या सामर्थ्याचा पाठिंबा देणे सुरू ठेवले तर त्या नीतीचे अपरिहार्य ते परिणाम साहजिकच होतील. सर्व जनतेकरिता शांतता व स्वयंशासन ह्या हक्काला मान्यता देणे या तत्वाशी ती नीती सुसंगत नाही. आशियाचे अनियंत्रित शोषण करू इच्छिणाऱ्या अमेरिकेच्या अत्यंत प्रतिगामी अशा बड्या उद्योगपतींची ती नीती आहे. अमेरिकेची ती डॉलर—साम्राज्यवादाची नीती आहे. जगाला नव्या महायुद्धाप्रती नेणारे ते धोरण आहे. यावेळचे हे महायुद्ध पॅसिफिकमधील आपल्या विशाल युद्धतळावरून, युद्धखोरीचे निर्मूलन न केलेल्या जपानवरून, व उत्तर चीनमध्ये आपण प्रस्थापित केलेल्या साम्यवादविरोधी तळावरून सोविएत संघाविरुद्ध चालविलेले ते युद्ध असेल.' तसेच, 'भावी युद्धात स्पेनप्रमाणे चीनचा उपयोग करता यावा याची तयारी आपण करीत आहोत' असा स्पष्ट इशारा रेनॉल्ड आणि हिचकॉक या प्रकाशन संस्थांचा उपाध्यक्ष फ्रँक टेलर याने आपल्या चीन दौऱ्यानंतर दिला होता.

दुसऱ्या महायुद्धानंतर चीनमध्ये जशी बिकट परिस्थिती उद्‌भवली तशीच परिस्थिती जपानी पकडीतून मुक्त झालेल्या प्रमुख पॅसिफिक बेटांतही उद्‌भवली. अमेरिकेने पुरविलेल्या युद्धसाहित्याच्या बळावर ब्रिटिश व डच फौजांनी इंडोनेशियातील स्वातंत्र्य चळवळ अत्यंत निर्घृणपणे दडपून टाकली. फिलिपाईन्समध्ये युद्धकाळात टोकिओने प्रस्थापित केलेल्या कळसूत्री सरकारचा एक मंत्री मॅन्युअल रोक्सास हा अमेरिकेच्या पाठिंब्याने फिलिपाईन्सचा अध्यक्ष म्हणून निवडून आला व जनरल डग्लस मॅकार्थर याने दिलेल्या द्रव्यसहाय्याच्या व युद्धसाहित्याच्या बळावल त्याने फिलिपाईन्समधील फासिस्टविरोधी चळवळ चिरडून टाकली. दक्षिण कोरियात जपान्यांशी हातमिळवणी केलेल्या कोरियन पंचमस्तंभीयांना अमेरिकन व्याप्ती—अधिकाऱ्यांनी तेथे उच्च सरकारी पदांवर नियुक्त केले, व तेथील प्रागतिक गट व कामगार संघटक यांविरुद्ध मात्र कठोर कार्यवाही करण्यात आली. [१९४७ च्या वसंतात वर्ल्ड फेडरेशन ऑफ ट्रेड युनियन्सच्या एका शिष्टमंडळाने कोरियाला भेट दिली. त्यावेळी जपानी गणवेशधारी सैनिकांनी त्यांच्या स्वागतार्थ पत्रके वाटणाऱ्या कोरियन कामगारांना बेशुद्ध होईपर्यंत क्रूर मारहाण केली. या प्रकाराने त्या शिष्टमंडळाने दक्षिण कोरियाचा आपला दौरा रद्द केला. 'दक्षिण कोरियात कृतिप्रवण फासिझमचे दर्शन आम्हाला झाले, आमच्या समक्ष कोरियन कामगारांना निर्दयपणे मारहाण केली गेली, खुद्द शिष्टमंडळाचाही अपमान करण्यात येऊन सदस्यांना धाकदपटशा करण्यात आला.' असे त्या सदस्यांनी मागून सांगितले.]

अनुक्रमणिका

एकंदरीत युद्धोत्तर काळात संपूर्ण आशिया व युरोप खंडांत रशियाप्रती कठोर धोरणाचा अवलंब अधिकाधिक जोमाने करण्यात आला, व तितक्याच सातत्याने प्रतिगामी व फासिस्ट शक्तींना वाढत्या प्रमाणात प्रोत्साहन व पाठिंबा अमेरिकन सरकारकडून मिळाला. तसेच, ॲक्सिस राष्ट्रांच्या झालेल्या दारुण पराभवानंतर नव्या दमाने फोफावणाऱ्या लोकशाहीवादी चळवळीविरुद्ध ट्रूमन प्रशासनाने उघडपणे, कठोर आर्थिक व राजनैतिक कार्यवाही करून शत्रुत्वाचे धोरण चालविले.

## ट्रूमन सिद्धांत

१२ मार्च १९४७ रोजी ट्रुमन सरकारची रशियाप्रती-कठोर-धोरण नीती कळसाला पोहोचली. रिपब्लिकन तसेच डेमोक्रॅटिक पक्षाच्या प्रमुख नेत्यांशी सर्व मुद्यांबाबत सांगोपांग विचारविनिमय केल्यानंतर व आवश्यक ती सर्व सिद्धता झाल्यानंतर, ग्रीक व तुर्की सरकारांना ४० कोटी डॉलर्सचे कर्ज मंजूर करण्याची विनंती करण्याकरिता अध्यक्ष ट्रुमनने अमेरिकेच्या कॉंग्रेसपुढे, ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत दूरगामी परिणाम करणारे भाषण केले, त्या कर्जाचा उद्देश, ट्रूमनने स्पष्ट शब्दात उघड करून सांगितला नसला, तरी अमेरिकेच्या त्या आर्थिक मदतीचा उद्देश युरोपातील बोल्शेविझमच्या प्रसाराला व सोविएत विस्तारवादाला आळा घालणे हा होता, हे उघडच होते.

ग्रीसला १९४६ पर्यंत ग्रेट ब्रिटनकडून मदत मिळत होती, परंतु यापुढे ती मदत चालू ठेवणे ब्रिटनला अशक्य आहे; आणि, ग्रीसमधील साम्यवाद्यांच्या नेतृत्वाखालील हजारो सशस्त्र दहशतवाद्यांच्या कारवायांमुळे ग्रीसच्या लोकशाहीवादी सरकारच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला असून साम्यवादाच्या त्या संकटाला तोंड देण्याकरिता ग्रीक सरकारला पाठिंबा देण्याची तयारी व सामर्थ्य केवळ एकट्या अमेरिकेत आहे. त्यामुळे अमेरिकेने ग्रीक सरकारला आवश्यक ती मदत केली पाहिजे असे ट्रुमनने आपल्या भाषणात सदस्यांना आवर्जून सांगितले. [नाझींचा पराभव झाल्यानंतर ग्रीसमधील फासिस्टविरोधी प्रतिकार चळवळ चिरडून टाकून तेथे राजसत्ताक सरकार प्रस्थापित करण्याकरिता ग्रीक प्रतिक्रियावाद्यांना ब्रिटिश लष्कराने सर्वतोपरी मदत केली. १९४६ मध्ये सेमूर फ्रेदिन या परदेशी वार्ताहराने ब्रिटिश व अमेरिकन पत्रकारांसह ग्रीसचा दौरा केला होता. ग्रीसमध्ये प्रस्थापित झालेल्या राजसत्ताक सरकारच्या स्वरूपाचे तपशीलासह वर्णन १६ सप्टेंबर १९४६ रोजी न्यूयॉर्क हेराल्ड ट्रिब्यूनला पाठविलेल्या एका खलित्यात फ्रेदिनने केले होते. 'लोकशाही आणि हत्या एकच आहेत' हे ग्रीक सरकारी अधिकाऱ्यांचे एक आवडते घोषवाक्य होते. राजसत्तेला जनतेकडून होणाऱ्या वाढत्या विरोधामुळे जनतेविरुद्ध दडपशाहीची कठोर मोहीम त्या सरकारने सुरू केली आहे, जनतेच्या मोठमोठ्या गटांना अन्न मिळू न देणे, संयुक्त राष्ट्रसंघाच्या मदत व पुनर्वसन प्रशानाने चालविलेली मलेरियाविरोधी मोहीम हाणून पाडणे, हजारोंना तुरुंगात डांबणे, हद्दपार करणे असे प्रकार नित्य होत आहेत' असे फ्रेदिनने कळविले. उत्तर ग्रीसमध्ये वृद्ध माणसे, स्त्रिया व मुले यांना छलशिबिरांत डांबण्यात आले असल्याचे फ्रेदिन व अन्य वार्ताहारांनी स्वतः पाहिले. त्या असहाय्य मंडळींची हेतुपुरस्सर उपासमार केली जात होती, ती एकाच उद्दिष्टाने; की फासिस्टविरोधी चळवळीत लढणाऱ्या त्यांच्या तरुण मुलांनी टेकड्या व दऱ्यांखोऱ्यांतून बाहेर पडून शरणागतीला व मरणाला सिद्ध व्हावे.

२० एप्रिल १९४७ रोरी विलियम एल्. शिरर याने न्यूयॉर्क हेराल्ड ट्रिब्यूनयध्ये प्रकाशित झालेल्या एका लेखात म्हटले होते—'ज्यांना चिरडून टाकण्याकरिता आपण मदत केली पाहिजे असे ट्रूमन महाशय म्हणतात, ते ग्रीक गनीम खरोखरी कोण आहेत? ते मुळात संघटित झाले ते जर्मनांविरुद्धच्या प्रतिकार चळवळीत लढणारे देशभक्त म्हणून. याउलट त्यांच्याविरुद्ध दंडात्मक कार्यवाही करीत असलेले व त्याकरिता आता ट्रूमनच्या कार्यक्रमानुसार अमेरिकेची मदत मिळत असलेले ग्रीक राजसत्तेचे सैनिक मात्र पूर्वीचे पंचमस्तंभीय आहेत खेड्यांची सरसकट जाळपोळ करणे व देशभक्त ग्रीकांना हुडकून काढून त्यांची हत्या करणे याकरिता याच ग्रीक तुकड्यांचा उपयोग जर्मनांनी करून घेतला होता.']

अनुक्रमणिका

अमेरिकेकडून दिल्या जाणाऱ्या कर्जाचा उपयोग नक्की कोणकोणत्या गोष्टींकरिता केला जाणार आहे हे ट्रूमनने स्पष्टपणे विशद केले नसले तरी कर्जाकरिता काँग्रेसची मंजूरी मागताना ग्रीस व टर्कीमध्ये लष्करी अधिकारी पाठवून निवडक ग्रीक व तुर्की अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची तरतूद करण्यात यावी, अशी मागणी ट्रूमनने आपल्या भाषणात केली होती.

ट्रूमनच्या त्या संपूर्ण भाषणात सोविएत संघाचा कोठे नामोल्लेखही नव्हता. परंतु ट्रूमनने केलेल्या सूचना म्हणजे सोविएत संघाविरुद्ध 'युद्धाचे उघड आवाहन होय' असे भाष्य त्या संबंधी शिकागो डेली न्यूजने केले होते.

अध्यक्ष ट्रूमनच्या सूचनांना उत्तर म्हणून राष्ट्राला उद्देशून रेडिओवरून केलेल्या आपल्या भाषणात अमेरिकेचा माजी उपाध्यक्ष हेन्री वॅलेस १३ मार्च रोजी म्हणाला,——"सध्या आपल्यासमोर ग्रीक नव्हे तर अमेरिकन पेचप्रसंग उभा ठाकला आहे. जगातील गरजू जनतेला मदत करण्याचे आपले उद्दिष्ट आहे हे जर खरे तर अध्यक्ष व काँग्रेस यांनी संयुक्त राष्ट्रसंघाची मदत व पुनर्वसन योजना का नष्टप्राय होऊ दिली? युरोपात बेघर झालेल्या लक्षावधी लोकांना कोणतीच मदत आपण का करीत नाही?

'ग्रीस व टर्कीच्या लोकशाहीविरोधी सरकारांना मदत करून स्वातंत्र्याच्या आदर्शाला किंवा कार्याला आपण कसा हातभार लावणार आहोत? पहिल्या महायुद्धात टर्की हे राष्ट्र आपल्याविरुद्ध लढले; तर दुसऱ्या महायुद्धात संयुक्त राष्ट्रांना कोणत्याही प्रकारे मदत करण्याचे त्या राष्ट्राने स्पष्टपणे नाकारले. एवढेच नव्हे तर, जर्मनी व दोस्त राष्ट्रे या दोहोकडून टर्कीने आपल्या पदरात लाभ पाडून घेतला. त्या राष्ट्राच्या तटस्थतेमुळेच वाजवीपेक्षा अधिक महिने युद्ध लांबले.

'एका वर्षापूर्वी फुल्टन (मिसूरी) येथे विन्स्टन चर्चिल यांनी राजनैतिक क्षेत्रात सोविएत संघाविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला जावा असे आवाहन केले. चर्चिल यांच्या त्या सूचनेला मूक मान्यता देऊन, ब्रिटिश साधनसामुग्रीचा उपयोग करून घेऊन सोविएत संघाविरुद्ध लढा देण्याच्या धोरणाला ट्रूमनने आपल्याला बांधून घेतले आहे. पण त्या धोरणाची दिवाळखोरी आता स्पष्ट झाली असून ब्रिटनच्या त्याबाबतच्या असहाय्यतेबद्दलही शंका उरलेली नाही. ब्रिटन ज्याबाबत पूर्णपणे असमर्थ व अपयशी ठरले असल्याचे उघड झाले आहे, नेमकी तीच जबाबदारी ट्रूमन महाशय आता आपल्या शिरावर घेऊ पाहात आहेत.'

ट्रूमनच्या सूचना मान्य करणे म्हणजे रूझवेल्टच्या धोरणांना पूर्णपणे तिलांजली दिल्यासारखे होणार असून त्यामुळे जागतिक शांततेला गंभीर धोका निर्माण होईल असा स्पष्ट इशाराही वॅलेसने आपल्या त्या भाषणात दिला. तो म्हणाला——'संपूर्ण जगात पूर्वपश्चिम लढा सुरू झाल्याची घोषणा ट्रूमन महाशयांनी करणे म्हणजे आपण अंतिम युद्धाची तयारी करीत आहोत असे सोविएत नेत्यांना बजावणे असाच त्याचा अर्थ आहे. पण युद्ध कोणालाच नको आहे. शांततेकरिता आवश्यक ते प्रयत्न व कार्यवाही करण्यात आपण अपयशी ठरलो तरच पुन्हा युद्ध भडकेल. रूझवेल्ट यांच्या विचारांची हीच दिशा होती. पुढील पिढ्यांना शांतता व समृद्धी लाभावी याकरिता त्यांची धडपड होती. त्यानंतर आता दोन वर्षेही

उलटली नाहीत तर अध्यक्ष ट्रूमन पुढील पिढ्यांकरिता दुःख दारिद्र्य व युद्ध यांची तरतूद करीत आहेत. भीतीच्या शतकाला जणू ते आमंत्रण देत आहेत. पण अजूनही वेळ गेलेली नाही. योग्य व आवश्यक ते प्रयत्न झाल्यास भीतीच्या शतकाऐवजी, येते शतक हे अमेरिकेचे स्वप्न साकार करणारे शतक ठरू शकेल मला खात्री आहे.'

नव्याने घोषित झालेल्या ट्रूमन सिद्धांतावर सडकून टिका करणाऱ्या वॅलेसचा आवाज अमेरिकेत ऐकू येत असतानाच, त्या सिद्धांताचे सहर्ष स्वागत करणारा एक परिचित आवाज त्याचवेळी संपूर्ण इंग्लंडमध्ये घुमला. तो आवाज होता विन्स्टन चर्चिलचा. एक वर्षापूर्वी फुल्टन येथे त्याने प्रतिपादिलेल्या सोविएतविरोधी कार्यवाहीला व ग्रीसमधील फासिस्ट चळवळ दडपण्याच्या त्याच्या सरकारने पूर्वी अवलंबिलेल्या नीतीला पूर्ण समर्थन, अध्यक्ष ट्रूमन यांनी केलेल्या सूचनांमुळे मिळाले आहे असे एप्रिलच्या प्रारंभी त्या माजी ब्रिटिश प्रधानमंत्र्याने मोठ्या हर्षभराने जाहीर केले. एवढेच नव्हे तर त्याचे ते मत त्याने, लाईफ व न्यूयॉर्क टाईम्स यात प्रसिद्ध केलेल्या दोन लेखांत अगदी निःसंदिग्धपणे जगापुढे मांडले. '१९४४—४५ मध्ये, ग्रीस संबंधीच्या धोरणात मी एकाकी पडतो की काय असे मला वाटले होते. पण त्यावेळी जी नीती मी निश्चित केली होती तीच नीती आज दोन वर्षानंतर, त्या नीतीच्या उपयुक्ततेबद्दल खात्री पटून, अमेरिकन सरकार अवलंबीत आहे ही माझ्या दृष्टीने एक मोठीच समाधानाची बाब आहे' असे भाष्य त्या अमेरिकन धोरणाबाबत चर्चिलने आपल्या लेखात केले होते.

अध्यक्ष ट्रूमनने केलेल्या सूचनांना सिनेटमध्ये काही सदस्यांनी प्रखर विरोध केला. ग्रीसला द्यावयाच्या मदतीचे काम संयुक्त राष्ट्रसंघाकडे सोपवावे याकरिता सिनेटर क्लॉड पेपर व सिनेटर ग्लेन एच्. टेलर यांनी प्रयत्न केले. पण ग्रीस व टर्की यांना ४० कोटी डॉलर्सचे कर्ज मंजूर करणारे विधेयक अमेरिकन सिनेटने, ६७ विरुद्ध २३ मतांनी २२ एप्रिल १९४७ रोजी पारित केले. त्या पाठोपाठ, बरीच उलट सुलट चर्चा होऊन, ९ मे रोजी त्या कर्जाला मंजूरी हाऊस ऑफ रिप्रेझेन्टेटिवनेही दिली.

त्या विधेयकाला काँग्रेसने दिलेल्या त्या मान्यतेबद्दल न्यूयॉर्क टाईम्सने लिहिले——'ट्रूमन यांच्या या कार्यक्रमात 'युद्धाची अघोषित घोषणा' दडलेली आहे, व तसाच त्याचा अर्थ सोविएत संघ करील.' पण अशा आशयाची भाषणे एकीकडे ऐकू येत असताच, न्यू हॅम्पशायरचा रिपब्लिकन प्रतिनिधी चेस्ट ई मेरो, याने उघडपणे सोविएत संघाला उद्देशून आव्हान दिले. तो म्हणाला——'त्यांनी (सोविएत संघाने) या कार्यक्रमाचा हवा तो अर्थ लावावा. या आमच्या कार्यवाहीमुळे रशिया युद्धाला प्रवृत्त होणार असेल तर आमचा नाईलाज आहे. त्याबाबत आपण काही करू शकत नाही.'

पहिल्या युद्धोत्तर काळाप्रमाणे याही वेळी, १९४७ मध्ये सुरू झालेले बोल्शेविझमविरोधी धर्मयुद्ध केवळ राजकीय हेतूने सुरू झालेले नव्हते. १९१८ मध्ये हस्तक्षेपाचे युद्ध चालविण्यामागे दोस्त राष्ट्रांचा प्रमुख हेतू होता तो म्हणजे रशियाच्या अमाप निसर्ग संपत्तीचा ताबा मिळवणे. आता १९४७ मध्ये भूमध्यसागर किनाऱ्यावर बोल्शेविझमविरुद्ध बालेकिल्ले उभारण्याची मागणी जेव्हा काही अमेरिकन हितसंबंधी करीत होते त्यावेळी त्यांचे डोळे खिळले होते ते मध्यपूर्वेतील असीम खनीज तेल भांडरावर! 'इथे पेट्रोलियमचा

वास येत आहे' या बोरिस साविन्कोवने अनेक वर्षापूर्वी उच्चारलेल्या शब्दांचा प्रतिध्वनी जणू काँग्रेसच्या त्या भव्य सभागृहात ग्रीस संबंधीच्या त्या विधेयकाच्या चर्चेच्या वेळी निनादत होता. 'जागतिक तेल उत्पादनाचे केंद्र कॅरिबियन आखाताकडून मध्यपूर्वेला पर्शियन आखाताच्या क्षेत्राकडे सरकत आहे' हे १९४४ च्या अहवालात अमेरिकेच्या गृहखात्याने केलेले भाष्य त्या दृष्टीने सूचक आहे.

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरच्या पर्वात मध्यपूर्वेत खनिज तेल उत्पादनाला भांडवल पुरवून त्यावर नियंत्रण प्रस्थापित करण्यात अमेरिकन कंपन्यांनी भरघोस यश मिळवले होते. 'सर्वाधिक खनिज तेल उत्पादनक्षमता असलेले सौदी अरेबिया हे मध्यपूर्वेतील राष्ट्र सर्वस्वी अमेरिकेच्या हातातील बाहुले असून ते मध्यपूर्वेतील अमेरिकन हितसंबंधांचा केंद्रबिंदू बनले आहे', अशी बातमी न्यू रिपब्लिकने २४ मार्च १९४७ रोजी त्यांच्या अंकात दिली होती. सौदी अरेबियाचा राजा इब्न सूद याच्याकडून अमेरिकन ऑईल कंपनीने सौदी अरेबियाच्या ४ लक्ष ४० हजार चौरस मैलाच्या प्रदेशातील खनिज तेलाचे अधिकार मिळवून घेतले होते. त्या प्रदेशात कमीत कमी वीस अब्ज बॅरेल खनिज तेलाचे साठे असावेत असा अंदाज होता. हा साठा संपूर्ण अमेरिकेतील ज्ञात खनिज तेल साठ्यापेक्षाही मोठा होता. १९४७ च्या वसतात, दाहरान येथील अमेरिकन तेल उत्पादन केंद्रातून दररोज २० हजार बॅरेल तेल निघत होते; व त्यावर राजा इब्न सूद याला रोजची ४०,००० डॉलर्सची रॉयल्टी मिळत होती. एप्रिल १९४७ मध्ये, तेथून भूमध्यसागराप्रर्यंत जाणारा ट्रान्सअरेबियन नळमार्ग तयार करण्याची १० कोटी डॉलर्सची कंत्राटे अरेबियन-अमेरिकन ऑईल कंपनीने दिली होती.

ग्रीस व टर्की या राष्ट्रांना द्यावयाच्या कर्जाला मंजूरी मागताना ट्रूमनने केलेल्या भाषणावर भाष्य करताना २४ मार्च १९४७ रोजी टाईम्स या नियतकालिकाने म्हटले होते--'त्या भाषणात (अध्यक्ष ट्रूमनच्या) मोठ्या आवेशाने उघड उल्लेख झाला तो ग्रीसचा व टर्कीचा. परंतु त्या पाठीमागे कुजबुज ऐकू येत होती ती तेथील खनिज तेलाच्या महासागरासंबंधीची!

ज्यावेळी अमेरिकन सरकार ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्वाच्या ठरणाऱ्या त्या कार्यवाहीबाबत निर्णय घेत होते, त्याचवेळी अमेरिकन तेल कंपन्यांच्या एका प्रभावी गटानेही एक ऐतिहासिक महत्वाचा निर्णय घेतला. अमेरिकन व ब्रिटिश सरकारांच्या मूक संमतीने त्या कंपन्यांनी त्या खनिज तेल साठ्याचे उत्खनन व उपयोग करून घेण्याकरिता अभूतपूर्व इतक्या मोठ्या प्रमाणावर एकामागून एक करार केले.

स्टँडर्ड ऑईल कंपनी या जगातील सर्वात मोठ्या तेल कंपनीकडे त्या गटाचे नेतृत्व होते; आणि त्या अती भव्य योजना तयार करण्यात सिंहाचा वाटा होता तो खनिज तेलाबाबत आंतर्राष्ट्रीय दृष्टीकोन ठेवणारा त्या कंपनीचा अध्यक्ष युजेन होलमन याचा. अत्यंत वादळी व अस्थिर राजकीय वातावरणाच्या त्या मध्यपूर्व क्षेत्रातून तेल उत्पादनाकरिता जेरेसी स्टँडर्ड व त्यांच्या भागीदार कंपन्या ३० कोटी डॉलर्सपेक्षाही अधिक भांडवल गुंतविणार होत्या. 'नवी लाकशाही! नवा व्यापार! जगात साम्यवादाला आवर घालण्याकरिता अमेरिकेने सुरू केलेला नवा उपक्रम म्हणजे लष्करी तळ, मदत व पुनर्रचना यांकरिता अमाप भांडवलाची गुंतवणूक! त्या मोबदल्यात परदेशांत अमेरिकेतील उद्योगांकरिता नव्याबाजारपेठा

निश्चितपणे उपलब्ध होणार' अशा मोठमोठ्या मथळ्यांसह २२ मार्चच्या 'बिझिनेस वीक' मध्ये लेख प्रसिद्ध झाले होते 'भांडवल गुंतवणुकीला पूर्वी कधीही नव्हे इतकी खात्रीपूर्वक संरक्षक हमी ट्रूमन सिद्धांताने दिली आहे. भांडवल गुंतवणूक करणाऱ्यांच्या दृष्टीने पिरिस्थिती मोठी सुरक्षित व किफायतशीर आहे, ही एक मोठी स्वागतार्ह गोष्ट आहे' असे भाष्य ट्रूमन सिद्धांताबाबत न्यूयॉर्क वर्ल्ड-टेलिग्रामचा वित्तसंपादक राल्फ हेंडरसन याने त्यावेळी केले होते.

## अमेरिकाः कोणत्या दिशेने?

ट्रूमन सिद्धांतावरील हेन्री वॅलेसची टीकात्मक स्पष्टोक्ती अमेरिकन वृत्तपत्रांनी दडपून टाकली. पण वॅलेस स्वस्थ बसला नाही. १९४७ मध्ये, एप्रिलच्या प्रारंभी, युरोपातील मोठमोठ्या शहरांतून या विषयावर भाषणे देऊन जनतेला जागरूक करण्याकरिता वॅलेस अमेरिकेहून निघाला. इंग्लंड, फ्रान्स व स्कँडिनेवियन राष्ट्रांत विशाल श्रोतृवृंदांसमोर बोलताना, ट्रूमन सिद्धांतात दडलेले गंभीर धोके वॅलेसने विशद करून सांगितले. 'ग्रीस व टर्कीला मदत करण्याची ट्रूमनची योजना म्हणजे जो कोणी हुकुमशहा साम्यवादविरोधाची घोषणा देत उभा ठाकेल त्याला मदत करण्याची अमेरिकेची बांधिलकीच आहे, त्याद्वारा, चीनपासून ते भूमध्यसागरापर्यंत, आणि उत्तर ध्रुवापर्यंत ते दक्षिण ध्रुवापर्यंत अत्यंत निर्दन अशा साम्राज्यवादाच्या मार्गावर अमेरिकेला आणून सोडण्यात येत आहे; अध्यक्ष म्हणून रूझवेल्टला निवडून देणारे अडीच कोटी अमेरिकन लोक अजूनही अमेरिकेत हयात आहेत, तेथे काम करीत आहेत; पण अमेरिकन सरकारचे नियंत्रण मात्र, संयुक्त राष्ट्रसंघ ही एक अगदी निरर्थक व नगण्य संस्था ठरणार असे मानणाऱ्या बेदरकार लोकांच्या हाती गेले आहे' असे सडेतोड विचार वॅलेसने युरोपीय जनतेपुढे मांडले.

एक देशद्रोही म्हणून वॅलेसची संभावना अमेरिकेत करण्यात आली. 'युरोपातील त्याच्या भाषणांवरून, त्याना त्याकरिता स्टालिनची पूर्वसंमती मिळाली होती हे स्पष्टच दिसते.' असा आरोप वॅलेसवर करण्यापर्यंत साऊथ कॅरोलिनाचा प्रतिनिधी एल्. मेंडेल रिव्हर्स या सारख्यांची मजल गेली. वॅलेसचा पासपोर्ट रद्द करून परदेशातील त्याच्या त्या भाषणांकरिता त्याला अटक करण्यात यावी व त्याच्यावर खटला गुदरण्यात यावा अशी मागणी १४ एप्रिल रोजी हाऊस ऑफ रिप्रेझेन्टेटिव्हच्या एका सदस्य गटाने केली. खाजगी व्यक्तींनी अमेरिकन नीतीबाबत परकीय सरकारांच्या अधिकाऱ्यांवर प्रभाव टाकण्यावर बंदी घालणाऱ्या १७९९ च्या लोगन कायद्यानुसार वॅलेसला अटक केली जाऊ शकते, असे 'हाऊस अन्. अमेरिकन ॲक्टिव्हिटीज' समितीचा अध्यक्ष जे. पार्नेल थॉमस याने सरकारच्या निदर्शनास आणून दिले; तर प्रतिनिधी जॉन. ई. रान्किन याने तर सभागृहापुढे लोगन कायदा वाचूनच दाखविला, व न्यायखात्याने वॅलेसविरुद्ध त्या कायद्याची ताबडतोब अंमलबजावणी करावी असे आवाहन केले. त्याच्या युरोप दौऱ्यावरील या प्रतिक्रियेवर भाष्य करताना वॅलेस म्हणाला, 'त्या सर्व वक्तव्यांच्या सुरावरून एक गोष्ट निश्चितपणे सिद्ध होते ती ही की आज जगात युद्धपरिस्थितीच अस्तित्वात आहे.' [जुलै १९५० मध्ये कोरियन युद्ध भडकले तेव्हा प्रतिक्रियावादी सिंग्मन ऱ्ही राजवटीला पाठिंबा देऊन मदत करण्याकरिता अमेरिकन फौजा पाठवून अमेरिकेने त्या युद्धात हस्तक्षेप करताच हेन्री वॅलेस याने प्रोग्रेसिव्ह पक्षाचा राजीनामा दिला. मात्र त्यानंतरच्या काही महिन्यांत, अमेरिकेत युद्धप्रक्षोभ व लोकशाहीविरोधी दडपशाही जसजशी वाढू लागली, तसतसा वॅलेस ट्रूमन प्रशासनाला अधिकाधिक व उघडपणे पाठिंबा देऊ लागला. मॅक्कारेन छलशिबिरांसंबंधीचे विधेयक सप्टेंबर १९५० मध्ये पारित झाले त्यावेळी वॅलेसने त्या विधेयकाला पाठिंबा व मान्यता दिली होती.]

अनुक्रमणिका

बोल्शेविझमविरुद्ध धर्मयुध्द चालविण्याच्या नावाखाली परकीय राष्ट्रांत प्रतिक्रियावादाला व फासिझमला ट्रूमन सिद्धांतामुळे जी मदत दिली जात होती त्याचे अपरिहार्य परिणाम खुद्द अमेरिकेतही दिसू लागले. वाढत्या युद्धक्षोभाबरोबर अभूतपूर्व अशी प्रतिक्रियावादी मोहीम नव्या जोमाने अमेरिकेत फोफावू लागली. पहिल्या महायुद्धकाळातील साम्यवादविरोधी मोहिमेबरोबर झालेल्या कुप्रसिद्ध पामर छाप्यांच्या काळातही आली नसेल अशी सरकारी गदा अमेरिकन नागरिकांच्या राजकीय, आर्थिक व नागरिक हक्कांवर येऊ लागली. दोनशे पेक्षाही अधिक कामगारविरोधी विधेयके अमेरिकेच्या कॉंग्रेसपुढे विचारार्थ ठेवली गेली. अमेरिकेतील अनेक राज्य सरकारांनीही त्यांच्या नागरिकांचे आर्थिक व राजकीय अधिकार सीमित करण्याकरिता कायदे पास केले. संपूर्ण राष्ट्रातील विद्यापीठांतून व महाविद्यालयांतून प्रागतिक विचाराच्या प्राध्यापकांचा व विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांच्याविरुद्ध दंडात्मक कार्यवाही सुरू झाली.' फेअर (एम्प्लॉयमेंट प्रॉक्टिसेस् कमिशन' गुंडाळून टाकण्यात आले, वॅग्नर कामगार कायदा असून नसल्यासारखा झाला. फ्रँकलिन डेलानो रूझवेल्टच्या नेतृत्वाखाली जे मोलाचे लोकशाही स्वरूपाचे लाभ अमेरिकन जनतेच्या पदरी पडले होते ते १९४७ च्या वसंतापर्यंत एकामागून एक नाहीसे होऊ लागले.

इतिहासाची पुनरावृत्ती होत होती. १९३० पासूनच्या शोकपर्यवसायी दशकात युरोपात घडले तसेच आता अमेरिकेत, साम्यवाद व बोल्शेविझम यांच्या आक्रमणापासून देशाचे रक्षण करण्याच्या नावाखाली लोकशाहीची पायमल्ली होत होती. १९४७ मध्ये अमेरिकेतील त्या सोविएतविरोधी आंदोलनात एक आघाडीची संस्था होती ती हाऊस कमिटी ऑन् अन्-अमेरिकन ॲक्टिव्हिटीज. डाईस कमिटीचा पूर्वीचा अध्यक्ष, प्रतिनिधी जे. पार्नेल थॉमस हा त्या कमिटीचा नामधारी अध्यक्ष होता. प्रत्यक्षात त्या कमिटीचे कामकाज चालत होते ते त्या कमिटीचा एक उत्साही व धडाडीचा सदस्य मिसिसिपीचा प्रतिनिधी जॉन ई. रान्किन याच्या देखरेखीखाली. त्या कमिटीची प्रस्थापनाच रान्किनच्या पुढाकाराने झाली होती. [१९४४ च्या शरदात ही कुप्रसिद्ध हाऊस अन्-अमेरिकन कमिटी अमेरिकेच्या राजकीय क्षेत्रातून नाहीशी होणार असे दिसत होते. कमिटीचे तीन सदस्य निवडणुकीत पराभूत झाले होते व आपण पुन्हा निवडणूक लढवणार नाही असे कमिटीचा अध्यक्ष डाईस याने जाहीर केले होते. कमिटीचा शेवट जणू दृष्टीपथात आला होता परंतु ७९ व्या कॉंग्रेसच्या पहिल्या सत्राच्या प्रारंभीच, ३ जानेवारी १९४५ रोजी अगदी अनपेक्षितपणे आवश्यक ती सर्व पूर्वतयारी गुप्तपणे करून, त्या कमिटीचे एका कायम संस्थेत रुपांतर करण्याची तरतूद करणारे विधेयक कॉंग्रेसपुढे ठेऊन त्यांनी २०७-१८६ मतांनी ते पारित करवून घेतले.] नाझींच्या 'वेल्ट डीन्स्ट' (जागतिक सेवा) या प्रचार संस्थेने 'एक मान्यवर अमेरिकन' असा त्याचा स्तुतिपर उल्लेख केला होता. दुसरे महायुद्ध म्हणजे ज्यूंच्या आंतरर्राष्ट्रीय कारस्थानाचाच एक भाग असून अमेरिकेचा खरा शत्रू प्रांरभापासूनच, ॲक्सिस राष्ट्रे नव्हे, तर सोविएत संघ होते असे मत खुद्द रान्किन उघडपणे प्रदर्शित करीत असे.

रान्किनच्या नेतृत्वाखाली हाऊस अन्-अमेरिकन ॲक्टिव्हिटीज कमिटीने युद्ध संपताच मोठ्या हिरीरीने सोविएतविरोधी प्रचार मोहीम सुरू केली. 'सोविएत साम्राज्यवाद' जगावर वर्चस्व प्रस्थापित करण्याची कारस्थाने करीत आहे, अमेरिकेवर आक्रमण करण्याच्या योजना लाल लष्कर आखीत आहे, क्रेमलिनच्या मार्गदर्शनाखाली घातपात करणाऱ्यांचे व अणुबॉंबसंबंधी हेरगिरी करणाऱ्यांचे जाळे संपूर्ण अमेरिकेत पसरले आहे, अशा धादांत खोट्या व विकृत स्वरूपाच्या बातम्या कमिटी वृत्तसंस्थांना पुरवीत होती. तशाच प्रकारचे 'अधिकृत' अहवाल प्रसिद्ध होत होते, व कमिटीचे सदस्य जाहीर व्याख्यानातून तेच

अनुक्रमणिका

सांगत होते. ट्रॉट्स्कीवादी, फासिस्ट, फुटीर साम्यवादी, व सोविएत संघाचे अन्य कट्टर शत्रू कमिटीपुढे तज्ज्ञ साक्षीदार म्हणून सोविएत संघाने अमेरिकेविरुद्ध चालविलेल्या युद्धसज्जतेबद्दल अंगावर शहारे आणणारी भयंकर व सर्वस्वी निराधार निवेदने उघडपणे करीत होते. [फेब्रुवारी १९४७ मध्ये एक साम्यवादी व नाझीविरोधक निर्वासित गेरहार्ट ऐस्लर यावर क्रेमलिनचा अमेरिकेतील प्रमुख हस्तक असल्याचा आरोप कमिटीने लादला व कमिटीच्या शिफारसीवरून फेडरल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशनने त्याला अटक केली. त्यावेळी ऐस्लरविरुद्धचे कमिटीचे प्रमुख साक्षीदार होते, युरोपातील ट्रॉट्स्कीवादी चळवळीत काम केलेली रूथ फिशर, फुटीर अमेरिकन साम्यवादी लुई बुडेन्झ, व पूर्वी कामगार हेर म्हणून काम केलेला विलियम नोवेल.]

२४ मार्च १९४७ रोजी पूर्वीचा कट्टर सोविएतविरोधी अमेरिकन मुत्सद्दी विलियम सी. बुलिट याने काँग्रेसपुढे येणाऱ्या विधेयकांवर विचारविनिमय करण्यासाठी नेमलेल्या काँग्रेसच्या उपसमितीसमोर साक्ष देताना, अमेरिकन साम्यवादी पक्ष बेकायदेशीर ठरविण्यात यावा अशी जोरदार शिफारस केली. [अमेरिकेतील साम्यवादविरोधी मोहीम, अमेरिकन फासिस्ट आपली दुष्ट उद्दिष्टे साध्य करून घेण्याकरिता हेतुपुरस्सर भडकवीत आहेत असा स्पष्ट इशारा 'ब्रदर हुड ऑफ रेलरोड ट्रेनमेन' चा अध्यक्ष ए.एफ्. व्हिटने याने मे १९४७ मध्ये दिला होता. साम्यवादावर चर्चा करण्यात जर फासिस्ट जनतेला गुंतवून ठेऊ शकेल तर लोकशाही चिरडून टाकण्याची संधी त्यांना अनायासेच प्राप्त होईल. भरमसाट भाववाढ, कामगारविरोधी कायदे, राहत्या घरांची टंचाई, बेसुमार नफेबाजी, घसरणारी क्रयशक्ती अशी अनेक गर्हणीय गोष्टींना जबाबदार असणाऱ्या अमेरिकन फासिझमचा नायनाट करण्याकरिता, राष्ट्रीय स्तरावर आपण प्रचाराच्या व प्रयत्नांच्या तोफा डागल्या पाहिजेत; असे स्पष्ट आवाहन व्हिटनेने त्यांच्या युनियनच्या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या एका लेखात केले होते.]

यावेळी रान्किनने विचारलेले प्रश्न व उत्तर म्हणून बुलिटने दिलेली साक्ष लक्षणीय आहे. एक लहानसा नमुना असा——

रान्किन : तिकडे रशियात ते मानवी मांस खातात हे खरे आहे काय?

वुलिट : मातापित्यांनी मांस खाल्ल्यानंतर, एका मुलाच्या उरलेल्या सांगाड्याचे चित्र मी पाहिले आहे खरे!

रान्किन : रशियातील सर्व लोक गुलामच आहेत म्हणायचे?

बुलिट : होय! जगात कधी कुठे नसतील इतके गुलाम आज रशियात आहेत.

रान्किन : येथील (अमेरिकेतील) साम्यवादी पक्षाच्या सदस्यांपैकी कमीत कमी ६० टक्के सदस्य परकीय आहेत असे तुम्ही पूर्वी म्हणालात. आता हे सांगा की त्या परकीय सदस्यांत किती टक्के ज्यू आहेत? दक्षिणेकडील राज्यांत जाऊन साम्यवाद्यांनी तेथील निवडक निग्रोंना क्रांतीचा अभ्यास करण्याकरिता मास्कोला पाठविले हे खरे आहे काय? इमारती, पूल, वगैरे उडवून देण्याचे प्रशिक्षण ते निग्रोंना देतात याची तुम्हाला कल्पना आहे काय?

अनुक्रमणिका

आपल्या साक्षीत बुलिटने ट्रूमन सिद्धांताचे मनापासून समर्थन केले. 'रशियाजवळ जर अणुबॉंब असता तर त्यांनी तो केव्हाच अमेरिकेवर टाकला असता,' असे त्याने ठासून सांगितले. जग जिंकण्याच्या व अमेरिकेवर हल्ला करण्याच्या सोविएत योजनांबद्दल बोलताना बुलिटने अगदी निश्चयपूर्वक सांगितले की 'अणुबॉंब टाकण्यास स्टालिन मुळीच मागेपुढे पाहणार नाही; तसे करण्यापासून आपल्याला त्याला अडवावेच लागेल.'

कमिटीपुढे साक्ष देताना पेन्सिलवानियाचा माजी गव्हर्नर जॉर्ज एच्. अर्ल याने रशियालाही लवकरच अणुबॉंबचे गुपीत गवसेल अशी भीती प्रदर्शित केली, व त्यानंतरच्या ५ वर्षात अमेरिकनांपैकी १० टक्के लोकही बहुधा जिवंत राहणार नाहीत असा इशारा त्याने दिला. अमेरिकेतील सर्व वृत्तपत्रात अशा विखारी व निराधार प्रचाराला हाऊस अन्-अमेरिकन ॲक्टिव्हिटीज कमिटी भरपूर प्रसिद्धी देत होती. याशिवाय १ जानेवारी १९४७ रोजी न्यूयॉर्क टाईम्सने दिलेल्या वृत्तानुसार, निरनिराळे उद्योगधंदे, कामगार संघटना, शिक्षण, चित्रपट व्यवसाय अशा अनेक क्षेत्रात साम्यवादी करीत असलेल्या कारवायांचा शोध घेऊन त्यांची चौकशी करणे, एवढेच नव्हे तर फेडरल सरकारातील साम्यवादी व साम्यवाद्यांप्रती सहानुभूती बाळगून असलेली मंडळी हुडकून काढून त्यांच्या कारवाया उघडकीस आणणे हा एक मोठ्या प्रमाणावरील कार्यक्रम कमिटीने हाती घेतला होता. कमिटीने चालविलेल्या या सर्व निंद्य कारवायांना ('गलिच्छ प्रकार' अशा शब्दात त्या कारवायांचा उल्लेख अध्यक्ष रूझवेल्टने केला होता) अमेरिकेच्या कार्यकारी प्रमुखाची अधिकृत संमती होती हे विशेष!

२२ मार्च १९४७ रोजी अध्यक्ष ट्रूमन याने 'निष्ठाहीन' सरकारी कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यासाठी एक आदेश जारी केला. असोसिएटेड प्रेसच्या वृत्तानुसार सरकारी सेवेतील २२ लक्ष लोक त्या कायद्याच्या कक्षेत मोडत होते; व अध्यक्षापासून ते लहानशा गावातील पोस्टाच्या कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वांनाच तो कायदा लागू होत होता. या कायद्यानुसार सरकारी सेवेतील कर्मचाऱ्यांची चौकशी करण्याच्या दृष्टीने भरवशाच्या अशा संस्थांचा निर्देश सरकारी आदेशात करण्यात आला होता. त्या संस्थांपैकी एक होती हाऊस कमिटी ऑन अन्-अमेरिकन ॲक्टिव्हिटीज!

अमेरिकन लोकांना युद्ध मुळीच नको होते. परंतु तिसरे महायुद्ध अपरिहार्य असून ते लवकरच सुरू होणार अशी जबरदस्त धास्ती १९४७ च्या वसंतात लक्षावधी अमेरिकनांना वाटत होती. आकाशवाणीच्या अमेरिकन टाऊन हॉल मीटिंगमध्ये तेथील हजारो श्रोत्यांना जेव्हा विचारले गेले की 'आपले परराष्ट्र धोरण आपल्याला शांततेकडे नेत आहे की युद्धाकडे?' तेव्हा ७० टक्के श्रोत्यांनी अमेरिकेचे परराष्ट्र धोरण राष्ट्राला युद्धाकडे नेत असल्याचा निर्वाळा दिला.

अर्थात् अलीकडील युद्धातील धोके व त्याचे परिणाम यांच्या बदलत्या स्वरूपाची जाणीव प्रत्येकाला होती. अणुयुद्धाच्या भयानक संहारक शक्तीपासून कोणीही सुरक्षित राहू शकणार नाही हे उघडच होते. जागतिक अणुयुद्ध झाले तर जगातील दोन तृतियांश लोक नष्ट होतील असा अंदाज अल्बर्ट आईन्स्टीन याने व्यक्त केला होता; तर अमेरिकेच्या २०० शहरांवर जर प्रत्येकी तीन अणुबॉंब टाकले गेले

तर १४ ते १७ दशलक्ष लोक मृत्युमुखी पडतील व सुमारे १४ दशलक्ष भयानक प्रकारे जखमी होतील असे अन्स्ले जे. कोल याने आपल्या 'द प्रॉब्लेम ऑफ रिड्यूसिंग डव्हल्नरेबिलिटी टू ॲटमिक बॉम्ब्स्' या आपल्या पुस्तकात म्हटले होते.

प्रत्येकाच्या मनात एकच प्रश्न होता—शांतता कशी टिकवता येईल? अध्यक्षपदासाठी निवडणुकीला उभा असलेला रिपब्लिकन पक्षाचा उमेदवार हेरॉल्ड ई. स्टासेन याने मास्कोत क्रेनलिनमध्ये प्रधानमंत्री जोसेफ स्टालिनची ९ एप्रिल १९४७ रोजी भेट घेतली. 'आजच्या जगात दोन निरनिराळ्या आर्थिक पद्धतींचे सुसंवादी सहजीवन शक्य आहे असे आपल्याला वाटते काय?' हा अमेरिकन लोकांच्या मनाला अस्वस्थ करून सोडणारा कूट प्रश्न त्याने स्टालिनला विचारला.

'निश्चितच ते शक्य आहे!' स्टालिनने निःसंदिग्धपणे उत्तर दिले. 'युद्धकाळात जर त्यांच्यात सहकार्य नांदू शकले तर शांततेच्या काळात ते का शक्य होऊ नये? पण अर्थात् तशा सहकार्याची मनापासून इच्छा मात्र असली पाहिजे. सहकार्याची शक्यता नेहमीच असते. पण त्याकरिता इच्छा नेहमी असतेच असे नाही. एका पक्षाची जर सहकार्याची तयारीच नसेल तर त्याची परिणती संघर्ष व युद्ध यातच होणार..! पण माझ्याकडून मला एक गोष्ट निःसंदिग्धपणे स्पष्ट करावीशी वाटते ती ही की रशियाला सहकार्य हवे आहे.

'आपण परस्परांच्या पद्धतींवर टीका करू नये. कोणती पद्धती स्वीकारायची ते ठरविण्याचा प्रत्येकाला हक्क आहे. त्यापैकी अधिक उपयुक्त व लाभदायक कोणती हे तर शेवटी इतिहासच ठरवील. पण सहकार्य करण्याकरिता दोन्ही पद्धती सारख्याच असल्या पाहिजेत हे आवश्यक नाही. जर कोणत्याही राष्ट्रातील लोकांनी कोणतीही एक पद्धती उपकारक म्हणून मान्य केली असेल तर त्या पद्धतीचा आपण सन्मान राखला पाहिजे. असे झाले तरच सहकार्य शक्य होईल. युद्धकाळातील समस्यांवर चर्चा करण्याकरिता आम्ही व रूझवेल्ट जेव्हा एकमेकांना भेटलो त्यावेळी आम्ही एकमेकांना दूषणे देत बसलो नाही. आम्ही आमच्यात सहकार्य प्रस्थापित केले. म्हणूनच शत्रूला नामोहरम करण्यात आम्ही अखेरीस यशस्वी झालो.'

'स्टालिन असे बोलत असता त्याच्याकडे पाहून माझ्या मनात अगदी स्वाभाविकपणे विचार आला की जगाला धोकादायक ठरणारा एक भयंकर राक्षस म्हणून ज्याच्याबद्दल बोलले जाते तो माणूस हाच आहे हे शक्य तरी आहे काय? नाही! यावर विश्वास ठेवणे अशक्य आहे.' युरोपच्या दौऱ्यावर स्टासेनबरोबर असलेला फिलाडेल्फियाचा माजी रिपब्लिकन अध्यक्ष जय कुक याने स्टालिनच्या त्या भेटीनंतर म्हटले, 'मी रशियाहून परत आलो ते मनाशी एक पक्का विश्वास बाळगून—की जोसेफ स्टालिन व रशियन जनता अमेरिकेशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्यास उत्सुक आहेत. जगात शांतता टिकावी याचे महत्त्व त्यांनी पुरेपूर ओळखले आहे.'

या ग्रंथाचे हस्तलिखित छपाईकरिता तयार होत आले त्यावेळी, ज्याच्या साहसी कारवायांच्या कथांपासून या ग्रंथाच्या निवेदनाला सुरुवात झाली त्या कर्नल रेमंड रॉबिन्सची मुलाखत लेखकांनी घेतली.

काही वर्षापूर्वी सार्वजनिक जीवनातून निवृत्त होऊन फ्लोरिडात त्याच्या २००० एकराच्या 'चिनेस्गट हिल' या इस्टेटीवर (हे संपूर्ण क्षेत्र अभयारण्य प कृषिसंशोधन याकरिता त्याने अमेरिकन सरकारला दिले आहे) कर्नल रेमंड रॉबिन्स शांतपणे राहात होता. इतक्या वर्षानंतरही त्याच्या मनाचा मोकळपणा, सामान्य माणसाच्या कल्याणाबद्दलची त्याची तळमळ, पूर्वग्रह व लोभी मनोवृत्ती याबद्दल त्याला असलेली चीड व क्रांतीच्या होमकुंडातून नव्याने जन्माला आलेल्या राष्ट्राबद्दल त्याला वाटणारे कुतुहूल व त्या देशाबद्दल सर्व काही जाणून घेण्याबद्दलची उत्सुकता ह्या सर्व गोष्टी तशाच कायम होत्या.

त्या मुलाखतीत सोविएत संघाबद्दल रॉबिन्सने केलेले विधान नमूद करण्याइतके महत्वाचे आहे. तो म्हणाला, 'लेनिन व सोविएत क्रांतीचे अन्य नेते यांच्या आवाहनाला प्रतिसाद देणाऱ्या रशियन कामगारांच्या व शेतकऱ्यांच्या डोळ्यात, शतकानुशतकांचा जुलुम, अत्याचार व दडपशाही यातून मुक्तता व स्वातंत्र्य मिळण्याच्या आशेचा किरण जेव्हा मी पाहिल्या तेव्हा तो माझ्या जीवनातील सुवर्ण क्षण आहे असे मला वाटले.'

'सोविएत रशियाला नेहमीच आंतर्राष्ट्रीय शांतता अगत्याची वाटली आहे. युद्ध झाले तर त्यांचा अंतर्गत प्रगतीचा सर्व कार्यक्रम, अगदी नष्ट झाला नाही तरी, अवरुद्ध होईल हे लेनिन ओळखून होता. रशियन जनतेलाही शांतताच हवी आहे. शिक्षण, उत्पादन यांना चालना देणे व त्यांच्या विशाल व समृद्ध राष्ट्राच्या साधनसामुग्रीचा उपयोग करून घेऊन प्रगती साधणे यावर त्यांचे विचार, त्यांची क्षमता व आशा केंद्रित झाल्या आहेत. आपल्या काळातील सर्वश्रेष्ठ असा परराष्ट्र मंत्री मॅक्झिम लिटविनोव याने मोठ्या सातत्याने व कौशल्याने सामूहिक सुरक्षिततेकरिता सर्वतोपरी प्रयत्न केले. परंतु इंग्लंड व फ्रांन्स या राष्ट्रांनी मुसोलिनी व हिटलरप्रती चालविलेल्या अनुनयाच्या धोरणामुळे सामूहिक सुरक्षेचे सर्व प्रयत्न विफल ठरले.

'सोविएत रशिया कोणत्याही वसाहतींचे शोषण करीत नाही. त्यांना तसे काही करण्याची इच्छा व गरजही नाही. परराष्ट्र व्यापाराकरिता व्यापार संघ स्थापून ते राप्ट्र कोणाचीही पिळवणूक करीत नाही. स्टालिनच्या धोरणामुळे सोविएत राष्ट्रातील सर्व वांशिक, धार्मिक, राष्ट्रिक व वर्ग कलह नाहीसे झालेले आहेत. सोविएत जनतेचे हे ऐक्य, सामंजस्य व सुसंवाद आंतर्राष्ट्रीय शांततेला निश्चितच उपकारक ठरणारे आहे.'

# संदर्भ ग्रंथ—सूची

या ग्रंथाच्या लेखनाला, अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याचे अधिकृत अहवाल, निरनिराळ्या अमेरिकन काँग्रेस उपसमित्यांसमोर झालेले साक्षी पुरावे व त्यांचे प्रकाशित अहवाल, ग्रेट ब्रिटनच्या सरकारने प्रकाशित केलेली अधिकृत कागदपत्रे, आणि क्रांतीकाळापासून सोविएत रशियात घातपात, हेरगिरी व देशद्रोह यांच्या झालेल्या खटल्यांचा सुनावणीचे सोविएत सरकारने प्रसिद्ध केलेले शब्दशः अहवाल ही सर्व मूळ साधनसामुग्री फार मोठ्या प्रमाणावर आधारभूत ठरली आहे.

ग्रंथात निर्देश करण्यात आलेल्या प्रमुख व्यक्तींची प्रकाशित स्मृतिचित्रेही, या ग्रंथाच्या लेखनाला उपयुक्त ठरली. या ग्रंथातील जवळजवळ सर्वच संभाषणे, ती स्मृतिचित्रे, अधिकृत अहवाल व अन्य मूळ कागदपत्रे यातून घेतलेली आहेत. न्यूयॉर्क टाईम्स, दी रीडर्स गाईड टु पिरियॉडिकल लिटरेचर, व इंटरनॅशनल इंडेक्स टु पिरियॉडिकल्स, यांच्या सूचीही आधारभूत साधने म्हणून महत्वाच्या ठरल्या.

या ग्रंथाच्या लेखनाला विशेष उपयुक्त ठरलेल्या संदर्भ ग्रंथाची सूची——

**प्रकरण १ व २**

रेमंड रॉबिन्सच्या कामगिरीचा वृत्तांत, १९१९ मध्ये ओवरमन कमिटीपुढे स्वतः रॉबिन्सने दिलेल्या साक्षीवरून प्रामुख्याने घेतलेला आहे. German and Bolshevik Propaganda; Report and Hearings of the Subcommittee of the Judiciary of the United States Senate, 65th Congress, Vol. □ (Washington, Government Printing Office, 1919); Raymond Robin's Own Story by William Hard (New York, Harper and Brothers1920), या ग्रंथात रॉबिन्सच्या साक्षीचा वृत्तांत दिलेला आहे. कर्नल विलियम थॉम्पसन, अलेक्झांडर केरेन्स्की, मेजर जनरल अल्फ्रेड नॉक्स, लेनिन अशा सर्व व्यक्ती व रेमंड रॉबिन्स यांच्यातील संभाषणे खुद्द रॉबिन्सने लिहून ठेवलेल्या वर्णनावरून घेतली आहेत.

सिनेटच्या उपसमितीपुढे रॉबिन्सने दिलेली साक्ष म्हणजे बोल्शेविक क्रांतिकाळाचे प्रत्यक्षदर्शी चित्र उभे करणारे बहुमोलाचे साधन आहे. त्या काळाची ऐतिहासिक पार्श्वभूमी व कारस्थाने याकरिता प्रामुख्याने पुढील साधनग्रंथांचा आधार घेतलेला आहे——

1. Papers Relating to the Foreign Relations of the United States, 1918, Russia Vols. □, □ and □(Washington Government Printing Office, 1931)
2. Ten Days That Shook the World : John Reed (New York, Bonir and Liveright Inc.

अनुक्रमणिका

1919)
3. The History of the Communist Party of the Soviet Union, ed. by a Commission of theCentral Committee of the C.P.S.U.(New York, International Publishers 1939);
4. The Soviets : Albert Rhys Williams (New York, Harcourt, Brace and Company 1937)
5. The Bolshevik Revolution 1917-1918 Documents and Materials : James Bunyan and H.H. Fisher (Stanford University, California 1933)
6. Vladimir I. Lenin. A Political Biography : Prepared by Marx-Engels-Lenin Institute (New York, International Publishers 1943)
7. Lenin, V.I. Ulyanov : (Ogiz, State Publishing House of Political Literature, 1939)
8. American Policy towards Russia Since 1917 : Fredrick L. Schuman. (International Publishers, 1938)

राजदूत डेव्हिड फ्रान्सिसने प्रतिक्रांतिकारकांशी केलेली हातमिळवणी व त्या काळाच्या कारस्थानातील त्याचा सहभाग या संबंधीची माहिती परराष्ट्र खात्याला त्याने पाठविलेल्या गोपनीय अहवालावरून, व "Russia From the American Embassy, April 1916-November 1918 (New York, Charles Scribner's Sons, 1931)या त्याच्या आत्मचरित्रात्मक ग्रंथावरून घेतलेली आहे त्याने परराष्ट्र खात्याला पाठविलेले अहवाल नंतर, Papers Relating to the Foreign Relations of the United States, 1918, Russia; यांत प्रकाशित झाले होते.

याशिवाय त्याकाळच्या कटकारस्थानांची माहिती देणारे मोलाचे आधारभूत ग्रंथ म्हणजे—

1. The Fourth Seal: Sir Samuel Hoare. (London, W. Heinemann Ltd. 1930)
2. The Catastrophe and the Crucifixion of Liberty : Alexander Kerensky (New York, John Day, 1934)
3. Memories of a Terrorist : Boris Viktorovich Savinkov (New York, A.C. Boni, 1931)

ब्रेस्त लितोवस्क कराराच्या वेळी ट्रॉट्स्की व डावे विरोधक यांनी केलेल्या कारवायांकरिता आधारभूत ठरलेले ग्रंथ म्हणजे—

1. The Forgotten Peace, Brest-Litovsk, March 1918 : John Wheeler-Bennett, (New York, Morrow, 1939)
2. British Agent : Bruce Lockhart (New York, Garden Publishing Company, 1933)
3. The Socialist Republic of Russia : Captain Jacques Sadoul (London, People's Russian Information Bureau, 1918)

अनुक्रमणिका

4. The German-Bolshevik Conspiracy (U.S. Public Information Committee, Washington, Government Printing Office, 1918)
5. The History of the Russian Revolution : Leon Trotsky. Translated by Max Eastman, (New York, Simon and Schuster, 1932)

### प्रकरण ३

कॅप्टन सिडने रॅली याच्या चित्तथरारक कारवायांकरिता खुद्द रॅलीने लिहिलेला Britain's Master Spy, Sidney Reilley's Narrative Written by Himself, edited and Compiled by His Wife, (New York, Harper and Brothers, 1933) हा ग्रंथ म्हणजे एक अत्यंत बहुमोलाचे साधन आहे. याशिवाय रॅलीचे व्यक्तिमत्व व त्याच्या कारवाया यासंबंधी—

1. Secrets of Espionage : Winfried Ludecke (New York, J.B. Lippincott Company 1929);
2. Terror in Our Time : Richard Wilmer Rowan (New York, Longmans Green and Company, 1941)
3. British Agent : Bruce Lockhart (New York, Garden City Publishing Company Inc. 1933)
4. Go Spy the Land, Being the, Adventures of J.K. 8 of the British Secret Service : George Hill (London, Cassel and Company Ltd. 1932)
5. Dreadful Hour : George Hill (London, Cassel and Company Ltd. 1936)

हे ग्रंथ मोलाची माहिती देतात. या प्रकरणातील संभाषणे खुद्द रॅलीच्या निवेदनातून घेतलेली आहेत.

### प्रकरण ४

सैबेरियातील अमेरिकन मोहिमेसंबंधी माहिती देणारा महत्वाचा आधारभूत ग्रंथ म्हणजे जनरल विलियम एस्. ग्रेव्हज् याने लिहिलेले—American Siberian Adventure, 1918-1920. (New York, Jonathan Cape and Harrison Smith, 1931). माजी युद्धमंत्री न्यूटन डी. बेकर याने ग्रेव्हज् च्या ग्रंथाला लिहिलेली प्रस्तावनाही या विषयाच्या माहितीच्या दृष्टीने उल्लेखनीय आहे. Papers Relating to the Foreign Relations of the United States, (Russia); Lansing Papers, 1914-1920, 2 Vols; Russia from the American Embassy, April 1916-November 1918; The White Armies of Russia : George Stewart (New York, Macmillan Company, 1933) हे ग्रंथ ग्रेव्हज्ने दिलेल्या वृत्तांताला पूरक ठरणारे आहेत.

अनुक्रमणिका

## प्रकरण ५

व्हर्साय कराराच्या काळात युरोप व अमेरिका यांतील जनसामान्यांची मनःस्थिती व भावना याबद्दल अचूक माहिती समकालीन नियतकालिकांतून व वृत्तपत्रांतून उपलब्ध झाली. त्या दृष्टीने न्यूयॉर्क टाईम्स, द नेशन, द न्यू रिपब्लिक व द लिटररी डायजेस्ट या नियतकालिकांचा व वृत्तपत्रांचा उपयोग लेखकांनी करून घेतला तत्कालिन घटनांकरिता अन्य महत्वाची साधने म्हणजे—

1. A test of the News : Walter Lippmann's and Charles Merz's supplement to August 4, 1920 issue of New Republic.
2. World Panorama, 1918-1935 : George Selders (New York, Blue Ribbon Books, Inc. 1935)
3. Victory Without Peace : Roger Burlingham and Alden Stevens (New York, Harcourt, Brace and Company, 1944)
4. The American Black Chamber : Herbert O. Yardley (New York, Blue Ribbon Books, Inc. 1931, Published in England under the title of Secret Service in America, Farber and Farber Ltd. 1931)

पॅरिस शांतता परिषदेतील चर्चेकरिता आधारभूत ठरलेला ग्रंथ म्हणजे–– Papers Relating to the Foreign Relations of the United States : The Paris Peace Conference 1919, Vols. □ and □; तर चर्चिलने शांतता कराराच्या संदर्भात बजावलेल्या भूमिकेबाबत रेने क्राऊस याने लिहिलेले चर्चिलचे चरित्र Winston Churchill (New York, J.B. Lippincott Company 1940) हा ग्रंथ विशेष उपयुक्त ठरला.

## प्रकरण ६

सोविएत रशियातील परकीय हस्तक्षेपाच्या युद्धाबाबत तपशीलासह माहिती देणारी पुष्कळ अस्सल साधनसामुग्री उपलब्ध आहे. आधारभूत साधने म्हणून लेखकांनी या विषयाकरिता पुढील ग्रंथांचा प्रामुख्याने उपयोग करून घेतला––

1. Armed intervention in Russia, 1918–22 : William Payton Coates and C.Z. Coates (London Victor Gollancz, Ltd. 1935)
2. The White Armies in Russia : George Stewart.
3. Russia's Fighting Forces : Captain Sergei N. Kournakoff (New York International Publishers, 1942)

अनुक्रमणिका

4. History of the Civil War in the U.S.S.R. : Edited by Gorky, Molotov, Voroshilov and others (London, Lawrence and Wishart Ltd. 1937)
5. The Intervention in Siberia : V. Parvenov (New York, Workers Library Publishers, 1939)
6. Historyof the Communist Party of the Soviet Union (New York International Publishers, 1939)
7. The World Crisis : The Aftermath : Winston S. Churchill (New York, Doubleday, Page and Company, 1922)
8. Papers Relating to the Foreign Relations of the United States, 1918, Russia, Vols. □, □ and □.

या परकीय हस्तक्षेप युद्धकाळाबद्दल काही व्यक्तींनी लिहून ठेवलेल्या हकीकतीही तत्कालीन घटनांबद्दल मोलाची माहिती देतात. त्याकरिता उपयोग करून घेण्यात आलेले खास ग्रंथ——

1. Fighting Without a War : An Account of Military Intervention in Northern Russia : Ralph Albertson (New York, Harcourt, Brace and Howe 1920)
2. Archangel : The American War With Russia, by a Chronicler : John C.Cudahy (Chicago, S. C. Maclure Company 1924)
3. Red Dusk and the Morrow : Sir Paul Dukes (New York, Doubleday, Page and Company 1922)
4. Russia from the American Embassy, April 1916— November 1918 : David Fracis
5. American Siberian Adventure, 1918— 1920 : William S. Graves.
6. Bloody Baron, The Story of Baron Roman Von Ungern Sternberg : (New York Random House, 1936)

### प्रकरण ७

झारकालीन रशियात हर्बर्ट हूवर याने केलेली भांडवल-गुंतवणूक व अन्नधान्य मदतप्रशासक म्हणून त्याने केलेल्या सोविएतविरोधी कारवाया याकरिता —

1. The Great Mistake :John Knox (Washington D.C. National Foundation Press Inc. 1936);
2. The Rise of Herbert Hoover : Walter Ligget (New York, the H. U. Fly Company 1932);

3. The Strange Career of Herbert Hoover Under Two Flags : John Hamill (New York, William Faro, Inc, 1931)

या हर्बर्ट हूवरवर लिहिलेल्या तीन चरित्रात्मक ग्रंथांचा लेखकांना फार उपयोग झाला. या शिवाय झारकालीन रशियातील परकीय भांडवल गुंतवणुकीबद्दल माहिती 'Soviet Russia' या 'रशियन सोविएत गव्हर्न्मेंट ब्यूरो' च्या मुखपत्राच्या १३ नोव्हेंबर १९२० च्या अंकात मिळते. कर्नल मलोनच्या The Russian Republic (New York, Harcourt, Brace and Howe, 1920) या ग्रंथातही त्या विषयावर उपयुक्त माहिती मिळते.

**प्रकरण ८**

युद्धोत्तर जगात त्याकाळी दाटून राहिलेली अनिश्चितता, अस्वस्था व असुरक्षितता यांचे जिवंत चित्र World Panorama 1918—1935 (New York Blue Ribbon Books : INC 1935) या शीर्षकाखाली जॉर्ज सेल्डेस याने संकलित करून प्रसिद्ध केलेल्या वृत्तपत्र-कात्रणांतून उभे राहते. शिवाय समकालीन वृत्तपत्रे व नियतकालिके यांचा उपयोग लेखकांनी केला आहेच. सोविएत रशियातून पराभूत श्वेत फौजांच्या बहिर्गमनाबद्दलची मोठी रोमांचकारी माहिती जॉर्ज स्टेवर्टच्या The White Armies of Russia (New York, The Macmillan Company, 1933) या ग्रंथात व रँगल, डेनिकिन, क्रास्नोव अशा श्वेत नेत्यांच्या स्मृति-ग्रंथातून मिळते. तोर्गप्रोमची स्थापना व स्वरूप याबद्दल तपशीलवार माहिती Wreckers on Trial, A Record of the Trial of the Industrial Party, held in Moscow, November, December 1930 (New York, Worker's Library Publishers 1931) या ग्रंथातून उपलब्ध होते.

नाझींची सैद्धांतिक भूमिका व अल्फ्रेड रोझेनबर्ग व त्याचे श्वेत रशियन सहकारी यांचे तत्संबंधीचे कार्य याबद्दलची रोचक व संपूर्ण माहिती कॉनरॅड हाईडेनच्या Der Fuehrer (Boston, Houghton Mifflin Company 1944) या ग्रंथात सापडते. शिवाय हाईडेनचे A History of National Socialism (New York, Alfred A Knopf 1935), व अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याने प्रकाशित केलेले National Socialism (Washington Government Printing Office 1943) हे ग्रंथही त्या विषयाकरिता उपयुक्त ठरले.

श्वेत रशियन्स व जर्मन साम्राज्यवादी यांच्या कारस्थानांत मॅक्स हॉफमन याने बजावलेली भूमिका व त्या कारस्थानांची नाझीझमच्या विजयात झालेली परिणती याची माहिती अर्न्ट हेन्री याने Hitler Over Russia (New York, Simon and Schuster, 1936) या आपल्या ग्रंथात मोठ्या कौशल्याने ग्रंथित केली आहे. याशिवाय त्या कारस्थानांकरिता पुढील ग्रंथ अत्यंत उपयुक्त ठरले——

1. The War of Opportunities : Max Hoffmann (New York, International Publishers, 1925)
2. War Diaries and other Papers (London, M. Lecker 1929):

3. The Diary of an Ambassador: Versailles to Rapollo, 1920–1922 (New York, Doubleday, Doran and Company 1929).

## प्रकरण ९

कॅप्टन सिडने रॅली व त्याची पत्नी यांच्या संबंधीची बरीचशी माहिती व या प्रकरणातील संभाषणे व पत्रे ही मिसेस रॅलीच्या स्मृतिचित्रातून घेतली आहेत (Britain's Master Spy चा दुसरा भाग). बोरिस सोविन्कोव याचे व्यक्तिमत्व व कारवाया याकरिता प्रामुख्याने आधारभूत ठरलेला ग्रंथ म्हणजे साविन्कोवचा Memoirs of a Terrorist (New York, A.C. Boni 1931) हा ग्रंथ, याशिवाय बोरिस निकोलाजेवस्कीचे Assef the Spy (New York, Doubleday, Doran and Company 1934); व Great Contemporaries (New York, G.P. Putnam's Sons 1937) या ग्रंथात विन्स्टन चर्चिल याने उभे केलेले जिवंत शब्दचित्र उपयुक्त ठरले.

आंतर्राष्ट्रीय खनिज तेल उद्योगाने या काळात सोविएत सरकारविरुद्ध गुप्तपणे चालविलेल्या युद्धाचा वृत्तांत ग्लिन रॉबर्टस्‌च्या The Most powerful Man in the World (New York, Covici, Friede 1938) या सर हेन्री डेटरडिंगच्या चरित्रात सापडतो. याशिवाय खनिज तेल उद्योगपतींच्या सोविएत रशियाप्रती भूमिकेबाबत मोलाची माहिती फ्रान्सिस डेलायसी याचे Oil: Its Influence on Politics (London, Labour Publishing Company 1922); आर्. पेज आरनॉट याचे The Politics of Oil (London Labour Publishing Company, 1924) या ग्रंथात, व टाईम्स्, मॉर्निंग पोस्ट, डेली मेल व न्यूयॉर्क टाईम्स या वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेल्या अहवालात मिळते.

याशिवाय, तेल उद्योगपतींच्या कारस्थानांकरिता जॉर्ज हिल याचे Dreadful Hour (London, Cassel and Company Ltd. 1936), कॉकेशसमधील नोई जोर्डेनियाचा उठाव व कारस्थानी मंडळींच्या गुप्त पत्रव्यवहारातील उतारे (हा पत्रव्यवहार नंतर सोविएत अधिकाऱ्यांच्या हाती पडला.) याकरिता International Press Correspondence Vol. 4 No. 72; तर बोरिस साविन्कोव याचा खटला व त्याची खळबळजनक जबानी याकरिता ११ सप्टेंबर १९२४ चा International Press Correspondence (Vol.4 No. 65) चा अंक, आधारभूत ठरेल.

## प्रकरण १०

कॅप्टन सिडने रॅलीची अमेरिकेतील सोविएतविरोधी कामगिरी व रशियातील त्याची अखेरची गुप्त कार्यवाही या संबंधीची माहीती Britain's Master Spy Sidney Reilley's Narrative Written by Himself, Edited and Compiled by his Wife यातून घेतली आहे. १९२०–२२ या काळातील हेन्री फोर्ड याच्या ज्यूविरोधी व लोकशाहीविरोधी कारवायांबद्दल माहिती जून-नोव्हेंबर1922 या काळात Hearst International च्या अंकात The Inside Story of Henry Ford's Jew Mania या शीर्षकाखाली नॉर्मन

हॅपगुड याने प्रसिद्ध केलेल्या लेखमालेतून मिळते. हेन्री फोर्डच्या Dearborn Independent च्या फाईल्सही ज्यूविरोधी व लोकशाही विरोधी प्रचाराने भरलेल्या आहेत.

नॉर्मन हॅपगुडच्या Hearst International मधील लेखांत बोरिस ब्रासोलच्या कारस्थानांबद्दलही भरपूर माहिती मिळते; तर अमेरिकेत ब्रासोलने केलेल्या ज्यू व लोकशाहीविरोधी प्रचाराचे स्वरूप त्याच्याच The World at the Cross roads (Boston, Small, Maynard and Company, 1921) या ग्रंथावरून स्पष्ट होते.

## प्रकरण ११ व १२

युरोप व आशियातील या काळातील राजकीय वातावरणावर माहिती रजनी पाम दत्त यांच्या World Politics (New York, Random House 1936) व शूमनच्या International Politics (▯ edition, New York, McGraw-Hill 1941) या ग्रंथात सापडते, तनाका मेमोरियलचे पुनर्मुद्रण Japanese Imperialism Exposed, The Secret Tanaka Document (New York, International Publishers 1942) या पत्रकात झाले आहे. ग्लिन रॉबर्टस् याने लिहिलेल्या सर हेन्री डेटरडिंगच्या चरित्रात, त्याकाळी डेटरडिंग, हॉफमन व त्यांचे सहकारी यांनी सर्व शक्ती पणाला लावून केलेल्या अनेक सोविएतविरोधी कारवायांची माहिती मिळते.

१९२८ मध्ये प्रो. रामझिनच्या उपस्थितीत पॅरिस येथे झालेल्या बैठकीचा वृत्तांत सोविएत संघाच्या सर्वोच्च न्यायालयापुढे रामझिनने केलेल्या निवेदनावरून घेतलेला आहे. त्या सर्व घटनेचा अहवाल Wreckers on Trial, A Record of the Trial of the Industrial Party, held in Moscow, November-December 1930 (New York. Workers' Library Publishers, 1931) या ग्रंथात प्रकाशित झाला आहे. या अहवालात सोविएत संघावर हल्ला करण्याच्या योजनेचा, व फ्रेंच, ब्रिटिश व जर्मन राजकीय व औद्योगिक नेत्यांशी रामझिन व त्याचे सहकारी यांनी केलेल्या वाटाघाटींचा तरशील सापडतो. चेरव्होनेट्स् खटल्यासंबंधीची हकीकतही ग्लिन रॉबर्टस्ने त्याच्या डेटरडिंगच्या चरित्रात दिली आहे. या संदर्भात अर्न्ट हेन्री यांचा Hitler Over Russia? (New York, Simon and Schuster 1936) हा ग्रंथही मोलाची माहिती देतो.

## प्रकरण १३ व १४

१९३०च्या हिवाळ्यात इंडस्ट्रियल पार्टीच्या कारस्थानी सदस्यांच्या खटल्यासंबंधी हकीकत तत्कालीन वृत्तपत्रांतून व Wreckers on Trial, The Record of The Trial of the Industrial Party held in Moscow, November-December 1930. (New York, Workers' Library Publishers, 1931) या ग्रंथातून प्रामुख्याने घेतली आहे.

अनुक्रमणिका

मार्च १९३१ मधील मेन्शेविक-खटल्यातील साक्षीपुरावे यांची तपशीलवार हकीकत The Menshevik Trial (New York, Workers' Library Publishers, 1931) यांत दिलेली आहे. त्या खटल्यासंबंधी निर्वासित रशियन मेन्शेविकांनी केलेले भाष्य व त्यांच्या सहकाऱ्यांनी सेकंड इंटरनॅशनलमध्ये केलेले भाष्य The Moscow Trial and the Labour and Sosialist International (London, The Labour Party 1931) या पत्रकात ग्रंथित करण्यात आले आहे. याच पत्रकात My Journey to Moscow या शीर्षकाचा राफेल आब्रामोविच याचा लेखही प्रसिद्ध झाला आहे. त्यात त्याने सोविएत संघाविरुद्ध मेन्शेविकांची गुप्त कारस्थानी यंत्रणा अस्तित्वात होती याची कबुली दिली आहे.

विकर्स इंजीनियर्सविरुद्धच्या एप्रिल १९३३ मधील खटल्याचा शब्दश: वृत्तांत Trial of the Vickers Engineers, Official Verbatim Report: Proceedings of Special Session of the Supreme Court of the U.S.S.R. in Moscow, April 12 19, 1933) यात सापडतो.

रशियातील त्याकाळचा ब्रिटिश राजदूत सर एडमंड ओव्हे व सोविएत परराष्ट्र मंत्री मॅक्झिम लिट् विनोव यांच्यात, विकर्स इंजीनियर्स यांना झालेली अटक व त्यांवरील खटले यावर स्पष्टवक्तेपणाने झालेल्या चर्चेचा रोचक वृत्तांत सोविएत सरकारने मास्कोत प्रकाशित केलेल्या Red Paper मध्ये; ॲलन मॉंकहाऊस याला सोविएत सरकारने केलेली अटक व त्याच्याविरुद्ध चालविलेला खटला याची हकीकत मॉंकहाऊसच्या Moscow 1911—1933 (Boston, Little, Brown and Company, 1934) या ग्रंथात, तर विकर्स इंजीनियर्स विरुद्धच्या खटल्यासंबंधीची ब्रिटिश वृत्तपत्रीय प्रतिक्रिया मॉरिस डोंब याच्या The Press and the Moscow Trial (London, Friends of the Soviet Union 1933) या ग्रंथात सापडते.

हिटलर सत्तारूढ होण्यासंबंधीच्या घटनांकरिता मूळ साधने म्हणून प्रामुख्याने कॉनरॅड हेनलिनच्या A History of National Socialism (New York, Alfred A Knopf 1935); अडॉल्फ हिटलर याचे My New Order, Edited with Commentary by Raoul de Roussey de Sates (New York Reynal and Hitchcock 1941), व Mein Kampf, हे ग्रंथ, तर, नाझी सत्तेवर आल्यानंतरच्या काळाकरिता Roosevelt's Foreign Policy, 1933— 1941 (New York William Funk. INC, 1942); फ्रेड्रिक एल्. शूमन याचे Europe on the Eve (New York, Alfred A Knopf 1939); व The Brown Network (New York, Knight Publications 1936); व अन्स्र्ट हेन्री याचे Hitler Over Europe (New York, Simon and Schuster, 1934) व Hitler Over Russia? (New York, Simon and Schuster, 1936) हे दोन दूरदर्शी व अत्यंत रोचक ग्रंथ मोलाचे ठरेल.

### प्रकरण १५, १६

ट्रॉट्स्कीचा जीवनक्रम व कारवाया याबद्दल अत्यंत उपयुक्त माहिती My Life (New York, Charles Scribner's Sons 1931 या त्याच्या आत्मचरित्रात्मक ग्रंथावरून व त्याच्या राजकीय

अनुक्रमणिका

लिखाणावरून मिळते. १९१८ च्या काळातील ट्रॉट्स्कीविषयी समकालिनांची मते ब्रुस लॉकहार्ट याच्या British Agent या ग्रंथात, व ओव्हरमन कमिटीपुढे १९१९ मध्ये रेमंड रॉबिन्स याने केलेल्या निवेदनात सापडतात.

ट्रॉट्स्कीसंबंधी लेनिनची मते जाणून घेण्याकरिता लेनिनचे Selected Works (New York, International Publishers) व Vladimir I. Lenin, A Political Biography Prepared by the Marx-Engels-Lenin Institute, Moscow (New York, International Publishers 1943) हे ग्रंथ उपयुक्त ठरले. बोल्शेविक पक्ष व लेनिन आणि स्टालिन यांविरुद्ध ट्रॉट्स्कीने दिलेला लढा यासंबंधी सोविएतांनी दिलेल्या माहितीकरिता एन. पोपोव याचे Outline History of the Communist Party of the Soviet Union, 2 Vols. (Moscow Leningrad Co-operative Publishing Society of Foreign Workers in the U.S.S.R. 1934); मास्को खटल्यानंतरच्या सोविएत इतिहासाबद्दल नवी माहिती देणारा History of the Communist Party of the Soviet Union (Bolshevik) edited by a Commission of the Central Committee of the C.P.S.U.(B) (New York International Publishers 1939) हे ग्रंथ मोलाची माहिती देतात. क्रांतीपूर्वीच्या व क्रांतीनंतरच्या काळातील ट्रॉट्स्कीच्या राजकीय कामगिरीसंबंधी, The Errors of Trotskyism (London, Centropress, 1925) या ग्रंथात प्रकाशित करण्यात आलेल्या स्टालिन, क्रुप्सकाया, झिनोवीव, कोमेनेव अशा सोविएत नेत्यांच्या भाषणातून माहिती मिळते.

आयझॅक एफ्. मार्कोसन लिखित, Turbulent Years (New York Dodd, Mead and Company 1938); चर्चिल याचे Great Contemporaries; सर बर्नार्ड पारेस याचे Russia (New York. Penguin Books 1943); सिडने व बिॲट्रिस वेब यांचे Soviet Communism; A New Civilization? (New York, Charles Scribner's Sons 1937); ट्रॉट्स्कीलिखित Leon Sedov, Son-Friend-Fighter (New York, Young Peoples' Socialist League-Fourth International-1938) या ग्रंथातून ट्रॉट्स्की व त्याची लेनिन, स्टालिन व सोविएत सरकारविरोधी कारस्थाने यांची माहिती मिळते, तर निर्वासित काळातील ट्रॉट्स्कीच्या कारस्थानांकरिता त्या काळच्या वृत्तपत्रांतून व नियतकालिकांतून अनेक लेख सापडतात. ट्रॉट्स्कीवादी व उजवे कटवाले यांची कारस्थाने, त्यांची परकीय हेरखात्यांशी झालेली हातमिळवणी याबद्दल माहिती मास्को खटल्याच्या अधिकृत अहवालांवरून घेतलेली आहे. ते अहवाल (I) Report of Court Proceedings in the Case of the Trotskyite-Zinovievite Terrorist Center, August 19-24, 1936; (2) Verbatim Report of Court Proceedings in the Case of the Anti-Soviet Trotskyite Centre, January 23-30, 1937 (People's Court of Justice of U.S.S.R. Moscow 1937); व (3) Verbatim Report of Court Proceedings in the Case of Anti-Soviet Bloc of Rightists and Trotskyites, March 2-13, 1938 (Peoples' Court of Justice of U.S.S.R. Moscow 1938) यांत प्रसिद्ध झाले आहेत. ॲक्सिस पंचमस्तंभीयांच्या कारवायांची अत्यंत रोचक अशी तपशीलासह माहिती देणारे, जगाच्या इतिहासातील एका महत्वाच्या काळाकरिता मूळ साधन म्हणून त्या ग्रंथाचे महत्व वादातील आहे.

अनुक्रमणिका

## प्रकरण १७ ते २०

हिटलरच्या उदयानंतर काळातील नाझी–फासिस्ट दहशतवाद व युरोपातील पंचमस्तंभीय संघटना याबद्दल मोलाची माहिती The Brown Network, अर्न्स्ट हेन्री याचे Hitler Over Europe व Hitler Over Russia हे दोन ग्रंथ; कॉनरॅड हाईडेन याचे History of National Socialism या ग्रंथातून मिळते. अंतस्थ आक्रमणाद्वारा विजय मिळविण्याचे ॲक्सिस राष्ट्रांचे तंत्र याबद्दल उपयुक्त माहिती एल्विन एफ. जोन्स याच्या The Battle for Peace (London, Victor Gollancz, Ltd, 1938) या ग्रंथात उपलब्ध आहे. ट्रॉट्स्कीवाद्यांची व उजव्या कटवाल्यांची कारस्थाने यांकरिता, तीन मास्को खटल्यांवरील प्रकाशित अहवाल, वॉल्टर डुरांटी याने न्यूयॉर्क टाईम्सला व जोसेफ ई. बार्नेस याने न्यूयॉर्क हेराल्ड ट्रिब्यूनला व अन्य समकालीन वृत्तपत्रांना पाठविलेले खलिते, ही मूळ साधने महत्वाची आहेत. मास्को खटल्यांचा प्रत्यक्षदर्शी वृत्तांत, न्यूयॉर्क टाईम्स, न्यूयॉर्क हेराल्ड ट्रिब्यून, मँचेस्टर गार्डियन व अन्य अमेरिकन व ब्रिटिश वृत्तपत्रे व नियतकालिके यात सापडतो.

वॉल्टर डुरांटी याचे The Kremlin and the People (New York, Reynal and Hitchcock, 1941), डी. एन्. प्रिट याचे At the Moscow Trial (New York, Soviet Russia Today 1937) व त्याचे इतर लिखाण तसेच जॉन गंथर याचे Inside Europe (New York, Harper and Brothers 1938) यांत मास्को खटल्यांविषयीचे अमेरिकन पत्रकारांचे मत, व त्या खटल्यांचा सारांश व मूल्यमापन, आढळते.

१९३० नंतर सामूहिक सुरक्षेविरुद्ध आंतर्राष्ट्रीय क्षेत्रात झालेली कटकारस्थाने, तसेच परकीय मुत्सद्दी व लष्करवादी यांच्याशी असलेले तुरवाचेवस्कीचे संबंध याबद्दल उपयुक्त माहिती गेनेवीव टाबोईस याचे They call me Cassandra (New York, Charles Scribner's Sons, 1942) व बेला फ्रोमच्या Blood and Banquets, A Berlin Social Diary (New York, Harper and Brothers 1942) या ग्रंथात सापडते. अर्थात् या घटनांकरिता मूळ साधने देणारा एक बहुमोलाचा अनिवार्य ग्रंथ म्हणजे रशियातील तत्कालीन अमेरिकन राजदूत जोसेफ इ. डेव्हिस याचे Mission to Moscow (New York, Simon and Schuster 1941).

## प्रकरण २१

१९३६–३७ या काळातील मास्को खटल्यासंबंधीची ट्रॉट्स्कीची प्रतिक्रिया The Case of Leon Trotsky (Harper and Brothers, 1937) व I Stake my Life, Trotsky's Address to the N.Y.Hippodrome Meeting (New York Pioneer Publishers 1937) या पत्रकात सापडते. मास्को खटल्याबाबतचे ट्रॉट्स्वावादी भाष्य मॅक्स शाक्टमनच्या Behind the Moscow Trials (New York Pioneer Publishers 1936) यात उपलब्ध आहे.मॅक्स ईस्टमन, विलियम हेन्री चेंबरलेन, युजेन लिऑन्स व अन्य सोविएत विरोधकांच्या समकालीन वृत्तपत्रांतील लेखात मेक्सिको येथील ट्रॉट्स्कीची जीवनपद्धती व ट्रॉट्स्कीवादी विचार यांचे प्रतिबिंब पडलेले दिसते. अमेरिकेत त्याकाळी प्रसृत झालेल्या ट्रॉट्स्कीवादी

अनुक्रमणिका

प्रचाराचे स्वरूप The Fourth International व Militant या नियतकालिकांतील लेखांतून स्पष्ट होते. स्पेनमधील फासिस्ट उठावात ट्रॉट्स्कीवाद्यांनी बजावलेल्या भूमिकेचे वर्णन जॉर्ज सोरिआ याच्या Trotskyism in the Service of Franco, A Documented Record of the Treachery by P.O.U.M. in Spain (New York, International Publikshers 1938) या पत्रकात तर चीनच्या राजकारणात ट्रॉट्स्कीवाद्यांनी बजावलेल्या भूमिकेचे वर्णन ॲगनीज स्मेडलेच्या Red Flood Over China (Moscow-Leningrad Cooperative Publishing Society of Foreign workers in the U.S.S.R. 1934) या ग्रंथात आढळते. जोसेफ स्टालिनने कम्युनिस्ट पक्षाच्या केंद्रीय समितीच्या प्लेनमला पाठविलेले सुप्रसिद्ध अहवाल [Mastering Bolshevism (New York, Workers' Library Publishers, 1937) या शीर्षकाखाली प्रकाशित झाले आहेत] ट्रॉट्स्कीवाद्यांच्या रशियातील कारवायांवर बराच प्रकाश टाकतात. ऑगस्ट रेमंड ऑग्डेन याच्या The Dies Committee (Washington, The Catholic University of America Press, 1943) या ग्रंथात डाईस कमिटीशी ट्रॉट्स्कीने केलेल्या वाटाघाटींची माहिती, तर न्यूयॉर्क, टाईम्सच्या त्या काळच्या अंकांत ट्रॉट्स्कीच्या हत्येची माहिती मिळते.

ट्रॉट्स्कीची हत्या म्हणजे स्टालिनने घेतलेला एक क्रूर सूड, हा ट्रॉट्स्कीवाद्यांनी लावलेला त्या घटनेचा अर्थ, अल्बर्ट गोल्डमनच्या The Assassination of Leon Trotsky (New York, Pioneer Publishers 1941) या ग्रंथात, तसेच तत्कालीन अमेरिकन ट्रॉट्स्काईट वृत्तपत्र Militant व त्यात प्रसिद्ध झालेला बेटी क्युहनचा लेख Trial of Trotsky's Murder (एप्रिल १९४३) यात प्रतिबिंबित झाला आहे.

## प्रकरण २२

१९३१—१९४१ या दशकातील घटनांचा सर्वसामान्य वृत्तांत अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याच्या Peace and War: United States Foreign Policy (Washington Department of State 1943) या प्रकाशनात आढळतो. तसेच, फ्रेड्रिक शूमनचे Europe on the Eve (New York, Alfred A Knopf 1939) व Night Over Europe (New York, Harper and Brothers 1938) हे दोन ग्रंथ, जॉन गुंथर याचे Inside Europe (New York, Harper and Brothers 1938); एल्व्हिन जोन्सचे The Attack from Within, The Modern Technique of Aggression (London, Penguin Books Ltd. 1939), जोसेफ डेव्हिस याचे Mission to Moscow (New York, Simon and Schuster 1941), Ambassador Dodd's Diary (New York, Harcourt, Brace and Company 1941), रजनी पाम दत्त याचे World Politics, न्यूयॉर्क टाईम्सचे तत्कालीन अंक, व स्टालिनचा Report on the work of the Central Committee of the Eighteenth Congress of the C.P.S.U. (B) March 10, 1939 (New York, International Publishers 1939) या सर्व मूळ साधनग्रंथातून त्या काळच्या राजकारणासंबंधी महत्त्वाची तपशीलवार माहिती मिळते.

बाल्टिक राज्यांशी सोविएत सरकारचे संबंध व बाल्टिक-बाल्कन क्षेत्रातील व फिनलंडमधील लाल लष्कराच्या हालचाली याबद्दल मूळ साहित्य Soviet Russia Today च्या फाईल्समध्ये सापडते. फ्रांन्सच्या पतनासंबंधित घटनांकरिता पियरे कॉट याचे Triumph of Treason (Chicago-New York, Ziff-Davis

Publishing Company 1944) व पर्टिनाक्सचे The Gravediggers of France (New York, Doubleday, Doran and Company 1944) हे ग्रंथ उपयुक्त ठरले. मूळ साधने म्हणून न्यूयॉर्क टाईम्स व अन्य वृत्तपत्रे व नियतकालिके यांच्या फाईल्सही विशेष महत्वाच्या ठरल्या.

## प्रकरण २३

नाझी जर्मनीच्या सोविएत संघावरील हल्ल्यासंबंधी अमेरिकन वृत्तपत्रांच्या प्रतिक्रियेचा उत्कृष्ट सारांश जॉर्ज सेल्डेस याच्या The Facts are a Guide to Falsehood and Propaganda in the Press and Radio (New York, In Fact, INC 1942) या ग्रंथात आढळतो. श्वेत रशियन निर्वासित व पंचमस्तंभीय यांच्या सोविएतविरोधी कारवायाकरिता लेखकांच्या स्वतःच्याच फाईल्समधील साहित्य उपयुक्त ठरेल. अमेरिकेत त्याकाळी प्रसृत झालेल्या नाझीप्रणीत प्रचाराचे स्वरूप Communism inGermany, the Truth About the Communist Conspiracy on the Eve of the National Revolution (Berlin, Europe House 1933) यातून स्पष्ट होते.

हिटलरच्या उदयानंतर, अमेरिकेत नाझीधार्जीणे असे अमाप प्रचार साहित्य प्रकाशित झाले.त्यात विशेष उल्लेखनीय म्हणजे जर्मन-अमेरिकन बंडचे Deutscher Weckruf and Beobachter फादर चार्लस् ई. कफलिनचे Social Justice; विलियम डडले पेलीचे Liberator; जिराल्ड विनरॉडचे Defender; कोर्ट अशेरचे X-ray; व ई. जे. गार्नरचे Publicity. कॉंग्रेस रिप्रेझेन्टेटिव हॅमिल्टन फिश व जर्मन हस्तक जॉर्ज सिल्व्हेस्टर विरेक यांच्या संबंधाची माहिती वॉशिंग्टनमध्ये (फेब्रुवारी १९४२) फेडरल कोर्टासमोर विरेकच्या झालेल्या खटल्याच्या वेळी फिशचा सचिव जॉर्ज हिल याच्या झालेल्या साक्षीत सापडते; तर वॉशिंग्टन पोस्टमध्ये प्रसिद्ध झालेल्या डिलार्ड स्टोक्सच्या लेखमालेत त्या खटल्याचा समग्र वृत्तांत आढळतो.

जर्मन प्रचार हस्तक पोंल शेफर याच्या कारवायांबद्दलची विलियम ई. डॉडची मते जर्मनीतील त्या अमेरिकन राजदूताच्या दैनंदिनीत—Ambassador Dodd's Diary, Edited by William E. Dodd Jr. and Martha Dodd (New York, Harcourt, Brace and Company, 1941) प्रतिबिंबित झाली आहेत. शेफरच्या अमेरिकेतील सोविएतविरोधी प्रचारकार्याचा भरपूर पुरावा Living Age, Foreign Affairs, Fortnightly Review या व अन्य नियतकीलिकांत सापडतो. मार्टिन डाईस समितीच्या प्रसिद्ध झालेल्या अहवालांतून त्याकाळी फार मोठ्या प्रमाणावर चाललेल्या सोविएतविरोधी प्रचाराचा प्रत्यय येतो. त्या प्रचाराचे आणखी मासलेवाईक नमुने म्हणजे मार्टिन डाईस याचे Trojan Horse in America (New York, Dodd Mead and Company, 1940), व जान वाल्तिनचे Out of the Night (New Youk, Alliance Book Corporation, 1941), अमेरिका फर्स्ट रिसर्च ब्यूरोची बुलेटिन्स् व त्या ब्यूरोची हेराल्ड व स्क्रिब्नेर्स कॉमेंटेटर यातील प्रकाशने.

ग्रेट ब्रिटनमध्ये व मध्य युरोपात १९३८ च्या ग्रीष्मात अनुनयाच्या नीतीला पाठिंबा देणाऱ्या चार्लस ए. लिंडबर्गच्या कारवायांचा वृत्तांत द वीक या इंग्लिश बातमीपत्रात, बेला फ्रोमच्या Blood and Banquets

अनुक्रमणिका

मध्ये, शिकागो ट्रिब्यून, न्यूयॉर्क डेली न्यूज, वॉशिंग्टन टाईम्स–हेराल्ड यांच्या फाईल्समध्ये सापडतो. विलियम सी. बुलिटच्या सोविएतविरोधी कारवायांची माहिती राजदूत डॉडच्या रोजनिशीत आढळते.

## प्रकरण २४

सोविएतविरोधी पोलिश कारस्थानाचा भरपूर कागदोपत्री पुरावा निर्वासित पोलिश सरकारच्या १६ हस्तकांवर सोविएत सरकारने ठेवलेल्या आरोपपत्रात आढळतो. The Case of the 16 Poles (New York, The National Council of American-Soviet Friendship, INC, 1945) यात ते आरोपपत्र भाषांतरित रूपात प्रसिद्ध झाले आहे. या कारस्थानांचा तपशीलवार वृत्तांत खटला चालू असता पोलिश कटवाल्यांनी दिलेल्या साक्षीतून व कबुलीजबाबांतून सापडतो. परदेशातील अमेरिकन पत्रकारांनी त्याबद्दल समग्र माहिती न्यूयॉर्क टाईम्स, न्यू यॉर्क हेराल्ड ट्रिब्यून या वृत्तपत्रांना कळविली होती.

पोलिश निर्वासितांनी रशियात केलेल्या कटकारस्थानांचा संपूर्ण वृत्तांत १८ मे १९४३ रोजी सोविएत परराष्ट्र खात्याचा उपमंत्री ए. वाय्. व्हिशिन्स्की याने ब्रिटिश व अमेरिकन वृत्तपत्रांना दिलेल्या प्रदीर्घ निवेदनात आढळतो. पोलिश राजकारणाच्या पार्श्वभूमीबाबत उपयुक्त माहिती रेमंड लेस्ली ब्युएलचे Poland: Key to Europe (New York, A. A. Knopf 1939) या ग्रंथात सापडते.

## प्रकरण २५ व २६

नाझी जर्मनीविरुद्ध रशियाच्या युद्धकाळातील सोविएत राजकारणावर उत्तम मूळ साहित्य वॉशिंग्टन डी. सी. मधील सोविएत वकीलात आठवड्यातून तीन वेळा प्रकाशित करीत असलेल्या Information Bulletin मध्ये मिळते. हेन्री सी. कासिडी, लॅरी लेसुएर, मॉरिस हिंडुस, लेलँड स्टोवे, रिचर्ड लाऊटेरबाख, एडगर स्नो, राल्फ पार्कर अशा अनेक अमेरिकन पत्रकारांनी युद्धकाळात सोविएत संघाला भेट दिली व तेथील प्रत्यक्षदर्शी वृत्तांत देणारी पुस्तके प्रकाशित केली. सोविएत जनतेने त्याकाळात सोसलेल्या अवर्णनीय हालअपेष्टा व भविष्यात दोस्तांकडून ते करीत असलेल्या सहकार्याची अपेक्षा याबद्दल स्पष्ट चित्त राल्फ पार्कर व मॉरिस हिंडुस यांनी अमेंरिकन वृत्तपत्रांना पाठविलेल्या बातमीपत्रांतून उभे राहते. वेन्डेल विल्कीचे One World (New York, Simon and Schuster, 1943) म्हणजे तेहरान घोषणेची आदर्शतत्वे सारांशाने सांगणारे एका ख्यातनाम अमेरिकन माणसाचे निवेदन आहे. तशाच प्रकारचे अमेरिकन निवेदन, अमेरिकन परराष्ट्र धोरणाच्या अध्ययनानंतर वॉल्टर लिपमनने लिहिलेल्या U.S. Foreign Policy: Shield of the Republic (Boston, Little, Brown and Company and Atlantic Monthly Press, 1943) या ग्रंथात आढळते.

अनुक्रमणिका

## काही अभिप्राय

**जोसेफ डेव्हिस** – (सोविएत संघातील माजी अमेरिकन राजदूत)

'मूळ ऐतिहासिक साधनांच्या पायावर आधारलेले हे एक विश्वासार्ह इतिहास कथन आहे. प्रत्येक अमेरिकन नागरिकाने या ग्रंथाचे परिशीलन करावे इतका हा ग्रंथ मोलाचा आहे.'

**प्रो.एफ्.एल्.शूमन** – (सुप्रसिद्ध इतिहासकार)

'इतिहासाची ही कथा कोणत्याही कांदबरीपेक्षा चित्तथरारक असून सत्यावर आधारलेली आहे. यातील अकल्पनीय वाटणाऱ्या घटनाही पूर्णपणे वादातीत आहेत.'

**हेन्री वॅलेस** – (अमेरिकेचे माजी उपाध्यक्ष)

'आंतर्राष्ट्रीय क्षेत्रातील १९१७ पासूनच्या या घटनांच्या अध्ययनाशिवाय आजच्या जगातील आंतर्राष्ट्रीय संबंधाचे वस्तुनिष्ठ आकलन होणे अशक्य आहे'

**बॅरन्स फिनान्शियल वीकली** –

'इतिहासातील सर्वात महत्वाच्या काळावरील या माहितीपूर्ण ग्रंथामुळे अमेरिका व सोविएत रशिया यांनी परस्परांना वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून समजून घेण्यास मदत होईल अशी खात्री आहे.'

अनुक्रमणिका